**महाराष्ट्र विधानसभा**

**पत्रक भाग – दोन**

**सोमवार, दिनांक २७ ऑक्टोबर, २०२५ / कार्तिक ५, शके १९४७**

**१२२. लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण :-**

विधानसभेचे सन २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक ३० जून, २०२५ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन शुक्रवार, दिनांक १८ जुलै, २०२५ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या व्दितीय (पावसाळी) अधिवेशनात एकूण ३५९ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक १८ जुलै, २०२५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. ३५९ निवेदनांपैकी २६ निवेदने मा. सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आलेली होती व एकूण ३३३ लक्षवेधी सूचनांची निवेदने प्रलंबित होती. आता १६९ निवेदने कक्षात प्राप्त झाली असून ती या सोबत वितरीत करण्यात येत आहेत. उर्वरित प्रलंबित १६४ निवेदनांचा संबंधित मंत्रालयीन विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

तसेच एम.के.सी.एल. तर्फे विकसित करण्यात आलेल्या MOIS या संगणकीय प्रणालीद्वारे सन्मा. विधानसभा सदस्यांनी संपूर्णत: ऑनलाईन (Online) पध्दतीने लक्षवेधी सूचना दिलेल्या असल्यामुळे विधानसभा सदस्यांना ऑनलाईन (Online) पध्दतीने निवेदने प्राप्त होणार असून उर्वरित प्रलंबित निवेदने प्राप्त झाल्यानंतर सर्व विधानसभा सदस्यांना पत्रक भाग -२ द्वारे अवगत करण्यात येईल.

विधान भवन,
मुंबई
दिनांक : २७ ऑक्टोबर, २०२५

**मेघना तळेकर**
सचिव-२,
महाराष्ट्र विधानसभा

**याची प्रत :-**

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य
२) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
३) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
५) सचिव-२, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
६) सचिव-३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
७) सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष
९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
१०) संगणक कक्ष (WEBSITE)
११) एम. के. सी. एल.
१२) अनुवाद कक्ष
१३) प्रतिवेदन कक्ष

## महाराष्ट्र विधानसभा, सन २०२५ चे
## द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.२४६३**

सर्वश्री श्री. देवेंद्र कोठे, वि.स.स. यांनी म.वि.स. नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २४६३ पुढीलप्रमाणे आहे :-

"कोल्हापूर येथील जुना राजवाडा येथील दि. 11/06/2025 रोजी, नोटरी वकील संतोष पाटील व मौलाना अनिस मोहम्मद सुभेदार यांनी मिळून, शर्वरी दिलीप सुर्वे व शाहिद जावेद नकाशे या दोन वेगवेगळ्या धर्मांतील व्यक्तींचा विवाह नोटरीव्दारे लावलेला असणे, 10 ऑक्टोबर, 2024 रोजी केंद्र सरकारच्या विधी व न्याय विभागाच्या अधिसूचनेनुसार, नोटरीच्या माध्यमातून विवाह नोंदणी तसेच घटस्फोट करणे अवैध व नियमबाह्य ठरविलेले असणे, त्यामुळे अशापद्धतीने नोटरी करुन विवाह घडवून आणणे हे उपरोक्त अधिसुचनेचे उल्लंघन असणे, तसेच अशा नोटरीव्दारे झालेल्या विवाहामुळे कोल्हापूर येथील सामाजिक सलोखा धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झालेली असणे, सदर प्रकरणात नोटरी वकिलाची नोटरी लायसन्सची मुदत संपलेली असणे, तसेच विवाहासाठी कोणतेही धर्मातर झालेले नसतानासुध्दा मौलानाव्दारे विवाह घडविण्यात आलेला असणे, यानुसार, सदर दस्तऐवज हे अवैध असून ते फसवणुकीच्या उद्देशाने वापरण्यात आले असणे, त्यामुळे दोन धर्मातील सामाजिक व धार्मिक संवेदनशीलतेला तडा गेलेला असणे, त्यामुळे असे खोटे दस्तऐवज तयार करुन दोन धर्मातील विवाह प्रक्रियेबाबत केलेल्या दिशाभुल प्रकरणातील नोटरी वकील श्री. संतोष गोपाळ पाटील व मौलाना अनिस मोहम्मद सुभेदार यांच्यावर भारतीय न्याय संहिता २०२३ नूसार तात्काळ गुन्हा दाखल करुन नोटरी वकील संतोष पाटील यांची सनद रद्द होण्याबाबत शासनाची भुमिका व आवश्यक उपाययोजना."

---

**विधि व न्याय विभाग**

### मा. मुख्यमंत्री (श्री देवेंद्र फडणवीस) यांचे निवेदन

महाराष्ट्र शासनाच्या विधि व न्याय विभागाच्या अभिलेखानुसार श्री. संतोष गोपाळ पाटील यांची नोटरी म्हणून नियुक्ती महाराष्ट्र शासनाने केल्याचे दिसून येत नाही. या पार्श्वभूमीवर श्री. संतोष गोपाळ पाटील यांची नोटरी सनद रद्द करण्याचे अधिकार नोटरी अधिनियम,१९५२ व त्याखालील नोटरी नियम, १९५६ नुसार महाराष्ट्र शासनास नाहीत.

श्री. संतोष गोपाळ पाटील यांची नोटरी म्हणून नियुक्ती केंद्र शासनाने केलेली असल्यास केंद्र शासनाच्या विधि कार्य विभाग, नवी दिल्ली येथे नोटरी नियम,१९५६ च्या नियम १३ अंतर्गत तक्रार दाखल करुन, संबंधीत नोटरी विरुध्द कायदेशिर कारवाई करता येते.

रोटा H/737 (700-7-25)********

96.

लक्षवेधी सूचना क्र. ८७५

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**मा. श्री. भीमराव केराम, श्री. रामदास मसराम, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ८७५ पुढीलप्रमाणे आहे :-**

"राज्यात गृह विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या पोलीस आयुक्तालयांमधून आदिवासींची तब्बल ३८० राखीव पदे गायब असल्याची धक्कादायक बाब जानेवारी २०२५ मध्ये उघडकीस येणे, विशेषता राज्यात बृहन्मुंबई नवी मुंबई ठाणे, नाशिक पुणे सोलापूर औरंगाबाद अमरावती नागपूर मुंबई पिंपरी चिंचवड मीरा-भाईंदर वसई विरार अशी एकूण बारा आयुक्तालय आहेत. सदर पोलीस आयुक्तालयात गट-अ ते ड संवर्गात एकूण मंजूर पदे ४७ हजार ६६६ आहेत यापैकी अनुसूचित जमातीसाठी ३ हजार ३३१ पदे राखीव आहे. अनुसूचित जमातींची भरलेली पदे ३ हजार १२२ आहे. ३८० पदांचा पूर्वीच्या अनुशेष शिल्लक असणे, जात वैधता प्रमाणपत्र सादर करणाऱ्यांची संख्या २ हजार ७४२ आहे. ३८० जणांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही अधिसंक्य पदावर सेवा वर्ग करण्यात आलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांची संख्या ३८० असणे अधिसंख्य पदावर ३८० जणांना वर्ग केल्यानंतर ती पदे रिक्त दाखवायला पाहिजे होती पण कोणतीच पदे रिक्त दाखविण्यात आलेले नाही बेपत्ता झालेल्या पदांचा छडा लावून आदिवासी समाजाला न्याय द्यावा अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची विशेष पदभरती मोहीम राबविण्यात यावी अशी राज्यातील आदिवासी संघटनांकडून होत असलेली मागणी याबाबत समाजामध्ये पसरलेला तीव्र असंतोष व उद्योग लक्षात घेता शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका"

---

**मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन**

महाराष्ट्र राज्य पोलीस दलाच्या आस्थापनेवर ८ परिक्षेत्रिय कार्यालये, १२ पोलीस आयुक्त कार्यालये, ३६ जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, १९ राज्य राखीव पोलीस बल, १२ पोलीस प्रशिक्षण केंद्र व इतर १३ विशेष अभिकरणे कार्यरत आहेत. या कार्यालयात आकृतीबंधानुसार गट-अ ते गट-ड मधील अधिकारी/कर्मचारी यांची सरळसेवेची १,३३,३९७ पदे व पदोन्नतीची ९३,२६१ पदे अशी एकूण २,२६,६५८ इतकी पदसंख्या मंजूर आहे.

यापैकी, एकुण १२ पोलीस आयुक्त कार्यालयांच्या आस्थापनेवर आकृतीबंधानुसार गट-अ ते गट-ड पर्यंत एकूण १,१०,१९० इतकी पदे मंजूर आहेत.

रोटा H/685 (750-7-25)

सदर मंजूर पदांपैकी गट-ब ते त्यावरील संवर्गाची पदे (पोलीस उपनिरीक्षक ते त्यावरील संवर्गाची पदे व लिपीक वर्गीय अधिकाऱ्यांची पदे) ही पोलीस आयुक्त कार्यालयामार्फत भरली जात नसून, सदर पदे पोलीस महासंचालक कार्यालय व शासन स्तरावरुन भरली जातात. तसेच, गट-ब व त्यावरील लिपीक वर्गीय संवर्गाची पदे पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयामार्फत भरली जातात.

तसेच, सदर मंजूर पदांपैकी गट-क मधील पोलीस शिपाई संवर्गाची पदे सरळसेवेने तर पोलीस हवालदार ते सहायक पोलीस उपनिरीक्षक संवर्गाची पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही संबंधित पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर करण्यात येते. तसेच, मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील कनिष्ठ श्रेणी लिपीकांची पदे सरळसेवेने पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयामार्फत भरण्यात येतात.

राज्य पोलीस दलातील गट-अ ते गट-ड संवर्गातील ( गट-अ भा.पो.से. संवर्गातील २३४ पदे वगळून ) सरळसेवेच्या पदांमधील अनुसूचित जमातीकरीता राखीव असलेल्या पदांची संख्या खालीलप्रमाणे आहे :-

तक्ता क्र.१

| गट | एकूण मंजूर पदे | अ.ज. प्रवर्गाकरीता राखीव पदे (४ + ५) | अ.ज. प्रवर्गाची भरलेली पदे | अ.ज. प्रवर्गाची रिक्त पदे | निर्माण करण्यात आलेल्या अधिसंख्य पदांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| गट-अ | २८७ | २१ | १६ | ५ | ० |
| गट-ब | ५५६७ | ३८९ | ३५२ | ३७ | १ |
| गट-क | १२६८०३ | १२१५७ | १०८७४ | १२८३ | ६१४ |
| गट-ड | ७४० | ६० | ३० | ३० | ११ |
| एकूण | १३३३९७ | १२६२७ | ११२७२ | १३५५ | ६२६ |

एकूण १२ पोलीस आयुक्त कार्यालयांमार्फत अनुसूचित जमातीकरीता आरक्षणाने भरण्यात येणाऱ्या गट-क मधील सरळसेवेच्या पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे -

तक्ता क्र. २

| अ.क्र. | पदनाम | एकूण मंजूर पदे | अ.ज.करीता राखीव पदे (५+६) | अ.ज. ची कार्यरत पदे | अ.ज. ची रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | पोलीस शिपाई | ६१८३० | ४७९२ | ३९३० | ८६२ |
| २ | कनिष्ठ श्रेणी लिपीक (बृहन्मुंबई) | ६६९ | ४७ | १० | ३७ |
| | एकूण | ६२४९९ | ४८३९ | ३९४० | ८९९ |

उक्त तक्ता (२) मध्ये नमूद केल्याप्रमाणे पोलीस आयुक्त कार्यालयाच्या आस्थापनेवर गट-क संवर्गातील अनुसूचित जमातीचे एकूण ८९९ पदे रिक्त आहेत. सदर पदे भरण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे-

१) राज्य पोलीस दलात रिक्त असलेल्या पोलीस शिपाई व चालक पोलीस शिपाई यांच्या पदांची भरती प्रक्रिया राबविण्याकरीता अप्पर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण व खास पथके) यांच्याकडून शासनास प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावात उक्त तक्त्यात स्तंभ ६ येथे नमूद अनुसूचित जमातीतील रिक्त असलेल्या ८६२ ( पोलीस शिपाई ७७७ + चालक पोलीस शिपाई ८५ ) पदांचा समावेश आहे. सदर पदे भरण्यास मान्यता देण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहे.

२) मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील कनिष्ठ श्रेणी लिपीक संवर्गात अनुसूचित जमाती प्रवर्गाकरीता रिक्त असलेली ३७ पदे भरण्याकरीता पोलीस आयुक्त, मुंबई शहर यांचे कार्यालयाकडून बिंदुनामावली अद्यावत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दि. २१/१२/२०१९ मधील तरतुदींनुसार राज्यातील १२ पोलीस आयुक्त कार्यालयाच्या आस्थापनेवरील गट-ब ते गट-ड मधील एकूण ९९२ पोलीस अधिकारी/कर्मचारी/लिपीक वर्गीय कर्मचारी यांना अधिसंख्य पदांवर वर्ग करण्यात आले असून, त्यांचेकरीता अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आली आहेत. सदरहू ९९२ अधिसंख्य पदांपैकी भरण्यात आलेल्या व भरण्याची कार्यवाही सुरू असलेल्या पदांचा गटनिहाय तपशिल पुढीलप्रमाणे आहे -

तक्ता क्र. ३

| अ.क्र. | गट | अधिसंख्य पदे | अधिसंख्य पदामुळे रिक्त झालेली पदे | भरण्यात आलेली पदे | रिक्त पदे | भरण्याची कार्यवाही चालु असलेली पदे | निव्वळ रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | गट-ब | १ | १ | ० | १ | १ | ० |
| २. | गट-क | ९८८ | ९८८ | ७२१ | २६७ | १७१ | ९६ |
| ३. | गट-ड | ३ | ३ | २ | १ | ० | १ |
| एकूण | | ९९२ | ९९२ | ७२३ | २६९ | १७२ | ९७ |

उक्त तक्ता (३) मधील स्तंभ ८ मध्ये नमूद ९७ रिक्त पदांपैकी १ पद हे गट-ड मधील कार्यालयीन शिपाई संवर्गाचे असून, सुधारीत आकृतीबंधानुसार सदर पद मृत घोषित करण्यात आल्याने सदर पद सरळसेवेने भरता येणार नाही. तसेच, गट-क मधील रिक्त असलेली ९६ पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

---

लक्षवेधी सुचना क्र. ३००

महाराष्ट्र विधानसभा, सन २०२५ द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये सर्वश्री. सुधीर मुनगंटीवार मा. विधान सभा सदस्य, यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ३०० पुढीलप्रमाणे आहे-

"चंद्रपूर जिल्ह्यात परराज्यातून निकृष्ट दर्जाचा तांदूळ पुरवठा करून जिल्ह्यात राईस मिलर्सकडून कोट्यावधींचा तांदूळ घोटाळा केला जात असल्याचे माहे जून, २०२५ या महिन्यात उघडकीस येणे, दिनांक १२ जूनच्या रात्री चंद्रपूर शहरातील रहमतनगर बिना गेट परिसरात तांदूळ तस्करीचा एक ट्रक पोलिसांच्या हाती लागल्याने परराज्यातील निकृष्ट दर्जाच्या तांदळाची चंद्रपूरमार्गे तस्करी होत असल्याचे उघड होणे, चंद्रपूर शहरात रहमतनगर बिनबा गेट येथे वाहन क्रमांक एमएच ३४ बीझेड २४२८ या वाहनातुन अवैधरित्या तांदुळाची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळणे, पोलिसांनी रहमतनगर येथे ताज एंटरप्रायजेस समोर असलेल्या ट्रकची तपासणी केली असता त्यात १३ टन तांदूळ प्रती किलो ३० रुपये प्रमाणे एकूण ३ लाख ९० हजार रूपयांचा तांदूळ आणि टाटा कंपनीचा ट्रक किंमत ४ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात येणे, सदर तांदूळाचा साठा हा काशिम यांच्या गोडावून मधुन घेतला व वडसा येथे घेऊन जात असल्याबाबत वाहनचालकाने पोलिसांना सांगणे, चंद्रपूर जिल्ह्यातून धान खरेदी करायचे, त्या धानाची भरडाई करायची आणि चांगला तांदूळ खुल्या बाजारात विकून निकृष्ठ तांदूळ पुरवठा विभागाला करायचा असा हा गोरखधंदा चंद्रपूर जिल्ह्यातील राईस मिलर्स च्या माध्यमातून राजरोसपणे सुरु असणे, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

---

मा. मंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण) यांचे निवेदन

चंद्रपूर जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ व महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ या अभिकर्ता संस्थामार्फत किमान आधारभूत किंमत खरेदी योजनतंर्गत धान खरेदी केली जाते. सदर धानाची भरडाई करुन त्या तांदळाची गुणवत्ता नियंत्रकांमार्फत गुणवत्ता तपासुन सदर तांदूळ शासकीय गोदामांत जमा केला जातो.

चंद्रपूर शहरातील रहमतनगर बिना गेट परिसरात अवैधरित्या तांदुळाची वाहतूक करणारे वाहन क्रमांक एमएच ३४ बीझेड २४२८ हे वाहन पोलिस स्टेशन, रामनगर (चंद्रपूर) यांच्याकडून दिनांक १२ जुन २०२५ रोजी पकडण्यात आले. सदर वाहनामध्ये रु. ३,९०,००० किंमतीचा १३ टन तांदूळ जप्त करण्यात आला आहे. सदर प्रकरणी पोलिस ठाणे, रामनगर येथे अत्यावश्यक वस्तु

कायदा, १९५५ मधील जप्त मुद्देमाल तांदुळ याबाबत गुन्हा नोंदविण्यात आला असुन २ व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. आरोपींशी संबंधित गोदामांची झडती घेण्यात आली असता गोदामांमध्ये रु.९०,००० किंमतीचा ३ टन तांदूळ आढळुन आला. असा एकूण रु. ४,८०,००० किंमतीचा एकूण १६ टन माल जप्त करण्यात आला आहे.

सदर जप्त केलेला तांदुळ शासकीय वितरण प्रणालीमधुन बहाल करण्यात आला आहे का याबाबत परिक्षण करण्यासाठी अन्नधान्य वितरण अधिकारी, चंद्रपूर यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली. सदर चौकशी अहवालानुसार पकडण्यात आलेल्या वाहनात शासकीय पोते आढळून आलेले नाहीत.

चंद्रपुर जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघामार्फत ५,३८,२७५.८५ क्विंटल धानाची खरेदी झाली असून त्यापैकी ५,२५,४७८.०० क्विंटल धान राईस मिलधारकांना भरडाईसाठी देण्यात आला आहे. तसेच आदिवासी विकास महामंडळामार्फत चंद्रपूर जिल्ह्यात १,१९,१९१.९९ क्विंटल धानाची खरेदी झाली असून त्यापैकी ७३,४१६.७७ क्विंटल धान मिलधारकांना भरडाईसाठी देण्यात आला आहे. बेस गोदांमामध्ये ३,३९,२२१.३४ क्विंटल तांदूळ जमा करण्यात आला आहे. त्यापैकी ३,१०,०७०.३८ लक्ष तांदुळ सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत वितरीत करण्यात आला आहे. तर २६,४४८.८७ क्विंटल तांदुळ लातुर जिल्ह्यास उपलब्ध करुन दिला आहे. उर्वरित २७०२.०८ क्विंटल तांदुळ बेस गोदामांमध्ये शिल्लक आहे. जिल्ह्यात अद्याप धानाची भरडाई सुरु असुन त्याचा तांदूळ शासनाकडे जमा होणार आहे.

चंद्रपूर जिल्ह्यामध्ये मागील पाच महिन्यांमध्ये अंत्योदय अन्न योजनेंतर्गत तांदळाच्या प्राप्त नियतनानुसार तांदळाचे वितरण लाभार्थ्यांपर्यंत करण्यात आला आहे. चंद्रपूर जिल्ह्यात धान खरेदी करून, धानाची भरडाई करुन आणि चांगला तांदूळ खुल्या बाजारात विकून निकृष्ठ दर्जाच्या तांदळाचा पुरवठा विभागाला करणेबाबत तथा यासंबंधीत कुठल्याही राईस मिलरची तक्रार तसेच जिल्ह्यामधील कोणताही लाभार्थी धान्याच्या लाभापासून वंचित असल्याची तक्रार प्राप्त झालेली नाही.

---

H/697-19

लक्षवेधी सूचना क्र. १०३०

महाराष्ट्र विधानसभा सन २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम,१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक - १०३० पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यातील गरीब कुटुंबातील प्रवर्गातील लोकांना अंतोदय व प्राधान्य कुटुंब योजनेचा रेशनकार्डचा लाभ मिळत असणे, परंतु एकाच कुटुंबामध्ये २ पेक्षा अधिक भाऊ असतील तर त्या कुटुंबांना विभक्त करताना अंतोदय योजनेचा रेशनकार्ड घेता येत नसल्याचे निदर्शनास येणे, विभक्त झालेले कुटुंब कितीही गरीब असले तरी त्यांना केशरी रेशनकार्ड दिले जाणे, यामुळे एकाच परिवारातील अंतोदय योजनेचा रेशनकार्डचा लाभ घेणारे वेगळे झाल्यामुळे त्यांना त्याचा लाभ मिळत नसणे, राज्यात अंतोदय योजनेकरीता १५००० वार्षिक मर्यादा असून प्राधान्य कुटुंब योजनेत ग्रामीण करीता ४४ हजार व शहरीकरीता ५९ हजार उत्पन्न मर्यादा ठरविण्यात आली असणे, परंतु राज्यात अर्थव्यवस्थेत सुधारणा झाली असून दारिद्रय रेषेखालील व्यक्तींचे उत्पन्न वार्षिक १५००० हजारांहून वर गेले असल्यामुळे शासनाने या योजनेचा लाभ देताना गरीब कुटुंबातील नागरिकांचे आर्थिक उत्पन्न तपासून पाहणे व त्याची मर्यादा वाढवणे गरजेचे असणे, इतर राज्यात अंतोदय योजनेचा लाभाकरीता नागरिकांना एक लाखा पर्यतची उत्पन्न मर्यादा दिलेली असणे, त्याच धरतीवर राज्यातही अंतोदय योजनेकरीता ६० हजार उत्पन्न मर्यादा तर प्राधान्य कुटुंब योजनेकरीता १ लाख उत्पन्न मर्यादा वाढविण्याची आवश्यकता, तसेच योजनेतील रेशनकार्डची मर्यादा ही लोकसंख्येनुसार ठरविण्यात येत असणे, परंतु लोकसंख्यावाढीमुळे इष्टांकाच्या मर्यादेतही वाढ करणे गरजेचे असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

---

श्री.छगन भुजबळ, मा. मंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण) यांचे निवेदन.

राज्यात दि.१ फेब्रुवारी, २०१४ पासून राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ ची अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे. सदर अधिनियमातील तरतूदीनुसार केंद्र शासनाने त्यांच्या दि.२६.०७.२०१३ च्या पत्रान्वये जनगणना २०११ मधील महाराष्ट्र राज्यातील लोकसंख्येच्या प्रमाणात राज्यातील ग्रामीण भागातील ७६.३२ टक्के व शहरी भागातील ४५.३४ टक्के एवढ्या लोकसंख्येस राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमातंर्गत पात्र ठरविले असून त्यानुसार ७,००,१६,६८४. (ग्रामीण- ४,६९,७१,४८१ व शहरी- २,३०,४५,२०३) एवढी लाभार्थ्यांची संख्या निश्चित केली आहे. त्यामध्ये अंत्योदय अन्न योजनेसाठी केंद्र शासनाने २५,०५,३०० शिधापत्रिका आणि प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजनेसाठी ५,९८,१२,७९६ लाभार्थी इतका इष्टांक मंजूर केलेला आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत केंद्र शासनाने मंजूर केलेल्या इष्टांकाच्या मर्यादेत शासनस्तरावरुन

जिल्हानिहाय इष्टांक मंजूर करण्यात येतो व त्यास अनुलक्षून जिल्हाधिकारी स्तरावरून तालुकानिहाय इष्टांक वितरीत करण्यात येतो.

केंद्र शासनाने वेळोवेळी राज्य शासनास केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार शासन निर्णय दि.१७.०७.२०१३ व शासन शुध्दीपत्रक दि.१४.११.२०१३ नुसार अंत्योदय अन्न योजनेसाठी लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी पात्र लाभार्थ्यांचे निकष निश्चित केलेले आहेत. सदर निकष हे सामाजिक असून, आर्थिक बाबींवर आधारीत नाहीत. त्यानुसार कुटुंब प्रमुख असलेल्या विधवा / परित्यक्ता स्त्रिया, दिव्यांग, दुर्धर आजारग्रस्त, कुष्ठरोगी, आदिम आदिवासी कुटुंबे, भूमीहीन शेतकरी, इ. लाभार्थ्यांना अंत्योदय अन्न योजनेचा लाभ देण्यात येत आहे. शासन निर्णय, दि.१७.१२.२०१३ अन्वये प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांचे निकष विहित केले असून, सदर शासन निर्णय व दि.१७.०७.२०१३ च्या शासन निर्णयातील निकषांनुसार पात्रता तपासणी करून विभक्त कुटुंबातील व्यक्तींनादेखील अनुज्ञेय शिधापत्रिका वितरीत करण्यात येतात.

शासन निर्णय, दि.१७.१२.२०१३ नुसार राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी निकष ठरविताना ग्रामीण भागात कमाल रू.४४,०००/- पर्यंत वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असणाऱ्या व शहरी भागात कमाल रू.५९,०००/- पर्यंत वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असणाऱ्या लाभार्थ्यांचा पात्र लाभार्थी म्हणून समावेश करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. यानुषंगाने इतर राज्यातील प्राधान्य योजनेचे निकष, तसेच सामाजिक निकष याबाबत परिपूर्ण अभ्यास करून प्राधान्य कुटुंब योजनेच्या ग्रामीण व शहरी लाभार्थ्यांसाठी सुधारीत निकष निश्चित करण्याची बाब तपासण्याकरीता शासन निर्णय दि.११.०४.२०२५ अन्वये नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर समितीचे कामकाज सुरु असून, समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजनेची वार्षिक उत्पन्न मर्यादा वाढविण्याबाबत शासनस्तरावर निर्णय घेण्यात येणार आहे.

राज्यामध्ये सन्माननीय लोकप्रतिनिधी तसेच क्षेत्रीय पुरवठा यंत्रणांकडून वारंवार इष्टांक सुधारीत करण्याची मागणी करण्यात येते. त्यामुळे २०११ च्या जनगणनेअंती प्रसिद्ध आकडेवारीनुसार महाराष्ट्र राज्यांसाठी देण्यात आलेल्या ७,००,१६,६८४ इतक्या लाभार्थी इष्टांकामध्ये वाढ करुन, ८,२०,६१,३४२ इतका लाभार्थी इष्टांक देण्याची मागणी दि.०७.०३.२०२२ च्या शासन पत्रान्वये केंद्र शासनाकडे करण्यात आलेली होती.

आता, राज्य शासनाच्या दि. २४.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सध्या सुरू असलेल्या देशव्यापी जनगणना कार्यक्रमामुळे, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम,२०१३ (NFSA) योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांची संख्या लक्षणीयरीत्या वाढण्याची शक्यता जास्त आहे. म्हणून या अपेक्षित वाढीला सामावून घेण्यासाठी लाभार्थी लक्ष्यात लवचिकता आणावी आणि राज्य संसाधनांवर किंवा प्रशासकीय क्षमतेवर अनावश्यक भार न पडता सर्व पात्र नागरिकांना त्यांचे योग्य हक्क मिळतील यासाठी उपाययोजना करण्याची विनंती केंद्र शासनास केलेली आहे.

-------------------

२०५.

लक्षवेधी सूचना क्र.१७६८

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन

**मा. श्री. श्याम खोडे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. १७६८ पुढीलप्रमाणे:-**

"विदर्भातील सरळ खरेदी धारक प्रकल्पग्रस्तांना मंजूर झालेला ८३२ कोटी रुपयाचा सहानुग्रह अनुदानाचा निधी अध्याप मिळालेला नसणे, दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये विदर्भातील सरळ खरेदीधारक प्रकल्पग्रस्तांना प्रति हेक्टर पाच लक्ष रुपये दराने १६६३३ हेक्टर आर क्षेत्राकरिता ८३२ कोटी रुपये वितरित करण्याचे आदेश होऊनही विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने खरेदी धारकांच्या खात्यावर हा निधी वर्ग केलेला नसणे, त्यामुळे विदर्भातील असंख्य सरळ खरेदी धारक प्रकल्पग्रस्तांना सानुग्रह अनुदान न मिळाल्याने ते आर्थिक अडचणीत येत असणे, त्यामुळे त्या शेतकऱ्यांना शेतीच्या हंगामाकरिता बँकेकडून अथवा सावकारांकडून कर्ज काढावे लागत असणे ते कर्जही त्यांना मिळत नसल्याने ते मोठ्या आर्थिक समस्येत येणे, त्यामुळे विदर्भातील सरळ खरेदी धारक प्रकल्पग्रस्तांनी आंदोलनाचा इशारा दिला असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना."

## मा. मंत्री, जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) यांचे निवेदन

महामंडळाचे नियामक मंडळाच्या ८५ व्या बैठकीत ठराव क्र.८५/१७ अन्वये सन २००६ ते २०१३ दरम्यान विदर्भातील सिंचन प्रकल्पांसाठी सरळ खरेदीने संपादीत क्षेत्राकरीता रु.५.०० लक्ष प्रती हे. दराने अंदाजे १६६३३.४२ हे. आर. क्षेत्राकरीता रु.८३१.६७१ कोटी रुपये सानुग्रह अनुदान स्वरुपात भुगतान करण्याकरीता नियामक मंडळाची मान्यता प्राप्त झाली. त्या अनुषंगाने महामंडळ कार्यालयाच्या दि. १५/१०/२०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये महामंडळांतर्गत सर्व अधीक्षक अभियंता यांना मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

सानुग्रह अनुदान हे सरळ खरेदीने संपादीत भूधारकांना देण्यात येत असून, सरळ खरेदी प्रकल्पांमध्ये न्यायालयीन दाद मागण्याची मुभा नाही. सबब, नैसर्गीक न्यायाचे तत्व लागु करुनच सहानुभुतीपुर्वक निर्णय घेवुन शासनाने विशेष बाब म्हणुन सानुग्रह अनुदानाची मागणी मान्य केली आहे. सदरचे अनुदान वाटप करण्याकरीता क्षेत्रफळ, लाभधारक, मृत लाभधारकांचे वारसदार इत्यादी आवश्यक बाबींच्या दृढीकरणासाठी आवश्यक दस्तऐवज आणि प्रतीज्ञालेख घेण्यात येत असून, याप्रमाणे आवश्यक कार्यवाही करुन प्रकल्पनिहाय उपलब्ध निधीमधून टप्प्या टप्प्याने अनुदान वाटप सुरु करण्यात आलेले आहे.

सद्यः स्थितीमध्ये प्रकल्पाच्या शीर्षावर उपलब्ध निधीमधुन रु.१४१.४४ कोटी निधी वितरित करण्यात आला आहे. सदर निधीचे वितरण दस्तऐवजाची पुर्तता करुन करण्यात येत आहे. आजतागायत लाभार्थ्यांना रु.५६.२० कोटी रुपयाचे वाटप करण्यात आलेले आहे. उर्वरित सानुग्रह अनुदानाचे वाटप निधीचे उपलब्धतेनुसार करण्याचे नियोजित आहे.

********************

रोटे H/660 (750-7-25)

लक्षवेधी सूचना क्र.१७८९

## महाराष्ट्र विधानसभा

### सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये मा.श्री. किशोर पाटील, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १७८९ पुढीलप्रमाणे:-

"पाचोरा-भडगांव मतदार संघात (जि. जळगांव) १. वाडे, २. पांढरद, ३. भडगांव, ४. परधाडे, ५. माहेजी याठिकाणी गेल्या ३० वर्षापासून मतदार संघातील शेतक-यांची बंधा-यांची मागणी असणे, सन २०१९ ला राज्य शासनाने बलून बंधा-यांना प्रशासकीय मान्यताही देण्यात येणे, त्या सात बलून बंधा-यांची किंमती ७०० कोटी होती परंतु आजची सुधारित अंदाजित रक्कम बलून बंधारे बांधण्यासाठी जवळपास १५०० कोटी रूपये होणे, पाच बंधारे पाचोरा-भडगांव मतदार संघात असून त्याठिकाणी पक्के सिमेंट कॉक्रिटचे बंधारे बांधल्यास एका बंधा-याला अंदाजे २५ कोटी रूपये लागतील असे एकूण १२५ कोटी रूपयांत माझ्या मतदार संघातील सिमेंट कॉक्रिट बंधारे कमी खर्चात होणे शक्य असणे, याकरिता पाचोरा-भडगांव मतदार संघातील मंजूर बलून बंधारे ऐवजी पक्के सिमेंट कॉक्रिटचे बंधारे बांधण्यास मंजूरी देऊन त्यांस लागणारा निधी उपलब्ध करून देण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.२९.१.२०२५ च्या सुमारास मा.जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन देण्यात येणे, यासंदर्भात अद्यापही शासनाने कोणताच निर्णय घेतला नसल्याने ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका"

---

### मा.मंत्री,जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) यांचे निवेदन

जळगांव जिल्हयातील गिरणा नदीवरील सात बंधारे (Pneumatically operated gated weirs) या प्रकल्पास शासनाने दिनांक २८/१२/२०१८ रोजी रू.७११.१५ कोटी (दरसुची सन २०१३-१४) एवढया किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. सदर मध्यम प्रकल्पाच्या अंतर्गत १) मौजे.मेहूणबारे ता.चाळीसगांव २) मौजे.बहाळ ता.चाळीसगांव ३) मौजे.पांढरद ता.भडगांव ४) मौजे भडगांव ता.भडगांव ५) मौजे.परधाडे ता.पाचोरा ६) मौजे. कुरंगी ता.पाचोरा ७) मौजे. कानळदा ता.जळगांव असे एकूण गिरणा नदीवर ७ बंधारे (Pneumatically operated gated weirs) प्रस्तावित आहे. शासनाने सदरची प्रशासकीय मान्यता प्रदान करतांना प्रकल्पासाठी आवश्यक १०० टक्के रक्कम केंद्र शासनाकडून उपलब्ध करून घेण्यात यावी अशी अट समाविष्ट केली आहे.

(क्रमाप)

सद्य:स्थितीत सदर प्रकल्पाचा केंद्र शासनाच्या कुठल्याही योजनेत समावेश नसल्याने कामास सुरूवात झालेली नाही. सदर प्रकल्पाचा रू. १२०५.७२ कोटी (दरसुची २०२२-२३) किंमतीचा प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवाल मंजूरीसाठी शासनास प्राप्त झाला असून त्यावर उपस्थित झालेल्या शे-यांची पूर्तता करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरू आहे.

उपरोक्त ७ Pneumatically operated gated weirs बंधाऱ्यांमध्ये लक्षवेधी सुचनेत नमुद १) पांढरद २) भडगांव ३) परधाडे व ४) माहेजी / कुरुंगी या ०४ बंधाऱ्यांचा समावेश आहे. प्रशासकीय मान्यता प्राप्त ७ बंधारे संधानकात प्रस्तावित असून संधानकाची उंची ०.९८ मी. ते २.६१ मी. या दरम्यान असुन बंधाऱ्यावरील Pneumatically operated gate ची उंची २.५० मी. ते ५.५० मी या दरम्यान आहे. त्यानुसार बंधाऱ्याची एकुण उंची ३.४८ मी. ते ८.११ मी. आहे.

पाचोरा भडगाव मतदारसंघातील मंजूर बलुन बंधा-याऐवजी पक्के सिमेंट क्राँक्रीटचे बंधारे बांधण्याच्या मागणीच्या अनुषंगाने असे सादर करण्यात येते की,उपरोक्त ७ बंधाऱ्यांची संकल्पने मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांच्या कडून करुन घेण्यात आलेली आहेत. सदरचे संकल्पन मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक कडून प्राप्त करतांना Conventional Barrage (पारंपारिक बंधारा) व Pneumatically operated gated weirs या दोन्ही प्रकाराचा संकल्पनाचा सन २०१६ मध्ये तुलनात्मक आर्थिक अभ्यास करण्यात आला होता.त्यानुसार सारख्याच आकारमानाच्या Conventional पध्दतीचे ७ Concrete बंधाऱ्याची किंमत क्षेत्रीय परिस्थितीनुसार सर्वसाधारण सरासरी रु.११० कोटी होती. सदरची किंमत प्रचलित सन २०२२-२३ च्या दरसुचीनुसार नक्कीच जास्त येणार आहे. त्यामुळे "पक्के सिमेंट क्रॅाकीटचे बंधारे बांधल्यास एका बंधाऱ्याला अंदाजे रु.२५ कोटी रुपये लागतील असे एकुण १२५ कोटी रुपयात ५ सिमेंट क्रॅाकीटचे बंधारे होणे शक्य असणे " ही बाब वस्तुस्थितीस धरुन नाही.

सिमेंट नाला बंधारे यांच्या बांधकामासाठी राज्य शासनाने जलसंधारण विभागामार्फत शासन निर्णय दिनांक २८.०२.२०१४ व दिनांक १२.११.२०१३ अन्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार "बंधाऱ्याची लांबी ५० मीटर पेक्षा जास्त असू नये व उंची ३.०० मी. पेक्षा जास्त असु नये." असे शासनाचे निर्देश आहेत. गिरणा नदीवरील या सात बंधाऱ्यांची सरासरी लांबी ही २०० मीटर ते ३३० मीटर इतकी आहे व नदीपात्रापासून उंची ३.४८ मी ते ८.११ मी इतकी आहे. त्यामुळे Conventional पध्दतीचे Concrete बंधारे बांधण्याऐवजी Pneumatically operated gated weirs या पद्धतीचे बंधारे बांधण्याचे नियोजित आहे.

---

एच-८०८-१अ.

लक्षवेधी सूचना क्र. १४१

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. भास्कर जाधव, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १४१

"रत्नागिरी येथे कांदळवन व वनविभागातर्फे माहे फेब्रुवारी २०२५ मध्ये एका अलिशान हॉटेलमध्ये कांदळवन प्रशिक्षण कार्यशाळेचे करण्यात आलेले आयोजन, सदर कार्यशाळेस पोलिसदल, कस्टम, कोस्टगार्ड, मत्स्यविभाग, मच्छीमार सोसायटी, सुरक्षादल कर्मचारी अशा केवळ १३० जणांची उपस्थिती असणे, केवळ चार तासांसाठी झालेल्या कार्यशाळेसाठी तब्बल ७.५० लाख रुपये खर्च करण्यात आल्याचे दाखविण्यात येणे, या प्रशिक्षणासाठी झालेल्या खर्चामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर या प्रकरणाची चौकशी करण्याचे मा. पालकमंत्री, रत्नागिरी यांनी दिलेले आदेश, तथापि त्यावर अद्याप कोणतीही कार्यवाही न झाल्याने सदर आदेशांची करण्यात आलेली पायमल्ली, त्यामुळे मा. पालकमंत्री यांचे आदेश न मानून सदर प्रकरणाची चौकशी न करणारे अधिकारी देखील या भ्रष्टाचारात सहभागी असल्याची नागरिकांची झालेली भावना, याप्रकरणी संबधितांवर कठोर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, या बाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

श्री. गणेश नाईक

मा.मंत्री (वने)

निवेदन

कांदळवनांच्या संरक्षणाबाबत जनजागृती, कांदळवन व त्यावर अवलंबून परिसंस्थेचे फायदे-तोटे, मच्छिमारांच्या जाळयात अडकलेल्या दुर्मीळ प्रजातींची सुटका व त्यापोटी मासेमारी जाळयाच्या झालेल्या नुकसानीची भरपाई बाबतच्या अटी व शर्ती, जखमी वा मृत डॉल्फीन/शार्क मासा इत्यादी समुद्रजीवांवर उपचार करणे, त्यांना पुन्हा समुद्रात सोडणे इत्यादी विषयांवर सखोल माहिती देणे व साधकबाधक चर्चा करणे व त्याबाबतचे प्रात्यक्षिक दाखवणे याकरिता "Marine Animal Stranding Response" या विषयावर कांदळवन प्रतिष्ठान व मे. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ११/०२/२०२५ रोजी रत्नागिरी येथे एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यशाळेस विविध क्षेत्रातील तज्ञ, वन विभाग चिपळूण (प्रादेशीक) अधिकारी/कर्मचारी, मत्स्यविभाग रत्नागिरी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, स्थानिक मच्छीमार, मासेमारी सहकारी संस्था, स्वयंसेवी संस्था (वाईल्ड लाईफ कंझर्वेशन सोसायटी), सह्याद्री निसर्ग मित्र, सृष्टीज्ञान फाऊंडेशन, निसर्ग सोबती, सृष्टी कंझर्व्हेशन फाऊंडेशन, कोस्टल गार्ड, नेव्ही, पोलीस विभाग, कस्टम विभाग, पत्रकार, कांदळवन कक्ष, मुंबई, रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग, मे.बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे पदाधिकारी, कर्मचारी असे विविध क्षेत्रातील एकूण १३५ जण उपस्थित होते. सदरची कार्यशाळा सकाळी १०.३० ते सायंकाळी ६.०० पावेतो कार्यान्वित होती व त्यास उक्त नमूद लोकांचा उत्तम प्रतिसाद प्राप्त झाला.

(शेटा) एच-८७५ (८५०-८-२०२५)-१ (क्रमशः)

रत्नागिरी येथे वन विभागाचे विश्रामगृह नाही तसेच शासकीय विश्रामगृहात एकूण १२ कक्ष असून त्यापैकी सर्व कक्ष दि. १०/०२/२०२५ व दि. ११/०२/२०२५ रोजी उपलब्ध नव्हते. त्याचप्रमाणे एकूण १२० ते १५० प्रशिक्षणार्थी बसू शकतील अशा क्षमतेचे सभागृह उपलब्ध नव्हते. प्रस्तूत कार्यशाळेकरिता रत्नागिरी येथे इतर जिल्हयातून येणारे तज्ञ/ शासकीय /अशासकीय १५ सदस्यांकरिता निवासाची सोय, वाहतूकीकरिता वाहन व्यवस्था व साधारण १२० ते १५० लोकांची बैठक व्यवस्था असलेले सुसज्ज सभागृह व इतर अत्याधुनिक सुविधा जसे LED Screen, माइक्रोफोन इ. व्यवस्थेचे नियोजन आवश्यक होते.

यास्तव, वनक्षेत्रपाल रत्नागिरी (कांदळवन) यांनी त्यांचे कार्यालयातील नोटीस बोर्डवर जाहिरात प्रसिध्द करुन याबाबतची दरपत्रके मागविलेली होती. त्यानुसार "सावंत पॅलेस, रत्नागिरी" यांचे दरपत्रक कमीतकमी दराचे असल्याने त्यांना मंजूरी देऊन निवड करण्यात आली. प्रस्तूत प्रकरणी कोणताही गैरव्यवहार झालेला नाही.

---

एच-७९५-१३अ

लक्षवेधी सूचना क्र. २०२६

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री सुनिल कांबळे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. २०२६

"महोदय, मौजे शिरुर, जि, पुणे येथील फॉरेस्ट कंपर्टमेंट ४२१ वन गट क्र. ११४० ही जमीन महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाची असणे, सदर जमिनीवर शासनाची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृत धार्मिक स्थळाचे बांधकाम केलेले असणे, धार्मिक स्थळाच्या बांधकामासाठी गृह विभागाची पूर्वपरवानगी घेणे कायद्याने बंधनकारक असणे, परंतु सदर धार्मिक स्थळाच्या बांधकामासाठी गृह खात्याची परवानगी घेतलेली नसणे, जुन्नर वन सर्वेक्षकांनी केलेल्या मोजणीमध्ये हे अतिक्रमण सिध्द झालेले असणे, सदर वन जमिनीवरील अतिक्रमणामध्ये वन गुन्हा अद्यापपर्यंत नोंदविलेला नसणे, अशा प्रकारे वन जमिनीवर होणाऱ्या अतिक्रमणांमुळे राज्यातील वनक्षेत्रफळ वेगाने घटत असणे, सदर बाब अत्यंत गंभीर असल्याने राज्यातील वनजमिनीवरील अनधिकृत अतिक्रमणे निष्कासित करण्यासाठी राज्य शासनाने विशेष मोहिम राबवणे आवश्यक असणे, तसेच वन जमिनींवरील अतिक्रमणांची जिल्हानिहाय यादी सार्वजनिक संकेत स्थळावर प्रसिध्द करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा.मंत्री (वने) — श्री. गणेश नाईक

निवेदन

मौजे शिरुर, जि, पुणे येथील फॉरेस्ट कंपार्टमेंट ४२१ वन गट क्र. ११४० मधील क्षेत्र २६.७१ हे. आर राखीव वन क्षेत्र असून ते शिरुर शहराच्या मध्यभागी आहे. सदर क्षेत्राच्या चारही बाजूंनी दाट मन्युष्यवस्ती आहे. वनक्षेत्र सर्व्हेक्षक यांच्या मार्फत दि. ६/०२/२०२५ रोजी सदर क्षेत्राचे सर्व्हेक्षण व सिमांकन करण्यात आले असून सदर सर्व्हेक्षणानुसार गट क्र.११४० च्या पश्चिम बाजूस सखल भागात सरकार हजरत आली दर्गा, असे लिहिलेले बांधकाम वनक्षेत्रात असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर अनधिकृत बांधकामाविरुध्द वनपरिक्षेत्र अधिकारी, शिरुर यांनी दि.१८/०४/२०२५, दि.२०/०५/२०२५ व दि. ६/६/२०२५ रोजी भारतीय वन अधिनियम, १९२७ अंतर्गत कारवाईसाठी नोटीस बजावलेल्या आहेत.

सदर अनधिकृत बांधकामाबाबत भारतीय वन अधिनियम १९२७ च्या कलम २६(१)(H) अन्वये वनपरिमंडळ, शिरुर यांनी राउंड गुन्हा क्र ओ-०३/२०२५, दि. १९/०६/२०२५ रोजी अज्ञात इसमाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. सदर वनगुन्हे प्रकरण तपासाधिन आहे.

सदर अनधिकृत बांधकामाच्या ठिकाणी कोणतीही अवैध कृती तसेच संशयास्पद वस्तु आढळून आलेली नाही. तसेच सदर अनधिकृत बांधकाम निष्कासनाची कार्यवाही करण्यात येत आहे.

------------

लक्षवेधी सूचना क्र.२२३२

# महाराष्ट्र विधानसभा

द्वितीय (पावसाळी) अधिवेशन (जुलै,२०२५)

**सर्वश्री रईस शेख, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२२३२ पुढीलप्रमाणे आहे:-**

" राज्यातील मराठी युवकांना जर्मनीत रोजगार मिळावा या उददेशाने जर्मन भाषेचे प्रशिक्षण देण्याची घोषणा शिक्षण विभागाने करणे, याबाबत जर्मनीतील बाडेन व्युटेनवर्गचे स्थानिक शासन व महाराष्ट्र सरकार यांच्यामध्ये जून, २०२२ मध्ये करार होणे, त्यानुसार २०२४ मध्ये राज्यभरातून ३२ हजारापेक्षा अधिक उमेदवारांनी जर्मन भाषेच्या प्रशिक्षणासाठी नोंदणी करणे, ७,५०० विदयार्थ्यांची निवड, निवड होऊनही अदयाप अंमलबजावणी न होणे, जर्मन भाषा प्रशिक्षणासाठी एससीआरटीला अनेक शिक्षण संस्थाकडून संमतीपत्र मिळाले असून या संस्था इच्छुक असणे, मुंबईत १५ केंद्रे सुरु, सदर संस्थांना अनुदान मंजूर करुन संस्थांना प्रोत्साहन देण्याची आवश्यकता, सदर उपक्रमाकरिता ७६ कोटीची तरतुद असणे, सदर प्रकल्पामुळे महाराष्ट्रातील ४ लाखांहून अधिक कुशल तरुणांना रोजगार प्राप्त होणे, तसेच महाराष्ट्र सरकारचे जर्मनीतील स्टुटगार्ट येथील प्रतिनिधी कार्यालय जुलै-ऑगस्ट, २०२४ दरम्यान " महाराष्ट्र हाऊस " चे उदघाटनदेखील करण्यात येणे, सदर प्रक्रिये विलंब होत असल्याने कुशल तरुण रोजगारापासून वंचित असणे, त्यांच्यात नैराश्याची भावना निर्माण होणे, यासंदर्भात शासनाने लक्ष घालून जर्मन प्रशिक्षण केंद्र तात्काळ सुरु करुन जर्मनमध्ये तरुणांना रोजगार उपलब्ध व्हावा याद्दष्टीने पावले उचलण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

श्री. दादाजी भुसे, मा.मंत्री शालेय शिक्षण यांचे निवेदन

**जर्मन प्रशिक्षण केंद्र तात्काळ सुरु करुन जर्मनीमध्ये तरुणांना रोजगार उपलब्ध व्हावा या दृष्टीने पावले उचलण्याची आवश्यकता याबाबत शासनाने केलेली कार्यवाही-**

महाराष्ट्र शासन व बाडेन वुटेनबर्ग (जर्मनी) यांच्या दरम्यान दिनांक २५ फेब्रुवारी, २०२५ रोजी सामंजस्य करार करण्यात आलेला आहे. सदर करारानुसार महाराष्ट्रातील कुशल मनुष्यबळ जर्मनी देशात पुरविण्यात येणार आहे. दि.११.०७.२०२४ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे सदर प्रकल्पास मान्यता देण्यात आली.

राजभवन, मुंबई येथे दिनांक ०९ ऑगस्ट. २०२४ रोजी ग्योथे इन्स्टिट्यूट, पुणे व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या दरम्यान जिल्हास्तरावर जर्मन भाषा प्रशिक्षण वर्ग सुरु करण्याबाबत सामंजस्य करार करण्यात आला आहे.

जर्मन भाषेच्या प्रशिक्षणासाठी सद्यस्थितीत ३२१६७ उमेदवारांची नाव नोंदणी झालेली आहे. जिल्हा स्तरावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेद्वारे तज्ञाच्या सहायाने उमेदवारांची शैक्षणिक पडताळणी प्रक्रिया दोन टप्यात झालेली असून सिंधुदुर्ग व कुडाळ येथे पथदर्शी प्रकल्प वगळता अद्याप कोणत्याही जिल्ह्यात उमेदवाराची निवड करण्यात आलेली नाही. याबाबत बाडेन वुटेनबर्ग

या राज्याशी चर्चा व अन्य आवश्यक प्रक्रिया सुरु आहे. सर्व प्रक्रिया अंतिम झाल्यानंतर याबाबत पुढील कार्यवाही केली जाणार आहे.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांना जर्मन भाषा प्रशिक्षणासाठी काही संस्थांकडून संमतीपत्र प्राप्त झाले आहेत. परंतु सदर बाबत ही सशर्त असून अद्याप कोणत्याही संस्थेस परवानगी देण्यात आलेली नाही.

मुंबई मध्ये जर्मन भाषा प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण वर्गासाठी प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई यांच्याद्वारे १५ केंद्रे निश्चीत करण्यात आली आहेत. पथदर्शी प्रकल्पाबाबतच्या सर्व प्रक्रिया अंति करण्याबाबत प्रक्रिया अद्याप सुरु आहे.

सदर प्रकल्पासाठी दि.११.०७.२०२५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे सन २०२४-२५ साठी रु.७६.०० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आला होता. यापैकी रु.१०.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. सदर उपक्रमाची व्यापक प्रसिध्दी, सिंधुदुर्ग व कुडाळ येथील प्रशिक्षणार्थ्यांचे व स्थानिक स्वराज्य संस्थेतील शिक्षण प्रशिक्षणार्थी यांचे परीक्षा शुल्क व जिल्हा स्तरावरील उमेदवार पडताळणी प्रक्रिया या बाबत निधी खर्च करण्यात आलेला आहे.

जर्मन प्रशिक्षण केंद्र तात्काळ सुरु करुन करुन रोजगार उपलब्ध व्हाया या दृष्टीने पुढील प्रक्रिया सुरु आहे:-

- जर्मनी येथे पुरविण्यात येणाऱ्या मनुष्यबळाला जर्मन भाषा शिकविण्यासाठी ग्योथे संस्था, पुणे यांचेकडून घेतली जाणारी A१, A२, B१, B२ इत्यादी स्तरनिहाय परीक्षा उत्तीर्ण होणे अपेक्षित आहे.
- सदर परीक्षा उत्तीर्ण होणे करिता संबंधित ग्योथे संस्था पुणे च्या द्वारे प्रशिक्षण देण्याचे प्रस्तावित आहे.
- आयुक्त कार्यालय, पुणे यांचे पत्रानुसार सर्व विभागीय उपसंचालक यांना सदर प्रशिक्षण वर्गाकरिता वर्ग खोल्या उपलब्ध करून देण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.
- जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेद्वारे प्रशिक्षण वर्गाकरिता जिल्हास्तरावर दिलेल्या सूचनेनुसार ५ वर्ग खोल्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.
- महाराष्ट्रातून पुरविण्यात येणाऱ्या ३४ प्राविण्य क्षेत्रातून निवडण्यात येणाऱ्या कुशल मनुष्यबळाला आवश्यक दर्जा प्राप्त करून देण्यासाठी मार्गदर्शन करणे, समुपदेशन करणे, आवश्यक साहित्य व पुस्तके तयार करण्यासाठी सल्ला देणे, वर्गावर दर्जात्मक सनियंत्रण ठेवण्यासाठी दिशादर्शकाचे काम करण्याच्या दृष्टीने सल्लागार समिती स्थापन करण्यात आलेली आहे

जर्मनीतील बाडेन वुटेनबर्ग या राज्याला कुशल मनुष्यबळ पुरविणे या पथदर्शी प्रकल्पाबाबतच्या सर्व प्रक्रिया अंतिम करण्याबाबत बाडेन वुटेनबर्ग जर्मनी या राज्याशी शासन स्तरावरुन चर्चा आणि अन्य आवश्यक प्रक्रिया सुरु आहे. त्या विषयीच्या सर्व प्रक्रिया अंतिम झाल्यानंतरच या बाबतची पुढील कार्यवाही केली जाणार आहे.

**********************************

H/726-19

लक्षवेधी सूचना क्र. १८२४

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय अधिवेशन

श्री. राजेश पाडवी, मा. वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १८२४ पुढीलप्रमाणे आहे :-

"शहादा विधानसभा मतदारसंघातील शहादा तालुक्यातील राट्यावड धरण हे एक ऐतिहासिक महत्त्व असलेले धरण असणे, त्याचे भूमिपूजन १९८५ साली झाले असणे, सन २०१४ ते २०१९ कालावधीत धरणाच्या कामासाठी पायाभरणी करण्यात आली असणे, त्यानंतर धरणाचे ८० टक्के काम पूर्ण झाले असून, धरणाच्या उर्वरित कामासाठी सुमारे दहा ते बारा कोटी रुपये निधी आवश्यक असणे, हा निधी मिळाल्यास या धरणाची पूर्णत्व होणार असणे, परिसरातील कोरडवाहू जमिनी सिंचित होऊन सुजलाम सुफलाम होणार असणे, अनेक वर्षापासून परिसरातील आदिवासी शेतकऱ्यांची मागणी असणे, अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपायोजना व शासनाची प्रतिक्रिया."

********************************************

**मा.मंत्री (मृद व जलसंधारण) यांचे निवेदन**

नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील मंदाणे रहाट्यावाड गावाजवळ असलेल्या खापऱ्या नाल्यावर १९८५ साली भूमिपूजन झालेले ल.पा. योजनेचे बांधकाम सुरु करण्यात आले. सदर योजनेच्या कामासाठी आर्थिक तरतूद न झाल्याने मूळ प्रशासकीय मान्यतेस १५ वर्षाचा कालावधी झाल्याने दि.२०.१२.१९९९ च्या शासन निर्णयातील (दरसूची सन १९९९-२०००) नुसार मूळ प्रशासकीय मान्यता (व्यपगत) रद्द करून नव्याने प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सन २००१ मध्ये सदर कामात सा.क्र. ० ते २३० मी. धरणाच्या संरेखा आणि त्यालगतच्या वन जमीनीवरील अतिक्रमण धारकांच्या व बुडीत क्षेत्रातील वन जमीनीवरील अग्रोसिल्व्ही प्लॉट धारकांचा विरोध होता. त्यामुळे सदर काम जानेवारी, २००५ पासून ते २०१६ पर्यंत असे सुमारे १२ वर्षे बंद होते. तसेच सन २०१६ मध्ये ५ ते ६ महिने काम सुरु होऊन सन २०१७ ते २०२० पावेतो काम बंद होते. तद्नंतर सन २०२० ते २०२१ कालावधीत धरणाच्या बांधकामासाठी पायाभरणी करण्यात आली असून ८०% काम पूर्ण झाले आहे. सदर योजनेच्या बांधकामासाठी रु.१०.२६ कोटी इतका खर्च झालेला आहे. योजनेच्या उर्वरित बांधकामासाठी अंदाजित रु. १२ कोटी आवश्यक आहे.

ल.पा. योजना मंदाणे रहाटयावड ता. शहादा या कामास दि.१३.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. परंतु सदर सुधारित प्रशासकीय मान्यतेमध्ये वस्तू व सेवा कराचा समावेश नसल्याने व संरेखा बदलामुळे परिमाणात वाढ झाल्याने स्वामित्व शुल्काच्या दरात झालेली वाढ यामुळे प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यतेतील तरतुदीत वाढ झाली आहे. सदर योजनेस राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या दि.२६.०६.२०२४ च्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्याकरिता रु.१७.८३ कोटी किंमतीचा द्वितीय सुधारित प्रशासकीय प्रस्ताव शासनास दि.२२.०७.२०२४ रोजी मान्यतेसाठी प्राप्त झाला आहे. ल.पा. योजना मंदाणे-रहाट्यावड ता. शहादा या कामास द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावाची तांत्रिक छाननी करुन नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेनंतर सदर योजनेस सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येईल. सदर योजनेच्या कामाच्या पुर्णत्वानंतर योजनेत ४८.८७ द.ल.घ.फु. (१३८४.१२ स.घ.मी) पाणीसाठा निर्मिती होणार असून शहादा तालुक्यातील १६१ हेक्टर क्षेत्रातील आदिवासी शेतकऱ्यांच्या कोरडवाहू जमिनीस फायदा होणार आहे.

***********************************

(रोटा) एच-७३३ (८००-७-२०२५)-९

**लक्षवेधी सूचना क्र.: १९५१**

## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी ) अधिवेशन

**श्री. अभिजीत पाटील, विधान सभा सदस्य यांनी विचारलेली महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे** - "मौजे करकंब (ता. पंढरपूर, जि. सोलापूर) या गावात पाझर तलावाचे रुपांतर साठवण तलावात करण्याचे काम महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत करण्यात येणे, सदर कामातील ५ व ६ क्रमांच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता व गैरव्यवहार झालेला असणे, पाझर तलाव हा जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या मालकीचा असून त्यांची रीतसर कायदेशीर परवानगी घेणे आवश्यक असतांनाही सदर परवानगी घेण्यात न येणे, तसेच सदरच्या कामासाठी ग्राऊटिंग पायातील चरामध्ये २०० ते ३०० फूट खोलीचे बोरवेल घेण्याची कामे करण्यात आलेली नसणे, तथापि ते काम केल्याचे दाखवून १ कोटी ८८ लाख आणि २ कोटी ४६ लाख रुपये अनुक्रमे ५ व ६ या कामासाठी वाढीव दायित्वाचा बेकायदेशीरपणे प्रस्ताव पाठवणे, सदर पाझर तलावाची कामे सुरु असतानांच कामाची देयके उचलण्यात येणे, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात यावी अशी मागणी करीत जनशक्ती शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांसह हजारो शेतक-यांनी मुख्य अभियंता, जलसंधारण कार्यालय, पुणे येथे आंदोलन करणे, सदर आंदोलनात एक शेतक-यांनी स्वत:ला रॉकेल ओतून संपवून घेण्याचा प्रयत्न करणे, अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण, प्रादेशिक क्षेत्र, पुणे-६ यांनी प्रादेशिक दक्षता व गुणनियंत्रण अधिकारी, पुणे यांना तात्काळ कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याचे आदेश देणे, परंतु अद्यापही कोणतीच कार्यवाही न होणे, शासनाने उक्त प्रकरणी तातडीने चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता."

**************************************

### मा. मंत्री महोदय यांचे निवेदन

मौजे करकंब (ता. पंढरपूर, जि. सोलापूर) या गावातील पाझर तलावाचे रुपांतर साठवण तलावात करण्याचे काम महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक २९.१२.२०२३ अन्वये पाझर तलाव करकंब क्र. ५ व पाझर तलाव करकंब क्र. ६, ता. पंढरपूर, जि. सोलापूर प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सदर कामांस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर कामांची मंजुर निविदा संच ब १ अन्वये मे. यशराज एन्टरप्रायजेस, पंढरपूर, जि. सोलापूर या अभिकरणामार्फत निविदा अटी व शर्तीप्रमाणे प्रगतीपथावर आहेत.

पाझर तलाव करकंब क्र. ५ व पाझर तलाव करकंब क्र. ६, ता. पंढरपूर, जि. सोलापूर या दोन्ही योजना मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी दि. ०५/०३/२०२४ अन्वये जिल्हा परीषद अॅक्ट १९६१ मधील तरतुदीनुसार या विभागाकडे तात्पुरता हस्तांतरीत करण्यात आलेले आहे.

धरण पायामध्ये पारगम्यता चाचण्या घेण्यात आल्या आहेत. सदर चाचणी अहवाल ३ लुगानपेक्षा जादा आला आहे. सदर अहवाल वरिष्ठ भूवैज्ञानीक, GSDA सोलापूर यांना सादर करण्यात आला होता. त्याबाबत विभागाच्या सक्षम अधिका-यांनी निर्णय घ्यावा असे नमूद केले आहे. कार्यालयीन परिपत्रकानुसार जलरोधक खंदकात ग्राउटींग करण्यात आले आहे. मापन पुस्तिकेनुसार Grouting hole ची जास्तीत जास्त खोली **६.००** मी. म्हणजेच **१९.५०** फुट नोंदविलेली आहे.

रोटा/एच - ६३३ (७५० — ०७ — २०२५) (क्र.मा.प

ग्राऊटिंगसाठी सदर काम केल्याचे दाखवून रु. १ कोटी ८८ लाख आणि रु.२ कोटी ४६ लाख रुपये खर्च झालेला नाही. ग्राऊटिंग साठी अनुक्रमे रु. ६५.५० लक्ष व रु. ६८.५१ लक्ष इतका खर्च झालेला आहे. रुपांतर साठवण तलाव, करकंब क्र. ५ व क्र. ६ या योजना प्रगतीपथावर असुन निविदा अटी व शर्ती प्रमाणे पूर्ण झालेल्या कामाच्या परिमाणाचे मोजमाप घेऊन प्रथम चालू देयके महामंडळास सादर करण्यात आलेले आहेत. सदर दोन्ही योजनेवर एकूण रु.४७३.९४ लक्ष एवढे देयके अदा करण्यात आले आहे.

रुपांतरीत साठवण तलाव क्र. ५ व क्र. ६ या कामाचे अनुषंगाने दि. ३०.०६.२०२५ रोजी कार्यालयाच्या समोर संस्थापक अध्यक्ष जनशक्ती संघटना व ग्रामस्थ यांनी आंदोलन केले. त्यावेळी प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, पुणे व संबंधित क्षेत्रीय अधिकारी यावेळी उपस्थित होते. आंदोलन कर्त्यांनी आंदोलनाचे वेळी या दोन्ही कामांचे चौकशीबाबत महामंडळास उद्देशून पत्र सादर केले व त्या पत्रातील नमूद मुद्दयांच्या अनुषंगाने अप्पर आयुक्त तथा मुख्य अभियंता मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र पुणे यांनी दि. ३०/०६/२०२५ च्या अन्वये सदर प्रकरणी चौकशी करुन व नेमकी वस्तुस्थिती पडताळून प्रादेशिक दक्षता व गुणनियंत्रण अधिकारी, दक्षता व गुणनियंत्रण पथक, पुणे यांना दहा दिवसात स्वयंस्पष्ट अहवाल सादर करणेस सुचित करण्यात आलेले आहे. याबाबत जनशक्ती शेतकरी संघटनेच्या आंदोलनकर्तेना अवगत करून देण्यात आले व त्या अन्वये आंदोलनकर्त्यांनी सदरचे आंदोलन स्थगित केले. सदर आंदोलनात एका शेतक-यांनी स्वत:वर रॉकेल ओतून संपूवन घेण्याचा प्रयत्न केला नाही तर सदर आंदोलनात एका शेतक-यांनी स्वत:वर काळी शाई ओतून घेतली होती, कायदा व सुव्यवस्थाचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून पोलीसांनी वेळेवर संबधिताना समज दिली. सदर योजनांच्या कामांची चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर संबंधीत अधिकारी व कंत्राटदार त्यांचेवर नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

*************************************************************

एच - ६३२ - १अ

लक्षवेधी सूचना क्र.: २१६२

## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी ) अधिवेशन

**श्री. किशोर जोरगेवार, विधान सभा सदस्य यांनी विचारलेली महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ लक्षवेधी सूचना क्र. २१६२ पुढीलप्रमाणे आहे -** "महाराष्ट्र जलसंधारण तथा महामंडळ यांचा निर्णय दिनांक १२ डिसेंबर, २०२३ ला चंद्रपूर तालुक्यातील गावामध्ये १० गेटेड साठवण बंधारे बांधण्यासाठी प्रशासकीय मान्यता देणे, परंतु लगेचच दिनांक २७ डिसेंबर, २०२३ रोजी सदर कामाची प्रशासकीय मान्यता आदेश रद्द करण्यात येणे, तद्नंतर दि.२९ डिसेंबर, २०२३ रोजी पुन्हा महामंडळ निर्णयनुसार तहसील, जिल्हा चंद्रपूर येथील आरवट-हिंगनाला-शिवनीचोर, वडा-उसगाव, सोनेगाव अंतुल, सोनेगाव-अंतुर्ला, पांढरकवडा दाताळा-चिचाळ या गावामध्ये ८ गेटेड साठवण बंधारे बांधण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात येणे, सदर कामाचे महत्त्व लक्षात घेता मान्सून पूर्वी जुलै, २०२४ अगोदर गेटेड साठवण बंधारेचे काम संपुष्टात आणणे आवश्यक असणे, असे असतांना सदर कामाचे निविदा प्रक्रिया जुलै, २०२४ मध्ये काढण्यात येणे, जुले, २०२५ पर्यंत १ वर्षाचा कालावधी लोटूनही अद्याप निविदा प्रक्रिया पूर्णत्वास न येणे, सदर काम ग्रामीण भागातील असून जलसंधारणाच्या दृष्टीने महत्वाचे असणे, तथापि जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, चंद्रपूर यांनी जाणीवपूर्वक सदर कामात दिरंगाई करणे, त्यामुळे दुष्काळसदृश्य भागात शेतकऱ्याचे नुकसान होणे, शासनाने उक्त प्रकरणी तत्काळ चौकशी करुन हेतुपरस्पर दिरंगाई करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता वा याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

*************************************

### मा. मंत्री (मृद व जलसंधारण) यांचे निवेदन

महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या दि. १२.१२.२०२३ ला चंद्रपूर तालुक्यातील १० गेटड साठवण बंधारे बांधण्यासाठी रु. १४२९.०३ लक्ष किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. त्यानंतर महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाने दि. २७.१२.२०२३ रोजी प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात आली. तदनंतर महामंडळाने दि. २९.१२.२०२३ रोजी ८ गेटेड साठवण बंधारे योजनेस रु. १०२७.९० लक्ष किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या चंद्रपूर तालुक्यातील आरवट- हिंगावाला शिवनचोर, वडा-उसगाव, सोनेगाव-अंतुर्ला, वडा-उसगाव, सोनेगांव-अंतुर्ला क्र. ०१, सोनेगांव अंतुर्ला क्र. ०२, पांढरकवडा व दाताळा-चिंचाळा या ८ कामांपैकी तांत्रिक मान्यता अधिकारानुसार ०५ या कामांना जिल्हा जलसंधारण, चंद्रपूर यांनी तात्रिक मान्यता दिली व उर्वरित ०३ कामांना प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, नागपूर यांनी मंजूरी दिली आहे.

दि. १६.०३.२०२४ ते दि. ०१.०६.२०२४ या कालावधीत लोकसभा आचारसंहिता मधील कालावधी व दि. १४.०४.२०२४ ते दि.३०.०८.२०२४ या कालावधीत निविदा क्लर्कचे प्रशिक्षण तसेच विधानसभा निवडणूकीच्या कालावधी दि. १५.१०.२०२४ ते दि. २३.११.२०२४ असा होता. या दरम्यान अधिकारी व कर्मचाऱ्यांचे निवडणूक प्रशिक्षण व कर्तव्य सुरु झाल्यामुळे निविदा कार्यवाहीवर परिणाम झाला आहे. त्यामुळे निविदा कार्यवाहीस विलंब झाला आहे. आचारसंहिता व प्रशिक्षण कालावधी नंतर दि.३०.०७.२०२४ रोजी वृत्तपत्रात निविदा सूचना प्रसिध्द झाली. सदर निविदेचा कालावधी दि.१६.०८.२०२४ पर्यंत होता.

रोटा/एच - ६३२ (५५० - ०७ - २०२५) [क्रमाप

प्रादेशिक स्तरावरील ०३ गेटेड साठवण बंधारा योजनांचे १) आरवट-हिंगनाला-शिवनचोर २) वडा-उसगाव, ३) सोनेगाव-अंतुर्ला या कामांसबंधी निविदांचा तांत्रिक लिफाफा क्र. १ दि. ०४.१०.२०२४ रोजी उघडण्यात आला व निविदेतील अटी व शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रांची तपासणी करण्यात आली व तांत्रिक मुल्यमापन तक्ता तयार करुन मंडळ कार्यालयास दि. १७.०४.२०२५ रोजी प्राप्त झाले आहे. त्याअनुषंगाने कंत्राटदाराचे पात्र व अपात्रतेच्या कारणासह तांत्रिक मुल्यांकन अहवाल दिनांक ०९.०७.२०२५ रोजी संकेतस्थळावर अपलोड करण्यात आले असून आर्थिक निविदेचा लिफाफा क्र.०२ उघडण्याचा दि. ११.०७.२०२५ आहे..

मागील वर्षभरात चंद्रपूर जिल्हयात एकूण १८३ कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली होती. त्यापैकी गोंडपिंपरी, कोरपना व राजुरा तालुक्यातील एकूण २६ कामांच्या निविदांना दि.०८.०७.२०२२च्या शासन निर्णयान्वये स्थगिती देण्यात आलेली होती. तदनंतर दि.२२.११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये या निविदांची स्थगिती उठविण्यात आली. सदर कामांच्या निविदा प्रक्रिया नव्याने सुरु करण्यात आलेल्या असल्याने सदर कामे कालक्रमानुसारच करण्यात आलेली आहेत. त्यामुळे निविदा प्रक्रियेमध्ये उशीर झालेला नाही.

*****************************************************************

लक्षवेधी सूचना क्र. २१८१

महाराष्ट्र विधानसभा सन २०२५ द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री धर्मरावबाबा आत्राम, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"गडचिरोली जिल्ह्यात अनेक वर्षापासून आदिवासी व गैरआदिवासी गरीब शेतकरी महसूल व वनविभागाच्या जमीनीवर अतिक्रमण करुन आपले उदारनिर्वाह करीत असणे, त्याबाबतच्या नोंदी महसूल व वनविभागाच्या कार्यालयात उपलब्ध असणे, शासनाच्या नियमाप्रमाणे काही प्रमाणात आदिवासी व गैरआदिवासींना त्यांनी अतिक्रमीत केलेल्या जागेचे मालकी पट्टे देण्यात आले असणे, परंतु सद्यस्थितीत अनेक आदिवासी व गैरआदिवासी लोकांना त्यांनी अतिक्रमीत केलेल्या जागेच्या मालकी हक्काचे पट्टे वितरीत करण्यात आलेले नसणे, मालकी हक्काचे पट्टे वितरीत करण्याची प्रक्रिया ही अत्यंत संथ गतीने सुरु असल्यामुळे जिल्हयातील अनेक शेतकऱ्यांना त्यांच्या अतिक्रमीत जमीनीचे मालकी हक्क प्राप्त झालेले नसणे, त्यामुळे अतिक्रमण धारकांना शासनाच्या अनेक योजनांपासून वंचित रहावे लागत असणे, त्यामुळे त्यांच्या मनात शासनाप्रती द्वेशाची भावना निर्माण झाली असणे, सन्मा.सदस्य गडचिरोली जिल्हयाचे पालकमंत्री असतांना जिल्हाधिकारी कार्यालयात शेतकऱ्यांना वनपट्टे वितरीत करण्याकारीता स्वतंर्त्य कक्ष उघडून हजारो शेतकऱ्यांना मालकी हक्काचे पट्टे वितरीत केले असणे, परंतु नंतर ती योजना बंद पडली असणे, त्याच धर्तीवर तातडीची निकड व सार्वजनीक हिताच्या दृष्टीने गडचिरोली जिल्हयातील आदिवासी व गैरआदिवासी गरीब शेतकऱ्यांना त्यांनी अतिक्रमण केलेल्या जागेच्या मालकी हक्काचे पट्टे नियमानुसार तातडीने मिळण्याकरीता जिल्हाधिकारी कार्यालयात स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याची नितांत गरज असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

मा. मंत्री (आदिवासी विकास) यांचे निवेदन

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी ( वनहक्कांची मान्यता ) अधिनियम, २००६ ,दिनांक ३१ डिसेंबर, २००७ पासून राज्यात लागू झाला आहे. सदर अधिनियमाच्या कलम ३ (१) अन्वये अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी यांना वैयक्तिक व सामूहिक वनहक्क किंवा दोहोंचे धारणाधिकार मिळण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत.

वनहक्क कायद्याची योग्य रितीने अंमलबजावणी होण्याकरिता गांव पातळीवर ग्रामसभा वनहक्क समित्या, उपविभागीयस्तरावर उपविभागीय वनहक्क समित्या व जिल्हा स्तरावर

जिल्हास्तरीय वनहक्क समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. तसेच राज्यस्तरावर आढावा घेण्यासाठी राज्यस्तरीय संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत राज्यात २,००,९१९ वैयक्तिक दावे आणि ८,७४९ सामुदायिक वन हक्क दावे मंजूर करण्यात आले आहेत. सदर कायद्यातील तरतुदीनुसार गडचिरोली जिल्ह्यामध्ये सद्यस्थितीत ३३,१४८ वैयक्तिक वनहक्क दावे तर १,४४२ सामुहिक वनहक्क दावे मंजूर करण्यात आलेले आहेत. गडचिरोली जिल्हास्तरीय वनहक्क समितीकडे १५ वैयक्तिक वनहक्क दावे प्रलंबित असून सामुहिक वनहक्क दावे प्रलंबित नाहीत.

वन हक्क धारकांना वनपट्टे प्राप्त होऊनही त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळत नसल्याच्या तक्रारी प्राप्त होत होत्या, त्यामुळे वनहक्क धारकांना सर्व शासकीय योजनांचा लाभ देण्याच्या अनुषंगाने मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेने दि.१३.०३.२०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

सदर कायद्याच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर, जिल्हास्तरीय समिती व उपविभाग स्तरावर, उपविभागस्तरीय समितीच्या बळकटीकरणासाठी मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी दि.२१/११/२००८ रोजी मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय सनियंत्रण समितीमध्ये मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार वनहक्क कायद्याच्या अमंलबजावणीसाठी संबधित जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरावर स्वतंत्र वनहक्क कक्षाची स्थापना करण्यात आलेली असून जिल्हास्तरावर व उपविभागस्तरावर प्रत्येकी २ मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. त्याच धर्तीवर जिल्हास्तरावर गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालयात स्वतंत्र वन हक्क शाखा/कक्ष स्थापन कार्यान्वित करण्यात आलेला आहे. सदर शाखा/कक्षामार्फत वन हक्क कायद्यांतर्गत कामे, दावे निकाली काढणे व वन हक्काशी संबंधीत इतर कामे सुरुवातीपासून आजतागायत करण्यात येत आहे.

***********

H/५९७ – १५

लक्षवेधी सूचना क्रमांक १००६

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री.अनुपभैय्या अग्रवाल, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १००६ खालीलप्रमाणे आहे :-

"माहिती अधिकार कायद्यान्वये उघड झाल्यानुसार महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाने वर्ष २००८ पासून आजपर्यंत शासनाकडे एकही लेखापरीक्षण अहवाल सादर केलेला नसणे, तसेच या पार्श्वभूमीवर हिंदु विधीज्ञ परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड .वीरेंद्र इचलकरंजीकर यांनी दिनांक २२.०३.२०२५ रोजी वक्फ बोर्ड बरखास्त करण्याची मागणी करत मुख्यमंत्री व अल्पसंख्याक विकासमंत्री यांना निवेदन दिले असणे, लेखापरीक्षण अहवाल सादर करणे वक्फ कायदा, १९९५ अन्वये बंधनकारक असताना, वक्फ बोर्डाने अहवाल न सादर करणे, वक्फ बोर्डाच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता राहावी, वक्फ बोर्ड जर शासनाच्या आदेशांचे पालन करत नसेल, तर वक्फ कायद्यातील संबंधित कलमानुसार बोर्ड बरखास्त करणे, तसेच वार्षिक लेखापरीक्षण अहवाल नियमितपणे सादर होतील यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार."

**श्री.दत्तात्रय भरणे, मा.मंत्री (अल्पसंख्याक विकास) यांचे निवेदन :-**

उम्मीद अधिनियम (तत्कालीन वक्फ अधिनियम) १९९५ मधील कलम ८० येथील तरतुदीनुसार राज्य शासनाने नियुक्त केलेल्या लेखा परिक्षकांमार्फत वक्फ मंडळाचे लेखा परिक्षण होणे आवश्यक आहे.

राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने वक्फ मंडळाचे सन २००२-०३ ते सन २०१७-१८ पर्यतचे लेखे स्थानिक निधी लेखा परिक्षकांमार्फत तपासण्यात आलेले आहेत. लेखा परिक्षकांनी सन २००२-०३ ते सन २०११-१२ पर्यतचे अहवाल वक्फ मंडळास सादर केलेले आहेत. सन २०१२-१३ ते २०१७-१८ या आर्थिक वर्षापर्यंतचा अहवाल स्थानिक निधी लेखा परिक्षकाकडे अद्याप प्रलंबित आहे. पहिल्या टप्प्यामध्ये सन २००२-०३ ते सन २००८-०९ या वर्षापर्यंतचे वार्षिक अहवाल विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेले आहेत.

स्थानिक लेखा परिक्षकांमार्फत सन २०१७-१८ पर्यतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदर अहवालासह वक्फ मंडळाचे वार्षिक अहवाल विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्याबाबत वक्फ मंडळास निर्देश दिलेले आहेत. सन २०१७-१८ ते सन २०२४-२५ या कालावधीतील स्थानिक लेखा निधी परिक्षण करण्याबाबत महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळामार्फत स्थानिक निधी लेखा परिक्षकांकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

लेखा परिक्षण अहवाल सादर न केल्याने वक्फ मंडळ बरखास्त करण्याबाबतचे निवेदन शासनास प्राप्त झालेले आहे. वक्फ मंडळ हे केंद्रीय कायद्यान्वये गठीत करण्यात आलेले वैधानिक मंडळ आहे. केंद्रीय उम्मीद कायद्यातील कलम ९९ अन्वये कार्यवाही सुरू करण्याबाबत कोणतेही सबळ कारण दिसून न आल्याने वक्फ मंडळ बरखास्तीचा प्रश्न उद्भवत नाही.

*********

ROTA-H-622-1(800-7-2025)

लक्षवेधी सूचना क्रमांक १८८७

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री.रईस शेख, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधासनसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १८८७ खालीलप्रमाणे आहे :-

"राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील अनेक समस्या प्रलंबित असणे, तरोच उर्दू अकादमीचे कार्यालय १९९६ पासून दक्षिण मुंबईतील फोर्ट परिसरातील "ओल्ड कस्टम हाऊस" मधील सांस्कृतिक कार्य विभागाच्या जागेत सुरु असलेल्या अकादमीच्या कार्यालयास अमूस, सांस्कृतिक कार्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २५ एप्रिल, २०२५ रोजी झालेल्या बैठकीत उर्दू अकादमीचे कार्यालय भाडयाच्या जागेत स्थलांतर करण्याचा झालेला निर्णय, सदर निधीमध्ये किमान ५ कोटी ची आवश्यकता असणे, २०२३-२४ मध्ये २ कोटी तरतूद असतांना १६ लाख निधी प्राप्त असणे, त्याचबरोबर अकादमीची ७ पैकी ४ पदे रिक्त असणे, एकाही सदस्यांच्या नियुक्त्या झालेल्या नसणे, अल्पसंखयांक विकास विभागाच्या अधिपत्याखालील ७ विभागामध्ये ६०९ पदे मंजूर ६७ टक्के रिक्त पदे, मनुष्यबळा अभावी योजनांची अंमलबजावणी न होणे, लाभार्थी निवड रखडणे, शुन्य टक्के निधी खर्च न होणे, तसेच राज्यात एकूण मालमत्तापैकी वक्फ च्या ६० टक्के जमिनीवर झालेले अतिक्रमण, समाजाला कब्रस्तानासाठी जागा उपलब्ध नसणे, वक्फ मंडळाच्या बळकटी करणासाठी दरवर्षी मिळणाऱ्या निधीतून होणारी कामे समाजाला न मिळणे, जिल्हा समित्या बनवल्या जाणे परंतु वक्फ न्यायाधिकरणाला अपुरे मनुष्यबळ असणे, राज्यातील वक्फ मालमत्तांचे जीआयएस,"डॅश बोर्ड"तयार करणे, नवे संकेतस्थळ, मंडळाने घेतलेल्या सर्व निर्णयाची माहिती संकेतस्थळावर देणे, मंडळाच्या अतिक्रमित मालमत्ताधारकांची नावे जाहिर करणे, आदि संदर्भात अल्पसंख्याक लोकप्रतिनिधी संबंधितांकडे पत्रव्यवहार करुन मागणी करुनही दुर्लक्ष होणे, तसेच अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (एमआरटीआय) स्थापनेपासून ५ महिने ठप्प राहिलेली पदनिर्मिती व प्रशिक्षण योजनेच्या कामांना गती देण्याबाबत होत असलेला विलंब, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यावर्षी उर्दू अकादमी सुवर्ण महोत्सव साजरा करित असतांना अकादमीची शासकीय जागेतून हकालपट्टी करण्याचे आदेश पारित करुन एक प्रकारे अवहेलना करणे, उक्त फोर्ट परिसरातील "ओल्ड कस्टम हाऊस"मध्ये जाती धर्माची अकादमीच्या कार्यालयाची दालने वाटप करण्यात असतांना उर्दू अकादमीवर भाडयाच्या जागेत स्थलांतर करणे, सांस्कृतिक कार्य विभागाकडून सापत्न वागणूक देणे, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून शासनस्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रीया व भूमिका."

## श्री.दत्तात्रय भरणे, मा.मंत्री (अल्पसंख्याक विकास व औकाफ) यांचे निवेदन :-

सांस्कृतीक कार्य विभागाच्या अधिनस्त असलेली काही कार्यालये मुंबई जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये उर्दू अकादमी कार्यालयाच्या लगत असून सदर कार्यालयांसाठी उपलब्ध जागा अपूरी पडत असल्याने या समस्येवर तोडगा काढण्यासाठी अपर मुख्य सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २४.०४.२०२५ रोजी झालेल्या बैठकीत उर्दू साहित्य अकादमीच्या कार्यालयाकरीता खाजगी जागा भाडयाने घेण्यासंबंधीची कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करण्यात येऊन सदर कार्यालय ओल्ड कस्टम हाऊस मधील जागेतून स्थलांतरित करण्याबाबतचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार महाराष्ट्र राज्य उर्दू अकादमीसाठी जागा

उपलब्ध करुन देणेबाबत सामान्य प्रशासन विभागास तसेच आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिकेस विनंती करण्यात आलेली आहे. तसेच खाजगी जागा भाडेतत्वावर घेण्याबाबतही प्रयत्न करण्यात येत आहे. पर्यायी जागा उपलब्ध होईपर्यंत उर्दू अकादमीचे कार्यालय मुंबई जिल्हाधिकारी कार्यालयातच कार्यरत राहील याबाबत सांस्कृतिक कार्य विभाग व अल्पसंख्याक विकास विभाग यांच्यामध्ये एकमत आहे. महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीवर नियुक्त करावयाच्या शासकीय आणि अशासकीय समितीची रचना निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे. महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीमार्फत राबविण्यात येणाऱ्या कामकाजासाठी वर्ष २०२५-२६ मध्ये रु.२.०० कोटीची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. तसेच सन २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षात उर्दू भाषेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी दर वर्षी दिड कोटीपेक्षा जास्त निधी खर्च करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे संकेतस्थळ सध्या कार्यान्वित आहे. त्यामध्ये सुधारणा करुन अद्ययावत संकेतस्थळ बनविण्यासाठी वक्फ मंडळामार्फत कार्यवाही सुरु आहे. संबंधीत यंत्रणांची मान्यता मिळाल्यानंतर अद्यावत संकेतस्थळ सुरु करण्यात येईल. वक्फ मालमत्तांच्या अभिलेख्यामध्ये असलेल्या त्रुटी दूर करण्यासाठी तसेच वक्फ मालमत्तांचे कायमस्वरुपी जतन व नोंदी करण्यासाठी राज्यातील सर्व वक्फ मालमत्तांचे GIS Mapping करण्यात येणार असून सदर कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. वक्फ मंडळाशी संबंधित कामकाजाबाबत अल्पसंख्याक लोकप्रतिनिधींकडून प्राप्त निवेदन आवश्यक कार्यवाहीस्तव महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळास अग्रेषित करण्यात आलेले आहे. वक्फ मंडळामार्फत त्याबाबत नियानुसार कार्यवाही करण्यात येईल. मुस्लिम कब्रस्तानासाठी जागा उपलब्ध करुण देणे हा विषय स्थानिक प्राधिकरणांच्या अखत्यारित येत असुन, कब्रस्तानसाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही त्यांच्यामार्फत करण्यात येते.

अल्पसंख्याक विकास विभाग खुद्द व विभागाच्या अधिपत्याखालील अल्पसंख्याक आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य हज समिती, महाराष्ट्र राज्य पंजाबी साहित्य अकादमी, जैन समाज अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ आणि अल्पसंख्याक संशोधन व कार्य प्रशिक्षण संस्था (MRTI) या सर्व कार्यालयासांठी एकूण ६०९ पदे मंजूर असून. त्यापैकी ४०७ पदे रिक्त आहेत. अल्पसंख्यांक आयुक्तालयाच्या अखत्यारितील १२१ पदांचे सेवाप्रवेश तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. तथापि, अल्पसंख्याक आयुक्तालयातील काही पदे प्रतिनियुक्तीद्वारे भरण्याबाबत देखील पाठपुरावा करण्यात येत आहे. अल्पसंख्यांक संशोधन व प्रशिक्षण संस्था (MRTI) च्या ११ पदांना उच्च स्तरीय समितीची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे. प्रशिक्षण योजनांची अंमलबजावणी खुद्द विभागामार्फत सुरु आहेत. उपलब्ध मनुष्यबळाच्या आधारे अन्य योजनांची अंमलबजावणी सुरू आहे. सन २०२४-२५ या अर्थिक वर्षात विभागाचा सुमारे ८३% निधी खर्च झालेला आहे. अल्पसंख्याक विकास विभागामार्फत अल्पसंख्याक समाजासाठी अनेक शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक विकासाच्या योजना राबविल्या जात आहेत.

* * * *

H-623-1A

लक्षवेधी सुचना क्रमांक १६०

महाराष्ट्र विधान सभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. सुधीर मुनगंटीवार, श्री. मोहन मते, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र.१६० पुढीलप्रमाणे आहे:-**

"राज्यात कृषी खरीप हंगामामधील शेतीच्या कामाची लगबग सुरू होणे, नांगरणी, पेरणी याकरिता शेतकरी सज्ज होत असताना चोरबिटी तस्कर सक्रीय होणे, राज्यसिमेलगतच्या गावात मोठया प्रमाणात बोगस बियाण्यांची विक्री केली जाणे, मात्र याकडे कृषी विभागाचे लक्ष नसल्याने बळीराजा आर्थीक बळी गेल्यानंतर विभागाला जाग येईल काय असा संतप्त सवाल शेतक-यांकडून विचारला जाणे, जमिनीच्या मशागतीसह बि-बियाणे व खत खरेदीसाठी बळीराजा सरसावला असणे, मात्र या हंगामाचा खरा फायदा घेण्यासाठी चोरबिटी तस्कर सक्रीय होणे, हे बोगस बियाणे आर्थीकदृष्टया परवडणारा नसणे, आंध्रप्रदेशात २५० ते ३०० रूपये प्रती किलो दराने मिळणारी चोरबिटी महाराष्ट्रात ३००० रूपये वाढीव दराने शेतक-यांच्या माथी मारणे, दिवसाढवळया शेतक-यांची फसवणूक करण्यात येणे, यातुन शेतक-यांचे आर्थीक शोषण होणे व पुढे जावून आत्महत्येमध्ये पर्यवसन होणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**मा.मंत्री (कृषि) यांचे निवेदन**

पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ अंतर्गत केंद्र सरकार GEAC (Genetic Engineering Approval Committee) व्दारे देशात जनुकीय बदल (Genetically modified) करुन तयार करण्यात येणाऱ्या बियाण्यांसाठी उत्पादन, विक्री व हाताळणी करीता मान्यता देण्यात येते. अशा मान्यताप्राप्त जनुकीय बदल बियाण्यांचीच विक्री करण्याकरीता राज्यात बियाणे विक्री परवाना देण्यात येतो.

तथापि Herbicide Tolerant Transgenic Gene असलेले बी.टी. कापूस बियाणे विक्री करण्यास केंद्र सरकार GEAC (Genetic Engineering approval Committee) ने अद्यापी परवानगी दिलेली नाही.

खरीप २०२५ हंगामात मा. आयुक्त (कृषि) यांनी जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधिक्षक यांना अधिनस्त यंत्रणाना सहभागी करुन गावपातळी पर्यंत तपासणी मोहिम राबवून अनाधिकृत एचटीबीटी विरोधात कारवाया करण्याचे सूचित केले होते.

पर्यावरणास धोकादायक, उत्पादनपध्दती बाबत माहिती नसलेले, अवैध व अनधिकृत एचटीबीटी कापूस बियाणामुळे शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यास्तव शेतकऱ्यांसाठी विविध प्रबोधनपर कार्यक्रम घेतले गेले. यामध्ये अधिकृत परवाना धारक निविष्ठा विक्रेत्याकडून निविष्ठांची खरेदी करणे, खरेदी पावती घेणे, एचटीबीटी बियाणे वापरातील धोका याबाबत विविध विस्तार कार्यक्रमातून मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

अनाधिकृत एचटीबीटी कापूस बियाणे उत्पादन, वाहतूक, साठवणूक, हाताळणी व विक्री यामध्ये सहभाग असलेल्या व्यक्ती विरोधात बियाणे कायदा १९६६, बियाणे नियम १९६८ व पर्यावरण

013२



संरक्षण कायदा १९८६ अन्वये कारवाया करण्यात आली असून राज्यात एचटीबीटी अनाधिकृत बियाणे विक्रीबाबत एकूण ५३ पोलीस केसेस दाखल केलेले असून जप्त पाकीटे संख्या १२८४३ व खुले बियाणे २८५३.७० किलो आहे त्याचे मुल्य एकूण रुपये २१६.०२ लाख इतके आहे.

*******************

H/680-19

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्रमांक ७५४

मा. श्री. उत्तमराव जानकर, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ७५४ पुढीलप्रमाणे आहे:-

"कृषी खात्याच्या योजनांचा लाभ शहरी भागातील झोनमध्ये शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना मिळत नसल्याचे निदर्शनास येणे, कृषी विभागाच्या योजना प्रामुख्याने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी असल्याने शहरी भागातील शेतीला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनामार्फत विशेष प्रयत्न होत नसल्याचे निदर्शनास येणे, कृषी खात्याच्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना तसेच महात्मा गांधी रोजगार हमी योजना या योजना प्रामुख्याने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी असल्याने नगरपरिषद, नगरपालिका तसेच महानगरपालिका क्षेत्रातील शेतकऱ्यांना/ फळबाग शेतकऱ्यांना सदर शासकीय योजनांचा लाभ मिळत नसल्यामुळे शहरी भागातील शेतकऱ्यांना शेतीसंबंधी अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असणे, शहरी भागातील शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी, शहरी भागासाठी योग्य शेती उपयुक्त शासनाची योजना आणि तंत्रज्ञान उपलब्ध करून देणे, खते, बी-बियाणे, किंवा सिंचनासाठी अनुदान उपलब्ध करुन देणे, शहरी जमिनीवर योग्य धोरणे ठरवून देणे, कृषी तंत्रज्ञान आणि प्रशिक्षण उपलब्ध करुन देणे इ. सुविधा व कृषी विभागाच्या योजनांचा लाभ शहरी भागातील शेतकऱ्यांना देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली असणे, कृषी योजनेचा लाभ मिळत नसल्याने शहरी भागातील शेतकऱ्यांनी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शासनाला दिला असणे, याबाबत शहरी भागातील शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या सर्व योजनाचा लाभ देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मा. मंत्री (कृषि) यांचे निवेदन

कृषी विभागामार्फत ग्रामीण भागातील शेती व शेतकरी विकासाच्या दृष्टिकोनातून योजनांची आखणी व अंमलबजावणी करण्यात येते. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, नमो शेतकरी महासन्मान निधी योजना, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया योजना, मुख्यमंत्री कृषी अन्नप्रक्रिया योजना यासारख्या अनेक योजनांचा लाभ हा शेतीचा सातबारा असलेल्या शेतकऱ्यांस देण्यात येतो. तसेच प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना व मुख्यमंत्री कृषि अन्न प्रक्रीया या योजनांचा शहरी भागातील लाभार्थ्यांना लाभ दिला जातो.

जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील)या योजनांचा लाभ ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनाअनुज्ञेय आहे. त्यामुळे नगरपंचायत व महानगरपालिका क्षेत्रातील शेतकऱ्यांना सदर योजनांचा लाभ दिला जात नाही.

जागतिक बँकेच्या सहाय्याने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प हा २०१८ ते २०२४ या कालावधीमध्ये मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील १६ जिल्ह्यातील ५२२० गावांमध्ये राबविण्यात आलेला असून सदर प्रकल्पाचा दुसरा टप्पा मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील २१ जिल्ह्यातील ७२०१ गावांमध्ये राबविण्यात येणार आहे. सदर प्रकल्पांतर्गत समाविष्ट गावे ही हवामानास संवेदनशील असलेल्या लघु पाणलोटामध्ये येत असून सदर गावांतील ५ हेक्टर मर्यादेपर्यंत जमीनधारणा असलेल्या खातेदारांना प्रकल्पातील वैयक्तिक लाभाचे सर्व घटकांचा (बिजोत्पादन वगळता) लाभ देण्यात येतो. यामध्ये फळबाग लागवड घटकाचा समावेश असून सदर घटकासाठी कृषि विभागांतर्गत राबविण्यात येत असलेल्या भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेचे तांत्रिक निकष लागू आहेत.

सन २०१४-१५ पासून केंद्र पुरस्कृत"एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान" हा कार्यक्रम सुरु केला आहे. ग्रामीण व शहरी भागातील ज्या शेतकऱ्याच्या नावावर जमीन आहे अशा शेतकऱ्यांना या योजनेतील विविध घटकांचा लाभ तांत्रिक निकषानुसार देण्यात येतो.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या सलग शेतावर, शेताच्या बांधावर व पडीक जमिनीवर अमृत महोत्सवी फळबाग/वृक्ष लागवड व फुलपिक लागवड कार्यक्रम राबविण्यात येतो. सदर योजनेंतर्गत वैयक्तिक लाभ घेण्यासाठी जॉब कार्ड आवश्यक असून जॉब कार्ड व्यक्ती ही ज्या ग्रामपंचायतचा रहिवासी आहे ती ग्रामपंचायत जॉब कार्ड वितरित करीत असते. त्यामुळे शहरी भागात वास्तव्यात असलेल्या व्यक्ती या योजनेचा लाभ घेण्यास पात्र ठरत नाहीत.

भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेची मार्गदर्शक सूचनांप्रमाणे क्षेत्रीय स्तरावर अंमलबजावणी करण्यात येते. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत जे शेतकरी फळबाग लागवडीकरिता पात्र ठरु शकत नाहीत, अशा शेतकऱ्यांना योजनेचा भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड लाभ घेता येतो.

-------------------------------

एच- ७१९-१अ'

लक्षवेधी सुचना क्रमांक ८१६

महाराष्ट्र विधान सभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्रीमती श्वेता विद्याधर महाले.वि ,सयांनी महाराष्ट्र विधान .स. सभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र८१६. पुढीलप्रमाणे आहे-:

"खरीप हंगामात बोगस खत- बियाणे शेतकऱ्यांची फसवणूक होण्याच्या घटना नेहमी होणे अशा घटनाना आळा घालण्यासाठी हंगाम पूर्व बैठकीतच अधिकाऱ्यांची नेमणूक करून तालुका निहाय पथके तैनात करणे, ही सर्व यत्रणा असतानाही आता बी-बियाणे यांचे नमुने घेणारे उपविभागीय कृषी अधिकारी व याच कार्यालयातील तंत्र अधिकारी, कृषी उपसंचालक, कृषी विकास अधिकारी कार्यालयातील मोहिम अधिकारी तसेच जिल्हा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी व याच कार्यालयातील कृषी विकास अधिकारी व पंचायत समिती कार्यालयातील कृषी अधिकारी यांचे अधिकार काढून घेणे त्यामुळे खत बियाण्याचे त्यामुळे खत-बियाणांच्या नमुन्यांच्या तपासणीचे अधिकार केवळ विभागीय गुण नियंत्रण निरीक्षक, जिल्हा गुण नियंत्रण निरीक्षक व तालुका गुण नियंत्रण निरीक्षक या तीन अधिकाऱ्यांकडेच असणे. निरीक्षकांची संख्या कमी झाल्यामुळे निकृष्ट दर्जाचे कृषी निविष्ठा उत्पादक व विक्रेत्यांना मोठया प्रमाणात संधी निर्माण होऊन शेतकऱ्यांची फसवणूक होणे, तालुकास्तरावरील कृषी अधिकारी यांनी यापूर्वी गुणवता नियंत्रणाचे कामे केलेली नसून त्यांचे गुणनियंत्राबाबतचे प्रशिक्षण झालेले नसल्यामुळे त्याचा गुणनियंत्रणाच्या कामावर सद्यस्थितीत विपरीत परिणाम होणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

ॲडयांचे निवेदन (कृषि) मंत्री.मा,माणिकराव कोकाटे .

राज्यात खरिप हंगामाचे नियोजन प्रत्येक वर्षी एप्रिल महिन्यापासून सुरू केले जाते. त्यानुसार राज्यातील शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार कृषी निविष्ठा उपलब्ध करून देण्यासाठी राज्यामध्ये राज्यस्तर, विभागस्तर, जिल्हास्तर व तालुका स्तरावर अशा एकूण ३९५ भरारी पथकांची स्थापना करण्यात आलेली होती.

बी-बियाणे अधिनियम १९६६, बियाणे नियम १९६८ व बियाणे नियंत्रण आदेश १९८३, किटकनाशके अधिनियम १९६८, किटकनाशक नियम, १९७१ व खत नियंत्रण आदेश १९८५ या कायद्यांतर्गत निविष्ठांच्या उत्पादनासाठी व वितरणासाठी परवाना दिला जातो. राज्यामध्ये बियाणे, खते व कीटकनाशके या निविष्ठांचे उत्पादन, पुरवठा, साठवणूक व वितरण या बाबी कायद्यान्वये नियंत्रित केलेल्या आहेत. महाराष्ट्र शासनची अधिसूचना दिनांक १३/१०/२०१० अन्वये एकुण ११३१ गुणवत्ता नियंत्रण निरिक्षकाची नियुक्ती करण्यात आलेली होती. तदनंतर दिनांक १९/०६/२०२५ या शासन राजपत्राद्वारे सुधारणा करून एकूण ४८३ निरिक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. निविष्ठा उत्पादनासाठी राज्यस्तरावर उत्पादन व विक्री परवाना अधिकारी म्हणून संचालक निविष्ठा व गुण नियंत्रण हे कार्यरत असून जिल्हा स्तरावरील विक्री परवाना अदा

कृ.ना.प.

(शेटा) एच-६०२(७५०-७-२०२५)-१

करण्यासाठी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना अधिकार प्रदान केलेले आहेत. शासनाने निर्गमित केलेल्या अधिसूचनेमध्ये या उत्पादन तसेच विक्री परवाना अधिकारी यांच्या अधिकारामध्ये कोणत्याही पद्धतीने बदल करण्यात आलेला नाही.

उत्पादन तसेच विक्री होत असताना या तीनही निविष्ठांच्या निविष्ठांचे नमुने काढून ते प्रयोगशाळेत तपासणी करिता पाठवण्यासाठी राज्यांमध्ये उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, मोहीम अधिकारी, कृषी विकास अधिकारी, तंत्र अधिकारी, इत्यादी कृषी विभागातील अधिकाऱ्यांना अर्धवेळ निरीक्षक म्हणून कामकाज करण्यासाठी अधिसूचना दि.१३.१०.२०१० अन्वये अधिसूचित करण्यात आलेले होते. सदरचे अधिकाऱ्यांना नमुने तपासणी घेणे तसेच उत्पादन तथा विक्री केंद्रांची नियमित तपासणी करणे या कामासाठी लक्षांक देण्यात येत होते. मात्र हे निरीक्षक पूर्णवेळ नसल्याने व त्यांना कृषी विभागातील इतर कामही सोपवण्यात आलेली असल्याने त्यांना देण्यात आलेले लक्षांक हे मर्यादित स्वरूपाचे होते. गुण नियंत्रण कामकाजासाठी जिल्हास्तरावर पूर्ण वेळ फक्त एकच निरीक्षक ठेवण्यात आलेला होता. अशा परिस्थितीत गुणवत्ता नियंत्रण कामकाजासाठी पूर्णवेळ निरीक्षकांची संख्या अत्यंत अत्यल्प असल्याने या कामकाजामध्ये विस्कळीतपणा येत होता. तसेच काही अक्षम्य अपराध झाल्यास त्याबाबतची जबाबदारी देखील निश्चित करण्यामध्ये मर्यादा येत होत्या या अनुषंगाने विचार करून शासनाने या अर्धवेळ निरीक्षकांचे अधिकार व्यपगत करून प्रत्येक तालुक्यासाठी एक कृषी अधिकारी दर्जाचा पूर्ण वेळ निरीक्षक नेमलेला आहे. या निरीक्षकाकडे गुणवत्ता नियंत्रणाचे कामकाज सोडून इतर कोणतेही कामकाज देण्यात आलेले नाही. त्यामुळे राज्यातील निरीक्षकांची संख्या ११३१ वरून घटून ४८३ एवढीच झालेली असली तरी पूर्ण वेळ निरीक्षकाला नमुने घेणे, तपासणी करणे यासाठी यापूर्वीपेक्षा जास्त कामकाज करणे शक्य असल्याने त्यानुसार लक्षांक वितरीत करण्यात आलेले आहे. परिणाम स्वरूप नमुने घेणे तथा उत्पादन व विक्री केंद्राची तपासणी करणे या कामकाजामध्ये कोणत्याही प्रकारचा ताण न येता उलट व्यापक व नेमके कामकाज होणे शक्य होणार आहे.

कायद्यातील तरतुदीनुसार आवश्यक असणाऱ्या पात्रतेनुसारच या गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांची नियुक्ती होत आहे. तसेच सदरचे नियुक्त करण्यात आलेले अधिकारी हे नविन नियुक्तीचे अधिकारी नसून कृषी विभागामध्ये कार्यरत असणारे अधिकारी आहेत. सबब त्यांना गुणवत्ता नियंत्रण कामाचे आवश्यक ज्ञान आहे. तसेच आवश्यकतेनुसार त्यांना प्रशिक्षणाची व्यवस्था देखील कृषी विभागामार्फत केलेली आहेत. त्यामुळे इतर शासकीय कामावर विपरीत परिणाम होणार नसल्याची खात्री करून घेण्यात आलेली आहे. त्यांना प्रत्यक्ष व नंतर कामाचे किमान प्रशिक्षण देण्याची व्यवस्था कृषी विभागामार्फत करण्यात आलेली आहे.

*********

एच-६०२-१अ

लक्षवेधी सुचना क्रमांक ९३६

महाराष्ट्र विधान सभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. अमोल पाटील, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम-१०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र.९३६ पुढीलप्रमाणे आहे:-**

““पारोळा (जि. जळगाव) तालुक्यातील शेतकऱ्यांनी खरीप हंगामात पेरणी करण्यासाठी तुलसी सिड्स कंपनी उत्पादित संकरित बाजरी वाण TBH ४०५ वान खरेदी केला असणे, सदरचे बियाणे वाण हे लॉट नंबर ५६९ (A) ७४०१२ पारोळा येथील बियाणे विक्री कृषी केंद्रातून केली असणे, सदर बियाणांची लागवड केली असता पिक फुलोऱ्यात आल्यानंतर पिक काढणेवेळी काही कणसांमध्ये एकही दाणा भरलेला दिसला नसणे, परिणामी शेतकऱ्यांच्या उत्पादनात ६० ते ७० टक्के घट होऊन शेतकऱ्यांचे नुकसान झाले असणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींकडून जळगाव जिल्हा खरीप हंगाम आढावा बैठकीत तुलसी कंपनी शेतकऱ्यांची फसवणूक करत असुन संबंधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देत नसल्याने या कंपनीला जळगाव जिल्ह्यात बियाणे विक्रीसाठी बंदी घालण्यात यावी अशी मागणी करण्यात येणे, सदर बियाणे खरीददार शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे करून संबंधित कंपनीवर कायदेशीर कारवाई करण्याची गरज, या लक्षवेधी मार्फत मी सभागृहाचे लक्ष वेधीत आहे, यावर शासनाने तातडीने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”

**मा.मंत्री (कृषि) यांचे निवेदन**

पारोळा तालुक्यातील वेगवेगळ्या गावातून एकूण २० शेतकऱ्यांच्या पंचायत समिती, पारोळा या कार्यालयात तुलसी सीड्स कंपनी उत्पादित संकरित बाजरा वाण TBH- ४०५ लॉट नं. ५६९ (A) ७४०१ या वाणाच्या अनुषंगाने दाणे न भरल्याची व त्यामुळे उत्पादनात घट आल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या. तक्रारीच्या अनुषंगाने उप विभागीय कृषि अधिकारी, अमळनेर यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीने तुलसी सीड्स कंपनी व विक्रेता यांच्या उपस्थितीत संबंधित शेतकरी यांच्या शेतावर दि.१९.०३.२०२५ रोजी भेटी दिल्या. क्षेत्रीय भेटीचा अहवालात संकरीत वाणाच्या काही कणसामध्ये अंशत: दाणा (कमी प्रमाणात दाणे) भरलेले व काही कणसामध्ये एकही दाणा भरलेला दिसून आलेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनात ७० टक्के पर्यंत घट संभवते असे निष्कर्ष समितीने आपल्या भेटीत नमूद केले आहे. संबंधित शेतकऱ्यांच्या शेतावर केलेला पंचनामा व तालुका स्तरीय तक्रार निवारण समितीचे निष्कर्षाची प्रत शेतकऱ्यांना देण्यात आली व ग्राहक मंचात दाद मागणे संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

तालुका स्तरीय तक्रार निवारण समितीच्या निष्कर्षात तुलसी सीड्स कंपनी उत्पादित संकरित बाजरी वाण TBH- ४०५ लॉट नं. ५६९ (A) ७४०१ बियाणे मधील दोष समितीने निष्कर्षात दिला असल्याने बियाणे नियम १९६८ मधील नियम २३ A (२) मधील नमूद बाबींचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्याने तालुका स्तरीय तक्रार निवारण समितीचे तत्कालीन सदस्य सचिव, बीज निरीक्षक तथा कृषि अधिकारी पंचायत समिती पारोळा यांनी मे. पारोळा न्यायालयात कंपनी विरोधात सदर प्रकरणी केस क्र.SCC १४९ दिनांक १२/०६/२०२५ रोजी दाखल केलेली आहे. तसेच तुलसी सीड्स कंपनी विरोधात प्रस्ताव दिनांक ०२/०७/२०२५ रोजी कृषि आयुक्तालय, पुणे यांचेकडे प्राप्त झाला आहे.

******************

शेटा H/694 (700-7-25)

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन लक्षवेधी सूचना क्र.१८२३

श्री.राजेश विटेकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम,१०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८२३ पुढीलप्रमाणे आहे :-

"कृषि संशोधनाला चालना मिळण्यासाठी मिळालेला कोट्यावधी रूपयांचा निधी संशोधना व्यतिरिक्त कंत्राटदाराचे हित जोपासाण्यासाठी खर्च होत असल्याचे निदर्शनास येणे, ९९ टक्के निधी बांधकामावर तर एक टक्का निधी प्रत्यक्ष संशोधनावर झाल्याने तसेच सदरील कामे १८ टक्क्यांपेक्षा "बिलो" नी देण्यात आल्याने प्रधान सचिव कृषि यांनी कामाची सी.ओ.ई.पी अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे यांच्यामार्फत तपासणी करण्याचे निर्देश देणे, कार्यकारी परिषदेचा ठराव डावलून ५५ कोटी रूपयांच्या कामांचे कार्यारंभ आदेश देण्यात येणे, बहुतांशी कामात अगोदर बिलो टेंडर देणे व नंतर सुधारित अंदाजपत्रक बनवून कंत्राटदारांना फायदा मिळवून देणे, असाच प्रकार इंद्रधनुष्य च्या कामातही होणे, कार्यकारी परिषदेस अंधारात ठेवून अनेक कामे करणे गैरप्रकार उघडकीस येईल म्हणून पुन्हा मान्यतेसाठी ते परिषदेसमोर ठेवणे, परभणी येथील कृषि विद्यापीठाचे कुलगूरू, विद्यापीठ कार्यकारी अभियंता, नियंत्रक व इतर यांनी केलेल्या गैरप्रकाराची चौकशी करण्यासाठी प्रधान सचिव कृषि यांनी नेमलेल्या महासंचालक कृषि परिषद पुणे यांच्या चौकशी समितीने जून/जुलै दरम्यान पुराव्यासह अंदाजे १५० पानांचा अहवाल शासनाकडे सादर करणे

वित्तीय अनिमित्तता प्रकरणी दोषी असणाऱ्या विरोधात गुन्हे नोंदवणे, निलंबन व शासनाच्या आर्थिक वसुली बाबत सक्षम कारवाई होत नसल्याने निर्माण झालेला असंतोष व शासनाने करावयाची कार्यवाही व उपाय योजना"

मा. मंत्री (कृषि) यांचे निवेदन

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाची स्थापना, दि.१८ मे, १९७२ रोजी झाली आहे. विविध वाणांचे संशोधन आणि तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी कृषि विद्यापीठात विहीत पिकांवर संशोधन करणारी संशोधन केंद्रे आणि संशोधन योजना कार्यरत आहेत. कृषि शिक्षण, संशोधन आणि विस्ताराच्या माध्यमातून शेतीचे बळकटीकरण आणि शेतक-यांचे हित साधणे, या उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी कृषि विद्यापीठामार्फत सातत्याने कार्य करण्यात येत आहे.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी करिता वित्तीय वर्ष २०२४-२५ मध्ये संशोधनाकरिता रू.३२.२०कोटी व बांधकामाकरिता रू. ३७.८० कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली होती. संशोधनाकरिता तरतूद करण्यात आलेला निधी हा स्वतंत्र उपलेखाशिर्षांतर्गत, तसेच बांधकामाकरिता निधी हा स्वतंत्र उपलेखाशीर्षांतर्गत उपलब्ध करून देण्यात आला होता. संशोधन कार्याकरिता मंजूर करण्यात आलेल्या निधीचा विनियोग हा संशोधनासाठीच करणे अपेक्षित असून, बांधकामाकरिता उपलब्ध करून दिलेला निधी बांधकामाच्या प्रयोजनाकरिता वापरणे अभिप्रेत आहे.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत विविध बांधकामांच्या निविदांमध्ये आर्थिक अनियमितता झाल्याच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या आहेत. सदरहू तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करण्याकरिता महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद,पुणे यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे. सदरहू समितीमध्ये नियंत्रक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी , सहसंचालक (प्रशासन), महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे , कार्यकारी अभियंता, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचा समावेश आहे. या समितीने आपला अहवाल नुकताच शासनास सादर केला असून, सदर अहवालाची छाननी करण्यात येत आहे.छाननीअंती अहवालातील निष्कर्षांच्या अनुषंगाने नियमोचित कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

याखेरीज लक्षवेधी सूचनेत उल्लेख केलेल्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी या विद्यापीठाच्या परिसरातील " इंद्रधनुष्य" या वसतीगृहाच्या इमारतीची संरचनात्मक तपासणी (Structural Audit) करण्याबाबत महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद,पुणे यांनी कुलगुरू, अभियांत्रिकी महाविद्यालय ,पुणे (सी.ओ.ई.पी.) यांना कळविले असून त्यानुषंगाने कार्यवाही सुरू आहे.

*****************

एच-७१८९अ

लक्षवेधी सुचना क्रमांक २२८०

महाराष्ट्र विधान सभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री.सुरेश धस, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र. २२८० पुढीलप्रमाणे आहे:-**

आयुक्त कृषि, कृषि विभागातील अधिकारी व कर्मचारी,शेतकरी लोकप्रतिनिधी यांचे मत विचारात न घेता माफदा कडुन कोटयावधी रुपये घेउन,भ्रष्टाचारीमार्गाचा अवलंब करुन, माफदाच्या दबावामुळे कृषि निविष्ठा(खत,बियाणे, किटकनाशके) उत्पादक करणाया कंपन्या,कृषि सेवा केंद्र यांची तपासणी करणारे गुणनियंत्रण यंत्रणा जाणीवपूर्वक दुबळी केली आहे शेतकरी बांधवाना गुणवत्ता पूर्ण बियाणे, खते, कीटकनाशके मिळण्यासाठी कृषी विभागाने गुणनियंत्रण अधिकारांचे विकेंद्रीकरण २०१० साली केले मात्र,१९ जून २०२५ रोजी जारी अधिसूचनेद्वारे कृषी विभागाने आपल्या अधिकाऱ्यांचे अधिकार काढून घेतले आहेत. बोगस कृषी कंपन्यांच्या दवावात शासनाने कृषि विभाग दुबळा केला आहे याला कंपन्याचे हित जोपासणारे काही भ्रष्ट अधिकारी, वर्षानुवर्षे गुणनियंत्रण विभागात ठाण मांडून बसणारे आयुक्तालयातील अधिकारी यांचा हात असणे ? राज्यात यासाठी कृषी विभागातील विविध अधिकारी यांची फळी कार्यरत असणे त्यामुळे जिल्ह्यात व तालुक्यातील भरारी पथकामुळे वियाणे, कीटकनाशके,खते उत्पादक व विक्रेते यांच्या कंपन्या,दुकाने यांच्यावर धाडी घातल्या जात होत्या त्यामुळे भेसळ करायला वाव कमी व शासनाचा वचक कायम होता.कृषी विभागात मात्र नवीन अधिसूचनेनुसार राज्यभरातील कृषि गुणवत्ता निरीक्षकांची निविष्ठा उत्पादक व विक्रेता कंपन्यांची आणि सेवा केंद्रांची संख्या किमान दुप्पटी पेक्षा जास्त वाढलेली असणे निरीक्षकांची संख्या निम्म्यावर का आणलीअसणे.कृषि निविष्ठाची गुणवता राखण्यासाठी शासन स्तरावर काय उपाययोजना करणार याकडे लक्ष वेधतो.

**मा.मंत्री (कृषि) यांचे निवेदन**

राज्यात खरिप हंगामाचे नियोजन प्रत्येक वर्षी एप्रिल महिन्यापासून सुरू केले जाते. त्यानुसार राज्यातील शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार कृषी निविष्ठा उपलब्ध करून देण्यासाठी राज्यामध्ये राज्यस्तर, विभागस्तर, जिल्हास्तर व तालुका स्तरावर अशा एकूण ३९५ भरारी पथकांची स्थापना करण्यात आलेली होती.

बी-बियाणे अधिनियम १९६६, बियाणे नियम १९६८ व बियाणे नियंत्रण आदेश १९८३, किटकनाशके अधिनियम १९६८, किटकनाशक नियम, १९७१ व खत नियंत्रण आदेश १९८५या कायद्यांतर्गत या निविष्ठांच्या उत्पादनासाठी व वितरणासाठी परवाना दिला जातो. राज्यामध्ये बियाणे, खते व कीटकनाशके या निविष्ठांचे उत्पादन, पुरवठा, साठवणूक व वितरण या बाबी कायद्यान्वये नियंत्रित केलेल्या आहेत. महाराष्ट्र शासनचे अधिसूचना दिनांक १३/१०/२०१० अन्वये एकुण ११३१ गुणवत्ता नियंत्रण निरिक्षकाची नियुक्ती करण्यात आलेली होती. तदनंतर दिनांक १९/०६/२०२५ या शासन राजपत्राद्वारे सुधारणा करून एकूण ४८३ निरिक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. निविष्ठा उत्पादनासाठी राज्यस्तरावर उत्पादन व विक्री परवाना अधिकारी म्हणून

शेटा H/624 (750-7-25)

C कृसाप.

संचालक निविष्ठा व गुण नियंत्रण हे कार्यरत असून जिल्हा स्तरावरील विक्री परवाना अदा करण्यासाठी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना अधिकार प्रदान केलेले आहेत. शासनाने निर्गमित केलेल्या अधिसूचनेमध्ये या उत्पादन तसेच विक्री परवाना अधिकारी यांच्या अधिकारामध्ये कोणत्याही पद्धतीने बदल करण्यात आलेला नाही.

उत्पादन तसेच विक्री होत असताना या तीनही निविष्ठांच्या निविष्ठांचे नमुने काढून ते प्रयोगशाळेत तपासणी करिता पाठवण्यासाठी राज्यांमध्ये उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, मोहीम अधिकारी, कृषी विकास अधिकारी, तंत्र अधिकारी, इत्यादी कृषी विभागातील अधिकाऱ्यांना अर्धवेळ निरीक्षक म्हणून कामकाज करण्यासाठी अधिसूचना दि. १३.१०.२०१० अन्वये अधिसूचित करण्यात आलेले होते. सदरचे अधिकाऱ्यांना नमुने तपासणी घेणे तसेच उत्पादन तथा विक्री केंद्रांची नियमित तपासणी करणे या कामासाठी लक्षांक देण्यात येत होते. मात्र हे निरीक्षक पूर्णवेळ नसल्याने व त्यांना कृषी विभागातील इतर कामही सोपवण्यात आलेली असल्याने त्यांना देण्यात आलेले लक्षांक हे मर्यादित स्वरूपाचे होते. गुण नियंत्रण कामकाजासाठी जिल्हास्तरावर पूर्ण वेळ फक्त एकच निरीक्षक ठेवण्यात आलेला होता. अशा परिस्थितीत गुणवत्ता नियंत्रण कामकाजासाठी पूर्णवेळ निरीक्षकांची संख्या अत्यंत अत्यल्प असल्याने या कामकाजामध्ये विस्कळीतपणा येत होता. तसेच काही अक्षम्य अपराध झाल्यास त्याबाबतची जबाबदारी देखील निश्चित करण्यामध्ये मर्यादा येत होत्या या अनुषंगाने विचार करून शासनाने या अर्धवेळ निरीक्षकांचे अधिकार व्यपगत करून 'प्रत्येक तालुक्यासाठी एक कृषी अधिकारी दर्जाचा पूर्ण वेळ निरीक्षक नेमलेला आहे. या निरीक्षकाकडे गुणवत्ता नियंत्रणाचे कामकाज सोडून इतर कोणतेही कामकाज देण्यात आलेले नाही. त्यामुळे राज्यातील निरीक्षकांची संख्या ११३१ वरून घटून ४८३ एवढीच झालेली असली तरी पूर्ण वेळ निरीक्षकाला नमुने घेणे, तपासणी करणे यासाठी यापूर्वीपेक्षा जास्त कामकाज करणे शक्य असल्याने त्यानुसार लक्षांक वितरीत करण्यात आलेले आहे. परिणाम स्वरूप नमुने घेणे तथा उत्पादन व विक्री केंद्राची तपासणी करणे या कामकाजामध्ये कोणत्याही प्रकारचा ताण न येता उलट व्यापक व नेमके कामकाज होणे शक्य होणार आहे. या कामी विभाग स्तरावर एकूण ८ भरारी पथकांची स्थापना करण्यात आलेली असून जिल्हा स्तरावर एकूण ३४ भरारी पथकांची स्थापना केलेली आहे. सदर भरारी पथकांमार्फत उत्पादक कृषि निविष्ठा उत्पादक/वितरक/विक्रेते यांची तपासणी करणे प्राप्त तक्रारीचे निराकरण करणे व त्यानुसार कायदेशीर कारवाई करणे या बाबी केल्या जातात.

कायद्यातील तरतुदीनुसार आवश्यक असणाऱ्या पात्रतेनुसारच या गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांची नियुक्ती केली आहे. तसेच सदरचे नियुक्त करण्यात आलेले अधिकारी हे नविन नियुक्तीचे अधिकारी नसून कृषी विभागामध्ये कार्यरत असणारे अधिकारी आहेत. तसेच आवश्यकतेनुसार त्यांना प्रशिक्षणाची व्यवस्था देखील कृषी विभागामार्फत केलेली आहेत. तालुका स्तरीय गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक हे पूर्णवेळ निरीक्षक असल्यामुळे इतर शासकीय कामावर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेण्यात आलेली आहे.

*********

लक्षवेधी सूचना क्र.६८०

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. हिरामण खोसकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ६८० पुढीलप्रमाणे आहे:-**

"राज्यात मार्च, २०२२ नंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका न होणे, नाशिक जिल्हयातील इगतपुरी-त्र्यंबकेश्वर मतदार संघातील जिल्हा परिषदमध्ये प्रशासकीय राजवट असणे, जिल्हा परिषद अंतर्गत विशेष शेष निधी हा राखीव असून या निधीचा उपयोग उर्वरित विकास कामांसाठी खास बाब म्हणून खर्च करण्यात येणे, असे असल्याने जिल्हा परिषदेचा हा विशेष शेष निधी सन २०२२ नंतर कुठे खर्च करण्यात आला याबाबतची माहिती स्थानिक लोकप्रतिनिधी या नात्याने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांच्याकडे दि.१६.६.२०२५ रोजीच्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे विचारणा करण्यात येणे, परंतु अद्यापही या संदर्भातील कोणतीच माहिती देण्यात न येणे, परिणामी सदरचा विशेष शेष निधीचा दुरूपयोग झाल्याची साशंकता निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करून कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

**श्री. जयकुमार गोरे, मा.मंत्री (ग्रामविकास व पंचायत राज) यांचे निवेदन**

जिल्हा परिषद, नाशिक येथे दि.२१/०३/२०२२ पासून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक हे प्रशासक म्हणून नियुक्त आहेत. सन २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीत नाशिक जिल्हा परिषदेच्या सेस निधी मधुन इगतपुरी-त्र्यंबकेश्वर मतदार संघात एकुण रुपये २,३०,२५,४८४ (रूपये दोन कोटी तीस लक्ष पंचविस हजार चारशे चवऱ्यांशी) इतक्या रकमेची पुढील विकास कामे करण्यात आलेली आहेत-

१) लघुपाटबंधारे विभागांतर्गत इगतपुरी तालुक्यात नागोसली व मुळेगाव येथे एकूण रुपये ९,९३,३०४ इतक्या रकमेची पाझरतलाव सुशोभिकरणाची कामे करण्यात आलेली आहेत.

२) बांधकाम विभागांतर्गत सन २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीत ग्रामीण रस्ते कॉंक्रीटीकरण, बस पिकअप शेड उभारणे, मंदीर परिसरात सुशोभिकरण करणे, रस्त्यावर पाईप मोरी बसविणे इत्यादी एकूण रुपये १,४१,८७,३५६ इतक्या रकमेची विकास कामे करण्यात आलेली आहेत.

३) पशुसंवर्धन विभाग अंतर्गत पशुवैदयकीय दवाखाने दुरुस्तीकरण व विदयुतीकरण करणे इत्यादी एकूण रुपये ७,९७,००० इतक्या रकमेची विकास कामे करण्यात आलेली आहेत.

४) शिक्षण विभागाअंतर्गत शाळा दुरुस्ती करणे इत्यादी एकूण रुपये ७०,४७,८२४ इतक्या रकमेची विकास कामे करण्यात आलेली आहेत.

लेखा H/627 (700-7-25)-1

(कृ. मा. प.)

इगतपुरी-त्र्यंबकेश्वर मतदार संघातील जिल्हा परिषद, नाशिक अंतर्गत २०२२ नंतर सेस निधीअंतर्गत झालेल्या कामांची माहिती मिळण्याबाबत मा.श्री. हिरामण खोसकर, वि.स.स. यांचे दि.१८.६.२०२५ चे निवेदन नाशिक जिल्हा परिषद, कार्यालयास प्राप्त झाले होते. त्याअनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी मा.श्री. हिरामण खोसकर, वि.स.स. यांना दि.३.७.२०२५ च्या पत्रान्वये उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे कळविले आहे. सन २०२२-२३ पासून पुढे नाशिक जिल्हा परिषदेच्या सेस निधीचा विनियोग जिल्हयांतील विकास कामांकरिता नियमानुसार करण्यात आलेला असून सदर निधीचा दुरूपयोग झालेला नाही.

*******

H/627-19

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

## विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक-२०९१

मा. श्री. विजयसिंह पंडित, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २०९१ पुढीलप्रमाणे आहे :-

"बीड जिल्हा परिषदेच्या ३४९ शाळांच्या ५९२ वर्गखोल्या अत्यंत धोकादायक असणे, कुजलेल्या भिंती उघडे छत, दरवाजे आणि खिडक्या तुटलेल्या अशा अवस्थेतील वर्गखोल्यांमध्ये ज्ञानार्जन सुरु असणे, मोठा पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे अनेकठिकाणी शालेय इमारती क्षतिग्रस्त होणे, बीड जिल्हा परिषदेच्या २४७१ शाळांपैकी २४१५ शाळा प्राथमिक तर ५९ माध्यमिक शाळा असणे, जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे १ कोटी ३ लाख ४५ हजार रुपयांचे विज बिल थकीत असणे, थकीत विज बिलामुळे ४९७ शाळांचे विज जोडणी बंद असणे, जिल्ह्यातील ७७२ शाळांना विज जोडणी नसणे, संगणकीय शिक्षण प्रणालीतील ई-लर्निंग, डिजिटल प्रणाली, एलईडी वापरसह आदी शैक्षणिक अध्यापन पध्दतीपासून हजारो विद्यार्थी वंचित असणे, धोकादायक इमारतीतील शैक्षणिक कार्यामुळे विद्यार्थी, शिक्षक आदींच्या जिवीतास धोका निर्माण होणे, अनेक शाळांमध्ये नवीन वर्ग खोल्यांची बांधकामे झाली नसल्यामुळे एकाच वर्गखोल्यामध्ये अनेक वर्गातील विद्यार्थ्यांना एकत्रित ज्ञानदान करण्याची वेळ येणे, जिल्ह्यातील धोकादायक वर्गखोल्यांच्या दुरुस्तीसाठी १४८५.५० लक्ष रुपये निधी उपलब्ध करण्याची मागणी शिक्षण विभागाकडून करण्यात येणे, जिल्हा परिषदेच्या शाळेतील धोकादायक वर्गखोल्यांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करण्याची अत्यंत आवश्यकता असणे, याकामी होत असलेल्या दिरंगाईमुळे विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांमध्ये शासन विरोधी संतापाची भावना असणे, धोकादायक वर्गखोल्यांच्या दुरुस्तीसह नवीन इमारत बांधकामासाठी शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना व शासन प्रतिक्रिया."

---

## मा.मंत्री (ग्रामविकास) श्री.जयकुमार गोरे यांचे निवेदन

सन २०२४-२५ मध्ये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) व राजमाता जिजाऊ शैक्षणिक गुणवत्ता विकास अभियानांतर्गत झालेल्या वर्ग खोली बांधकामे व शाळा दुरुस्तीची पूर्ण झालेली कामे वगळून बीड जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषदेच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक अशा एकूण २४७१ शाळांपैकी सद्यथितीत २१० शाळांमधील ३८४ वर्गखोल्या धोकादायक आहेत. त्या वर्गखोल्यांमध्ये विद्यार्थ्यांना सुरक्षेच्या दृष्टीने बसविले जात नाही.

सन २०२५-२६ मध्ये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) मध्ये शाळाखोली बांधकामासाठी १६५० लक्ष व शाळा दुरुस्तोसाठी रुपये ५०० लक्ष मंजुर असुन सदरच्या मंजूर निधीच्या मर्यादेत कामांना प्रशासकीय मंजुरी देण्याबाबतची प्रक्रिया सुरु आहे. तसेच सन २०२१-२२ मध्ये मराठवाडा विभागासाठी राजमाता जिजाऊ शैक्षणीक गुणवत्ता विकास अभियान अंतर्गत वर्गखोली बांधकामांपैकी २०३ वर्गखोली बांधकामे पूर्ण झालेली असून ६५ वर्गखोली बांधकामे प्रगतीपथावर आहेत. तसेच १२४ शाळा दुरुस्तीची कामे पूर्ण झालेली आहे. सदर कामांसाठी रु.११९५.३५ लक्ष निधी प्राप्त झालेला आहे.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) २०२५-२६ मधील मंजुर तरतुदीच्या मर्यादेत मंजुर होणारी वर्गखोली बांधकामे व शाळा दुरुस्तीची कामे तसेच राजमाता जिजाऊ शैक्षणीक गुणवता विकास अभियाना मधील प्रगतीपथावर असणारी बांधकामे व शाळा दुरुस्तीची कामे पूर्ण झाल्यास धोकादायक वर्ग खोल्यांचे प्रमाण कमी होईल. या व्यतिरिक्त आवश्यक असणाऱ्या धोकादायक वर्ग खोल्यांच्या ठिकाणी नवीन वर्ग

खोली बांधकामासाठी व शाळा खोली दुरुस्तीसाठीचा जास्तीचा निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

बीड जिल्ह्यातील वीज पुरवठा खंडित झालेल्या शाळेचा वीजपुरवठा नियमित करण्याकरीता आवश्यक निधीची मागणी शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे करण्यात आलेली आहे व वीजपुरवठा नसलेल्या शाळांना सोलार पॅनल बसवण्यासाठी पी. एम. सूर्य घर मोफत बिजली योजनेअंतर्गत प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

---

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र.२०२४

श्री.सुनील कांबळे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२०२४ पुढीलप्रमाणे आहे: -

" महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिनांक २८ ऑगस्ट २०१४ रोजी विशेष मागास वर्ग (अ) मधील मुस्लिम समाजास जात प्रमाणपत्रे व जात वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत परिपत्रक जारी केलेले असणे. सदर परिपत्रकातील मुद्दा क्र. ४) शासनाने वेळोवेळी जात प्रमाणपत्र मिळवण्यासाठी/देण्यासाठी विहित केलेल्या कागदपत्राऐवजी मुस्लिम समाजातील व्यक्तींना संबंधित भागातील धार्मिक स्थळ / संस्था यांनी किंवा समाजाच्या नोंदणीकृत संस्थेने दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात यावे असा असणे. सदर परिपत्रकातील मुद्दा क्र.४ चा मोठ्या प्रमाणात दुरुपयोग होणे व त्यामुळे मोठ्या प्रमाणात बनावट जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र वितरित होणे. यामुळे मोठ्या प्रमाणात इतर मागास प्रवर्गातील नागरिकांचे नुकसान होणे. धार्मिक स्थळ / संस्था यांना 'कागदपत्रे व पुरावे' बाबत संदर्भाने दिलेले अघोषित अधिकार व ती कागदपत्रे पुरावा म्हणून स्वीकारणे हे बेकायदेशीर व असंविधानिक असणे. सदर परिपत्रकातील मुद्दा क्र. ४ पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्याबाबत सुनील वारे, महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी, पुणे तथा मुख्य समन्वयक, जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी, समित्या (सर्व) महाराष्ट्र राज्य. यांनी दिनांक २३ नोव्हेंबर २०२३ रोजी शिफारस व विनंती केली असणे. सदर परिपत्रक रद्द करणे व सदर परिपत्रकातील मुद्दा क्र. ४ अन्वये देण्यात असलेली जात प्रमाणपत्रे व जात वैधता प्रमाणपत्रे पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करणे. याबाबत सरकारने करावयाची कारवाही व उपाययोजना."

## मा. मंत्री (सामाजिक न्याय) यांचे निवेदन

सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०९.०७.२०१४ च्या अध्यादेशाद्वारे (सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४) सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या मुस्लिम गटासाठी विशेष मागास प्रवर्ग-अ अंतर्गत शासकीय व निमशासकीय सरळसेवा भरतीमध्ये व शैक्षणिक संस्थेतील प्रवेशासाठी ५% आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुषंगाने अल्पसंख्याक विकास विभागाच्या शासन निर्णय, दि.१९.०७.२०१४ अन्वये विशेष मागास प्रवर्ग-अ मध्ये समाविष्ट असणाऱ्या मुस्लिम समाज घटकांची अनुसूची निश्चित करण्यात आली होती. सदर शासन निर्णयामधील निर्देशानुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि.२२.०७.२०१४ रोजीचा शासन निर्णय व दि.२८.०८.२०१४ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये विशेष मागास प्रवर्ग-अ मधील मुस्लिम समाजास जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्रे देण्याबाबतची कार्यवाही करण्यासंदर्भात सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. सदर परिपत्रकातील मुद्दा क्र.४ अन्वये "शासनाने वेळोवेळी जात प्रमाणपत्र मिळवण्यासाठी / देण्यासाठी विहित केलेल्या कागदपत्राऐवजी मुस्लिम समाजातील व्यक्तीना संबंधित भागातील धार्मिक स्थळ / संस्था यांनी किंवा समाजाच्या नोंदणीकृत संस्थेने दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात यावे" अशा सूचना देण्यात आल्या होत्या.

तदनंतर, सदर अध्यादेशाचे दिनांक २३.१२.२०१४ पर्यंत कायद्यात रुपांतर न झाल्याने व सदरहू अध्यादेश व्यपगत झाल्याचे नमूद करुन सामान्य प्रशासन विभागाने दि.०२.०३.२०१५ रोजीच्या शासन

[कृपाप

निर्णयान्वये विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) करिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी बिंदूनामावली विहीत करण्यासंदर्भातील सामान्य प्रशासन विभागाचा दि.२४.०७.२०१४ रोजीचा शासन निर्णय रद्द केला आहे. प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल विविध रिट याचिकांमध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.१४.११.२०१४ रोजी अंतरिम निर्णय दिला आहे. सदर निर्णयान्वये सदर अध्यादेशान्वये दिनांक ०९.०७.२०१४ ते दि.२३.१२.२०१४ (अध्यादेश व्यपगत होईपर्यंत) या कालावधीत शासकीय व अनुदानित शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशासाठी दिलेले आरक्षण अबाधित ठेवले आहे तसेच मा.उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशाच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीतील शासकीय सेवेत झालेल्या नियुक्त्या संरक्षित करण्यात आलेल्या आहेत. परंतु खाजगी विनाअनुदानित संस्थांमधील प्रवेश व शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी दिलेल्या आरक्षणाला स्थगिती दिली आहे.

तद्नंतर, उक्त शासन परिपत्रकातील मुद्दा क्र.४ च्या संदर्भात शासनाने वेळोवळी जात प्रमाणपत्र मिळविण्यासाठी / देण्यासाठी विहित केलेल्या कागदपत्रांसह अर्जदार व त्याच्या रक्तनातेसंबंधातील व्यक्तीचे मानीव दिनांकापूर्वीचे शालेय/महसूल व इतर सार्वजनिक लेखे दस्ताऐवज/अभिलेखे संबंधीत सक्षम प्राधिकारी यांना सादर करावे, असे बदल होणे आवश्यक असल्याचे नमूद करुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांनी शासनास अहवाल सादर केला आहे.

प्रस्तुत प्रकरणी अल्पसंख्याक विकास विभाग, विधी व न्याय विभाग आणि सामान्य प्रशासन विभाग यांचे अभिप्राय घेण्यात आले आहेत. सदर अभिप्रायांनुसार उपरोक्त अध्यादेश व्यपगत झाला असल्याने त्यासंदर्भात निर्गमित केलेले शासन निर्णय, शासन परिपत्रक आपोआप रद्द ठरतात. तथापि, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.१४.११.२०१४ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशास अनुसरून या विभागाकडून सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याचे अभिमत दिले आहे. त्यास अनुसरून विभागाकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

राज्यातील मागासवर्गीयांना जातींचे प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र देण्याकरिता "महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातींचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २०००(सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२३)" अधिसूचित करण्यात आलेला असून त्या अंतर्गत शासन अधिसूचना, दि.१ सप्टेंबर, २०१२ अन्वये "महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातींचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२" अधिसूचित करण्यात आलेले आहेत. उक्त अधिनियम, २०००, नियम, २०१२ व सदर नियमामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणांनुसार मागासवर्गीय व्यक्तींना जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकडून करण्यात येते. सबब, सदर नियम, २०१२ मधील विहीत तरतूदींनुसार फक्त सार्वजनिक अभिलेख्यांशिवाय दि.२८.०८.२०१४ रोजीच्या शासन परिपत्रकातील मुद्दा क्र.४ अन्वये दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने विशेष मागास प्रवर्ग-अ प्रवर्गातील कोणत्याही व्यक्तीस जात वैधता प्रमाणपत्र देण्यात आले नसल्याचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांनी दि.०८.०७.२०२५ रोजीच्या पत्रांन्वये शासनास कळविले आहे.

*****

H/361-19

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

मा.श्री. अभिमन्यु पवार, विधानसभा सदस्य महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये खालीलप्रमाणे लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे-

"महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये नोंदणीकृत संघीय सहकारी संस्थाच्या संचालक मंडळ निवडणूकीसाठी सदरील संघीय संस्थेच्या सभासद संस्थांना मतदानाचा अधिकार असणे, उक्त अधिनियमातील कलम २७ (३) मध्ये ज्या संस्थेने आपल्या निधीचा कोणताही भाग, संघीय संस्थेच्या भागामध्ये (शेअर्समध्ये) गुंतविला असेल त्यासंस्थेस, त्या संघीय संस्थेच्या कामकाजामध्ये आपल्यावतीने मत देण्यासाठी आपल्या सदस्यापैकी कोणत्याही एका सदस्याची नेमणूक करता येईल अशी तरतूद असणे, बाजार समित्यांच्या निवडणूकीमध्ये बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील कृषि पतसंस्थेच्या सर्व संचालकांना व ग्रामपंचायत सदस्यांना मतदानाचा अधिकार असणे, सहकारातील इतर संघीय संस्थेच्या निवडणूकीसाठी सभासद संस्थांच्या संचालक मंडळात प्रतिनिधीचा ठरावासाठी संचालक मंडळात मतभेत निर्माण होत असणे, मोठ्या प्रमाणात भांडण तंटे व आर्थिक उलाढाल ठरावासाठी होत असल्याचे दिसून येणे, राखीव प्रवर्गातील व महिला प्रवर्गातील प्रतिनिधी ठराव दिले जात नसणे, सर्व घटकातील प्रतिनिधिना मतदानाची संधी मिळावी यासाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती निवडणूक नियम २०१७ मधील तरतुदी प्रमाणे संघीय सहकारी संस्थाच्या संचालक मंडळ निवडणूकीसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २७ (३) व महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम २०१४ चे नियम १० (२) मध्ये सुधारणा करुन सभासद संस्थांच्या सर्व संचालकांना मतदानाचा अधिकार देणेबाबतची तरतुद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

मा. मंत्री (सहकार) यांचे निवेदन

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम २७ मध्ये सदस्यांच्या मतदानाच्या अधिकाराची तरतुद आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम २७ (१) मध्ये "पोटकलमे (२) ते (७) दोन्ही धरुन, यात अन्यथा तरतूद केलेली असेल त्या व्यतिरिक्त कोणत्याही संस्थेच्या सदस्यास, तिच्या कामकाजात एका पेक्षा अधिक मत असणार नाही आणि तिने मत देण्याच्या प्रत्येक अधिकाराचा व्यक्तिशः वापर केला पाहिजे आणि त्याचा बदली व्यक्तीद्वारे वापर करता येणार नाही" अशी तरतूद आहे.

तसेच संघीय संस्थेच्या बाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम २७ (३) मध्ये "ज्या संस्थेने आपल्या निधीचा कोणताही भाग, संघीय संस्थेच्या भागांमध्ये (शेअर्समध्ये) गुंतविला असल्यास त्या संस्थेस, त्या संघीय संस्थेच्या कामकाजामध्ये आपल्या वतीने मत देण्यासाठी आपल्या सदस्यांपैकी कोणत्याही एका सदस्याची नेमणूक करता येईल व त्याप्रमाणे अशा सदस्यास आपल्या संस्थेच्या वतीने मत देण्याचा अधिकार राहील. परंतु, संघीय संस्थेच्या कोणत्याही नवीन सदस्य संस्थेने आपल्या निधीचा कोणताही भाग अशा संघीय संस्थेच्या भागांमध्ये

(शेअर्समध्ये) गुंतविल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर ती त्या संघीय संस्थेच्या कामकाजामध्ये मत देण्यास पात्र असेल " अशी तरतूद आहे.

त्यानुसार, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ९ मध्ये संस्था अथवा संस्था व व्यक्ती सभासद असलेल्या सहकारी संस्थांची तात्पुरती मतदार यादी करणेबाबत तरतूद करण्यात आली आहे. तसेच, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम १० मध्ये संस्था किंवा संस्था आणि व्यक्ती सभासद असलेल्या सहकारी संस्थांच्या तात्पुरत्या मतदार यादीत समाविष्ट करावयाचा तपशील स्पष्ट करण्यात आला आहे.

महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी- विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ च्या कलम १३ मध्ये बाजार समित्यांच्या रचनेबाबत तरतूद करण्यात आलेली आहे. यामधील पोटकलम (१) नुसार " पोटकलम (२) च्या उपबंधाच्या अधीन प्रत्येक बाजार समितीस पुढील सदस्य असतील;-

अ) बाजार क्षेत्रात राहणारे जे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने, आवश्यकता भासल्यास, जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा, यथास्थितीत जिल्हा उपनिबंधकाच्या मदतीने याबाबतीत, वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास एकवीस वर्षाहून कमी वयाचे नसतील असे खालील विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे पंधरा शेतकरी,

१. बाजार क्षेत्रात कार्य करणाऱ्या कृषि पतसंस्था व बहुउद्देशिय सहकारी संस्था (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि त्याखाली केलेले नियम यांच्या अर्थातंर्गत असलेल्या) ज्या त्यांच्या सदस्यांना पीककर्ज संवितरीत करतात त्यांच्या व्यवस्थापन समितीच्या सदस्यांकडून अकरा सदस्य.

२. बाजार क्षेत्रात कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सदस्यांकडून चार सदस्य निवडून देण्यात येतील.

त्यानुसार, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ६ मध्ये कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकीसाठी मतदार यादी तयार करणेबाबत कार्यपध्दती स्पष्ट करण्यात आलेली आहे. यातील पोटनियम (१) नुसार कृषि पतसंस्थांच्या आणि बहुउद्देशिय सहकारी संस्थांच्या सदस्यांची सूची जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्याकडून तयार व सादर करण्यात येते. तसेच, बाजार समितीची मुदत संपण्याच्या १८० दिवसापूर्वी किंवा विर्निदिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत बाजार क्षेत्रात असणाऱ्या अनुसूचित जातीचे, अनुसूचित जमातीचे सदस्य स्पष्टपणे दर्शविणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सदस्यांची सूची, गटविकास अधिकारी यांच्याकडून तयार व सादर करण्यात येते.

उपरोक्त नमूद तरतुदींनुसार, राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूका महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ नुसार व कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूका महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ नुसार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्फत पार पाडल्या जातात.

सहकारातील इतर संघीय संस्थेच्या निवडणुकीसाठी सभासद संस्थांच्या संचालक मंडळात प्रतिनिधीचा ठरावासाठी संचालक मंडळात मतभेद निर्माण होत असणे, मोठ्या प्रमाणात भांडण तंटे व आर्थिक उलाढाल ठरावासाठी होत असल्याचे दिसून येणे, राखीव प्रवर्गातील व महिला

प्रवर्गातील प्रतिनिधी ठराव दिले जात नसणे या बाबी लेखी स्वरुपात प्राधिकरणाच्या निदर्शनास आलेल्या नाहीत.

बाजार समित्यांची व सहकारी संस्थांची स्थापना दोन भिन्न अधिनियमांद्वारे करण्यात येत असून, संबंधित कायदे व नियमांनुसार त्यांचे नियंत्रण केले जाते.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम २(९) मध्ये "सभासद" ही व्याख्या नमूद करण्यात आली असून प्रकरण ३ मध्ये सभासदांचे अधिकार व जबाबदाऱ्यांची तरतूद करण्यात आली आहे. सहकारी संस्थेच्या प्रत्येक सभासदाने उपविधीतील तरतुदीनुसार भाग धारण करण्याची तरतूद आहे.

कलम २७ मधील तरतूदीनुसार कोणत्याही सभासदास संस्थेच्या कामकाजात एकापेक्षा जास्त मत देण्याचा अधिकार नाही. राज्यात सध्या कार्यरत असलेल्या संघीय संस्था तसेच शिखर संस्थांच्या सभासद असलेल्या संस्थांच्या वतीने मतदानाचा हक्क बजावण्यासाठी अशा संस्थेच्या संचालक मंडळाच्या ठरावाव्दारे संस्थेच्या सभासदांपैकी केवळ एक प्रतिनिधी पाठविला जातो. संघीय संस्थेच्या सभासद असलेल्या सहकारी संस्थांच्या संचालकांची संख्या विभिन्न आहे (११ ते २१). अशा परिस्थितीत सभासद संस्थेच्या वतीने बाजार समित्यांप्रमाणे संस्थेच्या सर्व संचालकांना मतदानाचा अधिकार द्यावयाचा झाल्यास सहकार कायद्यातील कलम २७ मधील तरतुदीचे (एका सभासदास एक मत) अनुपालन होणार नाही. ही बाब विचारात घेता मा. सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे सहकार कायद्याच्या कलम २७(३) तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ मधील नियम १०(२) मध्ये सुधारणा करुन सभासद संस्थेच्या सर्व संचालकांना मतदानाचा अधिकार देणे सुसंगत होणार नाही.

******

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन
महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ३४.

श्री. मोहन मते, श्री.रोहित पवार,डॉ.जितेंद्र आव्हाड,श्री.बापूसाहेब पठारे,श्री.सुनिल प्रभू,श्री.हरिश्चंद्र भोये,श्री.विनोद निकोले,श्रीमती स्नेहा दुबे, श्री.राजेंद्र गावित,वि.स.स

---

" पालघर जिल्ह्यातील जोगलवाडी येथील एका गर्भवतीस वेळेवर रुग्णवाहिका आणि वैद्यकीय उपचार न मिळाल्याने तिचे अर्भक गर्भातच दगावल्याची आणि संबंधित दाम्पत्याला रुग्णालयाने रुग्णवाहिका उपलब्ध करून न दिल्याने मृत अर्भकाला पिशवीत टाकून एसटीने तब्बल ८० किमी प्रवास करून आपले गाव गाठून मृत अर्भकावर अंत्यसंस्कार करावे लागले असल्याची संतापजनक घटना दिनांक १३ जून, २०२५ रोजी वा त्या सुमारास घडली असणे, संबंधित महिलेला प्रसूतीकळा सुरू झाल्याने तिच्या कुटुंबियांनी सातत्याने १०८ वर रुग्णवाहिकेसाठी संपर्क साधला असता रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्याने तिला खाजगी वाहनातून खोडाळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आणण्यात येणे, सदरहू केंद्रातील डॉक्टरांनी तब्बल साडेतीन तास लोटल्यावर संबंधित गर्भवती महिलेवर वैद्यकीय उपचार करण्यास असमर्थता दर्शविल्याने तिला पुढील उपचारासाठी मोखाडा येथील ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात येणे, सदरहू रुग्णालयातील डॉक्टरांना तिच्या तपासणी दरम्यान बाळाचा मृत्यू झाल्याचा आढळून आल्याने पुढील उपचारासाठी नाशिक जिल्हा रुग्णालयात पाठविणे, त्याठिकाणी डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करून मातेचा जीव वाचविणे परंतु मृत अर्भक गावी नेण्यासाठी नाशिक जिल्हा रुग्णालयातून रुग्णवाहिका न मिळाल्याने आणि खासगी वाहनासाठी कुटुंबियांकडे पैसे नसल्याने त्यांना मृत अर्भक पिशवीतून ८० किमीवरील गाव गाठावे लागणे, या प्रकरणातील असंवेदनशील आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच जळगाव जिल्ह्यातील चोपडा तालुक्यातील वैजापुर जवळ दिनांक २८ मे २०२५ रोजी वेळेत आरोग्याच्या सुविधा उपलब्ध न झाल्याने गर्भवती महिलेने रस्त्याच्या कडेला बाळाला जन्म दिल्याची घटना घडणे, त्याचप्रमाणे रूग्णवाहिका उपलब्ध झाली नसल्याने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या रूग्णालयासमोर महिलेचा मृत्यू झाला असणे, राज्यभरात अत्यावश्यक वेळी रूग्णवाहिका वेळेत उपलब्ध होत नसणे, यामुळे रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असणे, या घटनांची सखोल चौकशी करून राज्यात रुग्णांना रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया "

---

मा. श्री. प्रकाशराव आबिटकर, मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे निवेदन

सन्मानीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेत अनुक्रमे पालघर जिल्ह्यातील जोगलवाडी,जळगाव जिल्ह्यातील चोपडा तालुक्यातील वैजापूर आणि कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतील रुग्णालयात सेवाउपलब्धतेबाबत आहे.त्यासंदर्भातील वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे आहे.:-

अ. श्रीमती अविता सखाराम कवर वय – २४ वर्षे, रा मु.जोगलवाडी पो. उघळे ता. मोखाडा ही गर्भवती महिला भोज वीट भट्टीवर कामाकरीता मागील आठ महिन्या पासून स्थलांतरित झाली असून तिची नोंदणी प्राथमिक आरोग्य केंद्र, वांगणी ता.अंबरनाथ, जि. ठाणे येथे करण्यात आली होती दिनांक ११/०६/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता गरोदर मातेच्या पोटात दुखु लागल्याने त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्र खोडाळा येथे दाखल केले.

वैद्यकिय अधिकारी यांनी तपासणी करुन मातेला ग्रामीण रुग्णालय मोखाडा येथे संदर्भ केले. मोखाडा येथील स्त्रीरोगतज्ञ यांनी तपासणी केली असता महिलेचे गर्भ पायाळू व मृत होते म्हणून तिला पुढील तात्काळ उपचारासाठी जिल्हा रुग्णालय नाशिक येथे संदर्भित करुन रात्री १०.१० वाजता दाखल करण्यात आले.सदर मातेची स्त्रीरोगतज्ञांनी आवश्यकती तपासणी करुन नातेवाईकांना बाळ गर्भातच मृत असल्याचे अवगत करुन

पतीचे संमतीपत्र घेतले .दरम्यान दि. ११/०६/२०२५ रोजी रात्री १०.४० मिनीटांनी मातेची प्रसुती झाली व त्यांनी उपजत मृत्यु झालेल्या स्त्री अर्भकाला जन्म दिला. प्रसुत महिलेस दोन दिवसाच्या औषधोपचारानंतर दि.१३/०६/२०२५ रोजी सकाळी जिल्हा रुग्णालय नाशिक येथून डिस्चार्ज देण्यात आला. जिल्हा रुग्णालयाकडून वाहन उपलब्ध करुन देण्याबाबत विचारणा केली असता पतीने नकार दिला. तदनंतर सदर माता बसने प्रवास करुन सायंकाळी ५:३० च्या दरम्यान तिच्या गावी जोगलवाडी येथे पोहोचली. सदर घडलेल्या प्रकरणाच्या अनुषंगाने कंत्राटी सेवक वैद्यकीय अधिकारी यांना प्रा. आ. केंद्र खोडाळा येथुन दिनांक २४/०६/२०२५ चे आदेशान्वये कार्यमुक्त करण्यात आले आहे, तसेच कंत्राटी वाहन चालक यांच्या सेवा बंद करुन अन्य कंत्राटी वाहन चालक उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. तसेच उपसंचालक आरोग्य सेवा नाशिक मंडळ, नाशिक यांच्याकडील प्राप्त अहवालानुसार या प्रकरणी गठीत केलेल्या समितीने दि.१७ जून, २०२५ रोजी चौकशी अहवाल सादर केला असून श्री.सुमित अशोक लिनके, आदिवासी कक्ष समन्वयक, जिल्हा रुग्णालय नाशिक यांची कंत्राटी नियुक्ती समाप्त केली आहे तर इतर जबाबदार अधिकारी विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतुदीनुसार शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे

ब. जळगाव जिल्हयातील चोपडा तालुक्यातील वैजापूर जवळ गर्भवती महिलेने रस्त्याच्या कडेला बाळाला जन्म दिल्याची घटना दि २१ मे, २०२५ रोजी घडलेली आहे. जळगाव जिल्हयातील घटनेच्या संदर्भात त्रिसदस्यीय समिती (जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, निवासी वैद्यकीय अधिकारी) गठीत करणेत आलेली होती. या समितीने ३० मे, २०२५ रोजी चौकशी करुन अहवाल सादर केला असून या अहवालाच्या अनुषंगाने उपकेंद्र कर्जाणे येथील आरोग्य सेविका श्रीमती विभांगिणी प्रेमदास हुमणे यांना दि.०३/०६/२०२५ अन्वये निलंबीत करण्यात आले आहे. तसेच रोजंदारी वाहन चालक श्री. शरद कोळी यांनी कर्तव्यात कसूर केली याकारणास्तव त्यांना सेवेतुन कमी करणेत आलेले आहे. नाशिक मंडळ, नाशिक अधिनस्थ १०२ ॲम्बुलन्स असून त्यांचे मार्फत आरोग्य सेवा देण्यात येत आहे.

क. दि.०५/०५/२०२५ रोजी दुपारी.१.१५ वाजता श्रीम सविता गोविंद पवार ,वय वर्ष ४३ ही महिला तीच्या मुलांसोबत कल्याण-डेंबिवली महानगरपालिकेच्या बाई रुक्मिणीबाई रुग्णालय येथील अपघात कक्षात उपचाराकरिता दाखल झाली होती. तपासणीनंतर सदर महिलेला के.ई.एम.रुग्णालय,मुंबई किंवा छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा जि.ठाणे येथे न्युरोलॉजिस्टचा सल्ला देवून पुढील उपचार करण्याबाबतचा सल्ला दिला. तद्नंतर दुपारी २.०० वा संदर्भ चिठ्ठी दिल्यानंतर रुग्णवाहिकेचे शुल्क रु ५००/ भरल्यानंतर शासनाच्या १०८ क्र. फोन केला असता,रुग्णवाहिका उपलब्ध झाली नाही. पर्यायाने नातेवाईकांनी महिलेला महानगरपालिकेच्या रुग्णवाहिकेने छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा जि.ठाणे येथे घेवून जाण्याचा निर्णय घेतला. तथापि रुग्णाला स्थालांतरीत करण्याकरिता वाहनचालकास इंटरकॉमवरुन वारंवार संपर्क साधला असता उपलब्ध झाले नाही. सदर रुग्णवाहिका दु.३.१० वाजता गेट जवळ आली. त्यादरम्यान रुग्णाची प्रकृती खालावली असता,त्यांना पुन्हा अपघात कक्षामध्ये नेण्यात आले. वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांना " Cardiopulmonary Resuscitation " (CPR)चालु केले .तद्नंतर Inj Atropine Inj.Adrenalin व ऑक्सीजन देण्यात आले.मात्र रुग्णाचा प्रतिसाद मिळाला नाही व दि. ०५. ०५. २०२५ रोजी ०३.४५ वाजता मृत्यु झाला आहे.याबाबत नातेवाईकांनी केलेल्या तक्रारीनुसार सदर घटनेची प्राथमिक चौकशी होवून त्याचा अहवाल महापालिका प्रशासनास प्राप्त झाला आहे. रुग्णाला वेळेवर अपेक्षित उपचारार्थ स्थलांतरीत केले असते तर कदाचित वेळेवर उपचार मिळून रुग्णाचा जीव वाचू शकला असता.त्यामुळे यासाठी संबंधित रुग्णालयातील सिस्टर इन्चार्ज ,वाहनचालक यांचेवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. तसेच बाह्यसंस्थेमार्फत नियुक्त वैद्यकीय अधिकारी यांना कामावरुन कमी करण्यात आले आहे.

राज्यात आरोग्य विभागामार्फत १०८ व १०२ क्रमांकाच्या रुग्णवाहिका रुग्णांना उपलब्ध करून देण्यात येतात.

सामान्य प्रशासन विभाग
लक्षवेधी सूचना क्र. १६१२

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. प्रविण दटके, श्री. प्रताप अडसड, श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानसभा अधिनियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १६१२ पुढीलप्रमाणे आहे:-

"महाराष्ट्र शासन निर्णय दि. २१ डिसेंबर २०१९ नुसार कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आले असणे त्यानंतर नियमित वेतनवाढ लागू करणेबाबत (पदोन्नती व अनुकंपा धोरण वगळून) सेवानिवृत्ती नंतरचे सर्व लाभ देण्यात यावे शासन निर्णय दि. १४/१२/२०२४ रोजी प्रसिद्ध केला असणे तसेच एक दिवसाचा तांत्रिक खंड दि. ०४ ऑक्टोंबर २०२४ नुसार क्षमापित केला असणे, सदर ३ ही शासन निर्णयानुसार हे कर्मचारी नियमित सेवा प्रामाणिकपणे करीत असणे, परंतु शासन निर्णय दि. २ मार्च २०१९ नुसार सातव्या वेतन आयोगामध्ये १०, २०, ३० नियमित सेवेनंतरच्या ३ लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अधिसंख्य अधिकारी / कर्मचारी यांना अद्याप मिळत नसणे, परिणामी या कर्मचाऱ्यांवर जाणूनबुजून अन्याय होत असल्याची भावना निर्माण झाली असणे, सबब अधिसंख्य कर्मचाऱ्यांना आर्श्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळत नसल्याने संविधान अनुच्छेद १४ व १५ चे उल्लंघन होत असणे, मानवतेच्या दृष्टीने अधिसंख्य कर्मचाऱ्यांना समान हक्क, न्याय द्यावा अशी लेखी मागणी आफ्रोह संघटनेमार्फत शासनाकडे केलेली असणे, त्यानुसार शासन निर्णय दि. २ मार्च २०१९ नुसार सातव्या वेतन आयोगामध्ये ३ लाभांच्या १०, २०, ३० निमित सेवेनंतरच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ सर्व अधिसंख्य अधिकारी /कर्मचारी यांना मिळणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

*****************************************************************************

## मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र.८९२८/२०१५ (चेअरमन ॲन्ड मॅनेजिंग डायरेक्टर,एफसीआय आणि इतर विरूद्ध जगदिश बालाराम बहिरा व इतर) व इतर याचिका यामध्ये दिनांक ६.७.२०१७ रोजी मागास जातींना असलेल्या आरक्षणाच्या आधारे शासकीय सेवेत दाखल झालेल्या व त्यानंतर जातीचे दावे अवैध ठरलेल्या व्यक्तींना शासकीय सेवेत संरक्षण देय ठरत नाही. अशा व्यक्तींना शासकीय सेवेत दिलेले संरक्षण घटनेतील तरतूदींशी विसंगत ठरते असा निर्णय दिला. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या सदर निर्णयानुसार कार्यवाही

करण्याच्या अनुषंगाने विधी व न्याय विभाग व महाधिवक्ता (Advocate General) यांचे अभिप्राय घेण्यात आले आहेत. महाधिवक्ता यांनी, राज्य शासनाचे कोणतेही धोरण, निर्णय अथवा आदेश मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात जाऊन जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांना संरक्षण देऊ शकत नाही. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्णयाची अमंलबजावणी करणे क्रमप्राप्त असल्याचे अभिप्राय दिले आहेत.

अनुसूचित जमाती प्रवर्गातील जातींशी असलेल्या नामसाधर्म्यामुळे अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या आरक्षणाच्या आधारे नियुक्ती मिळालेल्या कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत संरक्षण देण्यात आले होते. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ०६.०७.२०१७ रोजीच्या आदेशाची अंमलबजावणी करताना अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या राखीव पदांवरील कर्मचाऱ्यांना दिलेल्या संरक्षणामुळे या प्रवर्गातील बाधीत होणाऱ्या कर्मचाऱ्यांची मोठी संख्या विचारात घेऊन प्रशासनात निर्माण होणारी पोकळी, प्रतिकुल परिणाम व त्यांनी अनेक वर्षे केलेल्या सेवेचा मानवतावादी दृष्टीकोनातून विचार करुन शासन निर्णय दिनांक २१.१२.२०१९ निर्गमित करण्यात आला. सदर शासन निर्णयाच्या अनुसार अनुसूचित जमाती प्रवर्गातून शासन सेवेत नियुक्त झालेल्या तथापि, जातवैधता प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या, ते सादर न केलेल्या, अनुसूचित जमाती प्रवर्गाचा दावा सोडून विशेष मागास प्रवर्ग वा अन्य राखीव प्रवर्गाचे प्रमाणपत्र दिलेल्या कर्मचाऱ्यांना नियमित पदावरुन अधिसंख्य पदावर वर्ग करण्याची तरतूद करण्यात आली.

तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दिनांक १४.१२.२०२२ अन्वये अनुसूचित जमाती प्रवर्गातील अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या सेवा १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत सुरु ठेवण्याची तसेच अशा कर्मचाऱ्यांना सेवाविषयक लाभ (पदोन्नती व अनुकंपा धोरण वगळून ) व सेवानिवृत्तीविषयक लाभ अनुज्ञेय करण्याची तरतूद करण्यात आली.

शासन निर्णय दिनांक १४.१२.२०२२ अन्वये अधिसंख्य पदावरील अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या सेवेत १ दिवसाचा तांत्रिक खंड दिल्यामुळे त्यांना सेवा विषयक लाभ (पदोन्नती, अनुकंपा धोरण व आश्वासित प्रगती योजना वगळून) व सेवा निवृत्ती विषयक लाभ

अनुज्ञेय करण्यात येणारी तांत्रिक अडचण विचारात घेऊन शासन निर्णय दिनांक ०४.१०.२०२४ अन्वये सदर १ दिवसांचा तांत्रिक खंड क्षमपित करुन या कर्मचाऱ्यांना सेवा विषयक लाभ (पदोन्नती, अनुकंपा धोरण व आश्वासित प्रगती योजना वगळून) व सेवा निवृत्ती विषयक लाभ अनुज्ञेय केले आहेत.

वित्त विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०२ मार्च, २०१९ अन्वये देण्यात येणारा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ कर्मचाऱ्यांना पदोन्नती न मिळाल्यामुळे येणारी कुंठितता घालवण्यासाठी देण्यात येतो. सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दिनांक २१.१२.२०१९ अन्वये अधिसंख्य पदावर वर्ग झालेले अधिकारी / कर्मचारी नियमित पदावर कार्यरत नसल्याने त्यांना पदोन्नती, अनुकंपा धोरण, आश्वासित प्रगती योजना हे लाभ अनुज्ञेय करण्यात आलेले नाहीत.

मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र. ८९२८/२०१५ यामध्ये दिनांक ६.७.२०१७ रोजी दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक २१.१२.२०१९ अन्वये अनुसूचित जमाती प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्याचा निर्णय मानवतावादी दृष्टीकोनातून विशेष बाब म्हणून घेण्यात आला आहे. त्यामुळे अनुसूचित जमाती प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिसंख्य पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे पदोन्नती, अनुकंपा धोरण, आश्वासित प्रगती योजना लाभ अनुज्ञेय करता येणार नाही.

*************************************************************

लक्षवेधी सुचना क्र.५६२

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्रीमती सना मलिक,श्री. रोहित पवार, डॉ. जितेंद्र आव्हाड,श्री. बापूसाहेब पठारे, श्री.चेतन तुपे,श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर,श्री. विकास ठाकरे,श्री. नानाभाऊ पटोले,श्री. अमित विलासराव देशमुख, श्री.संजय मेश्राम, श्री. साजिदखान पठाण, श्री.अमिन पटेल, श्री.अस्लम शेख, श्रीमती ज्योती गायकवाड,डॉ.विश्वजित कदम, श्री.मंगेश चव्हाण,श्री.दौलत दरोडा वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र.५६२ पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यात अलिकडे दररोज मोठया प्रमाणावर अंमली पदार्थ विक्री केली जात असल्यामुळे पोलिसांकडून अनेक विक्रेत्यांकडून जप्त होत असलेले कोटावधी रुपयांचे अंमली पदार्थ, जून, २०२५ मध्ये अंबरनाथ, बदलापूर येथील चहापान टपऱ्यावर अंमली पदार्थ विक्री होत असल्याबाबत १७ लाख रुपयांचे एमडी जप्तीबाबत पोलिसांनी केलेली कारवाई, मे, २०२५ मध्ये एपीएमसी मार्केट, नवी मुंबई येथे ५० बांगलादेशीय नागरीकांना अंमली पदार्थ विक्री करतांना केलेली अटक, सीमाशुल्क विभागाने मुंबई विमानतळावर ५१ कोटी रुपयांच्या कोकेनसह परदेशी नागरीकांवर ३ जून, २०२५ रोजी केलेली अटक, त्याचवेळी ८६३६ ग्रॅम रु. ८ कोटी ६३ लाख रुपयांचा उच्च प्रतीचा हायड्रोपोनिक गांजा जप्त करणे, एप्रिल, २०२५ मध्ये वसईत एमडीचा कारखाना उध्दवस्त करुन ८ कोटीचे अंमली पदार्थ जप्त करणे, रत्नागिरी,सांगली,पुणे,मुंबई, नवी मुंबई, ठाणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर येथे मोठया प्रमाणावर जप्त करण्यात आलेले अंमली पदार्थ, या अंमली पदार्थ्याच्या सेवनामुळे युवा पिढी व्यसनाधिन होऊन त्यांच्या आरोग्यावर होत असलेले दुष्परिणाम, परिणामी राज्यातील जनतेत पसरलेला असंतोष लक्षात घेता शासनाने तात्काळ अंमली पदार्थ विक्री, वाहतूक, साठवणूक व सेवनावर तात्काळ कायमस्वरुपी बंदी करण्यासाठी करावयाची कडक कारवाई व शासनाची भूमिका."

---

## मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

राज्यात अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्यांविरुध्द एन.डी.पी.एस. कायदा १९८५ अन्वये कारवाई करण्यात येते. महाराष्ट्रातील विविध जिल्हे/शहरी भागात

अंमली पदार्थ विरोधी कक्ष, स्थानिक पोलीस ठाणे व गुन्हे प्रकटीकरण शाखा यांचेमार्फत अंमली पदार्थ जवळ बाळगणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात येते. तसेच स्थानिक पोलीस ठाणे स्तरावर अंमली पदार्थाचे सेवन करणारे सेवनार्थी विरुध्द देखील कारवाई करण्यात येते.

राज्यात सन २०२४ ते मार्च २०२५ पर्यंत अंमली पदार्थ कायद्यांतर्गत सेवनार्थीच्या विरुद्ध १९२०६ गुन्हे दाखल असून १६९०५ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. तसेच अंमली पदार्थ ताब्यात बाळगणे/वाहतुक करणे संदर्भात एकूण ३५२१ गुन्हे दाखल झालेले असून ४७६५ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे व एकूण रू. ४३३८.९० कोटी किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेले आहेत.

माहे जून २०२५ मध्ये ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील अंबरनाथ, बदलापूर येथील चहा पान टपऱ्यांवर अंमली पदार्थ विक्री होत असल्याने १७ लाख रूपयांचे एम.डी. जप्तीबाबत तक्रार/गुन्हा नोंद नाही.

पोलीस आयुक्त,नवी मुंबई यांच्या कार्यक्षेत्रातील वाशी विभागातील एपीएमसी पोलीस ठाणे अंतर्गत फळ मार्केट परिसरात दि.०२ मे २०२५ रोजी कोंबीग ऑपरेशन दरम्यान ५० संशयीत बांगलाभाषिक नागरिकांना ताब्यात घेण्यात आले होते. सदर नागरिकांच्या चौकशीमध्ये कोणीही बांगलादेशी नागरिक असल्याचे निष्पन्न न झाल्याने त्यांना मुक्त करण्यात आले आहे. तसेच त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारचा अंमली पदार्थ आढळून आला नाही.

दि.०२.०६.२०२५ रोजी सीमाशुल्क विभाग, मुंबई यांनी केनिया एयरवेज च्या KQ२०४ विमानातील एका कर्मचा-याकडे ५१९४ ग्रॅम वजनाचा अंदाजे रु.५१,९४,००,०००/- किंमतीचे Cocaine/Methaqualone सदृश्य अंमली पदार्थ मिळून आल्याने त्याला अटक करण्यात आले आहे. सद्यस्थितीत सदर आरोपी न्यायालयीन कोठडीत असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

सन २०२५ मध्ये बाहेरील देशातून मुंबई एअरपोर्ट मार्गे आलेल्या हायड्रो गांजा बाबत नेरूळ पोलीस ठाणे येथे गु. रजि नं. २०१/२०२५ एनडीपीएस मधील गुन्हयात २ किलो ८०५ ग्रॅम १५७ मिली वजनाचा रु.२,८३,३५,७००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्हयात २० भारतीय आरोपींना अटक करण्यात आली

आहे. तसेच सदर गुन्ह्यातील कारवाई मध्ये परदेशातील आरोपींचा समावेश असल्याचे आढळून आलेला नाही.

तसेच मुंबई पोलीस अंतर्गत माहे मे व जुन २०२५ मध्ये हायड्रोपोनीक गांजा संदर्भात ६ गुन्हे दाखल केले असून ७ आरोपींना अटक केले आहे. सदर गुन्ह्यात अंदाजे २९.३४ कोटी किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

माहे एप्रिल-२०२५ मध्ये मुंबई पोलीस अंतर्गत साकिनाका पोलीस ठाणे येथे दाखल वि.स्था.गु.र.क्र. २९६/२५, एन.डी.पी.एस. कायदा कलम ८ (क), २२(क), २९ अन्वये गुन्ह्याच्या तपासात कामनगांव, ता. वसई, जि.पालघर येथील मेफेड्रॉन निर्मिती कारखाना शोधून उघडकीस आणून ४.५३ किलो "मेफेड्रॉन व केमीकल्स" असे एकूण किंमत अंदाजे रु.८.१५ कोटींचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात एकूण ३ आरोपींना अटक करण्यात आले आहे.

**अंमली पदार्थ तस्करी तसेच विक्रीवर आळा घालण्यासाठी शासन खालील प्रमाणे उपाययोजना करते.**

- राज्यात अंमली पदार्थ तस्करांविरुद्ध विशेष मोहीमा, ड्रग्ज मुक्त अभियान, शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती कार्यक्रम तसेच वाहन रॅली व पथनाट्ये आयोजनाद्वारे अंमली पदार्थ सेवन व विक्री न करण्याबाबत जनजागृती करण्यात येते.
- राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकामध्ये स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केले आहेत.
- केंद्र शासनाच्या दि.२५.०३.२०२२ च्या आदेशान्वये नार्कोकोऑर्डीनेशन यंत्रणेची पुनर्रचना करण्यात आली असून त्यानुसार दि.३१.०८.२०२३ च्या शासन निर्णयाने अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) ची स्थापना करण्यात आली आहे.
- शासन निर्णय, दि.०६.०८.२०२४ अन्वये अंमली पदार्थ टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राज्यासाठी NCORD (Narco-Coordination centre) सचिवालय म्हणून व विशेष पोलीस महानिरिक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) यांची राज्यस्तरीय नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

- शासन निर्णय क्र. एपीओ-३१२३/ प्र.क्र.८२/पोल-३, दि.१९.०३.२०२५ अन्वये अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स करीता एकूण ३४६ पदे नव्याने निर्माण करण्यात आली आहेत.
- अंमली पदार्थावर आळा घालण्यासाठी राज्यस्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समिती व जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समितीची स्थापना करण्यात आली असून सदर समित्यांकडून अंमली पदार्थावर आळा घालण्याबाबत वेळोवेळी आढावा घेतला जातो.
- दरवर्षी २६ जून रोजी जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन साजरा केला जातो. या वर्षी दि. १२ जून, २०२५ ते २६ जून, २०२५ या कालावधी दरम्यान राज्यात अंमली पदार्थ विरोधी पंधरवडा अभियान राबविण्यात आला आहे. सदर कालावधीत अंमली पदार्थ विरोधी कक्ष, स्थानिक पोलीस ठाणे तसेच अशासकीय संस्था मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळा, महाविद्यालय, रेल्वे स्थानक, महत्वाचे चौकांमध्ये अंमली पदार्थ विरोधी पोस्टर्स, बॅनर्स तसेच पथनाट्याद्वारे जनजागृती करण्यात आली.

********

लक्षवेधी सुचना क्र.६०२

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. हेमंत ओगले, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र.६०२ पुढीलप्रमाणे आहे:-

"श्रीरामपूर जि. अहिल्यानगर येथे दि. १४ मे २०२५ वा त्यासुमारास अंमली पदार्थाचा सुमारे रु.१४ इतक्या किमतीचा साठा पोलिसांकडून पकडण्यात आला असणे, या अंमली पदार्थापासून नशेच्या (अल्प्राझोलम) पावडरची निर्मिती होत असणे, त्यासाठी श्रीरामपूर एमआयडीसी येथे संशयित आरोपींनी माहे ऑगस्ट २०२३ मध्ये प्लॉट विकत घेऊन तेथे सर्जिकल कॉटनची निर्मिती करण्यास परवानगी मिळवलेली असणे परंतु त्याठिकाणी अल्प्राझोलम पावडरची निर्मिती करून त्याची विक्री निजामाबाद व संगारेड्डी येथे केली जात असणे, या प्रकरणाचे कनेक्शन तेलंगणा राज्यात असल्याचे उघड होणे, सदरील धंदा मागील दोन वर्षापासून सुरु असणे, नशेच्या पावडरमुळे नागरीकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होणे आणि तरुण वर्ग व्यसनाधीन होणे, परिणामी स्थानिकांमध्ये पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन गुन्हेगारांवर कारवाई करण्याबाबत तसेच सदरील धंदा रोखण्याबाबत करावयाची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया."

## मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

दि.१४ मे,२०२५ रोजी रा.धनगरवाडी ता. राहाता येथील व्यक्ती टेम्पो क्र. एम.एच.२० बी. टी.०९५१ या वाहनातून अल्प्राझोलम या अंमली पदार्थाचे स्फटीक व अल्प्राझोलम तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल असा एकूण १३,७५,४१,०००/- इतक्या रूपयाचा मुद्देमाल वाहतूक करीत असल्याचे मिळून आल्याने श्रीरामपुर शहर पोलीस स्टेशन येथे ४९९/२०२५ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८ (क), २२ (क), २९ प्रमाणे त्यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत सदर गुन्ह्यातील चार आरोपी न्यायालयीन कोठडीत असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

ऑगस्ट २०२४ मध्ये आरोपी यांनी एम.आय.डी.सी. श्रीरामपुर येथे गोडावून खरेदी करून हार्षी फार्माकेम या नावाने Manufacturing of Surgical cotton चा व्यवसाय करण्यासाठी परवाना काढला होता. परंतु सदर गोडावून मध्ये उपरोक्त गुन्ह्यातील जप्त माल ठेवलेला असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने सदर गोडावूनचा पंचनामा करून दि. १६ मे, २०२५ रोजी गोडावून सिल करण्यात आलेले आहे. तसेच सदर ठिकाणी अशा प्रकारचा प्रकार घडू नये याकरीता योग्य ती खबरदारी घेणेकरीता व सदर जागेवर कोणताही व्यवहार न करणेबाबत प्रादेशिक अधिकारी, एम.आय.डी.सी. अहिल्यानगर यांना पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.

सदर आरोपी सन २०२४ पासुन Alprazolam हा अंमली पदार्थ तयार करण्याचे काम करीत होते. तद्नंतर, फेब्रुवारी २०२५ पासुन आरोपी यांनी श्रीरामपुर येथील एम.आय.डी.सी. येथील गोडावूनमध्ये Alprazolam तयार करण्याची एक प्रक्रिया केल्याने सदर प्रकरणामध्ये सहभागी असलेल्या आरोपी विरूध्द गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. त्यानुषंगाने आरोपींचे एम.आय.डी.सी. श्रीरामपुर येथील गोडावून व कराड येथील गोडावून / कंपनी सिल करण्यात आले आहेत. तपासान्वये, कराड येथे तयार होणारा पक्का माल पुणे येथे एका आरोपीकडे देत असल्याचे निष्पन्न झाले.

सदर पुणे येथील आरोपीस तेलंगणा येथील झरीराबाद टाऊन पोलीस स्टेशन १४७/२०२५ येथे दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीस उपरोक्त गुन्हयात अटक करणेकरीता मा. न्यायालय यांचेकडून प्रोडक्शन वॉरन्ट घेण्यात आले असून त्याचा ताबा घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. सदर पक्का माल तेलंगणा राज्यात विकला जात असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. तथापि, Alprazolam हा अंमली पदार्थाची पावडर व क्रिस्टल हे श्रीरामपुर परिसरात विकत असलेबाबत कोणताही पुरावा समोर आलेला नाही.

दि.१५ मे, २०२५ रोजी गोधवणी वार्ड नं.०१ श्रीरामपूर या ठिकाणी दोन व्यक्तींनी MH.०२ EE६९९९ या क्रमांकाच्या वाहनातून रू.३०,२४,१३५ किंमतीचा २०१.६०९ कि. ग्रा. वजनाचा हिरवट रंगाचा सुकलेल्या पाने, फुल व बिया असलेला उग्र व दर्प नशा

आणणारा वास असलेला गंजा सदृश्य माल ताब्यात बाळगून विक्री करण्याच्या उद्देशाने घेवून जात असतांना छापा टाकून श्रीरामपूर शहर, पोलीस स्टेशन गु.र.न.५००/२०२५ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८ (क), २० (ब), ॥क प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत सदर गुन्ह्यातील दोन आरोपी न्यायालयीन कोठडीत असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

**अंमली पदार्थ तस्करी तसेच विक्रीवर आळा घालण्यासाठी शासन खालील प्रमाणे उपाययोजना करते.**

- राज्यात अंमली पदार्थ तस्करांविरुद्ध विशेष मोहीमा, ड्रग्ज मुक्त अभियान, शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती कार्यक्रम तसेच वाहन रॅली व पथनाट्ये आयोजनाद्वारे अंमली पदार्थ सेवन व विक्री न करण्याबाबत जनजागृती करण्यात येते.
- राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकामध्ये स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केले आहेत.
- केंद्र शासनाच्या दि.२५.०३.२०२२ च्या आदेशान्वये नार्कोकोऑर्डीनेशन यंत्रणेची पुनर्रचना करण्यात आली असून त्यानुसार दि.३१.०८.२०२३ च्या शासन निर्णयाने अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) ची स्थापना करण्यात आली आहे.
- शासन निर्णय, दि.०६.०८.२०२४ अन्वये अंमली पदार्थ टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राज्यासाठी NCORD (Narco-Coordination centre) सचिवालय म्हणून व विशेष पोलीस महानिरिक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) यांची राज्यस्तरीय नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.
- अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स करीता शासन निर्णय क्र. एपीओ-३१२३/ प्र.क्र.८२/पोल-३, दि.१९.०३.२०२५ अन्वये एकूण ३४६ पदे नव्याने निर्माण करण्यात आली आहेत.
- अंमली पदार्थावर आळा घालण्यासाठी राज्यस्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समिती व जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समितीची स्थापना करण्यात आली असून सदर समित्यांकडून अंमली पदार्थावर आळा घालण्याबाबत वेळोवेळी आढावा घेतला जातो.

********

लक्षवेधी सूचना क्र. ७५३

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. उत्तमराव जानकर, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

""माळशिरस (जि. सोलापूर) तालुक्यात विशेषत: वेळापूर पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात अवैध धंद्यांचे प्रमाण वाढले असून, सदर अवैध धंदे पोलीस प्रशासनाच्या आर्थिक संगणमतामुळे सुरु असणे, सदर अवैध धंदे करणाऱ्यांना पोलीस प्रशासनाचे सहकार्य होत असल्याचेही निदर्शनास आले असणे, माळशिरस तालुका सध्या अवैध धंद्यांच्या विळख्यात सापडला असून यामध्ये मटका, गावठी व हातभट्टीची दारू, गुटखा, गांजा आणि इतर अंमली पदार्थांची खुलेआम विक्री होत असणे, या बेकायदेशीर कारवायांमुळे समाजावर, विशेषत: युवा पिढीवर, अत्यंत नकारात्मक परिणाम होऊन तरुणपीढी व्यसनाधीन होत असणे, या गंभीर परिस्थितीमुळे तालुक्यात कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असणे, या अवैध धंद्यांना स्थानिक पोलीस प्रशासनाचे, विशेषत: वेळापूर पोलीस ठाण्यातील सहायक पोलीस निरीक्षक श्री भाऊसाहेब चंद्रकांत गोसावी यांचे अप्रत्यक्ष, प्रत्यक्ष पाठबळ मिळत असल्याच्या तक्रारी शासनाकडे मोठ्या प्रमाणावर प्राप्त झालेल्या असणे, त्यामुळे सामान्य नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी तीव्र असंतोष आणि अविश्वास निर्माण झाला असणे, या अत्यंत गंभीर आणि संवेदनशील विषयावर, मा.गृहमंत्री महोदयांनी तात्काळ लक्ष घालून सखोल चौकशीचे आदेश देऊन दोषी पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली असणे, याबाबत माळशिरस तालुक्यातील सर्व अवैध धंदे तात्काळ आणि कायमस्वरूपी बंद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.""

---

## मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

वेळापूर पोलीस ठाणे, जि. सोलापूर यांच्या हद्दीत एकूण १६ गावाचे कार्यक्षेत्र असून त्यापैकी ११ गावाचे ग्रामपंचायत कार्यालय यांनी गावात अवैध धंदे चालू देणार नसलेबाबत ठराव घेतले आहेत. वेळापूर, पोलीस स्टेशन अधिनस्त पोलीस दलाने वेळापूर पोलीस ठाणे हददीत अवैध धंदयावर वेळोवेळी छापे टाकून देशी व हातभटटी दारू विक्रेते, जुगार खेळणारे तसेच गुटखा विक्रेते यांच्यावर खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे.

वेळापूर पोलीस ठाणे हददीत अवैध धंदयावर केलेल्या गुन्ह्यांची माहीती खालीलप्रमाणे:-

| प्रकार | सन २०२४ मध्ये केलेली कारवाई | | जुन २०२५ अखेर केलेली कारवाई | |
|---|---|---|---|---|
| | दाखल गुन्हे | जप्त मुद्देमालची किंमत | दाखल गुन्हे | जप्त मुद्देमालची किंमत |
| दारूबंदी केसेस | १२० | १,६७,१७१ | ६० | ६६,१०८ |
| जुगार केसेस | २६ | १,८९,८६५ | १० | १५,२६० |
| गुटखा | - | - | ०१ | ६४,४३,८०० |

तसेच, अवैध दारू विक्रेते लोकांवर केलेली प्रतिबंधक कारवाई खालीलप्रमाणे आहे.

| प्रकार | सन २०२४ मध्ये केलेली कारवाई | जुन २०२५ अखेर केलेली कारवाई |
|---|---|---|
| दारूबंदी कलम ९३ | ३४ | २३ |
| बीएनएसएस कलम १६३ | २९ | २८ |

वेळापूर येथील वारंवार अवैध मटका घेणारा इसम श्री. मुस्ताक अमीन तांबोळी, रा. वेळापूर ता. माळशिरस याच्यावर दिनांक ३१/०५/२०२५ रोजी प्रस्ताव नंबर ०३/२०२५, अन्वये महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५७ प्रमाणे हद्दपार प्रस्ताव उपविभागीय दंडाधिकारी माळशिरस विभाग अकलुज यांचेकडे पाठविण्यात आला आहे.

वरीलप्रमाणे वेळापूर पोलीस ठाणे हददीत अवैध धंदयावर वेळोवेळी गुन्हे दाखल केलेले आहेत. जे समाजकंटक इसम वारंवार दारू चोरून विक्री करतात किंवा अवैध धंदे करतात त्यांचेवर वेळीच प्रभावी प्रतिबंध कारवाई करण्यात येत आहे. पोलीस ठाणे हददीत सध्या कोठेही अवैध धंदे चालू नाहीत. यापुढेही पोलीस ठाणे हददीत अवैध धंदे करणारे इसमांची माहीती मिळाल्यास त्यांचेवर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. तसेच अधिकारी व बीट अंमलदार यांना पोलीस अधिक्षक कार्यालयाकडून बीट हददीमध्ये अवैध धंदयाची माहिती मिळताच त्यांचेवर कायदेशीर कारवाई करून समुळ उच्चाटन करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत.

**********

लक्षवेधी सुचना क्र.१३४१

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री.महेश शिंदे, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र.१३४१ पुढीलप्रमाणे आहे:-

"नवी मुंबईतील एपीएमसीच्या मार्केटमध्ये २०० कोटी रुपयांचा ड्रग्जचा साठा माहे फेब्रुवारी,२०२५ च्या दरम्यान तसेच वारंवार ड्रग्जचा साठा सापडणे, तसेच श्री.गुरुनाथ चिंचकर, रा.किल्ले गावठाण, बेलापूर, नवी मुंबई यांनी दि.२५.४.२०२५ रोजीच्या सुमारास आत्महत्या करणे, कै. गुरुनाथ चिंचकर यांचा मुलगा राज्यातील अंमली पदार्थांच्या तस्करी प्रकरणात असल्याचे सिध्द झाल्याने या प्रकरणातून सोडवणूक करण्याकरिता त्यांच्याकडून स्थानिक पोलिस व राजकीय व्यक्तीकडून पैशाची मागणी करीत असल्याने या त्रासाला कंटाळून कै. गुरुनाथ चिंचकर यांनी आत्महत्या केल्याचे मृत्यूपूर्व लिहिलेल्या चिठ्ठीतून निष्पन्न होणे, या प्रकरणी अँटीकरप्शन विभागाकडून किंवा शासनाच्या सक्षम प्राधिकरणाकडून चौकशी करण्याची आवश्यकता, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबधित दोषी पोलिस अधिकारी व त्यांस पाठीबा देणा-या राजकीय नेत्यांवरही कारवाई करण्याची नितांत गरज, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कारवाई,याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

## मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

नवी मुंबई आयुक्तालयातील एपीएमसी पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील एपीएमसी मार्केट मध्ये फेब्रुवारी २०२५ मध्ये किंवा अद्याप पर्यंत २०० कोटी रुपयांचा ड्रग्सचा साठा सापडण्याची कोणतीही घटना घडलेली नाही अथवा तशा प्रकारची कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

गुरुनाथ चिंचकर यांनी दि.२५.०४.२०२५ रोजी आत्महत्या केल्या संदर्भात एनआरआय पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे अकस्मात मृत्यु रजि. क्रमांक ३४/२०२५ BNSS कलम १९४ अन्वये दाखल करण्यात आला आहे.

गुरुनाथ चिंचकर यांचा मुलगा नवीन चिंचकर यांच्यावर अंमली पदार्थाच्या तस्करी प्रकरणी नेरुळ पोलीस ठाणे येथे दि.१५.०४.२०२५ रोजी गुन्हा रजि. क्रमांक २०१/२०२५ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८ (क), २१(अ), २३ (अ), २३ (ब), २० (ब) (ii) (c) २७ (अ), २९, बी.एन.एस. कायदा २०२३ चे कलम ३३८, ३३६(३), ३४०(२), २५५ अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्याचा तपास अंमली पदार्थ विरोधी पथक गुन्हेशाखा नवी मुंबई हे करत आहे. सदर गुन्ह्यांमध्ये २० आरोपींना अटक केली आहे. सदर प्रकरणी मा. जिल्हा व सत्र न्यायालय, बेलापुर येथे दिनांक १२.०६.२०२५ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सदर प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.

तसेच मयत यांच्या मुलावर एन.सी.बी. मुंबई येथे गुन्हा रजि क्रमांक ०६/२०२५ एन.डी.पी.एस. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

वरील दोन्ही गुन्ह्यांच्या अनुषंगाने मयत गुरुनाथ चिंचकर यांच्याकडे चौकशी केल्याचे दिसून येते. मयत गुरुनाथ चिंचकर यांनी आत्महत्या करण्यापूर्वी मृत्यूपूर्व लिहिलेल्या चिठ्ठीत एन.सी. बी. च्या कोणत्याही अधिकारी यांच्या नावाचा उल्लेख दिसून येत नाही. तसेच ए.एन.सी. (ॲन्टी नार्कोटिक्स सेल), नवी मुंबई च्या पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिका-याच्या नावाचा उल्लेख दिसून येत आहे. तथापि, स्थानिक पोलीस व राजकीय व्यक्ती यांचेकडून पैशाची मागणी केलेबाबत निष्पन्न झाले नाही. तसेच सदर गुन्ह्याचा अधिक तपास चालू आहे.

********

लक्षवेधी सुचना क्र.१४९०

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र.१४९० पुढीलप्रमाणे आहे:-

"मुंबई शहरातील चर्चगेट, ए रोड येथील प्रसिध्द असलेले जयहिंद महाविद्यालय समोरील आरे स्टॉलवर अंमली पदार्थाची विक्री व गैरव्यापाराचे केंद्र बनल्याची धक्कादायक माहिती दि.३०.०६.२०२५ रोजी उघडकीस येणे, राज्य सरकार व महापालिकेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार आरे स्टॉलवर फक्त दुध व दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी परवानगी असताना या स्टॉलवर महापालिकेची परवानगी न घेता चहा टपरी तसेच निकृष्ट दर्जाचे खाद्य पदार्थ विक्री होत असल्याने तेथे सदैव गर्दी होऊन रहदारी वाढत असणे, यामुळे येथील महाविद्यालय तसेच रात्री-बेरात्री होणाऱ्या गर्दीचा येथील नागरिकांना त्रास होत असणे. शिवाय धुम्रपान व अमंलीपदार्थांची सर्रास विक्री होत असल्याने या स्टॉलवर गुंडप्रवृत्तीचे लोक व टवाळखोरांच्या टोळ्यांचा वावर असल्याने येथील महाविद्यालयीन विद्यार्थीनींना जाता-येताना वाईट नजर टाकून तसेच अश्लिल शेरेबाजी करण्यात येत असल्याने त्याचा विद्यार्थीनींना त्रास होऊन त्यांच्यात असुरक्षिततेची भावना निर्माण झालेली असणे, सदरहू जयहिंद महाविद्यालयात हे सर्व परिचीत असून या महाविद्यालयात नामवंत चित्रपट कलावंत आणि राजकीय व्यक्तींनी पदवी घेऊन शिक्षण प्राप्त केलेले असणे, यामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी व स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेसाठी शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता,याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही."

---

मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

आरे सरीता स्टॉलवर फक्त दुध व दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी परवानगी असते. या स्टॉलवर महानगरपालिकेच्या अनुज्ञापनाशिवाय चहा टपरी तसेच खाद्यपदार्थ विक्री होत असल्याची तक्रार प्राप्त झाल्यास त्यानुषंगाने वैद्यकीय आरोग्य अधिकारी, ए विभाग,बृहन्मुंबई महानगरपालिके तर्फे कारवाई करण्यात येते. जयहिंद महाविद्यालय समोरील आरे स्टॉलवर तंबाखूजन्य/ अंमलीपदार्थांची विक्री होत असल्याची तक्रार ए विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिककेस प्राप्त झालेली नाही.

मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणे हद्दीतील जय हिंद महाविद्यालय परिसरामध्ये गस्त वाहने व बिट मार्शल यांचेमार्फत प्रभावी पोलीस गस्त असते. सदर ठिकाणी आरे स्टॉलवर आणि परिसरामध्ये अद्याप कोणतेही अंमलीपदार्थ विक्री होत असल्याबाबत तसेच सदर परिसरात गुंड प्रवृतीचे लोक व टवाळखोरांच्या टोळयांचा वावर असल्याचा प्रकार आढळून आलेला नाही. तसेच सदर परिसरात अंमली पदार्थ विक्री होत असल्याबाबत वा टवाळखोर टोळयांकडून नागरीकांना त्रास होत असल्याबाबत मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणे, मुंबई येथे अद्याप कोणतीही तक्रार प्राप्त झाली नाही.

सदर परिसरात प्रभावी पोलीस गस्त ठेवण्यात आली असून, कोणताही अनुचित प्रकार आढळून आल्यास योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

********

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. अभिजीत पाटील, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"मौजे कौठाळी, ता. पंढरपूर येथील दिव्यांग श्री. समाधान शिवाजी पाटील हे ड्रायव्हर सोबत दि. २७/०४/२०२५ रोजी हार्वेस्टर मशिन घेवुन प्रवास करीत असताना त्यांचे मशीनचे फास्टटॅगमध्ये पुरेसा बॅलन्स असताना टोल नाक्यावरील मशीनमधून टोल कपात न होणे, श्री. पाटील हे टोलची रक्कम रोखीने भरण्यास तयार असतानाही तेथील कर्मचाऱ्यांनी त्यांना शिवीगाळ व मारहान करुन कोंडून ठेवणे, सदर मारहानीमध्ये त्यांचा कृत्रिम डोळा निघून पडणे, यासर्व प्रकरणी ते मोहोळ पोलिस स्टेशनमध्ये तक्रार देण्यास गेले असता त्यांची तक्रार घेण्यास पोलीसांकडून टाळाटाळ करण्यात येणे, शेवटी त्यांनी सांगितल्या प्रमाणे तक्रार न घेता मनमानी पध्दतीने तक्रार नोंदवून घेणे, त्यामुळे श्री. पाटील यांनी मोहोळ ठाणे अमंलदार यांच्या विरोधात वरिष्ठ अधिका-यांकडे तक्रार करणे, त्याचा राग मनात धरून टोल नाक्यावरील कर्मचारी-याला हाताशी धरून घटना घडल्याचे २ दिवसानंतर श्री. पाटील यांचे विरोधात खोटा गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात येणे, ही बाब अत्यंतगंभीर असून सर्वसामान्य जनतेचा कायद्यावरील विश्वासास तडा जाऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे, शासनाने उक्त प्रकरणाची पारदर्शक चौकशी करुन खोटा गुन्हा दाखल करणाऱ्या टोल नाक्यावरील कर्मचाऱ्या व संबंधित पोलीस अधिका-यावर कारवाई करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री तसेच मा. पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केलेली मागणी, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन दोषी आढळून येणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता."

---

## मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

दि. २७.०४.२०२५ रोजी मौजे पेनुर, ता. मोहोळ, जि.सोलापुर येथील टोलनाक्यावरील लेन नं.१ वर हार्वेस्टर क्र. MH-१३ EK-३४९९ या वाहनाचे मालक श्री. समाधान शिवाजी पाटील व टोलनाक्यावरील कर्मचारी यांच्यात टोल भरण्यावरुन वाद झाला असता दोघांच्याही बाजुने परस्पर विरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

दि. २७.०४.२०२५ रोजी मौजे पेनुर, ता. मोहोळ, जि.सोलापुर येथील टोलनाक्यावरील लेन नं.१ वर हार्वेस्टर क्र. MH-१३ EK-३४९९ हे वाहन टोल भरण्याकरिता आले असता हार्वेस्टरचा फास्टॅग स्कॅन होऊन ब्लॅकलिस्टमध्ये दाखवत होता. त्यावेळी श्री. समाधान पाटील यांनी टोलनाक्यावरील महिला कर्मचाऱ्यास सांगीतले की, "मी हार्वेस्टर चा मालक आहे, तुमच्या मशिनमध्ये बिघाड आहे, तुम्ही लोकल गाड्या सोडता, तशी माझीही गाडी सोडा" यावर टोलनाक्यावरील महिला कर्मचाऱ्यानी "तुम्ही फास्टॅग रिचार्ज करा मग जावा" असे सांगताच श्री. समाधान पाटील यांनी महिला कर्मचाऱ्यास शिवीगाळ केल्याचे प्रथमदर्शी साक्षीदारांच्या फियार्दीवरुन निदर्शनास येते.

श्री. समाधान पाटील यांनी महिला कर्मचाऱ्यास शिवीगाळ केल्याचे निदर्शनास येताच टोलनाक्यावरील इतर दोन कर्मचारी श्री.अनिकेत महादेव तळेकर व श्री. महेश दत्तात्रय चवरे यांनी "तुम्ही महिला कर्मचाऱ्यास शिवीगाळ का करता" अशी विचारणा केली असता श्री. समाधान पाटील यांनी " तु शिवीगाळीच काय घेवुन बसलास, माझे वाहन जाऊ दिली नाहीस तर तुम्हाला माझ्या गाडीने उडवुन जाईल बघु मला कोण अडवितो" असे सुनावले.

त्यानंतर टोलनाक्यावरील कर्मचाऱ्यांनी हार्वेस्टर समोर बॅरीकेट आडवे लावुन थांबले असता श्री. पाटील यांनी बुम व बॅरीकेट मोडुन नुकसान करुन तेथील समोर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या अंगावर हार्वेस्टर चालवुन पळुन जात असल्याचे सीसीटिव्ही फुटेज वरुन दिसुन येते. तद्नंतर पुढे जाऊन हार्वेस्टर थांबविले व उतरुन कर्मचाऱ्यांना शिवीगाळ, दमदाटी करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने श्री. समाधान पाटील व टोलनाक्यावरील कर्मचारी यांच्या वाद झाल्याचे प्रथमदर्शी साक्षीदारांच्या फियार्दीवरुन कळते.

त्यानंतर थोडया वेळाने श्री. समाधान पाटील यांचे मेव्हुणे घटनास्थळी येवुन त्यांनी फास्टॅग रिचार्ज करुन हार्वेस्टर घेवुन गेले यावरुन सदर घटनेवेळी श्री. समाधान पाटील यांच्या मालकीचे असलेल्या हार्वेस्टर या वाहनाच्या फास्टॅग मध्ये रिचार्ज नसल्याचे दिसुन आले तसेच घटनास्थळावरील सीसीटिव्ही फुटेज वरुन श्री. पाटील यांना टोलनाक्यावर कोंडुन ठेवल्याचे निष्पन्न झाले नाही.

सदर घटनेच्या दुसऱ्या दिवशी दि. २८.०४.२०२५ रोजी श्री. समाधान पाटील यांच्या फिर्यादी जबाबावरुन टोलनाक्यावरील संबंधित कर्मचाऱ्यांच्या विरोधात मोहोळ पोलीस ठाणे येथे गु.र.न. ४७५/२०२५ भा.न्या.स. कलम १८९(२), १९१(२), १९०, ११५(२), ३५१(२), ३५१(३) तसेच अपंग व्यक्तींचे अधिकार अधिनियम २०१६ चे कलम ९२(b), ९२(e) प्रमाणे गुन्हा दाखल करुन सी.सी.टी.एन.एस.मध्ये अपलोड करण्यात आला आहे व त्यावर श्री. समाधान पाटील यांनी स्वाक्षरीही केलेली आहे, सदर गुन्ह्यातील नमुद आरोपींना भा.ना.सु.संहिता कलम ३५(३) प्रमाणे नोटीस देण्यात आली आहे. यावरुन पोलीसांकडुन तक्रार घेण्यास टाळाटाळ व मनमानी पध्दतीने तक्रार नोंदविल्याचे स्पष्ट होत नाही.

तद्नंतर दि. २९.०४.२०२५ रोजी सदर घटनेबाबत टोलनाक्यावरील कर्मचारी श्री. अनिकेत तळेकर यांच्या फिर्यादी जबाबावरुन श्री. समाधान पाटील यांच्या विरोधात मोहोळ पोलीस ठाणे येथे ४८२/२०२५ भा.न्या.सं. कलम १०९, ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३), ३२४(४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असता चौकशीअंती आरोपीने सदरचा गुन्हा केल्या असल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपी श्री. समाधान पाटील यांना दि. ३०.०४.२०२५ रोजी अटक करुन एक दिवस दि. ०१.०५.२०२५ रोजी पोलीस कोठडी व त्यानंतर दि. ०२.०५.२०२५ पासुन न्यायलयीन कोठडी देण्यात आली. दि.२१.०५.२०२५ रोजी आरोपीस जामीन मिळाला आहे. सद्यस्थितीत गुन्ह्याच्या तपास सुरु आहे.

सदर प्रकरणी पोलीसांनी दोन्हींही पक्षाच्या फिर्यादी जबाबावरुन गुन्हा नोंद केला असल्याचे व त्यानुषंगाने चौकशी करुन उचित कार्यवाही केली असल्याचे दिसुन येते.

**********

लक्षवेधी सुचना क्र.१६७८

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री.दिलीप लांडे, श्री.अस्लम शेख, श्री.अमिन पटेल, श्रीमती ज्योती गायकवाड, डॉ.विश्वजित कदम, श्री.विकास ठाकरे,श्री. संजय मेश्राम, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र.१६७८ पुढीलप्रमाणे आहे:-

" राज्यातील अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यानुसार कुठलाही मादक पदार्थ बाळगणे हा गुन्हा असणे, परंतु चांदिवली विधानसभा क्षेत्रातील साकीनाका पोलीस ठाणे आणि घाटकोपर पोलीस ठाणेच्या हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीरपणे गुटका,गांजा,चरस अशा अंमली पदार्थांची विक्री खुलेआम राजरोसपणे सुरु असणे , त्यामुळे परिसरात दिवसेंदिवस महिलांवरील अत्याचार वाढणे, तरुण पिढी मोठ्या प्रमाणावर व्यसनाधीन होत असल्याने भावी पिढीचे भविष्य धोक्यात येणे, परिसरातील महिला वर्गाला ये-जा करीत असताना नाहक त्रास सोसावा लागणे, महिला वर्गात असुरक्षिता निर्माण झाली असून भीतीचे वातावरण पसरणे, परिणामी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर असणे, अंमली पदार्थांच्या विक्रीवर व सेवन करणाऱ्या समाजकंटकांवर कायदेशीर कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना ."

---

मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

राज्यात अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्यांविरुध्द एन.डी.पी.एस. कायदा १९८५ अन्वये कारवाई करण्यात येते. महाराष्ट्रातील विविध जिल्हे शहरी भागात अंमली पदार्थ विरोधी कक्ष, स्थानिक पोलीस ठाणे व गुन्हे प्रकटीकरण शाखा यांचेमार्फत अंमली पदार्थ जवळ बाळगणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात येते. तसेच स्थानिक पोलीस ठाणे स्तरावर अंमली पदार्थाचे सेवन करणारे सेवनार्थी विरुध्द देखील कारवाई करण्यात येते.

सन २०२३ ते जून २०२५ मध्ये चांदिवली विधानसभा क्षेत्रातील साकीनाका व घाटकोपर पोलीस ठाण्यांतर्गत अवैध धंदे, अंमली पदार्थ विक्री व सेवनार्थीवर केलेल्या कारवाईची एकत्रीत माहिती पुढीलप्रमाणे आहे-

| पोलीस ठाणे | गुटखा कारवाई | मटका कारवाई | जुगार कारवाई | ऑनलाईन लॉटरी कारवाई | एन.डी.पी.एस अंतर्गत कारवाई | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सेवनार्थी | विक्री |
| घाटकोपर | ०९ | १६ | ३४ | ०१ | ४९३ | १०४ |
| साकीनाका | २५ | -- | ३७ | ०१ | २४४ | ५४ |
| एकूण | ३४ | १६ | ७१ | ०२ | ७३७ | १५८ |

राज्यात सन २०२४ ते मार्च २०२५ पर्यंत अंमली पदार्थ कायद्यांतर्गत सेवनार्थीच्या विरुद्ध १९२०६ गुन्हे दाखल असून १६९०५ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. तसेच अंमली पदार्थ ताब्यात बाळगणे/वाहतुक करणे संदर्भात एकूण ३५२१ गुन्हे दाखल झालेले असून ४७६५ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे व एकूण रू.४३३८.९० कोटी किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेले आहेत.

**अंमली पदार्थ तस्करी तसेच विक्रीवर आळा घालण्यासाठी शासन खालील प्रमाणे उपाययोजना करते.**

- राज्यात अंमली पदार्थ तस्करांविरुद्ध विशेष मोहीमा, ड्रग्ज मुक्त अभियान, शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती कार्यक्रम तसेच वाहन रॅली व पथनाट्ये आयोजनाद्वारे अंमली पदार्थ सेवन व विक्री न करण्याबाबत जनजागृती करण्यात येते.
- राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकामध्ये स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केले आहेत.
- केंद्र शासनाच्या दि.२५.०३.२०२२ च्या आदेशान्वये नार्कोकोऑर्डीनेशन यंत्रणेची पुनर्रचना करण्यात आली असून त्यानुसार दि.३१.०८.२०२३ च्या शासन निर्णयाने अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) ची स्थापना करण्यात आली आहे.
- शासन निर्णय, दि.०६.०८.२०२४ अन्वये अंमली पदार्थ टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राज्यासाठी NCORD (Narco-Coordination centre) सचिवालय म्हणून व विशेष पोलीस महानिरिक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) यांची राज्यस्तरीय नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

- शासन निर्णय क्र. एपीओ-३१२३/ प्र.क्र.८२/पोल-३, दि.१९.०३.२०२५ अन्वये अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स करीता एकूण ३४६ पदे नव्याने निर्माण करण्यात आली आहेत.
- अंमली पदार्थावर आळा घालण्यासाठी राज्यस्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समिती व जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समितीची स्थापना करण्यात आली असून सदर समित्यांकडून अंमली पदार्थावर आळा घालण्याबाबत वेळोवेळी आढावा घेतला जातो.
- दरवर्षी २६ जून रोजी जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन साजरा केला जातो. या वर्षी दि. १२ जून, २०२५ ते २६ जून, २०२५ या कालावधी दरम्यान राज्यात अंमली पदार्थ विरोधी पंधरवडा अभियान राबविण्यात आला आहे. सदर कालावधीत अंमली पदार्थ विरोधी कक्ष, स्थानिक पोलीस ठाणे तसेच अशासकीय संस्था मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळा, महाविद्यालय, रेल्वे स्थानक, महत्वाचे चौकांमध्ये अंमली पदार्थ विरोधी पोस्टर्स, बॅनर्स तसेच पथनाट्याद्वारे जनजागृती करण्यात आली.

********

लक्षवेधी सूचना क्र.१८२६ गृह विभाग

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे (पावसाळी) अधिवेशन

श्री.बापूसाहेब पठारे, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८२६ पुढीलप्रमाणे आहे :-

"लोहगाव, पुणे सुमारे ११७ एकर क्षेत्रामध्ये २०१० मध्ये पोलीसासाठी मेगा हाऊसिंग प्रकल्प राबविण्याचा निर्णय, या प्रकल्पाचा उद्देश राज्यातील पोलिसांना अत्याधुनिक व सुसज्ज घरे उपलब्ध करून देणे असणे, बीईबीलो मोरया कंपनीमार्फत प्रकल्प विकसित करण्याचे ठरविण्यात आले, त्यासाठी बांधकाम व्यवस्थापनासाठी मोरया व एमपीएमसी संस्थांनी मिळून 'बेबेन डेव्हलपर्स' नावाची एसपीव्ही (SPV) स्थापने, प्रकल्पात पोलिस दलाने ३०० कोटीहून अधिक रक्कम भरणा करणे, प्रकल्पात फिनलँडमधील प्री-कास्ट काँक्रीट व एलिमेंटिक तंत्रज्ञानाचा वापर करून संपूर्ण प्रकल्प प्री-कास्ट पद्धतीने पूर्ण करण्याची हमी दिली, प्रकल्पाच्या प्रथम व द्वितीय टप्प्यात एकूण ५२४८ सदनिका, २०० दुकाने बांधून हस्तांतरित करणे बंधनकारक, परंतु दुर्दैवाने प्रकल्प सन २०१६ पासून रखडलेला असणे, पुण्यातील बिल्डर्स आणि शासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमतामुळे एमपीएमसीवर दबाव आणून प्रकल्प त्यांच्या फायद्यासाठी राबविण्याचा प्रयत्न करणे, एमपीएमसीने उर्वरित जमीन खाजगी बिल्डरला विकून प्रकल्प चालू करण्यास स्पष्ट नकार दिला असणे, सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, मा.मुख्यमंत्र्यांनी हस्तक्षेप करून प्रकल्पासाठी अर्थ व गुंतवणूक प्रकल्पामधील भारताबाहेरील कंपन्यांच्या माध्यमातून पूर्णत्वास नेण्यासाठी दिशा देणे. दिनांक १० नोव्हेंबर २०२४ रोजी गुंतवणुकीसाठी टर्म शीट सादर करणे, परंतु अधिकारी व मूळ विकसकाच्या अडथळ्यांमुळे हा प्रकल्प प्रलंबित असणे परिणामी, पोलीस कर्मचारी त्यांच्या हक्काच्या घरांपासून वंचित असणे यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

लोहगाव, पुणे येथे पोलीस मेगासिटी सहकारी गृहनिर्माण संस्था तत्कालीन पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील दि.२०.११.२००५ च्या परीपत्रान्वये प्रस्तावित करण्यात आली होती. याबाबत पुणे पोलीस यांचेकडुन दि.२५/०९/२००९ रोजी पोलीस नोटीस प्रसिध्द करण्यात आली होती. पुणे शहरात पोलीस कर्मचा-यांना घरे उपलब्ध होणे गरजेचे असल्याने महाराष्ट्र राज्यातील आजी व माजी वरीष्ठ ते कनिष्ठ दर्जाच्या पोलीस अधिकारी, कर्मचारी यांनी सन २००९ साली पोलीस मेगासिटी सहकारी गृहनिर्माण संस्थेची स्थापन केली होती. सदर प्रकल्प

बांधकामाकरीता. बी.ई बिलीमोरीया या कंपनीची निवड करण्यात आली. नमुद प्रकल्पास एकुण ५०२५ सभासद असून दिनांक १९/०५/२०१० रोजी पहिला MOU हा करण्यात येवुन त्यात प्रकल्पासाठी रु.३४६,३०,६०,०००/- इतकी किंमत निश्चित करण्यात आली. जमीन खरेदी व विकसन यासाठी एकुण रक्कमेच्या १५ टक्के रक्कम बिल्डर यांना देण्याचे निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार संस्थेकडून एकुण रु. ५१,९४,५९,०००/- इतकी रक्कम कंपनीला देण्यात आली. त्यानंतर दुसरा MOU दि.०२.११.२०१० नुसार बुकींग वाढल्यामुळे ३६६६ सदनिका बांधण्याचे ठरवून यासाठी ११.६६ हेक्टर जागा वापरण्याचे ठरले. जागा व सदनिकामध्ये वाढ झाल्यामुळे त्याची किंमत रु.४१९,६७,५६,०००/- निश्चित करण्यात आले. त्याच्या रु.११,००,५४,४००/- वाढीव रक्कम बिल्डरला देण्यात आली आहे.

सदर महाराष्ट्र पोलीस मेगासिटी गृहनिर्माण हौसिंग सोसायटीची संकल्पना सन २००५ ला सुरु होऊन सन २०१० मध्ये संस्था रजिष्टर करण्यात आली. सदरची जमीन ही शेती तथा नाविकास विभागातील असल्याने तो झोन बदल आदेश सन २०१४ मध्ये मिळाला. तसेच प्रकल्पाला विविध परवानगी जसे बांधकाम व विकास परवानगी दि.०१/०९/२००९ रोजी पीएमआरडी मिळाली तर पर्यावरण परवानगी सन २०१८ मध्ये मिळाली व जमीन अकृषीक आदेश सन २०१८ मध्ये मिळाले. सन २०१० ते २०१८ या कालावधीत प्रकल्पासाठी लागणा-या शासकीय परवानग्या आणि बांधकामासाठी आवश्यक विविध विभागाच्या शासकीय मंजु-या (शेती झोन ची रहीवासी झोन बदल, एम.ए. व प्लॅन (आराखडा) पी.एम.आर.डी.ए. कडून मंजुरी, (पर्यावरण खात्याची मंजुरी) प्राप्त झाल्याचे दिसते.

सदर प्रकल्पाचे बेबॅन्को डेव्हलपर्स लिमिटेड व एम.पी.एम.सी. संस्था यांचे अग्रीमेंट टू सेल दि.३१.०३.२०१७ रोजी एकुण ४९९७ सदनिका व १६० दुकानांसाठी नोंदणीकृत करण्यात आले. त्यामळे प्रकल्पाची अंदाजित रक्कम रु.७३१ कोटी इतकी आहे. विकसकाने सोसायटीस दिनांक १२.०६.२०२५ रोजी सादर केलेल्या बिलानुसार (१) विकासकाने माईलस्टोन प्रमाणे पुर्ण केलेले कामकाज बिल रु.३७९.४१ कोटी (२) सोसायटीकडून विकास काम प्राप्त रक्कम रु.२८८.८९ कोटी (३) सोसायटी विकसकास देणे बाकी रक्कम रु.९०.५२ कोटी इतकी आहे. दि.३१.०३.२०२३ रोजी पर्यंत महाराष्ट्र पोलीस मेगासिटी गृहनिर्माण हौसींग सोसायटीने विकसकास रु.२७७.५४ कोटी रुपये अदा केलेले आहेत. तरी सुध्दा दि.३१.०३.२०२३ रोजी अखेर एम.पी.एमसी कडून रु.४७.५५ कोटी रुपये देणे बाकी असल्याचे फॉरेन्सिक ऑडीट वरुन दिसून येते.

एम.पी.एम.सी. प्रकल्पासंबंधाने गुन्हे दाखल करण्यात यावेत म्हणून काही सभासदांनी पुणे येथील मा. ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट कोर्ट येथे दि.०५.०१.२०२४ रोजी केस क्र. ३४/२०२४ दाखल केली आणि या प्रकरणी इतर याचीका दाखल असून त्या न्यायप्रविष्ठ आहेत. तसेच महारेरा मध्ये १, ग्राहक मंच न्यायलयामध्ये ६६ (पुणे १२, सातारा २४, सांगली १३, कोल्हापुर १, अहिल्यानगर १६ ) व सहकार न्यायालय, पुणे येथे १ केस न्यायप्रविष्ठ आहे.

एम.पी.एम.सी. प्रकल्पासंबंधाने गुन्हे दाखल करण्यात यावेत यासाठी मा.उच्च न्यायालयामध्येही बचाव समितीमध्ये कार्यरत असलेले सभासदांपैकी चार सभासदांनी क्रिमीनल रिट

पिटीशन क्र.५६०९/२०२४ अन्वये याचिका दाखल केलेली आहे. मा.उच्च न्यायालयाने सदर प्रकरणी मेडीशनची नेमणूक केली होती. परंतू तक्रारदाराच्या असहाकरामुळे तोडगा निघाला नाही. सदर प्रकरण फौजदारी स्वरुपाचे असताना सुध्दा मेडिशनची नेमणुक का केली ? असा प्रश्न याचिकाकर्ते यांनी उपस्थित केला तदनंतर पोलीसांचा प्रकल्प पुर्णत्वास जाणे आवश्यक आहे अशी भावना मा. कोर्टाने व्यक्त केली आहे.

पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी दि.३१.०७.२०२४, दि.२८.१०.२०२४, दि.३०.०१.२०२५ व दि.१८.०२.२०२५ रोजी विकसक व महाराष्ट्र पोलीस मेगासिटी गृहनिर्माण हौसींग सोसायटीचे संचालक यांचे समन्वय बैठका पोलीस आयुक्त कार्यालय येथे घेतल्या आहेत. सदर बैठकीमध्ये विकसक बी.ई. बिलीमोरीया यांनी कर्ज/निधी उपलब्ध करुन प्रकल्पास पुर्णत्वास नेण्याचे वेळोवेळी आश्वासन दिलेले आहे. परंतु विकासफ कर्ज अथवा निधी उपलब्ध करू शकलेला नाही. तरी निधी उपलब्धतता होवून प्रकल्पाचा वेग वाढवून पुर्णत्वास नेता येऊ शकेल.

*******

लक्षवेधी सूचना क्र. १८३७

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. अभिजीत पाटील, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

""राहुरी पोलीस ठाण्याचे निरीक्षक यांना अहिल्यानगरहून तीन व्यक्ती मोटरसायकलवर बनावट नोटा घेऊन राहुरीकडे येत असल्याची माहिती मिळणे, त्यानुसार पोलिसांनी तात्काळ कारवाई करत नगर-मनमाड रस्त्यावरील गाडगे महाराज आश्रम शाळा परिसरात सापळा रचून MH४५ Y ४८३३ क्रमांकाच्या दुचाकीवरून आलेल्या तिघांना थांबवून तपासणी केली असता, त्यांच्या जवळून २०० व ५०० रुपयांच्या एकूण २ लाख रुपयांच्या बनावट नोटा आढळून येणे, घटनास्थळी ॲक्सिस बँकेचे मॅनेजर यांनी त्या नोटा बनावट असल्याची खात्री करणे, तद्नंतर सदर आरोपींना अटक करून त्यांच्यावर भारतीय न्याय संहिता कलम १७९, १८० आणि ३ ते ५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येणे, सदर प्रकरणी अधिक तपास केला असता सोलापूर जिल्ह्यातील टेंभुर्णी येथे बनावट नोटा तयार करण्यात आल्याचे उघडकीस येणे, टेंभुर्णी येथे छापा टाकून ६६ लाख रुपयांच्या बनावट नोटा, विशेष कागद, प्रिंटर, झेरॉक्स मशीन आणि इतर साहित्य जप्त करण्यात येणे, ही घटना अत्यंत गंभीर असून यामध्ये मोठ्या आर्थिक गैरव्यवहाराची शक्यता असणे, शासनाने उक्त प्रकरणी तत्काळ चौकशी करून बनावट नोटा छापून त्या चलनात आणणाऱ्या टोळीचा तपास लावून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता.""

---

## मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

राहुरी पोलीस ठाण्याचे निरीक्षक यांना अहिल्यानगरहून तीन व्यक्ती मोटारसायकलवर बनावट नोटा घेवुन राहुरीकडे येत असल्याची माहिती मिळताच दि. २८/०६/२०२५ रोजी राहूरी शहरातील नगर-मनमाड रस्त्यावरील संत गाडगे महाराज प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, राहुरी परिसरात सापळा रचुन एम.एच.४५ वाय-४८३३ क्रमांकाच्या दुचाकीवरुन आलेल्या तिघांना थांबवून पंचा समक्ष झडती घेतली असता, त्यांच्या जवळ सह मिळून आल्याने व त्यांनी सदरच्या नोटा या बनावट असल्याचे माहिती असताना देखील खऱ्या भारतीय चलनाच्या हुबेहुब दिसणाऱ्या एकूण ७०७ बनावट नोटा, ०१ खरी नोट व ०३ ॲन्ड्रॉईड मोबाईल असल्याचे भासवून त्याचा व्यवहारात वापर केला आहे असे तपासणी केली असता आढळून आले.

सदर इसमांच्या ताब्यात मिळालेल्या नोटांची ॲक्सीस बँकेचे मॅनेजर यांचेकडुन खात्री करुन घेवुन त्या बनावट असल्याने तसा पंचनामा करुन जप्त करण्यात आल्या आहेत. तद्नंतर सदर आरोपीना राहुरी पोलीस स्टेशन गु.र.नं. ७२४/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम १७९, १८०आणि ३ ते ५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे असुन तीन आरोपींना गुन्हयात अटक करण्यात आली आहे, तसेच इतर दोन आरोपींचा शोध चालू आहे.

लक्षवेधी सुचना क्र.१८६१

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री.निलेश राणे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र.१८६१ पुढीलप्रमाणे आहे:-

“राज्यासह कोकणातील सिधुदुर्ग- रत्नागिरी जिल्हयांमध्ये मोठया प्रमाणात गांजासदृश्य अंमली पदार्थ्याचा बसलेला विळखा,कुडाळ येथून गोव्यात अमली पदार्थाची वाहतूक करतांना गोवा राज्य अमली पदार्थ विरोधी पथकाच्या पोलिसांनी बांदयाजवळील पत्रादेवी पो सि तपासणी नाका येथे दिनांक ३१/०३/२०२५ रोजी कारवाई करुन २५ लाख १० हजार रुपये किंमतीचे अमली पदार्थ पोलिसांनी जप्त करणे, कारवाईमुळे सिंधुदुर्गचे गोव्याशी असलेले ड्रग्ज कनेक्शन असल्याचे उघड होणे व दि.१९/४/२०२५ रोजी वा त्या सुमारास शिरगांव शेटयेवाडी (ता.चिपळूण ) येथे महालक्ष्मी मेडिकलच्या पाठीमागे भिंतीच्या आडोशाला गांजासदृश अमली पदार्थ सेवन करणा-यांना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलिसांनी केलेली अटक,रत्नागिरी शहरातील मिरकरवाडा परिसरात अंमली पदार्थ सेवक करणा-या तरुणांना अटक,केंद्रीय महसूल गुप्तचर यंत्रणेच्या (डीआरआय ) ने मुंबईतील अधिका-यांनी एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीमध्ये १२ स्वतंत्र प्रकरणांत एकूण १८ किलो कोकेन जप्त करणे, त्यांची आंतरराष्ट्रीय बाजारात १८० कोटी किंमत असणे, समुद्र मार्गचा तस्करीसाठी वापर ,विशेष म्हणजे कृषी मालाचा पुरवठा करणा-या वाशीतील सर्वात मोठया बाजारपेठांमध्ये अमली पदार्थविक्रीची मोठी साखळी कार्यरत असल्याचे समोर येणे बाजारपेठांमध्ये अवैधधंदे रोखण्यास पोलीस यंत्रणा कुचकामी ठरणे,गांजा ड्रग्ज अंमली पदार्थ माफियांनी शाळाकॉलेजमधून यांची विक्री करुन तरुणपिढी बरबाद होणे आतापर्यत विमान मार्गाने तस्करी होत होती आता समुद्र मार्गानेतस्करी होत असल्याने व तरुणीपिढी व्यासनाधीन होत असल्याने शासनाने गांभीर्याने लक्ष घालून यास आळा बसण्याच्या दृष्टीने ठोस कारवाई करण्याची नितांत आवश्यकता.”

---

## मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

राज्यात अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्यांविरुध्द/जवळ बाळगणाऱ्यांविरुध्द/ सेवनार्थीविरुध्द एनडीपीएस कायदा १९८५ अन्वये कारवाई करण्यात येते. राज्यात जानेवारी २०२५ ते एप्रिल २०२५ पर्यत अंमली पदार्थ कायद्यांतर्गत अंमली पदार्थ ताब्यात बाळगणे/वाहतुक करणे संदर्भात एकूण १००० गुन्हे दाखल असून १४३२ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे व एकूण रू.१५३.२५ कोटी किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. तसेच अंमली पदार्थ सेवन करणा-यांविरुद्ध ४००१ गुन्हे दाखल असून ३०४९ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक, रत्नागिरी व सिंधुदूर्ग कार्यक्षेत्रात राज्यात जानेवारी २०२५ ते जुन २०२५ पर्यंत अंमली पदार्थ कायद्यांतर्गत केलेल्या कारवाईचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | एकूण गुन्हे | अटक आरोपी | जप्त अंमली पदार्थ व वजन | जप्त अंमली पदार्थ किंमत (रु.लाख) |
|---|---|---|---|---|
| पोलीस अधीक्षक, रत्नागिरी | ४५ | ५६ | ब्रा. हेरॉईन- ४३ ग्रॅम | ३.३२ |
| | | | गांजा- १४.२९२ किग्रॅ | ५.६१ |
| | | | एमडी-०९ ग्रॅम | ०.२० |
| पोलीस अधीक्षक, सिंधुदूर्ग | ३ | ४ | गांजा-२.१५८ किग्रॅ | ०.६६ |
| एकूण | ४८ | ६० | | ९.८० |

कुडाळ पोलीस ठाणे, पोलीस अधीक्षक सिंधुदूर्ग कार्यक्षेत्रामधील पिंगुळी म्हपसेकर तिठा, ता. कुडाळ येथे राहणा-या एका व्यक्तीस दि.३१.०३.२०२५ रोजी बांदा जवळील पत्रादेवी सिमा तपासणी नाका येथे रु. २५,१०,०००/- किंमतीचा अंमली पदार्थ वाहतूक करीत असताना गोवा राज्य अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या पोलीसांना मिळून आल्याने, त्याच्याविरुध्द ॲन्टी नार्कोटिक्स पोलीस सेल, पणजी येथे गु.नों.क्र १०/२०२५ एनडीपीएस ॲक्ट १९८५ चे कलम २२ (सी), ८ (सी) प्रमाणे गुन्हा दाखल केलेला आहे.

शिरगांव शेटयेवाडी, ता.चिपळुण येथे महालक्ष्मी मेडिकलच्या पाठीमागे भिंतीच्या आडोशाला गांजासदृश्य अंमली पदार्थ सेवन करणाऱ्या ०२ व्यक्तीना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलीसांनी ताब्यात घेवून त्यांच्या विरुद्ध रत्नागिरी शहर पोलीस ठाणे येथे गु.नोंद क्र.१५२/२०२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच सदर प्रकरणातील दोन्ही आरोपीविरुध्द दि.१५.०६.२०२५ रोजी मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक, रत्नागिरी यांच्या कार्यक्षेत्रात रत्नागिरी शहर पोलीस ठाणे हद्दीतील मिरकरवाडा येथे अंमली पदार्थ सेवन करतानाचे एकुण ०५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर ५ गुन्हयातील निष्पन्न आरोपींना बी.एन.एस.एस. कलम ३५(३) प्रमाणे नोटीस देण्यात आली असून, त्यांच्याविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालया मधील एपीएमसी पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील एपीएमसी मार्केटमध्ये सन जुन,२०२५ पर्यंत अंमली पदार्थ विक्री करणे अथवा साठवणूक याबाबत कोणतीही घटना घडल्याचे निदर्शनास आलेले नाही. तसेच एपीएमसी मार्केटमध्ये अंमली पदार्थ विक्रीची कोणतीही साखळी असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

तथापि, एपीएमसी पोलीस ठाणे, नवी मुंबई यांचे मार्फत जुन २०२५ पर्यंत अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यावर ०७ कारवाया केल्या असून एकुण १० आरोपींकडून १५.७२३ किलो गांजा (किंमत रु.४,१८,४७५) ९६.०९ ग्रॅम एमडी (किंमत रु.९,७९,०००) व १४ ग्रॅम वजनाचा चरस (किंमत रु २८,०००) जप्त केला आहे. तसेच अंमली पदार्थाचे सेवन करण्याबाबत ८५ गुन्हे दाखल करुन ८५ व्यक्तींवर कारवाई करण्यात आली आहे.

एपीएमसी पोलीस ठाणेकडून एपीएमसी मार्केट मध्ये नियमीतपणे गस्त करीता बिट मार्शल, गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार तसेच इतर पोलीस अधिकारी व अंमलदार यांची नेमणूक करुन त्यांच्या मार्फत मार्केटमध्ये नियमीतपणे गस्त करण्यात येते.

तसेच एपीएमसी मार्केटमध्ये कोणत्याही प्रकारच्या अवैध प्रकारास वाव मिळून नये अथवा अवैध कृती चालणार नाही, यावर प्रतिबंध ठेवण्याकरीता एपीएमसी मार्केटमध्ये वारंवार कोंबीग ऑपरेशनचे आयोजन करुन मार्केट मधील व्यापारी, आडते, मजूर, वाहतूकदार, सुरक्षा रक्षक व नागरिक यांच्या बैठकांचे आयोजन केले जाते, तसेच एपीएमसी मार्केटमध्ये मेगा फोनव्दारे एपीएमसी मार्केट परिसरामध्ये कोणतेही अवैध प्रकार चालणार नाहीत व तसे काही चालू असल्यास त्याबाबत पोलीसांना माहिती दयावी व माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल याबाबत आवाहन केले जाते.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील पोलीसांनी गांजा, ड्रग्ज अंमली पदार्थ बाबत शाळा, कॉलेज महाविद्यालय, सोसायटी गर्दीची ठिकाणी जावून अंमली पदार्थाच्या दुष्परिणाम बाबत जनजागृती करण्यात येते. तसेच नागरिकांच्या मदतीकरिता ८८२८११२११२ हा हेल्प लाईन नंबर सुरू करण्यात आला आहे.

सागरी/खाडी किनारी भागात जेट्टीवर ये-जा करणाऱ्या बोटी/व्यक्ती/प्रवासी बोटी यांची कर्तव्यावरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेकडून कसून तपासणी करण्यात येते. तसेच संशयित बोटी व त्यावरील इसमांच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येते.

सागरी/खाडी किनारी भागातील मच्छिमार संस्था, सागर रक्षक दल, ग्राम रक्षक दल व मासेमारी बांधव यांच्या वेळोवेळी बैठका आयोजित करून त्यांना सागरी सुरक्षिततेच्या दृष्टीने गोपनिय माहिती संकलित करणेबाबत सुचित करण्यात येते. तसेच समुद्रात चालणारे

गैरकृत्य रोखण्यासाठी समुद्रामध्ये बोटी जहाजांवर संशयित हालाचाली आढळून आल्यास कोस्टल हेल्पलाईन क्र.१०९३ वर सपंर्क करणेबाबत सुचित केलेले आहे.

**अंमली पदार्थ तस्करी तसेच विक्रीवर आळा घालण्यासाठी शासन खालील प्रमाणे उपाययोजना करते.**

- राज्यात अंमली पदार्थ तस्करांविरुद्ध विशेष मोहीमा, ड्रग्ज मुक्त अभियान, शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती कार्यक्रम तसेच वाहन रॅली व पथनाट्ये आयोजनाद्वारे अंमली पदार्थ सेवन व विक्री न करण्याबाबत जनजागृती करण्यात येते.
- राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकामध्ये स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केले आहेत.
- केंद्र शासनाच्या दि.२५.०३.२०२२ च्या आदेशान्वये नार्कोकोऑर्डीनेशन यंत्रणेची पुनर्रचना करण्यात आली असून त्यानुसार दि.३१.०८.२०२३ च्या शासन निर्णयाने अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) ची स्थापना करण्यात आली आहे.
- शासन निर्णय, दि.०६.०८.२०२४ अन्वये अंमली पदार्थ टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राज्यासाठी NCORD (Narco-Coordination centre) सचिवालय म्हणून व विशेष पोलीस महानिरिक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) यांची राज्यस्तरीय नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.
- अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स करीता शासन निर्णय क्र. एपीओ-३१२३/ प्र.क्र.८२/पोल-३, दि.१९.०३.२०२५ अन्वये एकूण ३४६ पदे नव्याने निर्माण करण्यात आली आहेत.
- अंमली पदार्थावर आळा घालण्यासाठी राज्यस्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समिती व जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समितीची स्थापना करण्यात आली असून सदर समित्यांकडून अंमली पदार्थावर आळा घालण्याबाबत वेळोवेळी आढावा घेतला जातो.

********

लक्षवेधी सूचना क्र. १९२१

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. शंकर जगताप, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"मालेगाव जि. नाशिक येथे भारतीय चलनातील ५०० रुपयाच्या एकुण ३० बनावट नोटा प्राप्त झाल्या असणे, बनावट नोटा या रोकड जमा होणाऱ्या मशीनच्या रिट्रक्ट बॉक्समध्ये जमा होत असणे, एच.डी.एफ.सी (HDFC) बँक सटाणा शाखा येथील रोकड जमा करण्याच्या मशीनच्या रिट्रक्ट बॉक्समध्ये ३० बनावट नोटा जमा झालेल्या असणे, दि. ०७-०४-२०२५ रोजी एच.डी.एफ.सी बँकचे कर्मचारी यांनी रोकड जमा करणाऱ्या मशीनचा डेटा काढला असता सदर नोटा या डेबिटकार्ड क्र. ४०३८७५०११३४३६९७४ याद्वारे फातिमा अहमद शेख या महिलेमार्फत जमा केल्याचे निष्पन्न झालेले असणे, सदर घटनेबाबत छावणी पोलीस ठाणे मालेगाव येथे दि. १०-०५-२०२५ रोजी गुन्हा नोंद क्र. ९७/२०२५ दाखल झालेला असणे. नमुद गुन्ह्याच्या तपासात नोंद केलेले जबाब व प्राप्त कागदपत्रे यांच्यानुसार सदर बनावट नोटा या आरोपी फैयाज अहमद रियाज अहमद व नवाज खान फैजुल्ला खान यांच्यामार्फत चलनात आले असल्याचे निष्पन्न झाले असणे, सदर व्यक्तींकडे बनावट नोटा कोणाकडुन प्राप्त झाल्या याबाबतचे समाधानकारक उत्तर नसणे तसेच त्याबाबत पोलीस प्रशासनाकडुन आजपर्यंत कोणतीही पुढील कार्यवाही झालेली नसणे याबाबतच्या गंभीर बावी संदर्भात शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही."

---

## मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

दि. ०७.०४.२०२५ रोजी बँक कर्मचारी यांनी नेहमीप्रमाणे सी.डी.एम. मशीन ओपन करुन समरी काढली असता मशीनच्या रिट्रक्ट बॉक्स मध्ये ५०० रुपयांच्या ३० नोटा जमा झाल्याचे त्यांना दिसुन आले. त्यांबाबत त्यांनी बँक मॅनेजर यांना माहिती दिली व सदरच्या नोटा ह्या बँक प्रोसेस नुसार नोट चेकींग मशीन द्वारे तपासल्या असता सदरच्या नोटा बनावट असल्याचे निदर्शनास आले.

सदरच्या घटनेबाबत बँकेने तपासणी केली असता सदरच्या नोटा ह्या डेबिटकार्ड क्र. ४०३८७५०११३४३६९७४ याद्वारे फातिमा अहमद शेख या महिलेमार्फत जमा केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यानुषंगाने सदर प्रकरणी छावणी पोलीस ठाणे, मालेगांव येथे दि. १०.०५.२०२५ रोजी गु.र.नं. ९७/२०२५ भा.न्या.सं. २०२३ चे कलम १७९, १८६ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने फातिमा अहमद शेख ह्या डेबिटकार्ड धारक महिलेची विचारपुस करुन जबाब नोंदविण्यात आला असुन आपल्या जबाबामध्ये तिने १)फैयाज अहमद रियाज अहमद व २) नवाज खान फैजुलाखान रा. मालेगांव यांनी सदरच्या बनावट नोटा दिल्याचे जबाबात नमुद केले आहे.

त्यानुषंगाने वरिल दोन्ही आरोपींना अटक करुन चौकशी केली असता त्यांनी सदरच्या बनावट नोटा ह्या त्यांना त्यांच्या मटन विक्री व्यवसायातुन मिळाल्या असुन त्या नक्की कोणी व केव्हा दिल्या हे सांगता येत नसल्याचे आपल्या कबुली जबाबात सांगितले आहे.

गुन्हाच्या तपासाकामी आरोपीचे दुकान परिसरात व राहत्या घराच्या परिसरात जावुन चौकशी केली असता तेथे सी.सी.टि.व्ही. कॅमेरे आढळुन आले नाहीत. तसेच आरोपीतांचे मोबाईल फोनची तांत्रिक माहिती वरुन तपासाकामी उपयुक्त पुरेशी माहिती मिळुन आलेली नाही.

गुन्हाच्या तपासात बनावट नोटा तपासणी कामी Currency note press, Nashik यांचेकडे तपासणी करुन अहवाल प्राप्त करुन घेण्यात आलेला असुन त्यात FICN is of low quality असे नमुद करण्यात आले आहे. तसेच आरोपींविरुध्द दोषारोपपत्र तयार करुन सहनियंत्रण समिती यांचेकडे पडताळणी करीता पाठविण्यात आलेला आहे.

**********

लक्षवेधी सूचना क्र. २२५९

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. सुरेश धस, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"धाराशिव नगर पालिकेअंतर्गत झालेल्या कोट्यावधी रुपयांच्या घोटाळ्याबाबत विशेष तपास पथकाची (SIT) स्थापना होऊनही आद्यापर्यंत कसल्याही प्रकारची चौकशी किंवा कारवाई न होणे, अशा आशयाचे पत्र मा पोलिस अधीक्षक, धाराशिव यांना दिनाक ३/६/२५ रोजी दिले असणे, पत्र देऊनही सदरील पत्राच्या अनुषंगाने या SIT संदर्भात अति पोलिस अधीक्षक यांची निवड करणे, सदरील SIT च्या अनुषंगाने धाराशिव जिल्हाधिकारी यांनी विशेष लेखा परिषणाबाबत लेखी पत्र दिले असणे, सदरील SIT च्या अनुषंगाने दैनिक समय सारथी या वर्तमान पत्रात सातत्याने बातम्या प्रकाशित होणे व SIT संदर्भात कसल्याही प्रकारची कार्यवाही न होणे, त्या अनुषंगाने नागरिकांच्या मनामध्ये प्रचंड संतापाची लाट निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया"

---

<u>मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन</u>

मा. जिल्हाधिकारी यांच्याकडुन नगर परिषद, धाराशिव यांच्याकडे प्राप्त झालेले अनुदान योजनेतील समाविष्ट कामांवर खर्च न करता नगरपरिषदेच्या इतर कामांवर खर्च करण्यात आल्याच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, धाराशिव यांच्या आदेशान्वये समिती गठीत करण्यात आली.

गठीत समितीने चौकशी करुन समितीने २०५४ प्रमाणकांपैकी ९६६ प्रमाणके दर्शविले उर्वरित १०८८ प्रमाणके सादर केली नाहीत. सदर प्रमाणके ही शासकीय दस्ताऐवज आहे हे माहित असतांना तसेच ती प्रमाणके नगरपालिकेच्या लेखाविभागातील अभिलेखावर जतन करणे आवश्यक असतांना सदरची प्रमाणके सादर केलेली नाहीत.

त्यानुसार उपरोक्त प्रमाणे सादर न केलेल्या १०८८ प्रमाणकांच्या सखोल चौकशी करणेकामी जिल्हा सह आयुक्त, नगर परिषद प्रशासन विभाग जिल्हाधिकारी कार्यालय, धारशिव यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद नळदुर्ग यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत केली. सदरच्या चौकशी समितीने अभिलेख्यांवर मिळून न आलेल्या १०८८ प्रमाणकांचे खालीलप्रमाणे सर्वसाधारण वर्गीकरण केले.

१. शासकीय देयके, विद्युत देयके, शासकीय कर, लाभार्थी, जाहिरात, वेतन मानधन व इतर असे शासकिय खर्च असणारे देयके (एकुण ५७४)

२. ठेकेदार, विकास योजना व इतर किरकोळ खर्चाची देयके (एकुण ५१४)

उक्त प्रमाणे वर्गीकरून करून अभिलेख्यावर मिळुन न आलेल्या प्रमाणकांपैकी ठेकेदार, विकास योजना व इतर किरकोळ खर्चाची देयके (एकुण ५१४) प्रमाणके ज्याची एकुण रक्कम २७,३८,७८,१००/- रू. इतकी आहे त्या रकमेचा अपहार करून तो दडपण्याच्या उदेशाने ती ५१४ प्रमाणके जाणिवपुर्वक लेखाविभागात ठेवले नसल्याचे नमुद करून त्यांचा अहवाल सादर केला आहे.

उपरोक्त प्रमाणे धारशिव नगर पालिकेअंतर्गत झालेल्या कोट्यावधी रुपयांच्या अपहाराच्या अनुषंगाने मुख्याधिकारी, नगर परिषद धाराशिव यांच्या आदेशान्वये लेखापाल, नगर परिषद धाराशिव

यांच्या फिर्यादी जबाबावरून दि.१४.०८.२०२३ रोजी पोलीस स्टेशन, आनंदनगर जिल्हा धाराशिव येथे गु.र.नं. ३१८/२०२३ भा.दं.सं. कलम २०१, ३४, ४०९, ४२० सहकलम महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ कलम ९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाच्या तपासाकामी शासनाचे दि.०७.०६.२०२४ रोजीच्या पत्राच्या संदर्भान्वये पोलीस अधिक्षक, धाराशिव यांनी त्यांच्या दि. ०९.०९.२०२४ च्या आदेशान्वये विशेष तपास पथक SIT ची स्थापना केली आहे.

सदर एसआयटी विशेष तपास पथकाचे तपास प्रमुख अपर पोलीस अधिक्षक यांनी त्यांच्या दिनांक २५.१२.२०२४ व दिनांक २०.०६.२०२५ च्या पत्रान्वये सदरच्या गुन्ह्याच्या अनुषंगाने नगर परिषद, धाराशिव येथील विशेष लेखा परिक्षण होणे अत्यंत गरजेचे असल्याने सदरचा गुन्हा घडला त्या कालावधीतील विशेष लेखापरिक्षण करण्याकरिता मा. जिल्हाधिकारी धाराशिव यांना शिफारस करण्यात आली आहे.

त्यानुषंगाने मा. जिल्हाधिकारी, धाराशिव यांच्याकडुन दिनांक ३०.०६.२०२५ च्या पत्रान्वये मा.संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, मुंबई यांना सदर गुन्ह्यातील आर्थिक बाबींचा तपास करण्याकामी धाराशिव नगरपरिषद येथील आर्थिक विशेष लेखा परिक्षण होऊन मिळण्याबाबत विनंती करण्यात आली आहे.

मा.संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन यांच्याकडुन नगरपरिषद, धाराशिव येथील विशेष लेखापरिक्षण केल्यानंतर व त्यासंबंधीचा विशेष लेखापरिक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतरच पुढील चौकशी करण्यात येणार आहे.

तसेच सदर गुन्ह्यातील आरोपींना जामीन देते वेळी मा. उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांनी प्रकरणामध्ये केवळ प्रशासनिक अनियमितता असलेबाबत निरीक्षण नोंदविले आहे.

तसेच आरोपींविरुध्द CRPC कलम १९७ अन्वये आरोपींवर अभियोग दाखल करण्यापुर्वी सक्षम प्राधिकारी यांच्या मंजुरी करिता गुन्ह्यातील तपास अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेकडुन दि.१२.०१.२०२५ रोजी नगर विकास विभागास पत्र पाठविण्यात आले आहे.

उपरोक्त प्रमाणे धाराशिव नगर पालिके अंतर्गत झालेला अपहाराबावत विविध वर्तमान पत्रात बातम्या प्रकाशीत झालेल्या आहेत.

**********

लक्षवेधी सूचना क्र. २३०७

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री.सुरेश धस, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"धाराशिव जिल्ह्यात खरीप हंगाम २०२३ मधे शासकीय जमिनीवर पिक विमा भरलेल्या २४ ऑनलाइन केंद्र चालकावर गुन्हा दाखल झाला असणे, त्याचा तपास पोलिस निरीक्षक आर्थिक गुन्हे शाखा धाराशिव यांचे मार्फत करण्यात येत असणे, जिल्हाधिकारी धाराशिव यांनी संदर्भीय पत्र क्र ११ अन्वये मागविलेल्या माहितीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी धाराशिव यांनी ५६५ शेतकऱ्यांनी ११७० अर्जाद्वारे शासकीय जमिनीवर ऑनलाइन पिक विमा भरलेला असल्याचे लेखी देणे, दिनांक ३१/१२/२०२४ रोजीच्या जिल्हास्तरीय सयुक्त समितीची आढावा बैठक घेणे व त्यानुसार ५६५ शेतकरी दोषी दिसुन येत आहेत असे लेखी पत्र जिल्हाधिकारी धाराशिव यांनी पोलिस अधीक्षक धाराशिव यांना पाठविणे, त्या पत्राच्या अनुषंगाने दैनिक समय सारथी या वृत्तपत्रामधे सातत्याने बातम्या प्रकाशित होणे जिल्हाधिकारी धाराशिव च्या पत्राच्या अनुषंगाने धाराशिव पोलिस अधीक्षक यांनी आजवर अशा ५६५ बोगस शेतकऱ्यावर कसल्याही प्रकारची कार्यवाही न केल्याने जनतेमध्ये प्रचंड संतापाची लाट निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतीक्रिया"

..............................................................................................

## मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

धाराशिव जिल्ह्यात खरीप हंगाम २०२३ मध्ये शासकीय जमिनीवर पिक विमा भरला असल्याने सदर गुन्ह्यातील फिर्यादी उपसंचालक, जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी कार्यालय, धाराशिव यांच्या फिर्यादी जबाबावरुन बीड, औरंगाबाद, नांदेड, परभणी, सोलापुर व धाराशिव जिल्ह्यातील २४ ऑनलाईन सेवा केंद्र चालकांविरुध्द पोलीस स्टेशन, आनंदनगर येथे दि.०६.०४.२०२४ रोजी गु.र.क्र. ११८/२०२४ भा.दं.वि. कलम ४२०, ५११, ४१७, ४१८, ४६५, ४६७, ४६८, ४७१ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, धाराशिव हे करत आहे.

आरोपी असलेल्या ऑनलाईन सेवा केंद्र चालकांनी धाराशिव जिल्ह्यातील २९९४.५४ हेक्टर शासकिय जमीन शेतकऱ्यांच्या मालकीची नसल्याचे तसेच सदरच्या शासकीय जमीनीशी कोणताही भाडेकरार/संमतीपत्र केलेला नसल्याचे माहित असुन सुध्दा ऑनलाईन सेवा केंद्र चालकांनी ११७० शेतकऱ्यांचे नावे बनावट सातबारे व ८-अ चे उतारे तयार करुन ते खरे आहे असे दाखवुन फसवणुक केल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर गुन्ह्याबाबत पोलीस अधिक्षक, धाराशिव यांनी केलेल्या पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, धाराशिव यांनी त्यांच्या दि. ०९.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये ज्या ५६५ शेतकऱ्यांनी ११७० अर्जाद्वारे शासकीय जमिनीवर ऑनलाईन पिक विमा भरलेला आहे अशा शेतकऱ्यांची पडताळणी करण्याच्या अनुषंगाने दि.३१.१२.२०२४ रोजीच्या जिल्हास्तरीय संयुक्त समितीच्या

आढावा बैठकीत ठरल्याप्रमाणे पडताळणी करुन सदरील ५६५ शेतकरी दोषी दिसुन येत असल्याचे कळविले आहे.

परंतु सदरच्या गुन्ह्यातील फिर्यादी यांच्या जबाबावरुन फक्त २४ ऑनलाईन सेवा केंद्र चालक यांच्या विरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात शेतकऱ्यांना सहआरोपी करण्यात आलेले नाही. तथापि, मा. जिल्हाधिकारी, धाराशिव यांच्या दि. ०९.०१.२०२५ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने चौकशी करुन इतरांच्या सहभागा बद्दल तपास करण्यात येत आहे.

तसेच सदरच्या गुन्ह्यात एकुण २४ आरोपी निष्पन्न झाले असुन आरोपींविरुध्द दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. तथापी, सदर गुन्ह्यात फरार असलेल्या एकुण ३ आरोपींचा शोध सुरु आहे.

**********

लक्षवेधी सूचना क्रमांक :-९६२

## महाराष्ट्र विधानसभा

### सन २०२५ चे पावसाळी (द्वितीय) अधिवेशन

श्री. चंद्रदीप नरके, वि.स.स. यांची महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.९६२ पुढील प्रमाणे आहे :-

"दोन वर्षापूर्वी उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार गायरानातील सर्व अतिक्रमणे काढण्याची शासनाने कारवाई सुरु केली असणे, निर्णयाविरोधात जिल्ह्यातील अतिक्रमणधारकांनी महामोर्चा काढून अतिक्रमण नियमित करण्याची मागणी करणे, तरीही कारवाई सुरूच राहिल्यामुळे त्याविरोधात न्यायालयात याचिका दाखल केली असणे, यामध्ये गतवर्षी अतिक्रमण हटवण्याच्या प्रक्रियेस स्थगिती मिळाली असली तरी ते नियमानुकूल करण्याबाबत कोणताही ठोस निर्णय झालेला नसणे, या अनिश्चिततेमुळे अतिक्रमणधारक धास्तावलेले असणे, सरकारने अतिक्रमण कायम करण्याबाबत न्यायालयामध्ये सक्षमपणे बाजू मांडून राज्यातील अतिक्रमणधारकांना न्याय देणे गरजेचे असणे, वाढती लोकसंख्या आणि त्या तुलनेत राहण्यासाठी गावानजीक स्वमालकीची जमीन नसल्यामुळे ग्रामस्थांनी गायरानामध्ये घरे बांधली असणे, जिल्ह्यात शासकीय जमिनींमध्ये अतिक्रमण करून नागरीकांनी घरे बांधली असणे, यामध्ये सुमारे ६ लाखांहून अधिक लोक वास्तव्य करत असणे, कोल्हापूरच्या तुलनेत राज्यातील अतिक्रमणांची संख्या पाहता कोटींच्या घरात असणे, दोन वर्षापूर्वी करवीर तालुक्यातील हालसवडेमधील गायरान अतिक्रमणाच्या वादग्रस्त मुद्यावरून राज्यातील अतिक्रमणे हटवण्याचा निर्णय उच्च न्यायालयाने दिला असणे, त्यानुसार प्रशासनाने कारवाई सुरु केली असणे, त्यामुळे राज्य शासनाने तातडीने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून त्याबाबत स्थगिती घेण्याची अतिक्रमणधारकांनी मागणी केली असणे, गावालगत शासकीय जमिनीमध्ये गावठाण विस्तारासाठी रितसर परवानगीबाबत निर्णय घेऊन गावातील ग्रामस्थांना घरांसाठी जागा देणे गरजेचे असणे. याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

### श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

ब्रिटीश कालावधीपासून स्थानिक गावकरी / गावाच्या निरनिराळ्या सार्वजनिक वापरासाठी गायरान जमीन गुरचरणासाठी ग्रामपंचायतीकडे निहित अथवा वर्ग केलेली असते. बऱ्याच वेळेला स्थानिक गावकऱ्यांकडून अथवा ग्रामपंचायतीकडून अनधिकृतरित्या अशा जमिनींचा धार्मीक वा अन्य वास्तूंच्या उभारणीसाठी, व्यापारी स्वरुपाच्या बांधकामासाठी करण्यात येतो किंवा अशा जमिनीचे वाटप हितसंबंधित व्यक्तीना करण्यात येते. परंतु त्याबाबत स्थानिक महसूल यंत्रणेमार्फत अथवा ग्रामपंचायतीकडून कोणतीही कारवाई होत नाही. पर्यायाने गावकऱ्यांच्या सार्वजनिक वापराच्या जमिनी शिल्लक राहत नाहीत अथवा अल्प प्रमाणात शिल्लक राहतात. त्यामुळे ग्रामस्थांच्या सोयी सुविधा व वापरावर बंधने येतात.

गुरचरण अथवा गायरान जमिनीच्या वाटपाबाबत शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. १०७८/२६१६/७७७/ग-६, दि.२६.०३.१९८४ नुसार धोरण ठरविण्यात आले आहे. त्यानुसार गायरानासाठी राखुन ठेवलेली जमीन इतरत्र जमीन उपलब्ध नसेल तरच आणि गायरानाचे क्षेत्र त्या गावाच्या एकंदर लागवडीखाली येणाऱ्या क्षेत्राच्या ५ टक्के पेक्षा कमी होत नाही, याची खात्री झाल्यावरच सार्वजनिक उपयोगासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत विचार व्हावा, असा निर्णय घेण्यात आला आहे.

दि.२८.११.१९९१ च्या शासन निर्णयान्वये दि.०१.०४.१९७८ ते दि.१४.०४.१९९० या कालावधीत मागासवर्गीय आणि इतर भूमीहीन व्यक्तींची शासकीय पड व गायरान जमिनीवर शेतीसाठी झालेली व सदर शासन निर्णयातील अटी शर्तीनुसार पात्र ठरत असलेली अतिक्रमणे नियमित करण्याचा व अपात्र अतिक्रमणे निष्कासित करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तद्नंतर, शासनाने वारंवार अशी अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत विशेष मोहिम आखून प्रकरणे निकाली काढण्यासंदर्भात क्षेत्रिय कार्यालयास सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

गावकऱ्यांच्या सार्वजनिक वापरासाठी ग्रामपंचायतीकडे निहीत केलेल्या जमिनी तसेच गायरान जमिनीवरील अतिक्रमणांबाबत मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल सिव्हील अपिल क्रमांक ११३२/२०११ @ एसएलपी (सी) ३१०९/२०११ जगपाल सिंग व इतर विरुध्द पंजाब राज्य व इतर प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.२८.०१.२०११ रोजी पुढीलप्रमाणे निरिक्षण नोंदविले व आदेश दिले आहेतः-

१) गायरान जमिनींची मालकी स्थानिक कायद्यानुसार शासनाकडे होती. शासनाने या जमिनींचे व्यवस्थापन ग्रामसभा / ग्रामपंचायतीकडे सोपविले होते.

अपवादात्मक परिस्थितीत काही जमीन भूमीहीन शेतमजूर, अनुसूचित जाती /जमातीच्या व्यक्तींना देणे अनुज्ञेय होते यात शंका नाही. मात्र हे अगदी अपवादात्मक परिस्थितीतच करणे अपेक्षित होते.

सर्व राज्य शासनांनी शासकीय गायरान / गुरचरण व ग्रामस्थांच्या सार्वजनिक सोयी-सुविधासाठी असेलेल्या जमिनीवरील अतिक्रमणे तात्काळ निष्कासित करून सदर जमिनी लोकांच्या सार्वजनिक उपयोगासाठी संबंधित ग्रामपंचायतीकडे सुपूर्द करण्याबावत तात्काळ कार्यवाही करण्यासाठी विशेष कृती कार्यक्रम तयार करावा.

२) या कार्यक्रमांतर्गत संबंधित अतिक्रमण धारकांना कारणे दाखवा नोटीस देऊन संक्षिप्त सुनावणी घेण्यात येऊन त्वरेने अपात्र अतिक्रमणे निष्काषित करण्याची कार्यवाही करावी.

३) अशी अतिक्रमणे खुप कालावधी पासूनची आहेत किंवा त्यावरील बांधकामावर प्रचंड खर्च करण्यात आला आहे अशा कारणास्तव कोणत्याही अतिक्रमणास संरक्षण देण्यात येऊ नये तथा अशी अतिक्रमण नियमानुकूल करण्यात येवू नयेत.

४) ज्या प्रकरणात शासनाच्या निर्णयाव्दारे भूमीहिन शेतमजूर, अनुसूचित जाती / जमातीतील व्यक्ती इत्यादीचे अतिक्रमण नियमानुकूल करण्याबाबत यापूर्वीच निर्णय घेण्यात आला आहे, अशी अतिक्रमणे तसेच शाळा, दवाखाना किंवा इतर सार्वजनिक प्रयोजनार्थ बांधकाम यांची अगोदरच अस्तित्वात असलेली अतिक्रमणे वगळण्यात यावीत.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या उक्त नमूद आदेशाच्या अंमलवजावणीकरीता महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक १२ जुलै, २०११ अन्वये सार्वजनिक वापरातील जमिनी / गायरान जमिनी इतर प्रयोजनासाठी वापरण्यावर निर्बंध घालण्याबावत व अतिक्रमण निष्कासित करण्याबावत क्षेत्रीय अधिकारी यांना सविस्तर दिशा निर्देश दिलेले आहेत.

गायरान जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासित करण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल सुओमोटो जनहित याचिका क्रमांक ०२/२०२२ प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिनांक १५/०९/२०२२ रोजीच्या आदेशास अनुलक्षून राज्यातील गायरान / शासकीय जमिनीवरील अतिक्रमणांबाबतची माहिती घेतली असता राज्यामध्ये २ लाख २२ हजार १५३ अतिक्रमणे गायरान जमिनीवर झाल्याचे निदर्शनास आले आहे.

तद्नंतर मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०६/१०/२०२२ रोजीच्या आदेशान्वये गायरान जमिनीवरील अतिक्रमणे वर्षाअखेर निष्कासित करण्याबाबतचा रोडमॅप सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडून रोडमॅप तयार करण्यात आला.

सुओमोटो जनहित याचिका क्रमांक ०२/२०२२ या प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने पारीत केलेल्या आदेशांच्या अनुषंगाने विभागामार्फत दिनांक १४/११/२०२२ रोजी सादर करण्यात आलेल्या शपथपत्रामध्ये असे स्पष्ट करण्यात आले आहे की, शासन निर्णय नगर विकास विभागाकडील दिनांक १७/११/२०१८, तसेच शासन निर्णय ग्राम विकास विभाग दिनांक १६/०२/२०१८ आणि शासन निर्णय दिनांक २२/०८/२०२२ मधील तरतूदीनुसार पात्र असलेली अथवा शासनाच्या यापूर्वीच्या इतर कोणत्याही धोरणानुसार / तरतूदीनुसार संरक्षित होणारी अतिक्रमणे वगळून उर्वरित अतिक्रमणे निष्कासनांची कार्यवाही करण्यात येईल.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक ०१/१२/२०२२, दिनांक ०६/१२/२०२२ आणि दिनांक १९/१२/२०२२ च्या आदेशान्वये अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबतच्या त्यांच्या आदेशास सद्य:स्थितीत अंतरिम स्थगिती दिली आहे. तसेच, शासनाने अतिक्रमण निष्कासित करण्याकरीता द्यावयाच्या प्रस्तावित नोटीसचा नमूना तयार करून मा.उच्च न्यायालयास सादर करण्याचे आदेशित केले होते. त्यानुसार शासनाने प्रमाणित नोटीसचा मसूदा दिनांक २७/०२/२०२३ रोजी झालेल्या सुनावणी समयी मा.उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणला आहे. सद्य:स्थितीत सदरहू प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

शासकीय गायरान जमिनीवरील निवासी प्रयोजनासाठी झालेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबतची निकड विचारात घेता, तसेच, भूमीहीनांना घरे उपलब्ध करून देण्याबाबत शासनाच्या सर्वांसाठी घरे या धोरणांच्या योजनांचे महत्त्व पाहता, विशेष अनुमती याचिकेव्दारे सदर बाब मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून देऊन प्रकरणी निवासी / रहिवासी प्रयोजनासाठी करण्यात आलेले अतिक्रमण नियमानुकूल करण्याबाबत तसेच, ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमांतर्गत पात्र परंतु, भूमीहीन लाभार्थ्यांना गायरान जमिनीवरील जागा उपलब्ध करून देणेबाबत मुभा देण्याची विनंती करण्याच्या अनुषंगाने शासकीय अभियोक्ता, मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांच्यामार्फत मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करण्याबाबत विधी व न्याय विभागास विनंती करण्यात करण्यात आली असता, विधी व न्याय विभागाने CIVIL APPEAL NO. ११३२/२०११@SLP (C) No. ३१०९/२०११ श्री. जगपाल सिंग विरुध्द पंजाब शासन व इतर या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दि. २८ जानेवारी, २०११ आदेशाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करण्यास असहमती दर्शविलेली आहे.

*******

लक्षवेधी सूचना क्रमांक :- ११६१

## महाराष्ट्र विधानसभा

### सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन

श्री. किशोर पाटील, वि.स.स. यांची महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे :-

"ब-सत्ता / नविन अविभाज्य शर्त (भोगवटादार वर्ग -२) प्रकारचे भूखंडास विक्री करणेकामी व भोगवटादार वर्ग-१ मध्ये रूपांतरीत करणेकामी परवानगी देण्याच्या अनुषंगाने पूर्व परवानगी न घेता झालेले हस्तांतरणबाबत व वापरात बदलबाबत शर्तभंग नियमानुकूल करण्या बाबतचे अधिकार पूर्वीप्रमाणे जिल्हाधिकारी यांना प्रदान केल्यास व त्यांचे अधिनस्त उपविभागीय अधिकारी यांना प्रदान करणेबाबत लोकप्रतिनिधींनी दि.७.४.२०२५ रोजीच्या सुमारास मा. महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन देण्यात येणे, परंतु या संदर्भात अद्यापही शासनाने निर्णय न घेणे, परिणामी सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. "

---

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

राज्यातील विविध व्यक्तींना तसेच विविध संस्थांना शासकीय जमीन कब्जेहक्काने तसेच भाडेपट्ट्याने विविध प्रयोजनांसाठी विविध अटी व शर्तीच्या अधीन राहून शासनाद्वारे प्रदान करण्यात येते. सदर अटी व शर्तीचा भंग झाल्यास निश्चित केलेला नजराणा शासनाकडे भरुन झालेला शर्तभंग नियमानुकूल करणेबाबतचे अधिकार शासन निर्णय, महसूल व वन विभाग दि. २१.११.१९५७ अन्वये जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेले होते.

शासन निर्णय दि.०८.०९.१९८३ अन्वये भोगवटादार वर्ग-२ जमिनीच्या विक्री परवानगीचे/शर्तभंग नियमानुकूल करण्याचे अधिकार विभागीय आयुक्त यांना देण्यात आले होते. परंतु, शासन राजपत्र महसूल व वन विभाग, दिनांक ०३.०३.२०१५ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ३७ नंतर ३७अ(१) व ३७ अ (२) समाविष्ट करण्यात येवून त्यानुसार शासकीय जमिनीचे व नझूल जमिनीचे विक्री, हस्तांतरण इत्यादीबाबत "राज्य शासनाची पूर्वपरवानगी घेण्याच्या अधीन राहून करण्यात येईल" अशी तरतूद केली आहे.

तसेच, शासन अधिसूचना दि. २८ डिसेंबर, २०१५ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ३७(अ) ची पोटकलमे (१) व (२) अन्वये शासकीय अथवा नझूल जमिनीवरील निवासी, वाणिज्यिक किंवा औद्योगिक परिवास्तूच्या विक्री तसेच हस्तांतरणाच्या संबंधित राज्य शासनाची पूर्वपरवानगी घेण्याबाबतचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले.

प्रसंगत: नमूद करण्यात येते की, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ च्या कलम ३७ अ मधील नवीन तरतूदीं नंतर प्रदान केलेल्या शासकीय जमिनींचे विनापरवाना हस्तांतरण, वापरातील बदल व अन्य शर्तभंग नियमानुकूल करण्याच्या अधिकाराबाबत तसेच राज्यात शासनाने भाडेपट्ट्याने अथवा कब्जेहक्काने प्रदान केलेल्या शासकीय जमिनींच्या बाबतीत विना परवाना हस्तांतरण, वापरात बदल, पुर्नविकास, टी.डी.आर, एफ.एस. आय व अन्य स्वरुपाचे शर्तभंग वेळोवेळी आढळून आल्यास असे शर्तभंग नियमानुकूल करण्यास शासन सक्षम प्राधिकारी असल्याने अशा स्वरुपाचे सर्व शर्तभंग

नियमानुकूल करण्याचे प्रस्ताव देखील शासनास सादर करण्याच्या सूचना दि. २४ फेब्रुवारी २०२३ च्या पत्रान्वये विभागीय आयुक्त तसेच जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ३७(अ) मध्ये शासकीय अथवा नझूल जमिनीचे विनापरवानगी झालेले हस्तांतरण/ शर्तभंग नियमानुकूल करण्याचे राज्य शासनाचे अधिकार जिल्हधिकारी यांना हस्तांतरीत करण्याबाबतची सुधारणा प्रस्तावित होती. तथापि, विधी व न्याय विभागाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील क़लम ३७ (अ)(ii) मध्ये शासकीय जमिनीचे अनधिकृत हस्तांतरण/विक्री नियमानुकूल करण्याची तरतूद नसल्यामुळे या तरतुदीअन्वये असे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना प्रत्यायोजित करता येणार नाही, असे अभिप्राय नोंदविले.

तद्नंतर, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४० अन्वये शासनाची मालमत्ता राज्य शासनाला योग्य वाटेल अशा अटी व शर्तीवर विनियोग करण्याचा अधिकार आहे असे नमूद करुन तसेच महाराष्ट्र सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १९०४ (Maharashtra Geneneal Clauses Act १९०४) च्या कलम २१ खालील आपले अधिकार वापरुन अशी उल्लंघन केलेली अट अशा उल्लंघनापुरती वगळून व त्यापोटी काही दंडात्मक रक्कम भरण्याची अट टाकून शासन असे शर्तभंग नियमानुकूल करु शकते, असे नमूद करुन पुनश्च विधी व न्याय विभागास प्रस्ताव सादर केला. तथापि, विधी व न्याय विभागाने काही न्याय निर्णयाचा दाखला देऊन या प्रस्तावास असहमती दर्शविली.

******

**महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक १३८१**

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन**

मा.श्री. रणधीर सावरकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १३८१ खालीलप्रमाणे आहे:-

*"राज्यात राष्ट्रसंत विनोबाजी भावे यांच्या संकल्पनेनुसार महाराष्ट्रात सुमारे १९ गावांमध्ये ग्रामदान अधिनियम १९६४ अंतर्गत ग्राममंडळाची स्थापना होणे, ग्राममंडळाच्या प्रचलित अधिनियमानुसार या गावांतील शेतकर्यांच्या जमिनीला वर्ग-२ दर्जा दिला गेला मुळे शासनाच्या प्रचलित योजनांच्या सवलती/फायदा घेण्यात अडचणी येणे, शेतीला अकृषक करण्याची परवानगी न मिळणे, ॲग्री स्टॅक मध्ये नोंदणी न होणे, ई पिके, पिक विमा, पिक कर्ज, गहाण कर्ज, पिकविमा, आदि प्रकरणांमध्ये अडचणी येणे,राष्ट्रीयकृत बँकांतुन शेती कर्ज नाकारण्यात येणे, शेतीवर वाणिज्य विषयक व्यवसाय सुरु करण्यास बाधा येणे, सदर ग्रामदान अधिनियम १९६४ चा कायदा रद्द करुन या ग्राममंडळांचे प्रचिलित ग्रामपंचायत कायद्यात विलिनीकरण करण्याची ग्राममंडळांची मागणी असणे, या संदर्भाने शासन निर्णय क्र.जमीन-२०१६/प्र.क्र.१००/ज-१ दि.२३ मार्च २०१६ अन्वये गठित अभ्यास समितीचा अहवाल शासनास अद्याप सादर न होणे, मा. महसूलमंत्री यांनी संबंधिताची बैठक घेऊन सुध्दा अद्याप कोणतीही कार्यवाही न होणे, यावर शासनाची भुमिका व करावयाची कार्यवाही."*

---

**<u>मा.श्री.चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री (महसूल) यांचे निवेदन</u>**

आचार्य विनोबा भावे यांनी या देशामध्ये भूदानाची चळवळ सुरु केली. भूदानात मिळालेली जमीन भूमीहीनांना वाटून संपूर्ण गावाची सर्व प्रकारची शक्ती एकवटून ग्रामविकासाच्या कार्याला लागावे या उदात्त हेतूने भूदानाचे पुढचे पाऊल ग्रामदान मोहिमेच्या रुपाने सन १९६० पासून सुरु झाले. या ग्रामदान चळवळीला कायदेशीर स्वरुप देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम, १९६४" हा कायदा पारीत केला आहे. या कायद्याचा मुख्य उद्देश जमिनीची असमान वाटणी कमी करून समाजात आर्थिक आणि सामाजिक समानता आणणे हा होता. तसेच, भूमिहीनांना जमीन उपलब्ध करून देणे, गावाचा सामूहिक विकास घडवून आणणे, गावामध्ये स्वयंशासनाची भावना रुजवणे, ग्रामीण भागातील लोकांना एकत्र आणून त्यांना स्वयंनिर्भर बनवणे आणि बाहेरील मदतीवर अवलंबून न राहता स्वतःच्या समस्या सोडवण्यास सक्षम करणे हा विचार होता. सदर कायद्यानुसार राज्यातील ९ जिल्ह्यामधील एकूण २० गावांमध्ये ग्रामदान मंडळ स्थापन करण्यात आले आहे.

"महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम, १९६४" च्या कलम ४ नुसार एखादे गाव ग्रामदान गाव अधिसूचनेव्दारे ग्रामदान गाव म्हणून घोषित करता येते. त्याकरीता सदर कायद्याच्या कलम ५ नुसार संबंधीत गावातील जमीन मालकांना आपली जमीन ग्राममंडळास स्वेच्छेने दान करत असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांकडे विहित नमुन्यात प्रतिज्ञापन दाखल करणे आवश्यक आहे. सदर कायद्याच्या कलम ४ नुसार एखादे गाव ग्रामदान गाव म्हणून घोषित करण्यासाठी कलम ५ अन्वये दाखल केलेली प्रतिज्ञापने कायम करण्यात आलेली असतील अशा जमीनीचे क्षेत्र गावातील एकूण जमिनीच्या (राहिवाशी लोकांच्या मालकीची) ६०% पेक्षा कमी नसावे. तसेच जमीन मालकांची संख्या (अज्ञान व्यक्ती वगळून) गावातील एकूण जमीन मालकांपैकी किमान ७५% असणे आवश्यक आहे.

"महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम, १९६४" च्या कलम ५ नुसार ग्रामदानाच्या रुपाने ग्राम मंडळास दान दिलेल्या जमीनी, ग्रामदान मंडळाकडून सदर अधिनियमाच्या कलम २५ आणि २६ नुसार भूमिहीन इसमांना तसेच त्यांच्या पूर्वीच्या मालकांना कलम २७ मधील नमूद पट्ट्याच्या अटी व शर्तीवर वाटप करण्यात येते.

"महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम, १९६४" या अधिनियमांतर्गत ग्रामदान मंडळ स्थापन करण्यात आलेल्या गावांमधील जमिनी या भोगवटादार वर्ग-१ व वर्ग-२ स्वरुपाच्या आहेत. सदर जमिनीच्या अकृषक प्रयोजनाकरीता सक्षम प्राधिकारी यांची परवानगी आवश्यक आहे. सदर शेतकऱ्यांना पिक कर्ज, नैसर्गिक नुकसान भरपाई, शासकीय अनुदान इ. विविध शासकीय योजनांना लाभ मिळत असल्याचे दिसून येत आहे. तथापि, अमरावती व कोंकण विभागात काही ठिकाणी अशा योजनांचा लाभ मिळण्यास अडचणी येत असल्याचे अंशतः खरे आहे.

राज्यातील "महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम, १९६४" आणि "मध्य प्रदेश भूदान यज्ञ अधिनियम, १९५३" अधिनियमांतर्गत जमिनींच्या संदर्भात शासनाची भूमिका ठरविण्याकरीता याबाबत सर्वंकष अभ्यास करुन शासनास योग्य शिफारसी करण्याकरीता शासन निर्णय क्र.जमीन-२०१६/प्र.क्र.१००/ज-१, दिनांक २३ मार्च, २०१६ अन्वये प्रधान सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीस सहाय्य करण्याकरीता दिनांक ३०.०५.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये, विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या उप समितीने दिनांक २४.०२.२०२३ रोजी शासनास अहवाल सादर केला आहे. सदर अहवाल हा मध्य प्रदेश भूदान यज्ञ अधिनियम-१९५३ अंतर्गत येणाऱ्या विदर्भ क्षेत्रासाठीच मर्यादित असल्याचे दिसून आले आहे. सदर बाब विचारात घेवून विदर्भ क्षेत्र वगळता राज्याच्या उर्वरित विभाग- कोकण, पुणे, नाशिक व छत्रपती संभाजी नगर या क्षेत्रासाठी लागू असलेल्या तरतुदींचा अभ्यास करुन प्रधान सचिव /अ.मु.स. यांच्या अध्यक्षतेखालील नेमलेल्या समितीस अहवाल सादर करण्यासाठी शासन पत्र दिनांक ११.१२.२०२४ अन्वये विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली उप समिती गठीत करण्यात आली असून सदर उप समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे. तरी सदर प्रकरणी मूळ अभ्यास समितीचा अंतिम अहवाल शासनास प्राप्त झाल्यावर सदर अहवालातील शिफारशीनुसार योग्य निर्णय घेण्याबाबतची शासनाची भूमिका आहे.

*********

लक्षवेधी सूचना क्रमांक :- २३५४

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन

श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांची महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे :-

"जि. रायगड ता. पनवेल येथील तहसिलदाराने पदाचा दुरुपयोग करुन महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२-ब अंतर्गत कायद्याचे उल्लंघन करुन व अधिकारात नसतानाही मौजे. वारदोली, पोयंजे, भिंगारवाडी, भिंगार, पाली बुद्रुक, भेरले, ता. पनवेल येथील सुमारे ११५ एकर एवढया क्षेत्राची जमिन बिनशेती सनद तयार करुन देण्याचे नुकतेच निर्दशनास येणे, सदरच्या जमिनी मुळ अर्ज मालकांने कुळ कायदा कलम-६३ च्या परवानगीने खरेदी केलेले असणे. सदरच्या जमिनी करुन १५ वर्षाचा कार्यकाळ लोटूनही तीचा बिनशेती वापर न झाल्याने या जमिनी शासन जमा होण्यास पात्र असतानांही पनवेलच्या तहसीलदारांने खाजगी कंपनीस अर्थिक फायदा पोहोचविण्याच्या दृष्टीने उपरोक्त जमिनीची बिनशेती परवानगी देण्यात आल्याचा आश्चर्यजनक प्रकार, बिनशेती सनद निर्गमित करताना विकास प्राधिकरणाचे झोनल सर्टिफिकेट संचिकेत दाखल करणे, आवश्यक असतानाही दाखल न करण्यात येणे, तसेच सदर जमिन माथेरान इको सेंसेटीव्ह झोनमध्ये येत असतानांही सनियत्रंण समितीची पूर्वपरवानगी न घेता सनद निर्गमित करण्यात येणे, सदरहू प्रकरणात तहसिलदारांने शासनाचे महसूलाचे मोठ्या प्रमाणात अर्थिक नुकसान करुन कंपनी व्यवस्थापना बरोबर संगनमत करुन अर्थिक गैरव्यवहार करण्यात येणे, सदर प्रकरणाची चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

### श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मे.मेरेथॉन पनवेल इन्फास्ट्रक्चर प्रा.लि. यांनी महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ६३ एक-अ नुसार ख-या खु-या औद्योगिक प्रयोजनासाठी सन २००७ मध्ये विकास आयुक्त(उद्योग) यांची परवानगी घेऊन पनवेल तालुक्यातील मौजे वारदोली येथील स. नं. १०/६/अ व इतर क्षेत्र १.९८.१० हे.आर. मौजे पोयंजे येथील स. नं. १०३/८ व इतर क्षेत्र १७.९७.५० हे.आर., मौजे भिंगारवाडी येथील स.नं. ९०/० क्षेत्र ०.४२.२० हे.आर, मौजे भिंगार येथील स. नं. ११७/१/ब व इतर क्षेत्र १.१८.४५ हे.आर, मौजे पाली बुद्रुक येथील स.नं १०० व इतर क्षेत्र २३.११.१० हे.आर. व मौजे भेरले येथील १५४/४ व इतर क्षेत्र ०.७६.४० हे. आर असे एकूण ४५.४३.७५ हे.आर. खरेदी केलेल्या आहेत.

मे.मेरेथॉन पनवेल इन्फास्ट्रक्चर प्रा.लि. यांनी खरेदी केलेल्या जमीन मिळकतीस महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ६३ एक-अ मधील तरतूदी लागू होतात. महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन कायदे (सुधारणा) अधिनियम, २००४ मधील सुधारित तरतुदीनुसार "खरेदी केलेल्या जमीन खरेदी दिनांकापासून पंधरा वर्षाच्या कालावधीत औद्योगिक प्रयोजनार्थ वापरात आणने आवश्यक आहे.अन्यथा अशी जमीन ज्या व्यक्तीकडून मूलतः खरेदी केली होती त्या व्यक्तीस ती जमीन ज्या किंमतीस त्याने विक्री केली होती, त्याच किंमतीवर पुनर्खरेदी करण्याचा हक्क आहे.

लक्षवेधी सूचना क्रमांक :- २३५४

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन

श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांची महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे :-

"जि. रायगड ता. पनवेल येथील तहसिलदाराने पदाचा दुरुपयोग करुन महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२-ब अंतर्गत कायद्याचे उल्लंघन करुन व अधिकारात नसतानाही मौजे. वारदोली, पोयंजे, भिंगारवाडी, भिंगार, पाली बुद्रुक, भेरले, ता. पनवेल येथील सुमारे ११५ एकर एवढया क्षेत्राची जमिन बिनशेती सनद तयार करुन देण्याचे नुकतेच निर्दशनास येणे, सदरच्या जमिनी मुळ अर्ज मालकांने कुळ कायदा कलम-६३ च्या परवानगीने खरेदी केलेले असणे. सदरच्या जमिनी करुन १५ वर्षाचा कार्यकाळ लोटूनही तीचा बिनशेती वापर न झाल्याने या जमिनी शासन जमा होण्यास पात्र असतानांही पनवेलच्या तहसीलदारांने खाजगी कंपनीस अर्थिक फायदा पोहोचविण्याच्या दृष्टीने उपरोक्त जमिनीची बिनशेती परवानगी देण्यात आल्याचा आश्चर्यजनक प्रकार, बिनशेती सनद निर्गमित करताना विकास प्राधिकरणाचे झोनल सर्टिफिकेट संचिकेत दाखल करणे, आवश्यक असतानाही दाखल न करण्यात येणे, तसेच सदर जमिन माथेरान इको सेंसेटीव्ह झोनमध्ये येत असतानांही सनियत्रंण समितीची पूर्वपरवानगी न घेता सनद निर्गमित करण्यात येणे, सदरहू प्रकरणात तहसिलदारांने शासनाचे महसूलाचे मोठ्या प्रमाणात अर्थिक नुकसान करुन कंपनी व्यवस्थापना बरोबर संगनमत करुन अर्थिक गैरव्यवहार करण्यात येणे, सदर प्रकरणाची चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

### श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मे.मेरेथॉन पनवेल इन्फास्ट्रक्चर प्रा.लि. यांनी महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ६३ एक-अ नुसार ख-या खु-या औद्योगिक प्रयोजनासाठी सन २००७ मध्ये विकास आयुक्त(उद्योग) यांची परवानगी घेऊन पनवेल तालुक्यातील मौजे वारदोली येथील स. नं. १०/६/अ व इतर क्षेत्र १.९८.१० हे.आर. मौजे पोयंजे येथील स. नं. १०३/८ व इतर क्षेत्र १७.९७.५० हे.आर., मौजे भिंगारवाडी येथील स.नं. ९०/० क्षेत्र ०.४२.२० हे.आर, मौजे भिंगार येथील स. नं. ११७/१/ब व इतर क्षेत्र १.१८.४५ हे.आर, मौजे पाली बुद्रुक येथील स.नं १०० व इतर क्षेत्र २३.११.१० हे.आर. व मौजे भेरले येथील १५४/४ व इतर क्षेत्र ०.७६.४० हे. आर असे एकूण ४५.४३.७५ हे.आर. खरेदी केलेल्या आहेत.

मे.मेरेथॉन पनवेल इन्फास्ट्रक्चर प्रा.लि. यांनी खरेदी केलेल्या जमीन मिळकतीस महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ६३ एक-अ मधील तरतूदी लागू होतात. महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन कायदे (सुधारणा) अधिनियम, २००४ मधील सुधारित तरतुदीनुसार "खरेदी केलेल्या जमीन खरेदी दिनांकापासून पंधरा वर्षाच्या कालावधीत औद्योगिक प्रयोजनार्थ वापरात आणने आवश्यक आहे.अन्यथा अशी जमीन ज्या व्यक्तीकडून मूलतः खरेदी केली होती त्या व्यक्तीस ती जमीन ज्या किंमतीस त्याने विक्री केली होती, त्याच किंमतीवर पुनर्खरेदी करण्याचा हक्क आहे.

तथापि, मे.मेरेथॉन पनवेल इन्फास्ट्रक्चर प्रा.लि. या कंपनीने त्यांनी खरेदी केलेल्या जमिनींना अकृषक सनद मिळणेबाबत केलेल्या विनंती अर्जाच्या अनुषंगाने तहसिलदार, पनवेल यांनी मौजे वारदोली, पोयंजे, भिंगारवाडी, भिंगार, पाली बुद्रुक व भेरले येथील उक्त नमूद जमीन मिळकतींना दिनांक ०२/०२/२०२४ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ चे कलम ४२ ब अंतर्गत रुपांतरीत कर भरुन घेऊन अकृषिक प्रयोजनासाठी सनद दिलेली आहे.

मुळात प्रश्नाधीन जमिनी या महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ६३ एक-अ मधील तरतूदीन्वये ख-या खु-या औद्योगिक प्रयोजनासाठी सन २००७ मध्ये खरेदी केल्या होत्या,त्यामुळे सदर जमिनींवर कलम ६३ एक-अ मधील तरतूदीन्वये कार्यवाही करणे अपेक्षित असताना, तहसिलदार, पनवेल यांनी सदर बाबीकडे जाणीवपूर्वक अक्षम्य दुर्लक्ष करुन सदर जमिनींना अकृषिक सनद दिलेली आहे.तसेच, सदर सनद निर्गमित करताना नियोजन प्राधिकरणाकडील झोन दाखले देखील घेण्यात आल्याचे दिसून येत नाही.त्यामुळे तहसिलदार,पनवेल यांच्या विरुद्ध शिस्तभंग विषयक कारवाई करणेबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांना कळविण्यात येईल.

तसेच, तहसिलदार, पनवेल यांनी दिलेल्या अशा सर्व अकृषिक सनद आदेश पुन:निरीक्षणात घेऊन ते रद्द करणेबाबत उपविभागीय अधिकारी, पनवेल यांना तात्काळ कळविण्यात येईल.

********

लक्षवेधी सूचना क्र.१९६४

महाराष्ट्र विधानसभा, सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री.विजय वडेट्टीवार, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१९६४ पुढीलप्रमाणे आहे:-

"नागपूर जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अन्न व नागरी पुरवठा विभाग मार्फत देण्यात आलेले अन्नधान्य वाहतुकीचे कॉन्ट्रॅक्ट नियम बाहेर व शासन निर्णयानुसार होत नसल्याने सदर गणेश करिअर या संस्थेचे जीपीएस, अधिग्रण रक्कम, त्याला देण्यात आलेले देयके या सर्वांची सन २००३ पासून ते आतापर्यंत चौकशी करण्यात यावी अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी नागपूर व जिल्हा पुरवठा अधिकारी नागपूर यांच्याकडे माहे जून २०२५ मध्ये केली असणे, या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने या संस्थेची कोणत्या प्रकारची चौकशी केली नसणे, जिल्हा पुरवठा अधिकारी नागपूर व उप आयुक्त पुरवठा विभाग यांचे संबंधित संस्थेचे संबंधित यांची आर्थिक व्यवहार व मोबाईल सीडीआर तपासणीची मागणी सुद्धा करण्यात येत असणे, सदर वाहतूकदार ठेकेदार हा प्रामुख्याने गोंदिया व भंडारा येथील तांदूळ मोठ्या प्रमाणात वर्टी जिल्हा भंडारा येथे असल्याची बाब समोर येणे, सदर ठेकेदारा तातडीने काळया यादी टाकून फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्याची नितांत आवश्यकता यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाय योजना"

---

मा.मंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग) यांचे निवेदन

लक्ष्यनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत नागपूर जिल्ह्यातील अन्नधान्य वाहतूक करण्याकरिता मे.गणेश कॅरिअर्स, नागपूर यांची वाहतूकदार म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर नियुक्ती ही प्रचलित शासन निर्णयातील तरतूदी तसेच निविदा कागदपत्रांतील अटी व शर्तीनुसार निविदा प्रक्रीया राबवून करण्यात आली आहे.

२. नागपूर जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अन्न व नागरी पुरवठा विभाग मार्फत देण्यात आलेले अन्नधान्य वाहतुकीचे कॉन्ट्रॅक्ट नियम बाहेर व शासन निर्णयानुसार होत नसल्याने सदर मे.गणेश कॅरिअर्स, नागपूर या संस्थेचे जीपीएस, अधिग्रण रक्कम, त्याला देण्यात आलेले देयके या सर्वांची सन २००३ पासून ते आतापर्यंत चौकशी करण्यात यावी, अशा मागणीचे पत्र जिल्हाधिकारी, नागपूर तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी, नागपूर यांच्या कार्यालयास प्राप्त झालेले नाही. त्यामुळे संबंधितांकडून प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्यात आलेली नाही.

३. सदर लक्षवेधी सूचनेमध्ये नमूद, सदर वाहतूक ठेकेदार हा प्रामुख्याने गोंदिया व भंडारा येथील तांदूळ मोठ्या प्रमाणात वरठी जिल्हा भंडारा येथे असल्याबाबतची तक्रार प्राप्त झालेली नाही. सबब, ही बाब वस्तूस्थितीस धरून नाही. नागपूर जिल्ह्याकरीता सीएमआर तांदुळ वाहतूक या नियमाप्रमाणेच करण्यात आली आहे. त्यानुसार बाह्यजिल्ह्यातून संपूर्ण तांदळाची उचल, पोच व वाटप पूर्ण झालेले असून याबाबत कोणत्याही स्थानिक इ. लोकप्रतिनिधी यांची कुठलीही तक्रार प्राप्त झालेली नाही, असे क्षेत्रीय कार्यालयाने कळविले आहे.

४. आणखी असेही नमूद करण्यात येते की, महालेखापाल, मुंबई यांचेतर्फे माहे एप्रिल, २०२५ मध्ये जिल्हा पुरवठा अधिकारी, नागपूर कार्यालयाचे लेखा परीक्षण पूर्ण करण्यात आलेले असून सदर लेखा परीक्षण अहवालात वाहतूक कंत्राटाबाबत कसलीही अनियमितता असल्याबाबत कुठलाही आक्षेप उपस्थित केलेला नाही.

*********

लक्षवेधी सूचना क्र.२४१८

महाराष्ट्र विधानसभा, सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

डॉ.किरण लहामटे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.२४१८ पुढीलप्रमाणे आहे:-

"अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले या तालुक्यातील आदिवासीबहुल खेतेवाडी, मोरवाडी गावातील नागरीकांसाठी दि.७/०७/२०२५ रोजी दोन माल ट्रकमधून वाहतूक करुन रेशन दुकानात धान्य नेण्यात येत असणे, त्यापैकी धान्याचा एक ट्रक विनापरवाना अकोले विकास सेवा सोसायटीच्या गोदामात ऐनवेळी खाली करण्यात येणे, महसूल व पुरवठा विभागासह वाहतूक ठेकेदाराकडून ७०.४० क्विंटल तांदळाचा दिवसाढवळ्या काळाबाजार होत असल्याचे निदर्शनास आलेले असणे, त्याबाबत अकोले विकास सेवा सोसायटीच्या गोदामात खाली करतांना रंगेहात पकडण्यात येणे, धान्य गोदामपालाच्या सहीचा रितसर परवाना आढळला नसल्याचे व सदरचे धान्य हे मार्च महिन्याचे असून सोसायटीच्या गोदामात ते माहे जुलै, २०२५ मध्ये आणल्याचे निदर्शनास आलेले असणे, यादरम्यान याची खबर तहसिल कार्यालयात मिळताच पुरवठा निरीक्षक व पोलिसानी घटनास्थळी जाऊन त्यांनी नेमका काय प्रकार घडला आहे याबाबत चौकशी करुन सांगतो असे सांगण्यात येणे, तथापि धान्याचा पंचनामा करुन तो जप्त करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते संदीप शेणकट व अन्य कार्यकर्ते यांचेकडून करण्यात येणे, त्यावर पुरवठा निरीक्षक यांनी पंचनामा करुन धान्य सोसायटीतील गोदामात उतरवले याबाबत सविस्तर चौकशी करुन दोषींवर कडक कारवाई करण्यात येईल असे पुरवठा निरिक्षक यांचेकडून सांगण्यात येणे, परंतु अद्याप कारवाई झालेली नसणे, परिणामी याबाबत चौकशी करुन याबाबत संबंधित तहसिलदार, पुरवठाधारक व पुरवठा विभागातील संबंधित यांचेविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका."

---

मा.मंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग) यांचे निवेदन

अहिल्यानगर जिल्ह्यामधील अकोले तालुक्यातील खेलेवाडी, मोरवाडी व सातेवाडी येथील स्वस्त धान्य दुकानात धान्य पोहोच करण्यासाठी दि.०७.०७.२०२५ रोजी शासकीय गोदामातून गाड्या भरण्यात आल्या होत्या.

२. त्यापैकी MH १७ BD १०० हा ट्रक अकोले विकास सेवा सोसायटीच्या स्वस्त धान्य दुकानात उतरवत असल्याची माहिती मिळताच पुरवठा निरिक्षण अधिकारी, तहसील कार्यालय, अकोले यांनी सदर ठिकाणी भेट देऊन पंचनामा केला. त्यानुसार सदर ट्रक चालकाकडे परमीट असणे अपेक्षित असताना त्यांच्याकडे केवळ ट्रान्सपोर्ट पास असल्याचे दिसून आले. तसेच सदर ट्रकमध्ये एकूण ७०.२५ क्विंटल वजनाच्या १४० तांदुळ गोण्यांपैकी १६ तांदळाच्या गोण्या अकोले विकास सेवा सोसायटीच्या स्वस्त धान्य दुकानात उतरवल्याचे निदर्शनास आले. तसेच उर्वरित १२४ तांदळाच्या गोण्या या ट्रकमध्ये आढळून आल्या.

३. याप्रकरणी तहसिलदार, अकोले यांच्यामार्फत संबंधित गोदामपाल, गाडीचालक आणि अकोले विकास सेवा सोसायटीचे सेल्समन यांना नोटीस देण्यात आली होती. त्यावर संबंधितांकडून समाधानकारक खुलासा प्राप्त न झाल्याने, गाडीचालक आणि अकोले विकास

सेवा सोसायटीचे सेल्समन यांच्यावर अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ च्या कलम ३ व ७ अन्वये पोलिस स्टेशन, अकोले येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच गोदामपाल यांच्या पदाचा कार्यभार तात्काळ काढून घेतला असून सदरच्या अनियमिततेबाबत त्यांच्याविरूद्ध विभागीय चौकशी प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे. त्याचप्रमाणे संबंधित धान्य वाहतूक कंत्राटदार यांनाही सदर प्रकरणी नोटीस बजावण्यात आलेली आहे.

४. प्रस्तुत प्रकरणी संबंधित जबाबदार व्यक्तींविरोधात तात्काळ कारवाई करण्यात आलेली आहे.

*********

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे (पावसाळी) अधिवेशन
लक्षवेधी सूचना क्रमांक ३९०

श्री. आमश्या पाडवी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील -

---

"नंदुरबार येथे शंभर विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे वैद्यकीय महाविद्यालय सुरु असणे, व त्यास संलग्नित काय करायचं म्हणावं ५०० मीटर खाटांचे रुग्णालय सुरु करण्यात येणे, नंदुरबार जिल्हा हा आदिवासी बहुल जिल्हा असून त्याचा भौगोलिक विस्तार मोठा असणे, या वैद्यकीय महाविद्यालयाच्या स्थापनेने दुर्गम भागातील आदिवासी जनतेला वैद्यकीय सुविधा मिळणे सुकर व सोयीचे होईल ही अपेक्षा सर्वसामान्यांची असणे, परंतु वैद्यकीय महाविद्यालय कार्यान्वित होऊन पाच वर्षाचा कालावधी लोटणे, तरीदेखील वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा रुग्णालय मंजूर पदाप्रमाणे पदे भरण्यात आलेली नसणे, त्यामुळे सामान्य जनतेस वैद्यकीय सुविधा पासून वंचित राहावे लागत असणे, एकूण ४९६ मंजूर पदापैकी केवळ ६१ पदे भरणे, व तब्बल ४०० पदे रिक्त ठेवणे, नंदुरबार जिल्हयात माता मृत्यू उपोषण सिकलसेल अपघाताच्या प्रमाणात वाढ झालेली असणे, यासारखे अनेक आरोग्याचे गंभीर प्रश्न निर्माण होणे, म्हणून नंदुरबार जिल्हयातील सर्व जनतेला आरोग्याच्या दर्जेदार व तत्पर सेवा मिळण्यासाठी तातडीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय जिल्हा रुग्णालय जिल्हयातील सर्व ग्रामीण रुग्णालयातील मंजूर रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावी यावर शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

---

मा.मंत्री (वै.शि.) यांचे निवेदन

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय, नंदुरबार येथील मंजूर, भरलेली व रिक्त पदांची पदस्थिती खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | संवर्ग | मंजूर | भरलेली | रिक्त |
|---|---|---|---|---|
| १ | वर्ग-१ | ४५ | २५ | २० |
| २ | वर्ग-२ | ४८ | ४० | ८ |
| ३ | वर्ग-३ तांत्रिक/ अतांत्रिक | १५९ | ६३ | ९६ |
| | परिचर्या | ४२५ | ५६ | ३६९ |
| ४ | एकूण | ६७७ | १८४ | ४९३ |
| ५ | वर्ग-४ | वर्ग-४ ची सर्व पदे बाह्यस्त्रोतामार्फत भरण्यात येतात | | |

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या अधिनस्त प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहायक प्राध्यापक संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविण्यात आली होतीसहयोगी प्राध्यापक व ,त्या अनुषंगाने आयोगाने प्राध्यापक . ४७ सहायक प्राध्यापक संवर्गातील अनुक्रमे, तसेच .पदांकरीता जाहिराती प्रसिद्ध केल्या आहेत ७९२ व १९१ सहयोगी प्राध्यापकव प्राध्यापक संवर्गातील पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु

आहे .शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पदे नियमीत रित्या भरेपर्यंत या संस्थामध्ये करार तत्वावर अध्यापकांची नियुक्ती ३६४ दिवसाकरीता संचालनालय स्तरावरुन करण्यात येत आहे .

त्याच प्रमाणे गट-ब या संवर्गातील सहायक प्राध्यापक व वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे तात्पुरत्या नियुक्तीने विभागीय निवड मंडळामार्फत भरण्याबाबत संस्थाप्रमुखांना अधिकार देण्यांत आलेले आहेत. त्यानुसार संस्थास्तरावरुन विभागीय निवड मंडळामार्फत ३६४ दिवसांकरीता सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरण्यांत येतात.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील गट क तांत्रिकपरीचर्या संवर्गातील सरळसेवेची /अतांत्रिक/ .मध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती २०२३ पदांकरीता सन ५१८२ रिक्त पदे भरण्याकरीता एकूण ४९०२ सदर भरती प्रक्रिया प्रक्रियेमध्ये एकूणपदे भरती करण्यात आली आहेमध्ये २०२५ सन . अतांत्रिक सरळसेवेची पदे भरण्यासंदर्भात एकूण/संचालनालयाच्या अधिनस्त संस्थामध्ये गट क तांत्रिक .पदांकरीता जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली ११०७

गट क अतांत्रिक संवर्गातील कार्यालयीन अधिक्षक, वरिष्ठ सहाय्यक, वरिष्ठ लिपीक ही पदे पदोन्नतीने भरण्यात येतात. तसेच कनिष्ठ लिपीक, उच्चश्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक, लघुटंकलेखक ही पदे सरळसेवेने व पदोन्नतीने भरण्यात येतात. दि.१७.०४.२०२५ नुसार एकूण ६२ कर्मचाऱ्यांना कार्यालयीन अधिक्षक या पदावर पदोन्नती देण्यात आलेली असून वरिष्ठ सहाय्यक व वरिष्ठ लिपीक या पदावर पदोन्नतीकरिता कार्यवाही सुरु आहे.

गट ड संवर्गातील सर्व पदे बाहयस्रोतामार्फत भरण्यात येतात. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय, नंदुरबार येथे बाह्यस्रोत कंत्राटी वर्ग-३ साठी २३८ व वर्ग-४ साठी ३०६ पदे मंजूर असून सदर पदे पुरविण्यासाठी मे.स्मार्ट सर्विसेस, पुणे यांना पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार ८० ते ९० टक्के पदे भरलेली आहेत.

सद्यस्थितीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नंदुरबार कार्यान्वित झाल्यापासून माता मृत्युचे दर कमी झालेले असून जोखमीची प्रसूती देखील केली जाते. कुपोषण व सिकलसेल पिढीत रुग्णांना योग्य उपचार दिले जातात व अपघातग्रस्त रुग्णांना देखील योग्य उपचार दिले जातात. सध्या १०० विद्यार्थी क्षमतेचे महाविद्यालय व ५०० खाटांचे रुग्णालयाचे बांधकास सुरु असून पुढील २ वर्षात बांधकाम पूर्ण होणे अपेक्षित आहे.

*******************

लक्षवेधी सूचना क्र.२३७३

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री.सुनिल कांबळे, श्री.अतुल भातखळकर मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२३७३ पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यात विविध अभ्यासक्रमांसाठी घेतल्या जाणाऱ्या सीईटी परीक्षा ऑनलाईन असूनही निकाल व प्रवेश प्रक्रियेत अनावश्यक विलंब होत असणे, यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असणे, विशेषत: यावर्षी दहावी-बारावीचे निकाल मे महिन्यात लागूनही जुलैमध्येही अनेक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू झालेली नसणे, खाजगी विद्यापीठे शासनाच्या सीईटीपूर्वी स्वतःच्या परीक्षा घेतात, त्यासाठी अवाजवी शुल्क आकारतात, व प्रवेश प्रक्रियाही लवकर पूर्ण करतात. या प्रवेश प्रक्रियेवर कोणतेही शासकीय नियंत्रण नसणे, त्यामुळे सामान्य विद्यार्थ्यांवर आर्थिक व मानसिक ताण निर्माण होणे, एकाच विद्यार्थ्याला वेगवेगळ्या विद्यापीठांच्या अनेक सीईटी द्याव्या लागतात, ही व्यवस्था अन्यायकारक असणे. सीईटी सेल, शिक्षण विभाग, विद्यापीठे व परीक्षा केंद्र यांच्यात समन्वयाचा अभाव असणे, सीईटी सेलची वेबसाईट वारंवार क्रॅश होते, तांत्रिक अडचणी निर्माण होतात, एजन्सी वारंवार बदलल्या जातात - परिणामी विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागतो त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रमुख मागण्या आहेत. निकाल व प्रवेशप्रक्रिया वेळेत पूर्ण करावी, सर्व विद्यापीठांसाठी एकसंध प्रवेश वेळापत्रक ठरवावे, खाजगी विद्यापीठांच्या सीईटी व शुल्कावर नियंत्रण ठेवावे, परीक्षा व प्रवेश प्रक्रियेतील यंत्रणांमध्ये समन्वय साधावा, सीईटी सेलची वेबसाईट व तांत्रिक व्यवस्था सक्षम करावी. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व त्यावरील शासनाची प्रतिक्रिया."

---

मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे निवेदन

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षामार्फत विविध पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या १८ प्रवेश परीक्षा दि.१९.०३.२०२५ ते दि.०५.०५.२०२५ या कालावधीत घेण्यात आल्या आहेत. या प्रवेश परीक्षांकरिता एकूण १३,६४,८३८ विद्यार्थ्यांनी अर्ज केला होता व त्यापैकी १२,१२,७९२ विद्यार्थी प्रत्यक्ष परीक्षेकरिता उपस्थित राहिले होते. या सर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांचे निकाल दि.०८.०५.२०२५ ते दि.२०.०६.२०२५ या कालावधीत घोषित करण्यात आले आहेत.

सदर १८ प्रवेश परीक्षांचा निकाल जाहीर करीत असताना संकेतस्थळ क्रॅश होणार नाही, याची सीईटी कक्षाकडून पुर्णपणे दक्षता घेण्यात आली होती. सीईटीचे संकेतस्थळ कार्यक्षमतेने सुरु असल्याने, प्रवेश परीक्षा तसेच परीक्षांचे निकाल नियोजित वेळेत जाहीर करण्यात आले आहेत.

यावर्षीची प्रवेश प्रक्रिया व काही अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या नियमांमध्ये केंद्रीय शिखर संस्था व राज्य शासनाकडून अंशत: बदल करण्यात आल्यामुळे, सीईटी कक्षाच्या प्रवेशासाठीच्या संगणकीय

प्रणालीमध्ये बदल करण्यात आला. असे असले तरी, गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी प्रवेश प्रक्रिया १७ दिवस आधी सुरु करण्यात आली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता सीईटी कक्षामार्फत एकूण ७३ अभ्यासक्रमांकरीता प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत असून, त्यापैकी ५० अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया ह्या माहे जून, २०२५ च्या अंतिम आठवड्यापासून सुरु झालेल्या आहेत. उर्वरीत २३ अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया अद्याप सुरु झालेली नाही.

सदर २३ पैकी १५ अभ्यासक्रम हे वैद्यकीय / आयुष विभागाचे आहेत. सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश हे केंद्रीय शिखर परिषदेकडून प्रसिध्द केलेल्या वेळापत्रकानुसार करण्यात येत असल्यामुळे, सदर वेळापत्रक प्रसिद्ध झाल्यानंतर त्याप्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे एम.फार्मसी अभ्यासक्रमासाठी आवश्यक असलेला निकाल केंद्रीय शिखर परिषदेकडून अप्राप्त असल्याने, सदर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया अद्याप सुरु करण्यात आलेली नाही.

तसेच उपरोक्त २३ पैकी उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या व वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अनुक्रमे ३ व ४ अशा एकूण ७ अभ्यासक्रमांसाठीच्या प्रवेश परीक्षा झालेल्या नसल्यामुळे, सदर ७ अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया अद्याप प्रलंबित आहे. या विविध कारणांमुळे सीईटी कक्षामार्फत एकूण ७३ अभ्यासक्रमांकरीता राबविण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रियेपैकी २३ अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया अद्याप सुरु झालेली नाही.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत घेण्यात येणाऱ्या विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया विहित वेळेत पूर्ण करण्याची दक्षता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून घेण्यात येत आहे.

राज्यात खाजगी विद्यापीठांची स्थापना महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ मधील तरतूदीन्वये होते. खाजगी विद्यापीठांना शासनाकडून कोणतेही अनुदान प्राप्त होत नाही. सदर अधिनियमाच्या कलम ४४ नुसार खाजगी विद्यापीठांना त्यांच्या परीक्षांचे वेळापत्रक निश्चितीचे अधिकार आहेत. तसेच, कलम ४१ नुसार खाजगी विद्यापीठांतील प्रवेश गुणवत्तेच्या आधारावर देण्यात येतात. त्यासाठी खाजगी विद्यापीठांच्या संघाने किंवा राज्यातील कोणत्याही अभिकरणाने राज्यस्तरावर घेतलेल्या प्रवेश चाचणीतील गुणांच्या आधारे प्रवेश देण्याचे अधिकार खाजगी विद्यापीठास आहेत.

*****

लक्षवेधी सूचना क्रमांक :- २२३

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. सुधीर मुनगंटीवार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २२३ पुढीलप्रमाणे आहे :-

"चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही तालुक्यातील जाटलापूर मोठा येथील एका इसमाला दोन हत्तीनी सोंडेने आपटून जागीच ठार केल्याची घटना दिनांक १५ जून २०२५ रोजी घडणे, या घटनमुळे परिसरातील नागरिकांमध्ये निर्माण झालेले भितीचे वातावरण, मागील काही दिवसांपासून गडचिरोली जिल्ह्यातील दोन हत्ती चंद्रपूर जिल्ह्यातील सावली तालुका, त्यानंतर सिंदेवाही तालुक्यात फिरत असणे,. या हत्तींमुळे शेतकऱ्यांचेही मोठया प्रमाणावर नुकसान होणे, वन विभागाचे याकडे अक्षम्य दुर्लक्ष होणे, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, काही हत्ती ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात आढळून येणे, सदर हत्तींचा तातडीने बंदोबस्त करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

**मा. मंत्री (वने)** **श्री. गणेश नाईक**

**निवेदन**

दिनांक १५.०६.२०२५ रोजी सिंदेवाही तालुक्यातील फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमीटेडच्या अखत्यारीतील राखीव वनक्षेत्रात श्री. मारुती कवडू मसराम, वय वर्षे ६०, राहणार जाटलापूर यांचा वन्यहत्तीच्या हल्ल्यात मृत्यु झाल्याची घटना निदर्शनास आली आहे. प्रस्तुत प्रकरणी प्रचलित नियमातील तरतूदीनुसार मृत व्यक्तीच्या वारसास रु. १०.०० लक्ष इतके अर्थसहाय्य अदा करण्यात आले असून उर्वरित रु. १५.०० लक्ष अर्थसहाय्य अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

चंद्रपूर वन वृत्तातील सावली परिक्षेत्रात वन्यहत्तीमुळे माहे मे, २०२५ मध्ये शेतपिक नुकसानीच्या ८ व माहे जून, २०२५ मध्ये घराचे नुकसान केल्याची १ घटना निदर्शनास आली आहे. तसेच दिनांक १४.०६.२०२५ रोजी मौजे चिकमारा गावातील श्रीमती शिल्पा प्रमोद बोरकर यांच्या मालकीच्या धानाचे पोते फोडून नासधूस केल्याची व श्री. प्रमोद अशोक बोरकर यांच्या घराची भिंत तोडल्याची घटना निदर्शनास आली आहे. प्रस्तुत प्रकरणी प्रचलित नियमातील तरतूदीनुसार संबंधितास अनुक्रमे रु.१.२९ लक्ष व रु. १.१८ लक्ष अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

गडचिरोली वनवृतामध्ये सन २०२५-२६ मध्ये (माहे मे, २०२५ अखेर पर्यत) वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मनुष्य जखमीची १, शेतपिक नुकसानीच्या १३८ व इतर हानीच्या २६ घटना निदर्शनास आल्या असून प्रचलित नियमातील तरतूदीनुसार संबंधितास अनुक्रमे रु. ०.५० लक्ष, रु. ३०.१८ लक्ष व रु. ४.३१ लक्ष अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानीपोटी नुकसान भरपाई अदा करण्याची कार्यवाही अधिक प्रभावीपणे पार पाडण्याकरीता महाराष्ट्र वन्यप्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान याकरिता नुकसान भरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ दिनांक ३०.०१.२०२४ पासून अस्तित्वात आला असून त्यातील तरतूदींनुसार आवश्यक कार्यवाही करुन संबंधितास नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

मानव-हत्ती संघर्ष टाळण्याच्या अनुषंगाने क्षेत्रियस्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- वन्य हत्तींचा वावर असलेल्या क्षेत्रातील सरपंच, पोलीस पाटील, तलाठी, ग्रामसेवक व वरीष्ठ नागरीक यांच्या समवेत बैठक घेवून त्यांच्याद्वारे गावागावात जनजागृती करुन शेतात एकट्याने न जाता सामुहीकरित्या जाण्याबाबत सूचना देण्यात येतात.

- जंगली हत्तीचा कळप जंगलात कोणत्या ठिकाणी आहे व कोणत्या दिशेने वाटचाल करीत आहेत याची स्थिती समजण्यासाठी थर्मल ड्रोनचा वापर करण्यात येतो.
- वन्यहत्तींचा प्रतिबंध करण्यासाठी वनकर्मचारी आणि हंगामी संरक्षण मजूर यांचे गस्ती पथक स्थापन करण्यात आले असून फटाके मशाल इ. वस्तुचा वापर करुन वन्यहत्तींना मानवी वस्तीपासून दुर करण्याचे कार्य करण्यात येते.

*******

म/ ७९३ - १ ५

लक्षवेधी सूचना क्रमांक :- १५३२

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. उमेश ऊर्फ चंदु यावलकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १५३२ पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यात वन्य प्राण्यांमुळे पिक नुकसान, मनुष्यहानी, पशुहानी होत असल्याचे वारंवार निदर्शनास येणे, अमरावती जिल्ह्यातील वरूड व मोर्शी तालुक्यात सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या वर्षात एकुण ४५९५ पिक नुकासनीचे प्रकरणे होणे, तसेच पशुहानीची १०० प्रकरणे व मनुष्यहानीची १८ प्रकरणे घडली असणे, याकरीता वन विभागाकडून आर्थिक मदत देण्यात येणे, परंतु वन्य प्राण्यांच्या हल्ल्यापासून संरक्षणाच्या दृष्टीने आवश्यक वन विभागाच्या वतीने देण्यात येणारे सौर कुंपन प्रभावी नसल्यामुळे त्याएवजी लोखंडी पोल व जाळीचे असलेले कुंपन सलग जंगलाला किंवा जंगलालगत असलेल्या गावाला व शेतीला घालण्याची आवश्यकता असणे, यामुळे होणारे नुकसान वाचणार असून आर्थिक मदत देण्याचे प्रमाणही कमी होणार असणे, त्याच प्रमाणे साप हा जंगली प्राणी असल्याने सर्प दंशाने शेतकऱ्यांच्या पाळीव प्राण्याची पशु हानी झाल्यास त्यांना मोबदला (आर्थिक नुकसान) दिला जात नसणे, याकरीता शासनाने तात्काळ निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा. मंत्री (वने)** **श्री. गणेश नाईक**

### निवेदन

अमरावती वनवृत्तामध्ये अमरावती, अकोला व बुलढाणा या ३ जिल्ह्यांचा समावेश होतो. अमरावती वनविभामध्ये वडाळी, चांदूर रेल्वे, परतवाडा, मोर्शी व वरुड या ५ वनपरिक्षेत्राचा समोवश आहे.

राज्यात वाघ, बिबट्या, अस्तव, रानगवा, रानडुक्कर, लांडगा, तरस, कोल्हा, मगर, हत्ती, जंगली कुत्रा, हरिण, नीलगाय, माकड किंवा वानर या वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानीपोटी नुकसान भरपाई अदा करण्याची कार्यवाही अधिक प्रभावीपणे पार पाडण्याकरीता महाराष्ट्र वन्यप्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान याकरिता नुकसान भरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ दिनांक ३०.०१.२०२४ पासून अस्तित्वात आला असून त्यातील तरतूदींनुसार आवश्यक कार्यवाही करुन संबंधितास नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

सन २०२२-२३ ते सन २०२४-२५ या कालावधीत वरुड व मोर्शी वनपरिक्षेत्रामध्ये वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे शेतपिकनुकसानीच्या ४५९५, पशुधन हानीच्या १०० व मनुष्य हानीच्या १८ घटना निदर्शनास आल्या असून प्रचलित नियमातील तरतुदीनुसार अनुक्रमे संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना रु. २१६.३९ लक्ष, पशुधनाच्या मालकास रु. १४.४० लक्ष व मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसास / जखमीस व्यक्तीस रु. १०१.०१ लक्ष इतके अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनेंतर्गत वाघ आणि बिबट ह्यांच्या प्रादुर्भावामुळे वनालगत असलेल्या गावांमध्ये अलिकडे वारंवार होत असलेल्या मनुष्यहानी आणि वाढणाऱ्या पिक नुकसानीच्या घटना लक्षात घेता, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनेची व्याप्ती वाढवून वनालगतच्या काही गावातील वन सीमेवर साखळी जाळीचे कुंपन घालण्याबाबत शासन निर्णय क्र.डब्ल्युएलपी-०५.१७/ प्र.क्र. ९७/फ-१, दिनांक २१.०३.२०१८ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यात सौर ऊर्जा कुपणाकरीता अर्ज केलेल्यापैकी ३०५४७ लाभार्थांना शासनाची पुर्व मंजूरी प्रदान करण्यात आली असून त्यापैकी प्रत्यक्षात कुपण लावलेल्या १२७४१ लाभार्थांना अनुदानाचे वाटप करण्यात आले आहे.

वेदा H/794 (57-0-29-25) -1 कृपा.प.

दिनांक १९.०४.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये कृषि व पदूम विभागामार्फत गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा अनुदान योजना राबविण्यात येत आहे. त्यानुसार राज्यातील शेतकऱ्यांचा शेती व्यवसाय करतांना होणारे अपघात / रेल्वे अपघात, पाण्यामध्ये बुडून, सर्पदंश / विंचू दंश इत्यादी अशा विविध कारणामुळे मृत्यु झाल्यास सानुग्रह अनुदान किंवा मोबदला देण्यात येतो.

मानव-वन्यजीव संघर्षावर आळा घालण्यासाठी क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- क्षेत्रिय अधिकारी व कर्मचा-यांच्या गस्ती पथकांची निर्मिती करून नियमितपणे वनक्षेत्रात तसेच वन्यप्राणी प्रवण क्षेत्रात गस्त घालण्यात येवून वन्यप्राण्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यात येते.
- मानवी जिवीतास धोकादायक ठरणाऱ्या वन्यप्राण्यांना वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील तरतूदीनुसार जेरबंद करण्याची कार्यवाही करण्यात येते.
- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रातच पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता कृत्रिम पाणस्थळे, वनतळे, चेकडॅमची निर्मिती करून पाण्याची व्यवस्था करण्यात येते.
- स्थानिक पातळीवर संयुक्त वनव्यवस्थापन समित्या व अशासकिय संस्थांच्या मदतीने स्थानिकांचे प्रबोधन करण्यात येते तसेच सूचना फलक / भित्तीपत्रकाव्दारे नागरीकांनी घ्यावयाच्या दक्षतेबाबत माहिती देण्यात येते.
- आपत्कालीन परिस्थितीकरीता जलद बचाव पथकांची निर्मिती करण्यात आलेली आहे.
- नैसर्गिक भक्ष्य असलेल्या तृणभक्षी वन्यप्रण्यांना वनातच गवत / चारा उपलब्ध होण्याकरीता कुरण विकासाची कामे करण्यात येतात.
- वनालगतच्या गावांतील गावकऱ्यांची वनावरील निर्भरता कमी व्हावे यासाठी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना राबविण्यात येत असुन त्यात एल.पी.जी. गॅस पुरवठा, बायोगॅस, सोलर दिवे इत्यादी उपक्रम राबविण्यात येतात.

*****

H/794-19

लक्षवेधी सूचना क्रमांक :- १८५४

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. निलेश राणे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १८५४ पुढीलप्रमाणे आहे :-

"रत्नागिरी व सिधुदुर्ग जिल्हयातील फळबागा आणि शेती पिकांवर वानर,माकडे,आणि गवारेडया रानगवे आणि हत्तींचा मोठया प्रमाणात उपद्रव होत असल्याने शेतीबरोबरच मनुष्यहानी होत असल्याचे नुकतेच माहे एप्रिल,२०२५ मध्ये निदर्शनास येणे, सिंधुदुर्ग जिल्हयातील दोडामार्ग तालुक्यात सैराट झालेल्या रानगवे आणि हत्तीनी शेतक-यांच्या बागायत आणि पिके भुईसपाट केल्यामुळे शेतक-यांचे बिघडलेले आर्थिक गणित,रानगव्यांमुळे केवळ पिकांची नासाडीच नव्हे तर लोकांवर हल्ले करुन त्यांना जायबंदी करण्याच्या घटनाही धडलेल्या असणे, नाचणी, मिरची, वायंगणी भातशेती अशा पिकांत गव्यांकडून धुडगुस घालत जात असणे, हत्तीनी काजू बागेत जाणा-या शेतक-याला ठार केल्याने व शेतक-यांचा हत्तीकडून होत असलेला पाठलाग त्यामुळे शेतकरी बोगत काजू गोळा करण्याकरिता जात नसणे, हत्ती पकड मोहिम प्रभावीपणे राबविण्याची नितांत आवश्यकता, शेतक-यांना वन्यप्राण्यांमुळे होणा-या त्रासापासून तसेच फळबागा व शेती पिकांचे नुकसान टाळण्यासाठी दीर्घकालीन प्रतिबंधात्मक उपायोजना करण्याच्या दृष्टीने वानर, माकडे आणि गवारेडया यांचे निर्बीजीकरण करण्याची आवश्यकता वानर, माकडे आणि गवारेडया यांचे निर्बीजीकरण करण्यासंदर्भात रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयात निर्बीजीकरण केंद्र उभारण्याची गरज, तसचे याकरिता त्वरित अंमलबजावणी करुन याकरिता निधीची भरीव तरतूद करण्याची आवश्यकता, वन्यप्राण्यांमुळे नुकसान झालेल्या शेतक-यांना वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू पावलेल्यांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रि या व भूमिका."

---

**मा. मंत्री (वने)** **श्री. गणेश नाईक**

**निवेदन**

कोल्हापूर वनवृत्तामध्ये कोल्हापूर, सातारा, सावंतवाडी, सांगली व चिपळूण या पाच वनविभागांचा समावेश होतो.

सन २००२ मध्ये कर्नाटक राज्यातुन सावांतवाडी वन विभागात वन्यहत्तींचे आगमन झाले आहे. सिंधुदूर्ग जिल्ह्याच्या सिमेवरील तिलारी धरण पाणलोट क्षेत्रातील मुबलक पाणी व स्थलातरीत झालेली गावे यामुळे पोषक वातावरणामुळे कोल्हापूर वनवृत्तातील सावंतवाडी व कोल्हापूर वनविभागामध्ये सध्यस्थितीत एकूण ८ हत्ती स्थायीक झाले आहेत.

कोल्हापूर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये सन २०२४-२५ मध्ये वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे शेतपिकनुकसानीच्या ११९७९, पशुधन हानीच्या १११७, मनुष्य हानीच्या ३८ व अन्य मालमत्ता नुकसानीच्या २२ घटना निदर्शनास आल्या असून प्रचलित नियमातील तरतुदीनुसार अनुक्रमे संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना रु. १२९५.०० लक्ष, पशुधनाच्या मालकास रु. १७०.४० लक्ष, मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसास / जखमीस व्यक्तीस रु. ९४.९६ लक्ष व अन्य मालमत्ता नुकसानग्रस्तास रु. २.३४ लक्ष इतके अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानीपोटी नुकसान भरपाई अदा करण्याची कार्यवाही अधिक प्रभावीपणे पार पाडण्याकरीता महाराष्ट्र वन्यप्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान याकरिता नुकसान भरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ दिनांक ३०.०१.२०२४ पासून अस्तित्वात आला असून त्यातील तरतूदींनुसार आवश्यक कार्यवाही करुन संबंधितास नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील तरतूदीनुसार मानवी जिवितास धोकादायक ठरलेल्या दोडामार्ग तालुक्यामध्ये वावरत असलेल्या नर हत्तीस बंदीस्त करण्यास मुख्य वन्यजीव रक्षक तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे मार्फत परवानगी प्रदान करण्यात आली असून सदर वन्यहत्तीस बंदीस्त करण्याकरीता इतर राज्यातील चमुंची मदत मिळणेस्तव विनंती करण्यात आली आहे.

आंबा, काजु सारखी फळझाडे तसेच बांबु व फुलझाडे यांचा मोहोर, फुलोरा, पालवी इत्यादीचे वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानीमुळे बाधीत होणारे क्षेत्र व नुकसानीचे प्रमाणाच्या आधारे मुल्य निश्चित करयाकरिता कार्यपध्दती ठरविणे, नुकसान टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना सुचविण्यासाठी दिनांक ३०.१२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने मानव-माकड / वानर संघर्ष कमी करणेकामी निर्बीजीकरण करण्याची उपाययोजना सूचविण्यात आली होती. दिनांक १४.०२.२०२४ च्या शासन निर्णयान्वये टास्क फोर्सची निर्मीती करण्यात आली आहे.

सन २०२४-२५ मध्ये चिपळुन व सावंतवाडी वनविभागातील नागरीवस्तीमध्ये येवुन उपद्रव करणाऱ्या एकूण ५३७० माकडांना पकडून नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले आहे.

*****

## लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा सन २०२५ चे दुसरे पावसाळी अधिवेशन

**मा श्री .राजन नाईक, ॲड पराग अळवणी श्री. अमित साटम, कॅप्टन आर सेल्वन विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.९५४ पुढीलप्रमाणे आहे :-**

"वसई-विरार शहरात महापालिका व महाराष्ट्र जलजीवन मिशन प्राधिकरण यांच्यामार्फत विविध ठिकाणी पाणीपुरवठा करण्यासाठी जलकुंभ उभारण्यात आले असणे, मात्र अजूनही या जलकुंभापर्यंत पाणीच पोहचले नसल्याने मागील पंधरा वर्षापासून हे जलकुंभ कोरडेच असल्याची बाब माहे एप्रिल २०२५ च्या सुमारस निदर्शनास येणे, यामध्ये स्थानिक प्रशासनाची उदासीनता असल्याची बाब समोर येणे, परिणामी शहरातील नागरिकांना विशेषतः झोपडपट्टी विभागात रात्री उशिरापर्यंत किंवा पहाटे पाण्याची वाट बघत राहावे लागते व कमी दाबाने अनियमित पाणी येत असल्यामुळे नागरिकांना खूपच अडचणींचा सामना करावा लागत असल्याची बाब आढळून येणे, अनेक वर्षे जुने असलेले जलकुंभ हे धोकादायक अवस्थेत आढळून आल्याने त्यांचे संरचनात्मक लेखापरीक्षण करून उपाययोजना करण्याची मागणी स्थानिकांकडून केली जात असल्याची बाब समोर येणे, पुढील काळात मोठी दुर्घटना टाळण्यासाठी धोकादायक आढळून आलेल्या जलकुंभांचे तातडीने लेखापरीक्षण करून या जलकुंभांची दुरुस्ती करण्यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, त्याचप्रमाणे पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या पाहता या जलकुंभात लवकरत लवकर पाणी पोहचण्यासाठी शासनाने ठोस भूमिका घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

---

### मा. मंत्री पाणी पुरवठा व सवच्छता विभाग यांचे निवेदन

वसई-विरार उप प्रादेशिक ६९ गावांच्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनेस दि. २४ मे, २००५ रोजीच्या शासन निर्णयान्वये रू. ८५१६.२२ लक्ष किंमतीस प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे. योजनेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर योजनेचे कामे दोन टप्यामध्ये घेण्यात आलेली आहे. टप्पा-१ सन २००८ मध्ये गुरूत्ववाहिनीचे काम व टप्पा-२ सन २००९-१० व सन २०१०-११ मध्ये उद्भव निहाय सुर्या उद्भव, पेल्हार उद्भव व ऊसगांव उद्भव ०३ निविदेद्वारे हाती घेवून माहे मार्च २०१७ अखेरपर्यंत भौतिकदृष्ट्या पूर्ण करण्यात आली.

वसई-विरार उप प्रादेशिक पाणी पुरवठा योजना टप्पा-२, भाग-२ ६९ गावे पाणी पुरवठा या योजनेमध्ये मुख्य गुरुत्ववाहिनी व एकूण ६९ नवीन जलकुंभ बांधणे या कामाचा समावेश होता. या कालावधीत ज्याप्रमाणे महानगरपालिकेकडून पाणी उपलब्ध झाले, त्याप्रमाणे ही योजना टप्प्या टप्प्याने कार्यान्वीत करण्यात आली. सदर योजनेच्या वीज पुरवठयामध्ये माहे जानेवारी, २०२४ ते माहे जून, २०२५ या कालावधीमध्ये अनेक वेळा ट्रिपींग होऊन वीज पुरवठा खंडीत झाला होता म्हणून पाणी वितरणामध्ये अडथळे व अडचणी उद्भवतात आणि महापालिका क्षेत्रास कमी दाबाने पाणी पुरवठा होतो ही वस्तुस्थिती आहे. तत्कालीन परिस्थितीतील असमान व अपुऱ्या पाणी पुरवठ्याची परिस्थिती लक्षात घेता मा. जिल्हाधिकारी, पालघर यांनी दि.०७/०२/२०२० रोजी ६९ गावांच्या पाणी पुरवठा योजना संदर्भात बैठक घेवून सदर बैठकित महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत जलकुंभापर्यतच्या सर्व मुख्य जलवाहिन्यां व जलकुंभ कार्यान्वीत करून

दिल्यावर ६९ जलकुंभापैकी महानगरपालिका क्षेत्रातील ५२ गावांतील ५२ जलकुंभाच्या पाणी पुरवठयाची जबाबदारी महानगरपालिकेने स्विकारावी, असा निर्णय घेण्यात आला. सदर योजनेअंतर्गत महापालिकेत समाविष्ट ५२ गावांमध्ये उभारलेल्या जलकुंभाचे संरचनात्मक परिक्षण करण्याची कार्यवाही महापालिकेमार्फत करण्यात आलेली आहे. प्राप्त संरचनात्मक परिक्षण अहवालानुसार नायगांव येथील जलकुंभ वगळता ५१ जलकुंभाच्या आवश्यक दुरुस्त्या/डागडूजी करण्याबाबतचे अंदाजपत्रक वसई-विरार महानगरपालिकेमार्फत तयार करण्यात आलेले असून निविदा मागविण्यात आल्या आहेत. सदरच्या दुरुस्त्या या पावसाळा संपल्यानंतर पूर्ण करण्याचे नियोजन महापालिकेमार्फत करण्यात आलेले आहे.

महानगरपालिकेत समाविष्ठ नसलेल्या ग्रामीण भागातील १७ गावांच्या १७ जलकुंभाच्या पाणी पुरवठयाच्या नियोजना संबंधीची जबाबदारी जिल्हा परिषद, पालघर मार्फत स्विकारण्यात यावी. तसेच सदर प्रमाणे दि.२६/०८/२०२० रोजी मा.आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका यांनी आयोजित केलेल्या बैठकीत वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील ५२ गावातील गुरुत्ववाहिनी व ५२ जलकुंभ ताब्यात घेण्याचे ठरले, त्यानुसार महानगरपालिका क्षेत्रातील ५२ गावातील पाणी पुरवठ्याबाबतचे देखभाल दुरुस्ती व्यवस्थापन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे. योजनेतील उर्वरित ग्रामीण भागातील १७ गावांचा पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी जल जीवन मिशन अंतर्गत १७ गावांसाठी अर्नाळा व १६ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना (Retrofitting) पुर्नबांधणीचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आले असुन, हे काम प्रगती पथावर आहे. या कामामध्ये महानगरपालिका क्षेत्रातुन जल जोडण्या घेण्यात येवून आवश्यक लांबीची नविन गुरूत्ववाहिनी तसेच आवश्यक लांबीच्या वितरण व्यवस्थेचा समावेश करण्यात आलेला असुन अस्तित्वातील एकूण १७ जलकुंभाचे संरचनात्मक लेखापरीक्षण (Structural Audit) करून वापरा योग्य ठरत असल्याने, सदर जलकुंभाच्या दुरूस्तीचा देखील अर्नाळा व १६ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेत समावेश करण्यात आलेला आहे. सदर पुर्नबांधणीचे काम (Retrofitting) प्रगतीपथावर असून एकुण १७ पैकी १४ जलकुंभाचे दुरुस्तीचे काम पूर्ण करणेत आलेले आहे. उर्वरित ०३ जलकुंभापैकी आमले गावाकरीता वन विभागाच्या परवानगी अभावी तसेच इंदिरानगर गावाकरीता ग्रामस्थांचा विरोध असल्याने सदर ठिकाणी काम सुरु करता येऊ शकले नाही. सदर बाबत संबंधितांशी पाठपुरावा सुरु आहे. तसेच, वारलीवाडी या गावाकरीता जागा प्राप्त झाल्याने जलकुंभाच्या कामास पावसाळयानंतर सुरुवात करण्यात येत आहे. योजनेतील १६ गावांपैकी ०९ गावांना चाचणी स्वरूपात पाणी पुरवठा सुरू करण्यात आलेला आहे. ०३ गावांसाठी वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत जल जोडणी प्राप्त करून घेण्यात येत आहे व उर्वरित ०५ गावांसाठी व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पाणी पुरवठा स्त्रोत व्यवस्थापन (MMRDA) मार्फत जल जोडणी प्राप्त होणार आहे व याबाबतचा पाठपुरावा सुरू आहे. सदर योजनेचे भौतिकदृष्टया ९०% काम पूर्ण झालेले असुन सदर काम माहे मार्च २०२६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. सदर काम पूर्ण झाल्यावर वसई विरार शहर महानगर पालिका व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पाणी पुरवठा स्त्रोत व्यवस्थापन (MMRDA) मार्फत मंजूर पाणी आरक्षणानुसार पाणी उपलब्ध झाल्यानंतर ग्रामीण क्षेत्रातील १७ गावांना सुरळितपणे पाणी पुरवठा करता येणार आहे.

---

लक्षवेधी सूचना क्रमांक- ७४४

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे व्दितीय अधिवेशन

श्रीमती श्वेता विद्याधर महाले,श्री. गोपिचंद कुंडलिक पडळकर,श्री. मोहन गोपाळराव मते, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ७४४ पुढीलप्रमाणे आहे:-

---

"राज्यातील समग्र शिक्षा अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना शैक्षणिक पात्रतेनुसार व अहर्तानुसार रिक्त पदावर किंवा त्याच पदावर कायम करण्याच्या मागणीसाठी मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन करण्यात येणे, सर्व शिक्षा अभियानांतर्गत २००३ पासून जिल्हा तालुका आणि महापालिका स्तरावर सहाय्यक कार्यक्रमाधिकारी, विषय साधन व्यक्ती, कनिष्ठ अभियंता, डाटा एन्ट्री ऑपरेटर, दस्तऐवज व संशोधन सहाय्यक आणि वरिष्ठ लेखा सहायक अशा विविध पदावर कंत्राटी पद्धतीवर अनेक कर्मचारी काम करत असणे, त्यामुळे समग्र शिक्षा अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार व अहर्तानुसार समायोजन करून शासन सेवेत कायम करुन वेतनश्रेणी लागू करणे, राज्यात ८ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार विशेष शिक्षकांच्या मंजूर ४८६० पदांपैकी २९८४ पदे वगळून रिक्त असणाऱ्या २६९५ पदावर कंत्राटी काम करणाऱ्या समग्र शिक्षा अभियानातील कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्याची मागणी हे समग्र अभियानातील कर्मचारी करीत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

### मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे निवेदन

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद ही संस्था सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट, १८६० व मुंबई विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये पंजीकृत करण्यात आली आहे. मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद सेवा नियमावली, १९९४ नुसार व्यवस्थापनांतर्गत मंजूर असलेल्या पदांपैकी काही पदे प्रतिनियुक्तीने तर काही पदे करार/कंत्राटी पद्धतीने भरण्यात आली आहेत. सदर कार्यपद्धतीनुसार करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवा, दर सहा महिन्यांनी एक दिवसाचा खंड देऊन सुरू ठेवण्यात आल्या आहेत. सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाने मंजूर केलेल्या एकक दराने मानधन अनुज्ञेय आहे.

राज्यातील सामान्य शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी करार पध्दतीने कार्यरत विशेष शिक्षकांचे मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल रिट याचिका क्र. १३२/२०१६ मध्ये दिलेल्या निर्देशांचे अनुपालन करण्याच्या दृष्टीने मा. मंत्रीमंडळाच्या मान्यतेने उपलब्ध रिक्त शिक्षकीय पदांपैकी, प्रत्येक केंद्र स्तरावर एक या प्रमाणे ४८६० पदे विशेष शिक्षकांच्या नियुक्तीकरीता राखून ठेवण्यास दि.०८.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. यामध्ये समग्र शिक्षा योजनेमध्ये समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत कार्यरत २९८४ विशेष शिक्षकांचे समायोजन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. शासन निर्णय, दि.०८.१०.२०२४ अन्वये विशेष शिक्षकांची राखून ठेवण्यात आलेली ४८६० पदे ही दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आहेत. समग्र शिक्षा योजनेतील उर्वरीत कर्मचारी हे विषय साधन व्यक्ती, कनिष्ठ अभियंता, डाटा एन्ट्री ऑपरेटर, संशोधन सहाय्यक अशी आहेत. या कर्मचाऱ्यांचे समायोजन शासन निर्णय, दि. ०८.१०.२०२४ अन्वये दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी राखून ठेवण्यात आलेल्या ४८६० पदांमधील उर्वरीत २६९५ पदावर करता येणार नाही, तथापि, याबाबत तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि.२२.०७.२०२४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये दिलेल्या निदेशानुसार समग्र शिक्षा योजनेंतर्गत करार पध्दतीने कार्यरत कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नाबाबत शासनास शिफारशी करण्यासाठी शासन निर्णय दि.२२.०८.२०२४ अन्वये समिती गठीत करण्यात आली होती. परंतु, प्रशासकीय कारणास्तव समितीचे पुनर्विलोकन करून आता, दि.०४.०६.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये पुर्नरचना करण्यात आली आहे.

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन
श्री.मुरजी (काका) पटेल,वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये
दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१६५३

"महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११, दि.२१.३.२०१४ मधील कलम ८(३) व (४) अन्वये मागील विद्याविषयक वर्षाचे शुल्कवाढ अधिक त्यात १५ % शुल्क एवढे गोळा करण्याची मुभा व्यवस्थापनास असेल तसेच सदर दोन विद्याविषयक वर्षासाठी शुल्क वाढ न करणे बंधनकारक असेल अशी तरतूद असणे परंतु दोन वर्षानंतर फक्त १५ % शैक्षणिक शुल्क वाढ करण्याची मुभा असतानाही, अंधेरी (पूर्व), मुंबई येथील बॉम्बे केंब्रिज हायस्कूल या शाळेने उक्त अधिनियमांचे उल्लंघन करून शैक्षणिक शुल्कात ३०% वाढ केली असणे, केलेली शुल्क वाढ कमी करण्याची पालकांची मागणी लक्षात घेवुन शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई पश्चिम उपनगरे यांनी सदरहू शाळेस दि.१३/६/२०२५ रोजी नोटीस दिली असता शुल्कात केले वाढ कमी न करता तक्रार करणाऱ्या पालकांना नाहक त्रास देवुन त्यांच्या पाल्यास अपमानास्पद वागणूक देत असल्याने पालक आणि जनमाणसात शाळा व प्रशासनाविरूद्ध तीव्र असंतोषाची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

---

## मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे निवेदन

बॉम्बे केंब्रिज इंटरनॅशनल स्कूल, अंधेरी (पूर्व),मुंबई ही स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावरील माध्यमिक शाळा आहे. सदर शाळेने चालू शैक्षणिक वर्षामध्ये ३०% फी वाढ केल्याबाबत श्री.मुरजी पटेल,वि.स.स. यांनी दि.१०.६.२०२५ रोजी प्राचार्य,बॉम्बे केंब्रिज स्कूल,अंधेरी (पुर्व), मुंबई व शिक्षणाधिकारी,मुंबई पश्चिम उपनगरे,गोरेगांव मुंबई यांना निवेदन सादर केले होते.सदर निवेदनाच्या अनुषंगाने श्री.मुरजी पटेल,वि.स.स. यांचे समवेत दि.१३.०६.२०२५ रोजी सदर शाळेच्या भेटीच्या वेळी शाळेतील शैक्षणिक

शुल्कवाढी संदर्भात झालेल्या चर्चेनुसार महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम २०११,मधील तरतुदीनुसार फी वाढीबाबतची कार्यवाही करावी तसेच सदर अधिनियमातील तरतुदीचा भंग होणार नाही या बाबत दक्षता घेण्याच्या सूचना शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई पश्चिम विभाग या कार्यालयाने त्यांच्या दि.१३.६.२०२५ च्या पत्रान्वये मुख्याध्यापक,बॉम्बे केंब्रिज हायस्कूल,अंधेरी (पू.),मुंबई यांना दिल्या आहेत.सदर पत्राची दखल घेऊन शाळेने दि.२.७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ साठी ३०% वाढवलेले शैक्षणिक शुल्क कमी करून ती १५% केली असल्याबाबत शिक्षण निरीक्षक कार्यालयास लेखी कळविले आहे. तसेच सदर शाळेच्या कार्यकारी समिती व व्यवस्थापनाने मान्यता दिल्या प्रमाणे शाळेच्या शुल्कात रु ९०० एवढी रक्कम वाढ केली असून ९३१ पालकांपैकी ७१८पालकांनी शुल्क भरले आहे.सदर शाळेने वाढीव शुल्क रद्द केल्याची सूचना सर्व पालकांच्या निदर्शनास आणली आहे.

******

लक्षवेधी सूचना क्र. २३७८

## सन २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. कैलास घाडगे पाटील, विधानसभा सदस्य** यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. २३७८ पुढीलप्रमाणे आहे:

"धाराशिव जिल्हयात मृद व जलसंधारण विभागामार्फत राबवण्यात येणाऱ्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असणे. जलयुक्त शिवाय अभियान २.०, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार तसेच गेटेड सिमेंट नाला बांध या कामामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे उघड झाले आहे. जलयुक्त शिवार योजनेत जलसंधारणाची कामे माथा ते पायथा असे राबवण्यात येणे अपेक्षित असताना फक्त खोलीकरणची कामेच हाती घेण्यात आली आहेत. तसेच काही कामे वगळता इतर कामे फक्त कागदावरच झाल्याचे दिसून येते. गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेत काही स्वयंसेवी संस्थेला हाताशी धरुण अधिकाऱ्यांनी गाळ न काढताच शेतकऱ्यांची व शासनाची कोट्यावधीची रक्कम हडप केलेली आहे. धाराशिव जिल्हयात मे महिन्यापासुन मोठ्या प्रमाणात पावसाला सुरुवात झाली असल्यामुळे कोणत्याही धरणातुन गाळ काढणे अशक्य असताना त्याच दरम्यान धरणातून गाळ काढल्याचे बोगस मोजमाप घेऊन अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला असणे. तसेच पाणलोट विकास क्षेत्र योजना या योजनेत देखील मोठ्याप्रमाणात भ्रष्टाचार केला असणे या विभागामार्फत राबवण्यात येणाऱ्या निविदा प्रक्रियेमध्ये पारदर्शकता नसणे, ठराविक कंत्राटदाराना कामे देण्याच्या हेतूने निविदा प्रक्रिया राबविणे या सर्व बाबीसाठी जबाबदार असणाऱ्या अधिकारी, स्वयंसेवी संस्था व कंत्राटदार यांच्यावर कारवाई करणेबाबत शासनाची भुमीका व धोरण."

..............................................................................................................

## श्री. संजय राठोड, मंत्री, मृद व जलसंधारण यांचे निवेदन

जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत धाराशिव जिल्ह्यात १६३ गावांमध्ये विशेष निधी व अभिसरणातून रु. १२३.१० कोटी रक्कमेच्या ६८१३ कामांचा आराखडा जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरिय समितीने मंजूर केलेला आहे. सदर योजनेंतर्गत माहे जून-२०२५ अखेरपर्यंत सुमारे ६१५० कामे पूर्ण झाली असून रु.५७.७९ कोटी खर्च झालेला आहे. पूर्ण झालेल्या कामांपैकी नाला खोलीकरणाची २८६ कामे (५%) असून त्यावर रु. १०.८० कोटी (१९ %) इतका खर्च झालेला आहे. वर नमूद केल्याप्रमाणे माथा ते पायथा तत्वानूसार क्षेत्र उपचार व नाला उपचारांची कामे करण्यात आली आहेत. पूर्ण झालेल्या कामांचे त्रयस्थ संस्थामार्फत मूल्यमापन प्रस्तावित आहे.

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत धाराशिव जिल्ह्यात ६ प्रकल्प मंजूर असून त्यांचे प्रकल्प मूल्य रु. ४५.१७ कोटी आहे. नैसर्गिक संसाधन व्यवस्थापनांतर्गत (NRM) रु. २१.२३ कोटींची ९९५ कामे मंजूर असून आतापर्यंत २९३ कामे पूर्ण झाली असून रु. ४.९२ कोटी खर्च झालेला आहे. सदर योजनेंतर्गत केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे आणि शासन नियमांप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार योजनेंतर्गत सन २०२४-२५ मध्ये २२४ कामांना रु. ६१.७४ कोटींची प्रशासकिय मान्यता मंजूर आहे. त्यापैकी, १५० जलसाठ्यांमधून ६९.८७ लक्ष घ.मी. गाळ काढलेला असून त्यापोटी २० अशासकिय संस्थांना रु. २५.६६ कोटी निधी अदा करण्यात आलेला आहे. तसेच, सदर काढलेला गाळ ५३७३ शेतक-यांनी १६,६३७ एकर शेतात पसरविला असून अनुदान पात्र ४९२१ शेतक-यांच्या खात्यावर रु. १४.६३ कोटी अनुदान जमा केलेले आहे. सन २०२५-२६ मध्ये एकूण ५३१ कामासाठी रू.५९.१९ कोटींची प्रशासकिय मान्यता देण्यात आली असून यामध्ये १०४ कामे तलावातील गाळ काढण्याची आणि उर्वरित ४२७ कामे नाला खोलीकरणाची आहेत. सदर कामांपैकी तलावातून ९.७५ लक्ष घ.मी व नाला खोलीकरणाव्दारे १३.७१ लक्ष घ.मी. गाळ अंदाजे काढलेला आहे. अशासकिय संस्थामार्फत माहे जून- २०२५ मध्ये दि. २३ मे २०२५ पूर्वी झालेल्या कामांची माहिती अवणी ग्रामीण ॲपवर नोंद करण्यात आली असून दि. २३ मे २०२५ पासून गाळ काढण्याचे काम बंद आहे. झालेल्या कामांची मोजमाप पुस्तिका प्राप्त झाल्यानंतर अवणी ग्रामीण ॲपवरील नोंदी पडताळणी करून देयक अदा करण्यात येतील. त्यामुळे माहे मे-२०२५ नंतर गाळ काढण्याचे बोगस मोजमापे घेतली नसून सदर कामे ही शासकीय नियमानुसार केली आहेत.

धाराशिव जिल्ह्यात महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अंतर्गत सन २०१८ ते सन २०२५ पर्यंत एकूण ६५० गेटेड बंधारे मंजूर असून त्याची प्रमा रक्कम रु. ३१५.४२ कोटी आहे. त्या कामांची साठवण क्षमता २,१०,२१० स.घ.मी. आहे व सिंचन क्षेत्र ९८०० हेक्टर आहे. या कामांपैकी रु. १७५.११ कोटींची ३८१ कामे पूर्ण करण्यात आली असून रु. १०३.९९ कोटींची १८८ कामे प्रगतीपथावर आहेत. या कामांचे वाटप नियमाप्रमाणे ई-निविदाद्वारे झालेले असून सदर कामांचे जिओ टॅगिंग करण्यात आलेले आहे. तसेच, कामांमध्ये वापरण्यात आलेले सिमेंट कॉंक्रीट (१:२:४) गुणवत्तेबाबत कामाचे टेस्ट रिपोर्ट संबंधित यंत्रणेव्दारे घेण्यात आलेला आहे. पूर्ण झालेल्या कामामुळे पाणीसाठा होऊन जमिनीतील पाणीपातळी वाढलेली आहेत.

..................

लक्षवेधी सूचना क्र. २२९२

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. प्रताप अडसड, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २२९२ पुढीलप्रमाणे आहे: -**

"कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय व अधिनस्त कार्यालया करिता नविन उपायुक्त दर्जाची ५ पदे निर्माण करकरीता प्रस्ताव असणे, रोजगार मेळावे, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना केंद्र राज्य जिल्हा नियोजन पुरस्कृत कौशल्य विकास योजना राबविणे नव्याने मंजूर झालेल्या महाराष्ट्र खाजगी सेवा प्रदाता २०२५ कायदा, स्टार्ट-अप, इनोव्हेशन इ. विविध कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना विभागाच्या कामकाजामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असणे, तत्कालीन कौशल्य विकास व कामगार मंत्री यांचे दिनांक ०३/१०/२०२२, तत्कालीन कामगार मंत्री यांनी ५ पदाची आवशक्यता असणेबाबत शिफारस केली असताना देखील विभागाने ३ वर्षापासून दखल न घेणे, दिनांक २४.०१.२०२४ रोजी शासनास प्रस्ताव प्राप्त असणे, विधान परिषद सदस्य यांनी १०/०३/२०२५ रोजीच्या पत्रान्वये वाढीव पदाच्या प्रस्तावबाबत शिफारस करणे व दिनांक १२/०३/२०२५ रोजीच्या पत्रान्वये १ वर्ष २ महिने प्रस्ताव प्रलंबित ठेवून निर्णय न घेणे व हेतू पुरस्पर त्रुटी काढून प्रस्ताव परत पाठविला असणे, त्रुटीची पूर्तता होऊन पुन्हा २३ जून, २०२५ रोजी शासनास प्रस्ताव प्राप्त असणे व त्यावर शासन स्तरावर कोणतीही कार्यवाही केली नसणे, उपआयुक्त दर्जाची ५ पदे निर्माण केल्यावर शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नसणे, त्यामुळे उपआयुक्त दर्जाची ५ पदे निर्मितीच्या प्रस्तावास मान्यता मिळण्याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाय योजना."

---

**श्री. मंगलप्रभात लोढा, मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता यांचे निवेदन.**

राज्यातील बेरोजगार युवकांच्या समस्या सोडविण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग कार्यरत आहे. या विभागाच्या अधिनस्त कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय हे राज्यस्तरावरील शिखर कार्यालय कार्यरत आहे. या विभागाच्या दि. ०९.०४.२०२१ च्या शासन निर्णयान्वये सदर आयुक्तालयातील पदांचा आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार ७२३ नियमित व १२६ बाह्ययंत्रणेद्वारे अशा एकूण ८४९ पदांना मान्यता देण्यात आली असून सदर पदांमध्ये ७ उप आयुक्त पदांचा समावेश आहे.

विभागामार्फत रोजगार इच्छुक उमेदवारांची नोंदणी, रोजगार मेळावे, बेरोजगार सोसायट्या, मॉडेल करिअर सेंटर्सद्वारे समुपदेशन असे विविध कार्यक्रम राबविण्यात येतात. या व्यतिरिक्त महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी व महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी या आस्थापनांमार्फत राबविण्यात येणाऱ्या कौशल्य व नाविन्यता विषयक विविध कार्यक्रमांची अंमलबजावणीदेखील कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यंत्रणेमार्फत करण्यात येते. राज्यातील खाजगी पदयोजन एजन्सीचे विनियमन करण्याकरीता महाराष्ट्र राज्य खाजगी पदयोजन एजन्सी (विनियमन) अधिनियम, २०२५ पारित करण्यात आला असून त्याची अंमलबजावणी आयुक्तालय स्तरावरुन होणार आहे. आयुक्तालय स्तरावर कामकाजात कालानुरुप झालेली वाढ तसेच कामकाज अधिक गतिमान होण्यासाठी ५ उप आयुक्त दर्जाची पदे वाढविण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्तालयाकडून पाठविण्यात आला होता. तत्कालीन मंत्री, कामगार

यांच्या दि. १०.११.२०२२ च्या पत्रान्वये कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय अधिकारी संघटनेचे पदनिर्मितीबाबतचे निवेदन प्राप्त झाले आहे.

आयुक्तालयाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आयुक्तालयासाठी ४ उप आयुक्त दर्जाची पदे वाढविण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने वित्त विभागाने दिलेल्या अभिप्रायांनुसार आकृतीबंधांचा सुधारीत प्रस्ताव सादर करण्याबाबत दि. १२.०३.२०२५ च्या शासन पत्रान्वये कळविण्यात आले होते. आयुक्तालयाच्या दि. २३.०६.२०२५ च्या पत्रान्वये सुधारीत प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावाची छाननी करण्यात येत असून छाननी अंती सुधारीत प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात येईल.

************

H/631-19

महाराष्ट्र विधानसभा

सन- २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. १८४१

श्री. विनोद निकोले, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १८४१ पुढीलप्रमाणे आहे:-

" डहाणू तालुक्यातील दाबचरी, वांकस आणि टोकराळे येथील ४६० हेक्टर शासकीय जमिनीपैकी ३७७.२६ हेक्टर जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ MIDC साठी निश्चित करणे. सदर जमीन औद्योगिक विकास महामंडळ हे रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड या कंपनीला बायोगॅस प्रकल्प उभारणीसाठी हस्तांतरित करीत असल्याचेही निदर्शनास येणे. डहाणू तालुक्यामध्ये ५०० एकर क्षेत्रावर औद्योगीकरण करण्याची मर्यादा असताना एवढे मोठे क्षेत्र एका खाजगी कंपनीला देऊन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाचे व पर्यावरण विभागाच्या निर्देशाचे उल्लंघन करीत असल्याची बाब देखील उघड होणे. सदर जमीन आदिवासी समाजाची असून ती पूर्वी दापचेरी दुग्ध प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली असणे. पर्यावरणीय दृष्ट्या हानीकारक असलेल्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने घेतलेला निर्णय रद्द करून रिलायन्स इंडस्ट्रीज कंपनीला देण्यात आलेली जमीन परत आदिवासी समाजाला मिळवून देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मा. मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

शासकीय जमीन प्रदान करताना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६, तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम १९७१ व महसूल व वन विभागाची शासन अधिसूचना दिनांक ३१.१२.२०१५ मधील तरतूदी नुसार कार्यवाही करण्यात येते. या तरतूदीच्या अनुषंगाने मा. मंत्री मंडळाने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन मौजे दापचरी व वंकास ता. डहाणू जि. पालघर तसेच मौजे टोकराळे ता. जि. पालघर येथील अनुक्रमे ३७७.२६.१९ हे. आर व १२५.५५.२ हे. आर जमीन प्रचलित वार्षिक बाजार मूल्यदर तक्त्यानुसार शेती दराने येणारी कब्जा हक्काची रक्कम आकारुन भोगवटदार वर्ग-२ या धारणाधिकाराने नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास महसूल विभागाच्या दिनांक १०.१०.२०२४ च्या शासन निर्णयाद्वारे जमीन प्रदान करण्यात आलेली आहे.

सदरची जमीन आदिवासी खातेदारांकडून संपादित केलेली नसून कृषी व पदुम विभागाची शासकीय जमीन महसूल व वन विभागाच्या दि. १०.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार म. औ. वि. महामंडळाने कब्जा हक्काची रक्कम शासनास भरुन शासनाने सदर जमीन म. औ. वि. महामंडळास हस्तांतरीत केली आहे.

त्यापैकी डहाणू तालुक्यातील मौजे दापचेरी आणि मौजे वांकस येथील ३७७.२६ हेक्टर आर. क्षेत्र "पास-थू पध्दती" द्वारे संपादित करण्यात येत असल्याने संपादित होणाऱ्या जमीनीकरीता कब्जा हक्काच्या रकमेची मागणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे केली होती. त्यानुसार उपरोक्त सरकारी जमीनीचे मुल्य रक्कम रू. १६८,८३,४७,४८३/- इतकी रक्कम शासनास भरणा केलेली आहे.

मे. रिलायन्स इंडस्ट्रिज लि. यांनी दिनांक ०३.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये उपरोक्त क्षेत्र कंपनीच्या Energy Plantation based Integrated CBG Plant या प्रस्तावित प्रकल्पासाठी वाटप करण्याबाबत म. औ. वि. महामंडळास विनंती केली आहे. त्यानुसार म. औ. वि. महामंडळाने त्यांच्या

धोरणानुसार मे. रिलायन्स, इंडस्ट्रीज लि. यांना दि.१४/१०/२०२४ रोजी Letter of comfort निर्गमित केलेले आहे. म. औ.वि. महामंडळाच्या दिनांक १८.१.१९९४ च्या धोरणानुसार सदर Pass through पध्दतीने जमीनीचे संपादन करुन मे. रिलायन्स इंडस्ट्रिज लि. या कंपनीस वाटप करावयाचे असल्याने त्यानुसार प्रकरणी वाटपाची कार्यवाही करण्यात येत आहे.

केंद्र शासनाचे पर्यावरण विभागाने दि.२०/०६/१९९१ रोजी अधिसूचना निर्गमित केली असून, त्याअन्वये डहाणू तालूका Ecologically Fragile Area म्हणून घोषित केला आहे. पर्यावरणास हानीकारक ठरणाऱ्या औद्योगिक वापरावर निर्बंध लागू करण्यात आले आहेत. सदर अधिसूचनेनुसार औद्योगिक घटक ३ प्रकारांमध्ये विभागले असून त्यापैकी Green Category आणि Orange Category उद्योगाकरीता महाराष्ट्र शासन आणि केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाच्या मंजूरीने अनुज्ञेय असणार आहे. परंतु Red Category Industries उद्योगाकरीता अनुज्ञेय नसणार अशी तरतूद करण्यात आली आहे.

तसेच केंद्र शासनाच्या दि.१९/१२/१९९६ चे अधिसूचनेनुसार Dahanu Taluka Environment Protection Authority (DTEPA) ची स्थापना करण्यात आलेली आहे. मौजे दापचरी आणि मौजे वंकास, ता. डहाणू, जि. पालघर येथे मे. रिलायन्स इंडस्ट्रिज लि. साठी होत असलेल्या भूसंपादनाच्या अनुषंगाने DTEPA यांच्याकडे हरकत आली असता, प्राप्त हरकतीवर दि.१७/०१/२०२५ रोजी सुनावणी होऊन मा. न्यायालय (DTEPA) यांनी दिनांक २९/०४/२०२५ रोजी आदेश पारित केले आहेत.

मा. DTEP यांच्या आदेशानुसार मौजे दापचरी आणि मौजे वंकास, ता. डहाणू, जि. पालघर येथे मे. रिलायन्स इंडस्ट्रिज लि. यांनी Integrated Compressed Biogas Project साठी भूसंपादित होत असलेल्या क्षेत्रात Napear Grass चे plantation करून Compressed Biogas निर्मिती प्रकल्पाकरिता आवश्यक असलेल्या परवानग्या Dahanu Taluka Environment Protection Authority (DTEPA) यांनी काही अटीच्या अधीन राहून दिली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने सदरहू प्रकल्पाची वेळोवेळी तपासणी/निरिक्षण करण्याचा अधिकार राखून ठेवणे, प्रकल्प सुरू केल्या नंतर सहा महिन्यांचा अहवाल DTEPA यांना सादर करणे, पाण्याची आवश्यकता पावसाच्या भूगर्भातील किंवा पृष्ठभागावरील पाण्याचा उपसा न करता साठवणूक करून पुर्ण करणे, शुन्य डिसचार्ज (ZLD) चे देखील पालन करणे, सध्याच्या प्रकल्पानुसार शेती वगळता संपूर्ण जमीनीचा वापर बदल न करणे, जर तसे झाले नाही तर जमीनी सरकारने जप्त करणे, DTEPA देखरेखीसाठी देखरेख समिती स्थापन करणे, आणि DTEPA ने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन करणे, व इतर अटीसह प्रकल्प स्थापनेसाठी प्राथमिक परवानगी प्राप्त झाली आहे. उपरोक्त आदेशानुसार मा. न्यायालयाने स्थापित केलेल्या नियोजन प्राधिकारी यांचे आदेशान्वये कार्यवाही करण्यात येणार असल्याने मा. न्यायालयाच्यां निर्देशाचे व पर्यावरण विभागाच्या निर्देशाचे उल्लंघन होणार नाही.

उपरोक्त क्षेत्राचे भूसंपादन मे. रिलायन्स इंडस्ट्रिज लि. यांच्यां Integrated Compressed Biogas Project साठी करण्यात येणार असून, सदर ठिकाणी Napier Grass चे plantation करून Compressed Biogas चे उत्पादन करणार आहे. सदर प्रकल्पात एकुण रू.१३० कोटींची गुंतवणूक होणार असून, ५०० लोकांना रोजगार उपलब्ध करून होणार आहे.

तसेच उपरोक्त सीबीजी प्लांट उभारण्यासाठी फक्त २० एकर जमीन वापर आणि उर्वरित जमीन नेपीयर गवत लागवडीसाठी वापरली जाणार असल्याने डहाणू तालुक्याबाबत निर्गमित झालेल्या अधिसूचनेद्वारे लादलेल्या बंधनांमध्ये येणार नाही. या प्रकल्पामुळे सदर क्षेत्रातील शेतकऱ्यांना सामाजिक-आर्थिक फायदे मिळतील, तसेच यामुळे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे रोजगाराच्या संधी निर्माण होतील, ज्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

x-xx-x-x-x-x-x-x-x-x-x

महाराष्ट्र विधानसभा

सन- २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. १८७९

श्री. सुरेश धस, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १८७९ पुढीलप्रमाणे आहे:-

" संचालक, महाराष्ट्र राज्य तथा मुख्य अग्निशमन अधिकारी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ यांनी राज्यातील सर्व MIDC मध्ये वेगवेगळ्या कारखान्यांच्या बांधकामावेळी व महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रात असणाऱ्या सर्व रहिवाशी इमारती करिता FIRE NOC देताना कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार केल्याने संबंधितांमार्फत असंतोष असणे, संचालक पदाच्या कालावधीत ३०% ज्यादा दराने अग्निशमन दलासाठी सुमारे १५०० कोटी रुपयांचे वाहन खरेदी करून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करणे, वरिष्ठांना कोट्यावधी रुपयांची रक्कम देऊन संचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार वर्षानुवर्षे स्वतःकडेच ठेवलेला असणे, संचालक पदावर नियमित व्यक्तीची नेमणूक करून देणे, शेकड़ो कोटी रुपयांची बेहिशोबी मालमत्ता संपादित करून मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई परिसरात कोट्यावधी रुपयांच्या मालमत्तांची खरेदी केलेली असणे, याबाबत तक्रारी असल्यामुळे शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## मा. मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने "Ease of doing business" च्या अंतर्गत सन - २०१६ पासुन "Building Plan Approval Management System" (BPAMS) ही सुविधा कार्यान्वित केली असुन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत प्राथमिक अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र व अंतिम अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र ही ऑनलाईन पध्दतीने अदा करण्यात येतात. दि.२७/१०/२०१४ च्या परिपत्रकानुसार १५००१ चौ.मी.पेक्षा जास्त बांधकाम क्षेत्रफळ असलेल्या इमारती व ३० मीटरपेक्षा जास्त उंचीच्या इमारती यांना अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र अदा करण्याचे अधिकार मुख्य अग्निशमन अधिकारी व अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडे देण्यात आलेले आहेत. १५००० चौ.मी. पेक्षा कमी बांधकाम क्षेत्रफळ असलेल्या इमारती व ३० मीटरपेक्षा कमी उंचीच्या इमारतींना अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचे अधिकार कनिष्ठ अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले आहेत व दि.२७/१०/२०१४ रोजीच्या परिपत्रकानुसार संबंधित अधिकारी त्यांचे स्तरावर अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करीत आहेत. उपरोक्त अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्रांसाठी उद्योजकांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कुठल्याही कार्यालयात व्यक्तीशः जावे लागत नाही.

महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रांतील सर्व रहिवाशी इमारतींना अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्रे संबंधित महानगरपालिका व नगरपालिका यांच्या अग्निशमन विभागामार्फत अदा करण्यात येतात. तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व महानगरपालिका यांच्या अखत्यारीत येत नसलेल्या इमारतींना अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचे अधिकार महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय आदेश क्र. एमएफएस / ५१ / २०२२ /३९१, दि.०४/०३/२०२२ अन्वये स्थानिक अग्निशमन अधिका-यांना सोपविण्यात आलेले आहेत. श्री.संतोष वारीक, संचालक, महाराष्ट्र राज्य तथा मुख्य अग्निशमन अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याबाबत भ्रष्टाचाराच्या कोणत्याही तक्रारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे प्राप्त झालेल्या नाहीत.

महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयामार्फत कोणत्याही प्रकारची अग्निशमन वाहने खरेदी करण्यात आलेली नाहीत. अग्निशमन दलासाठी लागणारी वाहने संबंधित महानगरपालिका व नगरपालिका आपल्या

स्तरावर खरेदी करतात. महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत राज्यातील ड वर्ग महानगरपालिका / नगर परिषद/ नगर पंचायती यांचेकरीता वार्षिक ३०.०० कोटी एवढे अंदाजपत्रक असुन सदर महानगरपालिका / नगर परिषद / नगर पंचायती यांच्याकडून अग्निशमन वाहने खरेदी करण्याकरीता प्रस्ताव प्राप्त झाल्यास तो शासनास सादर करण्यात येतो व सदर प्रस्ताव शासनाने मंजूर केल्यावर संबंधित महानगरपालिका/नगर परिषद/नगर पंचायती यांना शासनाकडून उपलब्ध झालेला निधी हस्तांतरीत करण्यात येतो.

शासन निर्णय, नगरविकास विभाग क्रं.अशसे-२०२३/प्र.क्र.८९/नवि-४, दि.२४/०७/२०२४ अन्वये महानगरपालिका / नगरपालिकांमध्ये राबविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानाअंतर्गत अग्निशमन वाहनांची खरेदी व बांधणीबाबत महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाच्या स्तरावर आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असुन संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा हे सदर समितीवर सदस्य सचिव आहेत. सदर समितीने प्रस्ताव मंजूर केल्यानंतर अग्निसुरक्षा अभियाना अंतर्गत राज्यस्तरीय समितीपुढे सादर करण्यात येतो. या समितीमार्फत अद्याप एकाही वाहनाची खरेदी करण्यात आलेली नाही.

महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानाचे वार्षिक २०० कोटी रुपयांचे बजेट असुन त्यामध्ये अग्निशमन केंद्रांचे बांधकाम व अग्निशमन वाहन खरेदी यांचा समावेश असुन नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडून प्राप्त प्रस्तावाला राज्य सरकारने मंजूरी दिल्यानंतर सदर निधी संचालकामार्फत महानगरपालिका /नगरपालिका यांच्या मुख्याधिकारी यांच्याकडे हस्तांतरीत केला जातो. सदर बाबीत श्री.बारीक यांची कोणतीच भूमिका नसते.त्यानंतर संपुर्ण काम महानगरपालिका/नगरपालिका यांचे मुख्य अधिकारी करतात.

अग्निशमन वाहन खरेदीसाठी संचालक आणि आयुक्त, महानगरपालिका प्रशासन यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच समिती स्थापन करण्यात आली असुन अग्निशमन वाहनांची निविदा दि.०८/०७/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यामुळे महाराष्ट्र अग्निशमन सेवेचे संचालक म्हणून श्री.बारीक यांनी आजपर्यंत अग्निशमन वाहनांसह कोणत्याही प्रकारची उपकरणे खरेदी केलेली नाहीत. त्याचप्रमाणे आपत्तीं व्यवस्थापन,मदत व पुनर्वसन विभागाच्या संचालकांच्या देखरेखीखाली आणि नियंत्रणाखाली राज्य आपत्ती निधीद्वारे वाहन/साहित्य यांची खरेदी केली जाते. श्री.बारीक हे तांत्रिक मुल्यांकन समितीचे सदस्य आहेत.

श्री.संतोष बारीक यांच्याकडे दि.०१/१२/२०१४ ते दि.१६/०४/२०१६ पर्यंत महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाच्या संचालक पदाचा अतिरीक्त कार्यभार सोपविण्यात आला होता. दि.१६/०४/२०१६ ते दि.३१/०१/२०२१ पर्यंत महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाच्या संचालक पदाचा अतिरीक्त कार्यभार तत्कालीन मुख्य अग्निशमन अधिकारी, मुंबई अग्निशमन दल श्री. प्रभात रहांगदळे यांच्याकडे सोपविण्यात आलेला होता. सदर पदासाठी शहरी स्थानिक स्वराज्य संस्था अथवा विशेष नियोजन प्राधिकरणांमध्ये मुख्य अग्निशमन अधिकारी म्हणून किमान १० वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. सध्या उपरोक्त अनुभव शहरी स्थानिक स्वराज्य संस्था यामधील कोणत्याही अधिकाऱ्याकडे नसल्यामुळे सन २०२१ मध्ये श्री.संतोष श्रीधर बारीक यांच्याकडे महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाच्या संचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. श्री.बारीक यांनी त्यांच्या कार्यकाळात अग्निशमन कायदा, अग्निशमन नियमांमध्ये यशस्वीरित्या सुधारणा केल्या असुन १५ व्यां वित्त आयोगांतर्गत ६१५ कोटी रुपयांच्याह प्रस्तावाला मंजूरी देखील मिळालेली आहे. श्री.संतोष बारीक, मुख्य अग्निशमन अधिकारी व अग्निशमन सल्लागार यांना केंद्र शासनाने दोन वेळा राष्ट्रपती पदक देऊन गौरविण्यात आलेले आहे व ते तांत्रिक व प्रशासकीयदृष्ट्या सक्षम आहेत.

x-xx-x-x-x-x-x-x-x-x-x

# महाराष्ट्र विधानसभा

## सन- २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. २०३४

श्री. सुहास कांदे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २०३४ पुढीलप्रमाणे आहे:-

"महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे नाशिक येथील प्रादेशिक अधिकारी, तत्कालीन उप रचनाकार व तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी व नाशिक शहरातील विकासक यांनी संगनमताने वेगवेगळ्या नावाने कंपन्या स्थापन केलेल्या असणे, सातपूर व अंबड परिसरातील अनेक भूखंडामधील कंपन्या दिवाळखोरीमुळे व आर्थिक अडचणींमुळे बंद पडलेल्या असणे, सदरचे प्लॉट एम.आय.डी.सी च्या मालकीचे असणे, ते प्लॉट एम.आय.डी.सी.ने ताब्यात घेणे आवश्यक असणे, परंतु असे न करता प्लॉटचे सब डिव्हीजन बेकायदेशीररित्या दस्तवऐवज करुन औद्योगिक विकास महामंडळानी परवानगी न घेणे, नाशिक विभागात १० ते १५ कंपन्याचे बेकायदेशीर सब डिव्हीजन केलेले असणे, सदर प्रकरणी गंगापूर पोलीस स्टेशन येथे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये तक्रार दाखल केलेली असणे, सदर जागेचे क्षेत्रफळ २,१९,४३७ चौ.मी. पेक्षा जास्त असणे, सब डिव्हीजन झाल्यानंतर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचेकडून दिनांक १५ मार्च, २०२४ रोजीच्या दरपत्रकाप्रमाणे जागांचे अलॉटमेंट झालेले नसणे, वितरण झालेले नसणे, बेकायदेशीरपणे प्लॉट हस्तांतरित केलेले असणे, शासनाचे आर्थिक नुकसान होणे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या नियमावलीप्रमाणे रस्तेमध्ये वर्ग करताना एम.आय.डी.सी. ची परवानगी आवश्यक असतांनासुध्दा न घेणे, यामध्ये खूप मोठी आर्थिक देवाण-घेवाण झालेली असणे, महामंडळाचे सुमारे १००० कोटी रुपयांचे नुकसान केलेले असणे, शासनाने सदरविषयी संबंधित अधिकारी व विकासकावर कायदेशीर कारवाई करणे व शासनाची प्रतिक्रिया.""

### मा. मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

म.औ.वि. महामंडळाच्या सातपुर, अंबड औद्योगिक वसाहती मधील मुळ १४ भुखंडाचे सन २०१४ पासुन सबडिव्हीजन विभाजन करण्यात आलेले आहे. सदर भुखंड १४ भुखंड धारकांनी म.औ.वि. महामंडळाच्या नियमानुसार इमारत पुर्णत्वाचा दाखला प्राप्त करून् उत्पादन सुरू केले होते. कालांतराने सदर भुखंडधारकाचे उद्योग अवसायनात गेल्यामुळे व उद्योग बंद पडल्यामुळे संबधित भुखंडधारकांच्या विनंतीनुसार व महामंडळाच्या धोरणानुसार सदर भुखंडाचे विभाजन करण्यात आलेले आहे. नाशिक (सातपुर) व अति. नाशिक अंबड औद्योगिक क्षेत्रामधील विभाजन करण्यात आलेल्या भुखंडांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | औद्योगिक क्षेत्र | भुखंड क्रमांक | एकुण क्षेत्र | एकुण विभाजीत भुखंड |
|---|---|---|---|---|
| १ | सातपुर | १७,१८,१८/P | ६७७०८ | ५७ |
| २ | | ९१/३ | १०८०० | २० |
| ३ | | ७३ | २०६६४ | २४ |
| ४ | | ६७ | २०३२३ | ०५ |
| ५ | | ए-११/२, ए -११/३ | ३३४२२ | २७ |
| ६ | | ए -२३ | ५००० | ०३ |
| ७ | | बी-१/१ | २६३५६ | २३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | वी-१/२ | | |
| ८ | | वी-१९<br>वी-१९/पार्ट | १६१७४ | २३ |
| ९ | अंबड | ई-२० | १००० | ०२ |
| १० | | ई-७७ | ७६३८ | ०७ |
| ११ | | एच-१४३/१ | ३२५१ | ०४ |
| १२ | | एच-१४४/१ | ४००० | ०४ |
| १३ | | एच-१५० | २३६० | ०२ |
| १४ | | ए-१९/२/१९ | ७४१ | ०३ |

म.औ.वि. महामंडळाच्या नाशिक (सातपुर) व अति. नाशिक अंबड औद्योगिक क्षेत्रातील करण्यात आलेले विभाजन हे भुखंडधारकाचे विनंतीनुसार तसेच महामंडळाचे विभाजन संदर्भातील दि.०३/१०/ १९९१, दि. २०/०७/२००६ व दि. २५/०६/२०१४ रोजीच्या परिपत्रकानुसार व समुचित प्राधिकरणाच्या मंजुरी नुसार करण्यात आलेले आहे. म.औ.वि. महामंडळाच्या दि. १२/०५/१९९८ रोजीच्या परिपत्रकानुसार सदर भुखंडाचे हस्तांतरण करण्यात आलेले आहे

*************************

२४३.

# महाराष्ट्र विधानसभा

## सन- २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. २०४८

श्री. विजय वडेट्टीवार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २०४८ पुढीलप्रमाणे आहे:-

"पुणे येथील भोसरी येथील पिंपरी औद्योगिक क्षेत्रात महिला उद्योजकांना सामुहिक गटासाठी भुखंड क्र. बीजीपी-१०७ रुक्मिणी महिला इंजिनिअरींग असोसिएशन, भोसरी पुणे या संस्थेस वाटप करण्याबाबत त्यांनी शासनाकडे अनेकदा मागणी करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नसणे, रुक्मिणी महिला इंजिनिअरींग असोसिएशन ही संस्था सुक्ष्म, लघू उपक्रम -समुह विकास योजनेतंर्गत (MSE-CDP) महिला इंजिनिअरींग क्लस्टर, भोसरी महाराष्ट्र, पुणे या प्रकल्पास राज्य सरकारची मान्यता असून एम.आय.डी.सी. औद्योगिक क्षेत्रात जागा वाटप केल्यावर सदरच्या रुक्मिणी महिला इंजिनिअरींग असोसिएशन यांना केंद्र सरकारची मान्यता प्राप्त करणे शक्य असणे, याबाबत दिनांक २८ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग सारथी अंधेरी (पुर्व) यांच्याकडे सदर प्रकल्पास सामाईक सुविधा केंद्र (CFC) उभारणीसाठी एम.आय.डी.सी. विभागाकडे प्लॉट मिळण्याबाबत मागणी केलेली असूनही अद्याप कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने या संस्थेतील सदस्यांमध्ये व स्थानिक नागरिकांत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

### मा. मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

मे. रूक्मिणी महिला इंजिनिअरिंग असोसिएशन यांनी त्यांच्या ८० महिला सभासदांसाठी Engineering Cluster योजना राबविण्यासाठी पिंपरी औद्योगिक क्षेत्रामधून प्रत्येकी २०० चौ.मी. आणि अंतर्गत रस्ते व इतर सुविधांकरीता भूखंड क्र. BGP-१०७ व BGP-१०७ पार्ट क्षेत्र २१२५० चौ.मी. भूखंड वाटपाची विनंती केली आहे.

संस्थेने मागणी केलेला भूखंड क्र.बीजीपी-१०७ व १०७ पार्ट क्षेत्र २१२५० चौ.मी. हा Truck Terminus वाहनतळाकरिता म.औ.वि.महामंडळाच्या DCR १९९९ चे रेगुलेशन क्र. ३३ व म.औ.वि. महामंडळाचे परिपत्रक क्र. ४११, दि.१४/०६/२००१ अन्वये राखीव आहे.

यापूर्वी सदरचा भूखंड क्र.बीजीपी-१०७ व १०७ पार्ट क्षेत्र २१२५० चौ.मी. पिंपरी चिंचवड ट्रक टर्मिनल असोसिएशनचे अध्यक्ष श्री.के.एम.पटवर्धन यांना वाहनतळासाठी वाटप करण्यात आला होता. तथापि, भूखंडधारकाने करारनाम्यातील अटीनुसार भूखंड विकसित केला नसल्याने भूखंडाचा पंचनामा करुन मऔवि महामंडळाने दि. १४/०५/२००७ रोजी ताब्यात घेतलेला आहे.

सदरहू भूखंड काढून घेण्याबाबतच्या पत्रांति महामंडळाच्या कारवाई विरोधात पिंपरी चिंचवड ट्रक टर्मिनल असोसिएशनचे अध्यक्ष श्री.के.एम.पटवर्धन यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे सन २०१७ मध्ये दावा दाखल केला आहे.

भूखंड क्र.बीजीपी-१०७ व १०७ पार्ट क्षेत्र २१२५० चौ.मी. हा Truck Terminus करिता राखीव आहे. त्यामुळे सद्यस्थितीत सदरहू भूखंडाचे वाटप अभियांत्रिकी सामाईक सुविधा केंद्रासाठी (CFC) करता येणार नाही.

मे. रुक्मिणी महिला इंजिनिअरींग असोसिएशन, भोसरी पुणे या संस्थेशिवाय भूखंड क्र. BGP-१०७ व BGP-१०७ पार्ट क्षेत्र २१२५० चौ.मी. करीता खालील अर्जदारांनी देखील मागणी केलेली आहे.

| अ.क्र. | अर्जदाराची मागणी | भूखंड मागणीचे क्षेत्र चौ.मी. | अर्ज प्राप्त दिनांक | प्रयोजन |
|---|---|---|---|---|
| १ | के. एम. व्ही. इंडस्ट्रीज | ४०० | १६/०७/२०२४ | उद्योग विस्तार |
| २ | रामको ऑटोमॅटिक | २००० | १६/०७/२०२४ | उद्योग विस्तार |
| ३ | एलियोन डिव्हाईन कंपोनन्टिस प्रा.लि. | ८००० | १५/०७/२०२४ | उद्योग विस्तार |
| ४ | साईकृपा स्टील कॉर्पोरेशन | ६०० | १५/०७/२०२४ | उद्योग विस्तार |
| ५ | प्लास्टो क्राफ्ट | ५०० | १६/०७/२०२४ | उद्योग विस्तार |
| ६ | असोसिएशन ऑफ ट्रान्सपोर्ट पूना (REGD) | २१२५० | २२/०८/२०२४ | Thrust Sector |

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या धोरणानुसार एखाद्या भूखंडासाठी एकापेक्षा जास्त अर्जदारांची मागणी प्राप्त झाली असल्यास असा भूखंड निविदेद्वारे वाटप करण्यात येतो.

वरील बाबी विचारात घेता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास जास्त महसुल मिळण्याच्या दृष्टीकोनातून सदरहू भूखंडाचे औद्योगिक अथवा व्यापारी भूखंडात रुपांतरण करुन सदरहू भूखंडाचे वाटप ई-निविदेद्वारे करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचे स्तरावर कार्यवाही केली जाईल.

**********************

# महाराष्ट्र विधानसभा

## सन- २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. २११८

डॉ. बालाजी किणीकर, श्री.चंद्रकांत पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २११८ पुढीलप्रमाणे आहे:-

" अंबरनाथ औधोगिक क्षेत्रातील भूखंड क्र. १९/१ क्षेत्र ४७ हजार ८९२ चौ.मी. हा महामंडळाने सन २००४ मध्ये मे. प्यारेलाल टेक्स्टाईल मिल्स लि. प्रोप्रा-अंबर प्रोसेसर यांना दिलेला असणे, गेली १२ वर्षापासून सदर भूखंडावरील उत्पादन बंद असल्याने २२ हजार चौ.मी. क्षेत्र मोकळे असणे, त्यामुळे प्रादेशिक कार्यालयाने सदर भूखंड परत करण्याबाबतचा करारनामा रद्द करण्यासाठी मे, २०१५ मध्ये दिला असणे, सदर नोटीसच्या विरुध्द भूखंडधारकाने मा. जिल्हा न्यायालय, ठाणे/कल्याण व मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दावा दाखल केला असणे, भूखंडधारकानी मा. न्यायालयामध्ये दाखल केलेले दावे विनाशर्त मागे घेणे, तसेच निर्णयाची अमंलबजावणी केल्याच्या दिनांकापासून भूखंडधारक यांना भूखंडाचा विकासाकरिता दोन वर्षांचा कालावधी देऊन सदर कालावधीमध्ये उत्पादनात जाणे बंधनकारक राहील अशा अटीचे हमीपत्र घेऊन सदर प्रस्तावास मुख्यालयाने मंजुरी दिलेली असणे, तथापि अद्याप सदर भूखंडाचा विकास न होणे, उत्पादन सुरु करण्यात न येणे, तसेच भूखंडधारकाने सदर भूखंडाचे एकूण ६३ भागात विभाजन करण्याची विनंती महामंडळाकडे केली असता त्यास महामंडळाने मंजूरी देणे, सदर भूखंडधारक विभाजीत केलेले भूखंड विकून एक प्रकारे महामंडळाची दिशाभूल करीत असणे, शासनाने सदर प्रस्तावास तात्काळ स्थगिती देऊन यासर्व प्रकरणाची सखोल चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

### मा. मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

अंबरनाथ औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्र. १९/१ क्षेत्र ४७८९२ चौ.मी. हा भूखंड म.औ.वि. महामंडळाकडून दि.१४/०१/२००४ रोजी M/s. Paramal Spinnigand Weaving mill ltd यांच्या नावावरून M/s. Pyarelala Textile LTD. यांच्या नावे हस्तांतरीत करण्यात आलेला आहे. सदर भूखंडापैकी १०,७१५.७५ चौ.मी. क्षेत्रफळाची बीसीसी M/s. Paramal Spinnigand Weaving mill ltd यांनी १९९७ साली घेतली असुन उर्वरित ३७३७६.९५ चौ.मी. क्षेत्र आज देखील मोकळे आहे.

दरम्यान मोकळ्या भूखंडाच्या सर्वेक्षणावेळी भूमापक यांचे दि.१३/०४/२०१४ च्या अहवालामध्ये भूखंडावर २२००० चौ.मी. मोकळे क्षेत्र येत असल्याचे व उत्पादन बंद असल्याचे निदर्शनास आल्याने भूखंडामधील मोकळे क्षेत्र म.औ.वि. महामंडळास परत करणेबाबत दि.११/०८/२०१४, ०४/०१/२०१५ व ३१/०३/२०१५ रोजी नोटीस निर्गमित करण्यात आली असून दि.१५/०५/२०१५ रोजी इव्हिक्शन ॲक्ट १९५५ अंतर्गत भूखंडाचा ताबा घेणे बाबतची नोटीस निर्गमित करण्यात आली होती. वरील नोटीशीच्या विरोधात भूखंडधारक यांनी मा. दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर,उल्हारानगर येथील न्यायालयात पिटिशन क्र.३११/२०१८व मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन क्र. २८९१५/२०१८

दाखल केला होता. सदरचे दावे त्यांनी स्वतःहुन विनाशर्त मागे घेवुन रु.३००/- स्टॅमपेपरवर नोटराईज हमीपत्र सादर करून दोन वर्षाच्या कालावधीत भूखंडाचा विकास करून उत्पादन सुरू केले जाईल याबाबत दि.१०/०९/२०२० रोजी विनंती पत्र दिल्यावरून करारनामा रद्द करण्यासाठी बजावण्यात आलेली नोटीस मागे घेण्यात आली .

अर्जदाराने दि.२६/०६/२०२३ च्या पत्रानुसार भूखंड क्र. १९/१ या भूखंडावर नियमाप्रमाणे बांधकाम पुर्णत्वाचा दाखला पहिल्या वर्षी २०% व दुसऱ्या वर्षी ४०% चटई निर्देशानुसार बांधकाम करून दि.३०/०६/२०२४ पर्यत बांधकाम पूर्ण करणे क्रमप्राप्त होते. त्यानुसार भुखंडधारकाकडुन Non Utilisation चार्जेस आकारणी महामंडळाच्या दि.२/०८/२०२१ रोजीच्या परीपत्रकानुसार लेखा व वित्त विभाग, यांनी परिगणित केल्यानुसार दि.०१/०७/२०२२ पासुन ३१/०८/२०२४ रोजीच्या कालावधी करीता Non Utilisation Charges रक्कम रू. १,७७,५२.५६५.६५+ १८% GST ३१,९५,४६१.८१७ एकूण रक्कम रु.२,०९,४८,०२७.४६७ ही रक्कम आकारणी करण्यात येवून १५ दिवसाच्या आत भरणा करण्यात यावी. अशा बाबतचे पत्र दि.३०/०८/२०२४ रोजी संबंधित भूखंडधारकास निर्गमित करण्यात आले आहे.

तथापि, सदरची रक्कम न भरता भूखंडधारकाने दि. १६/०८/२०२४ रोजी विनंती अर्जान्वये भूखंड क्र.१९/१ या भूखंडावर एकुण ६३ भूखंडाचे विभाजन करून देणेबाबतची विनंती केली. त्यानुसार म.औ.वि. महामंडळाच्या नियोजन विभागाने दि.१७/०१/२०२५ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार म.औ.वि. महामंडळाच्या आदेश क. ६०३ दि.२०/०२/२०२५ अन्वये एकूण ६३ भूखंडाची विभागणी करून अटी व शर्ती नमूद करून दि.१/०७/२०२२ ते दि.२८/०२/२०२५ पर्यंत Non Utilisation Chargen + १८% GST असे मिळून रू.२,५९,८१,८८३.८७ भरणा करणे बाबत संबधित भूखंडधारकास कळविण्यात आले होते.

त्यानुसार भूखंडधारकांनी दि.३०/०५/२०२५ रोजी उपरोक्त Non Utilisation ची रक्कम म.औ.वि.महामंडळास भरणा केलेली आहे. सदरची रक्कम भरणा केल्यानंतर म.औ.वि महामंडळाच्या नियोजन विभागाच्या मान्यतेने नियमाप्रमाणे भूखंड क्र. १९/१ एकुण ६३ भूखंडाचे विभाजन करण्यात आले. त्यापैकी म.औ.वि महामंडळाकडून कोणत्याही विभाजीत भूखंडाच्या हस्तांतरणाची परवानगी आजपर्यंत देण्यात आलेली नाही किंवा याबाबत संबधित भूखंडधारकाकडून भूखंड विक्री बाबत कोणत्याही प्रकारचा विक्री अथवा हस्तांतरणाबाबतचा अर्ज म.औ.वि महामंडळास प्राप्त झालेला नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी कारवाई करण्याबाबत म.औ.वि.महामंडळाकडून कोणतीही कार्यवाही सुरु नाही.

************************

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक-१८५२</u>

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन**

**श्री. निलेश राणे, वि.स.स** यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना क्रमांक-१८५२** पुढीलप्रमाणे आहे. :-

"श्रीवर्धन (जि. रायगड) तालुक्यातील प्रदुषणकारी बॉक्साईट उत्खनन सर्रासपणे सुरु असल्याचे नुकतेच माहे एप्रिल, २०२५ मध्ये उघडकीस येणे, सदरहू प्रकल्पाबाबत जारे, कुरवडे, गुळधे, वांजळे, मामवली, शेखाडी, भरडोली, गडबवाडी, बापवली, मेघरे येथील ग्रामस्थांचा तीव्र विरोध असणे, सर्रासपणे सुरु असलेल्या बेसुमार उत्खननामुळे श्रीवर्धन तालुका पोखरला जात असून याचा परिणाम येथील मदगड किल्ल्यासह तालुक्यातील बागायती पिकांवर होत असून पिकांची गुणवत्ता खालावली जात असणे. त्याचबरोबर स्थानिक नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून ग्रामस्थांना श्वसनाचा व डोळयांचा त्रास होणे, अनेक ठिकाणी पाण्याच्या झ-यांची दिशा बदलली असून विहीरी कोरड्या पडू लागल्या असणे, सदरहू बॉक्साईट उत्खननामुळे भविष्यात पाणीटंचाईचे सावट येण्याची शक्यता, सतत सुरुंग स्फोट व उत्खननामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शान पावन झालेल्या मदगडकिल्ला बेसुमार उत्खननामुळे किल्ला ढासळण्याच्या स्थितीत असणे, सदरहू मायनिंग प्रकल्प तात्काळ बंद करण्याची ग्रामस्थांनी केलेली मागणी, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, सदरहू प्रदुषणकारी बॉक्साईट उत्खनन तात्काळ बंद करण्याबाबत शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

**श्री.शंभुराज देसाई मा.मंत्री (खनिकर्म) यांचे निवेदन**

रायगड जिल्हयामध्ये प्रमुख खनिजाचे (बॉक्साईट खनिज) साठे असून श्रीवर्धन तालुक्यामध्ये शासनाने १० खाणपट्ट्यांना मंजूरी दिली असून, त्यापैकी ०७ खाणपट्टे सद्यस्थितीत कार्यरत आहेत. सदर खाणपट्ट्यांना नियमानुसार केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालय यांचेकडील पर्यावरण ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त असून, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचीही मंजूरी प्राप्त आहे. खाणपट्टा सुरु करण्यापूर्वी पर्यावरण ना-हरकत दाखला देताना ग्रामपंचायतीचे ना-हरकत प्रमाणपत्र सुद्धा प्राप्त करण्यात येते. खाणपट्ट्यांमधून, भारतीय खाण ब्युरो यांनी मंजूर केलेल्या खाणकाम आराखड्यानुसार (Mining Plan) उत्खनन केले जाते. उत्खनन केलेल्या खनिजावर "एकात्मिक खाणपट्टा व्यवस्थापन प्रणाली" (Integrated Lease Management System) द्वारे नियंत्रण ठेवले जाते. यामुळे मंजूर खाणकाम आरखड्यापेक्षा जास्त उत्खनन करता येत नाही.

श्रीवर्धन तालुक्यातील बॉक्साईट खनिजाच्या बेसुमार उत्खननाबाबत माहे जानेवारी २०२५ ते एप्रिल २०२५ च्या दरम्यान काही गावातील ग्रामस्थांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. सदर तक्रारींच्या अनुषंगाने तहसीलदार श्रीवर्धन व विविध यंत्रणांकडून चौकशी करण्यात आलेली आहे. श्रीवर्धन तालुक्यातील बॉक्साईट उत्खनन खाणीमधून उडणाऱ्या धुळीमुळे बागायती पिकांवर दुष्परीणाम होत असलेबाबतची तक्रार मौजे बागमांडला येथील शेतकऱ्यांनी दिनांक २९/१२/२०२४ रोजी जिल्हा कृषी अधिक्षक रायगड यांचेकडे तक्रार केली होती. त्यानुषंगाने, याप्रकरणी चौकशीसाठी कृषि विभाग समिती व विद्यापीठ शास्त्रज्ञ समिती (डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली) स्थापन करण्यात आलेली आहे. सदर समितीने दि. ०६/०१/२०२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी करुन मौजे बागमांडला येथील बागायती पिकांचे पानांचे नमुने पृथक्करणासाठी घेतले असून त्यांचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. विद्यापीठ शास्त्रज्ञ समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर बागायती पिकांवर दुष्परिणाम होत आहे की नाही याबाबत स्पष्टता येईल. मंजूर खाणपट्ट्याच्या परिसरातील ग्रामस्थांच्या आरोग्यावर



कृ.मा.प.

खाणकामांमुळे विपरित परिणाम होत आहे किंवा कसे याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी, रायगड जिल्हा परिषद रायगड-अलिबाग यांचेकडील प्राप्त अहवालानुसार श्रीवर्धन तालुक्यातील जारे, कुरवडे, गुळधे, वांजळे, मामवली, शेखाडी, भरडोली, गडबवाडी, बापवली, मेघरे येथील गावातील स्थानिक नागरिकांच्या आरोग्यावर श्वसनाचा व डोळयांचा त्रास दिसून आला नसल्याचे अहवालात नमूद केलेले आहे.

बॉक्साईट खनिज हे सामान्यत: मऊ स्वरुपाचे खनिज असल्याने त्याचे उत्खनन करताना कोणत्याही स्फोटकाचा वापर करण्याची आवश्यकता नसते. त्यामुळे या क्षेत्रामध्ये जमिनीला मोठे तडे/भेगा पडण्यासारखे भूपृष्ठीय बदल संभवत नाहीत. बॉक्साइटच्या उत्खननामुळे रायगड जिल्हा परिषद (ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, श्रीवर्धन) यांचेकडून पाणीटंचाई बाबत प्राप्त अहवालानुसार मौजे कुरवडे, गळधे, वांजळे, मामवली, भरडोली, गडबवाडी, बापवली व मेघरे येथे विहीरीव्दारे पाणी पुरवठा सुरु असून सदर गावांना टंचाई भासत नाही. मौजे शेखाडी येथे फ़क्त उन्हाळयात विहीरीची पाणी पातळी कमी होत असल्याचे नमूद आहे.

तहसीलदार, श्रीवर्धन यांच्या अहवालानुसार मदगड किल्ला असलेल्या परिसरातील मौजे खुजारे येथील खाणपट्ट्याच्या क्षेत्राशी निगडीत मंडळ अधिकारी, बोर्लीपंचतन यांनी प्रत्यक्ष स्थळदर्शक पंचनामा केला असून, मदगड किल्ला हा उत्खनन ठिकाणापासून ३ ते ४ किलोमीटर अंतरावर असून उत्खनन ठिकाणी सुरुगांचे सहाय्याने स्फ़ोट (Blasting) केले जात नसल्यामुळे सदर किल्ल्याला तडे गेल्याचे दिसून आलेले नाही.

मौजे खुजारे येथील काही नागरिकांकडून जिल्हाधिकारी रायगड, यांचेकडे खुजारे येथील मायनिंग प्रकल्प तात्काळ बंद करण्याबाबचची तक्रार प्राप्त झालेली होती. त्याअनुषंगाने, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून दिनांक ०४/०४/२०२५ रोजी पाहणी करण्यात आली असून, खुजारे येथील खाण प्रकल्पास काही अटी व शर्तीचे पालन न केल्याने कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. दरम्यान, ग्रामस्थ मंडळ खुजारे व ग्रुप ग्रामपंचायत मेघरे यांनी जिल्हाधिकारी, रायगड यांना, अनुक्रमे दिनांक १२/०२/२०२५ व दिनांक १०/०३/२०२५ रोजीच्या पत्रान्वये मौजे मेघरे व मौजे खुजारे हद्दीतील बॉक्साईट खाण प्रकल्पामुळे या परिसरातील ग्रामस्थांना रोजगार उपलब्ध होऊन, गावांचा विकास होत असल्यामुळे सदर प्रकल्प कायमस्वरुपी सुरु ठेवणेबाबतचे निवेदन, स्थानिक ग्रामस्थ यांच्या सह्या व अंगठे घेवून सादर केलेले आहे.

******************

H/772-19

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

## विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक-१०२४

श्री. समीर कुणावार, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१०२४ पुढीलप्रमाणे आहे:-

"सर्वांसाठी घरे २०२२ अंतर्गत शासन निर्णयानुसार सन २०११ पर्यंतच्या अतिक्रमणधारक नागरिकांना घरकुलाचा लाभ मिळत असणे, परंतू वर्धा जिल्ह्यातील अद्यापही १५ ते २० हजार नागरीक, २०११ नंतरचे अतिक्रणधारक असल्यामुळे ते घरकुलापासून वंचित असणे, सदर वंचित अतिक्रमणधारक नागरिकांची अडचण लक्षात घेऊन २०११ ऐवजी २०१५ पर्यंतच्या अतिक्रमणधारक नागरीकांना अतिक्रमण नियमाकुल करुन घरकुल योजनेचा लाभ मिळणे गरजेचे असणे, परंतू त्यांना त्याचा लाभ न मिळणे त्यामुळ नागरिकात निर्माण झालेला असंतोष व चिडेची भावना, शासनाने नागरिकांना सन २०११ पर्यंत अतिक्रमणधारकांना मिळणा-या घरकुल योजनेचा लाभ २०१५ पर्यंतच्या अतिक्रमणधारक नागरिकांना मिळण्याकरिता नविन शासन धोरण जाहीर करणे बाबत दिनांक १३/५/२०२५ रोजी महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी (हिंगणघाट) केलेली पत्राद्वारे मागणी, सदर मागणीवर अद्यापर्प्यत कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, त्यामुळे शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा.मंत्री (ग्रामविकास व पंचायत राज) यांचे निवेदन

"सर्वांसाठी घरे-२०२२" या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना अतिक्रमित जागा निवासासाठी उपलब्ध करुन देण्याकरीता महसूल व वन विभागाचे शासन परिपत्रक दि. ०४ एप्रिल, २००२ मध्ये सुधारणा करुन ग्राम विकास विभागाने दि. १६ फेब्रुवारी, २०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित केला. तसेच या धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत शासन परिपत्रक दि. २० ऑगस्ट, २०१८ अन्वये मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. त्यानुसार सर्वसाधारणपणे गायरान जमिनी, सार्वजनिक वापरातील जमिनी व वनक्षेत्र तसेच ज्या जमिनीवर वास्तव्य करणे शक्य नाही, अशा जमिनी वगळून इतर शासकीय जमिनीवरील दि. ०१ जानेवारी, २०११ पर्यंतची निवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण करुन राहणाऱ्या सर्व अतिक्रमण धारकांची अतिक्रमणे नियामाकुल करण्याची तरतूद करण्यात आली. सदर शासन निर्णय घरकुलासाठी पात्र लाभार्थ्यांकरिता घेण्यात आलेला आहे.

वर्धा जिल्ह्यामध्ये एकूण १७७५ भूमिहीन लाभार्थी असून त्यापैकी १४१ लाभार्थ्यांना विविध मार्गाने घरकूलासाठी जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. उर्वरीत १६३४ लाभार्थ्यांपैकी ६१ लाभार्थी गावठाण क्षेत्रात, २१ लाभार्थी वाढीव गावठाण क्षेत्रात, १३१ लाभार्थी महसूल जागेवर, ३१

लाभार्थी इतर शासकीय जागेवर व २४७ लाभार्थी वन विभागाच्या जागेवर निवास करुन राहत आहे. असे एकूण ४९१ लाभार्थी वेगवेगळ्या ठिकाणी शासकीय जागेवर राहत आहेत, परंतू सदर लाभार्थ्यांकडे अतिक्रमण नियमाकुल करणेकरीता आवश्यक दि. ०१.०१.२०११ रोजी पूर्वीचे पूरावे उपलब्ध नसल्यामुळे त्यांचे अतिक्रमण नियमाकुल करता आले नाही. उर्वरीत ११४३ लाभार्थ्यांसाठी सद्यस्थितीत जागा उपलब्ध नाही. अशी परिस्थिती असून त्यांना पंडीत दीन दयाल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेतून तसेच इतर मार्गाने शासकीय जागा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी (हिंगणघाट येथील) मा. मंत्री, महसूल यांना दि. १३.०५.२०२५ रोजी दिलेले निवेदन या विभागास प्राप्त झाले आहे. घरकुल योजनेचा लाभ २०१५ पर्यतच्या अतिक्रमणधारक नागरीकांना देण्याच्या विनंती संदर्भात धोरणात्मक बाब असल्याने त्यावर विहीत कार्यपध्दतीनुसार छाननी करुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. ग्रामविकास विभागामार्फत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण या योजनेची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार केली जाते. तसेच राज्य पुरस्कृत विविध घरकुल योजना ह्या त्या त्या योजनेच्या निकषानुसार ग्राम स्तरावर संबंधीत विभागाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राबविण्यात येतात.

---

लक्षवेधी सूचना क्र.६

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. अतुल भातखळकर, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.६ पुढीलप्रमाणे आहे :-

"सामाजिक अंकेक्षण आणि पारदर्शकता सोसायटी या संस्थेच्या अहवालानुसार २०२१ ते २०२४ मध्ये परभणी, सातारा, पुणे, ठाणे, आणि मुंबई शहर या जिल्ह्यात मैला टाकी व मलजल वाहिन्या सफाई करताना १८ सफाई कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये सफाई कर्मचाऱ्यांना बचावात्मक उपकरणेच दिली जात नसल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे हाताने मैला सफाईस कायद्याने बंदी असूनही कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई होत नसल्याचे ही निदर्शनास येणे, त्यामुळे मैला टाकी व मलजल वाहिन्या साफसफाईसाठी यंत्रसामग्रीचा वापर करण्याकरिता उपाययोजना करण्याची गरज असणे, तसेच, याकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया".

## मा.मंत्री (सामाजिक न्याय) यांचे निवेदन

सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार यांनी दिनांक १८.१०.२०२३ च्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्यातील मुंबई, परभणी, पुणे, सातारा, ठाणे या ५ जिल्ह्यातील मृत्यू झालेल्या स्वच्छता कामगारांचे प्रकरणी सामाजिक अंकेक्षण करण्याच्या सूचना महाराष्ट्र राज्य सामाजिक व अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटीला दिल्या होत्या. त्यानुषंगाने सदर संस्थेने पुणे, मुंबई, परभणी, सातारा या ४ जिल्ह्यातील मृत्यू झालेल्या १८ स्वच्छता कामगारांच्या प्रकरणी दिनांक २०.११.२०२३ ते दिनांक १७.१२.२०२३ या कालावधीत सामाजिक अंकेक्षण करुन सामाजिक अंकेक्षण अहवाल दिनांक २०.१२.२०२३ रोजी National Resource Centre Social Audit, (NRCSA),सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय भारत सरकार यांना विहित नमुन्यात सादर करण्यात आला आहे.

सन २०२१ ते २०२४ या कालावधीत मैला टाकी व मलजल वाहिन्या सफाई करताना परभणी जिल्ह्यात ०५, सातारा जिल्ह्यात ०१, पुणे जिल्ह्यात १०, ठाणे जिल्ह्यात ०२, आणि मुंबई शहरात ०० याप्रमाणे १८ व्यक्ती मयत झाल्या असून पुण्यातील ०२ अकस्मात मृत्युची नोंद वगळता इतर सर्व प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले असून पोलीसांमार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध आणि त्यांचे पुनर्वसन अधिनियम २०१३ च्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने या विभागाच्या दिनांक १२.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये सफाई कामगार काम करीत असतांना गुदमरुन अथवा कामावरील अपघातामुळे मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसांना रु. १० लाखाची नुकसान भरपाई अदा करण्यासाठी सक्षम प्राधिकारी (जबाबदार अधिकारी) निश्चित केलेले आहेत. त्यानुसार पुण्यातील एका प्रकरणात वारस उपलब्ध न झाल्याने नुकसान भरपाई अदा न झालेले ०१ प्रकरण वगळता इतर सर्व प्रकरणांत पिडीतांच्या वारसांना या विभागाच्या दिनांक १२.१२.२०१९ च्या शासन निर्णयानुसार नुकसान भरपाईची रक्कम संबंधितांकडून अदा करण्यात आली आहे. तसेच मयत मॅन्युअल स्कॅव्हेंजर्स यांच्या वारसांना नुकसान भरपाई देण्याबाबत या विभागाकडून सुधारित शासन निर्णय दि. ३०.०४.२०२५ रोजी निर्गमित करण्यात आला असून सदर शासन निर्णयानुसार आता मृत्यूप्रकरणी रु. १० लाख ऐवजी रु. ३० लाख इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात येणार असून कायमस्वरुपी अपंगत्व

आल्यास रु. २० लाख व अपंगत्व आल्यास रु. १० लाख इतकी नुकसान भरपाई देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

केंद्र शासनाच्या नॅशनल ॲक्शन फॉर मेकनाईज्ड सॅनिटेशन इकोसिस्टम (नमस्ते) योजनेंतर्गत राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेतील ६४४३ नोंदणीकृत मैला टाकी व मलजल वाहिन्या सफाई कर्मचाऱ्यांना पी.पी.ई.किट्स (बचावात्मक उपकरणे) वाटप केली आहेत.

नगर विकास विभागाने दिनांक ०५.०३.२०१८ च्या शासन निर्णयान्वये व दिनांक ०३.०५.२०२४ च्या परिपत्रकान्वये सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी सेप्टीक टँक, भूमिगत गटारे इत्यादींची साफसफाई केवळ यांत्रिकी पध्दतीने अथवा मशीनद्वारे करण्याबाबत सूचना निर्गमित केल्या असून केवळ अपरिहार्य परिस्थितीतच कामगारांमार्फत साफसफाई करण्यात यावी अशा सूचना दिलेल्या आहेत.

तसेच, हाताने मैला उचलणे या कुप्रथेचे समूळ उच्चाटन होण्यासाठी तसेच हाताने मैला उचलणारे सफाई कर्मचारी (मॅन्युअल स्कॅव्हेंजर्स) यांचे काम करताना गुदमरुन होणारे मृत्यु टाळण्याच्या अनुषंगाने मॅनहोल, भूमिगत गटारे/ मल जलवाहिन्या, सेप्टीक टाकी / मलकुंड टाकी तसेच सिवेज टाकीची स्वच्छता करणारी वाहनयुक्त यांत्रिकीकृत उपकरणे / रोबोटिक स्वच्छता यंत्रे त्याचबरोबर आपात्कालीन प्रतिसाद स्वच्छता युनिट वाहने खरेदी करण्याची हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांच्या (मॅन्युअल स्कॅव्हेंजर्स) कल्याणासाठी "मॅनहोलकडून मशिनहोलकडे" ही योजना राबविण्यास या विभागाच्या दिनांक १६.३.२०२४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. तथापि, तद्नंतर सदर योजनेची अंमलबजावणी नगर विकास विभागामार्फत करण्याचा निर्णय झालेला असून त्यानुषंगाने नगर विकास विभागाकडून त्यांच्या दिनांक ०४.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयास अनुसरून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. प्रस्तुत प्रयोजनार्थ टप्प्याटप्प्याने रु.५०२.४० कोटी इतका खर्च अपेक्षित असून सन २०२४-२५ च्या पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे या विभागास मंजूर झालेला रु.१०० कोटी इतका निधी दिनांक ३१.०३.२०२५ रोजी नगर विकास विभागास उपलब्ध करुन दिला असून सदर राज्यस्तरीय योजनेंतर्गत राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी ४१४ सक्शन कम जेटींग वाहने खरेदी करण्याची प्रक्रिया नगर विकास विभागाकडून सुरु करण्यात आली आहे.

*************

लक्षवेधी सचना क्र.१९९५

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५-[illegible] च्या पावसाळी अधिवेशन

श्री.हिकमत उढाण, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१९९५ पुढीलप्रमाणे आहे :-

"मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत पॅकेज क्रमांक JLN-७९ या पॅकेज अंतर्गत उटवद, धांडेगाव ते इजिमा ७० (ता.जि.जालना) या ५ कि.मी. रस्त्याच्या दर्जोन्नतीकरिता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेकरिता रुपये ४ कोटी रुपये मंजूर करण्यात आलेले असणे, सदर कामाकरिता ३ वेळेस कार्यादेश निर्गमित करुन देखील कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, जालना यांच्या मनमानी कारभारामुळे सदरहू रस्त्याची दुर्दशा झालेली असणे, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजूर कामांकरिता इतर योजनेतून निधी वर्ग करुन कंत्राटदाराच्या संगनमताने बनावट देयकांच्या आधारे निधीमध्ये गैरव्यवहार करणे, दिनांक २६ सप्टेंबर, २०२२ रोजी कार्यारंभ आदेश देऊनही अद्याप कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, जालना यांचेकडून अद्याप ना-हरकत आदेशाचे वाटप करण्यात आलेले नसणे, कंत्राटदाराशी संगनमत करुन दर्जाहीन कामे केलेल्या कंत्राटदारांना काळ्या यादीत न टाकता त्यांचेकडून आर्थिक गैरव्यवहार करणे,

ग्रामपंचायत स्तरावरील असलेली गाव विकासाची उदा. शाळा इमारत, समाज मंदीर, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रे यांचा मंजूर निधीमध्ये आर्थिक गैरव्यवहार करुन ग्रामपंचायतीस मज्जाव करणे, तालुक्यातील विविध विकास कामांतील निधीमध्ये हस्तक्षेप करुन शासनाची दिशाभूल करणे यासाठी कार्यकारी अभियंता, उप अभियंता व शाखा अभियंता जिल्हा परिषद, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, जालना यांचेवर निलंबनाची कारवाई करणेकरिता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

---

# मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे निवेदन

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत पॅकेज क्रमांक JLN-७९ या पॅकेज अंतर्गत उटवद धांडेगाव ते इजिमा ७० ता. जि. जालना या ५.०१ कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या दर्जोन्नतीकरिता विभागाच्या दि.३० ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये रू.३७८.२७ लक्ष इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. सदर कामाची निविदा दि.०३ जानेवारी २०१९ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. सदर निविदेत पात्र ठरलेले मे.आनंद कंन्सट्रक्शन, औरंगाबाद यांना दि.०८ मार्च, २०१९ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले. प्रस्तुत कामाची मुदत ०९ महिने होते म्हणजेच दि.०७ डिसेंबर २०१९ पर्यंत होती. संबंधित कंत्राटदार यांना वारंवार सुचना देऊनही कामाची प्रगती राखता आली नाही. संबधित कंत्राटदार यांनी निविदा अटी व शर्तीचा भंग केल्याने दि.०९.११.२०२० रोजी निविदा रद्द करण्यात आली.

प्रस्तुत निविदा रद्द केल्याने कंत्राटदार यांनी मा.दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर),जालना येथे वाणिज्य दावा दाखल केला. मा.न्यायालयाने दि.१८ फेब्रुवारी, २०२१ रोजी दिलेल्या निकाला विरोधात मा.जिल्हा व सत्र न्यायालय, जालना यांच्याकडे अपील दाखल केले. सदरहू अपीलाच्या दि.०१ एप्रिल, २०२१ रोजीच्या आदेशान्वये निविदा रद्द करण्याच्या प्रक्रीयेस मान्यता देऊन पुढील निविदा प्रसिद्दीस मान्यता दिली तसेच निविदा प्रक्रीया रद्द केल्यानंतर होणा-या परिणामाबाबत कुठलीही कार्यवाही करू नये असे आदेशित करण्यात आले.

निविदा रद्द केल्यानंतर मा. दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर ),जालना यांनी संयुक्त मोजणी समिती गठीत करून अहवाल सादर करण्याबाबत आदेशित केले. त्यानुषंगाने संयुक्त गठीत समितीने प्रस्तुत कामाच्या सा.क्र. ०/००० ते सा.क्र.५/०० पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूस Road Side Drain करून त्यातील माती भराव व सा.क्र.०/०० ते सा.क्र.१/५०० या लांबीमध्ये मुरूम अस्तीकरणाचे काम झाले असल्याचे अहवाल सादर केला. तसेच याबाबत राज्य गुणवत्ता निरिक्षक यांच्या मार्फत तपासणी करून समाधानकारक शेरा दिल्यानंतरच रू.१५.५७ लक्ष इतक्या रकमेचे देयक अदा करण्यात आले आहे. निविदा रद्द झाल्यानंतर संबधीत कंत्राटदार यांच्यावर दंडात्मक कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे, मात्र कंत्राटदाराने दाखल केलेला दिवाणी दावा आज रोजी प्रलंबित आहे.

मा. न्यायालयाच्या आदेशानंतर उर्वरीत कामाची निविदा दि.०३ एप्रिल, २०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर निविदेत श्री.श्रीकांत घुले पाटील हे पात्र ठरले. मात्र त्यांनी निविदा अटी व शर्तीनुसार सुरक्षा अनामत रक्कम व अतिरिक्त सुरक्षा अनामत रकमेचा भरणा विहित मुदतीत केला नसल्यामुळे निविदा रद्द करण्याची कार्यवाही करण्यात आली व संबधीत कंत्राटदार यांची EMD जप्त करून सदर योजनेंतर्गत मंजुर कामांच्या निविदेसाठी बोली लावण्यास तीन वर्षाकरिता प्रतिबंधीत करण्यात आले आहे. तथापि, सदर कामास विलंब झाल्याने स्थानिक ग्रामस्थ व लोकप्रतिनिधी यांच्या मागणीनुसार सन २०२१-२२ च्या आर्थिक वर्षाकरीता जिल्हा वार्षिक योजना लेखाशीर्षांतर्गत सा.क्र.०/०० ते १/०० ग्रामा ११७ व इजिमा-७० ते धांडेगाव तांडा ग्रामा-२३ सा.क्र.१/५०० ते २/५०० या रस्त्याची सुधारणा करण्याकरीता दि.३० मार्च, २०२१ रोजी रु.१५ लक्ष इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामे जिल्हा परिषद, जालना यांच्यामार्फत करण्यात आले. याकरीता कार्यकारी अभियंता, प्रमंग्रासयो, जालना यांच्या कार्यालयाची ना-हरकत घेण्यात आली नाही.

उर्वरीत कामाकरिता पुनश्च: फेरनिविदा दि.०८ फेबुवारी, २०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. सदरहू निविदेत पात्र ठरलेले मे.वाय.पी.देशमुख ॲण्ड व्हि.के.गव्हाणे (JV), छ.संभाजीनगर यांना दि.१६ सप्टेंबर, २०२२ रोजी कार्यरंभ आदेश देण्यात आले. सदर कामाची मुळ मुदत १२ महिने होती म्हणजेच दि.१५ सप्टेंबर २०२३ पर्यंत होती. प्रस्तुत कामाचे सद्यस्थितीत सर्व लांबीत खडीकरण,डांबरीकरण,कॉंक्रीट रस्ता तथा चार ठिकाणी नळकांडी पुलाचे काम पुर्ण झाले असून रोड फर्निचरचे काम अंतिम टप्प्यात आहे. उर्वरीत काम दि.३० जुलै, २०२५ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजित आहे.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत कामाच्या दर्जाची तपासणी त्रिस्तरीय पध्दतीने वेळोवेळी केली जाते. सदर कामावर तीन वेळेस राज्य गुणवत्ता निरीक्षक व एक वेळेस वरीष्ठ राज्या गुणवत्ता निरीक्षक यांच्याकडून तपासणी करण्यात आली आहे. सदर कामांची पाहणी करुन काम समाधानकारक असल्याचा अहवाल दिला आहे. प्रस्तुत प्रकरणी सन २०२४-२५ अर्थसंकल्पिय अधिवेशनामधील तारांकित प्रश्न क्र.५५४२ अनुषंगाने सदर कामाच्या सविस्तर चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. सदर प्रकरणी राज्य गुणवत्ता समन्वयक

यांनी सादर केलेल्या अहवालानुसार रस्त्याच्या कामाच्या काही भागात डांबरी पृष्ठभाग असमाधानकारक असल्याने काही लांबीत कारपेट दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच सा.क्र.२/८७० मधील नळकांडी पुलाचे काम असमाधानकारक झाले आहे. सा.क्र.३/१०० ते ३/२०० या १०० मी. लांबीत काँक्रीटचे काम करण्यात आले असून त्यापैकी शेवटच्या ७ मी. लांबीत काँक्रीट ला तडे गेले असल्याने सदर ७ मी. काँक्रीट काम पुन्हा करणे आवश्यक आहे. सदर कामाची दि.२३.०६.२०२३ रोजी श्री. पी.पी.महाजन, राज्य गुणवत्ता निरीक्षक यांनी तपासणी केली असून त्यांच्या अहवाल समाधानकारक असल्याने श्री. महाजन यांची सन २०२५-२६ करीता केलेली सुचीबध्दता रद्द करण्यास दि.२६.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये मान्यता देण्यात आली आहे.

राज्य गुणवत्ता समन्वयक यांच्या अहवालाच्या अनुषंगाने अधीक्षक अभियंता, प्रमंग्रासयो, छ.संभाजीनगर यांना जबाबदार अधिकाऱ्यांकडून खुलासा सादर करण्याबाबत तसेच अति. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आलेल्या कामाबाबतचे अभिप्राय सादर करण्याबाबत दि.०७.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

शासन निर्णय दि.२०.०९.२०२४ अन्वये ग्रामपंचायतीन त्यांच्या गावठाणच्या हद्दीतील मुलभूत सुविधेची कामे /विकास कामे तसेच गावांशी निगडीत असलेली कामे उदा. शाळा, इमारत, समाजमंदीर, प्रा.आ.केंद्रे व उप केंद्रे या सारखी कामे गावठाणच्या हद्दीबाहेर असली तरी ग्रामपंचायतीला करता येतील, अशी मान्यता देण्यात आली आहे.

उर्वरीत गावठान हद्दीबाहेरील रु.१०.०० लक्ष पेक्षा जास्त रकमेची कामे व रु.१५.०० लक्ष पर्यंतची कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजुर सहकारी संस्था यांना काम वाटप समिती मार्फत दिली जातात. उर्वरीत रु.१५.०० लक्ष रकमेच्या वरील कामास ई-निविदद्वारे करण्यात येतात. निविदा वाटपाचे/कंत्राटदार निश्चितीची सर्व कार्यवाही शासन निर्णयानुसार आखून दिलेल्या पध्दतीने पारदर्शक पणे होते.

***********

गृह (परिवहन) विभाग
लक्षवेधी सूचना क्र.८१९

## महाराष्ट्र विधानसभा
## सन-२०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

मा.श्रीमती.नमिता मुंदडा,वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानासभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.८१९ खालीलप्रमाणे आहे.:-

" " केज, जि. बीड. येथे माजी मंत्री स्व. डॉ. विमलताई मुंदडा यांच्या प्रयत्नानी बस अगारासाठी ८.८३ हेक्टर आर एवढी जमीन उपलब्ध करण्यात आलेली असणे, सदर जमीन दि. १२/०४/१९९१ रोजी रा.प. मंडळाने संपादित केलीली असणे, केज तालुक्यात गावांची एकूण संख्या १२१ असून लोकसंख्या २,१३,१२८ (२०११ च्या जनगणनेनुसार) आहे. त्याचप्रमाणे केज तालुका व शहरामध्ये विविध शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये , साखर कारखाना, इत्यादी असल्यामुळे दळणवळणासाठी बस आगाराची आवश्यकता असून सदर ठिकाणी ई-बस आगार होणे रा.प. महामंडळाच्या हिताचा असल्याचे कळवत विभाग नियंत्रक, रा.प. बीड. यांनी प्रस्ताव मंजुरीसाठी महाव्यवस्थापक (वाहतूक), रा.प. मध्यवर्ती कार्यालय, मुंबई. पाठवला असणे, प्रत्येक तालुक्यात एक बस आगार असतांना फक्त केज तालुक्यात बस आगार नसणे, केज तालुका हा भौगोलिक दृष्ट्या मोठा आहे. आगार नसल्याने प्रवाश्यांची प्रचंड प्रमाणात गैरसोय होत असणे, त्यामुळे केज, जि. बीड. येथे बस आगारासाठीच्या प्रस्तावास त्वरित मंजुरी देऊन काम सुरु करून कार्यान्वित करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका" "

### निवेदन
### {श्री.प्रताप सरनाईक,मा.मंत्री (परिवहन)}

रा.प.बीड विभागात केज येथे रा.प.महामंडळाचे बसस्थानक कार्यान्वित आहे. दिनांक १२.०४.१९९९ रोजी केज येथे आगारासाठी २.८३ हेक्टर आर एवढी जमीन संपादीत केलेली आहे.

केज हे बीड जिल्हयातील तालुक्याचे ठिकाण असुन केज तालुक्यात एकूण गावांची संख्या १२१ एवढी आहे व २०११ च्या जनगणनेनुसार तालुक्यांची लोकसंख्या २,१३,१२८ एवढी आहे. केज शहरामध्ये विविध शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये, साखर कारखाने इ. असल्यामुळे केज येथील लोकप्रतिनिधी यांनी वारंवार केज येथे बस आगाराच्या उभारणीची मागणी केली आहे.

(रोटा) एच-८२० (७३०-८-२०२५)-१ (क्रमश:)

रा.प. महामंडळाच्या आगार निर्मितीचे मार्गदर्शक धोरण पुढील प्रमाणे -

रा.प.महामंडळाच्या आगार निमिर्ती साठी खालील महामंडळ ठरावानुसार धोरण निश्चित करण्यात आले आहे.

१) महामंडळ ठराव क्र.९४४१ दिनांक-२६.०२.१९८१ अन्वये आगारासाठी निवडण्यात आलेले ठिकाण केवळ तालुक्याचे ठिकाण आहे म्हणुन आगाराची निर्मिती न करता तेथे वाहतूकीच्या संख्येचे न्याय समर्थन असल्याशिवाय आगाराची निर्मिती करु नये.

२) महामंडळ ठराव क्र.२०४ दिनांक-२०.११.१९८४ अन्वये नवीन आगार उभारताना आर्थिकदृष्टया व्यवहार्य असल्याशिवाय किंवा उभारणीसाठी चालनीय गरजांचे योग्य समर्थन असल्याशिवाय त्याची निर्मिती करु नये.

३) महामंडळ ठराव क्र.९९.०३.०४ दिनांक-४/५.३.१९९१ अन्वये एखाद्या विशिष्ट आगाराची नियते १०० पेक्षा अधिक असल्याशिवाय यापुढे ३० कि.मी. अंतरावर नवीन आगाराची निर्मिती करु नये.

सदर धोरणांनुसार केज येथे नवीन आगार निर्मिती करणे संयुक्तीक होणार नाही. रा.प.बीड यांनी ई-बस आगार उभारणी प्रस्तावित केलेली असून,विभाग नियंत्रक, बीड यांनी केज येथे ई-बस आगार व ई-बसेससाठी चार्जिंग स्टेशन प्रस्तावित केले असुन ई-बस सेवेची २८ नियते प्रस्तावित केलेली आहे. त्याअनुषंगाने केज येथे ई-बसेससाठी चार्जिंग स्टेशन व आगार उभारणीबाबत तांत्रिक तसे चालनीय व्यवहार्यता तपासून याबाबतचा सविस्तर अहवाल प्रादेशिक व्यवस्थापक, संनियंत्रण समिती क्र.२ व विभाग नियंत्रक, रा.प.बीड विभाग यांचे कडून मागविण्यात आलेला आहे

******

एच-७२०-१अ

गृह (परिवहन) विभाग
लक्षवेधी सूचना क्र.१५०३

# महाराष्ट्र विधानसभा
## सन-२०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

मा.श्री.शिवाजी पाटील, श्री.संजय केळकर, श्री.मंगेश चव्हाण, श्री.राम कदम, श्री.योगेश सागर, श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानासभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १५०३ खालीलप्रमाणे आहे.:-

**"प्रवासी सुरक्षितता आणि प्रशासकीय कारभारात गती आणून मानवी हस्तक्षेप टाळण्यासाठी एसटीचे स्वयंचलन करण्याचे राज्य परिवहन महामंडळाचे नियोजन अपयशी ठरल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या सुमारास निदर्शनास येणे, महामंडळातील प्रवाशीहिताचे आणि प्रशासकीय कारभारातील तांत्रिक प्रकल्प अद्याप रखडले असल्यामुळे परिणामी, प्रवासी आधुनिक सुरक्षितता आणि गतिमान प्रशासनाच्या तंत्रज्ञानात एसटी महामंडळाची वाटचाल संथगतीने चालत असल्याची बाब निदर्शनास आली असणे, 100 दिवसांच्या कृती आराखड्यानुसार एसटी महामंडळाने विद्युत, सीएनजी आणि साध्या बसगाड्या वाढविणे, महसूल वाढ, सुविधा-प्रशासकीय कारभाराचे स्वयंचलन यांचा समावेश करून कृती आराखडा सादर करण्यात येणे, प्रत्यक्षात उक्त कोणत्याही सुविधा सुरु झालेल्या नसल्यामुळे एसटीचे प्रवासी अद्यावत सोयी-सुविधांपासून वंचित राहिले असणे, याकडे प्रशासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, एसटी महामंडळाच्या प्रवाशांना तंत्रज्ञानाच्या दृष्टीने अद्यावत सोयी-सुविधा उपलब्ध होण्यासाठी सदरहू कृती आराखडा तातडीने कार्यान्वित करण्याची आवशक्यता, यावर शासनाने करावयाची ठोस उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."**

## निवेदन

**{ श्री.प्रताप सरनाईक, मा.मंत्री (परिवहन)}**

राज्य परिवहन महामंडळामध्ये पुरवठा, डिझाईन, कस्टमायझेशन, होस्टींग, अंमलबजावणी आणि देखभाल स्वंयंचलन कार्यक्रम (Automation) प्रकल्पासाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येऊन ई-निविदा प्रक्रियेव्दारे मे.चेन-सिस (इंडिया) प्रा.लि. या सेवापुरवठादार कंपनीची मा. संचालक मंडळाच्या मंजुरीअंती निवड करण्यात आली. तसेच दि.25.04.2024 रोजी कंपनीसोबत करार स्वाक्षरी करुन नोंदणी करण्यात आला. त्यानुसार सेवापुरवठादार मे.चेन-सिस (इंडिया) प्रा.लि. यांचेकडून राप महामंडळामधील सर्व खात्यांमार्फत प्रकल्पाची अंमलबजावणी सुरु असुन प्रकल्पाची वापरकर्ता स्विकृती चाचणी सुरु (UAT) आहे. प्रकल्प अंमलबजावणीच्या कालावधीमध्ये सेवापुरवठादार कंपनीकडून प्रकल्प अंमलबजावणीची प्रक्रिया ही विलंबाने सुरु असल्याचे निदर्शनास आल्यानंतर सेवापुरवठादार मे. चेन-सिस (इंडिया) प्रा.लि. यांना करारातील व निविदेतील अटी-शर्तीनुसार दंड आकारणी का करण्यात येऊ नये? अशा आशयाची नोटीस तसेच वेळेत उत्तर न आल्यामुळे स्मरणपत्रही देण्यात आलेली आहे.

१०१



महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रम अंतर्गत रा.प.महामंडळाकडून समाविष्ट करण्यात आलेल्या मुद्दयांबावत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे-

१०० दिवसांमध्ये १३५ डिझेल वाहनांचे रुपांतरण CNG वाहनात करण्यात आले. तसेच नविन साध्या ८८७ बसेस रा.प. महामंडळाच्या ताफ्यात जमा करण्यात आल्या आहेत. तसेच २४० ई-बसेस ताफ्यात सामाविष्ट असून, या बसेस राज्यातील विविध मार्गावर चलनात आहे. प्रवासी तिकीट दरात ९५% इतकी वाढ करण्यात आली. तसेच फ्लेक्सीफेअर लवचिक योजनेअंतर्गत कमी गर्दीच्या हंगामात लांब व मध्यम लांब पल्ला सेवाप्रकारातील आगाऊ आरक्षण करणाऱ्या पुर्ण तिकीट धारी प्रवाशांना (कोणतीही सवलत नसलेले प्रवासी) प्रवास भाडयात १५% सुट दि.०१.०७.२०२५ पासून सुरु करण्यात आली आहे.

रा.प. महामंडळांवर प्रवाशांना बसस्थानकांवर अद्यावत सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे व त्या माध्यमातुन महामंडळाच्या प्रवासोत्तर महसुलात वाढ करण्यासाठी महामंडळाने बसस्थानकांवर विविध प्रकारच्या आस्थापना (उदा. उपहारगृह, स्नॅकबार, महा ई-सेवाकेंद्र, विविध वस्तु भांडार, जन औषधी / मेडीकल, दुचाकी वाहनतळ इ.) कार्यान्वित केलेल्या आहेत. तसेच महामंडळाकडे विनावापर उपलब्ध असलेल्या जागांचा विनियोग करुन त्या माध्यमातुन प्रवासोत्तर महसुल प्राप्त करुन घेण्यात येत आहे. रा.प. महामंडळाच्या प्रवासेत्तर महसुलात वाढ होण्यासाठी महामंडळाकडे उपलब्ध असलेल्या बसेसवर, मोकळया जागांवर, बसस्थानकाच्या छताखाली अशा विविध ठिकाणी जाहिरात करण्यासाठी ई-निविदा प्रक्रियेद्वारे अधिकृत परवानाधारकांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामाध्यमातुन महामंडळास प्रवासेत्तर महसुल प्राप्त होत आहे. सदर महसुलामध्ये वाढ होण्यासाठी नव्याने जाहिरात धोरण तयार करण्यात आले आहे. भविष्यामध्ये सदर धोरणानुसार महामंडळास अधिकचे प्रवासेत्तर महसुलात वाढ होण्यास मदत होणार आहे.

प्रवासी सुविधा स्वयंचलन वाहन मागोवा कार्यप्रणालीबाबत (VTS/ PIS):- अत्याधुनिक सोयी-सुविधा अंतर्गत रा प प्रवाशांना मार्गावरील बसचे प्रत्यक्ष ठिकाण उपलब्ध करुन देणेकरीता १६०५१ बसेसमध्ये VTS यंत्रणा बसविण्यात आली असुन, स्थानकावर येणा-या बसेसची माहिती प्रवाशांना उपलब्ध होणेकरीता राज्यातील ३२१ बसस्थानकावर ६०० प्रवासी माहिती संच (PIS Screen) बसविण्यात आले आहेत. तसेच मार्गावरील प्रवाशांना रा प बसचे ठिकाण उपलब्ध होणेकरीता कम्प्युटर ॲप google play store वर उपलब्ध करण्यात आले असुन याद्वारे अद्ययावत सुविधा देण्याकरीता कार्यवाही सुरु आहे.

रा.प. महामंडळाच्या लांब व मध्यम पल्याच्या बसने प्रवास करणा-या प्रवाशांच्या प्रवासादरम्यान नैसर्गिक विधीची व खानपाण्याची सोय व्हावी, याकरिता महामंडळाने विविध मार्गावरील खाजगी हॉटेल / मोटेलच्या ठिकाणी रा.प. महामंडळामार्फत अधिकृत थांबा देण्याची कार्यपध्दती निर्धारित करण्यात आलेली आहे. सदर कार्यपध्दतीनुसार विविध मार्गावर अधिकृत थांबे देण्यात येऊन त्याद्वारे प्रवाशांची सोय करण्यात येणार आहे व त्यामाध्यमातुन रा.प. महामंडळास प्रवासेत्तर महसुलात वाढ होत आहे. प्रवाशांना अधिकाधीक चागली सेवा देण्याच्या दृष्टीने नव्याने हॉटेल/ मोटेल धोरण तयार करण्यात आले आहे.

सन २०१५-२०१६ पासून शासनाच्या सर्वसाधारण योजनेअंतर्गत रा. प. महामंडळातील बसस्थानकाचे / आगाराचे आधुनिकीकरण, पुनर्बाधणी करण्याची कामे हाती घेण्यात येत आहेत. अद्यापपर्यंत मंजूर एकूण ३६७ कामांपैकी १२६ कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. रा.प. बसस्थानकामध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था मुख्यत्वे स्थानिक प्राधिकरणांच्या पाणी पुरवठा योजने अंतर्गत करण्यात आलेली आहे. तसेच टँकरद्वारे करण्यात आलेली आहे. रा.प. महामंडळामध्ये 338 बसस्थानकामध्ये हिरकणी कक्षाची सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे. तसेच आवश्यकतेनुसार व जागेचा उपलब्धतेनुसार उर्वरित ठिकाणी हिरकणी कक्षाची स्थापना करण्यात येणार आहे.

*****

11/7/7-19

लक्षवेधी सूचना क्र.२०९७

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन
महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.२०९७

श्री. सुधीर मुनगंटीवार, श्री.अमोल खताळ, श्री.राघवेंद्र (रामदादा) मनोहर पाटील, श्री.गोपिचंद पडळकर, मा.वि.स.स यांनी उपस्थित केलेली महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.२०९७ पुढीलप्रमाणे आहे :-

"महाराष्ट्र राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत ग्रामरोजगार सेवक कार्यरत असणे, सदर ग्रामरोजगार सेवकां कडून रोजगार हमी योजनेतील वैयक्तीक सिंचन विहीर, फळबाग लागवड योजना ही कामे तसेच पंतप्रधान आवास योजना, रमाई घरकुल योजना ईत्यादी कामे करून घेणे, कामाबाबत प्रशासन व लाभार्थ्यामध्ये समन्वयाची भुमीका पार पाडण्याचे कार्य करणे, त्यांना मिळत असलेले मानधन तुटपुंजे असल्यामुळे शासनाने मानधनात वाढ केली करणे, नियोजन (रोहयो) विभागाचे शासन निर्णय दिनांक 3.10.2024 अन्वये त्यांना दरमहा रु.8000/- मानधान लागु करणे, मात्र गेल्या 6 महिन्यापासुन सदर शासन निर्णय लागु न केल्यामुळे त्यांना सुधारीत मानधन न मिळणे, त्यामुळे त्यांना सुधारीत मानधन त्वरीत लागु करण्याची नितांत आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.."

## मा.मंत्री (रोजगार हमी ) यांचे निवेदन

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम,२००५ मधील परिशिष्ट १ मधील तरतुदीनुसार ग्रामपंचायत स्तरावर ग्रामरोजगार सहाय्यक नेमण्याची तरतूद आहे. दि.०२ मे २०११ रोजीच्या शासननिर्णयामध्ये ग्रामरोजगार सहाय्यकांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या व त्यांच्या नियुक्तीच्या संदर्भात मार्गदर्शक सूचना स्पष्ट केल्या आहेत.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत अभिलेख व नोंदवह्या ठेवण्याची जबाबदारी सरपंच व ग्रामसेवकाची असते. या कामात मदत करण्याचे काम ग्रामरोजगार सहाय्यकांचे आहे. ग्रामरोजगार सहाय्यकांचे काम हे अर्धवेळ स्वरूपाचे असून ते ग्रामपंचायतीचे नियमित कर्मचारी नाहीत तसेच ते राज्य शासन/जिल्हा परिषद/पंचायत समितीचे नियमित कर्मचारी नाहीत. ग्रामरोजगार सहाय्यकांची नियुक्ती ही ग्रामसभेमार्फत होते तसेच त्यांना काढून टाकण्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकारसुध्दा ग्रामसभेला आहे.

ग्रामरोजगार सहाय्यकांना रोजगार हमी योजनेंतर्गत झालेल्या कामाच्या प्रमाणात मनुष्यदिन निर्मितीच्या आधारे मानधन अदा करण्यात येत होते. तथापि, कमी काम असलेल्या ठिकाणी ग्रामरोजगार सहाय्यकांना कमी मानधन मिळते ही बाब विचारात घेऊन दि.३०.०९.२०२४ रोजी झालेल्या मा.मंत्रीमंडळाच्या बैठकीत ग्रामरोजगार सहाय्यकांना सुधारित मानधन देण्यासंदर्भात निर्णय झाला. त्यानुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कार्यरत ग्रामरोजगार सहाय्यकांना प्रतिमाह रू.८०००/- मानधन व इतर अनुषंगिक भत्ते देण्यासंदर्भात दि.०३.१०.२०२४ रोजी शासननिर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

सदर शासन निर्णयाची अंमलबजावणीकरिता नवीन लेखाशिर्ष उघडण्याबाबत वित्त विभागाने मान्यता दिली असून नवीन लेखाशिर्ष विभागास प्राप्त झाले आहे. त्यानुषंगिक अर्थसंकल्पीय तरतूद करण्याची बाब विभागाकडून कार्यवाहीत असून विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशन, २०२५ मध्ये लाक्षणिक पुरवणी

मागणीचा प्रस्ताव सादर केला आहे. दि.०३.१०.२०२४ रोजीच्या शासननिर्णयानुसार ग्रामरोजगार सहाय्यकांना मानधन अदा करण्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध होण्यास कालावधी लागणे अपरिहार्य आहे. त्यानुषंगाने प्रलंबित मानधन अदा करण्यासाठी शासनाच्या दि.३१.०३.२०२५ च्या पत्रान्वये ग्रामरोजगार सहाय्यकांना जुन्या पद्धतीने मानधन अदा करण्याच्या सूचना आयुक्त-मनरेगा कार्यालय, नागपूर यांना दिलेल्या आहेत. त्यानुसार ग्रामरोजगार सहाय्यकांना प्रचलित (जुन्या) दरानुसार माहे ऑक्टोबर २०२४ ते माहे फेब्रवारी २०२५ पर्यंत मानधनापोटी रू.४९.०३ कोटी अदा करण्यात आले असून माहे मार्च, २०२५ पासूनचे मानधन अदा करण्याबाबतची बाब विभागाकडून कार्यवाहीत आहे.

*********

मागणीचा प्रस्ताव सादर केला आहे. दि.०३.१०.२०२४ रोजीच्या शासननिर्णयानुसार ग्रामरोजगार सहाय्यकांना मानधन अदा करण्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध होण्यास कालावधी लागणे अपरिहार्य आहे. त्यानुषंगाने प्रलंबित मानधन अदा करण्यासाठी शासनाच्या दि.३१.०३.२०२५ च्या पत्रान्वये ग्रामरोजगार सहाय्यकांना जुन्या पद्धतीने मानधन अदा करण्याच्या सूचना आयुक्त-मनरेगा कार्यालय, नागपूर यांना दिलेल्या आहेत. त्यानुसार ग्रामरोजगार सहाय्यकांना प्रचलित (जुन्या) दरानुसार माहे ऑक्टोबर २०२४ ते माहे फेब्रवारी २०२५ पर्यंत मानधनापोटी रू.४९.०३ कोटी अदा करण्यात आले असून माहे मार्च, २०२५ पासूनचे मानधन अदा करण्याबाबतची बाब विभागाकडून कार्यवाहीत आहे.

*********

लक्षवेधी सूचना क्र.१०६५

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन
महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. साजिद खान पठाण, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. विकास ठाकरे, श्री. विश्वजित कदम,श्री. अस्लम शेख, श्री. अमीन पटेल, श्रीमती ज्योती गायकवाड, श्री. रणधीर सावरकर,वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना खालीप्रमाणे आहे:-

"अकोला शिवणी विमानतळाच्या विस्तारकरणाचे काम अदयापी प्रलंबित असणे, सदर शिवणी विमानतळ भारतीय विमानपतन प्राधिकरणाच्या मालकीचे असून विमानतळाच्या धावपटटीचा विस्तार १ हजार ४०० मीटरवरुन १ हजार ८०० मीटर करण्याचे प्रस्तावित असणे, त्यासाठी २२.२४ हेक्टर खासगी जमीन संपादित करण्याची आवश्यकता, त्याकरिता अंदाजित मूल्यांकन रक्कमेनुसार भूसंपादन कायदयाप्रमाणे १७७ कोटी रुपये व थेट खरेदी नियमानुसार १९८ कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता,उक्त विमानतळाच्या विस्तारणीकरणासाठी आवश्यक निधी उपलबध करुन देण्यात येणार असल्याची घोषणा राज्याच्या अर्थसंकल्पात करण्यात येणे, अदयाप निधी उपलब्ध झालेला नसणे,याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, आश्वासनाची पूर्तता होत नसल्याने व विमानतळाच्या विस्तारकरणासाठी विलंब होत असल्याने तीनही जिल्हयातील नागरिकांकडून शासनाप्रती संभ्रमाची व असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिकिया व भूमिका."

मा. मुख्यमंत्री यांनी करावयाचे निवेदन

अकोला (शिवणी) विमानतळ हा भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांच्या अधिपत्याखाली आहे, अकोला (शिवणी)विमानतळ १९६ एकर (७९ हे.आर) क्षेत्रामध्ये विस्तारलेला आहे. या विमानतळाची धावपट्टी १४०० मी. X ४५ मी. आहे. या विमानतळावर छोटी टर्मिनल इमारत असून एका वेळी ५० प्रवासी हाताळण्याची क्षमता आहे. विमानतळावर प्रिसिजन ॲप्रोच पाथ इंडिकेटर (पापी ) लाइटस व इतर दिशादर्शक उपकरणे उपलब्ध असून विमानतळाचा कोड ३ सी (३ सी प्रकाराच्या विमानतळांवर २४ ते ३६ मीटर wingspan असलेली विमाने उतरु शकतात) आहे.

भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांनी अकोला विमानतळावरून मोठी विमाने उतरण्यासाठी विमानतळाच्या धावपट्टीची लांबी १८०० मी. पर्यंत वाढविण्यासाठी ८२.९२ हे.आर (मोजणी अंती) अतिरिक्त क्षेत्राची आवश्यकता असल्याचे कळविले होते. त्यानुसार अकोला विमानतळाचा विस्तार १८०० मी. करण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची ६०.६८ हे. आर जमीन भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे. उर्वरित २२.२४ हे.आर. जमीन संपादनाबाबत प्रस्तावाबाबत तत्कालीन मा. मुख्यमंत्री यांनी भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाकडून feasibility report घेण्याबाबत निर्देश दिले होते. यानुषंगाने भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांनी अकोला विमानतळाकरीता आर.सी.एस. अंतर्गत रुट मिळाल्यास तेथील धावपट्टीचे आहे त्या जागेतच १८०० X ४५ विस्तारीकरण केले जाईल. तथापि नाईट लॅण्डींग करिता सुमारे ५१.६५ एकर अतिरिक्त जमिनीची आवश्यकता असल्याचे कळविले होते. तसेच, महाव्यवस्थापक भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांनी अतिरिक्त भूसंपादनाचे कारण नमूद करून कोणत्याही व्यवहार्यता दर्शक अहवालाची आवश्यकता नसल्याचे कळविले होते. आर.सी.एस.योजनेमध्ये अकोला विमानतळाचा समावेश करण्यासाठी प्रधान सचिव विमानचालन यांनी नागर विमानन मंत्रालयास कळविण्यात आले आहे.

सन २०२२ च्या दुसरे अधिवेशनात अकोला (शिवणी) येथील विमानतळ विस्तारीकरणाबाबत मा. मंत्री यांनी निधी उपलब्ध करून देण्याबाबत मा. मंत्री (दिपक केसरकर) यांनी आश्वासन दिले होते. दरम्यान जिल्हाधिकारी अकोला यांच्याकडे मा.केंद्रिय मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली या बैठकीमध्ये सदर विमानतळाचा धावपट्टीचा विस्तार २५०० मीटर करण्याबाबत निर्देश दिले होते. अकोला विमानतळाचा विस्तार २५०० मी. करण्याच्या अनुषंगाने भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाकडून प्राधिकरणाची व्यवहार्यता तपासून घेण्यात आली. भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांनी या विमानतळाची धावपट्टी २५०० मी. पर्यंत विस्तार करणे शक्य असून यासाठी अतिरिक्त १४५ एकर क्षेत्राची आवश्यकता असल्याचे कळविले आहे. सदर क्षेत्रामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची जमीन संपादीत करावी लागणार असून यामध्ये वसलेली मानवी लोकवस्ती तसेच कृषी अभियांत्रिकी महविद्यालयाच्या इमारती व वस्तीगृह इमारतीसह जमीन संपादन करणे शक्य नसल्याचे जिल्हाधिकारी यांनी कळविले आहे.

तद्नंतर सन २०२२ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये अकोला विमानतळाच्या भूसंपादनासाठी निधी उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने बैठक घेण्यात येईल अशी मा. मंत्री (दिपक केसरकर) यांनी सभागृहात आश्वासन दिले होते. तसेच सन २०२३ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये अकोला विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी जमीन संपादीत करण्याबाबतच्या अर्धातास चर्चेला उत्तर देताना मा. मंत्री (श्री.शंभूराज देसाई) यांनी संबंधितासमावेत बैठक आयोजित करू असे आश्वासित केले होते. यानुषंगाने मा. मंत्री (श्री.शंभूराज देसाई) यांच्या अध्यक्षतेखाली मा. श्री. रणधीर सावरकर, वि.स.स. व मा.श्री. अमोल मिटकरी, वि.प.स. यांच्यासमवेत संबंधित अधिकाऱ्यासोबत बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत मा. मंत्री यांनी अकोला विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार १४०० मी. वरून १८०० मी. आणि १४०० मी. वरून २५०० मी. पर्यंत करण्याबाबतचे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले होते. सदर निर्देशाच्या अनुषंगाने अकोला विमानतळाचा विस्तार १४०० मी. वरुन २५०० मी. पर्यंत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. सदर प्रस्ताव भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांच्याकडे feasibility report साठी पाठविण्यात आला होता.

दरम्यान मा. मुख्यमंत्री महोदय यांनी दि.६ जानेवारी २०२५ रोजीच्या बैठकीमध्ये अकोला विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार १८०० मी. पर्यंत करण्याचे निर्देश दिले आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी अकोला यांनी अकोला विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार १४०० मी. वरून १८०० मी. करण्यासाठी २२.२४ हे.आर जमीन संपादीत करणे आवश्यक असून त्यासाठी भूसंपादन कायद्यानुसार रू.१७७.०० कोटी व थेट खरेदी नियमानुसार रू.१९८.०० कोटी आवश्यकता असल्याचे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस कळविण्यात आले होते. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने थेट खरेदी नियमानुसार रू.१९८.०० कोटी रक्कम, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचा अस्थापना खर्च, उपविभागीय अधिकारी, अकोला यांचा अस्थापना खर्च व १०% प्रकल्प खर्चात वाढ इत्यादी रक्कमेचा समावेश करून एकुण रू.२३३.१९ कोटी खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी शासनास सादर केला होता. सदर प्रस्तावातील निधीबाबत मा.मुख्यमंत्री महोदय यांनी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या संचालक मंडळाच्या दि.२५.४.२०२५ रोजीच्या बैठकीत चालू रेडिरेकनर दर विचारात घेऊन नव्याने फेरप्रस्ताव सादर करण्याच्या सूचना महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीला दिल्या आहेत. यानुसार महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांनी सुधारीत रेडीरेकनर दरानुसार प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू आहे.

***

महाराष्ट्र विधानसभा

**सामान्य प्रशासन विभाग** **लक्षवेधी सूचना क्र.२१०६**

**सन २०२५ चे व्दितीय अधिवेशन**

**श्री. राजु तोडसाम, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थिती केलेली लक्षवेधी सूचना क्र. २१०६ पुढीलप्रमाणे आहे:-**

"यवतमाळ जिल्ह्यात विविध शासकीय विभागांमध्ये अनेक वरिष्ठ अधिकारी (वर्ग १ व वर्ग २) ५ वर्षांपेक्षा अधिक काळापासून कार्यरत असणे, शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या बदली धोरणानुसार कोणत्याही अधिकाऱ्याने एकाच जिल्ह्यात ३ ते ५ वर्षांपेक्षा जास्त काळ कार्यरत राहणे टाळावे, अशी स्पष्ट तरतूद असणे, मात्र यवतमाळ जिल्ह्यात याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, यामुळे संबंधित विभागांमध्ये कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असून, पारदर्शकता, कार्यक्षम सेवा वितरण आणि भ्रष्टाचार रोखणे या दृष्टीने धोरणाची अंमलबजावणी अत्यावश्यक असणे, यवतमाळ जिल्ह्यातील सर्व विभागांतील ५ वर्षांपेक्षा अधिक काळापासून कार्यरत असलेले वर्ग १ व वर्ग २ चे अधिकारी यांची सेवा नोंद तपासून, त्यांची बदली तात्काळ जिल्हाबाहेर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

**मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन**

यवतमाळ जिल्हयात विविध विभागातील वर्ग १ व वर्ग २ च्या पदावर कार्यरत अधिकाऱ्यांसंदर्भात जिल्हाधिकारी यवतमाळ यांचेकडून प्राप्त अहवालानुसार ३ वर्षांहून अधिक कालावधी होऊन संबंधित पदावर कार्यरत अधिकाऱ्यांची संख्या १५२ आहे. तसेच जिल्हयात वर्ग १ व वर्ग २ च्या पदावर ५ वर्षांहून अधिक कालावधीपासून संबंधित पदावर कार्यरत अधिकाऱ्यांची संख्या ११२ आहे.

शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन करण्यासाठी "महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन आणि कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध, २००५" दि.१२.०५.२००६ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यानुसार शासनातील वर्ग १ व वर्ग २ च्या अधिकाऱ्यांकरीता एखादया पदावर राहण्याचा सर्वसाधारण कालावधी ३ वर्षांचा विहित केला आहे. एखादया विभागातील किंवा कार्यालयातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या मोठया प्रमाणात बदल्या केल्यामुळे शासकीय कामावर परिणाम

होणार नाही, याची सुनिश्चिती करण्यासाठी कोणत्याही कार्यालयातील किंवा विभागातील तीस टक्क्यांपेक्षा अधिक नसतील इतक्या कर्मचाऱ्यांची एका वर्षात एकाच वेळी बदली करण्यात येणार नाही अशी तरतूद आहे. तसेच एखादया अधिकाऱ्याचा कार्यरत पदावर ३ वर्षाचा पदावधी संपल्यानंतर त्याच जिल्हयातील इतर रिक्त पदावर त्याची बदली होऊ शकते. त्यामुळे त्या अधिकाऱ्याचा जिल्हयातील कार्यकाळ ३ वर्षाहून अधिक होऊ शकतो. वर्ग १ व वर्ग २ च्या बदल्यांबाबतचे अधिकार हे संबंधित प्रशासकीय विभागांना आहेत. जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्या अहवालाच्या अनुषंगाने तपासून बदली अधिनियमाच्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधित विभागांना निर्देश देण्यात आलेले आहेत.

***********************

५.

महाराष्ट्र विधानसभा , सन २०२५ चे
द्वितीय (पावसाळी) अधिवेशन.

लक्षवेधी सूचना क्र.१७९३

मा. श्री. किशोर पाटील, मा. विधानसभा सदस्य यांनी म.वि.स. नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१७९३ उपस्थित केली आहे :-

"जळगांव येथे जिल्हा न्यायालयांतर्गत न्यायालयाचे कामकाज चालत असून पाचोरा येथे अतिरिक्त सत्र न्यायालय व दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर ही न्यायालये व्हावीत अशी मागणी तेथील नागरिकांकडून तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींकडून वारंवार होणे, पाचोरा येथे अतिरिक्त सत्र न्यायालय व दिवाणी न्यायालय झाल्यास पाचोरा व भडगांव अंतर १२ किमी असल्याने येथील जनतेस पाचोरा येथे येण्यास सोईचे होणार असल्याने पाचोरा वकिल संघाने सन १९९७ सालापासून पाठपुरावा करणे, तसेच पाचोरा येथे न्यायालयासाठी प्रशस्त अशी ई टाईपची इमारत असून सुमारे २ एकर मोकळी जागाही उपलब्ध असणे, तसेच पाचोरा येथे असलेल्या न्यायालयाच्या इमारतीमध्ये सत्र न्यायालय व दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) यांच्यासाठी मोठे तीन रुम २५ बाय ४० चे उपलब्ध असणे, याकरिता भडगांव वकील संघ व पाचोरा वकिल संघ यांच्या संयुक्त लाक्षणिक उपोषणाच्या योग्य तो अहवाल पाठविण्याचे आश्वासन देऊन सुमारे १४ वर्षाचा कालावधी लोटला तरी अद्यापही कोणतीच कार्यवाही होत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

मा. मुख्यमंत्री (श्री. देवेंद्र फडणवीस) यांचे निवेदन

पाचोरा येथे अतिरिक्त सत्र न्यायालय व दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर ही दोन न्यायालये स्थापन करण्याबाबत लोकप्रतिनिधींची मागणी शासनास प्राप्त झाली आहे.

पाचोरा व भडगांव हे अंतर १२ कि.मी. असल्याने पाचोरा येथे अतिरिक्त सत्र न्यायालय व दिवाणी न्यायालय झाल्यास तेथील जनतेस पाचोरा येथे येण्यास सोईचे होणार असल्याने पाचोरा वकील संघानेही सन १९९७ पासून पाचोरा येथे उपरोक्त २ न्यायालये स्थापन करण्याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांना तसेच मा. उपमुख्यमंत्री, श्री. अजितदादा पवार यांना निवेदने दिली आहेत.

पाचोरा येथे न्यायालयासाठी ई टाईपची इमारत असून न्यायालयाच्या आवारात ५००० चौ.मी. एवढी मोकळी जागा उपलब्ध आहे.

पाचोरा न्यायालयाच्या इमारतीमध्ये २५ बाय ४० चे मोठे तीन रुम उपलब्ध आहेत.

पाचोरा येथे अतिरिक्त सत्र न्यायालय व दिवाणी न्यायालय स्थापन करण्यासंदर्भात भडगांव वकील संघ व पाचोरा वकील संघ यांनी संयुक्तपणे दि.२६.८.२०११ रोजी लाक्षणिक

उपोषण ठेवले होते. परंतू जिल्हा न्यायाधीश, जळगांव यांनी पाचोरा येथे दि.२५.८.२०११ रोजी प्रत्यक्ष भेट देऊन संपूर्ण पाहणी केली व योग्य तो रिपोर्ट वरिष्ठांना पाठविण्याचे आश्वासन दिल्यामुळे सदर लाक्षणिक उपोषण तहकूब करण्यात आले.

उपरोक्त प्राप्त निवेदने मा. उच्च न्यायालय, मुंबई यांना पाठविली असता, त्यांनी नवीन न्यायालय स्थापन करण्यासाठी आवश्यक असलेल्या विहित अटींची पूर्तता होत असल्यास परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांना कळविले. त्यानुसार जिल्हा न्यायालय, जळगांव यांनी वेळोवेळी प्रस्ताव मा. उच्च न्यायालयास सादर केला असता, "सद्यस्थितीत पाचोरा येथे सदर न्यायालये स्थापन करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रलंबित दाव्यांच्या संख्येअभावी व न्यायदानकक्षासाठी तसेच न्यायाधीशांच्या निवासस्थानासाठी जागेच्या उपलब्धतेअभावी सदर प्रस्ताव मा. उच्च न्यायालयाच्या "नवीन न्यायालय स्थापना समिती" ने स्वीकृत केला नसल्याचे मा. उच्च न्यायालयाने दि.१९.३.२०२५ च्या पत्रान्वये जिल्हा न्यायालय, जळगांव तसेच शासनास कळविले आहे. तसेच यापूर्वीही सन २०१५ व २०१८ मध्ये मा. उच्च न्यायालयाने सदर प्रस्ताव याच कारणासाठी स्वीकृत केलेला नव्हता.

पाचोरा न्यायालयाच्या आवारात ५००० चौ.मी. एवढी मोकळी जागा उपलब्ध आहे. तसेच पाचोरा न्यायालयाच्या इमारतीमध्ये २५ बाय ४० चे मोठे तीन रुम उपलब्ध असले तरी सद्यस्थितीत तेथे कनिष्ठ स्तरची एकूण २ दिवाणी न्यायालये कार्यरत असून तेथे त्यांचे न्यायदान कक्ष, निजी कक्ष व कर्मचाऱ्यांची बैठक व्यवस्था करण्यात आली असल्याने प्रस्तावित २ न्यायालयांसाठी जागा उपलब्ध नाही. तसेच पाचोरा येथे न्यायालय स्थापन करण्यासाठी आवश्यक प्रलंबित प्रकरणे सद्यस्थितीत उपलब्ध नसल्यामुळे तसेच न्यायिक अधिकाऱ्यांकरीता राखीव किंवा संक्रमणकालीन निवासस्थान उपलब्ध नसल्यामुळे मा. उच्च न्यायालयाने सदर प्रस्ताव स्वीकृत केलेला नाही.

******************

महाराष्ट्र विधानसभा, सन २०२५ चे
द्वितीय (पावसाळी) अधिवेशन
मा.महेश सावंत, विधानसभा सदस्य

लक्षवेधी सूचना क्र.२३९९

"मुंबई मालाड पश्चिमेतील खोती गाव सर्व्हे क्रमांक ५१२अ, ५१२अ-१, ५१२अ-२,५१२ब, ५१२ब-१ आणि ५१२ब ३०,५१४,५१४/१ ते ५१४/१८ ही श्रीसौराष्ट्र दशश्रीमाळी जैन भोजनालय ट्रस्टची जमीन धर्मादाय आयुक्त कार्यालयांची परवानगी घेता तसेच मूळ ट्रस्टींना अंधारात ठेवून श्री मनोज ईश्वरीलाल अजमेरा आणि वंदिश भोगीलाल अजमेरा या ट्रस्टींसमवेत करार करुन जमिनीच्या विकसनांचे अधिकार त्यांच्याच कुटुंबियातील विशाल कन्स्ट्रक्शन या विकासकास ९० लाख रुपयांस विकून एक ते दीड हजार करोडो रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबतची तक्रार स्थानिक रहिवाशी श्री. अशोक शाह यांनी वारंवार शासनाकडे केलेली असणे, विशाल कन्स्ट्रक्शनकडून ट्रस्टीबरोबर झालेल्या कराराचे उल्लंघन करणे, रहिवाशांचे महापालिकेच्या डीपी रस्त्याकरिता आरक्षित असलेल्या जागेवर पुनर्वसन करणे, खूप वर्षापासून भाडे थकविणे, विधी व न्याय विभागाची परवानगी न घेता कुटुंबातील सदस्यांशी संगनमत करुन ट्रस्टचे व शासनाचे महसूलाचे आर्थिक नुकसान खाजगी इमारतीचे बांधकाम करतांना महापालिकेचे, झोपुप्राचे उल्लंघन विकासकाकडून केल्याचे निदर्शनास येणे, श्रीसौराष्ट्र दशश्रीमाळी जैन भोजनालय ट्रस्टची जागा खाजगी इमारतीच्या मुख्य प्रवेशदाराकरिता हटवून जागा बळकाविण्याचा प्रयत्न करण्यात येणे, या इमारतीच्या बांधकामामध्ये विशाल कन्स्ट्रक्शनकडून महापालिका, एसआरए, धर्मादाय आयुक्त यांच्या अटी व शर्तीचे उल्लंघन केल्याने विशाल कन्स्ट्रक्शन तसेच धवल अजमेरा या विकासकास काळ्या यादीत टाकण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केलेली मागणी, शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

---

विधि व न्याय विभाग

मा. मुख्यमंत्री (श्री देवेंद्र फडणवीस) यांचे निवेदन

मुंबई मालाड पश्चिमेतील खोती गाव सर्वे क्रमांक ५१२ अ. ५१२ अ-१, ५१२अ-२. ५१२ब, ५१२ ब-१, आणि ५१२ ब ३०,५१४,५१४/१ ते ५१४/१८ यापैकी डी. एस. नगर स्थित, मालाड गाव पोट तुकडी सिटी सर्वे नं. ५१२ब आणि ५१४ ही जमीन विकासकामार्फत विकसित करण्यास परवानगी मिळणेकरिता श्री सौराष्ट्र दशश्रीमाळी जैन भोजनालय ट्रस्ट, मुंबई न्यास नोंदणी क्रमांक ए-२२८१ (मुंबई) यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ३६ (१) (अ) अन्वये विश्वस्त श्री.एम.सी.शाह यांचे मार्फत चौकशी अर्ज क्रमांक जे-४/१८०/२००४ दाखल केलेला होता.

तत्कालीन धर्मादाय सह आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिनांक ३०/०३/२००५ रोजी श्री सौराष्ट्र दशश्रीमाळी जैन भोजनालय ट्रस्ट मुंबई या न्यासाची डी.एस. नगर स्थित,

मालाड गाव पोट तुकडी सिटी सर्व्हे नं.५१२ ब आणि ५१४ ही स्थावर मालमत्ता श्री सौराष्ट्र दशश्रीमाळी जैन भोजनालय ट्रस्ट मुंबई आणि विशाल कन्स्ट्रक्शन यांच्या मधील १२/०५/२००४ रोजी झालेल्या करारनाम्यास अनुसरुन, विकासाची परवानगी दिली होती.

सदर मंजूरी दि.३०/०३/२००५ च्या आदेशात अशी अट घालण्यात आली होती की, न्यासाला मोबदल्यापोटी मिळालेली रु.९०.०० लक्ष ही रक्कम शेड्युल बँक किंवा सरकारमान्य बँकेत दीर्घ मुदतीकरिता सुरक्षित ठेऊन त्यातून मिळणारे व्याज न्यासाच्या उद्देशाकरिता खर्च करण्यात यावे.

श्री सौराष्ट्र दशश्रीमाळी जैन भोजनालय ट्रस्ट मुंबई या न्यासाच्या विश्वस्तांच्या विरोधात श्री अशोक रमनिकलाल शाह यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ४१ (ड) अन्वये चौकशी अर्ज क्रमांक २१/२०२४ नुसार दाखल केलेला आहे. श्री. शाह यांनी तक्रारीत असे नमूद केले आहे की, सदर विकासकाने न्यासाला त्याचे हिश्याचे बांधकाम दिलेले नसून विश्वस्तांनी स्वतः च्या वैयक्तिक फायद्याकरिता बळकावलेले आहे. सर्वे नं. ५१२ ब आणि ५१४ वर सुरु असलेल्या बांधकामास स्थगिती द्यावी. सदर प्रकरणी धर्मादाय सह आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुबई यांनी नोटिस काढल्या असून, प्रकरण सुनावणीकरिता ठेवण्यात आलेले आहे.

तसेच, श्री. प्रीतेश महेंद्र गोसालीया व इतर ०१ यांनी देखील उक्त नमूद परवानगी आदेश दिनांक ३०/०३/२००५ चे संदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ४१ (ड) अन्वये चौकशी अर्ज क्रमांक ०४/२०२५ दाखल केलेला आहे. श्री. गोसालीया यांनी या तक्रारीत विश्वस्तांना निलंबित करण्याची मागणी केलेली आहे. सदर प्रकरणात नोटीस काढण्यात आल्या असून, त्यामध्ये गैरअर्जदार हजर होऊन प्रकरण पुढील सुनावणीकरीता ठेवण्यात आलेले आहे.

*********

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक ४९७ पुढीलप्रमाणे उपस्थित केली आहे:-

"पुणे जिल्ह्यातील जेजुरी-मोरगाव रस्त्यावर दिनांक १८ जून २०२५ रोजी कार आणि टेम्पोचा भीषण अपघात होणे, कार आणि पीकअप टेम्पोंच्या धडकेत ८ जणांचा जागीच मृत्यू होणे, या भीषण अपघाताची घटना सांयकाळी ७ वाजण्याच्या सुमारास घडणे,

या अपघातात पाच ते सहा जण गंभीर जखमी होणे, अपघातात जखमी झालेल्यांना तातडीने जवळील रुग्णालयात दाखल करण्यात येणे, त्यांची मृत्यूशी झुंज सुरु असणे, या भीषण अपघातात कारचा अक्षरश: चक्काचूर होणे, अपघातानंतर या परिसरात एकच खळबळ उडणे, रस्त्यावर उभे असलेले लोक दृश्य पाहून हादरणे, महामार्गावर होणाऱ्या अपघातांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होणे, मृतांच्या कुटुंबियांना आणि जखमीना तातडीने आर्थिक मदत देण्याची नितांत आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

पुणे जिल्ह्यातील जेजुरी पोलीस स्टेशन हद्दीमध्ये जेजुरी मोरगाव रोडवर नाझरी गावाजवळ दिनांक १८/०६/२०२५ रोजी सायंकाळी १८.४५ ते ९.०० वाजेच्या दरम्यान स्वीफ्ट डिझायर कार व पिकअप गाडीचा भीषण अपघात झाला होता. सदर अपघातात स्वीफ्ट डिझायर चालकाने भरधाव वेगाने वाहन चालवून रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन श्रीराम ढाब्यासमोर उभ्या असलेल्या पिकअप व मारुती सुझकी एस. प्रेसो या वाहनाना जोरधार धडक दिली. सदर धडकमध्ये पिकअप वाहनातील फ्रिज खाली घेत असलेली व्यक्ती, हॉटेलवर पाणी पिण्यासाठी आलेली व्यक्ती व स्वीफ्ट डिझायरमधील वाहन चालकासह महिला व मुले यांचासह सदर अपघातामध्ये जखमी झालेल्या इसमानां तात्काळ जेजुरी ग्रामीण रुग्णालय व जेजुरी आय. सी. यु. हॉस्पीटल येथे उपचारकामी

ॲडमीट करण्यात आले होते. त्यापैकी ८ व्यक्तींचा जागेवरच मृत्यु झालेले आहेत व १ व्यक्तीचा उपचारा दरम्यान मृत्यु झाल्याने एकूण ९ व्यक्तींचा या अपघातात मृत्यू झालेले आहेत.

जेजुरी पोलीस स्टेशन येथे सदरील गुन्ह्याबाबत गु.र.नं २२४/२०२५ बीएनएस कलम १०६(१),१२५(ए) (बी) २८१,३२४(२-६) तसेच मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम १८४ अन्वये दिनांक १९/०६/२०२५ रोजी ०६.४० वाजता गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर अपघातामध्ये स्वीप्ट कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या महामार्गावर अपघातामध्ये घट होण्याकरिता उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. वाहतूक नियमित होण्याकरिता वाहतूक कर्मचारी यांची नेमणूक करण्यात येते. सदरील खाजगी वाहनांतील जखमी व मयतांचे नातेवाईक यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना अपघात विमा मिळावा याकरीता गुन्ह्याचे आवश्यक ती सर्व कागदपत्रे पुरविण्यात आलेली आहे.

******

लक्षवेधी सूचना क्र.६५८

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय अधिवेशन

मा.श्री.विजय वडेट्टीवार, श्री. सुरेश धस , श्री. अतुल भातखळकर विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.६५८ पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यातील कारागृहात तीन वर्षात जवळपास पाचशे कोटीचा घोटाळा झाला असल्याचा आरोप होत असणे, याबाबत राज्याचे मुख्य सचिव व गृह सचिव यांनी चौकशी सुरु असल्याचे समोर येणे, परंतु या प्रकरणी चौकशीमध्ये टाळाटाळ होत असल्याची बाब माहे जून २०२५ मध्ये समोर येणे. सदर प्रकरणाची गेल्या तीन महिन्यात सखोल चौकशी होणे गरजेचे असताना. कारागृहात झालेल्या कॅन्टीन, रेशन व इतर साहित्य उपकरणाच्या खरेदीमध्ये अनियमितता झाल्याचे स्पष्ट दिसून येणे. कारागृह घोटाळ्यातील प्रमुख अमिताभ गुप्ता व जालिंदर सुपेकर यांच्याशी तेजस मोरे यांचे एकमेकाशी आर्थिक संबंध असल्याची बाब समोर येणे. मोरे हा गेल्या अनेक दिवसापासून सातत्याने मुंबई भायखळा येथील ADG कार्यालयात तसेच अधिकाऱ्यांच्या बंगल्यावर त्याचा संपर्क वाढलेला दिसून येणे तसेच पुणे या कार्यालयातील वरिष्ठ प्रशासन अधिकारी सत्यवान हिंगमिरे, तुरुंग अधीक्षक प्रशांत मते, जेलर शाहू विभूषण दराडे, लेखनिक गौरव जैन, सुनील ढमाळ अधीक्षक येरवडा, अतुल पट्टेकरी क्लार्क येरवडा कारागृह या सर्वांची तसेच त्यांच्या संपत्तीची ईडी आणि सीबीआय कडून चौकशी करण्यात यावी. अशी तक्रार शासनाकडे करत असणे याच्यावरती शासनाने तातडीने करावयाची कारवाई व उपाय योजना..."

---

## मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

राज्यातील कारागृहांत मागील तीन वर्षातील रेशन व उपकरण साहित्याची एकूण रु. ५३३.५३ कोटींची खरेदी अपर पोलीस महासंचालक, कारागृह व सुधारसेवा, पुणे (अपोमसं, कारागृह) यांच्या स्तरावरुन करण्यात आली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

(रक्कम रु.कोटी)

| अ.क्र | विवरण | खर्च तपशील | सन २०२२-२३ | सन २०२३-२४ | सन २०२४-२५ | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | रेशन | अनिवार्य | ७२.७७ कोटी | ९८.३० कोटी | १०६.८४ कोटी | २७७.९१ कोटी |
| २. | उपकरणे | कार्यक्रम | १२.७० कोटी | १७४.२० कोटी | ६८.७२ कोटी | २५५.६२ कोटी |
| | एकुण (१+२) | | | | | ५३३.५३ कोटी |

| अ.क्र. | विवरण | खर्च तपशील | सन २०२२-२३ | सन २०२३-२४ | सन २०२४-२५ | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | उपहारगृह | खाजगी खर्च | ४७ २५.कोटी | ६५ ३२.कोटी | ३८.०९कोटी | १५०.६६ कोटी |

(कॅन्टीन खरेदी : कारागृहातील उपहार गृह (कॅन्टीन) हे बंद्यांकरिता सुविधा केंद्र असून त्यामध्ये शासकीय निधीचा विनियोग नाही.)

कारागृहातील रेशन खरेदी पद्धतीचा घटनाक्रम:-

| अ.क्र. | शासन निर्णय दिनांक | घटना |
|---|---|---|
| १ | २६/१२/२००७ | कारागृहातील रेशन खरेदीसाठी अन्नधान्याच्या ५१ वस्तूंचे ६ गट निश्चित केले. |
| २ | १५/०२/२०११ | कारागृह उपमानिरीक्षक स्तरावरील समितीस प्रदान केलेल्या अधिकारानुसार प्रत्येक वर्षासाठी रेशनकरीता ई निविदा राबविण्यास मान्यता दिली. |
| ३ | ०६/०१/२०१४ | अन्नधान्याचे ६ ऐवजी १४ गटांत वर्गीकरण करण्यास मान्यता दिली. |
| ४ | १५/०३/२०२४ | अपोमसं (कारागृह ) यांचेकडून प्राप्त प्रस्तावानुषंगाने अन्नधान्याच्या १४ गटांऐवजी ३ गटांत वर्गीकरण करुन केंद्रिय पध्दतीने ई निविदा प्रक्रिया राबविण्यास, खाद्यवस्तुंच्या प्रत्येक गटासाठी विभागनिहाय निविदा करण्यास व याबाबतचे सर्व अधिकार अपोमसं (कारागृह ) यांना देण्यास मान्यता दिली. |

अपोमसं (कारागृह) यांचे स्तरावरील निविदा प्रक्रियेबाबतचा घटनाक्रम:-

| अ.क्र. | शासन निर्णय दिनांक | घटना |
|---|---|---|
| १ | ०३/०८/२०२४ | अन्नधान्याच्या तिन्ही गटांकरीता अपोमसं (कारागृह) कार्यालयाने मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध केली. त्यानुसार एकूण ५ प्रादेशिक विभागांकरीता अन्नधान्याच्या ३ गटांनुसार १५ निविदा प्रसिद्ध केल्या. |
| २ | २६/०८/२०२४ | निविदा दाखल करण्याचा अंतिम दिनांक. त्यानुसार अपोमसं (कारागृह) यांचे कार्यालयास तिन्ही गटांकरीता एकूण १६८ निविदा प्राप्त झाल्या. |
| ३ | २७/०८/२०२४ | कारागृहातील सर्व खरेदीकरीता असणाऱ्या तांत्रिक समितीचे पुनर्गठन केले. |
| ४ | ०३/०९/२०२४ | गट-२ करीता तांत्रिक समितीची बैठक पार पडली. |
| ५ | १२/०९/२०२४ | गट-१ करीता तांत्रिक समितीची बैठक पार पडली. |
| ६ | १२/०९/२०२४ | तदनंतर गट १ व ३ करीताचे नमूने मान्यताप्राप्त NABL प्रयोगशाळांना पाठवल्यावर प्रयोगशाळा अहवाल प्राप्त झाला. त्यानंतर तांत्रिक समितीची बैठक झाली. |
| ७ | १३/०९/२०२४ | राज्यस्तरीय खरेदी समितीच्या बैठकीत व्यापारी लिफाफे उघडून L-१ ठरलेल्या निविदाकाराची यशस्वी निविदाकार म्हणून निवड केली. |
| ८ | १३/०९/२०२४ | गट-१ करीता निविदा स्वीकृती आदेश दिले. |

रेशन गट-१ :-

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे कारागृहाच्या रेशन गट-१ च्या निविदा प्रक्रियेबाबत तक्रारदार पुरवठादारांनी दिवाणी याचिका क्र.१३३११/२०२४ व क्र.१४३४३/२०२४ अन्वये निविदेबाबत आक्षेप नोंदविले होते. परंतु, मा.उच्च न्यायालयाने सदर याचिकांमध्ये दिनांक ०४/०७/२०२५ रोजीच्या न्यायनिर्णयात "we do not find any merit in the writ petitions. The same fail and are hereby dismissed" असे नमूद करुन दोन्हीही याचिका निकाली काढल्या आहेत.

| विभागाचे नाव | पुणे विभाग | नागपूर विभाग | मुंबई विभाग | छ.संभाजीनगर विभाग | नाशिक विभाग |
|---|---|---|---|---|---|
| L-१ निविदाकार | एम पी भुतडा, लातूर | केंद्रिय भांडार, मुंबई | श्री साई मार्केटींग ॲन्ड ट्रेडींग कं, जळगांव | एन.सी.सी.एफ., मुंबई | एन.सी.सी.एफ, मुंबई |

रेशन गट-२ :-

गट २ साठी निविदेत यशस्वी निविदाकार (एल-१) यांनी काही वस्तुंचे दर बाजारदरांपेक्षा अत्यल्प दिल्याने तत्कालिन अपोमसं (कारागृह) यांनी गट-२ च्या निविदा रद्द करुन दिनांक २०.०९.२०२४ रोजी नव्याने फेरनिविदा प्रसिध्द केल्या. सबब, गट-२ मधील यशस्वी निविदाकार- गृहलक्ष्मी तेल आणि किराणा केंद्र, मे.व्ही.एम. डिस्ट्रीब्युटर्स, नाशिक व नॅकॉफ यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे स्वतंत्र याचिका दाखल केल्या.

अन्नधान्याच्या निविदा प्रक्रियेसंदर्भात शासनाकडे प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने प्रधान सचिव (अ.व सु.) यांच्याकडे दिनांक ३०/०९/२०२४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये त्यांनी गट-२ मध्ये न्युनतम दर सादर करणाऱ्या निविदाकारास (L-१) पुरवठा आदेश देण्याचे व प्रसिध्द केलेली फेरनिविदा जाहिरात रद्द करण्याचे निर्देश अपोमसं (कारागृह) यांना दिले. त्यावर फेरविचार करण्यासंदर्भात अपोमसं (कारागृह) यांनी विनंती केली असता सदर विनंती अमान्य करण्यात येत असून देण्यात आलेल्या (उक्त) निर्देशांनुसार तात्काळ कार्यवाही करण्याबाबत अपोमसं, कारागृह यांना शासनपत्र दिनांक १७/१०/२०२४ अन्वये कळविले. त्यानुसार अपोमसं (कारागृह) यांनी खाली नमूद L-१ निविदाकारांना पुरवठा आदेश दिले.

| विभागाचे नाव | पुणे विभाग | नागपूर विभाग | मुंबई विभाग | छ.संभाजीनगर विभाग | नाशिक विभाग |
|---|---|---|---|---|---|
| L-१ निविदाकार | मे.व्ही.एम. डिस्ट्रीब्युटर्स, नाशिक | श्री गृहलक्ष्मी किराणा आणि तेल केंद्र, धुळे | मे.नॅकॉफ, मुंबई | श्री गृहलक्ष्मी किराणा आणि तेल केंद्र, धुळे | मे.व्ही.एम. डिस्ट्रीब्युटर्स, नाशिक |

मा.न्यायालयाने, "learned AGP has brought to our notice a letter dated 17 th Oct, 2024 written by State Government to ADG Prison, whereby decision to proceed ahead with the earlier tender process has been conveyed.

In view of the aforesaid letter dated 17.10.2024, nothing needs to be adjudicated any further in this writ petition, which is hereby disposed of in terms of the aforesaid decision असे न्यायनिर्णयित करुन यशस्वी निविदाकारांच्या याचिका निकाली काढल्या आहेत.

रेशन गट-३ :-

गट-३ करीता निविदेत सरासरी १० निविदाकारांनी सहभाग घेतला. तत्कालिन अपोमसं (कारागृह) यांचेकडे तांत्रिक समितीची बैठक दिनांक १८.०९.२०२४ रोजी पार पडली. दिनांक २२.०९.२०२४ रोजीच्या राज्यस्तरीय खरेदी समितीच्या बैठकीत यशस्वी निविदाकारांची निवड करुन अपोमसं (कारागृह) यांनी दि. २२.०९.२०२४ रोजी पुढील निविदाकारांना निविदा स्वीकृती आदेश दिले.

| विभागाचे नाव | पुणे विभाग | नागपूर विभाग | मुंबई विभाग | छ.संभाजीनगर विभाग | नाशिक विभाग |
|---|---|---|---|---|---|
| L-१ निविदाकार | श्री साई मार्केटींग ॲन्ड ट्रेडींग कं, जळगांव | श्री साई मार्केटींग ॲन्ड ट्रेडींग कं, जळगांव | मुकेश ट्रेडिंग, मुंबई | श्री साई मार्केटींग ॲन्ड ट्रेडींग कं, जळगांव | श्री साई मार्केटींग ॲन्ड ट्रेडींग कं, जळगांव |

विद्युत उपकरणे खरेदी:-

(रक्कम रु.कोटी)

| बाब | खरेदी केलेल्या वस्तु | वर्ष निहाय खरेदी रुपये | | | एकूण खरेदी |
|---|---|---|---|---|---|
| | | २०२२-२३ (रुपये कोटी) | २०२३-२४ (रुपये कोटी) | २०२४-२५ (रुपये कोटी) | २०२२-२५ (रुपये कोटी) |
| १ सुरक्षा उपकरणे | ड्रोन कॅमेरा | १.७८ | ० | ० | १.७८ |
| | एक्स-रे बॅगेज स्कॅनर | १.५३ | ० | ० | १.५३ |
| | सीसीटीव्ही | ० | ५१.३८ | १९.४६ | ७०.८४ |
| | डिझेल जनरेटर | ४.१९ | २.०९ | ० | ६.२८ |
| | टि व्ही | ० | ४.८१ | ४.९४ | ९.७५ |
| | पॅनिक बटन | ० | ० | २८.३६ | २८.३६ |
| एकूण (१) | | ७.५ | ५८.२८ | ५२.७६ | ११८.५४ |
| २. व्ही सी उपकरणे | व्ही सी संच | ४.५९ | ७३.०० | ८.५५ | ८६.१४ |
| एकूण (२) | | ४.५९ | ७३.०० | ८.५५ | ८६.१४ |
| ३. संगणकीकरण | संगणक उपकरणे | ०.४६२ | ३७.७५ | ४.६४ | ४२.८५ |
| एकूण (३) | | ०.४६२ | ३७.७५ | ४.६४ | ४२.८५ |
| ४. वैद्यकीय उपकरणे | वॉशिंग मशिन | ० | ५.१६ | ० | ५.१६ |
| | व्हील चेअर/स्ट्रेचर | ०.१५४ | ० | ० | ०.१५ |
| | वॉटर कुलर | | ० | २.७७ | २.७७ |
| एकूण (४) | | ०.१५४ | ५.१६ | २.७७ | ८.०८ |
| एकूण (१+२+३+४) | | १२.७० | १७४.२० | ६८.७२ | २५५.६२ |

अ.क्र.१ ते ४ येथे नमूद विद्युत उपकरणांची खरेदी ही प्रशासकीय मान्यतेनुसार ई निविदा प्रक्रिया राबवून GeM पोर्टल व Mahatender पोर्टलवरुन मंजूर निधीच्या मर्यादेत अपोमसं (कारागृह) यांनी केली आहे.

कॅन्टीन खरेदी:-

कॅन्टीनकरीता MRP पेक्षा पाच टक्के कमी दराने वस्तू पुरवठा करण्याबाबत मे.एन.सी.सी.एफ., मुंबई यांनी शासनास विनंती केली. त्यास अनुसरुन अपोमसं (कारागृह) यांना केंद्र शासनाच्या दिनांक १५/१२/२०२२ रोजीच्या मार्गदर्शक तत्वानुसार नियमानुसार उचित कार्यवाही करण्यास कळविले. त्यानुसार अपोमसं (कारागृह) यांनी सर्व कारागृह अधीक्षकांना निर्देशित केले. त्यानुसार सर्व कारागृह अधीक्षक यांनी त्यांचे स्तरावर प्रायोगिक तत्वावर M/S NCCF यांची थेट नेमणूक केली. तद्नंतर केंद्रिय पध्दतीने संपूर्ण महाराष्ट्रातील कारागृहांसाठी Mahatender प्रणालीवर निविदा प्रक्रिया राबवून L-१ निविदाकार, M/s National Co-operative Consumer Federation यांना दि.०१.१२.२०२४ ते ३१.०३.२०२६ या दोन वर्ष कालावधीकरीता कॅन्टीन वस्तू पुरवठा करण्यासाठी अपोमसं (कारागृह) यांनी नियुक्त केले.

मारिया महिला बचत गट, श्री गृहलक्ष्मी किराणा आणि तेल केंद्र, राधिका ट्रेडर्स, श्री.हेमंतकुमार धनपाल सुरवंशी, चेरिज इंडिया प्रा.लि.यांनी अन्नधान्याच्या गट क्र.१, २, ३ च्या निविदा प्रक्रियेमधील अनियमितता, अपारदर्शकता, नमुना अहवाल निविदाकारांना सादर न करणे इ.बाबत शासनाकडे तक्रार अर्ज दाखल केले. सदर तक्रार अर्जांच्या अनुषंगाने अपोमसं कारागृह यांचेकडून शासनपत्र दिनांक २२/११/२०२४ अन्वये खुलासा मागविण्यात आला. सदर खुलासा त्यांच्या दिनांक ०५/१२/२०२४ व दिनांक २७/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाला.

सदर खुलासा अहवालांमध्ये तत्का.अपोमसं, कारागृह यांनी कारागृहांना पुरविण्यात येणाऱ्या अन्नधान्य व इतर खादयोपयोगी वस्तुंच्या पुरवठयासंदर्भात गृह विभाग, शासन निर्णय दिनांक १५/०३/२०२४ व उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक ०१/१२/२०१६ मधील मार्गदर्शक सुचनांनुसार ई-निविदा प्रक्रिया पारदर्शकपणे, प्रामाणिकपणे, जबाबदारीने आणि गुणवत्तेची खात्री करत पार पाडली असून शासनाला कोणताही आर्थिक तोटा झाला नसल्याचे नमूद केले आहे.

मा.राजू शेट्टी, माजी लोकसभा सदस्य यांनी राज्यातील कारागृहामध्ये रेशन, कॅन्टीन व विद्युत उपकरणासह इतर साहित्य खरेदीमध्ये झालेल्या घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी चौकशी समिती नेमण्याकरीता विनंती केली. त्या अनुषंगाने अपोमसं (कारागृह) यांनी दिनांक ३०.०६.२०२५ रोजीच्या अहवालात खरेदी प्रक्रियेच्या तक्रारीमध्ये तथ्य नसल्याबाबत स्वयंस्पष्ट अभिप्राय सादर केले आहेत.

श्री.तेजस मोरे हे कैवल्य ज्ञान विज्ञान सत्संग, जळगाव या संस्थेचे प्रतिनिधी आहेत. त्यांच्या संस्थेला कारागृहात "भक्ती आणि व्यसनमुक्ती" बाबत सत्संग कार्यक्रम आयोजित करण्यासाठी शासनपत्र दिनांक ०६/०९/२०२३ अन्वये परवानगी दिली असून उक्त संस्थेचे कार्यक्रम आयोजित करण्याकरीता श्री. तेजस मोरे यांनी मुंबई, भायखळा व पुणे येथील कार्यालयास भेटी दिल्या आहेत. तथापि, खरेदी प्रक्रियेबाबत त्यांचा संबंध दिसून येत नाही.

राज्यातील कारागृहांमध्ये रेशन व कॅन्टीनसंदर्भात अपोमसं (कारागृह) यांच्या स्तरावर झालेली खरेदी प्रक्रिया माहे ऑगस्ट, २०२४ ते नोव्हेंबर, २०२४ या कालावधीत झालेली आहे. कारागृह विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचे नाव, पदनाम व कार्यभाराचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| नाव व पदनाम आणि कालावधी | कार्यभार तपशील |
|---|---|
| श्री. अमिताभ गुप्ता, अपर पोलीस महासंचालक कारागृह, पुणे<br>(कालावधी-दि.१८/१२/२०२२ ते १५/०७/२०२४)<br>श्री.प्रशांत बुरडे, अपर पोलीस महासंचालक कारागृह, पुणे<br>(कालावधी१५/०७/२०२४ ते ०६/०३/२०२५-अपोमसं, पुणे) | १. कारागृह विभाग प्रमुख<br>२. राज्यस्तरीय खरेदी समितीचे अध्यक्ष (निविदा प्रक्रिया राबविणे, त्यामधील अटी शर्तींना मंजूरी देणे, पूर्ण निविदा प्रक्रियेवर पर्यवेक्षण व मंजूरीचे अधिकार) |
| श्री.जालिंदर सुपेकर, विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह),कारागृह मुख्यालय, पुणे<br>(कालावधी- दि. २८.०४.२०२३ ते ०२.०६.२०२५-अपोमसं, पुणे) | १. खरेदी समिती सदस्य सचिव<br>२. खरेदी समितीच्या तांत्रिक समितीचे प्रमुख (निविदांचे विश्लेषण, निविदांची पात्रता/अपात्रता तपासून राज्यस्तरीय खरेदी समितीला शिफारस करणे) |

| | |
|---|---|
| श्री.सुनिल ढमाळ, अधीक्षक येरवडा मध्यवर्ती , कारागृह<br>(कालावधी- दि.१७/०२/१९९२ ते १६/०२/१९९३-तु.अ.प्र.म.वि.येरवडा, पुणे<br>दि.१७/०३/१९९३ ते ३१/१०/१९९३-येरवडा म.का.<br>दि.०१/११/१९९३ ते १०/०५/१९९७- पैठण खु.जि.का.<br>दि.११/०५/१९९७ ते ३१/०५/२००६-येरवडा म.का.<br>दि.०१/०६/२००६ ते ०३/०६/२००७-कल्याण जि.का.<br>दि.०४/०६/२००७ ते १६/०६/२०१०-ठाणे म.का.<br>दि.१७/०६/२०१० ते २७/०५/२०१३-सोलापूर जि.का.<br>दि.२८/०५/२०१३ ते १४/०६/२०२३-अपोमसं, पुणे<br>दि.१५/०६/२०२३ ते अद्यापपर्यंत- येरवडा म.का. | १. अधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह<br>२. (येरवडा मध्य. कारागृहाचे व्यवस्थापन व नियंत्रण करणे तसेच सदर कारागृहाकरीता आवश्यक वस्तुंची मागणी करणे व त्या प्राप्त करुन घेणे, तसेच योग्य वस्तू प्राप्त झाल्याची खात्री करणे) |
| श्री.सत्यवान हिंगमिरे, वरिष्ठ प्रशासन अधिकारी, कारागृह मुख्यालय, पुणे-१<br>(कालावधी- दि.०५/०९/२००१ ते ११/०६/२००७-मुंबई म.का.<br>दि.१२/०६/२००७ ते ३०/०६/२०१०सोलापूर जि.का.<br>दि.०१/०७/२०१० ते ०१/१२/२०११-अपोमसं, पुणे<br>दि.०२/१२/२०११ ते ३०/०९/२०१७-लातूर जि.का.<br>दि.०१/१०/२०१४ ते २१/०६/२०१६-अमरावती म.का.<br>दि.२२/०६/२०१६ ते १७/०८/२०२१-येरवडा म.का.<br>दि.१८/०८/२०२१ ते अद्यापपर्यंत- अपोमसं, पुणे | १. विद्युत उपकरणे खरेदी तांत्रिक समितीचे सदस्य.<br>२. रेशन खरेदी तांत्रिक समितीचे सदस्य सचिव<br>(निविदा उघडणे, निविदेबाबत संकीर्ण पत्रव्यवहार करणे, निविदा प्रक्रियेचे पर्यवेक्षण करणे, निविदा GeM पोर्टलवर प्रसिध्द करणे, शुध्दीपत्रक काढणे, निविदा उघडणे, निविदांच्या छाननी करणे, तांत्रिक समितीचा अहवाल प्रसिध्द करणे, निविदेचे विश्लेषण पोर्टलवर प्रसिध्द करणे इ.) |
| श्री.प्रशांत मते, अधीक्षक, तुरुंग उद्योग, कारागृह मुख्यालय, पुणे<br>(कालावधी-दि.०८/०१/२०१५ ते अद्यापपर्यंत-अपोमसं, पुणे) | १. कारागृहातील उद्योगांचे व्यवस्थापन व नियंत्रण<br>२. कॅन्टीन व रेशन तांत्रिक समिती सदस्य<br>(निविदा ई पोर्टलवर प्रसिध्द करणे, शुध्दीपत्रक काढणे, निविदा उघडणे, निविदांच्या छाननी करणे, तांत्रिक समितीचा अहवाल प्रसिध्द करणे, निविदेचे विश्लेषण पोर्टलवर प्रसिध्द करणे) |
| श्री.शाहू बिभीषण दराडे, तुरुंगाधिकारी श्रेणी-१, कारागृह मुख्यालय, पुणे<br>(कालावधी-दि.०८/१२/२०१२ ते ०५/०१/२०१४-येरवडा म.का.,<br>दि.०५/०१/२०१४ ते २३/०१/२०१५-प्रा.दौ.जा.तु.अ.प्र.म.पुणे,<br>दि.२७/०१/२०१५ ते ०६/०५/२०२२-अपोमसं, पुणे<br>दि.०७/०५/२०२२ ते २४/०४/२०२३-लातूर जि.का.<br>दि.२५/०४/२०२३ ते १७/०९/२०२४-अपोमसं, पुणे<br>दि.१८/०९/२०२४ ते अद्यापपर्यंत- अपोमसं, पुणे | १. कारागृह संगणकीकरण व आधुनिकीकरण, ई-सेल कक्ष अधिकारी<br>२. विद्युत उपकरणे खरेदी तांत्रिक समितीचे सचिव.<br>(निविदा उघडणे, निविदेबाबत संकीर्ण पत्रव्यवहार करणे, निविदा प्रक्रियेचे पर्यवेक्षण करणे, निविदा GeM पोर्टलवर प्रसिध्द करणे, शुध्दीपत्रक काढणे, निविदा उघडणे, निविदांच्या छाननी करणे, तांत्रिक समितीचा अहवाल प्रसिध्द करणे, निविदेचे विश्लेषण पोर्टलवर प्रसिध्द करणे इ.) |
| श्री.गौरव कोंडेकर, वरिष्ठ लिपिक, कारागृह मुख्यालय, पुणे-१<br>(कालावधी-दि.१७/०७/२००६ ते ०७/०६/२०१२-काउमनि, औरंगाबाद<br>दि.१८/०६/२०१२ ते २१/०५/२०१८-नांदेड जि.का.<br>दि.३०/०५/२०१८ ते २१/०४/२०२३-परभणी जि.का.<br>दि.२२/०४/२०२३ ते अद्यापपर्यंत- अपोमसं कार्या. पुणे) | १. कारागृह उद्योग कक्षातील कामकाज<br>२. खरेदी संदर्भातील नस्ती सादर करणे. (रेशन व कॅन्टीन.) |

| | |
|---|---|
| श्री.अतुल पटेकर, लिपिक, येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे-६ (कालावधी-सन.२०१३ ते २०२१-काकमनि कार्या. पुणे व दि.२०/०८/२०२१ ते अद्यापपर्यंत अपोमसं कार्या. पुणे) | १. येरवडा मध्यवर्ती कारागृह येथील आवश्यक खाद्यवस्तुंची मागणी व वितरण करणे |

अन्नधान्याच्या गट-१ व २ संदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका मा.न्यायालयाने निकाली काढल्या आहेत. त्यामुळे अन्नधान्याच्या गट-१, २ व ३ मध्ये यशस्वी निविदाकारांना दिलेल्या पुरवठा आदेशानुसार सध्या सर्व कारागृहांना सुरळीत पुरवठा सुरु आहे.

तत्कालिन अपोमसं (कारागृह) यांनी दिनांक ०५/१२/२०२४ व दिनांक २७/०१/२०२५ च्या खुलासा अहवालान्वये कारागृहांना पुरविण्यात येणाऱ्या अन्नधान्य व इतर खादयोपयोगी वस्तुंच्या पुरवठयासंदर्भात निविदा प्रक्रिया ही नियमानुसार पार पडली असल्याचे नमूद केले असून, मा.राजू शेट्टी, माजी लोकसभा सदस्य यांच्या विनंतीच्या अनुषंगाने विद्यमान अपोमसं (कारागृह) यांनीदेखील दिनांक ३०.०६.२०२५ रोजीच्या अहवालान्वये कारागृह विभागाद्वारे राबविण्यात आलेली खरेदी प्रक्रिया नियमानुसार राबविण्यात आल्याचे नमूद केले आहेत. त्यामुळे सदर प्रकरणी कोणतीही कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

**********************

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. अबू आझमी, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक ६८२ पुढीलप्रमाणे उपस्थित केली आहे:-**

"मानखुर्द शिवाजीनगर विधानसभा क्षेत्रामध्ये घाटकोपर मानखुर्द लिंक रोड वर भरदाव येणाऱ्या अवजड वाहनामुळे झालेल्या अपघातामध्ये एकाच घरातील चार जणांचा मृत्यू झाला असल्याची गंभीर बाब १५ जून २०२५ वा त्यासुमारास निदर्शनास येणे, अपघातामध्ये ३ बालकांचा २९ वर्षाच्या माणसाचा मृत्यू होणे, सदर मानखुर्द लिंक रोडवर डंपर अन्य अवजड वहाने भरदाव वेगाने जात असल्यामुळे नेहमी येथे अपघाताच्या घटना होत असल्याचे निदर्शनास येणे, सदर मार्गावर बनलेल्या उड्डाणपुलावरून अवजड वहाने जाण्यास मनाई असल्याकारणाने अवजड वहाने उड्डाणपुला खालून जात असल्याने वाहतूक कोंडी व अपघात होत असणे, सदर उड्डाणपुलावरून अवजड वहाने जाण्यास परवानगी देण्यात यावी असे निवेदन वारंवार संबंधित विभाग तसेच विधानसभा अधिवेशनाच्या सदनामध्ये स्थानिक विधानसभा सदस्य यांच्याकडून करण्यात येणे, मागणी करूनही शासनाकडून कोणतीही कार्यवाही न होणे, सदर विषयी शासनातर्फे करण्यात आलेली वा येत असलेली कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

## मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

पूर्व उपनगरातील घाटकोपर मानखुर्द लिंक रोडवर दिनांक १४/०६/२०२५ रोजी दुर्देवी अपघातात एक २९ वर्षाचा इसम व त्यासोबत ३ बालकांचा मृत्यु झाला. सदर अपघातातील इसमाने हेल्मेटचा वापर न करता वाहतूकीचे नियम न बाळगता त्याच्यासह ३ बालकांना घेऊन जात असताना डंपरने धडक दिल्याने प्राणातिक अपघातास बळी पडले आहेत.

दिनांक १४/०६/२०२५ रोजी शिवाजीनगर सिग्नल येथे झालेल्या अपघाताबाबत डंपर चालकाविरुध्द देवनार पोलीस ठाणे येथे भारतीय न्याय

संहिता २०२३ कलम १०५, २८१ व मोटरवाहन अधिनियम, १९८८ कलम १८४ अन्वये गुन्ह्याची नोंद झाली असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

सदरची घटना झाल्यानंतर अपर पोलीस आयुक्त, वाहतूक, पोलीस उप आयुक्त, पूर्व उपनगरे, वाहतूक, पोलीस निरीक्षक, मानखुर्द, वाहतूक विभाग तसेच इतर अधिकारी यांनी स्थानिक आमदार, नगरसेवक व इतर स्थानिक जनते सोबत दिनांक १९/०६/२०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत घटनास्थळावर भेट देऊन अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्यासंदर्भात चर्चा झाली. सदर चर्चेमध्ये व पाहणी दरम्यान निदर्शनास आलेल्या महत्वाच्या सूचना यांची अमंलबजावणी करण्याचे काम देखील सुरू आहे.

सद्य:स्थितीत सदर मार्गीकेवर प्रथम सत्र व द्वितीय सत्रात एकूण ०२ अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच मानखुर्द विभागातील रायडर्स हे कायम गस्तीकरीता नेमण्यात आलेले आहेत. घाटकोपर मानखुर्द लिंक रोडवरील कचरपट्टी सिग्नल, बैगणवाडी सिग्नल, शिवाजीनगर सिग्नल येथे अपघात होऊ नये याकरिता गती रोधक बसविण्यात आलेले आहेत व झेब्रा क्रोसींग देखील आखण्यात आलेले आहेत.

माहे ०१/०१/२०२५ ते ३०/०६/२०२५ पर्यत मानखुर्द विभागाच्या हद्दीत वाहतुकीस अडथळा व धोका निर्माण करणाऱ्या वाहनांवर २१०६७, जंपिंग सिग्नलच्या ६६०४, ट्रिपल सिटच्या ४८२, नो एन्ट्री/वन वेच्या ६०८३, विदाऊट हेलमेटच्या ६७१८ कारवाई करण्यात आलेली असून संबंधितांना चलनाद्वारे दंड आकारण्यात आलेला आहे.

पोलीस उप आयुक्त, पूर्व उपनगरे यांनी दिनांक १९/१०/२०२१ तसेच दिनांक १२/१२/२०२३ अन्वये जारी केलेल्या अधिसूचनाच्या अन्वये या उड्डाणपुलावरील वाहतुकीची वेगमर्यादा ही ५० वरून ६० कि. मी. इतकी करण्यात आलेली असून या वेगाने मार्गक्रमण न केल्यास वाहतूक संथ गतीने मार्गस्थ झाल्यास वाहतुकीची कोंडी निर्माण होण्याची शक्यता आहे. उड्डाणपुलांचे दोन्ही बाजुला सुरुवातीस आणि शेवटी सध्या वाहतुकीची गती मंद असून वाहतूक कोंडी होत असते आणि जर अवजड वाहनांची वाहतूक उड्डाणपुलावरून झाली तर दोन्ही वाहिन्यांचे सुरुवातीला आणखीन जास्त वाहतूक कोंडी होईल व त्यामुळे पुर्व मुक्त मार्ग व पनवेल सायन मार्गाचे दक्षिण

वाहिन्यांवरही त्याचा परिणाम होऊन वाहतुकीस अडथळा निर्माण होईल. सदर ब्रिज हा अतिशय वर्दळीचा आहे. सदर ब्रीजवरुन/मार्गावरुन देशभरातील अनेक व्हि.आय.पी.ची ये-जा सुरु असते. संपूर्ण वाहतूक या उड्डाणपुलावरून वळविण्यात आल्यास अशा महत्त्वाच्या व्यक्तींच्या मार्गक्रमणाचे वेळीही अधिक अंमलदार वाहतूक नियमनासाठी नेमावे लागतील व तरीही वाहतूक कोंडी किंवा कमी गतीचे वाहतुकीमुळे मार्गक्रमणास अडथळा येऊन जास्त कालावधी लागण्याची शक्यता आहे.

तसेच उड्डाणपुलावर अवजड वाहन बंद पडल्यास बाजूस करणेस जागा नाही. उड्डाण पुलाखालून जाणारे वाहनास ४ जंक्शन/सिग्नल ओलांडावे लागते त्यामुळे वाहनांचा वेग कमी असतो. ब्रिज खालील रस्ता हा चौपदरी रस्ता आहे व तो कमी प्रमाणात वापरला जात असल्याने अवजड वाहनांच्या रहदारीस कुठल्याही प्रकारच्या अडचणी निर्माण होत नाही.

सर्वाधिक वाहन चालक उड्डाणपुलावरून जाणेस इच्छुक असतील. सद्य:स्थितीत उड्डाण पुलाच्या चढणीला व उतरणीला हलक्या वाहनांमुळे वाहतूक कोंडी होत असते. अवजड वाहनास प्रवेश दिल्यास मोठ्या प्रमाणात सदर ठिकाणी वाहतूक कोंडी होईल. तसेच रहिवाशी व सामान्य जनतेस वाहतूक कोंडीच्या समस्येला तोंड दयावे लागेल.

******

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. ६६१ पुढीलप्रमाणे उपस्थित केली आहे:-

"राज्यातील विविध पोलीस पाटील संघटना यांनी शासनाकडे त्यांच्या प्रलंबित मागण्या अनेकदा सादर केल्या असणे, सदर संघटनेचे विविध प्रश्न गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबीत असणे, तसेच पोलिस पाटील यांच्या प्रमुख मागण्या खालील प्रमाणे असणे, यात प्रामुख्याने पोलिस पाटील यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वरून ६५ वर्षे करने तसेच सेवानिवृत्तीनंतर सेवानिवृत्ती मानधन (पेंशन) किवा एकरकमी २० लाख रूपये मिळणे, या सह कर्तव्यावर असताना पोलीस पाटील यांचा मृत्यू झाल्यास परिवारास ५० लाख रू. सानुग्रह निधी देण्यात यावा तसेच ग्राम पोलीस अधिनियम १९६७ मध्ये दुरूस्ती करून या अधिनियमाचे काटेकोर पालन करण्यात यावे तसेच पोलीस पाटील कल्याण निधीत सुधारणा करून शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे D.C.P.S. लागू करून दरमहा रु.१०००- मानधनातून कपात करण्यात यावी अशी ही मागणी करण्यात आली असणे, तसेच पोलीस पाटलांना त्यांच्या कुटूंबासह आरोग्य विम्याचा लाभ देणे, तसेच नूतनिकरण कायमचे बंद करण्यात यावे तसेच शासन निर्णयाप्रमाणे २०१२ ते २०१६ चा प्रलंबीत प्रवास भत्ता मिळण्याबाबत त्वरित कारवाई करावी इत्यादी मागण्या राज्यातील विविध पोलिस पाटील संघटना यांनी शासनाकडे अनेकदा केल्या असणे, परंतु शासनाने त्यांच्या मागण्याबाबत कोणतीच दखल अद्यापी घेतली नसल्याने राज्यातील तमाम पोलीस पाटील वर्गामध्ये शासनाच्या विरोधात तीव्र नाराजी पसरली असणे, परिणामी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

राज्यातील पोलीस पाटील विविध संघटनेचे मागण्यां सादर करण्यात येतात. पोलीस पाटील यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वरुन ६५ करण्याची मागणी केली आहे. राज्य शासनाच्या कोणत्याही शासकीय,निमशासकीय अथवा मानधन तत्वावर नियुक्ती

होणाऱ्या व्यक्तीची निवृत्तीसाठी वयाची अट ही ५८ व वर्ग ४ साठी ६० वर्षे आहे. शासन निर्णय दिनांक १५.०३.२०२४ अन्वये पोलीस पाटील यांचे मानधन रु.६,५००/- वरुन रु.१५,०००/- इतके मानधन करण्यात आले आहे. म्हणजेच रु.८,५००/- इतके मानधनात वाढ केलेली आहे.

तसेच पोलीस पाटील यांनी केलेल्या इतर मागण्यां पोलीस पाटील पदावर नियुक्त झाल्यानंतर नुतनीकरण हे दर १० वर्षांनी व सदर पोलीस पाटलाच्या वर्तणूकीनुसार/कामकाजाच्या आवश्यकतेनुसार वयाच्या ६० वर्षापर्यंत टप्प्या टप्प्याने नुतनीकरण करण्यात येतात. सदरील नुतनीकरण हे पोलीस पाटील कायदानुसार करण्यात येते.

यापूर्वीच कोव्हिड-१९ मध्ये मृत्यु झालेल्या पोलीस पाटलाच्या वारसांना रु.५० लाख इतके सानुग्रह सहाय्य अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे. यासंदर्भात पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून अभिप्राय मागवून निर्णय घेण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

******

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक १५४९ पुढीलप्रमाणे उपस्थित केली आहे:-**

"नाशिक शहरातील वाहतूक व्यवस्थेची दुर्दशा झालेली असणे, पोलीस प्रशासन दुर्लक्षामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर गाड्या उभ्या करणे बसेस व टॅक्सीचे अनाधिकृत थांबे तयार होणे, खाजगी बसेस रस्ता अडवून उभ्या राहणे, काळा पिवळ्या टॅक्सी चालकांची मनमानी सुरू असणे, रजिस्ट्रेशन नसलेल्या व रजिस्ट्रेशन संपलेल्या टॅक्स नाशिक शहरात सुरू असणे, पोलिसांच्या आशीर्वादाने या टॅक्सी चालकांकडून खंडणी वसूल करून त्यांना संरक्षण दिले जाणे, पोलीस स्टेशनच्या समोर सुरू असणाऱ्या या गैरप्रकाराकडे पोलीस प्रशासनाचे होत असणारे दुर्लक्ष, शहरातील रस्त्यावरील बेकायदेशीर अतिक्रमणाचे वाढलेले प्रमाण, रस्त्यावरील खाजगी बांधकामात झालेली वाढ, प्रशासनाचे जाणीवपूर्वक होत असणारे दुर्लक्ष, केवळ दुचाकी वाहन चालकांना थांबवून त्यांच्याकडून आर्थिक लूट करण्यासाठी सुरू असणारा शहर वाहतूक विभाग, वर्षानुवर्ष वाहतूक विभागात कार्यरत पोलीस कर्मचारी वर्ग त्यामुळे नाशिक शहराची होत असणारी दुरावस्था जागोजागी होत असणारे वाहतूक खोळंबा, स्मार्ट सिटी योजनेतून सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत करून देखील याचा वापर पोलीस विभागाकडून न होणे, त्यामुळे वाहतूक करतानाही वाढणारी दादागिरी, अपघाताच्या प्रमाणात झालेली वाढ, याबाबत शासनाने लक्ष देऊन करावयाची कार्यवाही शासनाचे सदर बाबीकडे होत असणारे दुर्लक्ष, याबाबत शासनाने तत्काळ करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

वाढती वाहनसंख्या तसेच वाढती पर्यटकांची संख्या यामुळे नाशिक शहराच्या वाहतुकीवर ताण पडत आहे. शहरातील वाहतूक समस्या सोडविण्यासाठी वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या सर्व बाबी उदा. सिग्नल बंद पडणे, रस्ता दुरूस्ती करणे, खड्डे बुजविणे, डिवायडर टाकणे, अतिक्रमण हटविणे, पार्किंग व्यवस्था, सीसीटीव्ही यंत्रणा, सर्कल कमी करणे, रस्त्यावर पाणी साचणे, रस्त्यावर बांधकाम साहित्य ठेवणे इत्यादी अडचणींबाबत समन्वयाने कार्यवाही करण्यात येत आहे.

सन २०२४ मध्ये नाशिक शहर परिसरात एकूण २५९ अपघात झाले त्यात ११० लोकांचा मृत्यू झाला असून २२३ व्यक्ती जखमी झाले आहेत. सन २०२५ मध्ये २६८ अपघातामध्ये ९३ लोकांचा मृत्यू झाला असून २६७ व्यक्ती जखमी झालेले आहेत.

स्थानिक पोलीस प्रशासनाने वाहतूक पोलीस अंमलदार यांना वाहतुकीचे नियमन करणे व मोटार वाहन कायदयाचे उल्लंघन करणारे वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करणेबाबत वेळोवेळी सुचना दिल्या आहेत. त्यानुसार रस्त्यावर उभे असलेले काळीपिवळी टॅक्सी, खाजगी बसेस, अवजड वाहनांवर मोटार वाहन नियमानुसार वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या व नो-पार्किंगमध्ये वाहने पार्क करणाऱ्या वाहनधारकांवर नियमितपणे कायदेशीर कारवाई करण्यात येते. मोटार वाहन कायदानुसार १८४५५ दुचाकी वाहनांवर व ४२१४२ इतर वाहनांवर केसेस दाखल करण्यात आलेल्या आहेत. दुचाकी वाहनांवर रु.१,२६,५०,१००/- व इतर वाहनांवर रु.३,३२,२२,६०६/- इतका दंड करण्याची कारवाई करण्यात आली.

महानगरपालिका व वाहतूक पोलीसांच्या संयुक्त मोहिमेद्वारे द्वारका सर्कल येथील वाहतूक बेट तसेच शालिमार, मेनमार्केट, आर.के., सांगली बँक सिग्नल, रासबिहारी चौक, जत्रा हॉटेल इत्यादी ठिकाणी रोडचे अतिक्रमण अनेकदा काढण्यात आले होते. तथापि सदर ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर महापालिकेस याबाबत वेळोवेळी कळविण्यात येऊन अतिक्रमणे काढण्याकरिता ठोस उपाययोजना करण्याबाबत पोलीस आयुक्त, कार्यालयाने कळविले आहे.

स्मार्ट सिटी योजनेतून नाशिक शहरात सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत करण्यात आलेली आहे. त्यामध्ये ११३२ कॅमेरे लावण्यात आले असून ९०० कॅमेरे कार्यरत आहेत. कार्यरत सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमुळे शहरात घडणाऱ्या गुन्ह्यांचे तपासकामी, जसे रस्ते अपघात तपासकामी, मिसींग व्यक्तींचा शोध होणेकरीता, अपहरणाचे गुन्हे, चैन स्नॅचिंग, वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरिता सीसीटीव्ही यंत्रणेचा वापर करून एकूण ४०० केसेसची उकल होण्यासाठी मदत झाली आहे. वाहतूक पोलीसांकडून नियमितपणे कारवाई करून वाहतूक सुरळीत ठेवण्यात येते.

******

**लक्षवेधी सूचना क्रमांक १६०६**

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन

श्री. रोहित पाटील, श्री. सुधीर मुनगंटीवार, श्री. संजय गायकवाड, श्री. योगेश सागर, श्री. प्रकाश सोळंके, श्री. किशोर पाटील, श्री. कैलाश घाडगे पाटील विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना खालील प्रमाणे आहे :-

"डीजी होम लोन योजनेअंतर्गत पोलीस कर्मचाऱ्यांना कमी व्याजदरात घर बांधण्यासाठी कर्ज उपलब्ध करून देण्याची व्यवस्था असूनही, मागील वर्षभरात अनेक अर्ज मंजुरीच्या प्रतिक्षेत आहेत. या प्रलंबित अर्जामुळे संबंधित कर्मचाऱ्यांना इतर खासगी बँकांकडून जास्त व्याजदराने कर्ज घ्यावे लागत आहे, ज्यामुळे त्यांच्यावर आर्थिक बोजा वाढत आहे. शासनाने पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासाच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष का केले आहे? तसेच, जेव्हा डीजी लोन योजनेचा उद्देशच सुलभकर्ज सुविधा उपलब्ध करून देण्याचा असणे, तेव्हा अर्ज मंजुरी प्रक्रियेत विलंब का आणि कसा होत आहे? योजनेचा लाभ नेमका किती कर्मचाऱ्यांना मिळालेला आहे आणि किती प्रकरणे अजूनही प्रलंबित आहेत, याची माहिती सार्वजनिक का केली जात असणे, शासनाने योजनेचा आढावा घेऊन यामध्ये येणाऱ्या अडचणी दूर करून पोलीस कर्मचाऱ्यांनी पूर्वीप्रमाणे ही सुविधा देण्यासाठी करावयाची कार्यवाही या बाबत शासनाची प्रतिक्रिया आणि भूमिका."

---

**मा. मुख्यमंत्री (गृह) महोदयांचे निवेदन**

शासन निर्णय दि. १४/१०/२०२२ नुसार राज्यातील पोलीस दलातील कर्मचा-यांसाठी घरबांधणी अग्रिमाकरीता राष्ट्रीयकृत बँकेमार्फत / वित्तीय संस्थेमार्फत कर्ज घेऊन घरबांधणी अग्रिम योजना महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळामार्फत राबविण्यात येते. सदर योजनेनुसार घरबांधणी अग्रिम मंजूर झाल्यानंतर त्यावर बँकेने आकारलेले व्याज व शासन दराने देण्यात येणारे व्याज यामधील फरकाची रक्कम शासनाच्या मान्यतेने महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळामार्फत संबंधीत बँकांना अदा करण्यात येते. यासाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये रु. १०३ कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

राज्य पोलीस दलातील एकूण ९७८१ पोलीस अधिकारी कर्मचारी यांना विविध बँकांमार्फत रु.१९१५ कोटी इतके घरबांधणी अग्रिम वितरीत करून माहे ऑगस्ट, २०२३ पर्यंतचे सर्व घरबांधणी अग्रिम अर्ज निकाली काढण्यात आलेले आहेत.

सदर योजना सुरु असून, पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य तसेच पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या कार्यालयास दिनांक ३१/१२/२०२४ अखेर एकुण ५४५९ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यासाठी रु. १७६८.०८ कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने एकूण

रु.१७६८.०८ कोटी निधी उपलब्ध करुन देण्याकरीता विविध बँका, वित्तीय संस्था यांच्याकडून दरपत्रके मागवून न्यूनतम व्याजदराने कर्ज उभारणीसाठी मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित यांनी शासनास दिनांक ४/२/२०२५ व दिनांक २४/६/२०२५ रोजी मान्यतेसाठी पाठविलेला असून सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

* * * * *

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. नारायण कुचे, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"छत्रपती संभाजीनगर शहरात चिकन शॉपवर काम करणाऱ्या तरुणाने तीन तरुणांवर मांस कापणाच्या सुऱ्याने वार केल्याने एक तरुण ठार व दोन तरुण गंभीर जखमी झाल्याची घटना दिनांक १९ जुन, २०२५ रोजी वा त्यासुमारास घडलेली असणे, छत्रपती संभाजीनगर शहरात किरकोळ कारणावरुन गंभीर गुन्हे घडण्याचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढले असणे, गुन्हेगारांवर पोलीस प्रशासनाचा कोणताही धाक राहिलेला नसल्याने गुन्ह्यांमध्ये सातत्याने वाढ होत असणे, छत्रपती संभाजीनगर शहरात मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न, परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेले तीव्र स्वरुपाचा असंतोष व भितीचे वातावरण, वरील प्रकरणातील अपराध्यास कठोरात कठोर शिक्षा होण्यासाठी तसेच छत्रपती संभाजीनगरमधील गुन्हेगारांवर पोलीसांचा वचक निर्माण होण्याकरिता शासनाने करावयाची कारवाई व याबाबत शासनाची भूमिका."

---

## मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

दि. १९ जुन, २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे गाडी काढत असतांना धक्का लागल्याच्या कारणावरुन वाद निर्माण होऊन सदरच्या वादामध्ये आरोपींकडुन फिर्यादी व त्यांच्यासोबतचे दोन इसम यांना कोयते व चॉपरने मारहाण करण्यात आली. सदरच्या मारहाणीमध्ये एकाचा मृत्यु झाला असुन दोन जण जखमी झाले आहे. सदर प्रकरणी पोलीस ठाणे एम.सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे गु.र.नं. ३६९/२०२५, भा.न्या.सं.कलम १०३(१), १०९, ११८(२), ३५२, १८९(२), १८९(४), १९०, १९०(१) सह कलम १३५ म.पो.का. सहकलम ३(२) (v) अ.जा.ज.अ.प्र.का प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात एकुण ५ आरोपींना निष्पन्न करुन अटक करण्यात आली असुन सर्व आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे. सदरच्या गुन्ह्याचा पुढील तपास चालु आहे.

छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये माहे जुन, २०२४ च्या तुलनेत माहे जुन, २०२५ अखेरची आकडेवारी पाहता खुनांच्या गुन्ह्यात -१३ ने घट झालेली आहे त्यामुळे गुन्हयांमध्ये वाढ होत असल्याचे निदर्शनास येत नाही. तसेच पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर घटकामध्ये सराईत गुन्हेगार, नशेखोर, टवाळखोर याप्रकारच्या इसमांवर वेळीच प्रतिबंधक कार्यवाही केली जात आहे. सदरच्या पोलीस घटकामध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणुन BNSS कलम १२६, १२८, १२९ तसेच म.पो.का कलम ५५/५७, १४२, १२४ एमपीडीए, MCOCA अन्वये प्रतिबंधात्मक कारवाया करण्यात आलेल्या आहेत.

तसेच शहरातील शाळा, कॉलेज, खाजगी क्लासेस तसेच निर्जन ठिकाणी, मोकळी मैदाने, पडकी जागा/इमारती अशा ठिकाणी सक्तपणे पेट्रोलिंग करुन अवैध दारु, अमली पदार्थ सेवन व विक्री करणाऱ्या नशेखोर इसमांवर प्रचलित कायद्यान्वये गुन्हे दाखल करुन प्रभावी कारवाई केली जात आहे.

महानगर पालीके मार्फत अवैध दारु, अवैध धंदे व  अंमलीपदार्थ विक्री करणाऱ्या धाबे, हॉटेल, टपऱ्या, हातगाडया यांचे देखील अतिक्रमण निष्कासित करुन त्यांच्या विरुध्द कारवाई करण्यात येत आहे.

सदर गुन्ह्याचा तपास सहा. पोलीस आयुक्त सिडको विभाग यांच्याकडुन करण्यात येत असुन गुन्ह्यात विशेष लोकअभियोक्ता यांची नेमणुक होण्याबाबत विनंती करण्यात आली आहे.

**********

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. अभिजीत पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १७९७ पुढीलप्रमाणे आहे:-

"कुर्डुवाडी (जि.सोलापूर) शहर व परिसरात सर्रासपणे ऑनलाईन अवैध चक्री जुगार सुरु असणे, मोबाईल ॲपच्या माध्यमातून सदर जुगार सुरु असून शहर व परिसरातील अनेक गावातील तरुण या चक्री जुगाराच्या आहारी जाणे, सदर ऑनलाईन चक्री जुगारात तरुण मोठ्या प्रमाणात पैसे गमावत असणे, एका तरुणानी सदर जुगारामध्ये एक कोटी रुपये हरल्यामुळे आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणे, परिणामी कुर्डुवाडी शहर व परिसरातील नागरीकांमध्ये वाढते तीव्र असंतोषाचे वातावरण, सदर प्रकरणी लऊळ (ता.माढा) येथील तरुणांनी सोलापूर जिल्हा पोलिस अधीक्षकांची प्रत्यक्ष भेट घेऊन लेखी निवेदनाव्दारे तक्रार करणे, सदर निवेदनात ऑनलाईन चक्री जुगारात गुंतलेल्या एजंटचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, लऊळ येथील युवकांचे झालेल्या नुकसानीचा तपास करुन न्याय मिळवून द्यावा तसेच नागरिकांमध्ये जनजागृती करुन अशा प्रकारच्या जुगारांपासून सावध राहण्यासाठी विशेष मोहिम राबविण्यात यावी इत्यादी मागण्यांचा उल्लेख असणे, शासनाने उक्त प्रकरणी पारदर्शक चौकशी करुन कुर्डवाडी शहर व परिसरातील अवैध ऑनलाईन चक्री जुगाराला आळा घाण्यासाठी सक्षम उपाययोजना करण्याची तसेच अवैध जुगार चालवणा-या एजंटवर कठोर कारवाई करुन या जुगाराच्या आहारी जाऊन नुकसान झालेल्यांना न्याय देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

ऑनलाईन गेमसाठी शासनाकडून कोणत्याही प्रकारची परवानगी दिली जात नाही. आर्थिक हव्यासापोटी व जाहिरातबाजीला बळी पडून युवकवर्ग ऑनलाईन गेमींग कडे आकर्षित होत आहे. त्यामुळे ऑनलाईन गेमची त्यांना सवय होवुन परीणामी त्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते.

मौजे बारलोणी, ता. माढा, जि. सोलापूर येथील तरूणाने ऑनलाईन चक्री जुगारात पैसे गमावल्याने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. सदर तरुणास उपचारासाठी रूग्णालयात दाखल केल्यानंतर पोलीस त्याचा जवाब नोंदविण्यास गेले असता, सदर तरूणाने उपचारानंतर पोलीस स्टेशनला समक्ष येऊन सविस्तर जवाब नोंदवतो असा जवाब दिला आहे. तथापि, पोलीसांकडून वारंवार स्मरण करूनही सदर तरूणाने अद्यापही त्याचा सविस्तर जवाब नोंदविलेला नाही.

मौजे लऊळ, ता. माढा, जि. सोलापूर येथील तरूणाने ऑनलाईन चक्री जुगारात आर्थिक फसवणूक झाल्याबाबत पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांना लेखी निवेदन सादर केले होते. सदर प्रकरणाबाबत जिल्हा सरकारी अभियोक्ता, सोलापूर यांचे अभिप्राय घेऊन कुर्डुवाडी पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण येथे गु.र.नं. ५६/२०२५, भा.द.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२०ब, ३४ सह केंद्र शासनाच्या लॉटरी विनियमन अधिनियम, १९९८ च्या कलम ७, ८, ९ सह महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम, १८८७ च्या कलम ४, ५ सह केंद्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० च्या कलम ६६ (डी) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमूद गुन्ह्यात एकूण २३ आरोपी असून, त्यातील ८ आरोपींना अटक केली आहे व इतर आरोपींचा शोध सुरू आहे. सदर गुन्ह्यात मा. प्रथमवर्ग न्यायालय, माढा यांचे न्यायालयात दिनांक २७.०६.२०२५ रोजी दोषारोपपत्र क्र. ११९/२०२५ दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्ह्यातील आरोपींकडून रू. २,५०,०००/- इतक्या किमतीचे मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत.

वाढत्या सायबर गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठी राज्यात एकूण ५० सायबर पोलीस स्टेशन ची निर्मिती करण्यात आली आहे. सदर पोलीस स्टेशनला अत्याधुनिक यंत्रसामग्री पुरविण्यात आली आहे. ऑनलाईन जुगारास आळा घालण्यासाठी महाराष्ट्र सायबर कार्यालयामार्फत समाजमाध्यमांवरून तसेच प्रत्यक्षात सायबर जनजागृती कार्यक्रम राबवून जनजागृती करण्यात येते. सन २०१७-२०१९ या कालावधीत राज्यातील एकूण ३,२५३ पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना सायबर गुन्ह्यांबाबत आधुनिक पद्धतीचे अन्वेषण आणि तपासाचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

सायबर गुन्ह्याबाबतच्या तक्रारी नोंदविण्यासाठी https://cybercrime.gov.in हे पोर्टल कार्यान्वित करण्यात आले असून, नागरिकांच्या शंकांचे समाधान करण्यासाठी १९३० क्रमांकाची टोल फ्री हेल्पलाईन सुरू करण्यात आली आहे. सायबर कार्यालयाचे विविध समाजमाध्यमांवर अकाउंट्स असून, त्याद्वारे सायबर गुन्ह्याबाबतच्या ॲडव्हायझरी प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. राज्यभरातील सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी महापे, नवी मुंबई येथे नोडल सायबर पोलीस

स्टेशनसह सहा प्रमुख विभाग कार्यरत असलेले १ लाख चौरस फुटापेक्षा अधिक जागेत "महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प" कार्यान्वित करण्यात आलेला आहे.

ऑनलाईन गेम बंद करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे विशेष कायदे अस्तित्वात नाहीत. तथापि, ऑनलाईन गेमवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत माहिती व तंत्रज्ञान कायद्यांतर्गत Information Technology (Intermediary Guidelines and Digital Media Ethics Code) Rules, २०२१, दिनांक ०६.०४.२०२३ रोजी भारतीय राजपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत.

ऑनलाईन लॉटरी व ऑनलाईन गेम्स यांचे विनियमन करण्यासाठी कायदा करण्याबाबत राज्य शासनाच्या वतीने केंद्र शासनास दिनांक ०२.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे.

---------------------------

लक्षवेधी सूचना क्र. २०५२ गृह विभाग

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. निलेश राणे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २०५२ पुढीलप्रमाणे आहे:-

"मेसर्स एस्टेला रेस्टॉरंट,निचानी हाऊस, जुहू तारा रोड,अंधेरी (प ) येथील आरोग्य आस्थापनेमधील मोकळी जागेचा अनधिकृतपणे वापर होत असल्याचे निदर्शनास येणे, तसेच उक्त रेस्टांरटमध्ये डी.जे आणि लाऊड स्पीकरचा आवाज मोठया प्रमाणात होत असून हुक्का सेवनही केले जात असल्याचे समोर येणे, यासंदर्भात लोकप्रतिनिधिंनी स्थानिक पोलीस स्टेशन, बृहन्मुंबई महानगरपाकिा आदिंकडे तक्रार वजा निवेदन दिल्यानंतर महापालिकेच्या वैदयकिय आरोग्य अधिकारी के/पश्चीम विभाग यांनी दि. १९/५/२०२५ रोजी वरिष्ठ पोलीस निरिक्षक, जुहू पोलीस ठाणे, अंधेरी (प) मुंबई यांना पत्रव्यवहार करुन कार्यवाही करण्याच्या सूचना दिलेल्या असणे, रेस्टॉरंट मालकाविरुध्द कारवाई करण्यास सर्व स्तरावरुन जाणीवपूर्वक होत असलेली टाळाटाळ, रेस्टांरटमध्ये डी.जे आणि लाऊड स्पीकरचा आवाज व हुक्का सेवनही केले जात असल्याने आजुबाजुच्या नागरिकांना नाहक होत असलेला त्रास, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन यास जबाबदार असणा-याविरुध्द तसेच अनधिकृत जागेचा वापर करणा-या आस्थापनेवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

मा. लोकप्रतिनिधींनी मेसर्स एस्टेला रेस्टॉरंट, निचानी हाऊस, जुहू तारा रोड, अंधेरी (प.) या आस्थापनेबाबत पोलीस उप आयुक्त (झोन-९), मुंबई यांचेकडे दिनांक २४.०२.२०२५ रोजी तक्रारवजा निवेदन सादर केले आहे. त्यानुषंगाने केलेल्या पोलीस तपासणीत सदर रेस्टांरटमध्ये डी.जे आणि लाऊड स्पीकरचा आवाज मोठया प्रमाणात होत असल्याचे किंवा हुक्का सेवन केले जात असल्याचे निदर्शनास आलेले नाही. उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदर आस्थापनेस दिनांक १७.०३.२०२५ रोजी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १६३ द्वारे प्राप्त अधिकारान्वये नोटीस बजावण्यात आली आहे.

सदर आस्थापनेबाबत लोकप्रतिनिधींनी वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांनाही निवेदन सादर केले होते. संबंधित वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी निवेदनातील विषय पोलीस विभागाशी संबंधित असल्याने दिनांक १९.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये निवेदन पुढील कार्यवाहीकरिता पोलीस ठाणे, जुहू, अंधेरी (प), मुंबई यांना अग्रेषित केले आहे. त्यानुषंगाने पुनःश्च पोलीस तपासणी केली असता, डी.जे आणि लाऊड स्पीकरचा आवाज मोठया प्रमाणात होत असल्याचे किंवा हुक्का सेवन केले जात असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

सहायक अभियंता (बांधकाम विभाग), के पश्चिम विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना दिनांक २८.०५.२०२४ व ९.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सदर आस्थापनेचे बांधकाम अधिकृत आहे किंवा कसे ? याबाबत अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमोचित कार्यवाही करण्यात येईल.

तथापि, आस्थापनाधारकाने दिनांक १०.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सदरहू आस्थापना दिनांक ०१.०७.२०२५ रोजी पासून अनिश्चित कालावधीसाठी बंद करण्यात आली असल्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागास कळविले आहे.

-----------------------------

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन लक्षवेधी सुचना क्र. १८५

महाराष्ट्र विधानसभा

मा. श्री. नारायण कुचे , विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८५ पुढीलप्रमाणे आहे

" छत्रपती संभाजीनगर जिल्हातील चिखलठाणा येथे वादळी वाऱ्यामुळे शेतात उच्च दाबाच्या वायरसह वीजेचे पोल पडल्याचे महावितरणच्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देखील त्यांच्या दुर्लक्षामुळे दिनांक १६ जून, २०२५ रोजी दोन शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्याची घटना घडणे, दिनांक १९ मे, २०२५ रोजी भीमराव दहिहंडे व हरिश्चंद्र त्रिभुवन यांच्या शेतात असलेल्या व विमानतळासाठी गेलेल्या वीजेच्या अतिउच्च दाबाच्या वायर पोलवर वादळी वाऱ्यामुळे बाभळीचे झाड कोसल्याने पोलवरील अतिउच्च दाबाच्या वायर सहा फुटापेक्षा खाली आलेल्या असणे, याबाबत महावितरणच्या अधिकारी व लाईनमन यांना वारंवार माहिती देऊनही त्यांनी याकडे दुर्लक्ष केल्याने बाळू दहिहंडे व कचरु दहिहंडे या शेतकऱ्यांचा पोलवर असलेल्या तारेला चिकटून मृत्यु झालेला असणे, परिणामी महावितरणच्या गलथान कारभाराविरुध्द स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र स्वरुपाचा असंतोष व संतापाची भावना, सदर वीजेच्या अतिउच्च दाबाच्या वायर खाली आल्याचे निदर्शनास आणून देखील त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या व शेतकऱ्यांच्या मृत्युस जबाबदार असलेल्या महावितरणच्या अधिकारी व लाईनमन यांच्यावर शासनाने करावयाची कारवाई व याबाबतची भूमिका "

मा. मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

मौजे चिकलठाणा छत्रपती संभाजीनगर येथे गट क्र. ६६८ येथे ३३ के.व्ही. विमानतळ या नावाने जुनी बंद स्थितीत असलेली उच्चदाब वाहिनी आहे. सदर उच्चदाब वाहिनीच्या खालून विद्युत भारीत लघुदाब वाहिनी आहे. उच्चदाब एअरपोर्ट उपरी तार मार्गाचा कट पॉईंट लोखंडी पोल मागील अंदाजे एक महिन्यापासुन जोराच्या वादळी वाऱ्यामुळे जमीनीपासून उखडून खाली पडलेला होता. सदरहू ३३ के. व्ही. एअरपोर्ट फिडर हा मागील अंदाजे तीन वर्षापासून वापरात नव्हता. त्यामुळे सदरहू फिडर हा चार्ज नव्हता. परंतू कट पॉईंट पोल पडल्यामुळे सदरहू फिडरचे संवाहक यामध्ये झोळ निर्माण होऊन ते लोंबकाळत स्थितीत होते. घटनास्थळी त्याच परीसरात ३३ के.व्ही. डमी एअरपार्ट फिडरला खालून ओलांडून जाणारी (क्रॉसींग) तीन फेज मध्यम दाब उपरीतार मार्गाचा विद्युत भारीत संवाहक पुढील ३३ के.व्ही. फिडरच्या कट पॉईटपासुन तिसऱ्या स्पॅन मधील संवाहकाशी संपर्कात आल्यामुळे डमी (वापरात नसलेल्या) ३३ के.व्ही. फिडरच्या आर फेज संवाहक भारीत झाला. सदर भारीत संवाहकाच्या संपर्कात श्री. कचरु जनार्धन दहिहंडे व श्री. किरण जगन्नाथ दहिहंडे आल्याने त्यांना विजेचा धक्का बसल्याने त्यांचा मृत्यू झाला.

सदर घटनेबाबत दि.०६.०६.२०२५ रोजी विद्युत निरीक्षक, छत्रपती संभाजीनगर यांना माहिती देण्यात आली होती. त्यानुसार त्यांनी दि.१७.०६.२०२५ रोजी अपघातस्थळाची भेट देऊन चौकशी केली आहे. विद्युत निरीक्षक यांच्या सुचनेनुसार कोसळलेल्या ३३ के.व्ही. लाईनचा कंडक्टर काढून टाकण्यात आला आहे. सदर दुर्घटनेतील मयत व्यक्तींचे वारसदार रेखा किरण दहिहंडे व द्वारका कचरु दहिहंडे यांना दि.१८.०६.२०२५ रोजी महावितरण कंपनीमार्फत प्रत्येकी ४ लाख रुपये नुकसान भरपाई धनादेशाद्वारे देण्यात आली आहे.

मयत व्यक्तींच्या नातेवाईकांनी एम.आय.डी.सी. सिडको पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीनुसार महावितरण कंपनीचे संबंधित शाखा अभियंता श्री. अक्षय अब्दलवार आणि जनमित्र श्री. प्रेमचंद चव्हाण यांच्यावर एफआयआर क्र.०३६१ नुसार दि.१७.०६.२०२५ रोजी गुन्हा दाखल केला आहे. तसेच त्यांना दिनांक १८.०६.२०२५ रोजी महावितरण कंपनीच्या सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

लक्षवेधी सुचना क्र. ९७५

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

मा. श्री. भास्कर भाऊराव जाधव, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.९७५ पुढीलप्रमाणे आहे:-

"चिपळूण शहरातील कोलेखाजण येथे तुटलेल्या विद्युत भारीत तारेचा स्पर्श झाल्याने पाच दुभत्या म्हशींचा जागीच मृत्यू झाल्याची तर एक म्हैस गंभीर जखमी झाल्याची घटना दि. २३ जून २०२५ रोजी घडणे, या दुर्दैवी घटनेमुळे शेतकरी प्रमोद पांडुरंग कदम यांचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले असणे, महावितरण कंपनीच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे आणि हलगर्जीपणामुळे सदरची दुर्घटना घडल्याचे समोर येणे, दुर्घटना घडली तेथील विद्युत वाहिन्यांवर मोठ्या प्रमाणात झाडे झुडपे आणि झाडांच्या फांद्या आलेल्या असणे, या भागातील ग्रामस्थ रहिवाशांनी वारंवार निदर्शनास आणून देखील पावसाळ्यापूर्वी त्या तोडण्याची कार्यवाही वीज वितरणकडून न होणे, सर्वात महत्वाचे तुटलेल्या विद्युत वाहिनीला गार्डनिंग वायर जोडलेली नसल्यामुळे विद्युत वाहिनी तुटून जमिनीवर पडल्यानंतर बराच वेळ त्यातून विद्युत प्रवाह चालू राहिल्याने त्या स्पर्शाने एकापाठोपाठ म्हशींचा झालेला मृत्यू, ही घटना डोळ्यादेखत घडत असताना काही ग्रामस्थांनी स्थानिक वायरमन तसेच महावितरणच्या कार्यालयात दूरध्वनी केला असता त्यांनी वेगवेगळी कारणे सांगून घटनास्थळी येण्याची केलेली टाळाटाळ, घटना घडूनही कित्येक तास उलटले तरी कोणत्याही खात्याचा अधिकारी न पोहोचल्याने ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष आणि संताप, नुकसानग्रस्त शेतकऱ्याला शासनाने विशेष बाब म्हणून आर्थिक सहाय्य करण्याची व यातील दोषींवर कारवाईची मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

## मा. मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

चिपळूण शहरातील कोलेखाजण येथे दि. २३.०६.२०२५ रोजी जोरदार वाऱ्यासह झालेल्या पर्जन्यवृष्टीमुळे महावितरणच्या लघुदाब चिपळूण विभागातील कोलेखाजण या ठिकाणी लघुदाब वाहिनी ची वीज वाहक तार शॅकल इन्सुलेटरमधुन तुटून खाली पडली. त्या दिवशी श्री. प्रमोद पांडुरग कदम यांच्या ६ म्हशी त्या भागात चरावयास गेल्या होत्या. सदर वीज वाहक तारांशी त्या म्हशीचा संपर्क आल्यामुळे म्हशींना वीजेचा धक्का बसून त्यातील ५ म्हशींचा मृत्यू झाला व १ म्हैस गंभीर जखमी झाली. सदर घटनेबाबत जनमित्रास भ्रमणध्वनीद्वारे माहिती प्राप्त होताच, त्या लघुदाब वाहिनीचा वीज पुरवठा तात्काळ खंडित करण्यात आला व महावितरणचे चिपळूण ग्रामीण उपविभागीय अधिकारी, यांनी तत्काळ घटनास्थळी भेट दिली व सदर घटनेचा अहवाल तयार करून घेतला. पशुवैद्यकीय अधिकारी यांचा सदर ५ मृत म्हशींचा शव विच्छेदन अहवाल दि. २७.०६ २०२५ रोजी प्राप्त झाला असून,कंपनीच्या नियमानुसार ५ म्हशींच्या अपघाती मृत्यू प्रकरणी संबंधितास रू १,५०,००० नुकसान भरपाई दि १०.०७.२०२५ रोजी अदा करण्यात आली.

अपघातग्रस्त ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने गार्डिंगचे काम पूर्ण करून घेण्यात आले आहे. सदर प्रकरणी विद्युत निरीक्षक, याचा अभिप्राय दि १०.०७.२०२५ रोजी प्राप्त झाल्यावर सदर प्रकरणी श्री.मुदस्सर इब्राहिम खान, वरीष्ठ तंत्रज्ञ यांना कामात कसूर व निष्काळजीपणा केल्याबदल दि.१०.०७.२०२५ रोजी निलंबित करण्यात आले आहे.

महावितरणतर्फे वीज वितरण प्रणालीच्या मान्सूनपूर्व देखभाल व दुरुस्तीची कामे नियमितपणे करण्यात येत असतात. चिपळूण विभागामध्ये देखील वाहिनीवर अडथळा ठरणाऱ्या झाडांच्या फादया छाटणे, खराब पिन व डिस्क इन्सुलेटरची बदली करणे, जीर्ण झालेले पोल व जीर्ण झालेल्या तारा बदलणे, खराब झालेल्या वाहिन्यांचे गार्डलूप बदलणे, पोलचे री अर्थिंग करणे, खराब वितरण पेट्या

बदलणे, वाहिनीला गार्डिंग वायर व स्पेसर्स बसविणे इ. काम हाती घेण्यात येऊन यातील बहुतांश कामे पूर्ण करण्यात आली आहेत. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये वीज यंत्रणेच्या देखभाल व दुरुस्तीकरीता एकूण ३२ सुचिबद्ध ठेकेदाराची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच २०२५-२६ आर्थिक वर्षासाठी रु. ४२ कोटी इतक्या रक्कमेची तरतूद करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त महावितरण कर्मचाऱ्याना अखंडित वीजपुरवठा करण्यासाठी आणि भविष्यातील विद्युत अपघात टाळण्यासाठी विशेष प्रशिक्षण देण्यात आले. विद्युत अपघात टाळण्यासाठी जनजागृती मोहिम देखील नियमितपणे राबविण्यात येते.

रत्नागिरी जिल्हयातील वीज वितरण यंत्रणेचे सक्षमीकरणा सोबत वीज अपघात टाळण्यासाठी खालीलप्रमाणे कामे हाती घेण्यात आली आहेत:-

१. राष्ट्रीय चक्री वादळ धोके निवारण प्रकल्प (NCRMP) या प्रकल्पाअंतर्गत रत्नागिरी जिल्हयात सुमारे ९७ कोटी रुपयाची कामे झाली आहेत. त्यामध्ये, २२ कि.मी चे ३३ के.व्ही. उच्चदाब वाहिनी, ८० कि.मी. चे ११ के. व्ही. उच्चदाब वाहिनी व २२३ कि.मी. चे लघुदाब वाहिनी इत्यादी उपरी तारमार्ग विद्युत वाहिनीचे भूमिगत विद्युत वाहिनीमध्ये रुपांतर करण्यात आले.

२. सुधारीत वितरण क्षेत्र योजना (RDSS NCRMP) अंतर्गत रत्नागिरी जिल्हयात १२४ किमी. ३३ के.व्ही. उप वाहिनी १००४ कि.मी. ११ के.व्ही.च्या उच्चदाब वाहिनी ३२७६ कि.मी. लघुदाब वाहिनी भूमिगत करण्याची कामे मंजुर आहेत. त्यापैकी ५ कि. मी. ३३ के.व्ही. उच्चदाब वाहिनी ५१७ कि.मी. ११ के.व्ही.उच्चदाब वाहिनी व ३४२ कि.मी.लघुदाब वाहिनी भूमिगत करण्याचे काम पूर्ण झाले आहे.

३. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत ३३/११ के व्ही. श्रृंगारतळी उपकेंद्रांचे सक्षमीकरण पूर्ण झाले आहे व ३३/११ के.व्ही लोटे, धारतळे या दोन उपकेंद्रांची क्षमतावाढ करण्यात आली आहे.

४. डीपीडीसी योजनेअंतर्गत सन २०२४-२५ करीता एकूण ११ नवीन रोहीत्रांची कामे मंजूर आहेत. त्यापैकी ०३ रोहीत्रे कार्यान्वित झाली असून, उर्वरीत काम प्रगतीपथावर आहे.

५. RDSS Loss Reduction योजने अंतर्गत,२५ के.व्ही.ए.रोहीत्र ७५,एरियल बंच केबलचे ९३ कि.मी., लघुदाब वाहिनीचे २०६ कि.मी. व उच्चदाब वाहिनीचे ११८ कि.मी. ची कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

६. सुधारीत वितरण क्षेत्र योजना (RDSS Modernization & System Strengthening) अंतर्गत रत्नागिरी जिल्हयात २३ नवीन ३३/११ के व्ही. उपकेंद्र, २ स्विचींग स्टेशन, ६ उपकेंद्रांमध्ये अतिरिक्त रोहीत्र बसविणे तसेच ५ उपकेंद्र उच्चदाब रोहीत्रांची क्षमता वाढविणे इत्यादी कामे प्रस्तावित आहेत. केंद्र सरकारकडून योजनेस मंजुरी मिळाल्यानंतर हे काम करण्यात येणार आहे.

वरील प्रस्तावित कामामुळे पायाभूत सुविधा बळकट होऊन सुरक्षित व अखंडीत वीज पुरवठा देण्यास मदत होणार आहे.

********************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. रईस शेख, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना (क्रमांक : १३७९) खालील प्रमाणे :-

"महाराष्ट्रामध्ये वीजबील देयके भरण्याची कामगिरी करणारे राज्यातील सर्वोकृष्ट शहर व महावितरण आणि राज्य सरकारच्या महसुलात कर आणि शुल्काचे लक्षणीय योगदान असलेल्या भिवडी शहरातच अंदाजे १२ लाख यंत्रमाग असून त्यांची वार्षीक उलाढाल सुमारे दहा हजार कोटीची असणे, देश-परदेशात भिवंडीतून मालाचा पुरवठा केला जाणे,या उदयोगातून मोठा प्रमाणात महसूल प्राप्त होत असतांनाही या उदयोगाकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष,सध्यस्थितीत भिवंडी शहराचा मुख्य उदयोग/व्यवसाय अडचणी असणे,यंत्रमाग उदयोगाला उभारी देण्यासाठी भिवंडी क्षेत्रातील यंत्रमाग पावरलूम ) उदयोगास पाठबल व चालना देण्याकरिता तसेच शहरातील गोरगरिब नागरिकांना कायमस्वरुपी खंडीत (पीडी ) ग्राहकांसाठी मागील वर्षी सुरु केलेली " Special Amnesty Scheme-२०२३ " योजना पुन्हा सुरु करुन एक वर्षाची मुदतवाढ देण्याबाबत शासन स्तरावर करावयाची कार्यवाही,याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका . "

मा.मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

महावितरणच्या भिवंडी स. व सु. मंडळातर्गतची वीज वितरण व्यवस्था फ्रेन्चाइझी तत्वावर दि. २६.०१.२००७ पासून मे. टोरंट पॉवर लिमीटेड यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे. भिवंडी वितरण फ्रेन्चाइझी विभागात मे. टोरंट पॉवर लि. कडून संबंधित वितरण फ्रेन्चाइझी करारातील तरतुदीनुसार तसेच महावितरण व मा. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेद्वारे कामकाज करण्यात येते.

ऑक्टोबर २०२३ रोजी भिवंडी वितरण फ्रेन्चाइझी विभागात एकूण १५७५३५ कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित असलेले वीज ग्राहक होते व त्यांची एकूण थकबाकी रु.१२१३.२० कोटी इतकी होती. त्यापैकी ४०७७४ इतके यंत्रमागधारक वीजग्राहक होते व त्यांची एकूण थकबाकी रु.६००.११ कोटी इतकी होती.

महावितरणकडून भिवंडी वितरण फ्रेन्चाइझी विभागातील कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित असलेल्या ग्राहकांसाठी "वितरण फ्रेन्चाइझी विशेष सवलत योजना- २०२३" (DF Special Amnesty Scheme - २०२३ for PD Consumers) नोव्हेंबर २०२३ पासून एक वर्षासाठी राबविण्यात आली व तद्नंतर "महावितरण अभय योजना २०२४" अंतर्गत सदर योजनेस ३१ मार्च २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

मार्च २०२५ पर्यंत "भिवंडी वितरण फ्रेन्चाइझी विशेष सवलत योजना-२०२३" अंतर्गत एकूण १०१२ वीज ग्राहकांनी फक्त रु.५.८८ कोटी (०.५०%) इतका भरणा केला आहे. त्यामध्ये ३७७ यंत्रमागधारक वीजग्राहकांचा रु.३.६६ कोटीचा (०.६१%) भरणा अंतर्भूत आहे अशा प्रकारे सदर योजनेला "महावितरण अभय योजना २०२४" अंतर्गत मुदतवाढ देऊनही अत्यल्प प्रमाणात प्रतिसाद प्राप्त झाला आहे.

**********

लक्षवेधी सुचना क्र. २२५१

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन महाराष्ट्र विधानसभा

मा. श्रीमती सुलभा गणपत गायकवाड, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२२५१ पुढीलप्रमाणे आहे

"मौजे -बोहोनोली,धनगरवाडी येथे मागील दोन वर्षापासून लाईट नसल्याचे नुकतेच माहे जुलै,२०२५ मध्ये उघडकीस येणे,सदर लाईन प्रथम मलंगगड येथून घेण्यात येणे,परंतु सततच्या विदयुत पुरवठा खंडीत होणे आणि कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याने कायमच लाईट जात असणे,मलंगगड तर्फे विदयुत पुरवठा गेल्या दोन वर्षापासून १०० टकके बंद अवस्थेत असणे,यासंदर्भात संबंधित विभागाकडे धनगरवाडी ग्रामस्थांनी तक्रारी वजा निवेदने देऊनही विभागाकडून कोणतीच कार्यवाही वा दखल घेतली जात नसणे, त्यामुळे धनगरवाडी ग्रामस्थांना वीजेअभावी अंधारात असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष,शासनातर्फे राबविण्यात येणा-या योजनेअंतगत एम.आय.डी.सी कडून लाईन व नवीन डी.पी बसविण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही ,याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका ."

मा. मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

मलंगगड शाखा अंतर्गत असलेल्या मौजे बोहोनोली व धनगरवाडी ह्या वस्त्या कल्याण परिमंडळातील कल्याण मंडळ-१ अंतर्गत असलेल्या कल्याण पूर्व विभागाच्या परीक्षेत्रात येत असून, सदर वस्त्या हया शिरवली गावातील मांगरुळ ग्रुपग्रामपंचायतमध्ये समाविष्ट आहेत. सदर वस्त्यांमध्ये एकूण ७६ वीजजोडण्या असून त्यापैकी ६० वीजजोडण्या हया बोहोनोली गावातील आहेत व १६ वीजजोडण्या हया धनगरवाडी व कातकरवाडी गावामधील आहेत. सध्या सदर गावांना बोहोनोली आनंदनगर ३१५ केव्हीए रोहित्रावरुन योग्य दाबाने वीज पुरवठा सुरु आहे.

सुमारे दोन वर्षापूर्वी सदर गावांना शिरवली गावातील २२ केव्ही वाडी या उच्चदाब वाहिनीवरील जोडलेल्या १०० केव्हीए रोहित्राद्वारे २२ पोलच्या लघुदाब वीज वाहिनीवरून वीज पुरवठा करण्यात येत होता. सदर रोहित्रापासून वीज ग्राहकांचे अंतर हे फार लांब असल्यामुळे सदर गावे व वस्त्यांना कमी दाबाने वीज पुरवठा होत होता. त्याचप्रमाणे सदर वाहीनी ही जंगल व दुर्गम भागातून जात असल्यामुळे वारंवार बिघाड निर्माण होउन वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाणही जास्त होते. त्यामुळे या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी सदर ७६ वीज जोडण्याचा वीज पुरवठा हा २२ कव्ही वाडी या उच्चदाब वाहिनीवर असलेल्या १०० केव्हीए रोहित्रावरून काढून २२ केव्ही MIDC Feeder no ६ वर जोडलेल्या ३१५ केव्हीए क्षमतेच्या आनंदनगर रोहित्रावरुन जोडून देण्यात आलेला आहे.

सदर ७६ वीज ग्राहकांचा वीज पुरवठा हा एका वाहिनीवरून काढून दुसऱ्या वाहिनीवर स्थलांतरीत केल्यामुळे पुर्वीच्या १०० केव्हीए रोहित्रावरून निघालेल्या २२ पोलच्या लघुदाब वीज वाहिनीचा पुरवठा बंद करून ठेवण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत सदर वाहिनी बंद स्वरूपात (Dummy) असून त्यावर कोणताही ग्राहक जोडण्यात आलेला नाही

अशाप्रकारे आनंदनगर ३१५ केव्हीए रोहित्रावरुन बोहोनोली, धनगरवाडी व कातकरवाडीतील सर्व ७६ वीज ग्राहकांचा विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात आलेला आहे. तसेच सदर धनगरवाडी व त्या परिसराच्या भविष्यातील वाढीव मागणीच्या अनुषंगाने धनगरवाडीसाठी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत १२ कि.मी. लांबीची उच्चदाब वाहिनी व एक नविन १०० केव्हीए क्षमतेचे रोहित्र प्रस्तावित आहे.

महावितरण कंपनीतर्फे वीज यंत्रणेची प्रतिबंधात्मक देखभाल व दुरुस्तांची कामे नियमित करण्यात येतात. यामध्ये उच्चदाब व लघुदाब वीज वाहिन्यांच्या जवळ असणाऱ्या झाडांच्या फांद्याछाटणे, जुने जीर्ण झालेले पोल तसेच जुन्या जीर्ण झालेल्या तारा बदलविणे, वीज मागणीनुसार क्षमता वाढविणे, रोहित्र व उपकेंद्राची देखभाल करणे इत्यादी कामांचा समावेश आहे. वादळी वारा व मुसळधार पावसामुळे विद्युत वाहिनीवर तांत्रिक दोष निर्माण होऊन विद्युत पुरवठा खंडीत झाल्यास महावितरणकडून त्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात येवून वीजपुरवठा सुरळीत करण्यात येतो.

कल्याण मंडळ १ अंतर्गत वीज यंत्रणेच्या देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यासाठी एकूण १५ सूचीबध्द कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आलेली आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये रुपये २१ कोटी रकमेच्या निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच कल्याण मंडळ-१ मध्ये मान्सूनपूर्व देखभाल व दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

कल्याण मंडळ १ अंतर्गत सुधारित वितरण क्षेत्र योजना (आरडीएसएस) वितरण हानी कमी करणे ह्या योजनेद्वारे प्रस्तावित असलेल्या ४३४ कि.मी. एरियल बंच कंडक्टर कामापैकी २१४ कि.मी. चे काम पूर्ण झाले आहे. उच्चदाब वीज वाहक क्षमता वाढविणे १८४.१६ किमी पैकी ६५.५६ किमी, लघुदाब वीज वाहक क्षमता वाढविणे ६०.३५० कि.मी. पैकी २३.२४ कि.मी. तसेच उच्चदाब भुमिगत वाहिनी ३६.७८ कि.मी. पैकी ६.०६ कि.मी. इतके काम पूर्ण झाले आहे व याद्वारे कल्याण मंडळ-१ मधील वीज यंत्रणेच्या पायाभूत सुविधा यांचे सक्षमीकरण तसेच बळकटीकरण करण्यात आले आहे.

********************

लक्षवेधी सुचना क्र. १८८६

महाराष्ट्र विधानसभा

मा. सर्वश्री. विनोद अग्रवाल, संजय पुराम , विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८८६ पुढीलप्रमाणे आहे

"पूर्व विदर्भातील गोंदिया हा नक्षलग्रस्त आदिवासी बहुल जिल्हा असणे, जिल्हयामध्ये विजेची मागणी पाहता कालानुरुप कमी दाबाचा वीज पुरवठा होत असल्याने मोठया प्रमाणात नवीन उपकेंद्राचे निर्मीतीसह अनेक उपकेंद्रांची व रोहीत्रांची क्षमतावाढ करण्याची आवश्यकता असणे, गोंदिया शहरातील विद्युत पुरवठा व्यवस्था फार जुनी असून वारंवार वीज पुरवठा खंडीत होत असल्याने शहराच्या विद्युत व्यवस्थेमध्ये सुधारणा, नविनीकरण व बळकटीकरणाची आवश्यकतेसह शहराचे मध्यभागी नवीन उपकेंद्राचे निर्मितीसह शहराचा उपकेंद्राची तसेच रोहीत्राची क्षमतावाढीसह नवीन रोहीत्रांची आवश्यकता असणे, तालुक्यातील ग्रामीण भागातील मोठ्या प्रमाणात विजेची मागणी पाहता चंगेरा परिसरामध्ये नवीन उपकेंद्राचे निर्मितीसह काटी, दासगाव, फुलचूर येथील उपकेंद्राच्या क्षमतावाढ करणे, गोंदिया शहर व ग्रामीण मध्ये ३१५ केव्हीएचे २०, २०० केव्हीएचे ५० व १०० केव्हीएचे २०० नग रोहीत्रांचा पुरवठा करण्याची गरज असणे, गोंदिया तालुक्यातील मुंडीपार एम.आय.डी.सी. येथे १३२ केव्हीएच्या उपकेंद्रामधून गोरेगाव तालुक्याला विद्युत पुरवठा करण्यात येत असणे, उक्त उपकेंद्रांमध्ये तांत्रिक दोष उद्‌भवल्यास दुरुस्तीकरता ८ ते १० दिवसाचा कालावधी लागत असल्याने ग्रामीण भागातील भार नियमाला होत असणे, गोरेगाव येथे १३२ केव्हीएचे नवीन उपकेंद्र मंजूर करण्याची आवश्यकता असणे, गोंदिया शहरी व ग्रामीण भागातील कमी क्षमतेच्या उपकेंद्रामुळे वारंवार होत असलेल्या भार नियमनामुळे शेतकरी व नागरीकांमध्ये होत असलेल्या असंतोषाचे वातावरण यावर शासनाचे करायवाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना

## मा. मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

**********************************************

गोंदिया जिल्हयाला महावितरणच्या ३३/११ के.व्ही. क्षमतेची एकूण ४७ उपकेंद्रे व विविध क्षमतेच्या एकूण ११,८८८ वितरण रोहीत्राद्वारे विद्युत पुरवठा करण्यात येतो. तसेच गोंदिया शहराला ३३/११ के.व्ही. क्षमतेच्या एकूण ६ उपकेंद्राद्वारे विद्युत पुरवठा करण्यात येतो. गोंदिया जिल्हा हा घनदाट जंगलाने व्यापलेला असल्याने वादळ वारा व जोराच्या पावसामुळे झाडे उन्मळून वीज वाहिनीवर पडतात. काही ठिकाणी झाडांच्या फांदया विद्युत वाहिनीवर पडल्यामुळे विद्युत पुरवठा खंडीत होतो. विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरणचे अभियंते, तांत्रिक कर्मचारी यांच्या सोबतच सुचिबद्ध असलेले कंत्राटदार यांच्या मदतीने वीज पुरवठा सुरळीत करण्यात येतो.

**अ. गोंदिया जिल्हयातील वीज वितरण यंत्रणेचे सक्षमीकरण खालीलप्रमाणे करण्यात आले आहे.**

१. **मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत उपकेंदांचे सक्षमीकरण--**

उपकेंद्रांचे सक्षमीकरण मंजूर कामे-- ४० उपकेंद्रे

सक्षमीकरण पूर्ण झालेली उपकेंद्रे -- ३२ उपकेंद्रे

सक्षमीकरण प्रगतीपथावर असलेली उपकेंद्रे -- ८ उपकेंद्रे

२. **मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत उपकेंद्रामध्ये उच्चदाबाचे अतिरिक्त रोहीत्र बसविणे —**

उपकेंद्रामध्ये प्रत्येकी एक अतिरिक्त उच्चदाब रोहित्र बसविण्याची मंजूर कामे-- एकूण ४ उपकेंद्रामध्ये मंजूर

उपकेंद्रामध्ये अतिरिक्त रोहीत्र बसविण्याची पूर्ण कामे -१ (चिचगांव उपकेंद्र)

उपकेंद्रामध्ये अतिरिक्त रोहीत्र बसविण्याची प्रगतीपथावरील कामे-- ३ (नवेगाव बंध, हिवरा, झीलमील उपकेंद्रे)

३. **मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत उपकेंद्र उच्चदाब रोहीत्राची क्षमतावाढ करणे**

एकूण मंजूर काम -- १ पूर्ण काम १ (गोरेगाव उपकेंद्र)

४. जिल्हा नियोजन विकास समिती (डीपीडीसी) योजनेअंतर्गत नवीन रोहीत्रे बसविणे (सन २०२४-२५)
एकूण ६४ नवीन रोहीत्रे बसविण्यात आली.

५. निरंतर वीज योजनेअंतर्गत १०० के. व्ही.ए. क्षमतेच्या रोहीत्रांची क्षमता वाढवून २०० के.व्ही.ए. करणे --
एकूण ५ रोहीत्रांची क्षमता वाढवली.

६. सुधारीत वितरण क्षेत्र योजना RDSS Loss Reduction योजनेमध्ये पुढील कामे प्रगतीपथावर आहेत.
एरियल बंच केबल ७९८ कि.मी. ----- उच्चदाब वाहिनी (नवीन व नवीकरण) ४४४ कि.म
लघुदाब वाहिनी - ४ कि.मी., ----- २५ के.व्ही.ए. रोहीत्रे ६५ रोहीत्रे

**ब. गोंदिया जिल्हयातील प्रस्तावित वीज वितरण यंत्रणा सक्षमीकरण खालीलप्रमाणे:-**

१. सुधारीत वितरण क्षेत्र योजना (RDSS Modernization & System Strengthening) अंतर्गत ३३/११ के.व्ही. चंगेरा उपकेंद्र प्रस्तावित आहे. केंद्र सरकारकडून योजनेस मंजुरी मिळाल्यानंतर हे काम करण्यात येईल.

२. उपकेंद्रामध्ये उच्चदाबाचे एक अतिरिक्त रोहीत्र बसविणे ३३/११ के.व्ही. काटी उपकेंद्रामध्ये ५ ३३/११ एम.व्ही. अतिरिक्त रोहीत्र ए.डी.बी. योजनेअंतर्गत प्रस्तावित आहे.

३. दासगाव उपकेंद्र येथे क्षमतावाढ करण्यासाठी तांत्रिक बाबी तपासून योग्य ती कार्यवाही केली जाईल.

४. फुलचूर उपकेंद्रामध्ये क्षमतावाढ प्रस्तावित आहे.

सद्यस्थितीत १३२/३३ के.व्ही. एम.आय.डी.सी. मुंडीपार उपकेंद्र येथून गोंदिया व गोरेगाव तालुक्याला वीज पुरवठा करण्यात येत आहे. पर्यायी व्यवस्था म्हणून गोरेगाव तालुक्याअंतर्गत नवीन १३२/३३ के.व्ही. उपकेंद्राचा प्रस्ताव मंजूर करुन दि. २६.०६.२०२५ रोजी महावितरणकडून पुढील कार्यवाहीसाठी महापारेषणला पाठविण्यात आला आहे.

वरील प्रस्तावित कामांमुळे गोंदिया जिल्हयातील वीज पुरवठा पायाभूत सुविधा बळकट होऊन जिल्हयातील वीज पुरवठा अखंडीतपणे देण्यास मदत होणार आहे.

..............................................................................

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. राजू तोडसाम, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना (क्रमांक : २१७९) खालील प्रमाणे :-**

"श्री.रामकुमार मिश्रा (टेक्नोकेअर कंपनीचे प्रोप्रा.) यांनी डिसेंबर २०१९ पासून एम.एस.ई.डी.सी.एल. चे सबस्टेशन मेंटेनन्सची कंत्राटे कोट्यवधी रुपयांची कामे केली असणे, या अंतर्गत इलेक्ट्रिक उपकरणे बदलून नवीन लावणे, बॅटरी चार्जर, बॅटरी सेट बदलून नवीन लावणे, सुधारणा करणे इत्यादी कामांचा समावेश असणे, परंतु, श्री. रामकुमार मिश्रा यांनी बसविलेली उपकरणे नवीन नसून जुनी उपकरणे दुरुस्त करून अत्यंत निकृष्ट दर्जाची वापरलेली आहेत अशी तक्रार प्राप्त झाली असणे, त्यांच्या संबंधित एजन्सीने नवीन उपकरणांची देयके काढली असणे, कंपनीने बॅटरी सेट व बॅटरी चार्जर, एम.एस.ई.डी.सी.एल.च्या सबस्टेशनला लावले असून ते त्यांनी स्वतः मॅन्युफॅक्चर केले असणे, त्या बॅटरी सेटचे कोणतेही प्रामाणिकतेचे/गुणवत्तेचे सर्टिफिकेट (आय.एस.आय.) किंवा रजिस्ट्रेशन नसणे, एम.एस.ई.डी.सी.एल.च्या मानकाप्रमाणे ११० ए.एच. च्या बॅटरी ऐवजी ६० ए.एच. च्या बॅटरी कंपनीने लावल्या असणे, यामुळे फॉल्ट आले असणे, या गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर तात्काळ कायदेशीर कारवाई करून आणि महावितरण कंपनीच्या झालेल्या नुकसानीची भरपाई वसूल करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी योग्य उपाययोजना करण्याची आवश्यकता."

## मा.मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

नागपूर प्रादेशिक कार्यालय अंतर्गत नागपूर, गोंदिया, अकोला व अमरावती या परिमंडळामध्ये एकूण ११२० उपकेंद्रे आहेत. श्री. राम कुमार मिश्रा (टेक्नोकेअर कंपनी) यांच्या बाबतच्या तक्रारीची मुख्य अभियंता नागपूर, अकोला, अमरावती व गोंदिया यांनी आपआपल्या परिमंडळात चौकशी केली आहे. चौकशी अंती असे निदर्शनास आले की, श्री. राम कुमार मिश्रा (टेक्नोकेअर कंपनी) यांनी बॅटरी चार्जर व बॅटरी सेटची कामे नागपूर शहर, नागपूर ग्रामीण व अमरावती मंडळाअंतर्गत केली आहेत.

प्राप्त माहितीनुसार श्री. राम कुमार मिश्रा (टेक्नोकेअर कंपनी) यांना डिसेंबर २०१९ पासून एकूण १६ उपकेंद्रात बॅटरी चार्जर व बॅटरी सेटची कामे देण्यात आली होती. त्यामध्ये नागपूर शहर, नागपूर ग्रामीण व अमरावती मंडळाअंतर्गत असलेल्या अनुक्रमे २, ९ व ५ उपकेंद्रांचा समावेश आहे.

श्री राम कुमार मिश्रा (टेक्नोकेअर कंपनी) यांनी बसविलेल्या बॅटरी सेट मध्ये ९ नवीन व ७ पुनर्वधित बॅटरी सेटचा समावेश आहे. बॅटरी सेटची गुणवत्ता तपासण्यात आलेली आहे व ती महावितरणच्या निकषानुसार आहे. बॅटरी सेटची क्षमता १०० ए.एच. असून Overall Performance (एकूण कामगीरी) चांगली आहे. बसविलेले उपकरण निकृष्ट दर्जाचे आहे, असे आढळून आले नाही.

टेक्नोकेअर कंपनीने बसवलेली उपकरणे ही सद्यस्थितीत कार्यरत असल्याने महावितरण कंपनीचे कोणतेही नुकसान झाल्याचे निदर्शनास आले नाही.

**********

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. राजेश मोरे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना (क्रमांक : २३९६) खालील प्रमाणे :-**

"कल्याण ग्रामीण मतदार संघातील नवी मुंबई महापालिकेच्या हद्दीत येणाऱ्या १४ गावातील शेतकरी आणि नागरिक यांच्यावर टोरंटो कंपनीकडून सातत्याने अन्याय केला जाणे. कंपनीकडून वीज बिलांची अन्यायकारक वसुली होत आहे. शेतकऱ्यांच्या परवानगीशिवाय त्यांच्या शेतामध्ये अनधिकृत विद्युत खांबे व ट्रान्सफार्मर उभारणे बाबत, कोणतीही पूर्व सूचना न देता जबरदस्तीने काम करणे. गुंडप्रवृत्तीच्या लोकांकडून दमदाटी करणे, दादागिरी करणे, जबरदस्ती नागरिकांच्या घरात घुसून बिले भरण्याबाबत धमकावणे, ह्या त्रासाला कंटाळून शेतकऱ्यांना आत्महत्या करणेस प्रवृत्त करणे.टोरोंटो कंपनीकडून शेतकऱ्यांचे येणे बाकी असणे, आणि याबाबत कंपनीकडून कोणताही प्रतिसाद न मिळणे. टोरंटो कंपनी कडून होत असलेल्या जोर जबरदस्ती दादागिरी विरोधात शासनाने ~~आत्ता पर्यंत काय कार्यवाही केली~~." केलेली व करावयाची कार्यवाही व उपाययोजना।

मा.मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

महावितरणच्या शिळ, मुंब्रा कळवा उपविभागातील वीज वितरण व्यवस्था फ्रॅन्चाइझी तत्वावर दि. ०१.०३.२०२० पासून मे. टोरंट पॉवर लिमीटेड यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे. शिळ, मुंब्रा व कळवा वितरण फॅन्चाइझी विभागात मे. टोरंट पॉवर लि. कडून संबंधित वितरण फ्रॅन्चाइझी करारातील तरतुदीनुसार तसेच महावितरण व मा. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेद्वारे कामकाज करण्यात येते.

मे. टोरंट पॉवर लि. मार्फत शिळ, मुंब्रा, कळवा वितरण फ्रॅन्चाइझी विभागातील विहित वेळेत बीजदेयके न भरणाऱ्या वीजग्राहकांवर, व्यक्तीवर विद्युत अधिनियम २००३ चे कलम ५६, नुसार आणि मा. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग (वीज पुरवठा संहिता आणि पुरवठ्याच्या इतर अटी) नियम, २०२१ मधील तरतुदींनुसार कार्यवाही केली जाते. त्यामध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करून थकबाकी असलेल्या ग्राहकांना नोटीस देऊन, विहित वेळेत वीजबिल न भरलेल्या वीजग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात येतो. तसेच ७.५ अश्वशक्ती पर्यंतच्या शेतीपंपांना शासनातर्फे "मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना-२०२४" अंतर्गत माहे एप्रिल २०२४ पासून मोफत वीज देण्यात येत आहे.

सर्वसाधारणपणे मे, टोरंट पॉवर लि. तर्फे शिळ, मुंब्रा, कळवा वितरण फ्रॅन्चाइझी विभागातील वीजग्राहकांच्या जागेमध्ये विद्युत खांब अथवा ट्रान्सफॉर्मर उभारताना शेतकऱ्यांची, वीजग्राहकांची परवानगी घेऊन कामे केली जातात. शिळ, मुंब्रा, कळवा वितरण फ्रेन्चाइझी विभागात ग्राहकांच्या वीज तक्रारी बाबतच्या शंकाचे निवारण वेळेत करण्यात येते.

**********

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**मा. श्री. अभिमन्यू पवार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २४४६ पुढीलप्रमाणे आहे-**

"औसा विधानसभा मतदारसंघातील ३३ केव्ही उपकेंद्रातील पॉवर ट्रान्सफॉर्मर ओव्हर लोड झाले असल्याने शेतकऱ्यांच्या शेतीपंपाना असुरळीत व कमी दाबाने विज पुरवठा होत असणे, अनेक गावात रब्बी हंगामात दिवसाआड विज पुरवठा केला जात असणे, महावितरण कंपनीने MSKVY २.० योजनेअंतर्गत आशिव ,लिंबाळा दाऊ ता औसा रामलिंग मुदगड ता निलंगा येथे नविन ३३/११ केव्ही उपकेंद्र आणि खरोसा,तपसेचिंचोली,जवळगा पोमादेवी,एरंडी,गोंद्री येथील उपकेद्रात ५ MVA चे नविन अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर व बेलकुंड,नागरसोगा येथील उपकेंद्रातील पॉवर ट्रान्सफॉर्मर ची ५ MVA ने क्षमता वाढ करण्याच्या अत्यंत गरजेच्या कामास मंजुरी देऊन सदरील कामासाठी M/S Electropath Services या एजन्सीला दि २६/०९/२०२४ रोजी कामाचे कार्यारंभ आदेश दिले असणे, सदरील सर्व कामे पुर्ण करण्यासाठी १८ महिन्याची मुदत असणे, ९ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी होऊनही काम प्रत्यक्ष सुरू झाले नसणे, यामुळे यावर्षी रब्बी हंगामातही विजेचा प्रश्न निर्माण होणार असल्याने शेतकऱ्यांत चिंतेचे वातावरण निर्माण झाले असणे,शेतकरी वर्गात तिव्र असंतोष निर्माण झाला असणे, निविदेच्या अटी व शर्तीनुसार आज रोजी किमान ५०% काम पुर्ण होणे अपेक्षित असणे, निविदेच्या करारातील अटी व शर्तीचा भंग केल्याबाबत संबंधित दोषी एजन्सीवर नियमानुसार कारवाई करण्याबाबत व कामे कालमर्यादेत पुर्ण करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## मा. मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

औसा विधानसभा मतदार संघातील मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना (MSKVY २.०) योजने अंतर्गत नवीन उपकेंद्रे, अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर व उपकेंद्र क्षमतावाढ ही कामे M/S Electropath services pvt. Ltd. एजन्सिला दि.२६.०९.२०२४ अन्वये देण्यात आली आहेत. सदर प्रकल्प पूर्ण करण्याकरिता १८ महिन्याची मुदत दि. २५.०३.२०२६ पर्यंत देण्यात आली आहे. सदर एजन्सीला एकूण १६ नवीन उपकेंद्र पैकी एकूण १४ जागा हस्तांतरित करण्यात आल्या आहेत.

सदर एजन्सीची नवीन उपकेंद्रे, अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर व उपकेंद्र क्षमतावाढ अंतर्गत सुरू असलेली कामे खालीप्रमाणे आहेत:-

**नवीन उपकेंद्र-** नवीन उपकेंद्र कार्यान्वित करण्याचे पहिले उदिष्ट जुलै २०२५ पासून आहे. १६ उपकेंद्रापैकी ५ ठिकाणी कामे प्रगतिपथावर आहेत . तथापि ही उपकेंद्रे लातूर परिमंडळातील इतर ठिकाणची आहेत. औसा मंतदार संघातील उपकेंद्राची कामे प्राधान्याने हाती घेण्यात येणार आहेत.

**अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर -** ११ उपकेंद्रापैकी जून महिन्यापर्यंत २ उपकेंद्रांमध्ये अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट दिले आहे. ५ ठिकाणी कामे प्रगतिपथावर आहेत.

**उपकेंद्र क्षमतावाढ -** १२ उपकेंद्रापैकी जून महिन्यापर्यंत ४ उपकेंद्रांच्या क्षमतावाढीचे उदिष्ट दिले आहे. त्यातील एका ठिकाणी काम प्रगंतीपथावर आहे.

संथ गतीने काम सुरू असल्यामुळे एजन्सीला एकूण ४ पत्र देण्यात आली आहेत. औसा मतदारसंघातील आशिव, निंबाळा डावु, निलंगा येथे नवीन ३३/११ KV उपकेंद्रे, तसेच खरोसा तक्ष चिंचोली ,एरंडी गोदरी येथील नवीन अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर उभारणीची कामे दिलेल्या उद्दिष्टानुसार यापुढे पूर्ण करण्यात येतील. नागरसोगा येथे क्षमता ५ एमव्हीए क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने ५ एमव्हीए पॉवर ट्रान्सफॉर्मर उभारणीचे काम दि. १७.०४.२०२५ रोजी पूर्ण झाले आहे. बेलकुंड ५ MVA ते १० MVA उपकेंद्र क्षमतावाढ हे काम उपकेंद्र सक्षमीकरण योजने अंतर्गत समाविष्ट असून, १० MVA चे रोहित्र उपकेंद्रात उपलब्ध करण्यात आले असून, सदर रोहित्र बसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

**************************************

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ व्दितीय अधिवेशन

५७५ ६५

**श्री.रईस शेख, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ५७५ पुढीलप्रमाणे आहे :-**

" मुंबई ते नाशिक महामार्गावर होत असलेली मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी, सदर वाहतूक कोंडीवर तोडगा काढण्याकरिता मा. उपमुख्यमंत्री महोदयांनी मंत्रालयात घेतलेली बैठक, बैठकीच्या अनुषंगाने लोकप्रतिनिधी व अधिका-यांसमवेत महामार्गाची केलेली पाहणी, पाहणीत मुंबई ते नाशिक रस्त्याची झालेली दुरावस्था निदर्शनास येणे, रस्त्याच्या दुरावस्थेमुळे वाहतूक कोंडी होणे, परिणामी प्रवाशांबरोबर वाहन चालकांना मनस्ताप सहन करावा लागणे, उक्त महामार्गावरती सुरु असलेल्या वडपे- ठाणे हे १२०० कोटीपेक्षा जास्त किंमतीचा प्रकल्पाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून गुणवत्ता दर्जा योग्य नसल्याचे निदर्शनास येणे, ठाणे विभगापर्यंत ४ लेन वडापेच ८ लेन बांधकामाच्या सबलेटिंग करण्यात आलेले नसणे, याकरिता एमईपीएल करिता वर्क ऑर्डरचे करण्यात आलेले पुनरावलोकन, तसेच उपकंत्राट बँक टु बँक काम प्रतिबंधित असणे, त्यामुळे एमएसआरडीसी कडुन नियुक्त केलेल्या उपकंत्राटदारांना देय प्रक्रियेबाबत निर्माण झालेली शंका, याकरिता आर्थिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व राखण्यासाठी देयके अदा व्यवस्थापन प्रकल्पाच्या कराराची पडताळणी करण्याची आवश्यकता, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी दि १४/०८/२०२४ रोजी वा त्या सुमारास तत्कालिन मुख्यमंत्री महोदयांकडे पत्रव्यवहार करुनही अदयापी कोणतीच कार्यवाही न होणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, सदर कामाच्या गुणवत्ता, दर्जा, अनियमितता आदि बाबत सखोल चौकशी करुन यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यावर कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका "

.........................................................................................................................................

**मा.उपमुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे निवेदन**

मुंबई-नाशिक राष्ट्रीय महामार्ग क्र.८४८ हा केंद्रशासनाचे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) यांच्या अखत्यारीत आहे. या महामार्गाच्या लांबीपैकी ठाणे ते वडपे या एकूण २३.८० कि.मी. लांबीच्या आठ पदरीकरणाच्या कॉंक्रीटीकरणाच्या कामासाठी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची उद्योजक म्हणून नेमणूक केलेली आहे व उर्वरित वडपे ते नाशिक ही लांबी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या अखत्यारित आहे.

मुंबई-नाशिक महामार्गावरील वाहतूक कोंडी सोडविण्याकरीता मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) महोदयांनी सर्व संबंधित मा.खासदार व मा.आमदार यांच्या समवेत दि.०१.०८.२०२४ रोजी बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीच्या अनुषंगाने मा. लोकप्रतिनिधी यांचे समवेत व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांची दि.०२.०८.२०२४ रोजी सदर कामाची पाहणी केली होती.

वडपे ते ठाणे महामार्गाच्या २३.८० कि.मी. लांबीच्या मुख्य व सेवा रस्त्यापैकी २१.०० कि.मी. लांबीमध्ये कॉंक्रिटच्या पृष्ठभागावरून रहदारी सुरू आहे. उर्वरित २.८० कि.मी.चा डांबरी पृष्ठभाग सुस्थितीत असून वाहतुकीस योग्य आहे.

या प्रकल्पामध्ये कशेळी खाडीपूल, कळवा खाडीपूल, रेल्वे पूल व वडपे उड्डाणपूल या चार मोठ्या पुलाचे बांधकाम प्रगतीत आहे. या मोठ्या पुलाचे ठिकाणी वाहतूक दोन लेन मधून जात असल्याने काही प्रमाणात तेथे वाहतूक कोंडी होत असते. सदर रस्त्यावरील वाहतूक नियोजनासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते

विकास महामंडळाकडून वाहतूक पोलीस विभागास मदतीसाठी ट्रॅफिक वॉर्डन व क्रेन्स पुरवण्यात आल्या आहेत. कळवा खाडीपुलाचे ९३% काम, कशेळी खाडीपुलाचे ७९% काम, रेल्वे पुलाचे ६५% काम व वडपे उड्डाणपुलाचे ६७% काम पूर्ण झाले आहे. उपरोक्त चारही मोठ्या पुलाचे काम माहे डिसेंबर-२०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सदर मोठ्या पुलांचे काम पूर्ण झाल्यावर महामार्गावरील वाहतूक सुरळीत होईल.

सदर रस्त्याची गुणवत्ता राखण्यासाठी व पर्यवेक्षण करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने स्वतंत्र अभियंता (Independent Engineer) ची नेमणूक केली आहे. तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने ऑथॉरिटी इंजिनियर (Authority Engineer) ची नेमणूक केली आहे. त्यांचे मार्फत नियमित तपासणी करण्यात येत असून कामाचा दर्जा राखण्यात येत आहे. सदरचे काम उपरोक्त दोन्ही तांत्रिक यंत्रणांच्या देखरेखीखाली करण्यात येत आहे.

वडपे ते ठाणे या चौपदरी लांबीच्या रस्त्याचे कॉंक्रिटीकरणाने आठ पदरीकरण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने, मे. एमईपी इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड - एमसीएल जेव्ही यांना ईपीसी कंत्राटदार म्हणून दि.२५.०६.२०२१ रोजी नियुक्त केले असून त्यांचेमार्फत या प्रकल्पाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. सदर ईपीसी कंत्राटदार या रस्त्याचे काम दोन उपकंत्राटदारामार्फत करीत आहेत. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने उपकंत्राटदाराची नेमणूक केलेली नाही.

सद्यस्थितीत ठाणे ते वडपे प्रकल्पाचे ८०% काम पूर्ण झाले असून उर्वरित काम डिसेंबर-२०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या अखत्यारितील वडपे ते नाशिक या ११६ कि.मी. लांबीमध्ये ६ उड्डाणपुलांचे (घोटी, पिंपरी-सदो, कसारा वशाळा, आसनगाव, वाशिंद व खडवली) काम नुकतेच पुर्ण करण्यात आले असून सदर उड्डाणपूल वाहतूकीसाठी खुले करण्यात आले आहेत. घोटी येथील सेवा रस्त्याला सततच्या पावसामुळे काही ठिकाणी खड्डे पडले असून खड्डे भरण्याचे काम प्रगतीपथावर आहे. कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून सदर सेवा रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण सुरू करण्यात आले आहे. या व्यतिरिक्त तलोळी नाका येथे उड्डापणुलाचे काम प्रगतीपथावर असल्याने तेथील वाहतूक सिमेंट कॉंक्रिट सेवा रस्त्यावर वळवली असून वाहतूक सुरळीत सुरू आहे.

वडपे ते नाशिक दरम्यान पिंपरी सादो ते गोंदे या २० कि.मी. लांबीचे ६ पदरीकरणाचे कॉंक्रिटीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. या लांबीत ३ ठिकाणी (गोंदे, मुढेगाव व बोरटेंभे फाटा) येथे उड्डाणपुलाचे काम प्रगतीपथावर असून तेथील वाहतूक सेवा रस्त्यावर वळविण्यात आली आहे. सततच्या पावसामुळे सेवा रस्त्यावर पडलेले खड्डे डांबरी करणाने नियमितपणे भरण्यात आहे. या लांबीमध्ये पोलिसांच्या मदतीने ट्राफिक वॉर्डन तैनात केलेले असून वाहतूक सुरळीत ठेवण्याचा प्रयत्न आहे.

**********

६६

१२२९

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ व्दितीय अधिवेशन

**श्री. प्रकाश सोळंके, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १२२९ पुढीलप्रमाणे आहे :-**

"राष्ट्रीय महामार्ग ५४८ (सी) पॅकेज माजलगाव ते तेलगाव जि.बीड या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होणे, रस्त्यावर मोठ्या प्रमाणात भेगा पडणे, रस्त्यावरील भेगाच्या खड्ड्यात पडुन अनेक अपघात होवुन अनेकांची जीवीत हाणी होणे, या रस्त्याची दुरूस्ती करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीने MSRDC च्या अधिका-याकडे पाठपुरावा करणे, परंतू MSRDC च्या अधिका-याचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व करावयाची उपाययोजना."

..........

**मा.उपमुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे निवेदन**

राष्ट्रीय महामार्ग ५४८ (सी) माजलगाव ते तेलगाव जि.बीड या रस्त्याच्या ५७.५१८ कि.मी लांबीचे कॉंक्रिटीकरणाने दुपदरीकरणाचे काम केंद्र शासनाची स्टेट एजन्सी म्हणून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत सन २०१८ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. सदर रस्त्याच्या लांबीचे संपूर्ण काम रस्ते वाहतूक व महामार्ग यांनी नेमणूक केलेल्या ऑथॉरिटी अभियंता यांच्या देखरेखीखाली पूर्ण झालेले आहे.

करारनाम्यानुसार ४ वर्षाचा दोष दायित्व कालावधी सन २०२२ रोजी मध्ये संपूष्टात आलेला असून सदर रस्त्याची लांबी रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय यांचे निर्देशानुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून केंद्र शासनाची स्टेट एजन्सी राष्ट्रीय महामार्ग विभाग यांच्याकडे हस्तांतर करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

सदर महामार्गाच्या लांबीमध्ये काही ठिकाणी कॉंक्रिटीकरणाच्या पृष्ठभागावर भेगा पडलेल्या आहेत. या रस्त्यावर मागील ३ वर्षांमध्ये झालेले अपघात रत्यावरील भेगांमुळे झाली असल्याची नोंद पोलीस विभागाच्या अहवालामध्ये दिसून येत नाही.

खराब झालेल्या रस्त्याचे कॉंक्रिटीकरणाची दुरूस्ती कंत्राटदाराच्या जोखीमीवर IRC मानकाप्रमाणे प्रगतीपथावर असून वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत.

*******

२३६०

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ द्वितीय अधिवेशन

**श्री.सिध्दार्थ खरात, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २३६० पुढीलप्रमाणे आहे :-**

"बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी असणे, मेहकर शहर व लगतच्या या संपूर्ण परिसरात सर्वांगीण विकासाची असलेली आवश्यकता, मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावर मेहकर शहर असणे, मात्र या शहराला जोडणारा समृद्धी महामार्गावरील इंटर पास जोड रस्ता गैरसोयीचा असणे, परिणामी दहा ते पंधरा किलोमीटर वळसा घालून मेहकर शहरात यावे लागणे - जावे लागणे, त्यामुळे प्रवासी व नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, अशा स्थितीत मेहकर शहरात येण्या-जाण्यासाठी बाबुळखेड येथे नव्याने इंटरचेंज जोड रस्ता करण्याची आवश्यकता असणे, तसेच मेहकर मालेगावच्या मध्ये डोणगाव शहराला जोडणारा नवीन इंटरचेंज जोडरस्ता करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

---

**मा.उपमुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे निवेदन**

बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर शहर (जानेफळ फाटा) ते नागपुर मुंबई समृध्दी महामार्गावरील मेहकर इंटरचेंज (सा.क्र.कि.मी.२८४) हे अंतर सुमारे ६ कि.मी. आहे. तसेच मेहकर शहर (जानेफळ फाटा) ते बाभुळखेड फाटा हे अंतर ६ कि.मी. आहे. समृध्दी महामार्गावरील सा.क्र.कि.मी.२८४ मध्ये बाभुळखेड फाटा येथे यापुर्वीच वाहनांसाठी अंडरपास (VUP) देण्यात आलेला आहे. मेहकर इंटरचेंज ते बाभुळखेड येथील VUP चे अंतर ४ कि.मी. असल्याने तसेच समृध्दी महामार्ग कार्यन्वीत झालेला असल्यामुळे बाभुळखेड फाटा येथे नव्याने इंटरचेंज करणे शक्य होणार नाही.

मेहकर इंटरचेंज (सा.क्र.कि.मी.२८४) व मालेगांव इंटरचेंज (सा.क्र.कि.मी २३८/९००) मधील अंतर ४५ कि.मी. आहे. मेहकर इंटरचेंज व डोणगाव (सा.क्र.कि.मी.२६९) चे अंतर १५ कि.मी. आहे. सद्यस्थितीत डोणगाव येथे पेट्रोल पंप कार्यान्वीत झालेले आहे. तसेच समृध्दी महामार्ग कार्यन्वीत झालेला असल्यामुळे डोणगाव येथे नव्याने इंटरचेंज देणे शक्य होणार नाही.

*******

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ व्दितीय अधिवेशन

(२३८६) ६८

**श्री.सिध्दार्थ खरात, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २३८६ पुढीलप्रमाणे आहे :-**

"नागपूर ते मुंबई या हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्गाचा सुमारे ७०१ कि.मी. लांबीचा महामार्ग नागपूर ते आमणापर्यंत सुरू होणे, दिनांक २५-२६ जून रोजी ढगफूटीसदृश्य झालेल्या पावसामुळे समृध्दी महामार्गावरील मेहकर इंटरपासवरील खामगाव - जानेफळ - मेहकर रोडवर पाण्याचा तलाव झाल्याने वाहतुक खोळंबणे, सदरहू महामार्गावरील अनेक अंडरपास मध्ये पूलाखालून पाणी वाहून जाण्यासाठी केलेल्या नाल्या चोक-अप होणे, पाईपलाईनचे महामार्गालगत समांतर काम सुरू असणे व त्यामुळे खोदून ठेवलेल्या अर्धवट कामांमुळे पाणी तुंबणे, त्यामुळे शेतकरी व नागरिकांना अनेक अडचणींचा करावा लागणारा सामना तसेच लोणार, बुलढाणा, चिखली येथून समृध्दी महामार्गावर येण्यासाठी मेहकर शहराला वळसा घालून जावे लागल्यामुळे वाहतुक अडथळे व वेळ लागणे, मेहकर शहरासाठी मेहकर शहराजवळील बाभुळखेड येथे आणखी एक इंटरचेंज निर्माण करणे, तसेच मेहकर व मालेगाव दरम्यान डोणगाव येथे इंटरचेंज निर्माण करणे, समृध्दी महामार्गावर ठिकठिकाणी विश्रांती थांबे तयार करणे, झाडे लावण्याची आवश्यकता असणे, समृध्दी महामार्गाच्या आमणा या जंक्शनवरून पुढे कल्याण, नवी मुंबई, ठाणे व मुंबई शहराकडे येण्यासाठी प्रचंड वाहतुक कोंडी असणे, जुन्या मुंबई नाशिक हायवे वर रस्ते व पुलांची अनेक कामे सुरू असणे व त्यामुळे प्रवाशांना सहन करावा लागणारा प्रचंड त्रास, यावर शासनाने करावयाची कार्यवाही."

---

**मा.उपमुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे निवेदन**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाची एकूण ७०१ कि.मी. लांबीचे काम पूर्ण करण्यात येऊन सदर महामार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे.

मेहकर तालुक्यामध्ये (जि.बुलढाणा) दि.२५.०६.२०२५ रोजी रात्री ९.०० वाजल्यापासून सलग दुसऱ्या दिवशी सुमारे २४ तास अतिवृष्टी (१०७ मी.मी) झाल्याने खामगांवहून मेहकर कडे जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ -सी वर मेहकर इंटरचेंज येथे साधारणात: २०० मीटर लांबी मध्ये रस्त्यावरती पाणी आल्याने सुरक्षिततेच्या कारणास्तव सुमारे एक ते दीड तास राष्ट्रीय महामार्गावरील वाहतुक थांबविण्यात आली होती. तद्नंतर साचलेल्या पाण्याचा निचरा होण्यासाठी तात्पुरती व्यवस्था वाहतुक पुर्ववत करण्यात आली. त्यामुळे खामगांव ते मेहकर राष्ट्रीय महामार्गास व समृध्दी महामार्गास कोणतीही क्षती झालेली नसून वाहतुक सुरळीत चालू आहे.

अतिवृष्टी मुळे महामार्गाच्या अंडरपास मध्ये पाणी शिरले होते. परंतू आवश्यक उपाययोजना करून महामार्गाच्या अंडरपास मधील पाण्याचा निचरा करण्यात आला आहे.

समृध्दी महामार्गाच्या संपूर्ण लांबी मध्ये गेल पाईपलाईन चे महामार्गालगत समांतर काम पुर्ण झालेले आहे. तसेच शेतकऱ्यांसाठी शेतात जाण्यायेण्यासाठी सुमारे २२९.०० कि.मी. लांबीचे (कार्ट ट्रॅक) व सेवा रस्ते तयार करण्यात आलेले आहे.

नागपूर ते मुंबई या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर सा.क्र.कि.मी. २८४ येथे मेहकर शहराजवळ इंटरचेंज कार्यान्वीत आहे. सदर इंटरचेंज ते बाभुळखेडा हे अंतर फक्त ४ किमी.

असल्यामुळे तसेच वाभुळखेडा येथे वाहनासाठी अंडरपास (VUP) असल्याने इंटरचेंज करणे शक्य होणार नाही.

या महामार्गावर मेहकर इंटरचेंज (सा.क्र.कि.मी २८४) व मालेगांव इंटरचेंज (सा.क्र.कि.मी. २३९) मधील अंतर ४५ कि.मी. आहे. तसेच डोणगांव (सा.क्र.कि.मी. २६९) येथे पेट्रोल पंप कार्यरत आहे. त्यामुळे समृध्दी महामार्ग द्रुतगती महामार्ग असल्याने डोणगांव (सा.क्र.कि.मी. २६९) येथे इंटरचेंज करणे शक्य नाही.

समृध्दी महामार्गालगत व मेडिअन मध्ये ३३.६५ लक्ष मोठी वृक्ष, वेली, झुडुपे यांची रोप लागवड करण्याचे काम प्रगतीत आहे. समृध्दी महामार्गावर सध्या २२ ठिकाणी इंधन स्थानके कार्यरत आहे. त्या ठिकाणी इंधन, हवा भरणेची सोय, स्वच्छतागृहे (पुरुष, महिला व अपंग यांच्यासाठी), पाणी, खाद्यपदार्थ इ. सुविधा उपलब्ध आहे.

समृध्दी महामार्गावर २२ ठिकाणी परिपूर्ण मार्ग सुविधा (Wayside Amenities) उभारणेसाठी कंत्राटदारांना निविदा स्वीकृती पत्रे (Letter of Acceptance) देण्यात आलेली आहेत व कंत्राटदारांशी Lease Deed ( भाडे करारनामा) करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. सदर परिपूर्ण मार्ग सुविधा व्यतिरिक्त ८ ठिकाणी स्वतंत्र इंधन स्थानके आहेत.

समृध्दी महामार्ग वडपे येथे नाशिक – मुंबई राष्ट्रीय महामार्गास जोडून मुंबईला जोडण्यात आलेला आहे. आमणे ते खारेगाव या भागात होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेऊन समृध्दी महामार्गास ठाणे पर्यंत जोडण्याकरीता आमणे ते खारेगाव या भागात सलग जोडमार्ग निर्माण करण्याचा अभ्यास करण्यात आलेला असून आमणे ते राजणोलीपर्यंत जमिनीवरील नवीन रस्ता व राजणोली ते साकेत, ठाणेपर्यंत उन्नत मार्ग असा प्रस्ताव MMRDA कडून तयार करण्यात आलेला आहे.

मुंबई - नाशिक हा राष्ट्रीय महामार्ग हा केंद्र शासनाचे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या अखत्यारीत आहे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने मुंबई- नाशिक महामार्गावरील वडपे ते ठाणे या एकूण २३.८० किमी लांबीच्या आठ पदरीकरणाचे कामासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची उद्योजक म्हणून नेमणूक केली आहे.

वडपे ते ठाणे महामार्गाच्या २३.८० कि.मी. लांबीच्या मुख्य व सेवा रस्त्यापैकी २१.०० कि.मी. लांबीमध्ये कॉक्रिटच्या पृष्ठभागावरून रहदारी सुरू आहे. उर्वरित २.८० कि.मी.चा डांबरी पृष्ठभाग सुस्थितीत असून वाहतुकीस योग्य आहे. या प्रकल्पामध्ये कशेळी खाडीपूल, कळवा खाडीपूल, रेल्वे पूल व वडपे उड्डाणपूल या चार मोठया पुलाचे बांधकाम प्रगतीत आहे. या मोठया पुलांचे ठिकाणी वाहतूक दोन लेन मधून जात असल्याने काही प्रमाणात तेथे वाहतूक कोंडी होत असते. सदर रस्त्यावरील वाहतूक नियोजनासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून वाहतूक पोलीस विभागास मदतीसाठी ट्रॅफिक वॉर्डन व क्रेन्स पुरवण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत सदर प्रकल्पाचे ८०% काम पूर्ण झाले असून उर्वरित काम डिसेंबर-२०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

*******

## महाराष्ट्र विधानसभा सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री.अतुल भातखळकर, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम -१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे :-

" २०१७ मध्ये स्थापन झालेल्या महाराष्ट्र रिअल इस्टेट नियामक प्राधिकरणामध्ये (महारेरा) दाखल झालेल्या २९,३७४ तक्रारींपैकी ७,३१० तक्रारी प्रलंबित असल्याचे माहे जून २०२५ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये, महारेराकडे पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्यामुळे तक्रारींचे निवारण विलंबाने होत असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे, तक्रारींचे जलदगतीने निवारण होण्याकरिता ठोस पाऊले उचलण्याची गरज असणे, तसेच कर्मचाऱ्यांची संख्या वाढवण्याची गरज असणे, त्यामुळे पदांची लवकरात लवकर भरती करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया, "

---

### मा.उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

केंद्र शासनाने स्थावर संपदा (विनियमन आणि विकास) अधिनियम, २०१६ (रेरा अधिनियम) पारित केलेला असून त्यानुसार राज्यात महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्रधिकरणाची (महारेरा प्राधिकरण ) स्थापना १ मे २०१७ पासून करण्यात आलेली आहे. या रेरा अधिनियमातील तरतूदीनुसार विकासकांनी त्यांच्या गृहनिर्माण प्रकल्पांची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने महारेरा प्राधिकरणाकडे करणे बंधनकारक आहे. त्यानुसार सद्यस्थितीत राज्यात महारेरा प्राधिकरणाकडे ५०,७८० प्रकल्पांची नोंदणी करण्यात आलेली आहे. राज्यातील सदर प्रकल्प नोंदणी संख्या संपुर्ण देशातील एकूण प्रकल्प नोंदणी संख्येच्या ३४ % एवढी आहे.

रेरा अधिनियमातील तरतूदींनुसार वाटपग्राही म्हणजे प्रकल्पातील खरेदीदार यांना विकासकाविरुध्द किंवा विशिष्ट प्रकरणी विकासकास खरेदीदार यांच्याविरुध्द अधिनियमातील कलम ३१ नुसार तक्रार करण्याची मुभा दिलेली असून, या तक्रारींवर दोन्ही पक्षकारांना सुनावणीची पुरेशी संधी देऊन तक्रारींवर निर्णय देणे आवश्यक असते. राज्यात नोंदणी झालेल्या ५०,७८० प्रकल्पांमध्ये महारेरा प्राधिकरणाकडे आतापर्यंत दाखल झालेल्या एकूण तक्रारींची संख्या ३०,१११ एवढी असून, देशातील इतर राज्यांची तुलना करता महाराष्ट्र राज्यात तक्रारींची संख्या प्रकल्पांच्या नोंदणीसंख्येशी तुलनात्मकरित्या खुप कमी आहे. महारेरा प्राधिकरणाने त्यांच्याकडे दाखल झालेल्या तक्रारींवर सुनावण्या घेऊन २२,७४० तक्रारी (७५.५२ %) निकाली काढलेल्या आहेत.

महारेरा प्राधिकरणामध्ये एका सदस्याचे पद काही काळ रिक्त राहील्याने तसेच कोविड-१९ साथीच्या कालावधीत पुरेशा प्रमाणात सुनावण्या होऊ न शकल्याने काही प्रमाणात तक्रारी प्रलंबित राहील्या होत्या. महारेरा प्रधिकरणामध्ये मागील काही वर्षामध्ये दाखल तक्रारींची संख्या आणि

प्राधिकरणाने सुनावण्या घेऊन निकाली काढलेल्या तक्रारींची संख्या खालील तक्त्यात नमूद करण्यात आलेली आहे :-

| वर्ष | दाखल तक्रारींची संख्या | निकाली काढलेल्या तक्रारींची संख्या | दाखल तक्रारींशी निकाली काढलेल्या तक्रारींचे प्रमाण |
|---|---|---|---|
| २०१९ | ४३७६ | ३०९४ | ७१ % |
| २०२० | ३०४९ | १६३० | ५३ % |
| २०२१ | ३५३४ | २०२७ | ५७% |
| २०२२ | ३३१२ | २६२७ | ७९% |
| २०२३ | ४००६ | २७९२ | ७०% |
| २०२४ | ३८६८ | ४७७५ | १२३% |
| २०२५ (दि.१०जुलै, २०२५ पर्यंत) | २३९३ | ३०६३ | १२८% |

सद्यस्थितीत चालू असलेल्या सन २०२५ वर्षामध्ये आतापर्यंत (जानेवारी २०२५ ते १० जुलै २०२५) दाखल तक्रारी संख्येशी तुलना करता निकाली काढलेल्या तक्रारींचे प्रमाण १२८% एवढे आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने न्युटेक प्रमोटर्स आणि डेव्हलपर्स प्रा.लि. विरुध्द उत्तर प्रदेश आणि इतर या प्रकरणात दिलेल्या न्यायनिर्णयानुसार न्यायीक अधिका-यांमधून महारेरा प्राधिकरणामध्ये स्वतंत्रपणे चार अभिनिर्णय अधिकारी नियुक्त करण्यात आलेले आहेत.

सद्यःस्थितीत महारेरा प्राधिकरणामध्ये सर्व पदे भरलेली असल्याने तसेच अभिनिर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली असल्याने महारेरा प्राधिकरणाचे कामकाज रेरा अधिनियमातील तरतुदींनुसार सुलभपणे आणि जलदगतीने सुरु असल्याचे दिसुन येत आहे.

************************************************

<u>सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन</u> <u>लक्षवेधी सूचना क्र. २८६</u>

## लक्षवेधी सूचना

**श्री.भास्कर जाधव, श्री.संजय पेतनीस, श्री.अजय चौधरी, श्री.मनोज जामसुतकर, श्री.महेश सावंत, श्री.अनंत (बाळा) नर, श्री.संजय देरकर, श्री.सिध्दार्थ खरात, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २८६ पुढीलप्रमाणे आहे :-**

"सन २०१६ मध्ये शासनाने केलेला मुंबईतील धारावी मास्टर प्लॅन पुन्हा सन २०२५ मध्ये लागू करणे, एमआरटीपी कायद्यानुसार कोणताही विकास आराखडा तयार करण्यापूर्वी नागरिकांच्या सूचना, हरकती मागविणे आवश्यक असणे, तथापी धारावी मास्टर प्लॅन तयार करण्यापूर्वी नागरिकांकडून सूचना, हरकती मागविण्यात न येणे, संबंधित विभागातील जनतेची संमती आवश्यक असतांनाही धारावतील नागरिकांची संमती घेण्यात न येणे, इत्यादी त्रुटी असतांनाही राज्य शासनाने धारावी मास्टर प्लॅनला मान्यता देणे, सदर मास्टर प्लॅनच्या विरुध्द धारावीमध्ये असंतोष पसरलेला असणे, त्यामुळे तो मास्टर प्लॅन रद्द करण्याची मागणी मुंबईतील लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे निवेदनाव्दारे दि.०२ जून, २०२५ रोजी वा त्यासुमारास केलेली असणे, धारावी मास्टर प्लॅन रद्द करण्याची आवश्यकता, शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

---

### मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

शासन अधिसूचना, नगर विकास विभाग, दि.०३/०३/२०१६ अन्वये धारावी पुर्नविकास प्रकल्पाकरिता विकास नियोजन प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली. त्यानंतर विशेष हेतू कंपनीच्या माध्यमातून धारावी पुर्नविकास प्रकल्पाचा एकत्रित विकास करण्याबाबत दि.०५/११/२०१८ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली. विशेष हेतू कंपनी करिता प्रमुख भागीदाराची निवड करण्यासाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदेमध्ये धारावी पुनर्वसन प्रकल्पाकरिता बृहत आराखडा तयार करण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. त्यानुषंगाने मे. नवभारत मेगा डेव्हलपर्स प्रा.लि., या विशेष हेतू कंपनीमार्फत धारावी पुर्नविकास प्रकल्पाचा बृहत आराखडा माहे एप्रिल, २०२५ मध्ये तयार करण्यात आला आहे. महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम, १९६६ (MRTP Act) या कायद्यानुसार सदर बृहत आराखड्यामधील ज्या सुधारणांकरिता सूचना/हरकती घेणे आवश्यक असेल, अशा बाबींसाठी MRTP Act नुसार सूचना/हरकती घेऊन आवश्यकती कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच निविदेतील तरतूदीनुसार विशेष हेतू कंपनीमार्फत धारावीमध्ये विविध घटकांसोबत माहिती, शिक्षण व संप्रेषण उपक्रम (Information, Education and Communication (I.E.C) Activities) राबविण्यात येत आहेत.

*********

सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन लक्षवेधी सूचना क्र. ११९९

## लक्षवेधी सूचना

**श्री.हेमंत रासने, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ११९९ पुढीलप्रमाणे आहे :-**

"कसबा मतदारसंघ हा पुणे शहराच्या मध्यवर्ती भागात असून, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा असून, येथे अनेक जुने वाडे व झोपडपट्टया आहेत, जे सध्या पुनर्विकासाच्या प्रतीक्षेत असणे, मात्र, सध्याच्या धोरणांमधील अडथळ्यांमुळे हे प्रकल्प रखडलेले असून, नागरिक मूलभूत नागरी सुविधांपासून वंचित असणे, वाड्यांचे बांधकाम अत्यंत जीर्ण अवस्थेत असून रहिवाशांचे जीवित धोक्यात असणे, विद्यमान नियमांतील तांत्रिक अडथळ्यांमुळे पुनर्विकास प्रक्रियेत विलंब होत असणे, ठाणे व मुंबईतील धोरणांच्या धर्तीवर पुण्यासाठी स्वतंत्र व सुधारित धोरणाची तातडीने आवश्यकता असणे, झोपडपट्टी पुनर्विकासाची प्रक्रिया अत्यंत संथ आहे, ज्यामुळे नागरिक मूलभूत सुविधांपासून वंचित असणे, प्रशासकीय मंजुरी प्रक्रिया सुलभ करून प्रकल्पांच्या अंमलबजावणीत गती आणणे आवश्यक असणे,पुनर्विकास प्रक्रियेत पारदर्शकता व गतीसाठी धोरणात्मक सुधारणा करणे आवश्यक असणे, रहिवाशांच्या हितासाठी विशेष सवलती व प्रोत्साहनपर तरतुदी करण्याची गरज, पुण्यासाठी स्वतंत्र गृहनिर्माण व पुनर्विकास धोरण ठरवण्यासाठी तज्ज्ञ समिती गठीत करणे आवश्यक असणे,पुण्यातील वाडे पुनर्विकास धोरणावर चर्चा करण्यासाठी उच्चस्तरीय बैठक बोलविण्याची आवश्यकता,सध्याच्या नियमांमधील अडथळे दूर करून पुनर्विकास प्रकल्पांना गती देण्यासाठी आवश्यक सुधारणा त्वरीत मंजूर कराव्यात. तसेच पुण्यासाठी स्वतंत्र गृहनिर्माण व पुनर्विकास धोरण ठरवण्यासाठी तज्ज्ञ समिती स्थापन करण्यात यावी, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

## मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता दिनांक ३०/०६/२००५ च्या अधिसूचनेद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी - चिंचवड क्षेत्र, पुणेची नियुक्ती करण्यात आली आहे. उपरोक्त अधिनियमाच्या कलम ४ (१) व कलम ३ (क) नुसार अनुक्रमे गलीच्छ वस्ती घोषित करणे व झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे या संदर्भात विहित कार्यवाही करण्यात येते.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे यांच्या अंतर्गत कसबा विधानसभा क्षेत्रामध्ये झोपडपट्टी पुनर्वसनाच्या एकूण ९० योजना सादर करण्यात आल्या असून, त्यामध्ये २२०९९ झोपडीधारक समाविष्ट आहेत. झोपडपट्टी पुनर्वसन योजनांच्या गतीवर खालील कारणांमुळे सामान्यत: परिणाम होतो :

a) योजना राबवतेवेळी झोपडीधारकांचा सर्व सहमतीने विकासक निश्चित करणे व संक्रमण व्यवस्था मान्य करणे या बाबीवर एकमत नसते.

b) योजनेतील अपात्र होणाऱ्या आणि दुमजली पक्क्या घरात राहणाऱ्या झोपडीधारकांचा योजनेस विरोध होतो.

c) खाजगी मालकीच्या झोपडीव्याप्त जमिनीच्या विक्रीबाबत जमीनमालक व विकासक यांचेमध्ये सहमती होण्यास विलंब होतो. अशा प्रकरणी भूसंपादन करणेसाठीची प्रक्रिया अतिशय दीर्घकालीन आहे.

d) जुन्या झोपडीव्याप्त जागांबाबत अत्यल्प प्रमाणात खरेदी-विक्री व्यवहार होत असल्याने, तेथील वार्षिक मूल्य तक्त्यामधील जमिनीचे दर कमी आहेत व त्यामुळे तेथील योजनांची व्यवहार्यता कमी असल्याने विकासक जमीन मालकांशी व्यवहार करण्यास उत्सूक राहत नाही.

e) पुण्यातील योजना या खुल्या विक्री घटकाऐवजी हस्तांतरणीय विकसक हक्कावर अवलंबून आहेत व टि.डी.आर. दरामध्ये बाजारात वेळोवेळी होणारे बदल होत असल्याने विकासकामार्फत योजना मुदतीत पुर्ण करण्यास विलंब होतो.

झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविताना येणाऱ्या अडचणी दूर होण्याच्या दृष्टीने आणि त्यांच्या कार्यक्षेत्रातील झोपडपट्टी क्षेत्रांचा विकास व्हावा आणि भविष्यात झोपडपट्टी पुनर्विकासाला चालना मिळण्याच्या दृष्टीने शासनाने विकास नियंत्रण नियमावलीत सुधारणा करुन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र) पुणेसाठी शासनाने नविन "विकास नियंत्रण नियमावली, २०२२" काही बदलांसह दि.०५/१२/२०२३ च्या अधिसूचने अन्वये मंजूर केली आहे. सदर नियमावलीचा समावेश "यूडीसीपीआर" मधील विनियम क्र.१४.६ मध्ये केला आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याकरिता यापूर्वी ७०% टक्के झोपडीधारकांची संमती आवश्यक होती ती "विकास नियंत्रण नियमावली, २०२२" नुसार ५१% झोपडीधारकांची संमती आवश्यक करण्यात आली आहे. तसेच झोपड्यांचे पुनर्वसन करताना निवासी सदनिका २६९ चौ.फुट वरून ३०० चौ.फूट मंजूर करण्यात आल्या आहेत. झोपुप्रा, पुणे अंतर्गत योजना राबविताना योजनेच्या भूखंडावर FSI ची मर्यादा वाढवून ती सरसकट ४ FSI करण्यात आली आहे.

नवीन विकास नियंत्रण नियमावलीनुसार पुनर्वसन इमारतीची उंची ४० मीटर वरून ९ मीटर रुंद रस्त्यासाठी ४५ मीटर व ९ मीटर पेक्षा जास्त रस्त्यासाठी ७० मीटर एवढी करण्यात आली आहे. तसेच किमान सदनिका घनता ३६० वरून ४५० इतकी करण्यात आली आहे. नविन विकास नियंत्रण नियमावली लागू केली असल्यामळे बहुतांश अडचणी दुर झाल्या आहेत व योजनेसाठी चालना मिळाली आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे मार्फत कसबा विधानसभा क्षेत्रातील ३५ योजनांमध्ये पात्रता यादी पूर्ण झाली आहे. तसेच ३० योजनांमध्ये कलम ३(क) अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र निर्धारित करण्याचे आदेश पारीत झाले आहेत. आजपर्यंत २५ योजनांमधील पुनर्वसन घटक पुर्ण झाले असून, त्यामध्ये ५९०९ झोपडीधारकांचे पूनर्वसन झाले आहे.

पुणे महानगरपालिकेकडून प्राप्त अहवालानुसार, पुणे महानगरपालिका क्षेत्रातील जुन्या व मोडकळीस आलेल्या वाड्यांच्या पुनर्विकासाच्या अनुषंगाने एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली - २०२० मधील नियम क्र. ७.६ मधील उप नियम ७.६.२ अन्वये पुणे शहरातील दाट वस्ती भागातील मिळकतींना पुनर्विकास करणेसाठी खाजगी मिळकतींचे मालक/विकासक यांना प्रोत्साहानपर अतिरिक्त चटई क्षेत्र मान्य करणेत येते.

जुन्या मोडकळीस आलेल्या वाडयांच्या दुरुस्ती बाबत सदर बांधकामांची तपासणी करणेसाठी पुणे महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ चे कलम क्र.२६५अ(६) नुसार स्ट्रक्चरल इंजिनिअर यांची निविदाद्वारे नेमणूक करण्यात येऊन त्यांचेमार्फत सर्वेक्षण करून घेण्यात आलेले आहे.

ज्या खाजगी वाडे/इमारतीची दुरुस्ती होण्यासारख्या असतात त्यांना उपरोक्त कायद्याचे कलम २६४(१) अन्वये सर्व प्रथम मिळकत मालकांना इमारतीची दुरुस्ती/डागडुजी करणेसाठी विहित मुदतीची नोटीस देण्यात येते. संबंधीत मिळकत मालकाने कलम २६४(१) अन्वयेच्या नोटीसीनुसार दुरुस्ती न केल्यास सदर इमारतीमधील ऑक्यूपायर/भाडेकरू यांना दुरुस्तीची नोटीस देण्यात येते. तसेच ज्या इमारती अंत्यंत धोकादायक असतात त्याबाबत कलम २६४(३) अन्वये धोकादायक इमारत घोषित करून इमारतीमधील रहिवाश्यांना जागा रिकाम्या करण्याच्या नोटीसा उपरोक्त कायद्याचे कलम २६८ (बी) व (सी) अन्वये देण्यात येतात त्याप्रमाणे रहिवाश्यांनी जागा खाली केल्यानंतर धोकादायक इमारतींचे धोकादायक बांधकाम उत्तरवून घेतले जाते.

*********

लक्षवेधी सूचना क्र.१५८४

महाराष्ट्र विधानसभा

**श्री. किसन कथोरे, श्री. महेश चौघुले, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१५८४ पुढीलप्रमाणे आहे :-**

"कल्याण येथील मौजे चिकणघर शांतिदूत को.ऑप.सो.ली., या संस्थेचा पुनर्विकास प्रकल्प मे.टायकून्स अवंती प्रोजेक्ट एल.एल.पी. तर्फे भागीदार श्री.श्रीकांत दिगंबर शितोळे, चेतन विद्याधर सराफ, नूतन जाधव, विवेक जाधव या विकासकाने सन २०११ मध्ये प्रकल्प हाती घेतलेला असणे, विकासकाने सभादांच्या सदनिका ताब्यात घेऊन सभासदांना काही दिवस भाडे देणे परंतु नंतर भाडे देण्याचे बंद केले असणे, संस्थेच्या मिळकती ताब्यात घेण्यासाठी विकासकाने संस्थेचे पदाधिकारी व KDMC अधिकारी यांना हाताशी धरून ठरवून सदरच्या इमारती धोकादायक असल्याचे महानगर पालिकेकडून घोषित करण्यात येणे, विकासक विरुद्ध संस्थेच्या कार्यकारिणीने उपनिबंधक म्हाडा, व म्हाडा प्राधिकरणाकडे तक्रारी केल्यामुळे विकासकाने त्याच्या मर्जीतील अधिकार्यांना हाताशी धरून संस्थेच्या सध्याच्या कार्यकारिणी विरुद्ध विकासक व माजी सचिव यांनी तक्रार केली असणे, सदरच्या तक्रारीची दखल घेऊन उपनिबंधक यांनी तावडतोब संस्थेस नोटीस देऊन नवीन कार्यकारिणी बरखास्त केली असणे, तसेच संस्थेचे सभासद दिलीप प्रल्हाद आफ्रे व इतर पाच यांनी विकासक व माजी कार्यकारिणी यांचे विरुद्ध केलेल्या तक्रारीची उपनिबंधक यांनी दाखल न घेता श्री.अभिजीत देशपांडे हे त्यांचे अधिकारांचा गैरवापर करून ते त्यांच्या वैयक्तिक फायद्यासाठी संस्थेचे व संस्थेच्या सभासदांचे नुकसान करत असल्याचे आढळून येणे, याबबत शासनाकडून करावयाची कारवाई व ठोस उपाययोजना"

मा.उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

चिकणघर कल्याण येथील वसाहतीमधील एल.आय.जी.-२, एम.आय.जी-१ व एम.आय.जी.-२ या तीन गृहसमुहांमध्ये १२ संस्थांच्या एकूण ७१२ सदनिका आहेत. त्यापैकी एक संस्था ही चिकणघर शांतिदूत को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. (इमारत क्रमांक ४४ ते ४९) ही आहे. सदर संस्थेत एकूण १८४ सभासद आहेत. सदर संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९ (१) अन्वये सन २००५-२००६ मध्ये नोंदविण्यात आलेली आहे. उक्त सर्व १२ संस्थानी त्यांच्या इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी मे.टायकून अवंती प्रोजेक्ट एल.एल.पी. यांची विकासक म्हणून नियुक्ती केली असून प्रत्येक संस्थेने स्वतंत्र विकास करारनामा केला आहे. त्यानुसार, चिकणघर शांतिदूत को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. या संस्थेने विकासकासोबत दि.१२.०८.२०१४ रोजी विकासकरारनामा केला आहे.

सदर प्रकल्पाच्या पुनर्विकासास विलंब होत असल्याने तसेच विकासकाने वेळेवर भाडे न दिल्यामुळे चिकणघर शांतीदूत को.ऑप.हौ.सो.लि. या संस्थेकडून तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. याबाबत चिकणघर शांतीदूत संस्था व विकासक यांचे समवेत कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

या कार्यालयात झालेल्या बैठकीमध्ये विकासकाने सादर केलेल्या कागदपत्रांनुसार सन २०१३ ते सन २०२१ पर्यंत रहिवाश्यांना भाडे दिल्याचे म्हाडा प्राधिकरणाने कळविले आहे.

सदर इमारती ह्या सन १९८३-८४ मध्ये बांधण्यात आलेल्या असून, सदर इमारती सखल भागात असल्यामुळे पाणी सतत इमारतीमध्ये जाऊन कमकुवत झाल्या आहेत. तसेच इमारतींचे तळमजल्याचे छताचे कॉंक्रीट व प्लास्टर ठिकठिकाणी ढासळून पडले होते. त्यामुळे इमारतींचा संपुर्ण भाग मोडकळीस आलेला असल्याने, सदरची इमारती केव्हाही पडण्याचा धोका निर्माण होऊ शकतो म्हणून, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २६८ (१) (क) (२) व (३) अन्वये दि.०२.०८.२०१२ रोजी विहित कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करून इमारती धोकादायक असल्याचे घोषित केले होते.

चिकणघर शांतीदूत को.ऑप.हौ.सो.लि. संस्थेतील सभासद श्री.शिवाजी बळीराम बागवे यांनी संस्थेमध्ये सुरू असलेल्या अनागोंदी कारभाराबाबत उपनिबंधक,सहकारी संस्था,मुंबई शहर, पुर्व उपनगरे व कोंकण मंडळ, म्हाडा यांचेकडे दि.०४.१२.२०२४ रोजी तक्रार केली होती. सदर तक्रारीमध्ये संस्थेची पंचवार्षिक निवडणूक दि.२६.११.२०२३ रोजी होऊन नविन कमिटीने संस्थेचा कारभार हाती घेतला. परंतु संस्थेचे सर्व व्यवहार उपविधीनुसार होत नसल्याचे तसेच, संस्थेने विकासकावर कार्यवाही करण्याकरिता साखळी उपोषण सुरु करून त्यावर अंदाजे रु.१ लाख खर्च केला असल्याचे व इतर अनेक मुदयांबाबत तक्रार केली होती.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने, उपनिबंधक,सहकारी संस्था,मुंबई शहर, पुर्व उपनगरे व कोंकण मंडळ, म्हाडा यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९ (अ) अन्वये तपासणी करणेकरिता दि.२७.१२.२०२४ रोजीच्या आदेशान्वये तपासणी अधिकारी यांची नियुक्ती केली होती. त्यानुषंगाने तपासणी अधिकारी यांनी चिकणघर शांतीदूत को.ऑप.हौ.सो.लि., या संस्थेची तपासणी करून दि.१५.०१.२०२५ रोजी उपनिबंधक,सहकारी संस्था,मुंबई शहर, पुर्व उपनगरे व कोंकण मंडळ, म्हाडा यांनी तपासणी अहवाल सादर केला आहे. सदर तपासणी अहवालामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता दिसून आली. त्यामुळे, उपनिबंधक,सहकारी संस्था,मुंबई शहर, पुर्व उपनगरे व कोंकण मंडळ, म्हाडाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ (५) अन्वये संस्थेस सुनावणीची नोटीस निर्गमित करून सुनावण्या आयोजित करण्यात आल्या होत्या. संस्थेची तपासणी व सुनावणी झाल्यानंतर तसेच, सर्वांना त्यांचे म्हणणे मांडण्याची पुरेशी संधी उपलब्ध करुन दिल्यानंतर तसेच दिनांक ०७.०४.२०२५ रोजीच्या ५३ सभासदांपैकी ३१ सभासदांच्या स्वाक्षरीने संस्थेच्या नविन कार्यकारणी विरुध्द दिलेले लेखी म्हणणे, या सर्व बाबींचा विचार करून उपनिबंधक,सहकारी संस्था,मुंबई शहर, पुर्व उपनगरे व कोंकण मंडळ, म्हाडा यांनी दिनांक ०२.०६.२०२५ रोजीच्या आदेशान्वये, संस्थेच्या विद्यमान समिती सदस्यांना पुढील पाच वर्षाच्या कालावधीसाठी संस्थेच्या पदावर राहण्यास अपात्र घोषित करून, त्यांना आदेशाच्या तारखेपासून संस्थेच्या पुढील पाच वर्षासाठी होणाऱ्या निवडणुकीत भाग घेण्यास, स्विकृत होण्यास अपात्र करण्यात आले आहे.

उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई शहर, पूर्व उपनगरे व कोकण मंडळ म्हाडा यांच्या दि.०२.०६.२०२५ रोजीच्या आदेशाविरूध्द चिकणघर शांतीदूत को.ऑप.हौ.सो.लि.संस्थेने सहनिबंधक, सहकारी संस्था, झोपुप्रा, बृहन्मुंबई यांच्याकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,

१९६० चे कलम १५४ अन्वये पुनरिक्षण अर्ज दाखल केला होता. त्यानुसार, सहनिबंधक, सहकारी संस्था, झोपुप्रा, बृहन्मुंबई यांनी सुनावणी घेऊन दि.०२.०७.२०२५ रोजी अंतरीम आदेश पारित केले असून, सदर आदेशान्वये चिकणघर शांतीदूत को.ऑप.हौ.सो.लि. संस्थेने केलेला स्थगिती अर्ज मान्य केला आहे. सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि.२२.०८.२०२५ रोजी ठेवण्यात आली आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही होत आहे.

********

# महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन लक्षवेधी सूचना क्र.१९८२

**श्री. रवी राणा, श्री. विजयबापू शिवतारे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १९८२ पुढीलप्रमाणे आहे :-**

"न.भु.क्र. ७६४३/१, ७६४३/२ पार्ट, ७६४३/३ पार्ट, ७७१६ पार्ट व ४२०७ पार्ट भारतनगर बांद्रे पुर्व मुंबई या भुखंडावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर एसआरए को-ऑप.हो.सो चा पुर्नविकास एसआरए प्राधिकरण व मे. फॉरमोस्ट रिअलटर्स प्रा. लि. विकासकाकडुन होत असताना पर्यावरण विभाग मिठी नदी प्राधिकरण, भूमी अभिलेख, जिल्हाधिकारी, एमएमआरडीए, एसआरएच्या परिपत्रकांचे उल्लंघन करून मुंबई महानगरपालिकेची म्हाडाची NOC व परवानगी न घेताच सेरेंडिपीटी या विक्री इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र दिल्याचे निर्दशनास येणे, पर्यावरणप्रेमी अॅड.

राजेश दाभोळकर यांच्या तक्रारीची दखल न घेताच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने मे. फॉरमोस्ट रिल्टर्स या विकासकास Consent to Operate ची परवानगी देणे, पर्यावरण विभागाची १८ मजल्यापर्यंतची परवानगी असताना २० मजल्यांपर्यंत Consent to Operate ची परवानगी व भोगवटा प्रमाणपत्र देऊन पर्यावरण कायद्यांचे उल्लंघन झाले असणे, विक्री इमारतीचे बांधकाम वाकोला नाल्यावर झालेले असणे ८०० चौ.मी. चे मनोरंजन मैदानाचे आरक्षण महानगरपालिकेस हस्तांतरीत न करणे एमएमआरडीएचा ५३७ चौ.मी.चा भुखंड भाडेकरार संपलेला असताना त्याचा विकासकाकडून अनधिकृत वापर सुरु असणे उपरोक्त सोसायटीचा पुर्नविकास आधी दिवाण हौसिंग तदनंतर ओंकार रिअल्टर्स व नंतर खोट्या कागदपत्रांच्या आधारे तयार करण्यात आलेली मे. फॉर्मोस्ट रिअल्टर्स या विकासकामार्फत करताना स्थानिक झोपडपट्टीधारकांचे संमीतपत्र न घेताच पुर्नविकास सुरु ठेवणे शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया."

---

## मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

न.भु.क्र. ७६४३/१, ७६४३/२ पार्ट, ७६४३/३ पार्ट, ७७१६ पार्ट व ४२०७ पार्ट भारतनगर बांद्रे पूर्व मुंबई या भुखंडावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर एसआरए को.ऑप.हौ.सोसायटी या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे काम विकासक मे फॉरमोस्ट रिअलटर्स प्रा. लि. यांच्या मार्फत करण्यात येत आहे. सदर योजनेस दि. ३०/१०/२०१०, ०८/१०/२०१२, २५/०६/२०१४, २५/१०/२०१६, ०३/०३/२०१७ व दि.०१/१०/२०१८ रोजी आशयपत्र पारीत करण्यात आले आहे.

सदर योजनेतील भुखंड म्हाडा व एमएमआरडीए यांच्या मालकीचा असून विकास नियंत्रण नियमावली मधील कलम ३३(१०) मधील खंड २.८ अंतर्गत जमिन मालकाची ना-हरकत परवानगी प्राप्त करणे करीता संबंधित प्राधिकरणास आशयपत्राची प्रत पाठवून कळविण्यात आले होते. परंतु

संबंधित प्राधिकरणाकडून विहीत मुदतीत ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त न झाल्याने विकास नियंत्रण नियमावलीतील नियमानुसार Deemed NOC ग्राह्य धरुन सदर योजनेस पुढील परवानग्या पारीत करण्यात आलेल्या आहेत.

सदर योजना ही वाकोला नाल्यापासून दुर वसलेली असून योजनेतील विक्री घटक इमारत व वाकोला नाला यामध्ये एमएमआरडीए यांनी मंजूर केलेला २४.०० मी. रुंदीचा रस्ता व इतर झोपडपट्टी असल्याने विक्री घटक इमारत वाकोला नाल्याने बाधित होत नाही. तथापि, योजनेत एक ३.३ मी. ते ६.२४ मी. रुंदीचा नाला समाविष्ट असुन सदर नाल्याबाबत विकासकाने Dy.Che (SWD) Planning Cell चे अभिप्राय घेतले आहेत आणि सदर अभिप्रायाच्या अनुषंगाने जागेवर नाल्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

योजनेतील भुखंड विकास नियोजन आराखडा १९९१ नुसार कोणत्याही मनोरंजन मैदानाकरीता आरक्षित नाही. एमएमआरडीएच्या मालकीचा ५३७ चौ.मी.चा सदर भुखंड हा विषयांकित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा भाग नाही. तथापि, सदर भूखंड हा झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत बांधकामाचे साहित्य ने-आण करण्याकरीता विकासकाने एमएमआरडीए कडून भाडेकरारावर घेतलेला आहे. सदर भाडेकराराची मुदत जून २०२५ रोजी संपलेली असून पुढील मुदतवाढीसाठी विकासकाने एमएमआरडीएकडे प्रस्ताव सादर केला आहे.

सदर योजनेकरीता पर्यावरण विभागाची ना-हरकत दि. ०३/१२/२०१६ रोजी प्राप्त असून सदर ना हरकत प्रमाणपत्रामध्ये विक्री इमारत ०४ बेसमेंट + तळ मजला + १ ते २० मजल्यांपर्यंत प्रस्तावित असून सदर परवानगी नुसार विकासकामार्फत जागेवर बांधकाम करण्यात आलेले आहे. तसेच विकासकाने विहित बाबींची पुर्तता केल्यानंतर विकासकास विक्री घटक इमारतीकरीता ०४ बेसमेंट + तळ मजला + १ ते २० (पैकी) मजल्यांकरीता अंशतः भोगवटा प्रमाणपत्र (Part OCC) देण्यात आलेले आहे. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने फॉरमोस्ट रिअलटर्स प्रा. लि. या विकासकास Consent to Operate ची परवानगी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिलेली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर एसआरए को.ऑप.हौ.सो. चा पुर्नविकास सुरु झाल्यापासून योजनेचे विकासक म्हणून मे. फॉरमोस्ट रिअलटर्स प्रा. लि. हे असून त्यांच्याच नावे आवश्यक त्या परवानग्या देण्यात आलेल्या आहेत. सदर योजनेकरीता सक्षम प्राधिकारी यांनी पारीत केलेल्या परिशिष्ट-२ नुसार योजनेच्या पुर्नविकासाकरीता ८२.३५% झोपडीधारकांची संमती प्राप्त आहे. त्यामुळे पुर्नविकास सुरु ठेवण्यासाठी झोपडीधारकांचे पुनश्चः संमतीपत्र घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

********

लक्षवेधी सूचना क्रमांक २००५

महाराष्ट्र विधानसभा सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री.उत्तमराव जानकर, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम -१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे :-

"मुंबईतील म्हाडाच्या मुंबई दुरुस्ती व पुनर्रचना मंडळांच्या गाळे वितरण विभागाने म्हाडाच्या संकेतस्थळावर दि. २७-१२-२०२३ रोजी जाहिर झालेल्या २६५ जणाच्या बृहतसुची यादी मध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता, गैरव्यवहार झाल्याचा धक्कादायक प्रकार दि. १७-०६-२०२५ रोजी निदर्शनास येणे, बृहतसुचीच्या पात्र यादीमध्ये ५२ जणांचे मुळ क्षेत्रफळ उपलब्ध नसणे, २२ जणांचे आधार व मोबाईल नंबर नसणे, तसेच उपलब्ध आधार व मोबाईल नंबरमध्ये तफावत असुन १० हुन अधिक नावासमोर एजंटचा नंबर असणे, २०१८ मध्ये अपात्र असलेले लाभार्थी यांना २०२३ मध्ये पात्र करुन त्यांना ३०० चौ. फुटाचा गाळा बेकायदा वितरीत करण्यात येणे, म्हाडाच्या संकेतस्थळावरील यादीमध्ये म्हाडाच्या अधिकारी यांनी एंजटचे नंबर नमुद केल्याचा धक्कादायक प्रकार उघड होणे, अनेक अर्जदार आधी झालेल्या मुलाखतीत अपात्र असताना त्यांना २०२२-२३ मध्ये बनावट कागदपत्रे बनवुन पात्र करुन त्यांना बेकायदा गाळ्याचे वितरण करणे, अर्जदारास मुळ क्षेत्रफळ माहित नसतानाही त्यांस गाळा देण्यात येणे, सामान्य माणसाला जागा न देता फक्त एजंटमार्फत रहिवांशानाच म्हाडाकडून गाळा देण्यात येणे, सदर बृहतसुची यादीमध्ये मोठ्या प्रमाणात अपात्र लोकांना गाळे वितरणामध्ये म्हाडा अधिकारी, एजंट यांचे संगनमताने गाळेधारकाकडुन लाखो रुपये घेऊन गाळे वितरण करुन कोट्यावधी रुपयाचा आर्थिक भ्रष्टाचार करण्यात येणे, सदर प्रकरणाची शासनाने उच्च स्तरावरुन एसआयटी चौकशी करुन दोषी विरुद्ध कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.

---

## मा.उपमख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री यांचे निवेदन

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील उपकर प्राप्त इमारतीमधील ज्या भाडेकरु / रहिवाशी यांना निष्कासन सूचना (व्हेकेशन नोटीस) देऊन इमारत खाली करण्यात आलेली आहे व त्यांच्या मूळ इमारतीचा अरुंद भूखंड,आरक्षण, रस्ता रुंदीकरण इत्यादी कारणामुळे पुनर्विकास शक्य नाही. तसेच उपकरप्राप्त इमारती पुनर्रचित झालेल्या आहेत, परंतु कमी गाळे बांधले गेले आहेत अशा वंचित मुळ भाडेकरु / रहिवाशी यांना यापूर्वी मंडळाद्वारे पुनर्रचित / पुनर्विकसित इमारतीमध्ये कायमस्वरुपी गाळा देण्यात आलेला नाही व त्यांचे वारसदार संक्रमण शिबीर अथवा स्वत:च अधिवास धारण करीत आहेत, अशा मूळ भाडेकरु / रहिवाशी अथवा त्यांचे वारसदार याच्याकडून जाहिरातीद्वारे अर्ज मागविण्यात येतात. बृहतसुची समितीसमोर सुनावणी घेऊन पात्र ठरलेल्या मुळ भाडेकरु / रहिवाशी यांना गाळे वितरण करण्यात येते. ज्या प्रकरणामध्ये भाडेकरु/रहिवाशी यांना बृहतसूचीसमितीद्वारे अपात्र घोषित करण्यात येते. त्या भाडेकरु/रहिवाशी यांना नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार प्रथम अपील व द्वितीय अपीलाची संधी देण्यात येते व प्रकरणातील गुणवत्तेनुसार अपील स्तरावर पात्रता निश्चित करण्यात येते.

बृहतसूचीवरुन गाळे वितरण करण्याकरीता अर्ज मागविण्यासाठी संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आली. सदर प्रणालीद्वारे जून २०१९ पासून ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकरण्यात येत आहे. सदर अर्ज करतेवेळी अर्जदार यांना स्वंतत्र ओळख क्रमांक (Login ID) व पासवर्ड बंधनकारक असते. तसेच नोंदणी करतेवेळी आधार कार्ड व मोबाईल क्रमांक नोंदणी करणे ही सर्वस्वी अर्जदार यांच्या अखत्यारीतीतील बाब आहे. अर्जदारामार्फत लॉगीन आयडी व पासवर्ड

च्या माध्यमातून उक्त संकेतस्थळावर अर्ज दाखल केल्यानंतर सदर अर्जामधील माहितीमध्ये म्हाडा अथवा इतर त्रयस्थ व्यक्तीला हस्तक्षेप/बदल (Edit) करता येत नाही. ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यापूर्वी सन २०१३ व सन २०१७ मध्ये जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात आले होते. सदर जाहिरातीमधील काही पात्र अर्जदारांनी त्यांचे आधार क्र. व मोबाईल नं. अर्जामध्ये नोंदविले नसल्याचे निर्दशनास आले आहे. तथापि, बृहतसूचीसमिती समोरील सुनावणीच्या वेळेस उपकरप्राप्त इमारतीच्या संबंधीत मूळ भाडेकरु/रहिवाशी अथवा त्यांचे वारसदार यांचे आधारकार्ड व पॅन कार्ड तपासणी करण्यात येऊन त्यांना प्रत्यक्ष सुनावणीस हजर राहण्याची परवानगी देण्यात येते व सुनावणी पार पाडण्यात येते. बृहतसूचीसाठी अर्ज करण्यापासून ते बृहतसूचीवरुन गाळा वितरण करेपर्यंत प्रत्येक टप्प्यावर भाडेकरु/रहिवाशी व त्यांचे वारसदार यांची ओळखपत्र पडताळणी करण्यात येते.

सन २०२२ पर्यंत पात्रता निश्चित झाल्यानंतर पात्र भाडेकरु/रहिवाशी यांची यादी म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येऊन हरकती व आक्षेप मागविण्यात येत होते. हरकती व आक्षेप प्राप्त न झाल्यास भाडेकरु/रहिवाशी यांना त्यांच्या मागणीप्रमाणे उपलब्ध गाळयांचे ऑफलाईन पध्दतीने वितरण करण्यात येत होते. वितरण प्रक्रियेतील मानवी हस्तक्षेप व त्रुटी निवारण करण्याच्या हेतूने प्राधिकरणाकडून धोरणात्मक निर्णय घेण्यात येऊन दि.२२.१२.२०२३ रोजीच्या परिपत्रकाद्वारे संगणकीय सोडतीद्वारे बृहतसूचीवरील गाळयांचे वितरण करण्याची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली. तसेच बृहतसूचीवरुन सदनिका वितरीत करण्याबाबत क्षेत्रफळाचे निकष निश्चित करण्यात आले. संगणकीय सोडत (Lottery)व क्षेत्रफळाचे निकष या निर्णयामुळे वितरणाची कार्यपध्दती मानवी हस्तक्षेप विरहित करण्यात आली आहे.

सन २०१३ ते सन २०२२ या कालावधीमध्ये पात्र करण्यात आलेल्या परंतु सदनिका वितरणासाठी प्रलंबित असलेल्या २६५ पात्र भाडेकरु/रहिवाशी यांना संगणकीय सोडतीद्वारे पारदर्शक पध्दतीने सदनिका वितरण करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार २६५ पात्र भाडेकरु/रहिवाशी यांची यादी दि.२७.१२.२०२३ रोजी म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. सदर यादीमधील ज्या भाडेकरु/रहिवाशी यांचे उपकरप्राप्त इमारतीच्या मूळ सदनिकेचे क्षेत्रफळ, निष्कासन सूचना, भाडेकरु/रहिवाशी यादी अथवा कार्यालयीन अभिलेखामध्ये नमूद नाही अशा भाडेकरु/रहिवाशी यांचे उपकरप्राप्त इमारतीच्या सदनिकेचे क्षेत्रफळ ३०० चौ.फुटापेक्षा कमी असल्याचे गृहित धरण्यात आले व विकास नियंत्रण नियमावली व म्हाड अधिनियम १९७६ मधील तरतूदीनुसार कमीत कमी पुनर्वसन क्षेत्र . ३०० चौ.फुट अनुज्ञेय (Minimum Rehabiliation Area) असल्यामुळे त्यांना ३०० चौ.फुटाचे सदनिका वितरण करण्यात आले. तसेच उर्वरित पात्र भाडेकरु/रहिवाशी यांना त्यांच्या उपकरप्राप्त इमारतीच्या सदनिकेचा क्षेत्रफळानुसार ३०१ ते ७५३ चौ.फुटापर्यंत अनुज्ञेय सदनिकेसाठी संगणकीय सोडत काढण्यात आली. प्रथमच संगणकीय सोडतीद्वारे सदनिका वितरणाचा निर्णय घेण्यात आल्यामुळे भाडेकरु/रहिवाशी यांच्याकडून प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने २६५ पात्र भाडेकरु/रहिवाशी यांचे पात्रतेबाबत संबंधित कार्यकारी अभियंता विभागामार्फत पुनश्च: पडताळणी करण्यात आली. फेरतपासणी अंती २६५ पैकी २१३ भाडेकरु/रहिवाशी हे पात्र असल्याचे निदर्शनास आले. सदर पात्र २१३ भाडेकरु/रहिवाशी यांच्यापैकी ८० पात्र भाडेकरु/रहिवाशी यांच्या कागदपत्रांची तपासणी करुन त्यांना प्रत्यक्ष सदनिकेचा ताबा देण्यात आला. उर्वरित १३३ पात्र भाडेकरु/रहिवाशी यांनी ताब्याकरीता आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न केल्यामुळे त्यांना अद्यापपर्यंत ताबा देण्यात आलेला नाही. उर्वरित ५२ प्रकरणांची पुनर्पडताळणी केली असता ४६ भाडेकरु/रहिवाशी यांना बृहतसूचीकरीता अपात्र घोषित करण्यात आले आहे. ३ भाडेकरु/रहिवाशी यांना पात्र करण्यात आले आहे. ३ भाडेकरु/रहिवाशी यांची फेरतपासणी प्रलंबित आहे. तथापी, अपात्र घोषित करण्यात आलेल्या ४६ भाडेकरु/रहिवाशी यांना प्रथम व द्वितीय अपीलाची संधी उपलब्ध आहे.

अद्यापपर्यंत कुठल्याही अपात्र भाडेकरु/रहिवाशी यांना कायमस्वरुपी सदनिकेचे वितरण करण्यात आलेले नाही. त्यामुळे बृहतसूची वितरणाबाबत कुठल्याही प्रकारची अनियमितता झाल्याचे निदर्शनास येत नाही.

********

लक्षवेधी सूचना क्रमांक २१६३

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. किशोर जोरगेवार, श्री.करण देवतळे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"म्हाडा अंतर्गत नवीन चंद्रपूर येथे बालाजी मंदिर ते मामिडवार यांच्या फार्म पर्यंत रस्ता बांधकामासाठी रुपये १,६६,१७,५४४/- इतका निधी मंजूर करुन काम पूर्ण करणे, सदर भागात कोणतीही ठोस नागरी वस्ती नसणे, सदर ठिकाणी उत्तम डांबरी रस्ता असतानाही त्यावर पुन्हा काँक्रिट रस्ता करण्यात येणे, शासनाच्या निधी ज्या भागात लोकवस्ती आहे अशा ठिकाणी न वापरता लोकवस्ती नसलेल्या ठिकाणी कामे करण्यासाठी वापरणे, एका गर्भश्रीमंत व्यक्तीच्या फार्म हाऊसला जोडण्याच्या फायदेशीर हेतूने हा निधी मंजूर करणे, सदर रस्ता ग्रामपंचायत दाताळा अंतर्गत पांदन रस्ता असताना सदर ग्रामपंचायतीचे नाहरकत प्रमाणपत्र व कुठलीही परवानगी न घेणे, सदर ठिकाणी याच पांदन रस्त्यावर विशिष्ट व्यक्तीकडून फार्म हाऊससाठी अतिक्रमण करण्यात येणे, त्यामुळे पांदन रस्त्याची रुंदी कमी होणे, प्रत्यक्ष म्हाडा वसाहतीच्या अंतर्गत DP रस्ते अत्यंत खराब अवस्थेत असून तेथे अपघातांची संख्या वाढत असणे,या परिसरात स्थानिक नागरिक व ग्रामपंचायतीकडून वेळोवेळी तक्रारी करण्यात आल्या असूनही आवश्यक निधी व कामांना प्राधान्य देण्यात न येणे, सदर प्रकरणी ग्रामपंचायत दाताळा तर्फे दिनांक ७ ऑगस्ट, २०२४ च्या तक्रारीची दखल न घेणे, चुकीच्या पध्दतीने निधी मंजूर करणाऱ्या व प्रशासकीय प्रक्रिया पार पाडणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा प्रतिक्रिया."

---

### मा. उपमुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ४० अन्वये मौजा कोसारा (पूर्ण), दाताळा (पूर्ण), खुटाळा (भाग) व पडोली (भाग) मधील एकूण क्षेत्र १३९१.७१ हेक्टर आर.क्षेत्र नवीन चंद्रपूर म्हणून अधिसूचित करण्यात आले असून, या अधिसूचित क्षेत्राकरीता महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून दिनांक २९ डिसेंबर १९८८ रोजी नेमणूक केली आहे. नवीन चंद्रपूर प्रारुप विकास योजना दिनांक ०१ सप्टेंबर १९९८ पासून अंमलात आली आहे.

उपरोक्त प्रश्नाधिन रस्ता हा नवीन चंद्रपूर मौजा दाताळा येथील बालाजी मंदिर ते मामीडवार फार्म हा भाग जुने चंद्रपूर शहरालगतच असल्याने काही लोक शेतात घरे बांधून वास्तव्य करीत आहेत. तसेच सदर रस्त्याला लागून शेतजमिनी व मंगल कार्यालये (लॉन) सुध्दा असल्याने सदर भागातील शेतकरी व

लॉनधारकांनी मागणी केल्यानुसार त्याठिकाणी असलेला पांदन डांबरी रस्त्याची दुरावस्था झाली असल्याने मागणीप्रमाणे कॉंक्रीट रस्त्याचे काम हाती घेण्यात आले आहे. नवीन चंद्रपूर अधिसूचित क्षेत्रातील मौजा दाताळा येथील बालाजी मंदिर ते मामीडवार फार्म पर्यंत १०९० मीटर लांबीचा सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकामाची रुपये १,६६,१७,५४४/- इतकी रक्कमेची निविदा ऑनलाईन पद्धतीने प्रक्रिया पूर्ण करण्यात येऊन उक्त रस्त्याचे बांधकाम सुरु करण्यात आले असून सदर बांधकाम जवळपास ८० टक्के भौतिकरित्या पूर्ण झाले आहे. तसेच प्रत्यक्ष उपलब्ध असलेल्या विद्यमान रस्त्यावरच सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करण्यात आला आहे. पांदन रस्त्याची रुंदी ही इतर रस्त्यांप्रमाणे निश्चित राहत नाही व पांदन रस्त्यावर अतिक्रमण असल्यास सदर अतिक्रमण काढण्याचे अधिकार महसूल विभागाचे आहेत.

त्याचप्रमाणे अधिसूचित क्षेत्रातील मागणीप्रमाणे म्हाडा वसाहतीमध्ये साईट क्र.११४ मधील १२ मीटर रुंद ८०० मीटर लांबीचे सिमेंट कॉंक्रीट मुख्य रस्त्याचे बांधकाम व ICMR यांच्यामार्फत प्राप्त मागणीनुसार ICMR स्क्वेअर ते घुग्गुस रोड पर्यंत या रोडचे दुरुस्तीचे काम करण्यात आले आहे. ग्रामपंचायत दाताळा यांचे दिनांक ०७ ऑगस्ट, २०२४ चे तक्रार पत्र व अधिसूचित क्षेत्रातील गृहनिर्माण संस्था व शाळा यांचेकडून विकास योजना रस्ते खराब झाले असल्याचे तक्रारी प्राप्त आहेत. सदर तक्रारींची दखल घेऊन संपूर्ण विकास योजना रस्ते सिमेंट कॉंक्रीटचे तयार करण्याचा व इतर संबंधित कामांचा रुपये १०७१.२९ कोटींचा प्रस्ताव विचाराधीन आहे. तर ग्रामपंचायत दाताळा यांचे दिनांक ०७ ऑगस्ट,२०२४ चे तक्रार पत्राची दखल घेऊन अधिसूचित क्षेत्रातील डी.पी. रस्त्यांचे विद्युतीकरणासहित सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्याकरिता रुपये १५०कोटी निधीचा प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव प्राधिकरणामार्फत शासनाकडे सादर करण्याचे प्राधिकरण स्तरावर विचाराधीन आहे.

नवीन चंद्रपूर अधिसूचित क्षेत्रात मौजा कोसारा (पूर्ण), दाताळा (पूर्ण), खुटाळा (भाग) व पडोली (भाग) ही चार गांवे समाविष्ट आहेत. या चार गावांकरिता विशेष नियोजन प्राधिकरण, चंद्रपूर म्हाडा हे नियोजन प्राधिकरण असल्याने कोणत्याही विकास कामाकरीता स्थानिक ग्रामपंचायतीकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नाही, असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी सरपंच, ग्रामपंचायत पडोली, दाताळा, खुटाळा व कोसारा यांना दिनांक ०५/०२/१९९३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

---

# महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन | लक्षवेधी सूचना क्र.२३६४

**श्री. रवी राणा, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २३६४ पुढीलप्रमाणे आहे :-**

"मुंबईतील सांताक्रुझ पश्चिम येथील साई दुर्गा को हौ. सो. एफ. पी.नं. ९४ ते १०३, १०६ (पार्ट) पी.एम. रोड खोतवाडी या जमिनीवर विविध आरक्षणे बगळून नियमबाह्यपणे मॉलचे बांधकाम करणे, एसआरए गहाण ठेवून खाजगी बँकेकडून कर्ज उचलून विकासक व वास्तुविशारद यांनी कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याने आर्थिक गुन्हे अन्वेषण चौकशी करणेबाबतची मागणी अजय देसाई,सामाजिक कार्यकर्ते यांनी शासनाकडे केलेली असणे,सदर एसआरए प्रकल्प राबविताना विकासकाने नियमबाह्यपणे आयआयसीआय बँकेकडून ८५ करोड रुपये व भिलवाडा फायनान्सकडून ३५ करोड कर्ज घेऊन एसआरए प्रकल्प गहाण ठेवणे, प्रकल्पातील १२.२०डी.पी. रस्त्याचे नगर रचना विभागातर्फे MRTP Act ३७(i)चे पालन न करता व मुळ डी.पी.२०३४ मध्ये कोणतेही रस्त्याचे फेरफार न करता नियमबाहयपणे रस्त्यावर मॉलचे बांधलेले असणे,३ विहिरी बुजविल्याप्रकरणी वास्तूविशारद व विकासकांस दिनांक १०.०६.२०१९ कारणे दाखवा नोटीस तसेच त्यांचेवर दिनांक ४/१२/२०१९ रोजी एफआयआरही नोंदविलेला असणे, विकासकांनी नियमबाह्यरित्या अनधिकृत कामे केल्याबाबत एसआरएने कोटयवधी रुपयांची दंडात्मक फी भरण्याबाबत दिनांक २१.०५.२०२१ रोजी विकासकास कळविलेले असणे,विविध आरक्षणे गिळंकृत करुन विकासकामार्फत कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी विकासकांवर, वास्तुविशारद जितेन पटेल,संबधित एसआरए उपप्रमुख अभियंता,डीपी अभियंता यांची आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागामार्फत चौकशी करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी केलेली मागणी,याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

सांताक्रुझ (प) येथील मौजे विलेपार्ले मधील न.भु.क्र.१६९५, १६९५/१ ते २, १६९६, १६९६/१ ते २३, १६९७, १६९७/१ ते ५, १६९८, १६९८/१ ते ६, १६९९, १६९९/१ ते ४, १७००, १७००/१ ते ६, १७०१, १७०१/१ ते १०, १७०२, १७०२/१ ते ९, १७०३, १७०३/१ ते ८, १७०४, १७०४/१ ते ८ आणि १७०७ (भाग), अंतिम भुखंड क्र.९४, ९५, ९६, ९७, ९८, ९९, १००, १०१, १०२, १०३, १०६ (भाग), टी.पी. एस. क्र.VI या मिळकतीवर साई दुर्गा सह. गृह, संस्था मर्या या गृहनिर्माण संस्थेचे वास्तुविशारद यांनी विकासक मे. संजय कंन्स्ट्रक्शन व फायनान्स् (आत्ताचे नाव-मे. ट्रान्स्कॉन आयकोनिका प्रा.लि.) यांच्या वतीने विकास नियंत्रण नियमावली १९९१ च्या नियम ३३ (१०) व नियम ३० अंतर्गत सादर केलेला प्रस्ताव दि.०४.०४.२००८ रोजी स्विकृत करण्यात आला आहे. सदर योजना अंशतः खाजगी व अंशतः बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर अस्तित्वात आहे. सदर योजनेत एकूण २५० झोपडीधारकांपैकी १६७ झोपडीधारक पात्र आहेत.

सदर योजनेस प्रथम आशयपत्र दि.१६.११.२०१० रोजी देण्यात आले आहे. सदर योजनेचे प्रथम आशयपत्र देताना झोपडपट्टी क्षेत्र (slum plot) ६६६६.८० चौ.मी. व झोपडपट्टी नसलेले क्षेत्र (non-slum plot) ६९२.९० चौ. मी. विचारात घेऊन योजनेस मंजूरी देण्यात आली होती. सन २०१८ मध्ये नविन विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ शासनाने मंजूर केली असुन, सदर नियमावलीनुसार पुनर्वसन घटकाच्या सदनिकेचे क्षेत्रफळ २६९ चौ. फुटावरून ३०० चौ. फुट करण्यात आल्याने विकासकाने पुनर्वसन घटकाच्या वाढीव क्षेत्रफळासहित सुधारीत आशयपत्र दि.२८.०६.२०२२ रोजी प्राप्त केले होते. सदर योजनेस विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमन २०३४ च्या नियम ३३(१०), ३० व ३३ (१९) अंतर्गत शेवटचे आशयपत्र दि.०९.११.२०२३ रोजी निर्गमित करण्यात आले आहे. सदरचे आशयपत्र देताना झोपडपट्टी क्षेत्र (slum plot) ७०८४.९५ चौ.मी. व नियमन ३० अंतर्गत झोपडपट्टी नसलेले क्षेत्र (non-slum plot) २७९.३० चौ.मी. व नियमन ३३ (१९) अंतर्गत झोपडपट्टी नसलेले क्षेत्र १६१८.२८ चौ.मी. विचारात घेण्यात आले आहे. सदर योजनेमध्ये धोबीघाटचे बांधिव आरक्षण आणि १२.२० मी. डी.पी. रोडचे मोकळा आरक्षण आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नगररचना खात्याच्या दि.२४.१०.२०१९ रोजीच्या अभिप्रायाचा विचार करता सदर योजनेखालील भूखंडापैकी १५८४.६० चौ.मी. इतका भूखंड धोबीघाट या आरक्षणाने बाधित होता. विकास नियंत्रण नियमावलीच्या अनुषंगाने नियम १(२), अधिनियम ३३(१०) मधील Appendix-IV उपनियम ७.५, तसेच नगर विकास विभागाच्या दि.१०.०५.२०१६ व दि.०८.०५.२०१८ रोजीचे नोटीफिकेशन यांचा विचार करता प्रस्तुत योजनेमध्ये एकूण ४६६.०२ चौ.मी. इतके क्षेत्रफळाचे बांधकाम धोबीघाटकरीता प्रस्ताविण्यात आले असून त्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. सदरच्या प्रस्तावित धोबीघाटास बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियोजन विभागाने दि.१६.०६.२०२१ रोजीच्या पत्रान्वये सहमती दर्शविली आहे. सबब, सदर योजनेमध्ये कोणतेही आरक्षण वगळण्यात आले नाही.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून विकासकास झोपडपट्टी पुनर्वसन योजनेकरिता कर्ज घेण्यासाठी कोणतेही ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत नाही.

सदरच्या योजनेखालील भूखंड हा प्रस्तावित १२.२० मीटर रुंदीच्या डी.पी. रस्त्याने बाधित होता. सदरच्या रस्त्याच्या alignment चा विचार करता, सदर रस्ता योजनेच्या मधोमध प्रस्तावित होता. तसेच सदरची योजना सांताक्रुझ विमानतळाच्या अगदी शेजारी असून त्यामुळे इमारतीच्या ऊंचीस मर्यादा असल्याने योजना राबविण्यास अडथळा होता. सबब विकासक/ वास्तुविशारद यांनी सदरचा प्रस्तावित रस्ता realign करण्याची विनंती केली होती. त्याअनुषंगाने विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील अधिनियम ११(४) मधील तरतूदीनुसार सदर रस्त्यास realign करण्यास मंजूरी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहमती सापेक्ष तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांनी सन २०१७ मध्ये आशयपत्र मंजूरीच्या वेळी दिली आहे. त्यानुसार प्रस्तावित रस्त्याची alignment वगळता बांधकामास परवानगी देण्यात आली असून त्यानुसार काम करण्यात आले आहे. प्रस्तावित realignment बाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने दि.०३.०९.२०१९ रोजीच्या पत्रान्वये सहमती दिली आहे व त्याअनुषंगाने पूर्वीच्या व प्रस्तावित realignment मुळे रस्त्याच्या क्षेत्रफळामध्ये होत असलेल्या बदलाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेस N.P.V रक्कम भरण्यास सांगितले आहे. दि.०६.१२.२०२१

रोजीच्या पत्रान्वये सदरची पूर्ण रक्कम विक्री घटकाच्या इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र देण्यापूर्वी भरण्याचे कळविले आहे. आज रोजी सदर योजनेतील कोणत्याही विक्री घटकास भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही.

विषयांकित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये एकूण ०३ विहीरी अंतर्भूत आहेत. किटक नियंत्रण अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दि.२५.११.२०१६ रोजीच्या पत्रान्वये सदरच्या विहीरी झाकणेकामी नाहरकत प्रमाणपत्र दिले होते. तद्नंतर विकासकामार्फत ०३ पैकी ०२ विहीरी बुजविण्यात आल्याच्या कारणामुळे किटक नियंत्रण अधिकारी, एच/प विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दि.१२.०३.२०१९ रोजीच्या पत्रान्वये विकासकावरती महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गत कार्यवाही करण्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास कळविले होते. त्यानुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत विकासका विरुध्द महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५३ अन्वये नोटीस बजावण्यात आली होती व तद्नंतर दि.०४.१२.२०१९ रोजी सांताक्रूझ पोलिस ठाणे येथे एफआयआर नोंदविण्यात आला होता. किटक नियंत्रण अधिकारी यांनी दि.१७.१२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास कळविले होते की, प्रथम दर्शनी विकासकाने विहीरी बुजवल्याचे दिसून आले होते. त्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गत कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली होती. तथापि, विकासकाने ०३ पैकी ०१ विहीर पूर्वस्थितीत आणली असून, त्यावरती आर.सी.सी. स्लॅब अच्छादीत करून मनपाच्या २५.११.२०१६ च्या पत्रानुसार आवश्यक पूरेसे opening ठेवले आहे. तसेच विकासकाने इतर ०२ विहीरी देखील अशाच प्रकारे पूर्व स्थितीत आणण्याचे शपथपत्र किटक नियंत्रण अधिकारी, एच/प विभाग बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालयात सादर केले. त्यानुसार किटक नियंत्रण अधिकारी, एच/प मनपा यांनी विकासकाविरुध्द बजावण्यात आलेली महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५३ अन्वयेची नोटीस मागे घेण्याची विनंती केली आहे.

विषयांकित योजनेतील संयुक्त इमारतीच्या दुस-या मजल्याच्या बांधकामास दि.२५.०८.२०२१ रोजी परवानगी देण्यात आली होती. तथापि, विकासकाने विनापरवानगी तिस-या मजल्यापर्यंतचे बांधकाम केले होते. सबब, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत दि.०४.११.२०२२ रोजी विकासकाविरूध्द महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५३ (१) अन्वये काम पूर्व स्थितीत आणने कामी नोटीस बजावली होती. तसेच, बांधकाम स्थगितीचे आदेश पारीत केले होते. विकासकाने काम पूर्व स्थितीत न आणल्यामुळे दि.१७.०५.२०२३ रोजी विकासकाविरूध्द सांताक्रुझ पोलिस ठाणे येथे एफआयआर नोंदविण्यात आला होता. तद्नंतर विकासकाने सन २०२३ मध्ये सुधारित आशयपत्र मागणी करीत असतांना सदरचे अनधिकृत बांधकाम नियमित करण्याचा प्रस्ताव सादर केला होता. त्यानुषंगाने प्रचलित धोरणानुसार रू.२,९८,७४,६००/- इतक्या रक्कमेचा दंड आकारून सदरचे बांधकाम नियमित करण्यास व विकासकास बजावण्यात आलेली नोटीस व एफआयआर मागे घेण्यास मंजूरी देण्यात आली आहे. विकासकाने सदर रक्कमेचा भरणा दि ०६.०३.२०२४ रोजी प्राधिकरणाकडे केला आहे.

********

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. २४६४

## लक्षवेधी सूचना

श्री.देवेंद्र कोठे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २४६४ पुढीलप्रमाणे आहे :-

"मुंबई शहरातील धारावी परिसरामध्ये मोठया प्रमाणात शासकीय जमिनीवर अतिक्रमण करुन अनधिकृत बांधकामे झालेली असणे, सदर परिसरात बांधकाम करण्यापूर्वी महानगरपालिकेची पूर्वपरवानगी आवश्यक असणे, धार्मिक स्थळांच्या बांधकामासाठी महानगरपालिकेसह महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक असणे, परंतु धारावी परिसरातील १) मदिना मस्जीद ब्लॉक नं. ११, ९० फिट रोड धारावी २) कदारिया मस्जीद, नाईक नगर, धारावी ३) महबूब सुहानी मस्जीद, धारावी ४) वाजबे राजा मुस्तफा मस्जीद, पीएमजी कॉलनी, धारावी या अनधिकृत धार्मिक स्थळांच्या निष्कासनाबाबत न्यायालयाचे आदेश असूनही प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नसणे तसेच १) सुन्नी शफिया घुशिया मस्जीद, धारावी २) मदरसा ओ मस्जीद अहले सुन्नत अल जमियातुल गौसिया, अब्दुल गफुर कंपाऊंड, धारावी या अनधिकृत धार्मिक स्थळांच्या बांधकामबाबत नागरिकांनी वारंवार तक्रार व पाठपुरावा करुनही महानगरपालिका प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, धारावी परिसरातील अनधिकृत धार्मिक स्थळांची यादी बनवून अशा अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यासाठी विशेष समिती गठीत करणे आवश्यक असणे, शासनाने कालबध्द मर्यादा ठरवून अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यासाठी मोहीम राबविणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या गतिमान अंमलबजावणीसाठी धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार सचिव समितीस प्रदान करण्यात आले आहेत. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली सचिव समितीची दि.२०/०८/२०२४ रोजीच्या बैठकीत, धारावी पुनर्विकास प्रकल्प क्षेत्रात सुमारे १००० विविध धर्माची धार्मिक स्थळे अस्तित्वात असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला. सदर संख्या मोठी असल्यामुळे, या विषयावर जलद गतीने निर्णय घेण्यासाठी एक समिती स्थापन करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. त्याअनुषंगाने, शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग दिनांक ०४/१०/२०२४ नुसार धारावी पुनर्विकास प्रकल्पामध्ये अनधिकृत धार्मिक स्थळे निष्कासित करणे, स्थलांतरीत करणे किंवा नियमित करण्याकरिता मा. अलाहाबाद उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायमूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.

धारावी परिसरातील १) मदिना मस्जीद ब्लॉक नं. ११, ९० फिट रोड धारावी २) कदारिया मस्जीद, नाईक नगर, धारावी ३) महबूब सुहानी मस्जीद, धारावी ४) मदरसा ओ मस्जीद अहले सुन्नत अल जमियातुल गौसिया, अब्दुल गफुर कंपाऊंड, धारावी या धार्मिक स्थळांबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या कार्यालयात तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग दिनांक ०४/१०/२०२४ नुसार स्थापित करण्यात आलेल्या समितीने धारावी अधिसूचीत क्षेत्रामधील धार्मिक स्थळांचे वर्गीकरण निश्चित करण्याचे कार्य सुरू केले असून, त्यानुसार धार्मिक स्थळे निष्कासित करणे, स्थलांतरीत करणे किंवा नियमित करणे यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे. आजमितीस, धारावी पुनर्विकास प्रकल्प क्षेत्रात प्राथमिक अहवालानुसार ४०२ धार्मिक स्थळे असून, त्यांना पात्रतेबाबत आवश्यक ती कागदपत्रे सादर करण्याच्या नोटिस देण्यात आलेल्या आहेत.

*********

नगर विकास विभाग
लक्षवेधी सूचना क्र.१४८

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**डॉ. नितिन राऊत, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१४८ पुढीलप्रमाणे आहे :-**

"नागपूर सुधार प्रन्यासच्या अखत्यारितील जरीपटका, स्नेहदीप कॉलनीतील झुलेलाल पार्कची दुरवस्था झाली असणे, शासनाच्या विशेष अनुदान आणि दलित वस्ती सुधार योजनेतून ३३ लाखांहून अधिक खर्च करुन उभारण्यात आलेल्या या उद्यानात असमाजिक तत्वांचा अड्डा झाला असणे, याठिकाणी अंमली पदार्थांच्या अधीन गेलेले अनेक युवक-युवती बसलेले असणे, सर्वत्र कचरा पसरलेला, तुटलेली खेळणी, मोडलेली बाके पडलेली आढळून येणे, तसेच माजी नगरसेवक यांनी उद्यानातील वॉकिंग ट्रॅक, ग्रीन जीम आणि इतर खेळण्यांची दुरवस्था झाली असल्याचे सांगितले असणे, या उद्यानाचा वापरन गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक करीत असल्याने उद्यानात चौकदार ठेवून बंदोबस्त करावा, अशी येथील नागरीकांची मागणी असणे, साफसफाईबाबत प्रशासनाला सांगण्यात येणे, परंतु याची कोणतीही दखल प्रशासनाने न घेणे, परिणामी येथील नागरीकांमध्ये पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने माहिती घेऊन येथील देखभाल दुरुस्ती करुन सुरक्षारक्षक तैनात करण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास) महोदयांचे निवेदन

मौजा मानकापूर खसरा क्र.४१,४२,४३ येथील नागपूर सुधार प्रन्यासच्या स्वमालकीच्या एकूण ६.१७ एकर मोकळया मैदानाचे समतलीकरण व विकास करण्यात येऊन सदर पार्क उभारण्यात आले आहे. सदर प्रकल्पामध्ये मैदानातील खोलगट भागाचे सपाटीकरण, सुरक्षा भिंत, बास्केटबॉल ग्राऊंड, टेनिस कोर्ट, हॉलिबॉल ग्राऊंड, जॉगिंग ट्रॅक व विद्युत व्यवस्था हिरवळ खेळणी अशा प्रकारची कामे करण्यात आली आहेत. तद्नंतरच्या कालावधीत तत्का. लोकप्रतिनिधी डॉ.मिलिंद माने (उत्तर नागपूर) यांनी सदर प्रकल्प जसा आहे त्या स्थितीत देखभाल व दैनदिन व्यवस्थापन कार्यान्वयासाठी जिल्हा क्रिडा अधिकारी यांना हस्तांतरित करण्याबाबत कळविले होते. त्यानुषंगाने नागपूर सुधार प्रन्यासच्या विश्वस्त मंडळाच्या ठराव क्र.१९/११७१ दि.०४ ऑगस्ट २०१७ अन्वये सदर पार्कच्या हस्तांतरणास मंजुरी प्रदान करण्यात आली व त्यानुसार दि.०९ जानेवारी २०१८ रोजीच्या करारनाम्यानुसार व दि.१६ जानेवारी २०१८ रोजीच्या ताबा पावतीनुसार सदर पार्क जसा आहे त्या स्थितीत देखभाल व दैनदिन व्यवस्थापन कार्यान्वयासाठी जिल्हा क्रिडा अधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा क्रिडा परिषद, नागपूर यांना हस्तांतरित करण्यात आला. सदर करारनाम्यातील अट क्र.५ नुसार ५ वर्षाच्या मुदतीनंतर मुदतवाढ न दिल्यास हा प्रकल्प जसा होता त्याच स्थितीत आवश्यक ती देखभाल/दुरुस्ती/ रंगरंगोटी इ. करुन नागपूर सुधार प्रन्यासला परत द्यावा लागेल.

तथापि, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा क्रिडा परिषद यांच्यामार्फत सदर पार्ककरिता २ वेळा निविदा प्रसिध्द करुनही निविदाकाराकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त झाला नसल्याने तसेच पार्कच्या देखभाल दुरुस्तीकरिता क्रीडा विभागाकडून निधी उभारता येणे शक्य नसल्याने व जिल्हा क्रीडा अधिकारी, नागपूर या कार्यालयाकडे मनुष्यबळाची कमतरता असल्यामुळे करारनामा रद्द करण्याबाबतचा ठराव जिल्हा क्रीडा परिषद, नागपूर च्या माहे डिसेंबर २०१८ च्या बैठकीत मंजूर करण्यात येऊन त्यानुसार दि.१९ मार्च २०१९ रोजी नागपूर सुधार प्रन्यासला कळविण्यात आले आहे.

पार्कमध्ये पुरेशी विद्युत व्यवस्था तसेच सुरक्षा रक्षक नसल्यामुळे गैरप्रकार होत असुन असामाजिक तत्वांचा वावर वाढलेला असून त्यामुळे आजुबाजुला राहणारे तसेच या मैदानात फिरायला येणा-या लोकांना असामाजिक तत्वांचा मोठ्या प्रमाणात त्रास होत असल्याबाबत नागपूर सुधार प्रन्यासकडे अनेक तक्रारी प्राप्त होत आहेत. त्यानुषंगाने सदर झुलेलाल पार्क येथे नागपूर सुधार प्रन्यास व्दारे विकसीत करण्यात आलेल्या क्रीडा सुविधांची, परीसराची, विद्युत दिव्यांची जिल्हा क्रीडा विभागातर्फे कोणतीही देखभाल व दुरूस्तीचे कामे करण्यात येत नसल्याने तसेच सुरक्षा रक्षकाची कोणतीही व्यवस्था केलेली नसल्याने व करारनामा रद्द करण्याबाबतचा ठराव एकतर्फी करण्यात आल्यामुळे नागपूर सुधार प्रन्यासमार्फत जिल्हा क्रीडा अधिकारी ,नागपूर यांना थकीत विद्युत देयकाचा भरणा करून व पार्कचा परीसर सुस्थितीत करून रीतसर ताबा नागपूर सुधार प्रन्यासला परत करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

************************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. मनोज जामसुतकर, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"नॅशनल टेक्सटाईल्स कॉर्पोरेशन लिमिटेड (एनटीसी) ही भारत सरकारची वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या (एमओटी) प्रशासकीय नियंत्रणाखालील एक उपक्रम असून एनटीसी मुंबई शहरातील अनेक गिरण्यांचे व्यवस्थापन करीत असणे, त्यापैकी टाटा मिल, कोहिनुर मिल, मुंबई टेक्सटाईल्स मिल, मुंबई टेक्सटाईल्स मिल, श्री. मधुसूदन मिल, दिग्विजय टेक्सटाईल्स मिल, जाम मिल, श्री. सीताराम मिल, इंडिया युनायटेड मिल नंबर १ व ३ या एकूण ९ गिरण्यांच्या ११ उपकरप्राप्त चाळी असणे, सदर चाळीमध्ये एकूण २,०६२ मराठी रहिवाशी गेली १०० वर्षे राहत असणे, या सर्व रहिवाशांचे/भूमिपुत्रांचे एनटीसीने नवीन विकास नियंत्रण प्रोत्साहन नियम, २०३४ (डीसीपीआर २०३४) कलम ३३(७) व ३३ (९) च्या तरतुदीनुसार तात्काळ पुनर्वसन करणे आवश्यक असणे, एनटीसीच्या जमिनीवरील पुनर्विकास योजनांची व्यवहार्यता तपासण्याकरिता म्हाडाच्या दुरुस्तीमंडळाने वास्तूविशारद श्री. बागवे यांची नियुक्ती करणे, त्यांनी एनटीसीच्या अधिकाऱ्यांची मार्च, २०२३ मध्ये संयुक्त बैठक घेणे, सदर बैठकीत एनटीसीची निर्मिती ही सन १९६९ पूर्वीची असल्याने एनटीसीच्या जमिनीचा पुनर्विकास "विकास नियंत्रण नियमावली २०३४ कलम ३५ अंतर्गत न करता तो ३३ (७) व ३३ (९) अंतर्गत करण्यात यावा असे महाराष्ट्र शासनास कळविणे, तसेच सदर चाळी ह्या १०० वर्ष जुन्या असून धोकादायक स्थितीत असणे, परिणामी सदर चाळींचा पुनर्विकास रखडलेला असणे, शासनाने उक्त प्रकरणी तातडीने निर्णयात्मक कार्यवाही करुन मुंबईतील एनटीसीच्या चाळींचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता."

---

मा. उपमुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या मुंबईतील ९ गिरण्यांच्या जागेवर ११ चाळी असुन त्यांचे क्षेत्रफळ १३.८४ एकर इतके आहे. त्यामध्ये सुमारे २०६६ रहिवासी वास्तव्यास आहेत.राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या ११ चाळींपैकी मुंबई टेक्सटाईल मिल, मारवाडी चौक (लोअर परेल) या मिलची संपुर्ण जागा नॅशनल टेक्सटाईल कॉर्पोरेशन (NTC) तर्फे पुनर्विकासाकरिता सन २००७ मध्ये दिलेली आहे. सदर जागेवर सद्यःस्थितीत ०१ उपकरप्राप्त इमारत आहे. सदरहू उर्वरित १० चाळींपैकी ६ चाळी (कोहीनुर मिल (नायगांव), दिग्विजय मिल (काळाचौकी), मुंबई टेक्सटाईल मिल (कवळी कंपाउंड लोअर परेल), मुंबई टेक्सटाईल मिल (पारकरवाडी माहीम), श्री. मधुसुदन मिल (लोअर परेल), जाम मिल (परेल) ) या उपकरप्राप्त इमारती आहेत. तसेच शासनाने दि.२१.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये

टाटा मिल्स, परळ, मुंबई, इंडिया युनायटेड मिल २ आणि ३, टी.बी. कदम मार्ग, माझगाव विभाग, काळाचौकी, मुंबई, श्री.सिताराम मिल्स, ना.म.जोशी मार्ग, मुंबई व इंडिया युनायटेड मिल १, परळ, मुंबई या उर्वरित ४ चाळींना म्हाड अधिनियम १९७६, कलम ८२(१) मधील तरतुदीनुसार "क" वर्गवारी उपकर दि.३१.०३.१९६१ पासून लावण्यात आला आहे.

राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या मालकीच्या जमिनीवरील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतीच्या पुर्नविकासासंदर्भात मा.केंद्रीय मंत्री (वस्त्र मंत्रालय) यांच्या अध्यक्षतेखाली दि.१५.०१.२०२३ रोजी म्हाडा व एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीमध्ये एनटीसीच्या मालकीच्या गिरण्याच्या जमिनी या कॉटन टेक्सटाईल्स मिल्सशी संबंधित नसून या मानव निर्मित फायबरशी संबंधित असल्याने या गिरण्याच्या जमिनीसाठी व त्यावरील इमारतीच्या पुनर्विकासासाठी विकास नियंत्रण नियमावली ३५ मधील तरतुद लागू न करता विकास नियंत्रण नियमावली ३३(७) मधील तरतुदी लागू करण्याकरिता नगर विकास विभागास एनटीसीने प्रस्ताव सादर करावा असे निर्देश मा.केंद्रीय मंत्री (वस्त्र मंत्रालय) यांनी दिले होते.

सदर निर्देशाच्या अनुषंगाने राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या मुंबईतील ९ गिरण्यांच्या जागेवरील ११ चाळींचा पुनर्विकास विकास नियंत्रण नियमावली विनियम ३५ किंवा विकास नियंत्रण नियमावली विनियम ३३ (७) व ३३(९) अंतर्गत करण्याबाबतचा प्रस्ताव नगर विकास विभागास पाठविण्यात आला आहे. याबाबत नगर विकास विभागामार्फत कार्यवाही सुरू आहे.

*****

## महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री.किसन कथोरे, वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.४७९ पुढीलप्रमाणे आहे:-

"कुळगाव बदलापूर नगर परिषदेच्या वतीने वार्षिक निविदा दर पत्रकाप्रमाणे ७५ लक्ष रुपयांची निविदा मंजूर केली असतांना सन २०२० ते २०२४ या कालावधीत सुमारे २० कोटी रुपयांची कामे केल्याचे दाखवून मोठा भ्रष्टाचार झालेला असणे, याबाबत निविदा प्रक्रिया संहिता तसेच लेखा संहिता व नगरपरिषद अधिनियमाचे उल्लंघन करून प्रत्यक्ष जागेवर कामे न करता गटार व्यवस्था, शाळा दुरुस्ती व इतर स्थापत्य कामे जागेवर प्रत्यक्ष न करता कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार प्रशासकीय राजवटीत कंत्राटदार, ठेकेदार व प्रशासनातील अधिकारी यांच्या संगनमताने झालेला असणे, याबाबत वार्षिक दर पत्रकाचा वापर करून सुमारे २० कोटी रकमेची कामे केल्याचे खोटे दाखवण्यात येऊन त्याची एमबी बुक मध्ये नोंद करून बांधकाम ठेकेदार अभियंते तसेच प्रशासकीय अधिकारी यांनी प्रशासकीय अधिकारांचा गैरवापर करून नगर परिषदेचे कोट्यावधी रुपये लाटलेला असणे, याबाबत कामाचे कार्यारंभ आदेश, प्रशासकीय ठराव, रेकॉर्ड केलेली बिले,अदा करण्यात आलेली बिले याबाबत लेखा परीक्षण अहवालात देखील ताशेरे ओढण्यात येणे, या सर्व कामांची सक्षम तांत्रिक व लेखा यंत्रणेमार्फत चौकशी करण्यासाठी एसआयटीची स्थापना करण्याची गरज व अत्यावश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची व करण्यात येणारी तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

### मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

कुळगांव बदलापुर नगरपरिषदेने सन २०१९ ते २०२२ या कालावधीत स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरीकांच्या मागणीनुसार रस्ते, गटार, इमारत, पुल दुरुस्ती तसेच रस्ते सुरक्षा संबंधी उपाययोजना व आवश्यकतेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसुचीत अंतर्भूत असलेल्या बाबीनुसार रस्ते, उद्यान, नाले आणि गटार इत्यादी कामांची वार्षिक देखभाल व दुरुस्तीची कामे करणेकामी वार्षिक दुरुस्तीसाठी दि.२६/०६/२०१९ रोजी निविदा प्रसिध्द केली होती.

नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे स्थायी निर्देश क्र.३६ मधील अ.क्र.१९ नुसार एकाच प्रकारचे काम वारंवार करावे लागल्यास सदर कामी बारंवार निविदा प्रक्रिया करावी लागते व त्यानंतर अभिकर्ते नेमणुकीअंती कामे करता येतात. त्यास बराच विलंब होत असल्याने स्थायी निर्देशातील अ.क्र.२० नुसार वारंवार कराव्या लागणा-या कामांसाठी एकापेक्षा जास्त अभिकर्ते नेमणुकीची तरतुद असल्याने वार्षिक दुरुस्तीच्या कामांकरीता मे.किरण एंटरप्राईजेस, मे.अथर्व एंटरप्राईजेस व मे.यत्ती एंटरप्राईजेस यांची २.१०% कमी दराची बाबनिहाय वार्षिक निविदा मंजुर करण्यात आली असुन दि.१६/०९/२०२० रोजी कार्यादेश देण्यात आले होते. सदर कामांकरीता नगरपरिषदेच्या अर्थसंकल्पात पुरेशी वित्तीय तरतुद करण्यात आली असून अभिकर्ते यांचेकडून आवश्यकतेनुसार विविध कामे करुन घेण्यात आली आहेत.

निविदा कालावधीत कोरोना-१९ चा प्रादुर्भाव झाल्याने विविध विकास कामांचे आवश्यकतेनुसार तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी, नागरीकांनी विविध कामे करुन मिळणेबाबत केलेल्या मागणीनुसार कामे तातडीने करुन घेण्यास अडचण निर्माण झाली होती. त्यामुळे नगरपरिषदेने दि.२२/०२/२०२१ रोजी प्रशासकीय ठराव करुन उक्त निविदेतील अभिकर्ते यांना दि.३१ मार्च, २०२१ पर्यंत अथवा नविन निविदा मंजुर होईपर्यंत मंजुर दरानुसार मुदतवाढ दिली. त्यानुसार विविध कामांचे कार्यादेश देऊन कामे पूर्ण करण्यात आली असून वापरण्यात आलेल्या बांधकाम साहीत्याची गुणवत्ता चाचणी करण्यात आली आहे.

उक्त कामाचे लेखापरीक्षण करण्यात आले असून मार्च, २०१९ ते आजतागायत झालेल्या विकास कामांमध्ये लेखापरीक्षण करतांना काही आक्षेपामध्ये वारंवारतेनुसार साहीत्य तपासणी केली नाही, विमा उशिरा काढण्यात आलेला आहे अशाप्रकारचे आक्षेप घेतलेले आहेत. याव्यतिरिक्त कोणत्याही गंभीर स्वरुपाचे आक्षेप घेण्यात आले नसून आक्षेपांची पुर्तता करण्याचे काम नगरपरिषदेच्या स्तरावर सुरु आहे.

******

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री.किसन कथोरे,वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.४८० पुढीलप्रमाणे आहे:-

"कुळगाव बदलापूर नगरपरिषदेच्या प्रशासकीय प्रमुखांनी प्रशासकीय राजवटीत आपल्या प्रशासकीय अधिकाराचा गैरवापर अमर्यादितपणे करून सन २०२० ते २०२५ या कालावधीत नगरपरिषद अधिनियमांचे पालन न करता व जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय मान्यता न घेता १० लक्ष रुपयांची २००० पेक्षा जास्त प्रशासकीय ठराव, स्थापत्य कामे, विद्युत कामे मंजूर करून नगर परिषदेच्या निधीतून २०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केलेला असणे, हीच कामे पुन्हा शासनाच्या वेगवेगळ्या योजनांमधून केल्याचे निदर्शनास येणे, नगरोत्थान, दलित वस्ती, वैशिष्ट्यपूर्ण योजना, रस्ते अनुदान व एम एम आर डी ए च्या बाह्य रस्ते विकास निधीतून दाखवून डुप्लिकेट कामे दाखवून दोन दोन वेळेला बिले काढून नगर परिषदेच्या व राज्य शासनाच्या करोडो रुपयांची लूट केलेली असणे, या सर्व कामांची सक्षम तांत्रिक व लेखा यंत्रणेमार्फत चौकशी करण्यासाठी एसआयटीची स्थापना करून सखोल चौकशी करण्याची गरज व अत्यावश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची व करण्यात येणारी तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

कुळगांव बदलापुर नगरपरिषद हद्दीत सन २०२० ते २०२४ या कालावधीत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान, वैशिष्ट्यपुर्ण योजना, एम.एम.आर.डी.ए. च्या बाह्य रस्ते विकास, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना, रस्ते विकास योजना अशा विविध योजनांमधून स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरीकांनी विविध विकास कामे करुन मिळणेबाबत मागणी केली होती. त्यानुसार कामांची स्थळ पाहणी करण्यात आली. कामांची निकड व अधिनियमातील तरतुदीनुसार नगरपरिषदेचे तांत्रिक सल्लागार यांचेमार्फत अंदाजपत्रके/ नकाशे तयार करुन त्यास सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक/प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा प्रक्रिया राबवून कामांचे कार्यादेश देण्यात आले. ज्या कामांना जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय मंजुरी घेणे आवश्यक होते, अशा कामांना प्रशासकीय मंजुरी घेऊन कामे करण्यात आली आहेत.

कार्यादेश दिलेली कामे पूर्ण झाली असून सदर कामांकरीता वापरण्यात आलेल्या बांधकाम साहित्याची गुणवत्ता चाचणी देखील करण्यात आली आहे. रु.२५ लक्ष पेक्षा अधिक रकमेच्या कामांचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करण्यात आले असून रु.१० लक्ष पेक्षा कमी किंमतीच्या कोणत्याही कामांची दुबार देयके अदा करण्यात आलेली नाहीत.

******

नगर विकास विभाग
लक्षवेधी सूचना क्र.१४६४

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन**

**श्री.सुधीर मुनगंटीवार, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१४६४ पुढीलप्रमाणे आहे :-**

" चंद्रपूर मनपा येथे २००४ पासुन पाणी पूरवठा विभागात कामगार कार्यरत असणे, पाणी पुरवठा यंत्रणा २० वर्षापासून कार्यरत असणे, शासन प्रशासनाच्या वतीने कोणतीही सवलत व किमान वेतन या कामगारांना न मिळणे, मनपातील अनेक विभागात २००६ पासून असलेल्या कामगारांना मनपात स्थायी करणे, परंतु पाणी पुरवठा विभागात २००४ पासुन कार्यरत असलेल्या कामगारांकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, कोरोना काळात लॉकडाऊन दरम्यान पाणी पूरवठा विभागातील कर्मचारी यांनी जिवाची तसेच परिवाराची पर्वा न करता जनतेच्या सेवेसाठी दिवस रात्र एक करुण चंद्रपूर महानगरात सातत्याने पाणीपुरवठा सुरळीत ठेवणे, सदर कामगार व कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याची नितांत आवश्यकता, या कामगारांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

**<u>मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास) महोदयांचे निवेदन</u>**

चंद्रपूर पाणी पुरवठा योजना २००४ पासुन २०१९ पर्यत खाजगी कंत्राटदारामार्फत चालविण्यात येत होती. त्यानंतर महानगरपालिकेने पाणी पुरवठा योजना स्वतःच्या ताब्यात घेतली. सद्यस्थितीत पाणी पुरवठा विभागातील कामगार हे बाह्यस्त्रोताव्दारे मे. दुर्गेश इंडस्ट्रीअल सिक्युरिटी प्रा.लि., चंद्रपूर या एजंसी मार्फत पुरविण्यात येत आहे. सदर कामगारांना उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचे दि. २४/०२/२०१५ च्या अधिसुचनेनुसार किमान वेतन दर तसेच शासनाने वेळोवेळी जाहीर करण्यात आलेला विशेष भत्ता देण्यात येतो व सर्व कर्मचारी यांचे महानगरपालिकेमार्फत भविष्य निर्वाह निधी (EPF) व कामगार विमा (ESIC) नियमीत भरण्यात येते.

शासनाच्या वित्त विभागाचे परिपत्रक दिनांक ०२/०२/२०१३ अन्वये बाह्य यंत्रणेकडुन (आऊट सोर्सिंग व्दारे) कामे करुन घेण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच सद्यस्थितीत बाह्य यंत्रणेमार्फत (Outsource) कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना सेवेत सामावुन घेण्याचे शासनाचे कुठलेही धोरण नसल्याने महानगरपालिकेत २००६ पासून कार्यरत कर्मचारी हे बाह्यस्त्रोताव्दारे लावलेले कंत्राटी कर्मचारी असल्यामुळे त्यांना कार्यालयीन आस्थापनावर सामावून घेता येवू शकत नाही.

चंद्रपुर शहर महानगरपालिकेचा आकृतीबंध शासन निर्णय दि. १३/०२/२०२३ अन्वये मंजूर करण्यात आलेला असून आकृतीबंधानुसार पाणी पुरवठा व मलनिस्सारण विभागाकरीता एकुण ३३ पदे मंजूर असून वॉलमन पद मंजूर नाही. परंतु झोन कार्यालय १,२ व ३ करीता एकूण १२ वॉलमन पदे मंजूर असून ५ वॉलमन कार्यरत व ७ पदे रिक्त आहे. महाराष्ट्र शासनाने सामाजिक व शैक्षणिक प्रवर्ग (SEBC) यांचेकरिता दि.२६/०२/२०२४ पासून शासकीय व निमशासकीय सेवेत सरळसेवा पदभरती मध्ये १० टक्के आरक्षण लागू केलेले आहे. बिगर आदिवासी जिल्ह्यासाठी मागासवर्गीयांकरीता बिंदूनामावली तयार करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमीत झालेला असून अद्यापपावेतो आदिवासी बहुल जिल्ह्यासाठी मागासवर्गीयांकरीता बिंदूनामावली तयार करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमीत झालेला नसल्याने सदर रिक्त पदे भरण्याची कार्यवाही पूर्ण करता आलेली नाही.

***********************

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. कृष्णा खोपडे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम -१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१५८६ पुढीलप्रमाणे आहे :-**

नागपूर शहराचा आऊटर भागामधे म.न.पा. व ना.सु.प्र. चा जागेवर मोबाईल टावर लावण्याची मोहीम सुरु असणे, अवैध मोबाईल टावर वर म.न.पा. व ना.सु.प्र. कारवाई करण्यास असमर्थ असणे, आयुक्त, महानगर पालिका यांना वारंवार दिलेली तक्रार, मात्र मोबाईल कंपनीला छोटेखानी पत्र पाठवून दिशाभूल करून कसल्याही प्रकारची कारवाई न होणे, दूरसंचार कायदा २६ जून २०२४ रोजी लागू झालेला असून निगम आयुक्तांना २ मे २०२५ रोजी मंत्रालयाने पत्र पाठवून देखील यावर कारवाई न होणे, मोबाईल टावर कंपनीला अभयदान देण्याचा प्रयत्न, भरगच्छ वस्तीत अनाधिकृत इमारतीवर असलेले मोबाईल टावर म्हणजे त्यामुळे दुर्घटनेला आमंत्रण असणारी स्थिती, मोबाईल टावर उभारलेल्या इमारतीच्या बांधकामाला मंजुरी नसणे, इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट न होणे, मोबाईल कंपनीद्वारे आपल्या मर्जीने कुठेही मोबाईल टावर उभे करणे, राज्यात अश्या अनेक प्रकार घडले असून कसल्याही प्रकारची परवानगी न घेणे, त्यामुळे केंद्र व राज्य सरकारच्या नियमाचे होत असलेले सर्रास उल्लंघन, या अवैध मोबाईल टावरमुळे संभावित धोका टाळण्यासाठी व यावर नियंत्रण राखण्यासाठी अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता, नागरिकांनी या अवैध मोबाईल टावर विरुद्ध म.न.पा. व ना.सु.प्र. मधे तक्रार करून सुद्धा या कडे होत असलेले दुर्लक्ष, यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना

---

**मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास) महोदयांचे निवेदन**

राज्यातील सर्व महानगरपालिकांमध्ये शासन निर्णय दि. ०५ फेब्रुवारी, २०२५ नुसार केंद्र शासनाचा दूरसंचार अधिनियम २०२३ व दूरसंचार नियम (Telecommunications (Right of Way) Rules) २०२४ दि. ०१ जानेवारी, २०२५ पासून लागू करण्यात आले आहेत. त्यानुसार महानगरपालिकांद्वारे मोबाईल टॉवर्सच्या उभारणीसंदर्भात कार्यवाही करण्यात येते. दूरसंचार कायदा, २०२३ मधील कलम १४(४) नुसार महानगरपालिकांनी केंद्र शासनाद्वारे प्राधिकृत अधिका-याच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणतीही दंडात्मक कारवाई करू नये, असे निर्देश आहेत.

नगरविकास विभागाच्या दि. २ मे २०२५ रोजीच्या पत्रान्वये दूरसंचार कायदा, २०२३ मधील कलम १४(४) नुसार कार्यवाही करण्याकरीता नोडल अधिकारी म्हणून प्रधान सचिव( माहिती व तंत्रज्ञान) यांची शासनाद्वारे नियुक्ती करण्यात आल्याचे कळविण्यात आले आहे. त्यानुसार दूरसंचार कायदा, २०२३ मधील कलम १४(४) अंतर्गत येणाऱ्या बाबींकरीता प्रधान सचिव( माहिती व तंत्रज्ञान) यांच्या पूर्वपरवानगीनेच कार्यवाही करण्यात यावी, असे सर्व महानगरपालिकांना कळविण्यात आले आहे. त्यामुळे मालमत्ता कर थकीत असलेल्या मोबाईल टॉवर कंपन्यांवर वसुली करण्याबाबत महानगरपालिकेद्वारे सक्तीची कारवाई करणे शक्य होत नाही.

गतिशक्ती योजनेअंतर्गत महासंचार (Mahasanchar.emahapwd.com) पोर्टलवर मोबाईल टॉवर उभारणीस मान्यता देण्यात येते. या पोर्टलवर मोबाईल टॉवर उभारणीकरीता आतापर्यंत १२६१ अर्ज प्राप्त झाले आहेत. या अर्जांची छाननी करून आवश्यक कागदपत्रांची (बांधकाम परवानगी, structural stability certificate इ.) पूर्तता न करणारे अर्ज नामंजूर करण्यात आले आहेत. तथापि, अर्ज नामंजूर केल्यानंतर देखील ३० दिवसानंतर सदर अर्जांना पोर्टलवर अभिमत परवानगी (Deemed Permission) मिळत असल्याचे निदर्शनास आले आहे.

अशाप्रकारे Deemed Permission मिळालेल्या प्रस्तावांची पुनश्चः छाननी करून महानगरपालिकेद्वारे मोबाईल टॉवर कंपन्यांना शासकीय चलनांच्या रक्कमेचा भरणा करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तथापि, अशा कंपन्यांकडून अद्याप कोणताही भरणा करण्यात आलेला नाही. तसेच अशा प्रकारे Deemed Permission प्राप्त झालेल्या मोबाईल कंपनीद्वारे महानगरपालिकेची पूर्वपरवानगी न घेता अवैध मोबाईल टॉवर उभारत असल्याचे निदर्शनास आले आहे.

अनधिकृत बांधकामांवर कार्यवाही ही नागपूर महानगरपालिकेच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांमार्फत करण्यात येते. क्षेत्रीय कार्यालयांद्वारे वेळोवेळी अनधिकृत बांधकामाचे स्थळ निरीक्षण करण्यात येते. त्याअंतर्गत अनधिकृत इमारतीवरील मोबाईल टॉवरची शहानिशा करून सदर इमारतीच्या मालकांना नोटीस देण्यात येते. शासन निर्णय दि. ७ जून, २०२१ अन्वये मोबाईल टॉवर उभारणीच्या अनुषंगाने तक्रारींचे निवारण करण्याकरीता जिल्हास्तरीय दूरसंचार समिती गठित करण्यात आली आहे. तथापि, मोबाईल टॉवरवरील कोणतीही दंडात्मक कार्यवाही ही दूरसंचार कायदा, २०२३ मधील कलम १४(४) नुसार प्रधान सचिव (माहिती व तंत्रज्ञान) यांच्या पूर्वपरवानगीनेच करणे शक्य आहे. त्यानुसार अशी परवानगी मिळण्याकरिता सदर मोबाईल टॉवर हा अनधिकृत आहे किंवा नागरिकांकरिता धोकादायक आहे, याबाबत वेळोवेळी झालेल्या बैठकांमध्ये महानगरपालिकेकडून नोडल अधिकाऱ्यांना विनंती करण्यात आली आहे. महानगरपालिकांद्वारे प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने दंडात्मक कार्यवाहीबाबत नोडल अधिकाऱ्यांद्वारे निर्णय घेण्यात येतो व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येते.

**********************

लक्षवेधी सूचना क्र.१८७३

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री.नानाभाऊ पटोले, महाराष्ट्र विधानसभा सदस्य यांनी नियम १०५ अनुसार दिलेली

लक्षवेधी सूचना

" चंद्रपूर जिल्ह्यातील मौजा राजुरा शहरातील तसेच ग्रामीण भागातील नागरिकांना मुलभूत सुविधा पुरविणे परिसरातील नागरिक, युवक, विद्यार्थी, विद्यार्थिनी यांचे कला गुणांना वाव मिळणेसाठी शहरात नाट्यगृहांची निर्मिती करून मिळणेबाबत मागणी केली जात असून राजुरा शहरात नाट्यगृहाची नितांत आवश्यकता असणे , राजुरा शहरात नाट्यगृहाचे निर्मिती करीता नगर परिषदेनी ५.०० कोटी रूपये विशेष निधी उपलब्ध करून देणेसाठी आपले कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केलेला असणे, सदर नाट्यगृहाचे बांधकामाकरिता मौजा राजुरा येथील सर्वे क्र.१४९/१९ आराजी ०.४० हे.आर. सरकार जमा जागा नगर परिषदेला हस्तांतरीत करून मिळणे बाबतचा प्रस्ताव मुख्याधिकारी नगर परिषद राजुरा यांनी तहसीलदार राजुरा यांचेकडे सादर करणे, परंतु अद्यापही याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात न आल्याने याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करून मौजा राजुरा येथील सर्वे क्र.१४९/१९ आराजी ०.४० हे.आर. सरकार जमा जागा नगर परिषदला हस्तांतरित करून राजुरा येथे प्रशस्त नाट्यगृह बांधकाम करणेसाठी निधी उपलब्ध करून देणेबाबतची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया"

---

श्री.चंद्रशेखर बावनकुळे, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

राजुरा नगर परिषदेच्या हद्दीतील सर्वे नंबर १४९/१९ मधील ०.४० आर जागा नगर परिषदेच्या नाट्यगृहासाठी हस्तांतरीत करण्यात यावी अशी मागणी नगर परिषद, राजुरा यांच्या दिनांक २८ सप्टेंबर,२०२३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचेकडे करण्यात आली.

मौजे राजुरा येथील स.क्र.१४९/१९ मधील आराजी ४.०५ हे.आर.जागा ग्रामीण सहकार शिक्षण प्रसारक मंडळ, चंद्रपूर यांना सन १९६९-७० मध्ये महाराष्ट्र शासनातर्फे शैक्षणिक प्रयोजनार्थ प्रदान करण्यात आली आहे. सदर जमिनीवर या शैक्षणिक संस्थेच्या दोन इमारती असून त्यामध्ये मिडल स्कूल हायस्कूल व ज्युनीयर कॉलेज तसेच सावित्रीबाई फुले सभागृह व खेळाचे मैदान इत्यादींचे बांधकाम करण्यात आलेले आहे.

महात्मा ज्योतीबा फुले हायस्कूल यांनी सदर जमीनीपैकी ०.४० हे. आर. जमीन श्री. विनोद नरंदुलवार यांना भाडेतत्वावर देणे व त्या जागेवर बांधकाम साहित्य जमा करुन व्यवसायीक वापर करणे यामुळे सदर

जमिनीचा शर्तभंग झाला असल्याचा अहवाल तलाठी यांनी सादर केल्याने सदर जमिन सरकार जमा करण्याबाबतचा प्रस्ताव तहसिलदार राजूरा यांचेकडून उपविभागीय अधिकारी, राजुरा यांचेकडे प्राप्त झालेला होता.

सदर प्रस्तावानुसार उपविभागीय अधिकारी, राजुरा यांचे कार्यालयात प्रकरण दाखल करण्यात आले. प्रकरणात शर्तभंग झाल्यामुळे मौजा राजूरा येथील सर्व्हे नं. १४९/१९ आराजी ४.०५ हे. आर पैकी ०.४० हे. आर जमिन सरकार जमा करण्याबाबत दिनांक ०८.०२.२०२२ रोजी आदेश पारीत करण्यात आला. त्यानुसार ७/१२ अभिलेखात नोंद दुरुस्ती करण्यात आली.

उपविभागीय अधिकारी, राजुरा यांचे दिनांक ०८.०२.२०२२ चे आदेशाविरुध्द महात्मा ज्योतीबा फुले हायस्कुल, राजुरा यांनी अपर जिल्हाधिकारी, चंद्रपुर यांचेकडे अपिल क्र. ०२/एलएनडी-३०/२०२१-२२ दाखल केले. यामध्ये, अपर जिल्हाधिकारी, चंद्रपुर यांनी दिनांक २३.८.२०२२ रोजी आदेश पारीत करुन उपविभागीय अधिकारी, राजुरा यांचा दिनांक ०८.०२.२०२२ चा आदेश कायम ठेवला.

अपर जिल्हाधिकारी, चंद्रपुर यांचे दिनांक २३.०८.२०२२ चे आदेशाविरुध्द महात्मा ज्योतीबा फुले हायस्कूल, राजुरा यांनी मा. अपर आयुक्त, नागपुर विभाग, नागपुर यांचेकडे पुनरिक्षण अर्ज दाखल केला. सदर पुनरिक्षण प्रकरणात अपर विभागीय आयुक्त, नागपुर यांनी दिनांक २५.९.२०२४ रोजी आदेश पारीत करुन अपर जिल्हाधिकारी, चंद्रपुर यांचेकडील दिनांक २३.०८.२०२२ चा आदेश रद्द करून प्रकरणात फेरचौकशी करुन आदेश पारीत करण्याकरीता अपर जिल्हाधिकारी, चंद्रपुर यांचेकडे प्रकरण परत पाठविण्यात आले.

अपर विभागीय आयुक्त, नागपुर यांचेकडील दिनांक २५.९.२०२४ चे आदेशास अनुसरून अपर जिल्हाधिकारी, चंद्रपुर यांनी दिनांक ०४.०३.२०२५ रोजी, उपविभागीय अधिकारी, राजुरा यांचे दिनांक ०८.०२.२०२२ चे आदेश रदद करून प्रकरण  फेरचौकशी करण्याकरीता उपविभागीय अधिकारी, राजुरा यांचेकडे परत पाठविले.

अपर जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे दिनांक ४.३.२०२५  रोजीचे आदेशानुसार फेरचौकशी करून व प्रकरणात महात्मा ज्योतीबा फुले हायस्कुल, राजुरा यांना सुनावणीची संधी देऊन उपविभागीय अधिकारी, राजुरा यांचे स्तरावर अर्धन्यायिक प्रकरणात दिनांक २९.७.२०२५ रोजी आदेश पारित करण्यात आले आहेत. सदर आदेशान्वये, महात्मा ज्योतीबा फुले विद्यालय, राजुरा यांचे ताब्यातील या जागेच्या  मौका चौकशी अहवालानुसार प्रस्तुत जमिनीवर कोणतेही अतिक्रमण झाले नसल्याची बाब स्पष्ट झाल्याने, मौजे राजुरा येथील स.क्र.१४९/१९ मधील आराजी ४.०५ हे.आर. जागा ग्रामीण सहकार शिक्षण प्रसारक मंडळ, चंद्रपूर (महात्मा ज्योतीबा फुले, राजुरा) यांचे नावे दर्शविण्याबाबत उपविभागीय अधिकारी, राजुरा यांनी आदेश पारित केले आहेत.

*********************

लक्षवेधी सुचना क्र. २१८८

१२३.

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

मा.श्री.अमित झनक, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२१८८ पुढीलप्रमाणे आहे :-

"ता.जि.ठाणे येथील खैराणी गावातील दत्तू धमी यांचे कायदेशीर वारस संजय पाटील यांची गट क्र.१३५ हिस्सा क्र.१ व ३ मधील अंदाजे ८२ गुंठे जमीन बेकायेदशीरपणे सिडकोने संपादित करुन नवी मुंबई मनपाला देणे, परंतू १४.७.२००३ च्या पत्रान्वये सदर जमीन सिडकोने ताब्यात घेतली असल्यामुळे नवी मुंबई मनपाने या जमिनीचा मोबदला देण्यास नकार देणे, परंतु मा.उच्च न्यायालय, मंबई यांचे दि.११.३.२०२४ च्या आदेशानुसार तहसिलदार ठाणे यांनी अंमलबजावणी करुन सदर जमिनीचे संरक्षित कुळ म्हणून सदरील पूर्वजाचे वारस म्हणून संजय पाटील यांची ७/१२ वर नोंद करणे, त्यामुळे संजय पाटील मोबदला मिळण्यास पात्र असूनही त्यांना नियमानुसार मोबदला मिळणे आवश्यक असतानाही शासनाकडून कार्यवाहीस होत असलेले विलंब परिणामी येथील जनमानसात पसरलेला तिव्र असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

---

## मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

सिडको महामंडळाची नवी मुंबई प्रकल्पासाठी "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ११३(१) नुसार दि.२०.०३.१९७१ रोजीच्या अधिसूचनेन्वये "नवनगर विकास प्राधिकरण" म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नवी मुंबई प्रकल्पासाठी ठाणे व रायगड जिल्ह्यातील ठाणे, उरण व पनवेल तालुक्यातील एकूण ९५ गावे अधिसूचित करण्यात आली आहेत. त्यामध्ये मौजे खैरणे, ता. ठाणे या गावाचा समावेश आहे. सदर गावातील खाजगी जमिनी भूसंपादन अधिनियम, १८९४ नुसार संपादित करण्यात आल्या आहेत. महसूल व वन विभागाच्या दि.१०.४.१९७२ रोजीच्या शासन निर्णयानुसार उक्त ९५ गावांतील शासकीय जमिनी नवी मुंबई प्रकल्पासाठी निहित झाल्या असून जिल्हाधिकारी, रायगड व ठाणे यांनी अधिसूचित गावातील शासकीय जमिनी सिडको महामंडळाकडे हस्तांतरीत केल्या आहेत.

मौजे खैरणे, ता.जि.ठाणे येथील सर्व्हे नं.१३५ चे एकूण १० हिस्से आहेत. त्यातील १३५/१ ते ३ हिस्से शासकीय जमिनी असून उर्वरित हिस्से खाजगी मालकीचे आहेत. मौजे खैरणे, ता.जि. ठाणे येथील सर्व्हे क्र.१३५/१ व १३५/३ या जमिनीशी संबंधित गाव नमुना ७/१२ आणि फेरफार नोंदी बघता फेरफार क्र.१२४, दि.३.१२.१९२७ नुसार श्रीमती जानकीबाई रामचंद्र मयत झाल्याने वारसाने राधाबाई गोविंद इनामदार उर्फ अत्रे यांचे नाव दाखल आहे. तद्नंतर, फेरफार क्र. २९८, दि.२२.१२.१९४२ नुसार राधाबाई गोविंद अत्रे यांनी सदर जमिनीचा राजिनामा दि.२३.३.१९४२ रोजी दिल्याने जमीन खालसा करुन आकारी पडीत मध्ये गेली त्यानुषंगाने महसूल व वन विभागाचे शासन ज्ञापन, दि.३.७.१९७२ व जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या दि.१८.८.१९७२ रोजीच्या आदेशानुसार मौजे खैरणे, ता.जि.ठाणे येथील सर्व्हे क्र.१३५/१ व १३५/३ या जमिनीचा खुला ताबा सिडको महामंडळास देऊन फेरफार क्र. १०११, दि.१२.२.१९७४ रोजी सिडको

महामंडळाचे नाव दाखल करण्यात आले आहे. सदर जमीन नवी मुंबई प्रकल्पासाठी शासकीय जमीन म्हणून सिडको महामंडळास हस्तांतरण करुन जमिनीचा ताबा दि.२३.७.१९८५ रोजी देण्यात आला आहे. मौजे खैरणे येथील सर्व्हे क्र. १३५/१, क्षेत्र-०-३६-९० हे.आर. व सर्व्हे क्र. १३५/३, क्षेत्र ०-४५-०२ हे.आर. या शासकीय जमिनी आहेत.

मौजे खैरणे, ता.जि.ठाणे येथील सर्व्हे क्र.१३५ हिस्सा क्र.१ व ३ मधील अंदाजे ८२ गुंठे या जमिनीत सेक्टर १२ येथील भुखंड क्रमांक १९६ व १९६अे हे समाविष्ट आहेत. भुखंड क्र.१९६, क्षेत्रफळ ६३००.२५ चौ.मी. नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमासाठी दि.१५.३.२००७ रोजी करारनाम्याद्वारे हस्तांतरीत केला असून भाडेपट्टाची रक्कम रू.१००/- सिडकोकडे भरणा करण्यात आली आहे. तसेच भुखंड क्र. १९६अे, क्षेत्रफळ ४०९८.१ चौ.मी. हा भूखंड तरण तलाव या वापरासाठी दि.२५.६.२०१३ रोजीच्या करारनाम्याद्वारे नवी मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत केला असून सदर वापरासाठी रक्कम रू.८४,५६,३३९/- सिडकोस अदा केली आहे. सदर दोन्ही भुखंड नवी मुंबई महानगरपालिकेने सिडकोकडून ६० वर्ष कालावधीसाठी भाडेपट्टयावर घेतले आहेत.

दरम्यान, उक्त सर्व्हे नं.१३५/१ व १३५/३ या जमीन मिळकतीचे इतर अधिकार सदरी संरक्षित कुळ म्हणून धर्मा पद्या पाटील यांचे नाव दाखल करणेकामी अर्जदार श्री.कृष्णा दत्तू पाटील यांनी दि.१०.३.२०२२ रोजी मा.मंत्री (महसूल) यांच्याकडे अर्ज दाखल केला होता. सदर विनंती अर्जास अनुसरुन त्यांच्या कुळांची नांवे ७/१२ सदरी दाखल न झाल्याने श्री.कृष्णा पाटील व इतर ११ यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. १२५५/२०२४ दाखल केला होती. सदर याचिकेमधील दि.११.३.२०२४ रोजीच्या आदेशानुसार अर्जदार यांनी मागणी केलेले Prayer Clause (b) - In these circumstances, we find that the petition deserves to be allowed in terms of prayer clause (b) which reads thus : "(b) issue on appropriate writ order to direct respondent no. 1 to 4 to mutate the names of the petitioner in the capacity of tenants in respect of the suit property." मंजूर केले आहे. त्यानुषंगाने विषयांकीत जमिनीचे ७/१२ सदरी अंमल देण्यात आला असून जमीन मिळकतीच्या ७/१२ इतर हक्क अर्जदार यांचे पूर्वज पुर्वीचे संरक्षित कुळ म्हणून धर्मा पद्या पाटील यांच्या नावाची नोंद दाखल करण्यात आली आहे. आजरोजी सदर जमीन मिळकतीच्या भोगवटादार सदरी "आकारी पडीत" अशी नोंद दाखल असून इतर अधिकार सदरी संरक्षित कुळ धर्मा पद्या पाटील यांच्या नावाची नोंद आहे. याव्यतिरीक्त आयुक्त, मुंबई यांचे दि.३.२.१९७० रोजीच्या अधिसूचनेनुसार भूसंपादित अशी नोंद आहे.

उक्त रिट याचिकेमध्ये सिडको महामंडळ हे पक्षकार नसल्याने मा.न्यायालयाने दि.८.४.२०२४ रोजीच्या आदेशान्वये सिडकोचे म्हणणे विचारात न घेता एकतर्फी निर्णय घेणे उचित राहणार नाही त्यामुळे सर्व बाबी विचारात घेऊन सिडकोचे हक्क अबाधित ठेऊन संबंधित विभागाने कार्यवाही करावी असे आदेश दिले आहेत. सदर आदेशाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे सिडकोमार्फत पुनर्विलोकन याचिका (स्टॅम्प) क्र.२३६५६/२०२५ दाखल करण्यात आली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

***

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

मा.श्री.प्रशांत ठाकूर, श्री.समीर कुणावार, श्री.महेश बालदी, श्री.अमित साटम व श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२२८४ पुढीलप्रमाणे आहे :-

"सिडको प्रशासनाने नवी मुंबई क्षेत्र विकसित करताना पनवेल/उरण तालुक्यात मुलभुत सोयी सुविधा देताना पाणी पुरवठा सारख्या अत्यंत मुलभुत प्रश्नाकडे सिडको प्रशासनाचे दुर्लक्ष झाले असणे, उक्त तालुक्यात पाणी पुरवठा करण्याकरिता सिडको प्रशासनाला नवी मुंबई महापालिका/एमजेपी/एमआयडीसी या घटकांवर अवलंबून रहावे लागत असणे, सिडको प्रशासनाच्या नियोजन शुन्य कारभारामुळे उक्त तालुक्यातील नागरिकांना अनेक वर्ष सातत्याने अपु-या व कमी पाणी पुरवठयाचा सामना करावा लागत असणे, पनवेल, उरण या तालुक्यांमध्येच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत तयार होणारे गृहनिर्माण प्रकल्प, नैना प्रकल्प या प्रकल्पांमुळे वाढती लोकसंख्या पाहता भविष्यात नागरिकांना तीव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागणार असणे, उक्त तालुक्यात सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या लोकसंख्येला पाणी पुरवठा करण्यास सिडको प्रशासन असमर्थ ठरत असणे, अपु-या पाणी पुरवठयामुळे विशेषत्वाने खारघर व कामोठे विभागातील नागरिकांच्या रोषाला स्थानिक लोकप्रतिनिधींना सातत्याने सामोरे जावे लागत असणे, सद्यस्थितीत वसाहतीमध्ये होणारा अपुरा पाणीपुरवठा यासाठी मुळस्त्रोतामधून येणारे कमी पाणी तसेच पुरवठा करणा-या व्यवस्थेवर सिडकोचे नियंत्रण नसणे, त्यामुळे जोपर्यंत या सर्व वसाहतीमध्ये आवश्यक पाणी उपलब्ध होणार नाही तोपर्यंत कोणत्याही नव्या इमारतींना काम सुरू करण्याची परवानगी अथवा काम पूर्णत्वाचा दाखला देण्यात येवू नये अशी नागरिकांची तीव्र मागणी असणे, शासनाने तातडीने सक्षम प्राधिकरण बनवण्याची आवश्यकता त्यावर शासनाने त्वरीत करावयाची आवश्यक ती कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया"

---

## मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

नवी मुंबई प्रकल्पासाठी सिडको महामंडळाची "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सन १९७५ ते १९८० या कालावधीत सिडकोने वाशी, बेलापुर, नेरुळ, पनवेल व ऐरोली या ठिकाणी बांधलेल्या गृहनिर्माण प्रकल्प क्षेत्रास पाणी पुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या बारवी व पाताळगंगा स्त्रोतामधुन ५० द.ल.लि./दिन पाणी पुरवठ्याचे नियोजन केले. तद्नंतर कळंबोली, सानपाडा, तुर्भे, घणसोली, खारघर, कामोठे, तळोजे, उलवे व द्रोणागिरी या विभागांच्या पाणी पुरवठ्यासाठी महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या न्हावा शेवा टप्पा-१ अंतर्गत ८५ द.ल.लि./दिन पाण्याचे नियोजन केले. तद्नंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मोरबे पाणीपुरवठा योजनेमध्ये ४५० द.ल.लि./दिन पाण्याचे आरक्षण करण्यात आले. दरम्यान नवी मुंबई महानगरपालिकेची सन १९९२ मध्ये स्थापना झाल्यानंतर सन २००२ मध्ये मोरबे पाणीपुरवठा प्रकल्प नवी मुंबई महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यात आला. सदर प्रकल्पातून नवी मुंबई महानगरपालिकेकडून पाणी व्यवस्थापन करण्यात येत आहे.

सिडको विभागातील वाढती लोकसंख्या विचारात घेऊन वाढीव पाण्याची पुर्तता करण्यासाठी सन १९९२ मध्ये हेटवणे धरणामधुन १०० द.ल.लि./दिन पाणी पाटबंधारे विभागाकडून आरक्षित करण्यात आले. सन २०१६ हेटवणे प्रकल्पातून अतिरीक्त ५० द.ल.लि./दिन पाणी आरक्षित करून पाणी वापरास सुरूवात केली. तद्नंतर सन २०२० मध्ये अतिरीक्त १२० द.ल.लि./दिन पाणी वापराचे नियोजन सिडकोमार्फत करण्यात आले.

याव्यतिरीक्त महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या न्हावा शेवा टप्पा-३ योजनेमधून सिडको विभागासाठी ३५ द.ल.लि. / दिन व नैना विभागातील एमएमआरडीएच्या गृह प्रकल्पासाठी ३४ द.ल.लि./दिन असे एकुण ६९ द.ल.लि./दिन पाणी आरक्षित करण्यात आले आहे.

सिडको महामंडळाने सन २०५० पर्यंत लोकसंख्येच्या वाढीनुसार पाणी पुरवठा मागणी १२७५ द.ल.लि. / दिन केली आहे व सिडकोच्या विकसित विभागांची वाढती लोकसंख्या गृहित धरता विविध स्त्रोतांमधुन सन २०२५ पर्यंत केलेले पाणी आरक्षण, प्रत्येक विभागांची मागणी व पाणीपुरवठा विचारात घेता साधारण २३ द.ल.लि./दिन ची तुट दिसून येते. दरम्यानच्या काळात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ क्षेत्रामध्ये (नैना) पनवेल, खालापूर, पेण, उरण तालुक्यातील गावांचा समावेश करून या भागातील नियोजनाचे काम सिडको महामंडळाकडे सोपविण्यात आले. सदर क्षेत्रातील पाणी पुरवठयासाठी सिडकोकडून कोंढाणे धरण प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले असून या प्रकल्पाद्वारे २५० द.ल.लि./दिन पाणी पुरवठा करण्याचे नियोजित आहे.

सिडकोमार्फत पाणी पुरवठयातील तुट भरून काढण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये हेटवणे सिडको आउटलेट गेटचे (OPEN CHANNEL) रूपांतर प्रेशर कंडयुटचे काम पुर्ण करून पाणी पुरवठयात ३० द.ल.लि./दिन अशी माहे जून, २०२२ पासून वाढ करण्यात आली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने न्हावा शेवा टप्पा-२ अंतर्गत पाणी पुरवठा योजनेतील पंपींग मशीनरीमध्ये सुधारणा करून पाणी पुरवठयात सप्टेंबर २०२१ पासून १० द.ल.लि./दिन वाढ केली आहे. विविध विभागांमध्ये सुमारे ५३०० मीटर लांबीच्या नवीन जलवाहिन्या टाकण्यात आलेल्या आहेत व पंपीग मशीनरी मध्ये सुधारणा करून नियमित व सुरळीत पाणी पुरवठा करण्यात आला आहे. खारघर विभागातील नागरिकांना नियमित व योग्य दाबाने पाणी पुरवठा होण्यासाठी जलवाहिनी वरील समतोल तसेच वितरण व्यवस्थेसाठी तांत्रिक लेखापरिक्षक व सल्लागार म्हणुन टाटा कन्स्लटंसी कंपनीला नियुक्त करण्यात आले आहे. सदर कंपनीच्या अहवालानुसार खारघर येथील सेक्टर-१० येथे अतिरीक्त जलवाहीन्या टाकुन नेटवर्क मजबुतीकरणाचे तसेच विविध जलकुंभावर जलमापक यंत्र बसविण्याचे काम पुर्ण करण्यात आले आहे. तळोजा विभागातील ५ द.ल.लि./दिन क्षमतेचे दोन जलकुंभ बांधण्याचे काम पुर्ण होउन सदर जलकुंभ कार्यन्वीत झाले आहेत. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जलवाहिनीच्या नळजोडनी वर In line boosting पंपाचे काम दि.१५.१०.२०२२ रोजी कार्यान्वीत झाले आहे. खारघर विभागासाठी जलकुंभ वहाळ ते जलकुंभ खारघर सेक्टर-२६ पर्यंत NH-४B मार्गे १५०० मि.मि. व्यासाची जलवाहिनी दि.३०.९.२०२२ रोजी कार्यान्वीत केली आहे. खारघर, कामोठे व तळोजा विभागातील पाणी तुटवडा भरुन काढण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात मागणीप्रमाणे टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो.

हेटवणे धरणामधुन अतिरिक्त १२० द.ल.लि./दिन पाण्याचे आरक्षण मिळाले असुन त्यासाठी सिडकोने ११९.८० कोटी कोकण पाठबंधारे विकास महामंडळास अदा केले आहे. सध्यस्थितीत, हेटवने धरण ते जलशुध्दीकरण केंद्र, जिते (१३.२५ कि.मी.) व जलशुध्दीकरण केंद्र, जिते ते वहाळ जलकुंभ (१५.३५ कि.मी.) असे एकुन २८.६ कि.मी. जलबोगदा तयार करणे तसेच जलशुध्दीकरण केंद्र उभारण्याची काम प्रगथीपतावर असुन सदरची कामे २०२८ पर्यंत पुर्ण करुन कार्यान्वित करण्याचे नियोजित आहे. सिडको परिसरामध्ये नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, शिवडी-न्हावा शेवा पारबंदर मार्ग, नवीन गृहनिर्माण प्रकल्प इ. मुळे वाढत्या लोकसंख्येचा विचार करून सन २०५० पर्यंतच्या १२७५ दलली/दिन पाणी पुरवठयाचा व जलसंसाधन व्यवस्थापनाचा रोडमॅप तयार करून सिडकोच्या संचालक मंडळाच्या दि.३१.०७.२०२१ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली आहे.

कोंढाणे प्रकल्प हा रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यामध्ये कोंढाणे गावाजवळ उल्हास नदीवर प्रस्तावीत असुन सदर कोंढाणे प्रकल्पातून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभावित क्षेत्र (नैना) ४७४ चौ.किमी मधील २७० गावांना २५० द.ल.ली./दिन प्रमाणे पाणी पुरवठा होणार आहे. पाणीपुरवठा प्रकल्पाचे नियोजन करण्यासाठी आरवी कन्सलटंट, हैद्राबाद यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जलवाहिनी, जलशुद्धिकरण केंद्र, जलकुंभ इत्यादीचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून स्थळ निश्चित करण्यात आले आहे. सल्लागारामार्फत सविस्तर संकल्पनाचे काम सुरू आहे. महाराष्ट्र शासनाचे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेकडे संपर्क साधून, संकल्पन करून घेण्यात आले आहे. सदर संकल्पनावर आधारीत रू.१३४८.५२ कोटी रक्कमेचे धरण कामाचे अंदाजपत्रक तयार करून त्यास ऑगस्ट-२०२४ मध्ये तांत्रिक मान्यता देवून निविदा मागविण्यात आल्या. निविदा प्रक्रिया विहित पध्दतीने पार पाडून मे. पटेल इंजीनिअरींग लि. यांना दि.०५.०६.२०२५ रोजी कार्यादेश देण्यात आले आहेत. सिडकोच्या नियोजनानुसार कोंढाणे धरण प्रकल्प, पाणीपुरवठा व वितरणाचे काम २०२८-२९ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षीत आहे.

बाळगंगा नदी प्रकल्प हा पाणी पुरवठा प्रकल्प असुन रायगड जिल्हयातील पेण तालुक्यात बाळगंगा नदीवर निफाड येथे प्रस्तावित आहे. सदरचा प्रकल्प जलसंपदा विभागाचे कोकण पाटबंधारे विकास महामंडळामार्फत सिडकोसाठी ठेव तत्वावर बांधण्यात येत आहे. याव्दारे ३५० द.ल.ली. /प्रति दिन इतका पाणी पुरवठा होणार आहे. मा. मुख्यमंत्री महोदयांनी दि.२७.०१.२०२५ रोजी बाळगंगा प्रकल्प सिडकोमार्फतच राबविण्यात यावा व त्याकरीता सुधारीत प्रशासकीय मान्यता देऊन आवश्यक निधी कोकण पाटबंधारे विकास महामंडळास उपलब्ध करुन प्रकल्पाचे काम कालबध्द वेळेत पुर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार सिडको संचालक मंडळाने बाळगंगा प्रकल्पाच्या रु.२४०३.२७ कोटी रक्कमेच्या सुधारीत खर्चास दि.०३.०३.२०२५रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. जलसंपदा विभागामार्फत प्रकल्पाचे उर्वरीत काम हाती घेण्यात आले असून सन २०३० पर्यंत काम पुर्ण होणे अपेक्षित आहे.

दरम्यान, सिडकोअंतर्गत पनवेल व उरण तालुक्यात होत असलेल्या अपु-या व अनियमित पाणी पुरवठ्याबाबत तत्कालीन मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली दि.३०.९.२०२४ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना न्हावा शेवा टप्पा-३ या योजनेचे काम पूर्ण करुन अतिरीक्त १०० द.ल.लि./दिन पाणी पुरवठ्यात वाढ करणे तसेच बाळगंगा व कोंढाणे पाणीपुरवठा प्रकल्पासाठी आवश्यक भूसंपादन, पुनर्वसन, वन वळतीकरण व इतर संविधानिक परवानग्या पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत.

सद्यस्थितीत, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जलव्यवस्थापन विभाग, पनवेल अंतर्गत न्हावा शेवा पाणी पुरवठा योजना टप्पा-१ मधून सिडकोअंतर्गत पनवेल शहरी भाग, नवीन पनवेल, खांदा कॉलनी, कळंबोली, करंजाडे व काळुंद्रे या ठिकाणी तसेच पनवेल महानगरपालिकाअंतर्गत पनवेल शहर तसेच जे.एन.पी.टी. व मार्गस्थ गावे यांना ठोक स्वरुपात एकूण सरासरी १२०-१२२ द.ल.लि./दिन पाणी पुरवठा करण्यात येत आहे. तसेच न्हावा शेवा पाणी पुरवठा योजना टप्पा-३ या २२८ द.ल.लि./दिन क्षमतेच्या नविन पाणी पुरवठा योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. माहे, जून, २०२५ अखेर एकूण ६७% भौतिक काम पूर्ण झाले आहे. या योजनेंतर्गत पनवेल महानगरपालिका, सिडको, जे.एन.पी.टी., एम.एम.आर.डी.ए. व मार्गस्थ गावांना वाढीव ठोक स्वरुपात पाणी पुरवठा करण्याचे प्रस्तावित आहे.

***

लक्षवेधी सूचना क्र. १४५

## महाराष्ट्र विधानसभा, सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन

डॉ.नितिन राऊत, श्री विकास ठाकरे, वि.स.स पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील:-

"नागपूर शहरातील पात्र झोपडपट्टीवासियांना जमिनीचे भाडे पट्टे देण्याची महत्वाकांक्षी योजना राज्य शासनामार्फत लागू करण्यात येणे, त्याचे ५० हजार पट्टा वितरणाचे लक्ष निर्धारित करण्यात येणे, परंतु अद्यापही नझूल जमिनीवरील पट्टे वितरीत करण्यासाठी विलंब होत असल्याची बाब उघड होणे, त्यामध्ये उत्तर नागपूर मधील इंदोरा परिसर, श्रावस्ती नगर, वरपाखड इत्यादी भागातील नझूल जमिनीवरील पट्टे देण्यात आलेले नसणे, त्यामुळे या भागातील लाभार्थ्यांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन नागपूर शहरातील नझूल जमिनींवरील पट्टे वितरीत करण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया"

---

## श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री, महसूल यांचे निवेदन.

नागपूर शहरात नझूल च्या जागेवर एकूण ३७ झोपडपट्टी आहेत. त्याबाबत नागपूर महानगरपालिका मार्फत पी.टी.एस. सर्व्हे केला असता त्यात एकूण पी.टी.एस. संख्या ११११० आहेत. त्यामधून पूर्ण व अपूर्ण स्वरुपात एकूण ६४१४ अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी जिल्हाधिकारी, नागपुर कार्यालयाकडून अर्जाची पात्र व अपात्र छानणी करुन आतापर्यंत ४२६४ पट्टे धारकांचे अर्ज मंजूर करण्यात आले आहे. पैकी १८६२ पट्टे प्रत्यक्ष वाटप करण्यात आलेले आहे आणि २४१२ मध्ये पट्टे धारक यांनी अकृषक आकारणी भरणा न केल्यामुळे मंजुर पट्टे प्रत्यक्ष वाटप करणे शिल्लक आहे. पी.टी.एस. धारकांना अकृषक आकारणीची रक्कम शासन जमा करण्याकरीता भ्रमणध्वनीद्वारे, SMS द्वारे तसेच शिबीराचे आयोजन करुन जिल्हाधिकारी, नागपूर कार्यालयाकडून सुचित करण्यात येत आहे. या व्यतिरिक्त जिल्हाधिकारी, नागपूर यांनी महानगरपालिका नागपूर यांच्या सोबत समन्वय साधून उर्वरित अंदाजे ४००० अर्ज प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही नियोजित केलेली आहे.

(१) उत्तर नागपूर विधानसभा क्षेत्रातील (मोजा इंदोरा परिसर) श्रावस्ती नगर झोपडपट्टी स्लम कोड क्र.२१७ मध्ये एकूण ३४८ पी.टी.एस. असून त्यापैकी ३०५ अर्ज जिल्हाधिकारी, नागपूर कार्यालयास प्राप्त झाले आहेत पैकी जिल्हाधिकारी, नागपूर यांनी १६० अर्ज पात्र करुन ४० अपात्र ठरविले आहे. त्यामध्ये १०५ अर्ज अपूर्ण आहे. पात्र अर्जा पैकी जिल्हाधिकारी, नागपूर यांनी ११६ पात्रधारकांना पट्टे वाटप केले आहे आणि ४४ पट्टे धारकांना अकृषक आकारणी रक्कमेचे भरणा करण्याकरीता SMS द्वारे कळविले आहे.

(२) उत्तर नागपूर विधानसभा क्षेत्रातील (मौजा वडपाखड) नयी बस्ती छावणी झोपडपट्टी स्लम कोड क्र.४०७ मध्ये एकूण ३९९ पी.टी.एस. असून त्यापैकी १०३ अर्ज जिल्हाधिकारी, नागपूर कार्यालयास प्राप्त झाले आहेत. यापैकी जिल्हाधिकारी, नागपूर यांनी १७ अर्ज पात्र ठरवून ८६ अर्ज अपात्र ठरविले आहे. जागा खाजगी असल्याकारणाने पात्र अर्जापैकी जिल्हाधिकारी, नागपूर यांनी १५ धारकांना पट्टे वाटप केले आहे व २ पट्टे धारकांना अकृषक आकारणी रक्कमेचे भरणा करण्याकरीता SMS द्वारे कळविण्यात आले आहे.

(३) उत्तर नागपूर विधानसभा मतदार संघातील नझूल जमीनीवर असलेल्या झोपडपट्टी धारकांना पट्टे वाटपाबाबतच्या कार्यवाहीचा तपशिल सोबतच्या तक्ता अ मध्ये देण्यात आला आहे.

------

तक्ता -अ

| अ.क्र. | झोपडपट्टीचे नांव | एकुण पात्र पी.टी.एस. | प्राप्त अर्ज | पात्र अर्ज | अपात्र अर्ज | अपुर्ण असलेले अर्ज | पात्र पैकी वाटप करण्यात आलेले पट्टे | अकृषक आकारणी रक्कम भरणा न केल्यामुळे वाटप न केलेले पट्टे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्रावस्ती नगर ओपडपट्टीस्लम फोड क्र.२१७ | ३४८ | ३०५ | १६० | ४० | १०५ | ११६ | ४४ |
| २ | रिपब्लीकन नगर झोपडपट्टी स्लम कोड क्र. १९६ | ९६२ | ५७६ | ४६६ | ३० | ८० | २६८ | १९८ |
| ३ | इंदोरा पार्ट-११ झोपडपट्टी स्लम कोड क्र. १९४ | १२९५ | ९६९ | ९४३ | २६ | ० | २८२ | ६६१ |
| ४ | मोठा इंदोरा झोपडपट्टी स्लम कोड क्र. १९८ | १५२ | १०९ | १० | ९१ | ८ | १० | ० |
| ५ | इंदोरा पार्ट IV झोपडपट्टी स्लम कोड क्र. १९६ | ३७० | २२४ | १५७ | ७ | ६० | ११३ | ४४ |
| ६ | नयी बस्ती छावणी झोपडपट्टी स्लम कोड क्र.४०७ | ३९९ | १०३ | १७ | ८६ | ० | १५ | २ |
| ७ | न्यू इंदोरा झोपडा झोपडपट्टी स्लम काड क्र. १९७ | ७० | ५५ | ४२ | १३ | ० | ४२ | ० |
| ८ | जूना जरीपटका झोडपट्टी स्लम कोड क्र.९५४ | ५९ | ५९ | ० | ० | ५९ | ० | ० |
| ९ | बेझनबाग झोपडपट्टी स्लम कोड क्र.२०१ | ११५४ | ६३५ | ११५ | ७० | ४५० | ३० | ८५ |
| १० | आदिवासी नगर झोपडपट्टी स्लम कोड क्र.२०३ | २६३ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ११ | शेंडे नगर झोपडपट्टी स्लम कोड क्र.३४० | २६ | २६ | ० | ० | २६ | ० | ० |
| १२ | ठक्करग्राम स्लम कोड क्र. १९१-१९२ | १ | १ | ० | ० | १ | ० | ० |
| | एकुण - | ५०९९ | ३०६२ | १९१० | ३६३ | ७८९ | ८७६ | १०३४ |

## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. तानाजी मुटकूळे मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २३७ पुढीलप्रमाणे आहे:-

" हिंगोली जिल्ह्यात वसमत शहरालगत कौढा रोड भागात मोठ्या प्रमाणात अवैध वाळूची वाहतूक सुरू असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर झाल्याची बाब माहे मे, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, या भागात अनधिकृतपणे रात्रभर हायवाच्या माध्यमातून वाळू वाहतूक व वीटभट्टी साठी माती घेऊन जाणाऱ्या हायवाने २ निष्पाप नागरिकांचा बळी घेतल्यानंतरही त्यांना अद्याप कोणतीच मदत देण्यात आली नसणे, या निष्पाप नागरिकांच्या वारसांना तात्काळ मदत देऊन हिंगोली जिल्ह्यातील अनधिकृत वीटभट्ट्या व वाळूच्या वाहतुकीस आळा घालण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

---

## श्री.चंद्रशेखर बावनकुळे, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

वसमत शहरालगत कोठा रोड भागात अवैध माती वाहतूक करणाऱ्या वाहनाचा (हायवा-MH २० CT ९७९७) दिनांक ०३.०५.२०२५ रोजी वसमत शहरा लगत कोठा रोड भागात अपघात घेऊन २ व्यक्तींचा मृत्यू झाला. त्यानुषंगाने वसमत पोलीस स्टेशन येथे दिनांक ०३.०५.२०२५ रोजी संबंधीताविरूध्द गु.र.क्र.०२८५/२०२५ भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम १०६, १२५ (a), १२५(b), २८१ व मोटरवाहन अधिनियम, १९८८ चे कलम १३४,१८४ व १८७ अन्वये गुन्हा दाखल असून आरोपीविरूध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. तर दिनांक ०५.०५.२०२५ रोजी संबंधिताविरूध्द गु.र.क्र.०२९०/२०२५, भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ३१८ (४), ३३५, ३३६(२), ३३६(३), ३३८, ३३९, ३४०, ३४० (२) व महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४८ (७) व ४८ (८) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच, सदर वाहनावर रू.०२,२५,४२४/- एवढ्या रकमेची दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

मयतांचे नातेवाइक यांना अपघात विमा दाव्याकरिता गुन्ह्याबाबतची कागदपत्रे पोलीस स्टेशन, वसमत शहर यांचेकडुन देण्यात आलेली असुन, मयतांच्या नातेवाइकांकडून वाहन अपघात न्यायाधिकरणाकडे अपघात विमा दावा दाखल करण्याची कार्यवाही सूरू आहे.

हिंगोली जिल्हयात सर्व तालुक्या अंतर्गत अनाधिकृत असलेल्या विट्टभट्या बंद करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, हिंगोली कार्यालयाकडून देण्यात आल्या आहेत. वसमत शहरा लगत कौठा रोड परिसरातील विट भट्टयामध्ये वापरण्यात येणाऱ्या अवैध मातीवर तहसिलदार, वसमत यांच्या मार्फत दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली असुन, त्यामध्ये एकुण ५५ विट भट्टयांवर रुपये ५,५२,५४,९००/- (अक्षरी-पाचकोटी बावन लक्ष चौपन्न हजार

नऊशे केवळ) एवढा दंड आकरण्यात आलेला असून सबंधीताच्या गा.न.नं ७/१२ वर दंडाच्या बोजाची नोंद घेण्यात आलेली आहे. तसेच अनधिकृत गौण खनिज वाहतूकीस आळा घालण्यासाठी महसूल व पोलीस विभाग यांची संयुक्त पथके निर्माण करण्यात आली असून अवैध वाळू वाहतूकीवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याचे काम सुरू आहे.

हिंगोली जिल्हयात महसूल विभागा मार्फत एकत्रीत दिनांक ०१.०४.२०२४ ते २३.०६.२०२५ पर्यंत गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुक करणाऱ्या एकुण २४१ प्रकरणांमध्ये कार्यवाही करून, त्यांना एकूण २४९०.३५ लक्ष दंड वसूल करुन शासन खाती जमा करण्यात आला आहे. तसेच गौण खनिजाचे अवैध वाहतूक करणारी एकुण १८७ वाहने जप्त करण्यात आली आहेत. त्यामध्ये १९ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**********************************************

लक्षवेधी सूचना क्र.४४८

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री.भास्कर जाधव, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"चंद्रपूर जिल्ह्यातील चंद्रपूर महाऔष्णीक विद्युत केंद्रामधील महाजेनकोच्या कंत्राटी कामाकरीता लागणारी माती व मुरुम पुरविण्याकरीता एसएमएस कंपनी प्रा. लि., नागपूर या कंपनीला शेकडो कोटी रुपयांचे कंत्राट मिळालेले असणे, परंतु कंपनीव्दारे शासनाच्याच जागेवर अवैधपणे उत्खनन करुन ते खनिज शासनाच्या कामात वापरुन त्याबदल्यात शासानाकडून करोडो रुपये घेण्यात आल्याची गंभीर बाब समोर येणे, चंद्रपूर जिल्ह्यातील तिरवंजा (ता. भद्रावती) गावालगत असलेल्या क्षेत्रातून आतापर्यंत लाखो ब्रास खनिजाचे अवैध उत्खनन करण्यात आले असून हायवा ट्रकमधून ते महाजेनकोच्या कामाच्या ठिकाणी घेऊन जात असल्याचे निदर्शनास येणे, ज्या ठिकाणी उत्खनन करण्यात आले ती जागा महाजेनकोची म्हणजेच शासनाची असून या जागेत कोणतीही परवानगी न घेता तसेच स्वामित्वधन जमा न करता मोठ्या प्रमाणात उत्खनन केलेले असणे, हा एकप्रकारे चोरीचा प्रकार असून शासनाच्या जागेत चोरी केलेले खनिज शासनालाच विकून यामध्ये शासनाचे करोडो रुपयांचे नुकसान व फसवणूक झालेली असणे, ही फसवणूक चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राच्या अधिकाऱ्यांच्या मुकसंमतीशिवाय शक्य नसणे, अन्य संबधित अधिकाऱ्यांनीदेखील सदर उत्खानानाकडे केलेले दुर्लक्ष, या संपूर्ण प्रकरणी तात्काळ चौकशी करुन कंपनी व संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

श्री.चंद्रशेखर बावनकुळे, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

चंद्रपूर जिल्हयातील चंद्रपूर महाऔष्णीक विद्युत निर्मिती केंद्र यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार राख बंधा-याची क्षमता संपल्यामुळे बंधा-याची उंची चौथ्या वेळेस वाढविण्यासाठी स्पर्धात्मक निविदेव्दारे मे. एस. एम. एस लिमिटेड, नागपूर या कंत्राटदारास रुपये ११३.०९ कोटी चे कंत्राट दिले.

चंद्रपूर महाऔष्णीक विद्युत निर्मिती केंद्र यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार राख साठवणूक तलावालगतची माती वा फ्लाय अॅश हि अॅशबंडच्या विकास कामा अंतर्गत मोडत आहे. महसूल व वन विभागाचा शासन निर्णय क्रमांक गौखानी १०/१०१२/प्र. क्र.६०३/ ख, दिनांक ०१.११.२०२१ नुसार "ज्यावेळी जमिनीचा एखाद्या भूखंडाचा विकास करताना माती उत्खनन करून ती माती त्याच भूखंडाच्या सपाटीकरणाकरिता वापरली जाईल किंवा ती अशा भूखंडाच्या विकासाच्या प्रकियेतील कोणत्याही कामासाठी वापरली जाईल, त्यावेळी अशा मातीवर स्वामित्वधन आकारले

जाणार नाही" अशी तरतूद आहे. कंत्राटदाराने ती जागा समतल राहील अश्या प्रकारे उत्खनन केलेले आहे.

तहसिलदार, भद्रावती कडून प्राप्त अहवालानुसार मौजा तिरवंजा ता. भद्रावती येथील असलेल्या क्षेत्रातुन कंपनीने परवानगी घेवून खनिजाचे उत्खनन केलेले आहे. परंतु अवैध उत्खनन केल्याची बाब निर्देशनात आलेली नाही. तसेच चंद्रपूर महाऔष्णीक विद्युत निर्मिती केंद्र यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार सदर कामाची उंची वाढविण्यासाठी मुरुम, रबल आणि माती आवश्यक असते. चंद्रपूर जिल्हातील मौजा तिरवंजा (ता भद्रावती) गावालगत असलेल्या क्षेत्रातून जिल्हाधिकारी तथा दंडाधिकारी कार्यालय, चंद्रपूर तसेच तहसीलदार भद्रावती यांचे कडून अल्प/तात्पुरता मुदतीचा गौण खनिज उत्खनन परवाना वितरीत करण्यात आलेला आहे.

अशा प्रकारे महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम,२०१३ मधील तरतुदीनुसार चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत निर्मिती निर्मिती कंत्राटी कामाकरिता लागणाऱ्या गौण खनिजासाठी मे.एस.एम.एस.लि.,कंपनीस मौजा तिरवंजा (ता.भद्रावती) गावालगत असलेल्या क्षेत्रातून एकुण ०२,१६,५०० ब्रास परिमाणासाठी वेगवेगळे एकूण १३४ परवाने दिले असुन,त्याबाबत रु.१७.२० कोटी रुपयाचे स्वामित्वधन व इतर शुल्काचा भरणा शासन जमा केला आहे.

सदर कामाकरिता कंत्राटदाराने वेळोवेळी वापरण्यात आलेल्या गौण खनिजासाठी महसूल विभागास स्वामित्वधन व इतर शुल्काचा भरणा केलेला आहे. त्यामुळे हा चोरीचा प्रकार नुसून शासनाचे कोणतेही नुकसान व फसवणुक झालेली असल्याचे निदर्शनास येत नाही.

***************

<u>लक्षवेधी सूचना क्र.६२१</u>
<u>महाराष्ट्र विधानसभा</u>
<u>सन २०२५ चे द्वितीय अधिवेशन</u>

**श्री. विजय वडेट्टीवार, श्री. मोहन मते, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना ६२१ पुढीलप्रमाणे आहे:-**

---

<u>लक्षवेधी सूचना</u>

"मीरा-भाईंदर येथील इलेव्हन कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीकडून दंडाची वसुली रक्कम करत असताना सह जिल्हा निबंधक मुद्रांक व जिल्हाधिकारी मुद्रांक ठाणे यांनी आपल्या कर्तव्य मध्ये कसूर करत असल्याची तक्रार शासनाकडे दिनांक २२ जून २०२५ रोजी होत असणे, सदर तक्रारीमध्ये सेव्हन इलेव्हन कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड व शासनाच्या महसूल अधिकारी यांनी संगमत करून शासनाचा महसूल मोठ्या प्रमाणात बुडवत असल्याची तक्रार पुरावे सोबत व पत्रव्यवहार ची संपूर्ण माहिती सह करत असणे, या तक्रारीच्या अनुषंगाने शासन निर्णय/अधिनियम/परिपत्रक नुसार गुणवत्ता सात दिवसाच्या कारवाई करण्याचे आदेश महसूल मंत्री यांनी संबंधित विभागाला देणे, परंतु यावर शासन कोणती कारवाई करत नसल्याची बाब समोर येणे, यामध्ये मोठ्या प्रमाणात शासनाचे आर्थिक नुकसान झाले असून नुकसान केलेल्या अधिकाऱ्यांना तातडीने निलंबित करून त्यांच्याकडून सदर रक्कम वसूल करणे बाबत व जो कोणी अधिकारी यामध्ये दोषी असेल त्यांच्यावर फौजदारी स्वरूपाच्या गुन्हे दाखल करणे बाबत शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

<u>**श्री.चंद्रशेखर बावनकुळे, मा.मंत्री(महसूल) यांचे निवेदन**</u>

सह जिल्हा निबंधक वर्ग-१ ठाणे शहर कार्यालयाचे पत्र दिनांक १७/०२/२०२१ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका यांना DRC प्रकरणांची माहीती महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम कलम ३३ अन्वये मुद्रांक शुल्क पडताळणीसाठी मागणी केलेली होती. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी त्याचेकडील दिनांक १५/०३/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सह जिल्हा निबंधक वर्ग-१ ठाणे शहर कार्यालयास एकुण ५८ DRC प्रकरणांच्या छायांकीत प्रती प्राप्त झालेल्या आहेत.

सह जिल्हा निबंधक वर्ग-१ ठाणे शहर यांच्याकडे तक्रारीच्या अनुषंगाने ०५ प्रकरणे असे एकुण ६३ प्रकरणे मीरा-भाईंदर येथील सेव्हन इलेव्हन कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचे प्रकरणे चुकविलेले मुद्रांक शुल्क अंतर्गत प्राप्त होते.

<u>**सह जिल्हा निबंधक वर्ग-१ ठाणे शहर यांचेकडील प्राप्त ६३ प्रकरणाबाबतची कार्यवाही :-**</u>

अभय योजना दि. १ एप्रिल २०२२ च्या अनुषंगाने शासनाने जाहीर केली होती. अभय योजनेतील अटी व शर्तींची पुर्ततेच्या अनुषंगाने आवश्यक ती कारवाई करून **४३ DRC** प्रकरणात मुद्रांक शुल्क रु.२,६९,४८,१३०/- व दंड रु.७६,९८,८२०/- इतकी रक्कम वसूल केलेली आहे. **०७ DRC** प्रकरणातील दस्तऐवज हे नोंदणीकृत आहेत व ते यथोचित मुद्रांकीत आहेत. तसेच ०४ DRC प्रकरणे दुबार आहेत. DRC प्रकरणांपैकी प्रलंबित ०९ प्रकरणांमध्ये न्युन मुद्रांक शुल्क रु.१,०६,१६,५७०/- असून त्याबाबत महसूल वसुली प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे शहर यांचे स्तरावरुन सुरु आहे. यास्तव, वसूलीची कार्यवाही जारी असून त्यात दिरंगाई झालेली नाही.

******************************

महाराष्ट्र विधानसभा, सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन

मा.श्री.संदिप क्षीरसागर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

---

## लक्षवेधी सूचना

"गेवराई (जि.बीड) येथील सह दुय्यम निबंधक वर्ग -२ श्री संजय गोपवाड, यांनी आपल्या कार्यकाळात कामामध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार, अनियमितता, अपसंपदा केल्याच्या तक्रारी असणे, सह दुय्यम निबंधक वर्ग-२ यांनी त्यांच्या कार्यकाळात गुंठेवारीच्या आधारे नोदवलेले दस्तासंदर्भात स्थानिक दैनिकांमध्ये अनेक भ्रष्टाचाराच्या बातम्य प्रसिध्द होऊनही आजतागायत त्यांच्याविरुध्द कोणतीच ठोस कारवाई झालेली नसणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीनी सह दुय्यम निबंधक वर्ग -२ यांच्या भ्रष्टाचार व अनियमिततेबाबत दिनांक १७/०५/२०२५ रोजी व त्यापूर्वीही मा.महसूल मंत्री, मा. अप्पर मुख्य सचिव नोंदणी व मुद्रांक शुल्क, मुंबई, मा. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर व मा.नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे आदिकडे तक्रार वजा पत्रव्यवहार करुनही अदयाप कोणतीच कार्यवाही न होणे, कारवाई करण्यास जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, सह दुय्यम निबंधक वर्ग-२ श्री. संजय गोपवाड यांना पाठीशी घालण्याचा होत असलेला प्रयत्न, परिणामी भ्रष्टाचारास घालण्यात येत असलेले खतपाणी,याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, श्री संजय गोपवाड यांनी त्यांच्या कार्यकाळात केलेल्या कामातील अनियमितता व भ्रष्टाचार प्रकरणी सखोल चौकशी करुन कठोर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

## श्री.चंद्रशेखर बावनकुळे, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

श्री. संजय गोपवाड हे सह दुय्यम निबंधक कार्यालय, गेवराई येथे सह दुय्यम निबंधक पदावर दिनांक १७.१०.२०२२ पासून आजपावेतो कार्यरत आहेत. तत्पुर्वी श्री.गोपवाड हे वरिष्ठ लिपीक म्हणून सह जिल्हा निबंधक वर्ग-१ बीड, सह दुय्यम निबंधक बीड क्र.२ व सह दुय्यम निबंधक अंबाजोगाई येथे दिनांक १०.२.२०१४ ते दि.१६.१०.२०२२ पर्यंत अशा वेगवेगळया कार्यालयात कार्यरत होते. तसेच दरम्यानच्या काळात त्यांच्याकडे दुय्यम निबंधक,गेवराई पदाचा प्रभारी कार्यभार दिनांक १९.१०.२०२१ ते दि.१६.१०.२०२२ दरम्यान होता व पदोन्नतीने त्यांची नेमणूक सह दुय्यम निबंधक गेवराई येथे दिनांक १७.१०.२०२२ रोजी झालेली आहे.

मा.स्थानिक लोकप्रतिनिधी तथा आमदार महोदय,बीड यांचेकडून दि.१७.५.२०२५ रोजीचे पत्रात भ्रष्टाचार, अनियमितता, अपसंपदा इत्यादी बाबत कोणत्याही अनुषंगिक पुराव्यारुपी तपशील प्राप्त झालेला नाही.

दुय्यम निबंधक हे नोंदणी अधिनियमातील तरतुदींचे अनुषंगाने लोकसेवक म्हणून कार्य करीत असतात. नोंदणी अधिनियम १९०८ व महाराष्ट्र नोंदणी नियम १९६१ आणि मुद्रांक अधिनियमातील तरतुदीनुसार दस्तऐवज नोंदणीची कार्यवाही करतात. दुय्यम निबंधक कार्यालयाच्या तपासण्या, मुख्यत्वे जिल्हयाच्या सह जिल्हा निबंधक कार्यालयाकडून, विभागीय स्तरावरील नोंदणी उपमहानिरीक्षक कार्यालयाकडून, राज्य स्तरावरील नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाडून तसेच महालेखापाल, नागपूर कार्यालयाकडून नियमित तपासण्या केल्या जातात. दुय्यम निबंधक गेवराई कार्यालयाची तपासणी सह जिल्हा निबंधक कार्यालयाकडून दि.०१.०१.२०२४ ते दि. ३१.०३.२०२४ या कालावधीची तपासणी झालेली असून आक्षेपित परिच्छेद निरंक असल्याचे दिसून येते. तसेच नोंदणी उपमहानिरीक्षक कार्यालयाकडून माहे नाव्हेंबर,२०२३ मध्ये केलेल्या तपासणीमध्ये आक्षेपित परिच्छेद निरंक असल्याचे दिसून येते. नोंदणी महानिरीक्षक कार्यालयांडून झालेल्या तपासणीमधील एकूण १० परिच्छेद होते. ते

सर्व वसूल झालेले आहेत. महालेखापाल तपासणीमधील एकूण तीन परिच्छेदामधील एक वसूल झालेला आहे व दोन परिच्छेदांची वसुलीची कार्यवाही चालू आहे.

मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी श्री.एस.एच गोपवाड,(वरिष्ठ सहाय्यक) तथा प्रभारी सह दुय्यम निबंधक वर्ग-२ यांनी केलेल्या अनियमिततेची खातेनिहाय चौकशी होवून कार्यवाही होणेबाबत या कार्यालयास दि.१३.१०.२०२२,दि.३१.१०.२०२२ ,दि.८.११.२०२२ व शासन पत्र दि.२.१२.२०२२ रोजीच्या प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने या कार्यालयाचे दि.२.३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांना व शासनास माहिती उपलब्ध करुन आलेली आहे.

तसेच मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सह जिल्हा निबंधक बीड कार्यालयाकडे दि. १७.०५.२०२५ रोजी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सह जिल्हा निबंधक वर्ग-१ बीड कार्यालयाने पत्र दि.२१.५.२०२५ व दुय्यम निबंधक,गेवराई यांनी दि.०५.०६.२०२५ व दि.२०.०६.२०२५ अन्वये मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच श्री.केशव दादाराव तांदळे यांनी नोंदणी उपमहानिरीक्षक, छत्रपती संभाजी नगर विभाग यांना उद्देशून दिलेला दि.०१.०४.२०२५ रोजी व सह जिल्हा निबंधक, बीड कार्यालयास दि.२६.०७.२०२४ रोजी श्री.एस.एच.गोपवाड यांचे विरुध्द चौकशी होवून कायदेशीर कार्यवाही करणेबाबत केलेले तक्रार अर्ज सह जिल्हा निबंधक, बीड कार्यालयास प्राप्त झाले सदरचे अर्ज मालकी हक्कासंदर्भात असल्याने दि.३०.१०.२०२४ रोजी निकाली काढलेला आहे.

उपविभागीय अधिकारी, बीड यांनी दि. ०३.०१.२०२३ रोजी दुय्यम निबंधक कार्यालय, गेवराई यांना दोन पत्रे देऊन त्यांच्या कार्यालयामार्फत निर्गमित झालेले अकृषिक आदेश व निर्गमित न झालेले अकृषिक आदेश यांची यादी दिली होती. त्यानुसार निर्गमित न झालेल्या अकृषिक आदेशाने हस्तांतरण झालेल्या सन-२०२२ मध्ये नोंदविलेल्या एकूण ३२ दस्तऐवजावर दुय्यम निबंधक कार्यालय गेवराई मार्फत दि.१४.०१.२०२३ रोजी पोलीस स्टेशन गेवराई मध्ये गुन्हा दाखल केलेला आहे. याचा FIR-००२४/२०२३ असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

तसेच सह जिल्हा निबंधक कार्यालय, बीड यांचे आदेश क्र.श्री.गोपवाड/तक्रार/तपासणी/२०२५/८५, दिनांक २६.०५.२०२५ अन्वये सह दुय्यम निबंधक, गेवराई कार्यालयाची तपासणी करणेकरीता तपासणी पथक गठीत केलेले असून, तपासणीची कार्यवाही चालू आहे.

श्री.गोपवाड यांना पाठीशी घालणे किंवा भ्रष्टाचारास खतपाणी घालणे अशाप्रकारचे कोणतेही कृती झालेली नसून, श्री.गोपवाड यांचे कार्यकाळातील कामकाजाची तपासणीची कार्यवाही चालू आहे. तपासणीअंती आढळून येणा-या अनियमिततेबाबत संबंधितांवर योग्य ती प्रशासकीय कारवाई करणेत येईल.

******************************

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

सर्वश्री. श्री. संदिप क्षीरसागर, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"बीड विधानसभा क्षेत्रातील बीड व शिरुर (का)तालुक्यातील प्रा.ए.ए.पवार यांच्या मालकीचे मे.गुरुमाऊली स्टोन क्रेशर, खंडोबा मंदिर तेलीगल्ली, बीड -परळी रोडनजीक पांगरबावडी शिवारामध्ये सुरु असून या स्टोन क्रेशर मालकांनी नियमबाहय अवैध उत्खनन करुन मोठया प्रमाणात शासनाचा महसुल बुडवून शासनाची केलेली फसवणूक, नियमबाहय सुरु असलेल्या स्टोन क्रेशर ने उत्खनाबाबत स्थानिक ग्रामस्थांनी व शेतक-यांनी शासनाच्या संबंधित विभागाकडे केलेल्या तक्रारी, स्टोन क्रेशर मालकानी शासनाच्या नियमाप्रमाणे महसूल भरणे बंधनकारक असतांनाही शासनाच्या नियमाची पायमल्ली करुन महसूल बुडवून स्टोन क्रेशन सुरु असणे, सदर नियमाची पायमल्ली करुन सुरु असलेल्या स्टोन क्रेशर संबंधात स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २७/५/२०२५ रोजी वा त्या दरम्यान मा.जिल्हाधिकारी बीड, अप्पर मुख्य सचिव, महसूल विभाग, विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे पत्रव्यवहार करुन सदर बाब निदर्शनास आणूनही अदयाप कोणतीच ठोस कारवाई न होणे, तालुक्यातील सर्व खदान व क्रशर संबंधात सखोल चौकशी करण्याची नितांत आवश्यकता, शासनाचा महसूल बुडवुन सुरु असलेल्या खदान व स्टोन क्रेशर मालकांवर महाराष्ट्र जमीन महसूल संहिताअधिनियम १९६६ कलम २४७ अन्वये व सुधारित गौण खनिज अधिनियमाद्वारे दंडात्मक कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने सखोल चौकशी करुन करावयाची कारवाई, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने, मौजे पांगरवाडी येथील ग.नं. २० मधील मे.गुरुमाऊली स्टोन क्रशरला दिनांक १८.०६.२०१६ अन्वये क्रशर सुरु करण्याचे संमतीपत्र (CTO-Consent to operate) दिलेले असुन, त्याची वैधता दिनांक ३०.०६.२०२६ पर्यंत आहे. सदर स्टोन क्रशर हा मे.गुरु माऊली स्टोन क्रशर या नावाने असुन, श्री.आनंद अशोकराव पवार यांच्या मालकीचा आहे.

जिल्हाधिकारी,बीड यांनी दिनांक २४.०९.२०१८ च्या आदेशान्वये ,मौजे बीड बोबडे येथील स.नं. १३४ व १३६ मधील ०१.१८ हे.आर क्षेत्रावर दिनांक २३.०९.२०२३ पर्यंतच्या कालावधीसाठी श्री.आनंद अशोक पवार, रा.बीड,ता.जि.बीड यांच्या नावे खाणपटटा मंजुर केला आहे. सदर खाणपटटयाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर खाणपटटाधारक यांनी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे नुतणीकरणासाठी अर्ज केला असुन,सदर खाणपटटयाचे नुतणीकरण करण्यात आलेले नाही. श्री.पवार यांनी खाणपटटयाच्या अनुषंगाने सन २०२२ ते २०२५ या कालावधीत तहसिलदार, बीड यांच्याकडे रु.१५,००,०००/-एवढया रकमेच्या स्वामित्वधनाचा भरणा केला आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे मे.गुरुमाऊली स्टोन क्रशर, बीड यांनी नियमबाहय अवैध उत्खनन करुन मोठयाप्रमाणात शासनाच्या महसूल बुडवत असल्याने त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ चे कलम २४७ अन्वये व सुधारित गौण खनिज अधिनियमामध्ये कार्यवाही करण्याबाबत निवेदन तहसिलदार बीड कार्यालयास प्राप्त झाले आहे. त्यानुषंगाने तहसिलदार, बीड यांच्याकडून करण्यात आलेल्या ईटीएस मोजणीमध्ये मौजे बीड बोबडे, येथील स.नं. १३४ व १३६ मध्ये मंजूर खाणपटटयाचे उत्खननासाठी ५६२६.८४ ब्रास उत्खनन केल्याचे परिमाण आढळून आले आहे. त्यानुसार श्री.अनंद पवार याना तहसिलदार, बीड यांनी मौजे बीड बोवडे येथील स.नं. १३४ व १३६ मध्ये आढळून आलेला ५६२६.८४ ब्रास परिमाणाच्या अनुषंगाने ४८,३९,०८२/- एवढया स्वामित्वधनाची रक्कम शासन खाती जमा करण्याबाबत दिनांक ०३.०७.२०२५ रोजी नोटीस दिलेली आहे. संबंधितानी यापूर्वी रु.१५,००,०००/- शासन जमा केलेली स्वामित्वधनाची रक्कम समायोजित करुन उर्वरित रक्कम वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

***************

लक्षवेधी सूचना क्र. १५७७.

महाराष्ट्र विधानसभा

सन-२०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री.किसन कथोरे, श्रीमती सुलभा गायकवाड, श्री.अतुल भातखळकर, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्रमांक १५७७ पुढीलप्रमाणे आहे :-**

" नाशिक व ठाणे जिल्ह्यातील इगतपुरी व शहापूर तालुक्यातील भावली, चिंचले, आवलखेड, वाघाचीवाडी गव्हांडा, बोरली, पिंपरी व इतर गावे तसेच शहापूर आदिवासी दुर्गम भागातील आदिवासी बांधव वडिलोपार्जित जमीन मिळकतीवर हंगामी पिके काढून त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत असणे, परंतु अलीकडच्या काळात आदिवासी खातेधारकांच्या जमिनी राजकीय वरदहस्ताने भूमाफिया बेकायदेशीरपणे स्वतःचे लाभात व स्वतःचे नावे नोंद करून घेत असणे, जोर जबरदस्तीने या जागेवर भूमाफियांनी चाळी बांधत असणे, रिसॉर्ट बांधणे, फार्म हाऊस, हॉटेल्स इतर व्यवसाय करणेप्रकारचे बेकायदेशीरपणे बांधकामे व धंदे सुरू केलेले असणे, तसेच या जमिनी हडप करूनपरस्पर खरेदी विक्री करण्यात येणे, काही आदिवासी बांधवांना दमदाटी करून खरेदी विक्री व्यवहार करिता भाग पाडण्यात येणे, खरेदी विक्री व्यवहारावर सही किंवा अंगठे दिले नाहीत किंवा रजिस्ट्रेशन साठी येण्यास नकार दिला तर जीवे ठार मारून टाकण्याची धमकी देण्यात येणे, त्याचबरोबर गेल्या दहा वर्षात खातेदारांच्या नावे बँक खाते बँकांमध्ये तयार करून त्यांचे चेक बुक काढून घेऊन त्याच खात्यात शासकीय रेडीरेकनर नुसार जमिनीच्या मोबदल्याची रक्कम जमा करून पुन्हा धनादेशाद्वारे किंवा एनएफटी द्वारे स्वतःकडचे काढून घेण्यात येणे, त्यामुळे बाजारभावाप्रमाणे रक्कम सुद्धा आदिवासी बांधवांना मिळत नसणे, त्यामुळे आदिवासी बांधवांनी अनेक वेळा धरणे, रस्ता रोको अशी आंदोलने व उपोषण करून सुद्धा न्याय न मिळणे, याबाबत शासनाने करावयाची व करण्यात येणारे कार्यवाही व शासनाचे प्रतिक्रिया."

---

श्री.चंद्रशेखर बावनकुळे, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम ३६ अ तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (जनजातीच्या व्यक्तींनी जनजातीतर व्यक्तींकडे भोगाधिकार हस्तांतरित करणे) नियम, १९७५ मधील नियम ४ (१) अ (१) नुसार आदिवासी खातेदार व बिगर आदिवासी खातेदार यांच्या अर्जावरून व संमतीनेच स्थानिक चौकशी अंती आदिवासी खातेदाराची जमीन खऱ्याखुऱ्या कृषीत्तर प्रयोजनासाठी बिगर आदिवासी खरेदीदाराकडे राज्यशासनाच्या पूर्वमान्यतेने हस्तांतरण करण्यास मंजूरी देण्यात येते.

आदिवासी ते आदिवासी जमिन विक्री प्रस्तावांच्या अनुषंगाने रितसर चौकशी करून नियमानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन परवानगी देण्यात येते. तसेच आदिवासी ते आदिवासी जमीन विक्री प्रस्ताव व आदिवासी ते बिगर आदिवासी जमिन विक्री प्रस्तावासंदर्भात तक्रार प्राप्त झाल्यास महाराष्ट्र अनुसुचीत जमातींना जमीनी प्रत्यर्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४ अंतर्गत नियमानुसार कार्यवाही करणेत येते.

महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ३६, ३६ अ नुसार बिगर आदिवासी खातेदारास अकृषिक प्रयोजनार्थ विक्रीने हस्तांतरण करण्याच्या आदेशामध्ये संबधित जमिनीचे प्रचलित वार्षिक बाजारमुल्य तक्त्यात नमूद असलेले दर विचारात घेऊन जमिनीचे मुल्यांकन निश्चित करण्यात येते. अशा प्रकारे येणारी मुल्यांकनाची रक्कम अथवा सौदापावती अथवा साठेखतानुसार ठरविण्यात आलेले मुल्यांकन यामध्ये अधिक असेल ती जमिनीची खरेदी किंमत म्हणून निश्चित करून, सदर रक्कम संबधित आदिवासी जमीन मालकास त्यांचे बँक खात्यावर प्राप्त झाल्याची खात्री तहसीलदार यांचेमार्फत करूनच सदर मिळकतीचे ७/१२ सदरी बिगर आदिवासी खरेदीदार यांचे नावांची नोंद केली जाते.

नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील भावली, चिंचले, आवळखेड, वाघाचीवाडी, गव्हांडा, बोरली, पिंपरी व इतर गावांमधील तसेच ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील आदिवासी खातेदारांच्या सद्यस्थितीत कोणत्याही तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत. प्रस्तुत जिल्ह्यामधील आदिवासी बांधवांच्या जमीनींवर भूमाफिया यांनी चाळी बांधत असणे, रिसॉर्ट बांधणे, फार्म हाऊस, हॉटेल्स इतर व्यवसाय करणे या प्रकारचे बेकायदेशीरपणे बांधकामे सुरू केलेले असणे याबाबत कोणत्याही प्रकारचे तक्रार अर्ज जिल्हाधिकारी, नाशिक व जिल्हाधिकारी, ठाणे यांचे कार्यालयास प्राप्त झालेले नाहीत.

मात्र नाशिक जिल्हयात श्रीमती बेबीताई हरिश्चंद्र तेलम, रा. भावली खुर्द इगतपुरी तसेच दिपक सपके, रा. ठाणे यांनी जमीन खरेदी -विक्री करणारे प्रशांत कडु व इतर लोकांविरूध्द जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे तक्रार अर्ज सादर केले होते. तसेच बेबीताई तेलम व इतर यांनी जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे व तहसिल कार्यालय, इगतपुरी येथे उपोषण केले होते. त्यावेळी संबंधितांनी सादर केलेल्या तक्रारी अर्जासंदर्भात चौकशी करून जमीन व्यवहाराची चौकशी करून रितसर खरेदी प्रक्रीया झाली असल्याची माहिती उपोषणकर्त्यांना देण्यात आली होती.

पोलीस स्टेशन इगतपुरी, येथे फिर्यादी प्रशांत कडू यांचे फिर्यादीवरुन बेबीताई हरिश्चंद्र तेलम व इतर यांचे विरुध्द व बेबीताई तेलम यांचे फिर्यादीवरुन प्रशांत कडु व इतर यांचे विरुध्द भा.द. वि. अंतर्गत गुन्हे दाखल आहेत. तसेच गोमा गंगाराम तेलम, गंगुबाई राजु आगिवले व यमुनाबाई बच्चु तेलम यांचे फिर्यादीवरुन भा.द. वि. सह अनुसुचित जाती आणि जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ चे सुधारीत कायदा सन २०१५ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलीस स्टेशन इगतपुरी, येथे दाखल उक्त सर्व गुन्ह्यांमध्ये दोषारोपपत्र दाखल असून गुन्हे न्यायप्रविष्ट आहेत.

ठाणे जिल्ह्यातील शहापुर तालुक्यामधील आदिवासी खातेधारकांच्या जमिनींचे बेकायदेशीरपणे, आदिवासी खातेदारांना दमदाटी करून विक्री व्यवहाराकरिता भाग पाडल्याबाबत तसेच सदर व्यवहारानंतर आदिवासी खातेदारांच्या बँकखात्यामध्ये जमा करण्यात आलेली रक्कम धनादेशाद्वारे किंवा एनएफटी द्वारे काढून घेण्यात आल्याबाबत व त्यामुळे आदिवासी बांधवांनी अनेक वेळा धरणे, रस्ता रोको, आंदोलने व उपोषण करून सुद्धा न्याय न मिळणेबाबतची कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही.

**********

H/808 - 19

लक्षवेधी सूचना क्र.१७५८

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. आमश्या पाडवी, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१७५८ पुढीलप्रमाणे आहे :-

"तळोदे (जि. नंदुरबार) शहराचा सन १९६५ मध्ये सिटी सर्व्हे पार पडलेला असूनही आजपर्यंत त्या सर्व्हेचे प्रत्यक्ष अंमलबजावणीचे काम झालेले नसणे, देशातील जहागिरी खालसा होयून सुद्धा तळोद शहरात जाहागिरी पद्धत अद्याप चालू असणे, परिणामी नागरिकांना त्रास सहन करावा लागणे, कब्जेदार असतानाही मालकी हक्काची नोंद जमीन धारक नागरिकांच्या नावावर नोंदविली जात नसणे, नागरिकांच्या मालमत्ता या जाहागिरदारांचा नावावर सातबाराच्या उताऱ्यावर दाखवले जात असणे, त्यामुळे कब्जेदारावर जमिनीच्या कामाबाबत अथवा घराच्या नुतनीकरणासाठी जाहागिरदाराकडून पैशांची मागणी करण्यात येणे, नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजना (घरकुल), भु-संपत्ती हक्क, शासकीय कर्ज योजना, मालमत्ता कर भरणा, घरपट्टी यांसारख्या योजनांचा थेट लाभ मिळत नसणे, शहरातील अनेक रहिवाशी वर्षोनुवर्ष त्या जमिनीवर राहून ही कायदेशीर मालकी हक्कापासून वंचित राहणे, ही बाब घोर अन्यायकारक असून नागरी विकासाच्या अडथळ्याचे मुख्य कारण ठरत असणे, परिणामी रहिवाशांत शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत तात्काळ जाहागिरी हक्क रद्द करुन सिटी सर्व्हे च्या आधारे रहिवाशांच्या मालकी हक्कांची नोंद करून प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची उपाययोजना."

---

श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

तळोदे शहरातील गावठाणामध्ये ७/१२ उतारे बंद करण्यात आलेले आहेत. तथापि, तळोदे शहरातील गावठाणा व्यतिरिक्त इतर मालमत्तेचे एकूण १२६९१ इतके ७/१२ उतारे उपलब्ध आहेत. परंतु, यापैकी कुठल्याही ७/१२ उताऱ्यावर श्री.बारगळ जहागिरदार इनाम ही नोंद आढळून येत नाही. या सर्व उताऱ्यांवर त्या-त्या मालकांची नावे आहेत. तळोदे शहराचे अधिकार अभिलेख तपासले असता सन १९५० ते १९५३ या कालावधीतील ७/१२ उताऱ्यांवर बारगळ जहागिरदार अशी नोंद आढळून येते. तथापि, नोंद क्र.१५१६ अन्वये मुंबई पर्सनल इनाम ॲबोलिशन ॲक्ट, १९५२ चे कलम ५ प्रमाणे दि.०१.०८.१९५३ पासून कागदोपत्री खालसा असे समजून त्याप्रमाणे दुरूस्ती करावी अशी नोंद दि.२२.०७.१९५४ रोजी घेण्यात आली आहे. या नोंदीवरून वैयक्तिक इनाम खालसा झाल्याचे दिसून येतात व सद्यस्थितीत गावठाणा बाहेरील क्षेत्राच्या कुठल्याही ७/१२ वरती इनामाबाबत नोंद आढळून येत नाही.

शहर तळोदा ता. तळोदा जि. नंदुरबार येथे सविस्तर मोजणी व चौकशी होवून नगर भूमापन योजना सन १९५३ मध्ये अंमलात आली आहे. सदर चौकशीवेळी तत्कालीन चौकशी अधिकारी यांचेसमोर संबंधित धारक यांनी समक्ष दिलेल्या महसूल अधिकार अभिलेख अथवा ग्रामपंचायत अभिलेखांच्या पुराव्यानुसार मिळकतीची चौकशी करुन निर्णय पारित केलेले आहे. तळोदा शहरामध्ये सद्यस्थितीतील नगर भूमापन अभिलेखानुसार एकुण ४६४३ मिळकत पत्रिका असून त्यापैकी ४२५ मिळकत पत्रिकांवर बारगळ जहागिरदार

या नावाने धारक सदरी नोंद असून इतर हक्कात पट्टेदार/कब्जेदार यांची नावे दाखल झालेली आहेत. कब्जेदारांवर जमिनीच्या कामाबाबत अथवा घराच्या नुतनीकरणासाठी जहागिरदार यांच्याकडून पैशांची मागणी करण्याबाबत लेखी तक्रार प्राप्त नसल्याने अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

चौकशीवेळी ज्या धारकांची नावे धारक सदरी दाखल झाली आहेत अशा धारकांचे व्यवहाराबाबत जसे वारस / खरेदी व तत्सम नोंदीबाबत कार्यवाही वेळोवेळी करणेत येते. संबंधित धारक/पट्टेदार यांना तत्कालीन चौकशी अधिकारी यांनी दिलेला निर्णय मान्य नसल्यास पुराव्याचे कागदपत्रानुसार सक्षम प्राधिकारी म्हणजेच जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख, नंदुरबार / उप संचालक भूमि अभिलेख, नाशिक यांचेकडे अपिल करुन दाद मागणी करणे आवश्यक आहे. तथापि, बारगळ जहागिरदार या नावाने धारक सदरी नोंद असून इतर हक्कात पट्टेदार/कब्जेदार यांची नावे दाखल असलेल्या मिळकत पत्रिकांबाबत काही न्यायालयीन प्रकरणे असल्यास ती विचारात घेऊन सदर मिळकत पत्रिकांवरील नोंदी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम २५७ अन्वये पुनरिक्षणात घेऊन कार्यवाही करण्यात येईल.

..................................

लक्षवेधी सूचना क्र.१७९१

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. किशोर पाटील, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१७९१ पुढीलप्रमाणे आहे :-**

"पाचोरा व भडगांव नगरपालिका (जि. जळगांव) हद्दीत सुमारे ७ हजार नागरिकांनी शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून बांधलेली घरे धारकांच्या नावावर करण्यासंदर्भात शासन निर्णय क्र.एमयूएन-२०१८/प्र.क्र.१९७/नवि१८ दि.१७.९.२०१८ निर्णय घेण्यात येणे, त्यानुसार भूमिअभिलेख कार्यालय अंतर्गत मोजणी करणे आवश्यक असल्याने त्या मोजणीकरिता लागणारी रक्कम स्थानिक नगरपालिकांना भरणे शक्य नसणे, पंतप्रधान आवास योजना, रमाई घरकूल योजना, शबरी माता घरकूल योजना यासारख्या मा.पंतप्रधान यांच्या महत्वाकांक्षी योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांना न मिळणे, याकरिता शासनस्तरावर मोजणी रक्कम माफ करून संबधित अधिका-यांना विनामूल्य करण्याचे आदेश देण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना माहे डिसेंबर, २०२४ च्या दरम्यान लेखी निवेदन देऊनही कोणताच निर्णय न होणे, परिणामी लाभार्थ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

भडगांव नगर परिषद हद्दीतील शासकीय जमीनीवर अतिक्रमण करुन बांधलेल्या घरांची मोजणी करण्याबाबत मा. विधानसभा सदस्य यांच्यासोबत मुख्याधिकारी, नगर परीषद, भडगांव, तहसिलदार, भडगांव तसेच उप अधीक्षक भूमि अभिलेख, भडगांव यांची दि.१६/०१/२०२५ रोजी संयुक्त बैठक पार पडली होती.

मुख्याधिकारी, नगर परीषद, भडगांव या कार्यालयाकडून दि.०९/०८/२०२४ रोजी उप अधिक्षक भूमि अभिलेख, भडगांव यांना मौजे कराब येथील गावठाणातील वस्तीच्या ७७ अतिक्रमीत मिळकतींची मोजणी करण्याचा प्रस्ताव सादर केला होता. त्यास अनुसरून दि.१७/१०/२०२४ रोजीच्या पत्रान्वये नगर परिषदेस मोजणी फी भरणा करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार नगर परिषद, भडगांव कडून दि.०५/०३/२०२५ रोजी मोजणी फी भरल्याचे चलन उप अधिक्षक भूमि अभिलेख, भडगांव या कार्यालयास प्राप्त झाले. उप अधिक्षक भूमि अभिलेख, भडगांव कार्यालयाकडून दि.१४/०७/२०२५ अखेर अतिक्रमीत ७७ मिळकतींच्या मोजणीचे काम पुर्ण झाले आहे. सदर गावठाणातील ७७ मिळकतीच्या जागेचे यापुर्वी सर्व्हेक्षण झालेले नसल्याने अभिलेखात कोणताही नकाशा उपलब्ध नाही. त्यामुळे संबधीत मिळकती अक्षांश व रेखांशासह जी. आय. एस. प्लॅटफॉर्मवर बसविण्याची कार्यवाही पुढील १५ दिवसामध्ये करुन मोजणी नकाशा नगरपरिषद भडगांव यांना पुरविण्याची तजविज ठेवण्यात येत आहे.

पाचोरा नगर परिषद हद्दीतील शासकीय जमिनीवर अतिक्रमण करुन बांधलेल्या घरांची मोजणी करण्याबाबत मुख्याधिकारी, पाचोरा नगर परिषद, पाचोरा यांच्याकडून उप अधीक्षक भूमि अभिलेख,

पाचोरा कार्यालयास सन २०२१ मध्ये प्रस्ताव प्राप्त झाला होता. त्याअनुषंगाने उप अधीक्षक भूमि अभिलेख, पाचोरा यांनी मुख्याधिकारी, पाचोरा नगर परिषद यांना दि.१६/०९/२०२१ च्या पत्रान्वये रू.४६,८३,०००/- मोजणी फी भरणे बाबत कळविले होते. तद्नंतर मुख्याधिकारी, नगरपरिषद पाचोरा यांनी नगर भूमापन क्रमांक ३३७९ मध्ये समाविष्ट असलेल्या २१५ अतिक्रमित मिळकतींची मोजणी फी रू.३,१८,०००/- दि.३०/०९/२०२४ रोजी भरणा केली. त्यानुसार उप अधीक्षक भूमि अभिलेख, पाचोरा या कार्यालयाकडून दि.३१/०१/२०२५ ते दि.२८/०२/२०२५ या कालावधीत एकूण २१५ अतिक्रमित मिळकतींच्या मोजणीची कार्यवाही पुर्ण करण्यात आलेली आहे.

नगरपरिषद हद्दीतील उर्वरित मिळकतींच्या मोजणीचा प्रस्ताव मुख्याधिकारी, नगरपरिषद पाचोरा यांच्याकडून प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करण्याची तजविज ठेवण्यात येत आहे.

महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम, १९६६ चे कलम १३६ आणि महाराष्ट्र जमिन महसुल (सीमा व चिन्हे) नियम, १९६९ चे कलम १३(२) मधील तरतुदींनुसार मोजणी फी चा सुधारीत दर निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार जमाबंदी आयुक्त, पुणे या कार्यालयाचे परिपत्रक दि.११/१०/२०२४ अन्वये शासकीय मोजणीसाठी नियमित दराने मोजणी फी घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे. सर्वासाठी घरे या योजनेंतर्गत प्रदान करण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री आवास योजनेतील घरांना शासनाकडून ५० टक्के मोजणी फीची सवलत देण्यात येते.

.....................................

लक्षवेधी सुचना क्र. १७९२

महाराष्ट्र विधानसभा

सन-२०२५ चे दुसरे (पावसाळी अधिवेशन)

**श्री. किशोर पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र. १७९२ पुढीलप्रमाणे आहे:-**

" राज्यात सिलींग कायदयांतर्गत वाटप करण्यात आलेल्या नविन अविभाज्य शर्तीवरील जमिनी या मुळातच भूमिहिन व प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्यात येणे, परंतु ब-याच प्रकारच्या नविन अविभाज्य शर्तिच्या जमिनी या वर्ग १ करणेबाबत शासनाने वेळोवेळी शासन निर्णय काढून ५० टक्के नजराणा भरून त्या त्या जमिनी वर्ग १ करण्याबाबतचा निर्णय घेतला येणे, दिनांक ९ जुलै, २००२ च्या शासन निर्णयाप्रमाणे इनाम जमिनी सुध्दा ५० टक्के नजराणा भरून वर्ग १ करण्यात येणे, सिलींग कायदयांतर्गत अंतर्गत वाटप झालेल्या जमिनीच नजराणा रक्कम भरुन वर्ग १ होत नसणे, शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सिलींग कायदयांअंतर्गत वाटप करण्यात आलेल्या नविन अविभाज्य शर्तीवरील जमिनी यांना दिनांक ८ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयानुसार सिलींग कायदयांतर्गत वाटप करण्यात आलेल्या जमिनीबाबत काढण्यात यावा किंवा लागू करण्यात यावा व सिलींग कायदयांतर्गत भूमिहिन व प्रकल्पग्रस्तांना वाटप झालेल्या जमिनींना वर्ग-१ (जुनी शर्त) लागू करण्याबाबत योग्य तो निर्णय घेण्याची मागणी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांच्याकडे वारंवार करण्यात येऊन कोणताच निर्णय होत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका".

---

मा. मंत्री ( महसूल ) यांचे निवेदन

महाराष्ट्र शेत जमीन ( जमीन धारणेची कमाल मर्यादा ) अधिनियम, १९६१ च्या कलम २१ अन्वये अतिरिक्त जमीन म्हणून घोषित केलेल्या जमिनीपैकी उक्त अधिनियमातील कलम २७ अन्वये भूमिहीन, माजी सैनिक व इतर यांना भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकाराने जमिनीचे वाटप करण्यात आलेले आहे. प्रस्तुत जमिनींचे भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकारातुन भोगवटादार वर्ग-१ या धारणाधिकारात रुपांतरण करण्याबाबत उक्त अधिनियमामध्ये सुधारणा

करण्यात येऊन कलम २९ (अ) अंतर्भुत करण्यात आले आहे. त्याबाबतची अधिसुचना दिनांक १९ जानेवारी, २०२४ रोजी राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. उक्त सुधारणेमध्ये कलम २९ (अ) अन्वये भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकारातुन भोगवटादार वर्ग-१ या धारणाधिकारात रुपांतरीत करण्याबाबतचे रुपांतरण अधिमुल्य, रुपातंरणासाठीची कार्यपद्धती आणि अटी व शर्ती विहित करण्याची तरतूद उक्त अधिनियमाच्या कलम ४६ (२) (इ -१) मध्ये करण्यात आली आहे.

त्यानुषंगाने उक्त अधिनियमातील कलम २७ अन्वये भूमिहीन, माजी सैनिक व इतर यांना वाटप करण्यात आलेल्या जमिनीचे भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकारातुन भोगवटादार वर्ग-१ या धारणाधिकारात रुपांतरीत करण्याबाबतचे रुपांतरण अधिमुल्य, रुपातंरणासाठीची कार्यपद्धती आणि अटी व शर्ती विहित करण्याकरिता नियम तयार करण्याच्या अनुषंगाने शिफ़ारशी करण्याची जबाबदारी श्री. उमाकांत दांगट, भा.प्र.से ( सेवानिवृत्त ) यांच्या अध्यक्षतेखालील महसूल कायदा सुधारणा समितीला शासन निर्णय दिनांक १६ मार्च, २०२४ अन्वये देण्यात आलेली होती. सदरहू समितीने दिनांक १० जुन, २०२४ रोजी शिफ़ारशी शासनास सादर केलेल्या आहेत. समितीच्या शिफ़ारशींवर सर्वकष विचारविनिमय करून शिफ़ारशी सुधारणेसह शासनाने दिनांक १० फ़ेब्रुवारी, २०२५ रोजी स्विकृत केल्या आहेत. शासनाने सुधारणेसह स्विकृत केलेल्या शिफ़ारशींच्या अनुषंगाने प्रसिध्द करावयाच्या नियमांचे प्रारूप तपासून देण्याची विनंती विधी व न्याय विभागास करण्यात आली होती. त्यावर विधी व न्याय विभागाने सदर प्रारुपामध्ये दि.०३.०७.२०२५ रोजी सुधारणा सुचावल्या आहेत. विधी व न्याय विभागाने सुचवलेल्या सुधारणेनुसार आवश्यक त्या बदलासह सुधारीत प्रारुप विधी व न्याय विभागाने तपासून दिल्यानंतर विहीत कार्यपध्दती अनुसरुन नियम अंतिम करण्याचे संकल्पित आहे.

*******

लक्षवेधी सूचना क्र.१९१८
महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे व्दितीय अधिवेशन

**श्री.संग्राम जगताप, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना १९१८ पुढीलप्रमाणे आहे:-**

---

## लक्षवेधी सूचना

" शेख साजिद व शेख खलील हे सन २००१ पासुन मुद्रांक विक्रेते असणे, सन २००१-२००४ दरम्यान तहसील कार्यालय साक्री येथे बनावट जात प्रमाणपत्र प्रकरणात संबंधितांना शास्ती झालेली असणे, त्यानंतर संबंधित व्यक्तींनी पुनश्च: मालेगाव येथे मुद्रांक विक्री व्यवसाय सुरु केलेला असणे, गैरव्यवहार केल्यामुळे काही कालावधीकरिता संबंधिताचा मुद्रांक विक्री परवाना रद्द झालेला असणे, जमिनीच्या व्यवहारात विविध प्रकारचे बनावट नकाशे व बनावट दस्त तयार करुन तसेच बोगस बिनशेती आदेश घेवून अंदाजे १०० ते १२५ कोटी रुपयांची मालमत्ता स्वत: व कुटुंबाच्या नावावर जमा केलेली असणे, सन २०२२-२३ मध्ये मालेगाव येथे पेट्रोलपंप ८.९० कोटींना खरेदी केलेला असणे, त्यावर लक्षवेधी क्रमांक ४०६ अन्वये तक्रार झाल्यानंतर चौकशी समितीमार्फत शासनाचे ९० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे निष्पन्न झाले असणे व त्याबाबतची वसुलीची शिफारस केलेली असणे, परंतु आजतागायत वसुली झालेली नसणे, मालेगाव शहरातील एक संशयित दहशतवादी फरार झाल्यावर त्याच्या मालमत्तेचे दस्त शेख साजिद, शेख वाजिद व ॲड. मन्नान यांच्या संगनमताने बनावट ओळखपत्राच्या आधारे नोंदवण्यात आले असणे, सदर बनावट खरेदीखताबाबत तक्रार दाखल झालेली असणे, त्यामुळे या गंभीर प्रकरणाची आर्थिक गुन्हे शाखा तसेच अंमलबजावणी संचालनालय (E.D.) यांच्यामार्फत चौकशी होऊन सदर घटनेतील संपत्ती जप्त करणेबाबत शासनाची भुमिका व उपाययोजना."

## श्री.चंद्रशेखर बावनकुळे, मा.मंत्री(महसूल) यांचे निवेदन

श्री. शेख साजिद शेख खलील हा तहसील कंपाऊंड, मालेगाव या ठिकाणी मुद्रांक विक्री करणारा परवानाधारक मुद्रांक विक्रेता असून त्याचा परवाना क्रमांक ३७/२००१ आहे. त्याचा सन २०२४-२०२७ या कालावधीसाठी परवाना नूतनीकरणाचा अर्ज सह दुय्यम निबंधक, मालेगाव क्रमांक १ यांच्या शिफारशीसह सह जिल्हा निबंधक, वर्ग-१ नाशिक यांना प्राप्त झाला होता. तथापि, सदर मुद्रांक विक्री परवान्याचे नूतनीकरण करण्यात येऊ नये असे निवेदन सह जिल्हा निबंधक नाशिक या कार्यालयास प्राप्त झाले होते. सदर निवेदनात गंभीर स्वरूपाचे आक्षेप घेण्यात आल्याने सदर परवान्याचे नूतनीकरण थांबवून संबंधितांना सुनावणी देण्यात आली होती. तसेच मुद्रांक विक्री व साठा नोंदवही तपासणी बाबत सह दुय्यम निबंधक मालेगाव क्र.१ यांना निर्देश देण्यात आले होते. मुद्रांक परवाना नूतनीकरण झालेले नसल्यामुळे मुद्रांक साठा निरंक असल्याचा अहवाल सह दुय्यम निबंधक मालेगाव यांनी सादर केलेला आहे. मुद्रांक विक्रेता यांनी सुनावणी दरम्यान लेखी खुलासा सादर करून तक्रार अर्ज खोटा व बनावट असल्याचे नमूद करून तक्रार निकाली काढण्याची विनंती केली होती.

सदर सुनावणीस तक्रारदार हजर न राहिल्याने तक्रारदारास पुढील सुनावणीकरिता उपस्थित राहण्याबाबत पत्र पाठवण्याचे निर्देश देण्यात आले होते. तथापि तक्रारदार सुनावणीस हजर न राहिल्याने मुद्रांक

विक्रेता यांनी तक्रार अर्जातील नावे बनावट असून पत्ता देखील टाकलेला नाही. त्यामुळे जाणून-बुजून मुद्रांक विक्री परवाना नूतनीकरण थांबवण्यासाठी खोटा व बनावट अर्ज केला असल्याचे नमूद करून अर्ज निकाली काढावा व परवाना नूतनीकरण करण्यात यावे अशी विनंती केली आहे.

सदर तक्रार प्रकरणाची सह जिल्हा निबंधक वर्ग-१ धुळे यांनी चौकशी करुन दि.२१.१.२०२५ अन्वये सादर केलेल्या अहवालानुसार पुढील बाबी स्पष्ट होतात. मुद्रांक विक्रेता शेख साजीद शेख खलील यांचा परवाना नुतनीकरण झालेला नसल्याने आज रोजी ते मुद्रांक विक्री करीत नाहीत. सबब चौकशीदरम्यान ते मुद्रांक विक्रीचे ठिकाणी बसत नसल्याने मुंबई मुद्रांक पुरवठा व विक्री नियम १९३७ चा भंग झाला असे म्हणता येत नाही. सदर मुद्रांक विक्रेता शेख साजीद शेख खलील मु.वि. परवाना क्र.३७/२००१ हा फक्त स्वत:साठी व भू-माफीयांसाठी मुद्रांक विक्री करतो किंवा अत्यंत कमी मुद्रांक विक्री केली आहे, किंवा जनतेस मुद्रांक विक्री करत नाही यात कोणत्याही प्रकारचे तथ्य असल्याचे चौकशी दरम्यान आढळुन आले नाही. संबंधित मुद्रांक विक्रेता दस्त नोंदणी करुन घेण्यासाठी दबाव तंत्राचा, राजकीय लोकाचा वापर करुन गैरमार्गाने अथवा त्यांचे माणसांमार्फत सह दुय्यम निबंधक कार्यालयातील संगणकांवर बेकायदेशिर दस्तांची नोंदणी करतात याबाबतीत संबंधित तीनही सह दुय्यम निबंधक यांचे अहवाल प्राप्त करुन घेण्यात आलेले आहेत. तसेच यापुर्वीच मा. सह जिल्हा निबंधक वर्ग-१, तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, नाशिक यांचे कार्यालयामार्फत तीनही कार्यालयांची तपासणी करुन नोंदणी अधिनियम चे कलम २१ व नोंदणी नियम १९६१ चे नियम ४४ (ई) चा भंग करुन नोंदणी करण्यात आलेल्या दस्तऐवजांचे बाबतीत व तत्कालीन नोंदणी अधिकारी यांचे बाबतीत प्रशासकीय कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच धुळे येथील मुद्रांक विक्रेता श्री. भालचंद्र दत्तात्रय भांडारकर यांचा मुद्रांक विक्री परवाना ३/१९९३ यांचेवर कार्यवाही करुन सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, धुळे यांचे आदेश दि. १३/१२/२०२४ अन्वये मुद्रांक विक्री परवाना निलंबित करण्यात आला आहे.

मुद्रांक विक्रेता यांनी मौजे दरेगाव येथे खरेदी केलेल्या पेट्रोल पंपाची मिळकत व त्यावरील बांधकामाचे बाजारमूल्य रुपये ६७ लाख ७२ हजार एवढे असून त्यात मुद्रांक शुल्क रु. ४ लाख व नोंदणी फी रु. ३० हजार वसूल केलेली आहे.

तक्रारदार यांनी तक्रार अर्जात नमूद केलेल्या ७० दस्तऐवजात न्युन मुद्रांक शुल्क व नोंदणी फी ची आकरणी असून त्या दस्तऐवजातील रक्कम वसुल करणेसाठी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील तरतुदीनुसार वसुलीची कार्यवाही करण्याचे निर्देश सह दुय्यम निबंधक मालेगांव क्र. ३ यांना सह जिल्हा निबंधक वर्ग-१, नाशिक यांच्या स्तरावरुन देण्यात आले आहेत. तसेच मालेगांव महानगरपालिका हद्दीतील संगमेश्वर येथील स. नं. १२१ मधील मिळकतीच्या खरेदीखताच्या दस्तऐवजामध्ये झालेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने संबंधीत दुय्यम निबंधक यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून संबंधीतांचा खुलासा प्राप्त होताच त्यांचेविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल. सदर प्रकरणी दस्त क्रमांक ४५४४/२०२० या दस्ताची दुय्यम निबंधक यांना फसवणूक करुन नोंदणी झाली असल्याचे दिसून येते. तरी याबाबत संबंधीत व्यक्ती विरुध्द नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८२ व ८३ मधील तरतूदीनुसार उचीत कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल सादर करणे बाबत सह दुय्यम निबंधक वर्ग-२ मालेगांव क्र. ३ यांना कळविण्यात आले

होते. त्यानुसार त्यांनी संबंधीत व्यक्तीविरुध्द छावणी प्रथम खबर क्र. ०१५३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

गैरअर्जदार श्री. शेख साजिद शेख खलील यांचा मुद्रांक विक्री परवाना तक्रार निवेदनाची सखोल चौकशी होईपर्यंत नूतनीकरण करण्यात येणार नाही व तक्रार अर्जदार यांनी लेखी कागदपत्रे पुरावे सादर करून सुनावणीस व चौकशी सहकार्य केल्यास यामध्ये मुद्रांक विक्रेता दोषी आढळून आल्यास त्याच्यावर मुद्रांक पुरवठा व विक्री नियम १९३४ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

शेख साजिद शेख हे मुद्रांक विक्रेता असून त्यांचा तहसिल कार्यालयाशी अथवा उपविभागीय कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयासोबत कोणताही संबंध येत नाही. मुद्रांक विक्रेता या नात्याने ते त्यांच्या स्तरावर व्यवसाय करतात. मुद्रांक विक्री प्रकरणी काही अनियमितता आढळून आल्यास नियमानूसार कारवाई करण्यात येईल.

******************************

लक्षवेधी सूचना क्र.१९२८.

महाराष्ट्र विधानसभा

सन-२०२५ चे (पावसाळी) अधिवेशन

**श्रीमती सिमा महेश हिरे, डॉ. जितेंद्र अव्हाड, श्री. बापुसाहेब पठारे, श्री. सुनिल प्रभु, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्रमांक १९२८ पुढीलप्रमाणे आहे :-**

" नाशिक शहरातील मध्यवस्तीत असलेल्या शरणपूर रोडवरील जुन्या पोलिस आयुक्तालासह परिसरातील ६ एकर जमिनीचे कायदेशीर अधिकार नसतांना बांधकाम व्यवसायीक व नाशिक डायोसेशन ट्रस्टच्या विश्वस्तांनी डल्ला मारल्याचे माहे जून, २०२५ मध्ये उघडकीस येणे, सदर प्रकरणात बांधकाम व्यवसायीक व नाशिक डायोसेशन कौन्सिलच्या विश्वस्थांनी शासनाची सुमारे ३०० कोटी रुपयांची केलेली फसवणूक, अशाच प्रकारे नाशिक जिल्ह्यातील इतर ठिकाणच्या ५० एकर शासकीय जमिनीवर डल्ला मारत सुमारे पाच हजार कोटीपर्यंत घोटाळा उघडकीस येण्याची शक्यता वर्तवण्यात येणे, याबाबत सरकारवाडा पोलिस ठाण्यात ट्रस्टच्या १६ सदस्यांसह २१ बांधकाम व्यावसायीक अशा ३७ जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला असणे, सदर घोटाळ्यात धर्मादाय आयुक्त, महसूल विभागातील अधिकारी, कर्मचारी, उपजिल्हाधिकारी यांचा समावेश असणे, उक्त विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने बांधकाम व्यवसायीक व नाशिक डायोसेशन ट्रस्टच्या विश्वस्तांनी शासनाची कोट्यावधी रुपयांची केलेली फसवणूक, शासनाने उक्त प्रकरणी तातडीने पारदर्शक चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

---

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

शहर नाशिक, ता.जि. नाशिक येथील शरणपुर गावठाण भागाचे नगर भूमापन सन १९४५ ते १९४७ या कालावधीत करण्यात आले आहे. नगर भूमापन चौकशीअंती नगर भूमापन क्रमांक ६८७४ व इतर नगर भूमापन क्रमांक यावर सन १९४५ मध्ये धारक दि चर्च मिशनरी ट्रस्ट असोशिएशन लि. नाशिक असे नांव दाखल आहे. तसेच दिनांक ०४/०६/१९५६ ट्रान्सफर डीड दस्त क्र.१०००/४९, दस्त क्र.१३९५/४९ व दस्त क्र. ३२९/१९५५ च्या नोंदीने धारक सदरी नाशिक डायोसेशन ट्रस्ट असोशिएशन लि. चे नांव दाखल आहे.

नोंदणीकृत खरेदी दस्त क्र.५०४४/२००१ नाशिक डायोसेशन कौन्सिल मुंबई तर्फे त्यांचे बोर्ड ऑफ ट्रस्टी श्री.अविनाश बलकुंदी व इतर या सर्वांचे जनरल मुखत्यार म्हणून श्री.अविनाश बलकुंदी यांनी श्री.पंकज प्रभाकर मालपुरे व इतर २० यांना नगर भूमापन क्रमांक ६८७४ (शिल्लक क्षेत्र), ६८७५ पार्ट, ६८७६, ६८७७, ६८७८, ६८८०, ६८८१, ६८८२, ६८८३ यापैकी २६,०००.०० चौ.मी. क्षेत्राची खरेदी दिली. त्यानुसार मिळकत पत्रीकेवर फेरफार नोंद क्र.५३७/२००१ प्रमाणे खरेदी घेणार श्री. पंकज प्रभाकर मालपुरे व इतर २० यांची नांवे मिळकत पत्रीकेवर दाखल झालेली आहेत.

दरम्यानचे काळामध्ये मिळकतीबाबत नाशिक डायोसेशन ट्रस्ट असोशिएशन प्रा. लि. तर्फे श्री. अरविंद गंगाधर मोरे यांनी सदर फेरफार नोंद क्र.५३७/२००१ ला आक्षेप घेत अधीक्षक भूमि अभिलेख, नाशिक यांचेकडे अपील क्र.३२८/२००६ दाखल केले. त्यावर जिल्हा अधिक्षक यांनी दिनांक ३०/११/२००६ रोजी आदेश पारित केले. उक्त आदेशामध्ये अपीलदार यांचे अपील अंशत: मान्य करून प्रकरण पुर्नविलोकन करण्यासाठी नगर भूमापन अधिकारी, नाशिक यांचेकडे वर्ग केले.

अधीक्षक भूमि अभिलेख, नाशिक यांचे निर्णयाविरुध्द खरेदी दस्त क्र.५०४४/२००१ मधील खरेदीकर्ते पंकज प्रभाकर मालपुरे व इतर ४४ यांनी उपसंचालक भूमि अभिलेख, नाशिक प्रदेश नाशिक यांचेकडे अपील क्र. ४०५/२००७ व ५३/२००७ दाखल केले. त्यामध्ये उपसंचालक भूमि अभिलेख, नाशिक प्रदेश नाशिक यांनी

दिनांक २०/०४/२०११ अन्वये आदेश पारित केले. त्यामध्ये अधीक्षक भूमि अभिलेख, नाशिक यांचे दिनांक ३०/११/२००६ चा आदेश व मिळकत पत्रिकांवर झालेल्या नोंदीच्या गुणवत्तेबाबत उचित कागदपत्रांनिशी अपील सादर करून कार्यवाही करून घेण्याची जाबदार यांना मुभा ठेवून अपील रद्द करण्यात येत आहे असे आदेश पारित केले.

उपसंचालक भूमि अभिलेख, नाशिक प्रदेश नाशिक यांचे निर्णयाविरूध्द अपीलदार पंकज प्रभाकर मालपुरे व इतर २० यांनी तत्का. मा.मंत्री (महसूल) यांचेकडे अपील दाखल केले. त्यावर मा. मंत्री (महसुल) यांनी दिनांक २७/६/२०२२ अन्वये कनिष्ठ न्यायालयाने अर्जदार यांचे लाभातील नोंदी यापुर्वीच कायम केल्या असल्याने प्रस्तुत फेरतपासणी अर्ज निष्प्रभ ठरतो असे आदेश पारित केले. मा. मंत्री (महसूल) यांचे आदेशाविरूध्द नाशिक डायोसेशन ट्रस्ट असोशिएशन प्रा. लि. चे डॉ. श्री. अरविंद गंगाधर मोरे यांनी पुर्नविलोकनासाठी तत्का.मा.मंत्री (महसूल) यांचेकडे पुर्नविलोकन अर्ज सादर केला त्यावर दिनांक १४/१०/२०२४ रोजीच्या आदेशान्वये अर्जदार यांचा पुर्नविलोकन अर्ज मंजुर करण्यात येवून तत्का. मा.मंत्री (महसूल) दिनांक २७/०६/२०२२ रोजीचे आदेश रद्द करण्यात आले.

पोलीस उपआयुक्त परिमंडल-१, नाशिक यांनी दिनांक २३/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये मौजे नाशिक शहर (शरणपुर), ता. नाशिक जिल्हा नाशिक, नाशिक महानगरपालिका हद्दीतील नगर भुमापन क्रमांक १) ६८७५ (जुना सर्वे नं. ६४९/ अ/१ पैकी) २) ६८७८ (जुना सर्वे नं.६५१/ क + ६५२ ब) ३) ६८८३ (जुना सर्वे नं. ६५१अ) ४) ६८८७ (जुना सर्वे नं. ६५२अ) या जमीनीवर जुने पोलीस आयुक्त कार्यालय, नाशिक शहर हे कार्यरत होते व उपरोक्त जमीनीवर १) पोलीस उप आयुक्त, परिमंडळ क्र. १, नाशिक शहर २) सहायक पोलीस आयुक्त, सरकारवाडा विभाग, नाशिक शहर ३) सहा. पोलीस आयुक्त, शहर वाहतुक शाखा, नाशिक शहर व ४) दंगल नियंत्रण पथक, नाशिक शहर या आस्थापना कार्यरत असून जुने पोलीस आयुक्त कार्यालय, नाशिक शहर ज्या जमीनीवर कार्यरत होते त्या जमीनीबाबत दुय्यम निबंधक, नाशिक कार्यालयाद्वारे दस्त क्र. ५०४४/२००१ नोंदविण्यात आला असल्याची बाब निदर्शनास आणून दिली. मात्र, पोलीस उपआयुक्त परिमंडल-१, नाशिक यांनी उल्लेख केलेल्या उपरोक्त नगर भुमापन क्रमांकाच्या मिळकतपत्रिका पाहता त्यावर पोलीस उपआयुक्त परिमंडल-१, नाशिक हे धारक अथवा सहधारक असल्याचे दिसून येत नाही.

पोलीस उपआयुक्त परिमंडल-१, नाशिक यांचे पत्रास अनुसरून नगर भूमापन अधिकारी, नाशिक यांनी संबंधीतांना नोटीस देऊन चौकशीची कार्यवाही सुरू केली चौकशी अंती नाशिक डायोनेशन कौन्सील या नावाने मिळत पत्रिकेवर धारक सदरी नावे दाखल नसल्यामुळे झालेल्या मिळकतपत्रिकेवरील नोंदी या ट्रस्टच्या नावाचा आभास निर्माण करून झाल्या असल्याचे निदर्शनास आल्याने नगर भूमापन अधिकारी, नाशिक यांनी दिनांक ०३/०६/२०२५ चे आदेशान्वये दस्त क्र. ५०४४/२००१ अन्वये खरेदी घेणार धारकांची नांवे कमी करण्याबाबत आदेश केलेला आहे व मिळकत पत्रीकेवर सन १९४५ व दिनांक ०४/०६/१९५६ चे नोंदीप्रमाणे नांवे पुर्नजिवीत करणेत आलेली आहेत. यावर संबंधीतांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे क्र.१९८५३/२०२५ व २००६२/२०२५ अन्वये दावे दाखल केले असून त्यामध्ये अंतरीम स्थगिती आदेश दिलेले आहेत.

वादाकित मिळकतीस नाशिक डायोसेशन कौन्सिल असे नांव दाखल असल्याचे दिसून येत नाही. नाशिक डायोसेशन कौन्सिलचे तत्कालीन विश्वस्थ यांनी नावातील सारखेपणाचा फायदा घेऊन लिमीटेड व कौन्सिल ही संस्था एकच असलेबाबत दस्त नोंदवलेले आहेत. त्याबाबत पोलीस विभागाने सरकारवाडा पोलीस स्टेशन येथे दिनांक ११/०६/२०२५ रोजी एफआयआर क्र. ०१६६/२०२५ अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे. संबंधीत संस्थेचे तत्कालीन विश्वस्थ व खरेदी घेणार व्यवसायीक यांनी जामीन घेतलेला असून सध्यस्थितीत पोलीस विभागाकडून चौकशीची कार्यवाही चालु आहे.

************

H/807-19

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री.सिध्दार्थ शिरोळे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १९४७ पुढीलप्रमाणे आहे –

"पुणे जिल्ह्यातील ता. शिरूर येथील तळेगाव ढमढेरे, जांबूत, टाकळीहाजी, मलठण, पिंपरखेड याठिकाणी ग्रामपंचायतीची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता अनधिकृतपणे धार्मिस्थळांचे बांधकाम सुरु असणे, सदर बांधकामावर आजपर्यंत अतिक्रमण, निष्कासनाबाबतची कार्यवाही न करता फक्त अतिक्रमण धारक यांना ग्रामपंचायतींमार्फत अतिक्रमण काढून टाकण्याबाबतच्या नोटीस दिलेल्या असणे, सदर अतिक्रमण धारकांमार्फत नोटीसींना कोणतेही सबळ उत्तर न देता अनधिकृत बांधकाम चालू ठेवलेले असणे, तरीसुध्दा शासकीय यंत्रणांमार्फत कोणतीही ठोस कारवाई झालेली नसणे. अशाप्रकारे पुणे तसेच महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यात धार्मिकस्थळांचे अनधिकृत बांधकाम होत असणे, त्यावर शासकीय यंत्रणांमार्फत कोणतीही कारवाई होत नसणे त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील धार्मिकस्थळांच्या अनधिकृत बांधकामाची यादी तयार करणे गरजेचे असणे व सदर यादी जिल्हानिहाय संकेतस्थळावर प्रसिध्द करणे, तसेच सर्व अनधिकृत धार्मिकस्थळांवर निष्कासनाची कार्यवाही करणेबाबत कालबध्द कार्यक्रम राबविण्याबाबत शासनाची भुमिका व आवश्यक उपाययोजना."

---

मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मौजे तळेगांव ढमढेरे, ता. शिरुर, जि. पुणे या गावामध्ये शासकीय जमिनीवर धार्मिक स्थळांचे अनाधिकृत बांधकाम आढळून येत नाही.

तथापि, मौजे तळेगांव ढमढेरे येथील खाजगी जमीन गट नं. ३६४२ मध्ये श्री. चर्च आट बेथने तर्फे लकपा तामंग यांनी विनापरवानगी अनाधिकृत धार्मिक स्थळांचे व निवासी बांधकाम केल्याने ग्राम विकास अधिकारी व सरपंच यांनी ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ५२, ५३ अन्वये एकूण ३ वेळा संबंधितांना नोटीस दिलेल्या आहेत.

मौजे जांबूत येथील धार्मिक स्थळ श्रीमती हिराबाई कचर गायकवाड यांचे जमीन गट नं. ७१०/१ या खाजगी क्षेत्रात असून सदर बांधकामाची नोंद ग्रामपंचायत दप्तरात धार्मिक स्थळ अशी केलेली नाही.

मौजे टाकळीहाजी येथील धार्मिक स्थळ श्री. प्रशांत जालिंदर घोडे यांचे जमीन गट नं. ७२२ या खाजगी क्षेत्रात असून सदर बांधकामाची नोंद ग्रामपंचायत दप्तरात धार्मिक स्थळ अशी केलेली नाही.

मौजे टाकळीहाजी येथील धार्मिक स्थळामध्ये धर्मांतर करणेची घटना घडत असताना त्यावर ग्रामस्थांनी कारवाई करून सदरचा प्रकार हाणून पाडला. त्याबाबत पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून संबंधितांना अटक करण्यात आलेली होती.

तसेच सदरचे धार्मिक स्थळ अनाधिकृत असल्याने दिनांक २९/०५/२०२५ रोजीची मासिक सभा व दिनांक ३०/०५/२०२५ रोजीची ग्रामसभा यामध्ये देणेत आलेल्या ठरावानुसार सदर धार्मिक स्थळावर कारवाई करणेबाबत ग्रामपंचायत टाकळी हाजी मार्फत जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे दिनांक ०७/०७/२०२५ रोजी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

मौजे मलठण, ता. शिरुर, जि. पुणे येथील गावठाण (राजगुरु वस्ती) येथे मुक्ती फौज शाखा मलठण मालमत्ता क्रमांक ११/०६८/३०७ ही मुक्ती फौज शाखा यांचे नावे फौज शाखा यांचे नावे असून यात कोंडीराम सुदाम साळवे व कमल कोंडीबा साळवे हे राहत असून त्यांचा वेल्डींग काम करणे हा व्यवसाय आहे. सदर जागेत यापूर्वी ख्रिस्ती मिशनरी यांचे आठवड्यात शुक्रवार व रविवार या दिवशी मिटींग होत असत तथापि, मागील ९ ते १० महिन्यापासून सदर केंद्र बंद आहे. सदर इमारतीमध्ये या बाबतीत कोणतेही बैठक होत नाही. सदर ठिकाणी अनाधिकृतपणे धार्मिक स्थळांचे बांधकाम झालेला नाही. याबाबत ग्रामपंचायत मलठण यांचेकडून कोणत्याही नोटीसा पारित झालेल्या नाहीत. सदर मिळकत ही शासकीय जागेत नाही.

मौजे पिंपरखेड येथील धार्मिक स्थळ श्री. धनराज भिमाजी सरोदे यांचे जमीन गट नं. ३ या खाजगी क्षेत्रात असून सदर बांधकामाची नोंद ग्रामपंचायत दप्तरात धार्मिक स्थळ अशी केलेली नाही.

---

लक्षवेधी सूचना क्र. १९६५.

## महाराष्ट्र विधानसभा

## सन-२०२५ चे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. विक्रम पाचपुते, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्रमांक १९६५ पुढीलप्रमाणे आहे :-**

"अहिल्यानगर जिल्ह्यातील २५ पेक्षा अधिक ठिकाणी शासकीय जमिनीचा बळजबरीने ताबा घेऊन, अनधिकृतपणे सदर जमिनींवर अतिक्रमण केलेले असणे, तसेच सदर जमीनींवर अतिक्रमण करुन विनापरवानगी निवासी, औद्योगिक तसेच वाणिज्य प्रयोजनार्थ विविध खाजगी व्यक्ती तसेच धार्मिक संस्था यांनी बांधकाम करुन त्याचा बेकायदेशीररीत्या उपभोग सुरु असणे. सदर बांधकामांकरीता जिल्हाप्रशासन तालुकाप्रशासन तसेच स्थानिकस्वराज्यसंस्था यांच्याकडून कोणती ही पुर्वपरवानगी घेतलेली नसणे, तसेच सक्षम प्राधिकारी अथवा मा.न्यायालय यांच्याकडून नियमानुसार तसेच कायदेशीर पध्दतीने आदेश घेतलेले नसतानाही संबंधितांकडून सदर सार्वजनिक प्रयोजनार्थ राखीव असलेल्या शासकीय जमिनींचा बेकायदेशीररीत्या वापर सुरु असणे. याबाबत सजग नागरीक, सामाजिक कार्यकर्ते, विविध कल्याणकारी व लोकाभिमुख कार्य करणा-या संघटना यांच्याकडुन संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी यांना वारंवार तोंडी तसेच लेखीतक्रार देऊनही त्यांच्याकडून कोणत्याही स्वरुपाची ठोस कार्यवाही न करणे. सदर प्रशासकीय दुर्लक्ष तसेच अनास्थेमुळे शासनाच्या विविध व मोक्याच्या ठिकाणी असणा-या शासकीय जमिनींवर खाजगी व्यक्ती तसेच संस्था यांनी बेकायदेशीररीत्या अतिक्रमण करुन सदर जमिनींचा नियमबाहय वापर सुरु असणे, त्यामुळे शासनाच्या मालकीच्या जमिनी सार्वजनिक प्रयोजनार्थ तसेच सार्वजनिक प्रकल्पांकरीता आजरोजी सहजासहजी उपलब्ध न होणे. सदर अवैध अतिक्रमणांमध्ये काही जागेवर अल्पसंख्याक समुदायाच्या धार्मिकसंस्थाचे अतिक्रमण असून सदर अतिक्रमण करुन बांधकाम केलेल्या धार्मिक वास्तुंमध्ये बेकायदेशीररीत्या, बळजबरीने, प्रसंगी अत्याचार करुन किंवा धमकी देऊन, आमिष दाखवून हिंदू धर्मियांचे धर्म परिवर्तन करण्याचे काम सुरु असल्याचे निदर्शनास येणे. त्यामुळे अहिल्यानगर जिल्हयातील २५ हून अधिकठिकाणी शासकीय जमिनींवर अवैधरीत्या झालेले अतिक्रमण तात्काळ निष्कासित करुन सदर जमिनी परत शासनाच्या ताब्यात घेणे, तसेच हिंदू धर्मियांचे बेकायदेशीररीत्या झालेले व सुरु असलेले धर्म परिवर्तनबाबत कायदेशीररीत्या तात्काळ ठोस कार्यवाही करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

### श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये अहिल्यानगर, नेवासा, शेवगाव, पाथर्डी, कर्जत, जामखेड, श्रीगोंदा, पारनेर, राहाता, कोपरगाव, संगमनेर, अकोले, राहुरी व श्रीरामपुर असे एकुण १४ तालुके आहेत. यामध्ये श्रीगोंदा, पारनेर, जामखेड, शेवगाव, अकोले, नेवासा, संगमनेर, पाथर्डी, राहाता, कर्जत व कोपरगांव या ११ तालुक्यांमध्ये शासकीय जमीनींवर अतिक्रमणाची बाब आढळून आलेली नाही. तथापि, राहुरी, श्रीरामपुर, अहिल्यानगर (शहर व मनपा हद्द) मध्ये शासकीय जमिनीवर धार्मिक स्वरुपाचे अतिक्रमणाबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

राहुरी तालुक्यातील मौजे तांदुळवाडी ता.राहुरी येथील गट क्रमांक ५१ सरकारी गावठाण मधील इंडिया बायबल चर्च फेलोशिप या धार्मिक स्थळाचे बांधकाम निष्कासित करणे व मौजे देवळाली प्रवरा येथील गट क्रमांक ५४६ चे ओपन स्पेसमधील श्री. गणपती मंदिर या धार्मिक स्थळाचे बांधकाम नियमानुकुल करणे बाबतच्या प्रस्तावाबाबत तालुकास्तरीय समितीकडुन प्राप्त अहवालाचे अनुषंगाने गृहखात्यासह सर्व संबंधीत यंत्रणांचे अभिप्राय व सुनावणीअंती शासकीय जमिनीवरील सदर धार्मिक स्थळाबाबत अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे.

मौजे ब्राम्हणी ता. राहुरी येथील गट नं.३८३ मध्ये असलेले धार्मिक बोधचिन्ह व मौजे कोल्हार खुर्द ता.राहुरी येथील गट क्रमांक ४३ मध्ये असलेले अनाधिकृत धार्मिक स्थळ माहे मार्च २०२५ मध्ये काढून टाकण्यात आलेले आहे.

रोहा H|810(450-9-25)-1      ८ क्र.मा.प.

मौजे पिंप्री अवघड, ता.राहुरी येथील गट नं. ग्रामपंचायत मिळकत ३७४ मधील अनाधिकृत धार्मिक स्थळ, मौजे देवळाली प्रवरा ता. राहुरी येथील गट नंबर ७७२ मधील मस्जिद, मौजे देवळाली प्रवरा ता. राहुरी येथील गट नंबर १६२२ मधील श्री. समर्थ बाबुराव पाटील महाराज देवस्थान व मौजे देवळाली प्रवरा ता. राहुरी येथील गट नंबर ३३७ मधील चर्च यांचे नियमितीकरणास जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हास्तरीय समिती अहिल्यानगर यांचेकडील ज्ञापन दिनांक ३०/११/२०१६ नुसार सदर धार्मिक स्थळे नियमितीकरणास मान्यता दिलेली आहे.

श्रीरामपूर तालुक्यातील मौजे खिर्डी ता.श्रीरामपूर येथील गट नंबर ६ मध्ये अंदाजे ० हे. ४० आर क्षेत्रामध्ये लोखंडी अँगल पाईप जाळीचे कुंपणाचे अतिक्रमण निष्कासित करण्यात आलेले आहे. अहिल्यानगर मधील मौजे बोल्हेगांव ता.जि.अहिल्यानगर येथील ग.नं.६१/२ ई मधील महानगरपालिकेच्या आरक्षित खुल्या जागेवरील अनधिकृत धार्मिक स्थळाचे अतिक्रमीत बांधकाम दि.१७/०१/२०२५ रोजी काढण्यात आलेले आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील शासकीय जमिनीवरील विविध खाजगी व्यक्ती, धार्मिक संस्था इ. यांनी केलेल्या अतिक्रमणांबाबतच्या एकुण १० प्रकरणांपैकी ४ ठिकाणची अतिक्रमणे नियमानुकुल करण्याची कार्यवाही यापुर्वीच करण्यात आलेली आहे अन्य ४ ठिकाणची अतिक्रमणे निष्कासित करणेत आलेली आहेत. तसेच उर्वरित २ ठिकाणच्या अतिक्रमणांसंदर्भात जिल्हास्तरीय समितीमार्फत तपासणी करून अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे.

कर्जत तालुक्यामध्ये शासकीय जमीनीवर धार्मिक अतिक्रमण झालेले नाही. मात्र, कर्जत नगरपरिषद हद्दीतील सि.स.नं.२४५ व सि.स.नं.२४७ मधील जागेवर व मौजे कर्जत ता.कर्जत जि.अहिल्यानगर येथील सि.स.नं.७३५,७३७ मधील जागेवर खाजगी व्यक्तींनी निवासी प्रयोजनासाठी अतिक्रमण केले आहे. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ५० (३) अन्वये संबंधितांस अतिक्रमण काढणेबाबत नोटिस देण्यात आलेली आहे. तथापी, अतिक्रमण धारक यांनी मे. वरिष्ठ दिवाणी न्यायालय कर्जत येथे दाखल केलेल्या दाव्यांमध्ये मे.न्यायालयाने परिस्थिती जैसे थे ठेवणेबाबत आदेश केल्याने अतिक्रमण निष्कासनाची कार्यवाही स्थगित करणेत आलेली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील शासकीय जमिनीवरील धार्मिक अतिक्रमणांव्यतिरिक्त ८ ठिकाणी देवस्थान व वक्फ जमिनीबाबत धार्मिक स्वरुपाच्या तक्रारी सजग नागरीक, सामाजिक कार्यकर्ते व इतर सामाजिक संघटना यांचेकडून धार्मिक स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. ८ ठिकाणच्या देवस्थान व वक्फ जागांवरील अतिक्रमणांचे अनुषंगाने १ ठिकाणचे अतिक्रमण निष्काषित करण्यात आले आहे. इतर ४ ठिकाणच्या जागा या वक्फ बोर्डाकडे नोंद असून त्यापैकी २ ठिकाणच्या अतिक्रमण निष्काषणाच्या कार्यवाहीस वक्फ बोर्डाने स्थगिती दिलेली आहे. अन्य २ अतिक्रमणांसंदर्भात पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येत आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील १५ खाजगी जमिनींवरील अतिक्रमणांपैकी १ ठिकाणचे अतिक्रमण निष्काषित करण्यात आले आहे. १ ठिकाणच्या जागेसंदर्भातील शर्तभंग नियमानुकुल केला आहे. २ जागेवरील अतिक्रमण हे २५ वर्षापुर्वीचे जूने बांधकाम आहे. १ ठिकाणी बांधकाम नाही. १ जागेवरील बांधकामास भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. ५ ठिकाणच्या अतिक्रमणांसंदर्भात बांधकाम निष्काषण नियमानुकुल करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हास्तरीय समितीकडे प्राप्त झाला असून त्यासंदर्भात प्रचलित कायदयातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याबाबत संबंधित तहसिलदार यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत. उर्वरित अन्य ४ ठिकाणच्या अतिक्रमणांसंदर्भात संबंधितांना नोटीस बजावण्यात आलेली असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

अहिल्यानगर जिल्हयात विविध पोलीस स्टेशनअंतर्गत धर्मांतरणाबाबत एकूण ६ तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्यापैकी ३ तक्रारी या मा. न्यायालयात न्यायप्रविष्ट आहेत तर १ तक्रारीसंदर्भात दिनांक २/७/२०२५ रोजी मा.न्यायालयाने अदखलपात्र गुन्हयाचा तपास करण्याची परवानगी दिलेली असून पुढील पोलीस तपास सुरू आहे. उर्वरित २ तक्रारींसंदर्भात पोलीस तपास सुरू आहे.

******

H/810-19

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ दूसरे (पावसाळी अधिवेशन)

**श्री. सचिन कल्याणशेट्टी, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १९९३ पुढीलप्रमाणे आहे.**

"सोलापूर महानगरपालिका हद्दीमध्ये शासकीय जमिनीवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे करुन अनधिकृत बांधकामे केलेली असणे, त्यापैकी प्रामुख्याने १) मुरारजी पेठ, सोलापूर येथील न. भू.क्र. ८४१३/१ हा शासकीय भूखंड सरकारी कचेऱ्यांसाठी असणे, या भूखंडावर जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापुर आवारात या अनधिकृत धार्मिक स्थळाचे अतिक्रमण असणे, २) साखरपेठ परिसरात एक ट्रस्ट आणि मदरसा यांनी बनावट कागदपत्रांद्वारे जमीन वक्फ बोर्डाच्या नावे करुन मागील १५० वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून तिथे राहणाऱ्या इतर धर्मीय लोकांना हुस्कावून लावण्याचा प्रयत्न होत असणे, या प्रकरणात जिल्हाधिकारी यांची समिती नेमून जुने कागदपत्र तपासून हा घोटाळा तपासणे आवश्यक असणे, ३) सिध्देश्वर मंदिर परिसरात दिपमाळ जवळ एका भंगाराच्या दुकानाचे अतिक्रमण असणे, हे अतिक्रमण दिवसेंदिवस वाढत असणे, सदर अतिक्रमण धारकाद्वारे स्थानिक नागरिकांना धमकावले जात असणे, या अतिक्रमणाबाबत जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, पोलीस आयुक्त, सोलापूर यांच्याकडे वारंवार तक्रार केलेली असणे, परंतु सदर अतिक्रमणाबाबत कोणतेही कारवाई झालेली नसणे, सोलापूर महानगरपालिका हद्दीतील शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे हटविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना कालमर्यादेत कारवाई करण्याचे आदेश पारित करणे आवश्यक असणे, तरी सदर गंभीर प्रकाराची चौकशी करून शासनाचे करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

**मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

मुरारजी पेठ, सोलापूर येथील नगर भूमापन क्रमांक ८४१३/१ चे संपूर्ण क्षेत्र २९००० चौ.मी. आजरोजी शासकीय जमीन असून सन १९२८ पासूनच्या नोंदीनुसार धारक सदरी / इतर अधिकारात कोणतेही धार्मिक स्थळाचे नावाचा उल्लेख नाही. तथापि, प्रत्यक्षात जागेवर मलंगपीर दर्गा याचे बांधकाम अंदाजे ५ ते ७ गुंठे क्षेत्रावर असल्याचे दिसून येते. सदरचे अतिक्रमण फार जुने असून सदर प्रकरणी न्यायप्रविष्ट बाबी आहेत किंवा कसे हे तपासून कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.

साखर पेठ परिसरात ९९७८, ९९८०, ९९८१ व ९९८४/अ असे एकूण ४ नगर भूमापन क्रमांक असून नगर भूमापन क्र. ९९८० या मिळकतीस सन १९४३ पासून मा. जिल्हा न्यायालयाच्या आदेशाने वक्फ बोर्ड ॲक्ट प्रमाणे मुतवली (काळजी करणारा) नेमल्याचे दिसून येते. तसेच नगर भूमापन क्र. ९९७८ व ९९८१ या मिळकतीस सन १९४४ पासून मा. जिल्हा न्यायालयाच्या आदेशाने वक्फ बोर्ड ॲक्ट प्रमाणे मुतवली (काळजी करणारा) नेमल्याचे दिसून येते. तसेच नगर भूमापन क्र. ९९८४/अ या मिळकतीस सन १९४७ पासून साखर पेठ हाशमपीर मशीदीचे मुतवली (काळजी करणारा) हाजी नबी सो इनाम सो बाणकरी असे नाव नमूद असल्याचे दिसून येते.

वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३७ नुसार वक्फ बोर्ड त्यांचे अधिनस्त असलेल्या मालमत्तेचे रजिस्टर ठेवत असून सदर रजिस्टरला विषयांकित मिळकतीची नोंद असल्याची खातर जमा करून वक्फ अधिनियम १९९५चे कलम ४० नुसार सदरची मिळकत वक्फ बोर्डाची मालमत्ता आहे किंवा कसे याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार वक्फ बोर्डाचे असल्याने सदरच्या मिळकतीबाबत वक्फ बोर्डाशी पत्रव्यवहार करून पुढील योग्य तो निर्णय घेणे योग्य होईल.

सिध्देश्वर, मंदिर परिसर, रेल्वे लाईन, सोलापूर येथील नगर भूमापन क्र.८४१६ चे क्षेत्र २१४००.०० चौ. मी. धारणाधिकार H१ असून १९३९ मूळ धारक मूसलमानाचे कब्रस्थान पूर्वपार असे नमूद आहे.

दिनांक २७/०८/२००३ रोजीच्या फेरफार क्र. २७४१ अन्वये रस्ता रुंदीकरणाकरीता ३१७२ चौ.मी. व दिनांक १०/१२/२००३ रोजीच्या फेरफार क्र. ३०२९ अन्वये जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडील ग्रीन युजरसाठी कब्जा देणेबाबतचे आदेश दि. १४/११/२००३ अन्वये १ हे. ८२ आर. २८ चौ.मी. (१८२२८ चौ.मी.) क्षेत्रावर महानगरपालिका, सोलापूर यांचे नाव दाखल करण्यात आले असल्याचे दिसून येत आहे.

सदर मिळकतीस महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील दि. १३/०४/२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार सन २०१७ मध्ये वक्फ प्रतिबंधित सत्ता प्रकार अशी नोंद आहे.

नगर भूमापन क्र. ८४१६ वर ५ घरे व ४८ दुकानांचे अतिक्रमण आहे. त्या अनुषंगाने सदर ५३ मिळकतीवर तेथील नागरिकांच्या समक्ष लाल रंगाने अतिक्रमण बाधित क्षेत्र मार्किंग करणेत आले आहे व अतिक्रमणधारकांना स्वतःहून अतिक्रमण काढून घेण्यास सूचना देण्यात आल्या आहेत. जर त्यांनी स्वतःहून अतिक्रमण काढले नाही तर सदरचे अतिक्रमण सोलापूर, महानगरपालिका यांच्याकडील अतिक्रमण प्रतिबंधक विभागाकडून अतिक्रमण निष्कासित करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

उपरोक्त वस्तुस्थिती पाहता संपूर्ण मिळकत ही महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक १३/०४/२०१६ पुर्वीच सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांना हस्तांतरित झालेली असल्याचे दिसून येत आहे. तेव्हा सदर मिळकतीवरील २१४०० चौ.मी. क्षेत्राबाबत मूसलमानाचे कब्रस्थान पूर्वापार या नावाची नोंद कमी होणे आवश्यक होते. या नोंदी बाबत वक्फ बोर्ड यांचेशी पत्रव्यवहार करून खातरजमा करून महसूल व वन विभाग यांचेकडील महसूल व वन विभाग शासन परिपत्रक ०७/०९/२०१० व महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक दि१०/१०/२०१३ ला अनुसरुन् अन्वये महानगरपालिका सोलापूर यांच्याकडून अतिक्रमण निष्कासित करण्याची कारवाई करण्याचे संकल्पित आहे.

---

लक्षवेधी सूचना क्र.२१८६

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री.नरेंद्र भोंडेकर, व इतर मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"मागील दीड वर्षापासून गडचिरोली जिल्ह्यातील वडसा-गडचिरोली या नव्या लोहमार्गाचे काम जे.पी.इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीच्या वतीने मागील दिड वर्षापासून सुरु असणे, लोहमार्गाच्या कामासाठी या कंपनीने मागील वर्षी विनापरवानगीने मोहझरी, अडपल्ली, गोगाव, साखरा, खरपूडी, माडेतुकूम, काटली, लजेंडा परिसरातील महसूल विभागाच्या जमिनीतून २ लाख ७३ हजार ३५१ ब्रास मुरूम व मातीचे अवैध उत्खनन केल्याने गडचिरोली तत्कालीन जिल्हाधिकाऱ्याने २३५ कोटींचा दंड करणे, तरी सुध्दा कंपनीने काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने पुन्हा मे २०२५ पर्यंत गडचिरोली तालुक्यातील पोर्ला महसूल मंडळातील पोर्ला, वसा व वसाचक येथील महसुल विभागाच्या जमिनीतून तसेच आरमोरी तालुक्यातील चुरमुरा, किटाळी मालगुजारी तलावातून जवळपास १५ पोकलँड व ३० हायवाच्या माध्यमातून दररोज रात्रंदिवस हजारो ब्रास गौण खनिज मुरमाचे अवैध उत्तखनन करून वाहतूक करणे, मे २०२५ मध्ये किटाळी येथिल मुरूम खोदून पडलेल्या खड्ड्यात पडून ५० वर्षीय महिलेचा मृत्यू होणे, वनविभागाच्या जमिनीतून सुध्दा नियमबाह्य अवैध गौण खनिजचे उतखनन केल्याने शासनाच्या करोडोरुपयाचा महसूल बुडालेला असून कंपनीच्या फायद्यासाठी या चोरी प्रकरणाकडे महसूल, वनविभाग, खनिकर्म विभागातील अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष करणे, या चोरी प्रकरणात सामील असलेल्या सर्वावर फौजदारी कारवाही होणे अपक्षित असताना याबाबत तक्रार करून सुद्धा कोणतीही कार्यवाई होत नसल्याने नागरिकांत पसरलेले तीव्र असंतोष त्यामुळे शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

---

श्री.चंद्रशेखर बावनकुळे, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

गडचिरोली जिल्हयामध्ये वडसा-गडचिरोली या नव्या लोहमार्गाचे काम जे.पी.इन्फ्रास्ट्रक्चर,गुजरात व्ही.आर.एस (जे.व्ही.) यांचेकडून तर, वडसा तालुक्यातील रेल्वे लोहमार्गाचे काम मे. ऍरकोनस ओ.एम.के.(जे.व्ही.) या कंपनीकडून करण्यात येत आहे.

मे, जे. पी. इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी यांनी दिनांक १२.०३.२०२४ रोजी मोजा गोगांव, स.नं. २३६. मौजा खरपुंडी स.नं. ८७/१ व मौजा साखरा स.नं. १४० येथील क्षेत्रावर मुरुम उत्खननाकरीता जिल्हाधिकारी कार्यालयात विहीत नमुन्यात अर्ज सादर केलेला होता व त्याकरीता कंपनीने दि. ३१.०३.२०२४ रोजी रॉयल्टी, डीएमएफ व इतर शुल्क मिळूण एकूण १,०३,४४,४७५/- (रुपये एक कोटी, तीन लक्ष, चव्वेचाळीस हजार, चारशे पंचाहत्तर फक्त) ऑनलाईन शासन भरणा केलेले आहे. परंतु मार्च २०२४ पासून जिल्हाधिकारी कार्यालयाची संपूर्ण यंत्रणा ही लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीत व्यस्त असल्यामुळे मे. जे. पी. इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीला मुरुम उत्खननाची परवानगी देणे शक्य झालेले नाही, असे कार्यालयीन अभिलेखावरुन दिसून येते असल्याचे जिल्हाधिकारी यांनी अहवालात नमूद केले आहे.

मौजे माहेझरी, अडपल्ली, गोगाव,साखरा, खरपुंडी, माडेतुकूम, काटली, लांझेरा परिसरातुन केलेल्या वेगवेगळ्या परिमाणाचे अशा एकूण ०२,७३,३५१ ब्रास परिमाणाच्या मुरुमाचे मे.जे.पी.इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने उत्खनन केल्याच्या अनुषंगाने वेगवेगळ्या प्रकरणी

एकूण २३५,०८,१८,६००/- एवढ्या रकमेचा दंड का आकारण्यात येवू नये याबाबत दिनांक १७.०६.२०२४ रोजी तहसिलदार यानी सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने वेगवेगळ्या नोटीसा बजाविण्यात आल्या आहेत.

तसेच, त्यानंतर दिनांक ०९.४.२०२५ रोजी गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालयाव्दारे मे. झांझरिया निर्मन लि. कंपनीस मौजे पोर्ला येथील सरकार तलाव स.नं.१९२ व स.नं.२४१ तसेच मौजा वसा येथील सरकार तलाव येथील स.नं. ४०० आणि मौजा वसा चक येथील सरकार तलाव स.नं.१०८ मधुन एकूण ९,८५० ब्रास परिमाणाच्या उत्खननास परवानग्या देण्यात आलेल्या आहेत. तर दिनांक १८.०४.२०२५ रोजी मे.जे.पी. इन्फ्रास्ट्रक्चर, गुजरात व्ही.आर.एस (जे.व्ही.) यांना मौजा चुरमुरा येथील सरकार बोडी स.नं.१९५ व १८२ मधुन ४२४० ब्रास परिमाणाच्या उत्खननास परवानगी देण्यात आलेली आहे.

तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मुरुम उत्खनन वाहतुकीचे मे. झाझरिया निर्मन लि. कंपनीला ९,८५० ब्रास मुरुमाचे उत्खननाचा आदेश निर्गमित करण्यात आलेला होता. त्याप्रमाणे ज्या जागेमधून मुरुमाची उत्खनन व वाहतुक करण्याचे परवाना मिळालेली होता. त्यामधून अवैध उत्खनन झाले किंवा कसे याबाबत या कार्यालयाकडून तहसिल गडचिरोली कार्यालयाकडून तांत्रीक मोजणी करणेबाबत उपअधिक्षक, भूमि अभिलेख कार्यालय व उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्र देण्यात आले असून उक्त विभागाकडून तांत्रीक मोजणी अहवाल प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करण्यात येणार असल्याचे तहसिलदार, गडचिरोली अहवालामध्ये नमूद आहे

माहे मे, २०२५ मध्ये मौजा किटाळी येथे तलावात पडुन महिलेचा मृत्यु हा सदर महिला तलावामध्ये कपडे धुण्याकरिता गेलेली असल्याने जास्त पाणी असल्याने उक्त ठिकाणी महिलेचा तोल गेल्यामुळे पाण्यात बुडून मृत्यु झालेला असल्याने तहसिलदार,आरमोरी यांनी अहवालात नमूद केले आहे. त्यानुषंगाने मृत्यु पावलेल्या वारसास रु.०२,००,०००/- ऐवढे सानुग्रह अनुदानाची रक्कम अदा केली आहे.या घटनेचा रेल्वे कामासाठी करण्यात आलेल्या उत्खननाचा संबंध नाही.

संबंधित तहसिल कार्यालयास वनविभागाच्या जमिनीतून सुध्दा नियमबाहय अवैध गौण खनिजाचे उत्खनन केल्याने शासनाच्या करोडो रुपयाच्या महसूल बुडाल्याचे तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

**************

लक्षवेधी सूचना क्र. २१९८.

महाराष्ट्र विधानसभा

सन-२०२५ चे (पावसाळी) अधिवेशन

**श्रीमती देवयानी फरांदे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्रमांक २१९८ पुढीलप्रमाणे आहे :-**

" राहुरी बु., जि. अहिल्यानगर येथे बुवा सिंद बाबा मंदिर या देवस्थानाची अंदाजीत १०० एकर इनाम जमीन असणे, Alienation Register मध्ये Sr. No. ३६६ मध्ये Bava, Siddhadev असे नमूद असणे, या देवस्थान जमिनीचे जुने ७/१२ उतारे मालकीहक्क पत्र यावर कब्जेदार सदरी श्री. बुवा सिंद देव नमूद असणे, १९९२-९३ सालचे राहुरी नगरपरिषदेचे अभिलेख तपासले असता, सदर मालमत्तेमध्ये बुवा सिंद बाबा मंदिर अशी नोंद असणे, नमूद अभिलेखातील देव, मंदिर या नोंदीवरुन सदर देवस्थान हिंदू धर्माचे असल्याचे सिध्द होत असणे, तरी दिनांक ११.४.१९९५ रोजी सदर मिळकतीवर हजरत अहमद चिस्ती बाबा दर्गा असल्याचे अनधिकृत नोंद होणे, सदर नोंदीच्या सहाय्याने पुढील काही वर्षात देवस्थान जमिनीवर वक्फ बोर्डाचे नाव लावणे, सदर देवस्थान जमिनीमध्ये अनधिकृत दर्गा मदरसा बांधणे, संपूर्ण देवस्थानाची जागा दर्गा - वक्फ बोर्डाची असल्याचे सांगून हिंदू धर्मीयांना या जागेत प्रवेश करण्यास प्रतिबंध करणे, सदरची देवस्थान जमीन सत्ता प्रकार वर्ग -२ ची असून देखील शासनाची कोणतीही परवानगी न घेता या जमीनीचे हस्तांतरे झालेली असणे, सदर देवस्थान जमिनीबाबत जिल्हाधिकारी यांनी चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करणे अपेक्षित असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मौजे राहुरी बुद्रुक येथील नगर भूमापन क्रमांक २६९२ व २८०५ ची मिळकत पत्रिका व चौकशी नोंदवही नुसार सन १९९५ साली मौजे राहुरी बुद्रुक या गावचे गावठाण चौकशीचे काम पूर्ण होऊन नगर भूमापन योजना कार्यान्वित झालेली आहे. त्यामध्ये आलेख क्रमांक ३४ चालता नंबर ५ व ७ यास नगर भूमापन क्रमांक २६९२ देण्यात येवून क्षेत्र २१५.७ चौ.मी. दाखल करून धारक सदरी बुवा सिंद बाबा दर्गा अशी नोंद दिनांक २७/४/१९९५ रोजी दाखल झालेली आहे. आलेख क्रमांक ३३ चालता नंबर २०२, २०३, २०४ यास नगर भूमापन क्रमांक २८०५ देण्यात येवून क्षेत्र ६३९.०० चौ.मी. दाखल करणेत येऊन धारक सदरी बुवा सिंद बाबा दर्गा व्यवस्थापक नन्नूभाई भिकनभाई इनामदार अशी नोंद दिनांक ११/०४/१९९५ रोजी दाखल झालेली आहे.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांचेकडील दिनांक २१/०४/२०२५ रोजीच्या पत्रानुसार इतर हक्कात वक्फ प्रतिबंधीत सत्ता प्रकार अशी नोंद ७/१२ उताऱ्यांवर घेणेबाबत आदेशीत केलेले आहे. परंतु अदयापपर्यंत सदर नोंद घेणेत आलेली नाही.

राहुरी शहर हद्दीतील सि.स.नं.२८०५ (मिळकत क्रमांक ११६८) या जागेवरील बुवासिंद बाबा या धार्मिक स्थळाच्या १९९२ सालापासुनचे नगर परिषदेकडील दस्ताऐवज तपासले असता सन १९६७-६८ ते १९७१-७२ मध्ये श्री बुवासेंदी बाबा, सन १९९२-९३ ते १९९५-९६ मध्ये बुवासिंद बाबा मंदिर, सन २००५-०६ ते २००८-०९, २००९-१० ते आजपर्यंत बुवासिंद बाबा मंदिर अशी नोंद दिसुन येते.

हजरत अहमद चिस्तीबाबा दर्गा या नावाने नगरपरिषदेकडील दस्तऐवजामध्ये कोणतेही नोंद दिसून येत नाही. मात्र वक्फ बोर्डाचे Suit No.३८/२०२५ मध्ये पक्षकार बुवासिंद बाबा यांचे ट्रस्ट/विश्वस्त तर्फे ३ विरूध्द प्रविण लक्ष्मण राऊत व इतर तसेच महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ वक्फ मुख्य कार्यकारी अधिकारी हे प्रतिवादी आहेत. त्यामध्ये दिनांक ३०/०४/२०२५ रोजी आदेश देण्यात आलेले आहेत.

राहुरी तालुक्याच्या ॲलिनेशन नोंदवहीमध्ये अनुक्रमांक ३६६ ला Biva Siddhadev असे नमुद असुन त्यात स.नं.३४८, ३६३/१, ३६३/२, ३६७, ४००, ४८५ असे नमुद आहे. श्री.बुवासिंद बुवादेव अशी नोंद असलेले सन १९३० ते १९३५ चे ७/१२ उतारे पाहिले असता स.नं.४४०/१, ४४०/२, ४४१/१, ४४१/२, ४४२/१, ४४२/२, ४४२/३, ४४२/४, ४४२/५, ४४२/६, ४४६/१, ४४६/२, ५११/१, ५११/२, ५११/३, ५११/४, ५११/५, ५११/६, ४२५/१, ४२५/२, ४२५/३ असे आहेत. तसेच संगणकीकृत ७/१२ वर स.नं. ४२५/१, ४२५/२, ४२५/३ वगळता उर्वरित सर्व्हे नंबरच्या ७/१२ वरील कब्जेदार सदरी श्री. बुवासिंद बुवा देव व इतर अधिकारात प्रतिबंधात्मक सत्ता प्रकार व महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ अशी नोंद फेरफार क्रमांक २८८८६ दिनांक १८/०२/२००६ रोजी घेतली असल्याचे दिसून येते.

मौजे राहुरी बु.येथील स.नं.४२५/१+२+३ क्षेत्र १ हे २० आर बुवासिंद बाबा देवस्थान ही जमिन इनामवर्ग - ३ मधुन वगळणी करुन भरआकारणी करणेबाबत तत्का. मा.राज्यमंत्री (महसुल) यांनी दिलेला आदेश पारित केले आहेत. त्यानुसार फेरफार क्रमांक-३३६६३, दिनांक ०८/०१/२०११ अन्वये स.नं.४२५/१+२+३ या क्षेत्राच्या ७/१२ वरील बुवासिंद बाबा देवस्थानचे नाव कमी करुन इतर हक्कातील वहिवाटदारांची नावे कमी करणेत येवुन वहिवाटदार कब्जेदार सदरी घेण्यात आलेली आहेत व इतर हक्कांतील देवस्थान ट्रस्ट व प्रतिबंधात्मक सत्ता प्रकार महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ हे शेरे कमी करणेत येवुन जमिन भर आकारणी करणेत आलेली आहे. तद्नंतर फेरफार क्रमांक ३३८४०, दिनांक ०३/०३/२०११ अन्वये स.नं.४२५/१+२+३ क्षेत्र १ हे २० आर खराबा ० हे ०५ आर असे एकुण १ हे २५ आर क्षेत्र वहिवाटदार यांनी सुरेश बन्सीलाल बाफना व पंकज प्रकाशलाल.बाफना यांना खरेदीने दिलेले आहे. सर्व्हे नंबर ४२५/१+२+३ बाबत परवानगीने झालेले हस्तांतरणाव्यतिरिक्त अन्य कोणतेही प्रकारचे हस्तांतरण झाल्याचे दिसुन येत नाही. तसेच बुवासिंद बाबा मंदीर येथे हिंदु धर्मियांना प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

*********

H|८०१-१९

<u>लक्षवेधी सूचना क्र.२२४०</u>
<u>महाराष्ट्र विधानसभा</u>
<u>सन २०२५ चे द्वितीय अधिवेशन</u>

**श्री. मंगेश कुडाळकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना २२४० पुढीलप्रमाणे आहे:-**

---

<u>लक्षवेधी सूचना</u>

"महाराष्ट्र शासनाने दिनांक २८ एप्रिल, २०२५ रोजीच्या राज्य पत्रान्वये भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ मध्ये कलम १८A अंतर्भूत केले असणे, या कलमानुसार केंद्र अथवा राज्य शासनाच्या किंवा कोणत्याही प्राधिकरणाच्या अथवा उपक्रमाच्या मालकीतील स्थावर मालमत्तेच्या हस्तांतरणासाठी (जसे विक्री, विनिमय, बक्षीस, भाडेपट्टा इ.) प्राधिकृत अधिकाऱ्याशिवाय इतर कोणत्याही व्यक्तीने केलेला दस्तऐवज नोंदणीस सादर करताना संबंधित प्राधिकरणाची ना हरकत परवानगी (NOC) संलग्न करणे अनिवार्य करण्यात आली असणे, याअंतर्गत प्राधिकरणांमध्ये म्हाडा, एस.आर.ए., एमआयडीसी, बीएमसी, कलेक्टर ऑफिस, एमएमआरडीए इत्यादींचा समावेश असणे, म्हाडा या प्राधिकरणाने दिनांक ०६ मे, २०१० रोजीच्या ठराव क्रमांक ६४८० अन्वये संबंधित गृहनिर्माण संस्थांना मालमत्ता अभिहस्तांतरित करुन सर्व अधिकार प्रदान केले असणे, तरीही सह दुय्यम निबंधक आणि मुद्रांक कार्यालयामार्फत दस्तावेज नोंदणीच्या वेळी वारंवार ना हरकत प्रमाणपत्राची मागणी करण्यात येणे, या प्रक्रियेमुळे म्हाडा अंतर्गत असलेल्या अनेक सोसायट्यांचे रहिवाशी व पदाधिकारी गोंधळात आणि असंतोषात असणे, शासनाच्या ठरावाची व प्राधिकरणाच्या अधिकार प्रतिस्थापनाची अंमलबजावणी होत नसल्यामुळे नागरिकांना अनावश्यक त्रास सहन करावा लागणे, यासाठी सह दुय्यम निबंधक व मुद्रांक कार्यालयांना याबाबत स्पष्ट मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची आवश्यकता, मुंबईसह राज्यातील सर्व सोसायट्यांतील रहिवाशांचा दस्तावेज नोंदणीचा प्रश्न कायमस्वरुपी निकाली काढण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

<u>मा. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री (महसूल) यांचे निवेदन</u>

महाराष्ट्र शासन राजपत्र दि. २८ एप्रिल २०२५, कायदा क्र. २३/२०२५ (Maharashtra Act No. XXIII OF २०२५) अन्वये नोंदणी अधिनियम १९०८ मध्ये कलम १८ (क)(१)(ख) चा समावेश करण्यात आला आहे. या कलमानुसार, केंद्र सरकारची किंवा राज्य शासनाची किंवा केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही प्राधिकरणाची किंवा कोणत्याही उपक्रमाची किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही केंद्रीय अधिनियमान्वये किंवा राज्य अधिनियमान्वये घटित केलेल्या किंवा स्थापन केलेल्या कोणत्याही प्राधिकरणाची किंवा उपक्रमाची, मालकी असलेल्या कोणत्याही स्थावर मालमत्तेच्या बाबतीत, सांविधिकदृष्ट्या तसे करण्याचा अधिकार प्रदान केलेल्या व्यक्ती व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीने निष्पादित केलेल्या विक्री कराराच्या, विक्रीच्या बक्षिसाच्या, विनिमयाच्या किंवा भाडेपट्टयाच्या किंवा अन्य मार्गाने केलेल्या मालमत्तेच्या हस्तांतरणाशी संबंधित असणारा दस्तऐवज, नोंदणीसाठी नाकारण्याची तरतूद विहित केली आहे.

सदर तरतूदीच्या अनुषंगाने, म्हाडा, सिडको, एमआयडीसी यासारख्या प्राधिकरणांच्या मालकीच्या मिळकतींचे दस्तनोंदणी संदर्भात व्यावहारिक अडचणी निदर्शनास आल्या आहेत. त्यावर उपाययोजना करण्याच्या दृष्टीने, याबाबत वस्तुस्थिती व अनुषंगिक नियम विचारात घेता, महानगरपालिका / नगरपालिका, तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था तसेच म्हाडा, सिडको, एमआयडीसी या सारख्या प्राधिकरणांनी त्यांचेकडील भाडेपट्ट्यानी दिलेल्या जमीन मिळकतीवर खाजगी विकसकाने विकसित केलेल्या इमारतींमधील / बांधकामामधील युनिटस (निवासी / अनिवासी) च्या विक्री वा भविष्यात होणा-या पुर्नविक्रीच्या दस्तांबाबत उक्त नमूद कलम १८ (क)(१)(ख) ची तरतूद लागू राहणार नाही, परंतु अशा मिळकती (भाडेपटटयाने दिलेल्या जमिन मिळकती) बाबत संस्थेच्या / कंपनीच्या लाभात जागा व बांधकाम स्वरुपात होणा-या अंतिम खरेदीखतास / असाइनमेंट डीड अशा स्वरुपाच्या दस्तांना कलम १८ (क)(१)(ख) ची तरतूद लागू राहील.

******************************

लक्षवेधी सूचना क्र.२३३६

महाराष्ट्र विधानसभा, सन २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

मा.श्री.गोपिचंद पडळकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

---

लक्षवेधी सूचना

"महाराष्ट्र राज्यात दस्तनोंदणी प्रक्रिया पूर्णपणे संगणकीय पद्धतीने होत असून, महसूल विभागाने महसूलवाढीसाठी विविध तरतुदी केल्या आहेत. शासकीय किंवा नियंत्रित सत्ताप्रकारच्या जमिनींच्या दस्तनोंदणीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेण्याची पद्धत लागू आहे. मात्र, पुणे शहरांतील खराडी, ता. हवेली येथील सर्वेनंबर ५६ मधील जमिनी नियंत्रित सत्ताप्रकारातील असल्याची स्पष्टपणे सातबारा सदरी नोंद असून भोगवटा वर्ग२ याप्रकारात मोडत असतानाही पुणे शहरातील दुय्यमनिबंधक क्र.१ कार्यालयातील अधिकाऱ्यांनी कायद्यातील तरतुदीकडे स्पष्टपणे दुर्लक्षकरून उक्त सर्वेनंबर मधील जमिनीची अपर जिल्हाधिकारी यांची विक्रीपरवानगी न घेता दि. २४नोव्हेंबर २०२४ रोजी चुकीच्यापद्धतीने दस्तनोंदणी करणे, यामुळे एका व्यक्तिने नजराना भरलेला असताना दुसऱ्या व्यक्तिच्या नावाने खरेदीची नोंदणी करताना पूर्णपणे चुकीच्या कुलमुखत्यारद्वारे खरेदीखत करण्याचा प्रकार निदर्शनास आला असणे, याबाबत तक्रार केल्यानंतर दुय्यमनिबंधक विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी, संबंधितावर कडक कारवाई करण्याबाबत अहवाल देऊनही कलम ८२ अंतर्गत फ़ौजदारी कारवाई झाली नसणे, यामुळे राज्यशासनाच्या कोट्यावधींचे महसुलाचे नुकसान होणे. जिल्हाउपनिबंधक पुणे यांनी संबंधितावर कारवाई करण्याची शिफारस करून देखील कारवाई झालेली नसणे, राज्यसरकारने अशाच प्रकारच्या इतर प्रकरणाबाबत तपासणीसाठी कोणती यंत्रणा उभी करणार आहे, चुकीचे दस्त नोंदणीसाठी जमीन मालक व शासकीय अधिकारी यांच्यावर वचक बसण्यासाठी शासन नेमके काय कारवाई करत आहे याबाबत नागरिकांना कोणतीही माहिती उपलब्ध नसणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

श्री.चंद्रशेखर बावनकुळे, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

नोंदणी व मुद्रांक विभागाच्या नोंदणी कार्यालयामध्ये दस्त नोंदणी प्रक्रिया पूर्णपणे संगणकीय पध्दतीने होत असून, महसूल वाढीसाठी विभागामार्फत वेळोवेळी विविध योजना जाहीर करण्यात येतात. तसेच शासकीय किंवा नियंत्रित सत्ताप्रकारच्या जमिनींच्या दस्त नोंदणीसाठी सक्षम प्राधिकारी यांच्या पूर्वपरवानगीची आवश्यकता असते.

याअनुषंगाने सह दुय्यम निबंधक हवेली क्र.१ कार्यालयात नोंदविण्यात आलेला दस्त क्र. २२९१३/२०२४, दिनांक २९.११.२०२४ या दस्तातील मिळकत स.नं.५६/३ हा ७/१२ वर्ग-२ असल्यामुळे सदर प्रकरणी हस्तांतरणासाठी मा.जिल्हाधिकारी यांची परवानगी आवश्यक आहे किंवा कसे या बाबत सह जिल्हा निबंधक वर्ग-१, पुणे शहर या कार्यालयाकडून मा. जिल्हाधिकारी, पुणे यांना दिनांक १३.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये विचारणा करण्यात आली होती. त्या अनुषंगाने मा.जिल्हाधिकारी कार्यालय पुणे, कुळ कायदा शाखा, पुणे यांचे पत्र सह जिल्हा निबंधक वर्ग-१, पुणे शहर कार्यालयास दिनांक १८.०६.२०२५ रोजी प्राप्त झाले आहे. सदर पत्रान्वये त्यांनी दस्तांकित मिळकत हस्तांतरण करण्याआधी परवानगीची आवश्यकता असल्याचे नमूद केले आहे.

सह दुय्यम निबंधक हवेली क्र.१ या कार्यालयात मौजे खराडी स.नं. ५६/३ या मिळकतीच्या दस्त क्र.२२९१३/२०२४, दि.२९.११.२०२४ ला मा. जिल्हाधिकारी कार्यालय पुणे यांची परवानगी न घेता नोंदणी झाली आहे. सदर दस्तात रु. १,२७,६०,५००/- इतके कमी मुद्रांक शुल्क भरलेले आहे. त्या बाबतची वसूलीची प्रथम नोटीस पक्षकारास दिनांक १९.०५.२०२५ रोजी पाठविण्यात आलेली आहे. व वसुलीची पुढील कार्यवाही सह जिल्हा निबंधक वर्ग-१, पुणे शहर कार्यालयाकडून सुरु आहे.

मौजे खराडी येथील स.न. ५६ हा I Sarita संगणक प्रणालीमध्ये Negative List मध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे.

सह जिल्हा निबंधक वर्ग-१ पुणे शहर कार्यालयाने दिनांक २६.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये दस्त क्र.२२९१३/२०२४ मधील पक्षकारांवर नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८२ अन्वये कार्यवाही करणे करीता सह दुय्यम निबंधक हवेली क्र.१ यांना आदेश दिले आहेत.

प्रस्तुत प्रकरणात सह जिल्हा निबंधक वर्ग-१, पुणे शहर कार्यालयाच्या दि.२२.०५.२०२५ व दिनांक २६.०६.२०२५ रोजीच्या अहवालावर नोंदणी उपमहानिरीक्षक, पुणे यांचे दिनांक ०२.०६.२०२५ रोजीचे प्राप्त अभिप्रायानुसार संबंधित प्रभारी सह दुय्यम निबंधक, हवेली क्र.१ यांचे विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करणेकरिता नोंदणी उपमहानिरीक्षक, पुणे यांचेकडून दोषारोप पत्र मागविण्यात येत असून, दोषारोप पत्र प्राप्त होताच संबंधित प्रभारी सह दुय्यम निबंधक, हवेली क्र.१ यांचेविरुद्ध पुढील प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.

सह जिल्हा निबंधक, नोंदणी उपमहानिरीक्षक व नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाचे स्तरावरुन विभागातील दुय्यम निबंधक कार्यालयांच्या वेळोवेळी नियतकालिक तपासण्या करण्यात येत असतात. तपासणीअंती दुय्यम निबंधक दोषी आढळल्यास त्यांचेविरुध्द नियमानुसार प्रशासकीय कारवाई करण्यात येते.

................................

लक्षवेधी सूचना क्र. २४२७

महाराष्ट्र विधानसभा, सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन

सर्वश्री. किशोर जोरगेवार, प्रविण दटके, प्रताप अडसड, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील:-

" चंद्रपूर जिल्ह्यातील चंद्रपूर महानगरपालिका व घुग्गुस नगरपरिषद हद्दीतील अनेक नागरिक वर्षानुवर्षे नझुल जमिनीवर घरे बांधून वास्तव्यास असणे, चंद्रपूर शहरातील ३९ झोपडपट्टयांमध्ये सुमारे ११,८८१ कुटुंबे राहत असून, केवळ १४ झोपड्यांपट्टयांचे सर्वेक्षण झालेले असून उर्वरित २५ झोपडपट्ट्यांचे अद्यापही सर्वेक्षण झालेले नसणे, तसेच घुग्गुस नगरपरिषद हद्दीतील सर्व्हे क्र.२९/१,२६३,२६४,२६५,२६६,३१७,३१८ या शासकीय जमिनीवर गेल्या ३० वर्षापासून अनेक कुटुंबिय वास्तव्य करीत असणे, उक्त रहिवाश्यांकडून शासनाचा कर भरण्यात येत असतांनाही सुमारे १३०० कुटुंबियांना स्थानिक प्रशासनाकडून अतिक्रमण नोटीसा बजावण्यात येणे, त्यामुळे त्यांच्यावर बेघर होण्याची आलेली वेळ, उक्त नझुल जमिनीवरील भोगवटाधारक नागरीकांकडून गेल्या अनेक दशकांपासून वारंवार स्थायी पट्टयांची मागणी होत असणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार जिल्हाधिकारी, आयुक्त, चंद्रपूर, मुख्य कार्यकारी अधिकारी, घुग्गुस नगरपरिषद, संबंधित तहसिलदार तसेच मा. मुख्यमंत्री मा.महसूल मंत्री यांचेकडे मागणी केलेली असणे, तथापी अद्यापपर्यंत जिल्ह्यातील नझुल जमिनीवरील रहिवाश्यांना स्थायी पट्टे देण्यात न येणे, परिणामी सदर कुटुंबियांना नागरी सुविधा, शासकीय योजना व कर्जसुविधेच्या लाभापासून वंचित रहावे लागणे, शासनाने उक्त प्रकरणी तातडीने निर्णयात्मक कार्यवाही करुन चंद्रपूर महानगरपालिका व घुग्गुस नगरपरिषद क्षेत्रातील नझुल जमिनीवरील घरे व त्यांचे भोगवटाधारक बेघर होण्यापासून वाचवण्यासाठी तसेच मुलभुत नागरी सोयीसुविधा व शासकीय योजनांचा लाभ मिळवा याकरीता तातडीने स्थायी पट्टे देण्याची आवश्यकता यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया ".

---

श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री, महसूल यांचे निवेदन

चंद्रपूर शहर महानगरगालिका हद्दीत एकूण ५५ इतक्या झोपडपट्टया असून त्यापैकी ३९ झोपडपट्टया घोषीत आहेत. महानगरपालिका, चंद्रपूर यांच्या सर्वेक्षणानुसार घोषित झोपडपट्टीमध्ये एकुण घरांची संख्या ११,८८१ इतकी असून त्यामध्ये सुमारे ५९,४८९ इतके नागरिक वास्तव्यास आहेत.

महानगरपालिका, चंद्रपूर यांचेकडून एकुण १४ शासकीय जमिनीवरील झोपडपट्टींचे अभिन्यास जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे मान्यतेकरिता प्राप्त झाले होते. सदर १४ प्रस्तावांपैकी १ प्रस्ताव हा झुडपी जंगलाच्या जागेवर असल्यामुळे त्यास उपरोक्त शासन निर्णय दि.१७ नोव्हेंबर, २०१८ व ११ सप्टेंबर, २०१९ नुसार कार्यवाही करता येणार नाही. उर्वरित १३ झोपडपट्ट्यांच्या

प्रस्तावामध्ये अभिन्यासास शिथीलता प्राप्त करण्यासाठी सहसंचालक, नगर रचना, नागपुर विभाग, नागपुर यांच्याकडे प्रस्ताव सादर केलेले आहेत.

त्याअनुषंगाने सहसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर व महानगरपालिका, चंद्रपूर यांच्यात झालेल्या प्रत्यक्ष चर्चेनुसार घुटकाळा तलाव व सिव्हील लाईन (रेल्वे स्टेशन) या ०२ झोपडपट्ट्यांचे सुधारीत अंतीम नकाशे प्रायोगीक तत्त्वावर सहसंचालक, नगर रचना नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे महानगरपालिका, चंद्रपूर यांनी मंजुरीस्तव सादर केलेल आहेत.

याबाबत संचालक, नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग, पुणे यांनी उक्त दोन प्रकरणांमध्ये गावठान क्षेत्रात किमान ४.५० मीटर व गावठानाबाहेरील क्षेत्रात किमान ६.० मीटर इतक्या रुंदीचे रस्ते व रस्त्याच्या लांबीनुसार किमान ९.० मीटर व १२.० मीटर रुंदीचे रस्ते तसेच ओपन स्पेस व ॲमेनिटी स्पेस करीता आवश्यक जागा उपलब्ध करण्याबाबत नमूद केले आहे. तरी, वरीलप्रमाणे नमूद नागरी व सार्वजनिक सुविधांसाठी आवश्यक जागा सोडून उर्वरित भूखंडांपैकी जे भूखंड प्रचलित नियमांनुसार पात्र ठरतील, अशा भूखंडांची यादी तयार करुन सुधारित नकाशांसह एकत्रित प्रस्ताव जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचेकडे सादर करण्यात येणार आहेत, तसेच उर्वरित ३४ झोपडपट्ट्यांबाबत जिथे अभिन्यास मंजूर करता येईल, अशा अभिन्यासांबाबत संचालक, नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग, पुणे यांचेकडे पाठवून आवश्यक शिथिलतेबाबत त्यांची मंजूरीची परवानगी घेण्यात येईल.

जनहित याचिका क्र.५४/२०१७ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक १७ एप्रिल, २०२४ रोजी दिलेल्या आदेशानुसार तहसिलदार, चंद्रपूर यांनी घुग्घुस नगरपालिका क्षेत्रातील सर्व्हे क्र.२९/१, २६३,२६४,२६५,२६६, ३१७ व ३१८ या शासकीय जमिनीवरील अतिक्रमण काढण्याकरिता १३८५ नागरिकांना महाराष्ट्र महसूल अधिनियम १९६६ चे कलम ५० अन्वये अतिक्रमण धारकांना नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत. तथापि सद्यस्थितीत कोणतेही अतिक्रमण निष्काषीत करण्याची कार्यवाही महसूल प्रशासनाने केलेली नाही.

नगर विकास विभागाचे शासन निर्णय १७ नोव्हेंबर, २०१८ नुसार सर्वांसाठी घरे २०२२ या धोरणाची अमंलबजावणी करण्याकरिता शासकीय जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल करण्याची कार्यप्रणाली निश्चित करण्यात आलेली आहे.त्याअनुषंगाने, घुग्घुस नगरपरिषद हद्दीतील सर्व्हे क्र. २९/१, २६३, २६४, २६५, २६६, ३१७, ३१८ या शासकीय जमिनीवर वास्तव्य करित असलेल्या कुटुंबांना पट्टे देण्याबाबत नगर परिषद, घुग्घुसने ठराव पारित केलेला असुन, सद्यस्थितीत उक्त सर्व्हे क्रमांकापैकी प्रथम टप्पा म्हणून सर्व्हे क्र. २६५ ची मोजणी करण्याबाबतची कार्यवाही नगरपरिषद घुग्घुस यांनी सुरु केलेली आहे. नगर विकास विभागाच्या दिनांक १७ नोव्हेंबर २०१८ च्या शासन निर्णयान्वये अतिक्रमण नियमानुकुल करताना अतिक्रमित जमिनीचा संबंधित भुमि अभिलेख कार्यालयाकडुन मोजणी "क" प्रत प्राप्त झाल्यानंतर नगर परिषदेकडून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील व विकास नियंत्रण नियमावली मधील तरतुदीनुसार एकत्रित अभिन्यास तयार करण्यात येणार आहे. तद्नंतर दि.१७ नोव्हेंबर, २०१८ च्या शासन निर्णयातील नमुद अटी व शर्तींच्या अधीन राहून सदरची अतिक्रमणे नियमानुकुल करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

म/६९३-१९

------

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन

**श्री.सुरेश धस, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८७७ पुढीलप्रमाणे:-**

"श्रीमती. श्वेता योगेंद्र कुऱ्हाडे, कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे यांनी केलेल्या भ्रष्टाचाराबाबत शासनाकडे तक्रार करूनही चौकशी न करणे, कुऱ्हाडे यांनी बेकायदेशीर रित्या स्वतःला राहण्यासाठी कृष्णा खोरे विकास महामंडळाची वर्ग एक साठीची संपूर्ण इमारत एकट्यासाठी घेणे, त्याकरिता वरिष्ठाची परवानगी न घेणे, ज्यादाच्या क्षेत्राचे भाडे न देणे, वरिष्ठांची मंजुरी न घेता रहाण्याच्या इमारती शेजारील १२००० चौरस फूट जागेवर शोभेच्या झाडासाठी लाखोंचा खर्च करणे, निविदा प्रक्रिया न राबवता वरिष्ठ अधिकाऱ्यांची मंजुरी न घेता इमारतीच्या संरचनेत बदल करणे त्यासाठी लाखो रुपयांचा खर्च करणे, जुन्या इमारतीमधील लाकडी सामान, फर्निचर, लोखंड, इत्यादी साहित्य कवडीमोल भावात विकणे, अनावश्यक कामावर ५० ते ६० लाखांचा खर्च दाखवून त्यामध्ये ४० लाख रुपयांचा भ्रष्टाचार करणे, मुठा नदी उजवा कालव्यामध्ये जुन्या संरक्षण भिंतीच्या मजबुती करण्यासाठी निकृष्ट दर्जाची कामे करून ४०% कमिशन घेऊन २० कोटी रुपयांचा खर्च करणे, अशा तक्रारी असतानाही शासनामार्फत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कसलीही चौकशी न होणे, भ्रष्टाचाराला पाठीशी घालणं, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

मा.मंत्री,जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांचे निवेदन

श्रीमती.श्वेता योगेंद्र कुऱ्हाडे,कार्यकारी अभियंता,खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे यांच्याविरुध्दच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या त्यानुषंगाने संबंधित दक्षता पथक पुणे यांच्याकडून प्राप्त वस्तुस्थितीदर्शक अहवालाची शासनस्तरावर तपासणी व तांत्रिक छाननी करण्यात येत आहे.

कार्यकारी संचालक, कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे अंतर्गत कार्यरत श्रीमती श्वेता कुऱ्हाडे, कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे या कार्यालयात दि.०६/०७/२०२३ रोजी हजर झाल्या. वर्ग-१ अधिकारी म्हणून येरवडा पाटबंधारे शासकीय वसाहती मधील ड' वर्ग इमारतीमधील निवासस्थान रहिवासासाठी मिळणे बाबत त्यांनी पुणे पाटबंधारे मंडळांतर्गत शासकीय निवासस्थान वाटपसमितीस विनंती केली होती. शासकीय निवासस्थान वाटपसमितीचे कार्यालयीन आदेश, दि.२६/०३/२०२४ नुसार श्रीमती कुऱ्हाडे, कार्यकारी अभियंता यांना येरवडा पाटबंधारे वसाहतीमधील वर्ग अ निवास स्थान क्र. ड इमारत (१/२) तळमजला चे वाटप करण्यात आलेले होते. श्रीमती कुऱ्हाडे या सदर निवासस्थानात राहण्यास जाणेपूर्वी निवासस्थान राहण्यायोग्य करण्याच्या अनुषंगाने दुरुस्ती करून घेत होत्या.

तथापि दरम्यानच्या काळात सदर दुरुस्ती बाबत तक्रारी झाल्यामुळे त्यांनी दि.३१/०७/२०२४ रोजी सदर निवासस्थानात राहण्यास न जाता परत शासनाच्या ताब्यात दिले आहे.

श्रीमती श्वेता कुऱ्हाडे, कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे यांनी शासकीय निवासस्थानाचा ताबा घेतलेनंतर निवासस्थानाच्या समोरील बाजूस असलेला परिसर राहण्यायोग्य करण्याच्या अनुषंगाने दुरुस्ती करताना अंदाजे ७०० स्क्वेअर फुट जागेत शोभेची झाडे त्यांच्या स्वखर्चाने लावलेली होती.

श्रीमती श्वेता कुऱ्हाडे, कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे यांना वाटप झालेले निवासस्थान हे बऱ्याच वर्षापासून विना वापर होते म्हणून सदर निवासस्थान राहण्यायोग्य करणेसाटी निवासस्थानाची स्वच्छता व दुरुस्ती स्वखर्चाने केलेली आहे. यामध्ये त्यांनी निवासस्थानाचे जुन्या दरवाजच्या चौकटी व दरवाजे, खिडक्या बदलून नवीन बसविल्या. तसेच निवासस्थानाच्या दुरुस्ती दरम्यान काढलेल्या जुन्या दरवाजाच्या चौकटी व दरवाजे, खिडक्या ह्या वस्तू निवासस्थानामध्ये एकत्र करून सदर इमारतीची देखभाल दुरुस्ती करणारे सहायक अभियंता, श्रेणी-१, मालमत्ता व्यवस्थापन उपविभाग, पुणे यांना हस्तांतरित केलेल्या आहेत. सबब सदर वस्तू ह्या शासनाकडे हस्तांतरित आहेत व सदर वस्तूंचा लिलाव केलेला नाही.

नवीन मुठा उजवा कालवा सा.क्र.१२ ते २८ मधील शहर हद्दीतील कालव्याची दुरुस्ती व बांधकामांची दुरुस्ती करणे या कामाचा समावेश सन २०२२-२३ च्या बिगर सिंचन प्रापण सूची मध्ये करण्यात आला होता. त्यानुषंगाने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे या कार्यालयाचे पत्र दि. ०५/१२/२०२२ अन्वये मंजूर बिगर सिंचन प्रापण सूची सन २०२२-२३ मधील अ.क्र. ब. ८ नवीन मुठा उजवा कालवा सा.क्र. १२ ते २८ मधील शहर हद्दीतील कालव्यांची दुरुस्ती व बांधकामांची दुरुस्ती करणे या कामास रक्कम रु. २० कोटी एवढ्या किमतीस मान्यता मिळाली होती. त्यानुसार सदर कामाची निविदा कार्यवाही पूर्ण करून कार्यारंभ आदेश दिले होते. तथापि सदर कालवा दुरुस्ती मंजूर कामांतर्गत शहरी भागातील कालवा सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून प्रापणसुचीत मंजूर कालवा सा.क्र. १२ ते २८ या लांबीतील सर्वात धोकादायक व कालवा परीचलनाच्या दृष्टीने दुरुस्ती गरजेची असलेला भाग म्हणून कि. मी. १३ ते १५ ह्या ठिकाणचे काम तातडीने करणे आवश्यक होते. सबब प्रापणसुची मधील नवीन मुठा कि.मी. १२ ते २८ या मंजूर लांबीतील प्रापणसुचीत मंजूर निधीच्या मर्यादेत कालवा सुरक्षिततेच्या व परिचलनाच्या दृष्टीने कि. मी. १३ ते १५ मधील काम प्राधान्याने करणे आवश्यक असल्याने प्रापणसुची मधील फक्त कामाच्या नावात बदल करण्याचा प्रस्ताव महामंडळास मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणे या कार्यालयाचे पत्र दि.०५/०३/२०२४ अन्वये सदर कामास कार्योत्तर मान्यता देण्यात आलेली आहे.तसेच मुठा कालवा कि.मी.१३ ते१५ मधील जून्या संरक्षक भिंतीचे मजबूतीकरणाचे काम हे चालू झालेले नाही.

तक्रारीच्या अनुषंगाने याबाबत शासनस्तरावर प्राप्त अहवालाची तपासणी व तांत्रिक छाननी सूरू आहे. सदर प्रकरणी सखोल चौकशी करून उचित कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

.................................................................................................

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे (पावसाळी) अधिवेशन
लक्षवेधी सूचना क्रमांक १११२

श्री.अभिमन्यु पवार, श्री. अमित देशमुख, श्री. विकास ठाकरे, श्री. संजय मेश्राम वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील -

---

"लातूर येथे जिल्हा रुग्णालय कार्यान्वित नसणे, त्यामुळे लातूर जिल्हयातील रुग्णांचा उपचाराचा अतिरिक्त भार विलासराव देशमुख शासकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, लातूर वर पडलेला असणे, सदरील वैद्यकीय महाविधालयात अनेक पदे रिक्त असून महाविद्यालयामध्ये ५०० रुग्ण खाटा प्रमाणे कर्मचारी वर्ग मंजूर असून प्रत्यक्षात ८५० रुग्ण खाटा चालवले जाते. त्यामुळे वर्ग १ ते ४ ची अतिरिक्त पदे मंजूर करुन भरण्याची आवश्यकता असणे, सदरील महाविद्यालयातील MRI मशीन मागील दीड वर्षापासून बंद अवस्थेत असणे, त्यामुळे नवीन MRI मशीन रुग्णाच्या सेवेकरिता मंजूर करण्याची गरज असणे, रुग्णालया शेजारील रेल्वे विभागाची जागा शासनाने सदरील महाविद्यालयाच्या विस्तारासाठी मंजूर केली असून सदरील प्रकरण न्याय प्रविष्ट असल्याने रुग्णालयाच्या वाढीव बांधकाम व इतर सुविधासाठी जागा अपुरी पडत असल्याने सदरील न्याप्रविष्ट असलेले प्रकरण त्वरित निकाली काढण्याच्या दृष्टीने शासनाने तत्परतेने उचित कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे, सदरील महाविद्यालयातील मंजूर व प्रस्तावित बांधकामे झालेली नसणे, त्यामुळे रुग्णांच्या तत्परतेने उपचार देण्यावर परिणाम झाला असून विलासराव देशमुख शासकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, लातूर येथे रुग्णांच्या सेवेकरिता आवश्यक सुविधा व वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

मा.मंत्री (वै.शि.) यांचे निवेदन

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, लातूर येथे आजूबाजूच्या परिसरातून व पर राज्यातील रुग्ण औषधोपचाराकरिता दाखल असतात. त्यामुळे रुग्णालयावर अतिरिक्त भार पडत आहे. सदर रुग्णालयातील पदांची स्थिती खालील प्रमाणे आहे.

| वि.दे.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, लातूर | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | संवर्ग | मंजुर | भरलेली | रिक्त |
| १ | वर्ग-१ | ६६ | ५९ | ७ |
| २ | वर्ग-२ | १०१ | ९१ | १० |
| ३ | वर्ग-३ (अतांत्रिक) | २३ | १७ | ६ |
| | वर्ग-३ तांत्रिक | ११९ | ९२ | २७ |
| | परिचर्या संवर्ग | ३९५ | ३२५ | ७० |
| ४ | वर्ग -४ | २२४ | १०२ | १२२ |
| | एकुण | ९२८ | ६८६ | २४२ |

प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक (गट-अ) तसेच सहाय्यक प्राध्यापक (गट-ब) या संवर्गातील पदे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती, स्वेच्छा सेवानिवृत्ती, राजीनामा व पदोन्नती होत असल्याने पदे रिक्त होण्याची प्रक्रिया सुरुच असते.

वर्ग-१ संवर्गातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक ही पदे ५०% सरळसेवेने व ५०% पदोन्नतीने भरण्याची तरतुद आहे. तसेच वर्ग-२ सवर्गातील सहाय्यक प्राध्यापक व वैद्यकीय अधिकारी ही पदे १०० % सरळसेवेने भरण्याची तरतुद आहे.

प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील पदोन्नती कोट्यातील रिक्त पदे भरण्याकरिता शासन स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे. रिक्त पदे नियमित स्वरुपात भरेपर्यंत, रुग्णहित व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेता, शासन निर्णय दि.०९.०२.२०२२ व दि. २१.०८.२०२४ अन्वये चिकित्सालयीन, अचिकित्सालयीन व अतिविशेषोपचार विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील रिक्त असलेली पदे ही कंत्राटी पध्दतीने ३६४ दिवसाकरिता संचालनालय स्तरावरुन भरण्यांत येत आहेत.

त्याचप्रमाणे वर्ग-२ या संवर्गातील सहाय्यक प्राध्यापक व वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे तात्पुरत्या नियुक्तीने विभागीय निवड मंडळामार्फत भरण्याबाबत संस्थाप्रमुखांना अधिकार देण्यांत आलेले आहेत. त्यानुसार संस्थास्तरावरुन विभागीय निवड मंडळामार्फत ३६४ दिवसांकरीता सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरण्यांत येतात.

संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय व दंत महाविद्यालये व संलग्नित रुग्णालयातील गट-क तांत्रिक संवर्गातील सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदे भरण्याबाबतची प्रक्रिया टि.सी.एस. या कंपनीमार्फत भरण्याची जाहिरात दि.१८.०६.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यानुसार रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

कार्यालयीन अधिक्षक पदावर संचालनालयाचे आदेश दि.१७.०४.२०२५ अन्वये एकुण ६२ कर्मचाऱ्यांना पदोन्नती प्रदान करण्यात आली आहे. वरिष्ठ सहाय्यक पदावर पदोन्नतीकरीता विभागीय पदोन्नती समितीची कार्यवाही अंतिम टप्यात आहे व वरिष्ठ लिपीक पदावर पदोन्नतीकरीता विभागीय पदोन्नती समितीची कार्यवाही करण्यात येत आहे.

कनिष्ठ लिपिकांची सरळसेवेतील रिक्त पदे भरण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र सादर करण्यात आले आहे. त्यापैकी ४७७ उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. उच्चश्रेणी व निम्नश्रेणी लघुलेखकांची रिक्त पदे विभागीय पदोन्नती समितीच्या शिफारशीनुसार भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

वर्ग-४ या संवर्गाचे नियुक्ती प्राधिकारी अधिष्ठाता असून या विभागाच्या दि. २० ऑक्टोबर २०२२ च्या पत्रान्वये सर्व अधिष्ठातांना त्यांचे संस्थेतील वर्ग-४ ची रिक्त पदे भरण्यासाठी संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा निवड समितीकडे मागणीपत्र पाठवून पद भरतीबाबत तात्काळ कार्यवाही करण्याबाबत सूचित केले आहे. वर्ग-४ संवर्गातील पद भरती करण्याबाबत संस्थास्तरावरुन कार्यवाही करण्यात येत आहे.

संचालनालयाच्या अधिनस्त महाविद्यालये व रुग्णालयात अधिपरिचारीका या पदावर ४००० नविन उमेदवारांची नियुक्ती भरती प्रकीया २०२३ मधून करण्यात आलेली आहे. तसेच ८३० अधिपरिचारीकांना परिसेविका या पदावर माहे-डिसेंबर २०२४ मध्ये पदोन्नती प्रदान करण्यात आलेली आहे. परिचर्या संवर्गातील

पदे नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त, स्वेच्छा सेवानिवृत्ती, राजीनामा व पदोन्नती होत असल्याने पदे रिक्त होण्याची प्रक्रिया निरंतर सुरुच राहते. त्यामुळे सदर रिक्त पदे लवकरच भरण्यात येतील.

संचालनालयाच्या दि. ३०.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासनास संचालनालयाच्या अधिनस्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांकरिता विद्यार्थी क्षमता व वाढीव रुग्णखाटांच्या अनुषंगाने वर्ग १ ते ४ संवर्गातील पदांची निर्मिती करणे बाबतचा एकत्रीत प्रस्ताव करण्यात आलेला आहे. त्यामध्ये विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, लातूर या संस्थेचाही समावेश आहे.

संस्थेतील टेस्टला एम.आर.आय मशीन बंद असल्याने छाती विकार, मणक्याचे विकार, मेंदूविकार, महिलांच्या ओटीपोटाचे आजार यासह अपघातातील रुग्णांना एमआरआयची आवश्यकता असतानाही त्यांना ही सुविधा उपलब्ध नसल्याने रुग्णांची गैरसोय होवू नये म्हणून संस्थेचे तत्कालीन अधिष्ठाता यांनी संस्थेच्या नजिकच्या विवेकानंद रुग्णालयाशी सामंजस्य करार केलेला असून शासन दराने विविध आजारानुसार तपासणी करुन घेण्यात येत आहे. त्याचप्रमाणे संचालनालयाने सन २०२५-२६ या वित्तीय वर्षामध्ये दि.२०.०५.२०२५ अन्वये क्ष-किरणशास्त्र विभागातील एम.आर.आय.मशिन व सिटी स्कॅन मशिन या पीपीपी तत्वावर देण्याचे आदेश देण्यात आलेले असून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही सुरु आहे.

रेल्वे विभागाची मोकळी असलेली २.४५ आर इतकी जागा मा.जिल्हाधिकारी, लातूर यांनी दि.२९.०८.२०१९ रोजीच्या आदेशानुसार अधिष्ठाता यांच्या ताब्यात दिलेली आहे. सद्यस्थितीत नियमित दिवाणी दावा क्र.३२/२०२० अन्वये रेल्वे विभागाकडून Perpetual Injuction करिता दावा केलेला आहे. हा दावा रेल्वे विभागातर्फे महाराष्ट्र शासन, जिल्हाधिकारी, लातूर व अधिष्ठाता, शावैम.लातूर यांचेवर दाखल करण्यात आलेला असून सदर जागा रेल्वे विभागाच्या मालकीची असल्याचा दावा केला आहे. सदर न्यायालयीन प्रकरणास मा.न्यायालयाकडून स्थगिती (stay) देण्यात आलेला असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय लातूर येथील ओ.पी.डी. बांधकामासाठी शासन निर्णय दि ०५.०३.२०२१ अन्वये रु. ७३.२९ कोटी व विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय लातूर येथे ४०० खाटांच्या रुग्णालयीन इमारतीचे बांधकाम करणे (G+४) या कामासाठी शासन निर्णय दि.११.०३.२०२४ अन्वये रु.९३.७७ कोटी इतक्या रक्कमेच्या प्रशासकीय मान्यता प्राप्त असून सदर कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे.हाईटस लि. यांनी नियुक्ती केलेली आहे. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्यासोबत सामंजस्य करारा करण्यात आला आहे. त्यानुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे हाईटस लि. यांनी प्रत्यक्ष बांधकामासाठी निविदा प्रकिया राबविण्यात आली होती.

लातूर येथे ४०० खाटांच्या रुग्णालयीन इमारतीचे बांधकाम करणे (G+४) याकामासाठी L१ कंत्राटदार मे. शिवालया कन्स्ट्रक्शन यांची नियुक्ती करण्यात आली आहे.प्रकल्प व्यवस्थापन सल्लगार यांनी सदर कामाचे कार्यरंभ आदेश निर्गमित केले आहे. मे. हाईटस यांच्याकडून पुढील कार्यवाही सुरु आहे.

*******************

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे (पावसाळी) अधिवेशन
लक्षवेधी सूचना क्रमांक १३९३

श्री.रणधीर सावरकर, श्री. अमित झनक, श्री. संजय मेश्राम वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील -

---

"प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजनेंतर्गत अकोला येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल लोकार्पण होऊनसुध्दा डॉक्टरांची मंजूर पदांची भरती न झाल्याने तसेच तपासणी मशीन तंत्रज्ञ अभाव विनावापर पडून असल्याने गरीब गरजू रुग्णांना रुग्णोपचाराची सुविधा उपलब्ध नसणे, अकोला, बुलढाणा, वाशीम, हिंगोली आशा जिल्हातून रुग्ण उपचारासाठी अकोला येथे येतात सदर सुपर स्पेशालिटी रुग्णालय सुरु न झाल्याने रुग्णांना खाजगी रुग्णालयात महागडा व खर्चिक उपचार घ्यावा लागत असल्याने रुग्ण व नागरिकांमध्ये हॉस्पिअल सुरु न झाल्याने प्रचंड नाराजी व शासनप्रती असंतोष निर्माण होणे या करिता सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल रुग्ण सेवेत पुर्ण क्षमतेने तातडीने सुरु करणे या बाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

मा.मंत्री (वै.शि.) यांचे निवेदन

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय ,अकोला तसेच अ.वि.रु.अकोला येथील पदस्थिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | पदनाम | मंजूर | भरलेली पदे | | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|
| | | | नियमित | तदर्थ पदोन्नती/ करार/ विनिम | |
| १ | प्राध्यापक | २९ | १५ | ०० | १४ |
| २ | सहयोगी प्राध्यापक | ५५ | ३६ | ०० | १९ |
| ३ | सहाय्यक प्राध्यापक | ९० | ३८ | २३ | २९ |
| एकूण | | १७४ | ८९ | २३ | ६२ |

वर्ग-१ संवर्गातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक ही पदे ५०% सरळसेवेने व ५०% पदोन्नतीने भरण्याची तरतुद आहे.तसेच वर्ग-२ सवर्गातील सहाय्यक प्राध्यापक व वैद्यकीय अधिकारी ही पदे १००% सरळसेवेने भरण्याची तरतुद आहे.

तरी सदरहू संवर्गातील रिक्त पदे नियमित स्वरुपात भरेपर्यंत,रुग्णहित व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेता, शासन निर्णय दि.०९.०२.२०२२ व दि.२१.०८.२०२४ अन्वये चिकित्यालयीन,अचिकित्सालयीन व अतिविशेषोपचार विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील रिक्त असलेली पदे ही कंत्राटी पध्दतीने ३६४ दिवसाकरता संचालनालय स्तरावरुन भरण्यांत येत आहेत. त्याच प्रामणे वर्ग-२ या संवर्गातील सहाय्यक प्राध्यापक व वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे तात्पुरत्या नियुक्तीने विभागीय निवड मंडळामार्फत भरण्याबाबत संस्थाप्रमुखांना

अधिकार देण्यांत आलेले आहेत.त्यानुसार संस्थास्तरावरुन विभागीय निवड मंडळामार्फत ३६४ दिवसांकरीता सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरण्यांत येतात.

तसेच वर्ग-१ या संवर्गातील प्रध्यापक , सहयोगी प्राध्यापक व वर्ग-२ संवर्गातील सहाय्यक प्राध्यापक व वैद्यकीय अधिकारी पदांचे नियुक्ती प्राधिकारी शासन आहे.तथापि राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक (वर्ग-१) तसेच सहाय्यक प्राध्यापक ( वर्ग-२ ) या संवर्गातील सरळसेवेच्या कोटयातील रिक्तपदे भरण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत जाहिराती प्रसिध्द करण्यांत आलेल्या आहेत.त्यानुसार रिक्त पदे भरण्यांबाबतची कार्यवाही शासनस्तरावरुन करण्यांत येत आहे.त्याचप्रमाणे प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील पदोन्नती कोटयातील रिक्त पदे भरण्याकरिता शासन स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

| अ.क्र | पदनाम | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | इ.सी.जी.तंत्रज्ञ | १ | १ | ० |
| २ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ४ | ४ | ० |
| ३ | डायलेसीस तंत्रज्ञ | २ | १ | १ |
| | एकूण | ७ | ६ | १ |

वर्ग-३ तांत्रीक संवर्गातील इ.सी.जी.तंत्रज्ञ, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, डायलेसीस तंत्रज्ञ ही पदे ५०% सरळसेवेने व ५०% पदोन्नतीने भरण्याची तरतुद आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिशोषपचार रुग्णालय, अकोला या संस्थेमध्ये प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनेअंतर्गत दि.१ जानेवारी २०१४ रोजी केंद्र शासनाकडून रु.१५०/- कोटी मजूरी मिळालेली असून रु.१२०/- कोटी केंद्र शासनाकडून व रु.३०/- कोटी राज्य शासनाकडून मंजूर आहेत. त्यानूसार रुग्णालय व इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. सदर इमारत ३०/१२/२०२१ रोजी संस्थेकडे हस्तांतरीत करण्यात आलेली आहे.

शासन निर्णय क्र.पदनि-२४२०/प्र.क्र.१३७/२०२०/वैसेवा-१ दि.०८/०१/२०२१ अन्वये अकोला येथे अतिशोपचार रुग्णालयाकरिता ०३ टप्प्यात आवश्यक १ ते ४ संवर्गाची एकूण १८४७ पदांपैकी प्रथम टप्प्याकरिता आवश्यक ८८८ पदे मंजूर करण्यात आलेली असून त्यापैकी अतिविशेषोपचार रुग्णालयासाठी २२३ पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. दि.०१/०८/२०२२ पासून बाहय रुग्ण विभाग रुग्णसेवेत कार्यान्वित आहे. रुग्णसेवा सुरळीत होण्यासाठी वर्ग-१ व २ ची पदभरती करण्याची प्रक्रिया शासन स्तरावर सुरु असून टीसीएसमार्फत ५१८२ पदे भरण्यात आलेली होती त्यापैकी अतिविशेषपचार रुग्णालय, अकोला यासाठी ६ तांत्रीक पदांची भरती करण्यात आलेलली आहे. तसेच संचालनालयामार्फत क्र.संवैशिवसं/तांत्रिक-अतांत्रिक/जाहिरात/आस्था-४/८५३/२५ दिनांक १८/०६/२०२५ नूसार वर्ग-३ तांत्रीक संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्यानूसार पदभरतीची करण्यात येणार आहे.

************************************************

लक्षवेधी सुचना क्रमांक २३०३

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री.किशोर जोरगेवार, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सुचना क्र.२३०३ पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यातील हाफकिन जीवऔषध निर्माण महामंडळात सुरु असलेला गैरप्रकार व भ्रष्ट कारभार, योग्यता व कामाचा कोणताही अनुभव नसलेल्या अधिकाऱ्यांची कोणतीही मुलाखत न घेता केवळ भ्रष्ट मार्गाने त्यांना वरिष्ठ दर्जा देण्यात येणे, महाव्यवस्थापक उत्पादन या पदावर उत्पादनाचा कोणताही अनुभव नसलेल्या एका डॉक्टरला बसविण्यात येणे, व्यवस्थापक प्रशासन या पदावर अँटी करप्शनची चौकशी सुरु असलेल्या एका भ्रष्ट अधिकाऱ्याची करण्यात आलेली नेमणूक, तसेच आस्थापना अधिकारी म्हणून एका जेष्ठ महिला अधिकाऱ्यांची रितसर पदोन्नती करण्यात आलेली असतांनाही त्यांना जाणीवपुर्वक प्रशासनातून काढून इतर विभागात बदली करुन त्यांच्या जागी ज्येष्ठता यादीत १२ व्या क्रमांकावर असलेल्या कक्ष अधिकाऱ्याला बसविण्यात येणे, हाफकिन कंपनीत सद्यस्थितीत एकही सी.ए. शैक्षणिक अर्हता असलेला अधिकारी नसणे, त्याचा चार्ज बी.कॉम झालेल्या एका महिला अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात येणे, सदर महिला अधिकाऱ्यांनी हाऊसकिपिंग कंत्राटदाराकडे १० लाख रुपयांची लाच मागणे, पैसे न दिल्यामुळे कंत्राटदाराची ५ महिन्यांची बिले थकवणे, भ्रष्ट मार्गाने वरिष्ठ दर्जाच्या पदावर बसलेल्या उक्त अधिकाऱ्यांच्या जाचाला व त्यांच्या भ्रष्टाचारी कारभाराला कंटाळून हाफकिनमधील इतर ६ वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शासकीय नोकरीचा राजीनामा देणे, परिणामी भविष्यात जीव रक्षक औषधांचे उत्पादन कोण करणार असा प्रश्न इतर अधिकारी व कामगारांमध्ये निर्माण झालेला असणे, शासनाने उक्त प्रकरणी तातडीने पारदर्शक चौकशी करुन हाफकिन महामंडळातील भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता."

---

मा. मंत्री (अन्न व औषध प्रशासन) यांचे निवेदन

हाफकिन जीवऔषध निर्माण महामंडळातील महाव्यवस्थापक उत्पादन हे पद जून, २०२४ पासून रिक्त होते. सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार हाफकिन महामंडळातील सर्वात वरिष्ठ असलेले अधिकारी यांना रितसर पध्दतीचा अवलंब करुन व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने देण्यात आलेला आहे. हाफकिन महामंडळ लसी व औषधे यांची निर्मिती करत असल्यामुळे वैद्यकीय क्षेत्रातील व्यक्तीला महाव्यवस्थापक उत्पादन या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे.

व्यवस्थापक प्रशासन हे पद सन २०२२ पासून रिक्त आहे. हाफकिन महामंडळातील सर्वात द्वितीय वरिष्ठ असलेले अधिकारी यांना रितसर पध्दतीचा अवलंब करुन व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने देण्यात आलेला आहे. तसेच व्यवस्थापक प्रशासन या पदावरील कोणत्याही अधिकाऱ्याची अंटी करप्शनची चौकशी सुरु असल्याबाबतची कोणतीही माहिती अथवा तक्रार महामंडळाकडे प्राप्त झालेली नाही.

आस्थापना अधिकारी या पदावर कार्यरत असलेल्या श्रीम. शमिका पड्याळ या अधिकाऱ्याची गंभीर आरोपावरुन त्यांच्यावर आरोपपत्र दाखल करुन विभागीय चौकशी प्रलंबित आहे. त्यामुळे त्यांना दुसऱ्या विभागात स्थानांतरण करण्यात आले आहे. तसेच शैक्षणिक पात्रता व अनुभव या धर्तीवर महामंडळातील योग्य अधिकाऱ्यास आस्थापना अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार तात्पुरत्या स्वरुपात देण्यात आलेला आहे.

हाफकिन महामंडळात व्यवस्थापक लेखा हे पद सन २०२१ पासून रिक्त आहे. सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार मनुष्यबळाच्या उपलब्धतेनुसार विविध अधिकाऱ्यांना सन २०२१ पासून देण्यात आलेला आहे. यामुळे महामंडळाच्या कार्यपध्दतीनुसार वरिष्ठ व अनुभवी व्यक्तीस अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. सदर महिला अधिकाऱ्यांनी १० लाख रुपयांची लाच मागणे, पैसे न दिल्यामुळे पाच महिन्यांची हाऊस किपिंग कंत्राटदार यांची बिले थकविणे इ. बाबत हाऊस किपिंग कंत्राटदाराची तक्रार महामंडळास प्राप्त झालेली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने महामंडळ स्तरावर कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ यांना कळविण्यात आले आहे.

हाफकिन महामंडळातील चार अधिकाऱ्यांनी वैयक्तिक कारणास्तव सेवेचा राजीनामा दिलेला आहे. त्यामुळे महामंडळाच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या कारभाराला कंटाळून संबंधित अधिकाऱ्यांनी राजीनामा दिला आहे असे म्हणणे संयुक्तिक ठरणार नाही.

*******

लक्षवेधी सुचना क्र. ५७६

## महाराष्ट्र विधानसभा सन २०२५ चे वित्तीय अधिवेशन

श्री. रईस शेख वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ५७६ पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यातील दिव्यांग (पीडब्ल्युडी) विदयार्थ्यांना उच्च शिक्षणात मोठ्या प्रमाणात येत असलेले अडचणी, दिव्यांग विदयार्थ्यांसाठी शासनाने १०० टक्के शुल्क परतावा योजना राबविली असली तरी योजनेची अंमलबजावणी अत्यंत संथ गतीने सुरु असणे, परिणामी विदयार्थ्यांना शैक्षणिक शुल्काबाबत अनेक आर्थिक अडचणींचा सामना करावा लागणे, दिव्यांग विदयार्थ्यांना प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीला संपूर्ण शुल्क भरावे लागणे, सदर शुल्काचा परतावा मिळण्याची प्रकिया अनेक महिने प्रलंबित राहणे, त्यामध्येही परतावा एकाच टप्प्यात न देता दोन टप्प्यात देण्यात येणे, अनेक विदयार्थी हे आर्थिकदृष्टया दुर्बल कुटुंबातील असल्याने त्यांना परवडणारे नसणे, त्याकरिता दिव्यांग विदयार्थ्यांना शुल्क भरण्याची आवश्यकता टाळून संस्थांना थेट शासनाकडून शुल्क मिळविण्याची व्यवस्था करण्यात यावी, तसेच परताव्याची रक्कम एका हप्त्यात आणि वेळेवर विदयार्थ्यांना देण्याबाबत शासन स्तरावर करावयाची कार्यवाही, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

## श्री. चंद्रकांत पाटील, मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे निवेदन

केंद्र शासन पुरस्कृत दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना राज्यात सन २०१६-१७ पासून नॅशनल स्कॉलरशीप पोर्टलव्दारे (NSP) ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत प्रवेश फी आणि टयुशन फी यासाठी प्रत्यक्ष खर्च किंवा रु. १.४० लक्ष प्रतिवर्ष, इतर शुल्कासाठी (ग्रंथालय शुल्क, क्रिडा शुल्क, वैद्यकीय तपासणी) प्रत्यक्ष खर्च किंवा रु. १०,०००/- प्रतिवर्ष, परीरक्षण भत्ता यासाठी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना रु.१२००/- दरमहा व वसतिगृहाबाहेरील विद्यार्थ्यांना रु. ६५०/- दरमहा, दिव्यांगत्व भत्ता यासाठी दृष्टीने दिव्यांग असणाऱ्या विद्यार्थ्यांना रु. ४०००/- प्रतिवर्ष व इतर दिव्यांग विद्यार्थ्यांना रु. २०००/- प्रतिवर्ष आणि पुस्तकीय भत्ता यासाठी रु. १५००/- प्रतिवर्ष असे लाभ शिष्यवृत्ती स्वरुपात मंजूर करण्यात येतात. केंद्र शासनाने या योजनेअंतर्गत राज्यासाठी १८७९ संच विहीत केलेले आहेत. त्यानुसार सन २०२२-२३ मध्ये प्राप्त २७४५ विद्यार्थ्यांच्या अर्जांपैकी १३३५ विद्यार्थ्यांना, सन २०२३-२४ मध्ये प्राप्त १२२७ विद्यार्थ्यांच्या अर्जांपैकी १०५५ विद्यार्थ्यांना व सन २०२४-२५ मध्ये प्राप्त ११६३ विद्यार्थ्यांच्या अर्जांपैकी १०३६ विद्यार्थ्यांना केंद्र शासनाने शिष्यवृत्ती मंजूर केलेली आहे.

केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व सक्षमिकरण मंत्रालयाने त्यांचे ज्ञापन दि. २५.९.२०२४ अन्वये सदर योजनेसाठी मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या असून या सूचनांनुसार प्रस्तुत शिष्यवृत्ती योजनेअंतर्गतचे लाभ Public Finance Management System (PFMS) प्रणालीव्दारे Direct to Beneficiary Transfer पोर्टलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या थेट आधार क्रमांक संलग्न खात्यात जमा करण्यात येतात.

--------------------

## महाराष्ट्र विधानसभा

### श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.६२२ पुढीलप्रमाणे आहे.

"राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागात मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार होत असल्याची तक्रार डॉक्टर अभिषेक हरदास यांनी राज्य शासनाच्या मुख्यमंत्री मुख्य सचिव अप्पर मुख्य सचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्याकडे दिनांक १९.६.२०२५ रोजी करणे, सदर तक्रारी मध्ये राज्य शासनाच्या विविध अधिकारी आर्थिक व्यवहारासाठी सीनियर कॉलेजच्या फायली दाबून ठेवत असल्याची तक्रार होणे, सदर फायलीन ची संख्या सुमारे ५०० च्या वरती होत असल्याची माहिती त्यामध्ये देणे, नियमित प्राचार्य नाही, जागा नाही अश्या कॉलेजेसला नवीन कोर्स मान्यता देता येत नसतांना १५ लाख रुपये घेवुन मान्यता देण्यात आली यात पुण्यातील कार्यकर्ता साळी देखील सामील आहे याचा तपशील उदाहरणार्थ शांताबाई शिवराम पवार कॉलेज, पुणे तकक्षशिला कॉलेज ऑफ आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स, पुणे इत्यादी तरी सदर प्रकार गंभीर असून यात सखोल तपास आवश्यक असून चौकशी सुरु झाल्यास तक्रारदार स्वतः काही व्हिडीओ देईल याची नोंद घेऊन वर नमूद आरोपी यांचे मोबाईल सिडिआर, बँक खाती, ऑनलाईन मनी ट्रान्सफर, कार्यालयातील सिसिटीव्ही, येणाऱ्या जाणाऱ्या लोकांचे जाब जबाब घेण्याची मागणी करत असल्याची बाब समोर येणे, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना."

### मा. श्री. चंद्रकात पाटील, मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे निवेदन

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १०९ (३) व (४) मध्ये अनुक्रमे नवीन महाविद्यालय व नवीन अभ्यासपाठ्यक्रम/ विषय/ विद्याशाखा / अतिरिक्त तुकडी यांना मान्यता देण्याची तरतूद विशद करण्यात आलेली आहे. सदर तरतुदीस अनुसरून नवीन महाविद्यालय व नवीन अभ्यासपाठ्यक्रम/ विषय/ विद्याशाखा / अतिरिक्त तुकडी यांना मान्यता देण्याबाबत निकष व कार्यपध्दती अनुक्रमे शासन निर्णय दिनांक १५.०९.२०१७ व शासन निर्णय, दिनांक १३.०९.२०१७ व अन्वये विहित करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम १०९ (३) व (४) मधील तरतुदीनुसार नवीन महाविद्यालय, नवीन अभ्यास पाठ्यक्रम/विषय/विद्याशाखा/अतिरिक्त तुकडी सुरु करण्यास इच्छुक संस्था, ज्या वर्षापासून परवानगी मागितली असेल त्या वर्षाच्या अगोदरच्या वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी संबंधित विद्यापीठाकडे अर्ज दाखल करतात.

विद्यापीठाकडे नवीन अभ्यास पाठ्यक्रम/विषय/विद्याशाखा/अतिरिक्त तुकडीबाबतच्या प्राप्त प्रस्तावांची, विद्यापीठ स्तरावर शासन निर्णय, दिनांक १३.०९.२०१७ अन्वये विहित निकषांनुसार छाननी करून, सर्व पात्र अर्जदार संस्थांचे अर्ज मंजूरीच्या शिफारशीसह विद्यापीठाकडून शासनाकडे दिनांक १ एप्रिल रोजी किंवा त्यापुर्वी प्राप्त होतात.

विद्यापीठाकडे नवीन महाविद्यालयासंदर्भात अंतिम मान्यतेकरीता प्राप्त अनुपालन अहवालांची, विद्यापीठ स्तरावर शासन निर्णय, दिनांक १५.०९.२०१७ अन्वये विहित निकषांनुसार

छाननी करून, सर्व पात्र अर्जदार संस्थांचे अर्ज मंजूरीच्या शिफारशीसह विद्यापीठाकडून शासनाकडे दिनांक मे च्या पहिल्या दिवशी किंवा त्याआधी प्राप्त होतात.

विद्यापीठाकडून सकारात्मक शिफारशींसह विहित कालावधीत प्राप्त झालेल्या नवीन महाविद्यालय तसेच नवीन अभ्यास पाठ्यक्रम/विषय/विद्याशाखा/अतिरिक्त तुकडीबाबतच्या प्रस्तावांची शासनस्तरावर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १०९ (३) व (४) मधील नमूद तरतूदी व शासन निर्णय, दिनांक १५.०९.२०१७ व दिनांक १३.०९.२०१७ अन्वये विहित निकषांनुसार छाननी केली जाते. छाननीअंती निकषांची पूर्तता करणाऱ्या प्रस्तावांना सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम १०९ (३) व (४) मधील तरतूदींनुसार १५ जून किंवा त्यापूर्वी अंतिम मान्यता प्रदान करण्यात येते.

शांताबाई शिवराम पवार कॉलेज, पुणे व तक्षशिला कॉलेज ऑफ आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स, पुणे या महाविद्यालयांच्या नवीन अभ्यासक्रमाबाबतचे प्रस्ताव सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठामार्फत दिनांक २९.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सकारात्मक शिफारशीसह शासनास प्राप्त झाले होते. सदर प्रस्तावांची महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १०९ (४) मधील नमूद तरतूदी व शासन निर्णय, दिनांक १३.०९.२०१७ अन्वये विहित निकषांनुसार छाननी केली असता, उपरोक्त दोन्ही प्रस्ताव विहित निकषांची पूर्तता करीत असल्याने, सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने, शासन निर्णय दिनांक १४.०६.२०२५ अन्वये त्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामध्ये उच्च शिक्षण संचालनालयाअंतर्गत अंतिम मान्यता (दुसरा टप्पा) बाबतचे एकुण ३९ प्रस्ताव, नवीन विद्याशाखाबाबतचे एकुण ४२ इतके प्रस्ताव, नवीन अभ्यासक्रम/विषयाबाबतचे एकुण २०५ प्रस्ताव व नवीन अतिरिक्त तुकडी बाबतचे एकुण ६४ इतके प्रस्ताव शासनास प्राप्त झाले होते. सदर प्रस्तावांची महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १०९ (३) व (४) मधील नमूद तरतूदी व शासन निर्णय, दिनांक १५.०९.२०१७ व दिनांक १३.०९.२०१७ अन्वये विहित निकषांनुसार छाननी करण्यात येऊन, छाननीअंती पात्र ठरणाऱ्या प्रस्तावांना सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता घेऊन, शासन निर्णय दिनांक १४.०६.२०२५ अन्वये विहित मुदतीत मान्यता दिलेली आहे.

जी महाविद्यालये विहित निकषांची पूर्तता करीत नाहीत, त्या महाविद्यालयांना संबंधित विद्यापीठामार्फत शासनपत्र दिनांक २३.०६.२०२५ अन्वये नामंजूरीची कारणे कळविण्यात आली आहेत. त्यामुळे ५०० प्रकरणे प्रलंबित ठेवण्याची बाब वस्तुस्थितीस धरून नाही.

डॉ. अभिषेक हरदास यांची दिनांक १९.०६.२०२५ रोजीची लक्षवेधी सूचनेत नमूद केलेल्या नवीन महाविद्यालय/ नवीन अभ्यासक्रमाच्या मान्यतेशी संबंधित तक्रार अद्यापपर्यंत विभागास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

****************************************

लक्षवेधी सुचना क्रमांक-१८४७

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन
मा.श्री.किसन वानखेडे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८४७

---

"माहे जून, २०२५ च्या शेवटच्या आठवडयात झालेल्या वादळी वा-यामुळे पुसद वनविभागाच्या चारही रेंजमधील मौल्यवान सागवान झाडे उन्मळून पडणे, मात्र अधिका-यांनी या सागवानाची शासकीय आगारात अजूनपर्यंत वाहतूकच न करणे, त्यामुळे शेकडो सागवान झाड जंगलातून गायब झाली असून आजही बेवारस स्थितीत काही सागवान झाडे जंगलातच पडून असणे, उमरखेड आणि महागांव तालुक्याला लागूनच मराठवाडयाची सीमा असल्याने आंतरराज्यीय आणि मराठवाडयातील तस्कारांचा मौल्यवान सागवानावर नेहमीच डोळा असणे, वन अधिका-यांच्या दुर्लक्षामुळे नेहमीच वनसंपदेचे नुकसान झाले असून याबाबत नेहमीच तक्रार करुनही कोणतीच कारवाई होत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेले व करावयाची कारवाई, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका "

---

**श्री.गणेश नाईक**
**मा.मंत्री (वने)**

**महसूल व वन विभाग (वने)**

**निवेदन**

यवतमाळ वनवृत्तातील यवतमाळ जिल्हयामध्ये पुसद वनविभागाचे कार्यक्षेत्र पुसद, दिग्रस, उमरखेड आणि महागांव या चार तालुक्यात आहे. पुसद वनविभागाचे एकुण वनक्षेत्र ७१५.१९ चौ.कि.मी. असुन ७ वनपरिक्षेत्र, २५ उपवनक्षेत्र व ११७ नियतक्षेत्रात विभागलेले आहे. उमरखेड, महागांव तालुक्यात पुसद वनविभागातील उमरखेड व महागांव या वनक्षेत्रास मुख्यतः मराठवाडयाची सीमा लागलेली असून त्यास आंतरराज्यीय सीमा लागून नाहीत.

पुसद वनविभाग व आजुबाजुच्या तालुक्यामध्ये माहे जून २०२५ च्या शेवटच्या आठवडयात खुप मोठ्या प्रमाणात वादळी वा-यासह पाऊस झाला होता. सदर वादळी वा-याची तीव्रता खूप मोठया प्रमाणात असल्यामुळे माहे जून २०२५ मध्ये एकूण ७३६६ एवढे वृक्ष उन्मळुन पडले आहेत. अशा उन्मळुन पडलेल्या झाडांची वेडी वर्ग निहाय(Enumeration) घेण्यास अडचण निर्माण होत होती. परंतु आज घटकेला अशा उन्मळुन पडलेल्या झाडांची वेडी वर्ग निहाय मोजमाप (Enumeration) बाबतची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे.

वादळीवाऱ्यामुळे पडलेल्या सागवान व आडजात वृक्षांचे अंदाजपत्रक तयार झाले असून सदर अंदाजपत्रकास दि. १५.०७.२०२५ रोजी उपवनसंरक्षक पुसद वनविभाग, पुसद यांनी मान्यता प्रदान केलेली आहे. वनक्षेत्र (प्रा.) पुसद येथील ४० वृक्ष ४.८५९ घ.मी. मालाची वाहतूक डेपोवरती करण्यात आलेली आहे. उर्वरित मालाची कटाई व वाहतूक करण्याबाबतची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे. इमारती /जळाऊ मालाची विक्री वनविभागाच्या काष्ठ विक्री आगारातून प्रचलित पध्दतीनुसार केली जाते.

उमरखेड तालुक्यात बिटरगांव येथे वन्यजीव विभागाचा वनउपज तपासणी नाका व उमरखेड वनपरिक्षेत्राचा नांदेड रोड येथे वनउपज तपासणी नाका असुन सदर नाक्यावरुन वाहनाची नियमित तपासणी करण्यात येते. सबब, वनक्षेत्रातुन मोठया प्रमाणात अवैधरित्या वृक्षतोड करुन वाहतूक झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

******

लक्षवेधी सूचना क्रमांक १०७

महाराष्ट्र विधानसभा,

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. अमोल खताळ, मा. विधानसभा सदस्य, यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १०७ पुढीलप्रमाणे आहे -

"राज्यातील जिल्हा अहिल्यानगर स्थित संगमनेर तालुक्यातील विविध ग्रामपंचायतीमध्ये केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी जलजीवन मिशन अंतर्गत सुरु असलेली पाणीपुरवठा योजनांची कामे अतिशय निकृष्ट दर्जाची झाल्याच्या तक्रारी ग्रामस्थांकडून मोठ्या प्रमाणात प्राप्त होत असणे सदर कामांमध्ये अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास आले असून कामे मंजूर इस्टीमेटप्रमाणे न होता निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरुन गुणवत्तेचा फज्जा उडविण्यात आलेला असणे, कामाच्या दरम्यान खोदण्यात आलेले रस्ते पूर्ववत न करता तसेच सोडले गेले आहेत, जुन्या पाईपलाईनलाच नवीन जोडण्या देऊन पूर्ण काम दाखवले जात असणे, नियोजित जागांऐवजी खाजगी मालमत्तेत टाक्या जलसाठा व्यवस्था उभी करण्यात आलेली आहे, ७० टक्के पूर्ण काम दाखवून उर्वरित कामासाठी अतिरिक्त निधीची मागणी केली जात असणे, या सर्व गोष्टी अत्यंत गंभीर असून जलजीवन मिशन योजनेच्या उदिशांना बाधा आणणाऱ्या असणे, या प्रकरणी चौकशी समिती नेमून जलजीवन मिशन अंतर्गत झालेल्या सर्व कामांची सखोल चौकशी करणे तसेच दोषी ठेकेदारावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता असणे, परंतु शासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने स्थानिक जनतेत राज्य शासनाप्रति पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना याबाबत शासनामार्फत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

---

मा. मंत्री, (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे निवेदन

जल जीवन मिशन कार्यक्रम अंतर्गत जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांचेकडील संगमनेर तालुक्यामध्ये आराखड्यानुसार एकुण ७२ योजना (४९ योजना रेट्रोफिटींग व २३ नवीन योजना) प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत. या प्रस्तावित योजनांपैकी २६ योजना भौतिकदृष्ट्या पूर्ण (२० रेट्रोफिटींग व ६ नवीन योजना) करण्यात येऊन पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. प्रस्तावित असलेल्या सर्व योजनांची कामे प्रगतीत असून काही उपांगाची कामे जागे अभावी बंद आहेत. सदर योजनांची कामे तपासण्यासाठी शासनाने मे. टाटा कन्सल्टींग इंजिनीअर्स लि. या त्रयस्थ तांत्रिक तपासणी यंत्रणेची नेमणूक केलेली आहे. प्रत्येक योजनेची उपांगनिहाय व कामांची टप्पानिहाय तपासणी सदर यंत्रणेकडून करण्यात येते. त्यानुसार योजनांच्या टप्पानिहाय ७२ कामांना १०६ भेटी दिलेल्या आहेत. त्यांच्या अहवालानुसार १०६ निरीक्षणे नोंदविली असून त्यापैकी १०२ निरीक्षणांची पुर्तता करण्यात आलेली असून इतर ४ निरीक्षणांची पूर्तता करण्यात येत आहे. योजनांच्या कामांमध्ये गंभीर अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. तसेच सदर योजनांची कामे मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणे करण्यात येत असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील शासन मान्य स्वीकृत साहित्याच्या सूचीनुसार उपांगनिहाय साहित्य वापरण्यात आलेले आहे. कामांची गुणवत्ता योग्य राखण्यात आलेली आहे. योजनेच्या कामाची गती संथ राखणाऱ्या एकूण २२ योजनांच्या कंत्राटदारांवर रु. ४.६३ लक्ष दंड केलेला आहे.

जल शक्ती मंत्रालय, दिल्ली यांचेकडील राष्ट्रीय वॉश एक्सपर्ट यांनी दिनांक २०.०३.२०२५ रोजी संगमनेर तालुक्यातील जिल्हा परिषदेकडील मौजे आंबी खालसा योजनेची पाहणी केलेली असून सदर भेटीनूसार योजनेचे काम योग्य रित्या सूरु असल्याचे दिसून आलेले आहे.

जिल्हा परिषदेकडील जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर योजनांची कामे करतांना अंदाजपत्रकानुसार आवश्यक पाईपलाईन टाकण्यासाठी शेतकरी त्यांच्या शेतामधून व खाजगी जागेतून पाईपलाईन टाकू देत नाहीत अशा वेळी सदर पाईपलाईन रस्त्याच्या बाजूने टाकण्यात येते. तसेच आवश्यकतेनुसार रस्त्यांचे काम पूर्ववत करण्यात आलेले आहे. योजनांची कामे मंजूर अंदाजपत्रकानुसार करण्यात येत असल्याने ज्या ठिकाणी अस्तित्वातील योजनेच्या (रेट्रोफिटींग) उपांगाचा वापर करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे अशा योजनांच्या बाबत अस्तित्वातील पाईपलाईनला नवीन जोडणी देऊन काम करण्यात येत आहे. प्रस्तावित पाणी पुरवठा योजनांमध्ये अंदाजपत्रकानुसार उंच टाकी, जमीनीवरील बैठी टाकी यांचे काम करण्यासाठी ग्रामपंचायतीकडून बक्षीसपत्र, नाहरकत दाखला तसेच आवश्यक ठिकाणी शासनाच्या मंजूरीनुसार दिलेल्या जागेमध्ये सदरची कामे करण्यात येत आहेत. योजनेचे काम करतांना मुळ अंदाजपत्रकानुसार उद्भवास पाणी कमी उपलब्ध होणे, या करीता नवीन उद्भव प्रस्तावित करणे, उद्भव बळकटीकरण उपाय योजना, ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार वाढीव कामांची मागणी, त्यानुसार तांत्रिकदृष्ट्या तपासणी करुन योजनेची अंदाजपत्रके सुधारीत होत आहेत. त्यामुळे वाढीव निधीची आवश्यकता आहे.

संगमनेर तालुक्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत एकूण २६ योजना राबविण्यात येत असून योजनांची सरासरी भौतिक प्रगती ६६ % आहे. या २६ योजनांपैकी ४ योजनांमधून पाणी पुरवठा सुरु करण्यात आला असून उर्वरित योजनांची कामे प्रगतीत आहेत. सदर योजना ऑगस्ट २०२५ ते मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणेच कामे करण्यात आली आहेत. पुरवठा करण्यात आलेल्या साहित्याचे अधिकृत त्रयस्थ यंत्रणेव्दारे तपासणी करुन त्यांचे अहवाल समाधानकारक असल्याचे खात्री करुन कामे करण्यात आलेली आहेत. एकूण २६ योजनांपैकी ४ योजनांच्या कामांची संथ गती पाहता कंत्राटदारांवर दंडात्मक कार्यवाही करुन रुपये २७.४ लक्ष दंड वसूल केलेला आहे. सदर २६ योजनांपैकी १९ योजनांची अंदाजपत्रके व आराखडे सुधारीत होत आहेत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील योजनेच्या कामांची NABARD या त्रयस्थ तांत्रिक तपासणी यंत्रणेमार्फत भौतिक प्रगतीच्या २५%, ५०%, ७५ %, ९०% व १०० % या पाच टप्प्यात पाहणी करण्यात येते. चालू योजनांच्या कामांची क्षेत्रीय पाहणी राष्ट्रीय जल जीवन मिशन कार्यक्रम (NJJM) यांच्या तांत्रिक सल्लागाराकडून माहे ऑक्टोबर २०२४, मार्च २०२५ व मे २०२५ मध्ये करण्यात आली आहे. सदर पाहणीचे सर्व अहवाल समाधानकारक आहे. नळ जोडणींची कामे जिल्हा परिषद यंत्रणेमार्फत पूर्ण करण्यात येत आहेत. पाईपलाईन जोडणीच्या कामाकरिता खोदकाम हे बहुतेक ठिकाणी रस्त्याच्या बाजूने करण्यात आलेले आहे, तसेच पाईपलाईन जोडणीत आवश्यक त्या ठिकाणी रस्त्याचे केलेले खोदकाम हे मंजूर निविदेतील तरतूदीप्रमाणे पूर्ववत करुन देण्यात येत आहे. शासकीय जागा उपलब्ध असल्यास ग्रामपंचायत मागणी प्रस्तावानुसार जागेची मंजुरी घेऊन टाक्या व जलसाठा व्यवस्थेची कामे

हाती घेण्यात आली आहे. शासकीय जागा उपलब्ध नसल्यास ग्रामपंचायतमार्फत खाजगी जागांचे बक्षीस पत्र घेऊन अधिकृत रित्या टाक्यांची कामे करण्यात आली आहे. जल जीवन मिशन कार्यक्रमाअंतर्गत, करण्यात आलेल्या कामांची देयक अदायगी यांची नियमित पडताळणी वार्षिक लेखा परिक्षण व्दारे करण्यात येते. सबब ७० टक्के पूर्ण काम दाखवून, उर्वरित कामासाठी अतिरिक्त निधीची मागणी केली जात नाही.

************

लक्षवेधी सूचना क्रमांक ६७८

महाराष्ट्र विधानसभा,
सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. हिरामण खोसकर, मा. विधानसभा सदस्य, यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ६७८ पुढीलप्रमाणे आहे:-

"नाशिक जिल्हयातील घोटी शहरास दारणा, वाकी नदीतून कोणतीही शुध्दीकरण प्रक्रिया न करता पाणीपुरवठा करण्यात येत असल्याची बाब माहे जून, २०२५ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, सध्या नदीचे पाणी मोठया प्रमाणात गढूळ व दूषित झाले असून शहरातील जलवाहिन्यांनी जुन्या झाल्याने आतून गंजणे, घोटीत गढूळ व लाल पाण्याचा पुरवठा होत असल्याने परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणे, तसेच घोटी शहरासाठी प्रस्तावित करण्यात आलेली २५ कोटी रुपयांची शुध्द पाणी पुरवठा योजना अनेक वर्षांपासून लालफितीत अडकणे, सुमारे ४० हजार लोकसंख्या असलेल्या घोटीवासियांना स्वच्छ पाणी पुरवठा झाला नाही तर तीव्र आंदोलन करण्याचा दिलेला इशारा, यासंदर्भात शासनाने तातडीने योग्य ती कार्यवाही करुन शुध्द पाण्याचा पुरवठा करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका ."

---

मा. मंत्री, (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे निवेदन

नाशिक जिल्ह्यातील दारणा नदीतून घोटी ग्रामपंचायत मार्फत पाणी उपसा करुन योजनेच्या अस्तित्वातील २.५ द.ल.घ.मी. क्षमतेच्या शुद्धीकरण केंद्रातून पाणी शुद्धीकरण करुन सदर गावास पाणी पुरवठा केला जातो. या ठिकाणी असलेली अस्तित्वातील वितरण व्यवस्था जुनी झाल्यामुळे वारंवार नादुरुस्त होत असल्याने पाणी पुरवठा करण्यास अडचणी निर्माण होतात. तथापि, ग्रामपंचायत घोटी मार्फत वितरण व्यवस्थेची वेळोवेळी दुरुस्ती करुन पाणी पुरवठा सुरळीत करण्यात येतो.

सद्यस्थितीत जल जीवन मिशन अंतर्गत घोटी (बु.) पाणी पुरवठा योजना, ता. इगतपुरी, जि. नाशिक या नवीन नळ पाणी पुरवठा योजनेचे (भावली धरण उद्भव) काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे. जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत सदर योजनेच्या रु. २०.८१ कोटी किंमतीस (ढोबळ) दिनांक १८.०४.२०२२ रोजी तांत्रिक मान्यता तसेच दिनांक ११.०५.२०२२ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजनेचे कार्यारंभ आदेश दिनांक १०.१०.२०२२ रोजी दिलेले आहेत. योजनेच्या कामाची मूळ मुदत २७ महिने (१५ महिने बांधकामासाठी, ३ महिने योजनेची चाचणी व ९ महिने योजना चालविणे) अशी असून सद्यस्थितीत योजनेची सरासरी भौतिक प्रगती ६८% इतकी झालेली आहे. सदर योजनेवर आतापर्यंत रुपये ८७०.७१ लक्ष इतका खर्च झालेला आहे. योजनेच्या कामाची प्रगती बार चार्ट नुसार अपेक्षित प्रगतीपेक्षा असमाधानकारक असल्याने कंत्राटदारास दिनांक ०१.०१.२०२४ पासून रुपये २४४२३/- प्रतिदिन दंड आकारण्यात आलेला आहे.

आवश्यकतेनुसार केंद्र व राज्य शासनामार्फत निधी उपलब्ध झाल्यास योजनेतील समाविष्ट मुख्य कामांसह इतर सर्व कामे करुन योजना डिसेंबर २०२५ अखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे.

************

**महाराष्ट्र विधानसभा, सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन**
**श्री. महेंद्र दळवी, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १२२३ पुढीलप्रमाणे आहे.**

"मौजे नांदगाव व खारआंबोली ता. अलिबाग, जि. रायगड येथील खारबंधाऱ्याची कामे खारभूमी विकास विभागाची असून उक्त कामे जिल्हा ग्रामीण पुरवठा, जि.प. रायगड यांनी विना परवानगी केल्याचे माहे जून, २०२५ च्या दरम्यान निदर्शनास येणे, उक्त कामासंदर्भात चौकशी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतीनिधींनी मा. पाणी पुरवठा मंत्री, प्रधान सचिव व मु.का.अ. जि.प. रायगड यांनी दिनांक ११ जून, २०२५ रोजीच्या निवेदना मार्फत केलेली मागणी, उक्त दोन्ही कामे कोणत्या अधिकारात जि.ग्रा.पा.पु. जि.प. रायगड यांनी पुर्ण केली व त्यांचे देयक अदा केले असणे, ग्रामीण पाणी पुरवठांच्या कोट्यावधीचा निधी खारभूमी विकास विभाग यांच्या विनापरवानगीने त्यांच्याच योजनांवर खर्च करुन त्यांचे काम पूर्ण केल्याचे दाखले दिल्याबाबत कार्यकारी अभियंता, जि. ग्रा. पा. पु. विभाग, अलिबाग, जि. प. रायगड यांच्यावर कारवाई करावी व योजनेवर खर्च केलेल्या निधीची वसूली करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे निवेदन**

खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग पेण, जि.रायगड अंतर्गत मौजे नांदगांव व मौजे खारआंबोली ही गावे अलिबाग तालुक्यातील नसून मुरुड तालुक्यातील आहेत. सदर गावात अनुक्रमे नांदगांव-मजगांव खारभूमी व मुरुड-आंबोली खारभूमी या योजना आहेत. सदर योजना खारभूमी विभागाच्या रायगड जिल्ह्यातील एकूण १६५ योजनांपैकी असून या योजनांना किनारपट्टी नियमन क्षेत्र मान्यता मिळालेली आहे. महाराष्ट्र खारभूमी विकास अधिनियम, १९७९ नुसार सदर योजना खारभूमी विकास विभागाच्या ताब्यात असून, सदर योजनांवर काम करण्याचा अधिकार फक्त खारभूमी विभागास आहे.

मौजे नांदगाव व मौजे खारअंबोली येथील कामासंदर्भात चौकशी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ जून, २०२५ रोजीच्या निवेदनान्वये उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांचेकडून अहवाल प्राप्त झाला आहे. त्यानुसार "मौजे नांदगाव येथील पुराने नुकसानित खारबांधाच्या दुरुस्तीचे कामे, ता. मुरुड, जि. रायगड व मौजे खारअंबोली येथील खारबंधाऱ्याचे उघाडीचे कामे नव्याने बांधकाम करणे, ता. मुरुड जि. रायगड ही दोन्ही कामे ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, रायगड कडून करण्यात आलेली नाहीत. तसेच, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, रायगड यांचेमार्फत सदर कामांवर खर्च करण्यात आलेला नाही. तसेच सदर कामे पूर्ण केल्याचे दाखले ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद मार्फत देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे संबंधिता विरुध्द कारवाई करण्याचा किंवा वसूली करण्याबाबत प्रश्न उदभवत नाही."

मौजे नांदगाव व मौजे खारअंबोली या कामांच्या दाखल्याच्या अनुषंगाने खारभूमी विकास विभागामार्फत कार्यक्षेत्रावर प्रत्यक्ष पडताळणी केली असता कार्यक्षेत्रावर कुठलेही काम केले नसल्याचे निदर्शनास आले आहे.

---

लक्षवेधी सूचना क्रमांक १८०३

# महाराष्ट्र विधानसभा,
## सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्रीमती सरोज अहिरे, मा. विधानसभा सदस्य, यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १८०३ पुढीलप्रमाणे आहे :-

" नाशिक व देवळाली विधानसभा मतदारसंघामध्ये जलजीवन मिशन अंतर्गत सुरु असलेल्या पाणीपुरवठा योजनांचे प्रकल्प मोठ्या प्रमाणात प्रलंबित असणे, सदर तालुक्यातील पाणीपुरवठा योजना विहीत कालावधीत पूर्ण न होणे, सद्यःस्थितीत अनेक प्रकल्प अद्यापही रखडलेले असणे, सदर तालुक्यातील अनेक गावांमध्ये वाड्यावस्त्यांवर सदर पाणीपुरवठा योजना पोहचलेली नसणे, सदर योजनांचे सर्वेक्षण करीत असतांना कृती आराखडा तयार असतांना तालुक्यातील अनेक गावांमधील वाड्यावस्त्या जाणीवपूर्वक सर्वेक्षणापासून वंचित टेवणे, संबंधित अधिकारी यांनी योग्य सर्वेक्षण न करणे, त्यामुळे अनेक वाड्यावस्त्यांवर पिण्याचे पाणीपुरवठा योजना पोहचली नसणे, सदर योजनेमधील ठेकेदार व अधिकारी यांचे आर्थिक हितसंबंध असणे, विशेषतः अधिकाऱ्यांच्या अकार्यक्षमतेमुळे जलजीवन मिशनचे उद्दिष्ट साध्य न होणे, १०० टक्के पैकी ८० टक्के पाणीपुरवठा प्रकल्प अर्धवट आणि अपूर्ण असणे, विहित मुदतीत प्रकल्प पूर्ण न होणे, परिणामी देवळाली विधानसभा मतदारसंघ ग्रामीण भाग अद्यापही तहानलेला असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

मा. मंत्री, (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे निवेदन

नाशिक व देवळाली तालुक्यात जिल्हा परिषदेमार्फत जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत एकूण ५५ नळ पाणी पुरवठा योजना मंजूर असून त्यापैकी आज रोजीपर्यंत ४३ नळ पाणी पुरवठा योजना भौतिकदृष्ट्या पुर्ण करण्यात आलेल्या असून, ४५ नळ पाणी पुरवठा योजनांचा पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. उर्वरित नळ पाणी पुरवठा योजनांची कामे प्रगतीत असून, सदर योजना माहे डिसेंबर २०२५ अखेर पुर्ण करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. संबंधित योजनांच्या जागेची परवानगी, ग्रामपंचायतीकडे जागा उपलब्ध नसणे, निधीची कमतरता या कारणांमुळे योजनेची कामे विहीत कालावधीत पूर्ण न होता रखडलेली आहेत. त्याचप्रमाणे ज्या कंत्राटदारांनी कामे पूर्ण करण्यास विलंब केलेला आहे अशा १५ योजनांच्या कंत्राटदारांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच यापूर्वी नाशिक तालुक्यातील ५ योजनांसंदर्भात संबंधित कंत्राटादारांकडून रु.७२८००/- इतका दंड वसुल करण्यात आलेला आहे.

नाशिक जिल्हयातील जिल्हा परिषदेकडील १२२२ योजनांपैकी नाशिक तालुक्यातील १९ योजनांचे सुधारीत अंदाजपत्रके व आराखडे तयार करण्यात आले असून मंजूरीबाबत पुढील कार्यवाही प्रगतीत आहे. त्याचप्रमाणे गोविंदपुरी ग्रामपंचायत गंगाम्हाळुंगी ता. नाशिक येथे गत ७ वर्षांपासून टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत होता. परंतु तेथील जल जीवन मिशन योजनेचे काम युद्ध

पातळीवर पूर्ण करुन दिनांक ०६.०४.२०२५ पासून सदर गाव तसेच नाशिक तालुका टँकरमुक्त करण्यात यश आलेले आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत देवळाली विधानसभा मतदारसंघात शिंदे पाणी पुरवठा योजना, ता.जि. नाशिक व एकलहरे पाणी पुरवठा योजना, ता.जि. नाशिक या २ पाणी पुरवठा योजनांची कामे प्रगतीत आहेत. शिंदे पाणी पुरवठा योजना, ता.जि. नाशिक योजनेची प्रगती बार चार्ट नुसार अपेक्षित प्रगतीपेक्षा कमी असल्याने कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करुन दिनांक २३.०२.२०२४ पासून आजतागायत दंड रु.१०९५६/- प्रतिदिन आकारण्यात येत आहे. योजनेच्या कामाची गुणवत्ता व दर्जाबाबत त्रयस्थ यंत्रणेमार्फत (M/S NABCONS) प्रथम व द्वितीय तपासणी करण्यात आली असून तपासणी दरम्यान कोणतेही गंभीर आक्षेप घेण्यात आलेले नाहीत.सदर योजना कार्यान्वित झाली असून चाचणी तत्वावर शीर्ष कामांपासून जलकुंभापर्यंत पाणी पुरवठा सुरु करण्यात आलेला आहे. तसेच एकलहरे पाणी पुरवठा योजना, ता.जि. नाशिक योजनेची चाचणी घेण्यात आली आहे. तथापि, ग्रामपंचायतीने पूर्वीची वीजबील थकबाकी अदा न केल्यामुळे MSEB कडून वीज पुरवठा करण्यात आलेला नाही.

************

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. नितीन देशमुख, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १९३१ पुढीलप्रमाणे आहे :-**

"प्रभारी उपविभागीय अभियंता, श्री.आर.ए इंगले, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उपविभाग अकोट जि.अकोला यांनी आपल्या कार्यालयात कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या श्रीम.शिल्पा गावंडे यांच्यावर बळजबरी,अतिप्रसंग,विनयभंग केल्याप्रकरणी मूर्तीजापूर शहर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करणे, तसेच म.जि.प्रा मध्ये वरिष्ठ लिपीक पदावर कार्यरत असलेले श्री.जयंत तळेगावकर यांना विनाकारण त्रास दिल्याप्रकरणी श्रीमती शरयु तळेगावकर यांनीदेखील केलेली तक्रार, विविध तक्रार दाखल झाल्यामुळे संतप्त होऊन कंत्राटी कामावर असलेल्या महिलांना धमकावून काढून टाकण्यात येणे, प्रभारी उपविभागीय अभियंता यांच्या रोजच्या त्रासामुळे वेतागलेल्या महिलानी स्वेच्छामरण घेत असल्याबाबतचा पत्रव्यवहार वजा निवेदन मा.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मुख्य अभियंता,अधिक्षक अभियंता यांच्याकडे करणे, प्रभारी उपविभागीय अभियंता, श्री.आर.ए इंगले यांनी त्यांच्या कार्यकाळात केलेल्या गैरप्रकाराची सखोल चौकशी होणे गरजेचे असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष,महिलांची अवेहलना व अपमान करणा-या दोषी शासकीय अधिका-याविरुध्द कठोर कारवाई करुन तात्काळ निलंबित करण्याबाबत करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

### मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे निवेदन

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उपविभाग, मुर्तिजापूर या कार्यालयामध्ये कार्यालयीन कामकाजाकरीता श्रीमती शिल्पा गावंडे यांना संगणक चालक म्हणून कंत्राटदारामार्फत नियुक्त करण्यात आले होते. तथापि, त्यांच्या सेवा श्री.ए.के.मांडविया, कंत्राटदार यांनी दिनांक ०१.०४.२०२४ पासून कमी केल्या आहेत. सदर महिलेचे वेतन कंत्राटदारामार्फत अदा करण्यात येत होते.

श्रीमती शिल्पा गावंडे यांना कंत्राटदाराने कामावरुन कमी केले असले तरी त्यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उपविभाग, मुर्तिजापूर या कार्यालयाला वेळोवळी भेटी देऊन त्यांना वेतन न मिळाल्याबाबत विचारणा केली. याबाबत श्री.डी.बी.कपिले, उप विभागीय अभियंता यांच्याशी दिनांक २५.०६.२०२४ रोजी झालेल्या वादानंतर श्री.कपिले यांनी दिनांक २५.०६.२०२४ रोजी पोलीस स्टेशन, मुर्तिजापूर येथे श्रीमती शिल्पा गावंडे यांच्याविरुध्द तक्रार नोंदविली.

श्री.जयंत तळेगावकर, वरीष्ठ लिपिक, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उपविभाग, मुर्तिजापूर यांच्या पत्नी श्रीमती शरयु जयंत तळेगावकर यांनी श्री.आर.ए.इंगळे, शाखा अभियंता यांचेविरुध्द दिनांक ०६.०१.२०२५ रोजी तक्रार दिलेली आहे. तथापि, यापूर्वी श्री.जयंत तळेगावकर यांनी श्री.आर.ए.इंगळे, शाखा अभियंता यांच्याकडून त्रास दिल्याबाबत तक्रार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मंडळ कार्यालयास प्राप्त झाली नाही.

श्रीमती शिल्पा गावंडे, कंत्राटी महिला कर्मचारी यांनी श्री.आर.ए.इंगळे, शाखा अभियंता व श्री.डी.बी.कपिले, उप विभागीय अभियंता यांच्याविरुध्द विनयभंग व लैंगिक छळाबाबत दाखल केलेल्या तक्रारीनुसार मुर्तिजापूर शहर पोलीस ठाण्यात अर्ज नं. ०२७४/२०२४, कलम ३५४, ५०६, ५०९, ३४ भा.दं.वि. नुसार दि.०९.०७.२०२४ रोजी गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणात श्री.इंगळे, शाखा अभियंता यांना मा.जिल्हा न्यायाधिश-१, जिल्हा न्यायालय, अकोला यांचे आदेश दि.०३.०८.२०२४ अन्वये अंतरिम अटकपुर्व जामिन मंजूर झाला आहे. सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. सदर दाखल केलेल्या गुन्ह्याविरुध्द संबंधितांविरुध्द तपासामध्ये उपयुक्त पुरावा मिळाला नसल्याचे व तपास चालु असल्याचे पत्र पोलीस स्टेशन, मुर्तिजापूर कडून विभागीय कार्यालयास देण्यात आलेले आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम-३ व २२ (अ) चा भंग केला असल्याचे दिसून येते. त्यामुळे श्री.डी.बी.कपिले, उप विभागीय अभियंता व श्री.आर.ए.इंगळे, शाखा अभियंता, उपविभाग मुर्तिजापूर यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम-८ अंतर्गत दि.१८.११.२०२४ रोजीच्या ज्ञापनान्वये विभागीय चौकशीची कार्यवाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सुरू केली आहे. तसेच श्रीमती शिल्पा गावंडे, यांनी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे क्रिमीनल रिट पिटीशन क्र.६५८/२०२४ दाखल केले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

**********

लक्षवेधी सूचना क्र. ४९५

## महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.४९५**

मा. श्री. तुकाराम काते, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना क्र.४९५** पुढीलप्रमाणे आहे :-

"संपूर्ण महाराष्ट्र राज्यांमध्ये प्रथम मान्यता हीच कायमस्वरूपाची मान्यता ग्राह्य धरली जात असताना मुंबई महापालिका क्षेत्रातील खाजगी अनुदानित व विनाअनुदानित शाळांना प्रत्येक पाच वर्षानंतर मुदतवाढ घेणे बंधनकारक असणे, मुंबईतील फक्त इयत्ता पहिली ते इयत्ता चौथीच्या प्राथमिक शाळा मुदतवाढ लादली जाऊन मान्यता घेताना शाळा व्यवस्थापन यांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत असणे, मुंबई महापालिका शिक्षण विभागाकडून क्लार्क पासून ते आयुक्तांपर्यंत मान्यता फाईल मंजूर घेण्यास प्रचंड कालावधी लागत असणे, मागील १५ वर्षापासून अनुदान पासून वंचित असलेल्या मुंबईतील ९५ शाळांना आपल्या सरकारने अनुदान देण्याचा निर्णय घेतला व त्या प्रस्तावाला आयुक्त मुंबई महापालिका यांनी दिनांक ८ नोव्हेंबर २०२३ रोजी मंजुरी देऊनही ४९० स्क्वेअर फुटाच्या वर्ग खोल्या असणे बंधनकारक असल्याची जाचक अट टाकल्याने व मान्यता मुदतवाढ न दिले असल्याने मराठी माध्यमाच्या शाळांना अनुदान प्रस्ताव मंजूर होत नसणे, त्यामुळे विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके मध्यांत्र भोजन या सुविधांपासून वंचित राहावे लागत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

................................................................................................................................

### मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे निवेदन

बृहन्मुंबई महानगरपालिका परिक्षेत्रातील खाजगी संस्थांच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या प्राथमिक (इ.१ ली ते इ.४ थी) शाळांना अनुदान सहाय्य संहिता, १९६८ अन्वये प्रथम मान्यता, मान्यता मुदतवाढ आणि अनुदान सहाय्य मंजूर करण्यात येते. सदर प्राथमिक शाळांना प्रथम मान्यता, मान्यता मुदतवाढ व अनुदान नोंदणीचे प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करताना महानगरपालिका निकष / नियम तसेच आर.टी.ई. कायद्यानुसार भौतिक सुविधाबाबतचे निकष पूर्ण करणे आवश्यक आहे. सदर खाजगी प्राथमिक शाळांना प्रथम मान्यता आणि मान्यता मुदतवाढ देण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण समितीला आहेत. सद्यस्थितीत, शाळांना मान्यता मुदतवाढ दर पाच वर्षासाठी शिक्षण समितीच्या मंजुरीने देण्यात येते.

राज्य शासनाने निर्धारित केलेल्या अनुदानाच्या धोरणानुसार ज्या शाळांना राज्य शासनाने मान्यता प्रदान केली आहे, त्या शाळांना शासन निर्णय, दि.१५.११.२०४४ व शासन निर्णय, दि.१३.०७.२०१३ च्या निकषांच्या अधिनतेने अनुदान अनुज्ञेय आहे. राज्य शासनाची मान्यता नसताना, बृहन्मुंबई महानगरपालिकेला कोणतेही अधिकार नसताना, त्यांचे स्तरावरुन परस्पर मान्यता प्रदान केलेल्या शाळांना राज्य शासनाच्या अनुदानासाठी ग्राह्य धरले जाणार नाही, असे शासनाने दि.१३.०१.२००४, दि.२२.०३.२०१७ व दि.२०.०७.२०२० रोजीच्या पत्रान्वये वेळोवेळी कळविले आहे. तसेच, शासन पत्र, दि.१५.०९.२०२३ अन्वये देखील पुन्हा कळविण्यात आली आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ नुसार शाळांमध्ये मुलभूत सुविधा उपलब्ध असणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानुसार शासन निर्णय दि.२९.०६.२०१३ अन्वये राज्यातील शाळांकरीता वर्गखोली, मुलां-मुलींकरीता स्वतंत्र स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची सुविधा, संरक्षण भिंत, खेळाचे मैदान, उताराचा रस्ता (रँम्प), स्वयंपाकगृह इत्यादी मुलभूत सुविधांबाबतचे निकष निश्चित करण्यात आले आहेत.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ अन्वये वय वर्षे ६ ते १४ वयोगटातील मुलांना दर्जेदार व गुणवत्तापूर्व मोफत प्राथमिक शिक्षण देण्याची तरतूद करण्यात आली आहे. शाळांमध्ये मुलांच्या शिक्षणासाठी पोषक वातावरण राहण्यासाठी पुरेशी मोकळी जागा असणे आवश्यक आहे. तसेच, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ मधील तरतूदीनुसार प्रत्येक शिक्षकासाठी एक वर्ग, ऑफिस, स्टोर्स रुम व मुख्याध्यापक यांचेसाठी संयुक्त वर्ग, विद्यार्थ्यांना अडथळा मुक्त प्रवेश, मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे, सर्व विद्यार्थ्यांसाठी पुरेसे व शुध्द पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, मध्यान्ह भोजनासाठी किचन शेड, क्रीडांगण व शाळेसाठी कंपाऊड असणे आवश्यक आहे. तसेच, आगी सारख्या आपत्कालीन घटना घडल्यास बचाव कार्य करण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध असणे देखील आवश्यक आहे.

*****

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. रईस शेख, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.५७० पुढीलप्रमाणे आहे:-**

"राज्यातील पवित्र पोर्टल उर्दु माध्यमातील शिक्षक पदे मोठया प्रमाणात रिक्त असल्याचे नुकतेच माहे मे,२०२५ मध्ये निदर्शनास येणे, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका मधील अधीनस्थ शिक्षण अधिकारी व संबंधित कर्मच-यांनी ही पदे भरण्याकरिता आवश्यक असलेले रोस्टर अदयाप शासनाकडे सादर केले नसल्याचेही समोर येणे, सदर पदे रिक्त राहिल्यामुळे अल्पसंख्यांक शिक्षक, पदवीधर त्याचबरोबर विदयार्थ्यांवर अन्याय झालेला असून यासंदर्भात अल्पसंख्याक लोकप्रतिनिधिंनी दिनांक २२ मे, २०२५ रोजी वा त्या सुमारास मा.शालेय शिक्षण मंत्रीमहोदयांकडे केलेला पत्रव्यवहार, उक्त पत्राच्या अनुषंगाने शासनाने सखोल चौकशी करण्याची आवश्यकता, शिक्षण अधिकार कायदयाचे (आरटीई) उल्लंघन करणा-या दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची नितांत गरज, तसेच अल्पसंख्याक समाजावर झालेल्या अन्यायाची दखल घेऊन उक्त रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

बिंदुनामावली तपासणीची कार्यवाही ही नियुक्ती प्राधिकारी आणि संबंधित मागासवर्ग कक्ष यांचेकडून करण्यात येते. तद्नंतर बिंदूनामावली अदयावत करुन पवित्र पोर्टलवर जाहीरात नोंदविण्याबाबतची सर्वस्वी जबाबदार संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांची आहे. यानुसार कार्यवाही करण्याबाबत आयुक्त (शिक्षण) कार्यालयामार्फत वेळोवळी सूचना देण्यात येत असतात.

राज्यात शिक्षक भरतीबाबतची प्रक्रिया शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी मधील प्राप्त गुणांकनानुसार पवित्र पोर्टलमार्फत राबविण्यात येत असते. यानुसार सन २०२२ मध्ये शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी पार पडल्यानंर जाहीरातीमधील रिक्त पदांच्या अनुषंगाने बिंदुनामावलीबाबत तक्रारी शासनास प्राप्त झाल्या. त्यानुसार १० टक्के जागा राखून ठेवण्यात येऊन, बिंदुनामावली अदयावत करणेबाबत राज्यस्तरावरुन व आयुक्त (शिक्षण) यांचे स्तरावरुन सर्व नियुक्ती प्राधिकारी यांना निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार माहे जून २०२३ ते नोव्हेंबर २०२३ या कालावधीमध्ये सर्वच व्यवस्थापनांच्या बिंदुनामावली तपासणीची कार्यवाही करण्यात आली होती.

त्यानुसार पदभरतीच्या पहिल्या टप्प्यामध्ये २८ जिल्हा परिषदा, १५ महानगरपालिका, ४५ नगरपालिका, २ खाजगी व्यवस्थापनांमध्ये उर्दू माध्यमाच्या एकूण १,८५० रिक्त पदांच्या जाहिराती आलेल्या होत्या, त्यातील १,७२२ पदे पवित्र पोर्टलमार्फत नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेली आहे, उर्दू माध्यमाच्या जाहिरातीमध्ये आरक्षित प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध होत नसतील अशी रिक्त राहिलेली पदे पोर्टलमार्फत खुल्या गटातून गुणवत्तेनुसार भरण्यात आलेली आहेत. तथापि, पहिल्या टप्प्यामध्ये उर्दू माध्यमाची १२८ पदे रिक्त राहिली आहेत. तसेच दुसऱ्या टप्प्यात ४ जिल्हा परिषदा, ५ महानगरपालिका, २७ नगरपालिका, २७ खाजगी व्यवस्थापन यांचेमार्फत उर्दू माध्यमाच्या एकूण २३८ रिक्त पदांच्या जाहीराती आलेल्या होत्या. त्यामध्ये ९७ पदावर शिफारस झाली असून, १४१ पदे रिक्त राहीलेली आहेत. पहिला टप्पा व दुसरा टप्पा दोन्ही मिळून एकूण २६९ पदे संबंधित विषयाची आवश्यक अर्हता धारण करणारे उमेदवार उपलब्ध न झाल्याने रिक्त राहिली आहेत.

सन २०२५ मध्ये शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणीचे आयोजन माहे मे-जून २०२५ मध्ये करण्यात आले होते. या चाचणीचा निकाल अंतिम करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे उर्दु माध्यमांच्या रिक्त पदांवर पात्र उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस करणे शक्य होणार आहे.

***********************

## महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.९७२**

मा. श्री. विनय विलासराव कोरे (सावकर), विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना क्र.९७२** पुढीलप्रमाणे आहे :-

"कोल्हापूर जिल्ह्यातील शाहूवाडी तालुका हा डोंगराळ व दुर्गम भाग असून शाहूवाडी तालुक्यातील ऐनवाडी- धनगरवाडी या गावातील विद्यार्थ्यांची सातवीपर्यंतची शिक्षणाची सोय असणे, ऐनवाडी- धनगरवाडी येथील लोकवस्तीचा विचार करता माध्यमिक शाळा आवश्यक असणे, तथापि ऐनवाडी- धनगरवाडी येथून ११ किलोमीटर पर्यंत माध्यमिक शाळा नसणे, तेथील बृहत आराखडा रद्द केल्यामुळे अनुदानित शाळा चालविणे कोणत्याही संस्थेला अशक्य झालेले असणे, त्यामुळे धनगरवाडी व आसपासच्या वाड्या - वस्त्या वरील अनेक विद्यार्थ्यांचे कायमस्वरूपी शैक्षणिक नुकसान होण्याची निर्माण झालेली परिस्थिती त्यामुळे विद्यार्थी व पालक यांच्यामध्ये पसरलेले नैराश्याचे वातावरण यामध्ये शासनाने प्राधान्याने लक्ष घालण्याची गरज व माध्यमिक शाळा सुरू करणे बाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाय योजना."

****************************************

**मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे निवेदन**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९, दि.०१.०४.२०१० पासून लागू झाला असून सदर अधिनियमातील तरतुदींनुसार ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना मुक्त व अनिवार्य शिक्षण देण्याची वैधानिक जबाबदारी राज्य शासन व स्थानिक स्वराज्य संस्थांची आहे. केंद्र शासनाने युडाएस प्लस मधील आकडेवारीवरून राज्यात अनेक प्रकारच्या शाळा असल्याचे नमूद केले असून, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने राज्यात प्रामुख्याने इ.१ ली ते इ.८ वी, इ.१ ली ते इ.१० वी / इ.१ ली ते इ.१२ वी अशा संयुक्त शाळा असाव्यात, अशी शिफारस केली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांचे सक्षमीकरण व दर्जावाढ करणेबाबत विहित तरतुदींच्या अनुषंगाने, शासन निर्णय दि.१५.०३.२०२४ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इ.१ ली ते इ.४ थी च्या शाळांना इ.५ वी चा वर्ग व आवश्यकता असल्यास उच्च प्राथमिक व माध्यमिक वर्ग जोडण्यास तसेच इ.१ ली ते इ.७ वी च्या शाळांना इ.८ वी चा वर्ग व आवश्यकता असल्यास माध्यमिकचे वर्ग जोडणेबाबत कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हानिहाय प्राथमिक व माध्यमिक करीता मंजूर पायाभूत पदांच्या मर्यादेत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इ.१ ली ते इ.४ थी च्या शाळांना इ.५ वी चा वर्ग व आवश्यकता असल्यास उच्च प्राथमिक व माध्यमिक वर्ग जोडण्यास तसेच इयत्ता इ.१ ली ते इ. ७ वी च्या शाळांना इयत्ता आठवीचा वर्ग व आवश्यक असल्यास माध्यमिकचे वर्ग जोडण्यास मान्यता प्रदान करण्यास सक्षम प्राधिकारी म्हणून अनुक्रमे संबंधित जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद/आयुक्त, महानगरपालिका यांना घोषित करण्यात आले आहे. तसेच केंद्र शाळा, आदर्श शाळा व पीएमश्री शाळा तसेच ज्या स्थानिक

स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये प्राथमिक स्तरावर प्रत्येक वर्गात ३० व उच्च प्राथमिक स्तरावर प्रत्येक वर्गात ३५ व त्यापेक्षा जास्त विद्यार्थी असल्यास यांना प्राधान्याने इ.१ ली ते ४ थी च्या शाळांना इयत्ता ५ वी चा वर्ग व आवश्यकता असल्यास उच्च प्राथमिक व माध्यमिक वर्ग जोडण्यास तसेच इयत्ता इ.१ ली ते इ. ७वी च्या शाळांना इयत्ता आठवीचा वर्ग व आवश्यक असल्यास माध्यमिकचे वर्ग जोडण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

विद्यामंदिर ऐनवाडी, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर येथे इ.१ ली ते इ.८ वी पर्यंतचे वर्ग असून सदर शाळेची एकूण पटसंख्या ६१ आहे. तसेच सदर शाळेपासून २.५ किमी अंतरावर असणाऱ्या धनगरवाडी येथील प्राथमिक (इ.१ ली इ.४ थी) शाळेची एकूण पटसंख्या १७ आहे. सदर शाळेतील विद्यार्थ्यांना १.५ किमी अंतरावरील धोपेश्वर धनगरवाडा येथे असणाऱ्या उच्च प्राथमिक (इ.५ वी ते इ.८ वी) च्या शिक्षणाची सोय उपलब्ध आहे. दोन वर्षांपूर्वी पर्यंत जुगाई हायस्कूल, पणुंद्रे मार्फत ऐनवाडी येथे भाग शाळेच्या माध्यमातून इ.९ वी इ.१० वी चे वर्ग चालू होते. परंतु, चालू वर्षी ऐनवाडी शाळेतून इ.८ वी मधील उत्तीर्ण झालेल्या ४ विद्यार्थ्यांपैकी ३ विद्यार्थी मुंबई येथे व १ विद्यार्थी कापशी येथे पुढील शिक्षणासाठी गेल्यामुळे, सदर भाग शाळा विद्यार्थी उपलब्ध झाले नसल्याने बंद केली आहे.

*****

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री.सुरेश धस, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८७८ पुढीलप्रमाणे आहे:-**

"राज्यात शिक्षक भरती प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षक भरती करिता परीक्षा सन २०२२ मध्ये घेण्यात आली त्यामध्ये मोठ्या प्रमाणत भ्रष्टाचार झाला त्यामुळे शिक्षक भरती प्रक्रिया बाबत सर्व उमेदवारांमध्ये उद्रेक निर्माण झाला, या परीक्षेमध्ये पास झालेल्या उमेदवारांना पहिल्या दोन टप्प्यात नेमणुकीच्या संधी उपलब्ध करुन देण्याचा हेतू चूकीचा असणे, पहिल्या टप्प्यामध्ये ज्या उमेदवारांना पात्र करुन त्यांना पुन्हा दुसऱ्या टप्प्यामध्ये त्यांची निवड करणे या मागचा हेतू चुकीचा असणे, त्यामुळे इतर पात्र उत्तीर्ण उमेदवारांना संधी उपलब्ध न होणे, ज्या उमेदवारांची निवड झाली त्या उमेदवारांना खाजगी संस्थेमार्फत इंटरव्यू ला गेल्यानंतर मोठ्या प्रमाणात पैशांची मागणी होणे, अशा स्वरुपाच्या तक्रारी असूनही शासनाने कारवाई न करणे"

---

**मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे निवेदन**

राज्यातील शिक्षक भरती प्रक्रियेमध्ये सर्व उमेदवारांना निवडीची समान संधी मिळावी व शिक्षण सेवक पदासाठी उच्च गुणवत्ताधारक उमेदवाराची निवड होण्याच्यादृष्टीने शिक्षण सेवकाची भरती प्रक्रिया अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणीमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे पवित्र पोर्टल या संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येते.

सन २०२२ मध्ये शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणीचे आयोजन दि.२२.०२.२०२३ ते दि. ०३.०३.२०२३ या कालावधीत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचे मार्फत करण्यात आले होते. सदर परिक्षेचा निकाल दि.२३.०३.२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे. या परीक्षेमध्ये भ्रष्टाचार झाल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

शिक्षक भरतीबाबतची कार्यपध्दती पाहीली तर प्रथम शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी घेण्यात येते. तद्नंतर प्राप्त जाहिरातीनुसार विविध टप्प्यांमध्ये पवित्र पोर्टलमार्फत शिक्षक भरती प्रक्रिया राबविण्यात येत असते. यामध्ये एखाद्या गटामध्ये म्हणजेच (इ. १ ली ते ४ थी किंवा इ.८ वी ते १० वी) या गटाकरीता उमेदवाराची निवड झाल्यास उमेदवार पुन्हा त्याच गटाकरीता अर्ज दाखल करीत असतात. त्यामुळे उच्च गुणवत्ताधारक एकाच उमेदवाराची सतत निवड त्याच गटाकरीता वेगवेगळ्या ठिकाणी होत असते. ही बाब टाळता यावी व त्यांचेकडे उच्च अर्हता प्राप्त असेल तर त्यानुसार उच्च गटाकरीता देखील संधी उपलब्ध व्हावी या उद्देशाने शासनाने दि.१३.१०.२०२३ चा शासन निर्णय निर्गमित करुन निवड झालेल्या उमेदवारांना केवळ उच्च गटाकरीता विचारात घेण्याबाबतची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यामध्ये शिफारस करण्यात आलेले उमेदवार त्यांच्या अर्हतेनुसार पुढील टप्प्यामध्ये वरच्या गटासाठी (इयत्तेसाठी) विचारात घेण्यात आले आहेत.

मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल रिट याचिका क्र.५०५९/२०१८ प्रकरणी मा. न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार शासन निर्णय दि. ०७.०२.२०१९ अन्वये खाजगी व्यवस्थापन पात्र उमेदवारांपैकी शिक्षण सेवकांची अंतिम निवड खाजगी शैक्षणिक संस्था मुलाखतीच्या आधारे करील, असे निश्चित करण्यात आले. मुलाखतीकरीता एकूण ३० गुणांची तरतूद करण्यात आली. यामध्ये एका रिक्त पदाकरीता १० उमेदवारांची शिफारस पोर्टलमार्फत मुलाखतीकरीता करण्यात येते. मुलाखतीकरीता व्यवस्थापनांकडून पात्र उमेदवारांच्या निवडीसाठी विविध प्रकारची कार्यपद्धती अवलंबविण्यात येत होती तसेच मुलाखतीप्रक्रियांमध्ये अधिकची पारदर्शकता यावी व शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांचे योग्यरित्या मूल्यमापन व्हावे याकरीता शासन पत्र दि.०६.०८.२०२४ अन्वये मानक कार्यपद्धती (SOP Standard Operating Procedure)

निश्चित करण्यात आली आहे. यामध्ये मुलाखत प्रक्रियेच्या चित्रीकरणाचा व मुलाखतप्रक्रियेचा सर्व अभिलेख जतन करणेबाबतची बाब समाविष्ट आहे.

तसेच, निवडप्रक्रियेदरम्यान उमेदवारांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी संबंधित जिल्ह्यांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांचेकडे अर्ज दाखल करता येतो. शिक्षणाधिकारी यांच्यास्तरावरुन निराकरण न झाल्यास उमेदवारांना संबंधित विभागाच्या विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्याकडे अपील अर्ज दाखल करण्याचे देखील प्रयोजन आहे. सदरच्या शिक्षक भरतीप्रक्रियेमध्ये उमेदवारांना पैशांच्या मागणीबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याचे आयुक्त (शिक्षण) कार्यालयाने नमूद केले आहे. ही बाब पाहता सर्व उमेदवारांना शिक्षक भरतीची समान संधी उपलब्ध व्हावी व शिक्षक भरतीप्रक्रिया अधिकची पादर्शकरित्या पार पडावी म्हणून ऑनलाईन पवित्र पोर्टल प्रणाली लागू करण्यात आली आहे.

****************

लक्षवेधी सूचना क्रमांक २२३३

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे व्दितीय अधिवेशन

श्री. रईस शेख, वि. स. स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २२३३ पुढीलप्रमाणे आहे :-

"सन २०२४ जुलै मध्ये राज्य शासनाने लंडन येथील महाराष्ट्र मंडळाच्या सहकार्याने लंडनमधील विद्यार्थ्यांसाठी मराठी भाषा अभ्यासक्रम सुरु करण्याचा निर्णय घेतला असणे, सदर अभ्यासक्रम तयार करण्यात आलेला नसणे, जानेवारी २०२४ मध्ये नवी मुंबई येथे झालेल्या विश्व मराठी संमेलनाच्या दरम्यान राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT) व महाराष्ट्र मंडळ, लंडन यांच्यामध्ये सामंजस्य करार (MoU) आणि त्या अनुषंगाने १० जुलै, २०२४ रोजी शासन निर्णयानुसार लंडनमधील विद्यार्थ्यांसाठी मराठी कोर्सेस सुरु करण्यात आलेले नसणे, शासन निर्णयानुसार १० सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली असून त्यात महाराष्ट्र मंडळ, लंडनचे ५ सदस्य समाविष्ट असणे, ही समिती प्रत्येक महिन्यात बैठक घेण्याचे अपेक्षित असणे, या समितीच्या आतापर्यंत एकूण किती बैठका झाल्या याची माहिती नसणे, जर सदर मराठी कोर्सेस सुरु करण्यात आला असेल तर लंडनमधील एकूण किती विद्यार्थ्यांनी यासाठी प्रवेश घेतला आहे याची माहिती न मिळणे, शासन निर्णयानुसार महाराष्ट्र मंडळ, लंडन यांना आवश्यक पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देणे, तसेच विद्यार्थ्यांसाठी परीक्षा घेणे व प्रमाणपत्र देणे राज्य शासनाच्या जबाबदारीत असणे, या अनुषंगाने लंडनला पाठ्यपुस्तके पाठविण्यात आलेली नसणे, राज्य सरकारने लंडनमधील विद्यार्थ्यांना मराठी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र प्रदान करणार असल्याचे सांगण्यात आले असणे, आतापर्यंत एकूण किती विद्यार्थ्यांना हे प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले याची माहिती उपलब्ध करून देणे, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

## मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे निवेदन

परदेशातील विद्यार्थ्यांना मराठी भाषा समजावी, टिकून राहावी, मराठी भाषेचा प्रचार व्हावा यासाठी लंडन येथील मराठी भाषा शिकण्याची आवड असणाऱ्या मुलांचा शोध घेणे, त्यांची माहिती संकलित करणे, पाठ्यपुस्तक पुरवणे, अध्यापन करणे, परीक्षा घेण्याकरिता यंत्रणा निर्माण करणे, इयत्ता १ ली ते ५ वी च्या

विद्यार्थ्यांची परीक्षा घेणे, प्रश्नपत्रिकांची पडताळणी करून प्राप्त श्रेणीनुसार इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांना राज्य बोर्डामार्फत प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे व प्रमाणपत्राचे वाटप करणे इत्यादी बाबी सुलभ होण्याच्या दृष्टिने महाराष्ट्र मंडळ, लंडन आणि शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन यांच्यामध्ये माहे जानेवारी २०२४ मध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे. सदर सामंजस्य कराराची अमंलबजावणी करण्यासाठी शालेय शिक्षण विभागांतर्गत विविध कार्यालयांची जबाबदारी निश्चित करण्यास व समन्वय समिती स्थापन करण्यास दिनांक १० जुलै, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे हे समन्वय समितीचे अध्यक्ष आहेत.

महाराष्ट्र मंडळ, लंडन यांच्याशी झालेल्या सामंजस्य कराराच्या अनुषंगाने करावयाच्या पुढील कार्यवाही संदर्भात त्यांच्यासोबत व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत लंडन येथे मराठी भाषा विषयाचे कोर्स सुरु करणे व त्याची अंमलबजावणी या संदर्भाने चर्चा करण्यात आली. चर्चेअंती असे निदर्शनास आले की, महाराष्ट्र मंडळ, लंडन यांची सदर मराठी कोर्सेस सुरु करण्याच्या अनुषंगाने संपूर्ण तयारी झालेली नाही. त्यामुळे सबंधित मंडळाने या संदर्भात शासनास अंमलबजावणीसंदर्भात सविस्तर व तपशीलवार माहिती सादर करावी, असे बैठकीत ठरले. महाराष्ट्र मंडळ, लंडन यांनी संबंधित माहिती सादर केल्यानंतर व या कोर्सेस चालू करण्याच्या अनुषंगाने तयारी केल्यानंतरच पुढील कार्यवाही करणे शक्य होणार आहे. महाराष्ट्र मंडळ, लडन यांच्याकडून याबाबतचा प्रतिसाद अद्याप प्रलंबित आहे.

*****

लक्षवेधी सूचना क्र.२३९७

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना

*श्री. बाबुराव कदम कोहळीकर (वि.स.स.) यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली* लक्षवेधी सुचना क्र.२३९७ पुढीलप्रमाणे आहे :-

"नांदेड जिल्ह्यातील हिमायतनगर कृषी उत्पन्न बाजार समितीत आजमितीपर्यंत शेतीमालाचा लिलाव झालेला नसणे,तसेच उक्त बाजार समितीला गाळे,मोकळे प्लॉट यांच्या लिलावातून तसेच बाजार शुल्कातून कोट्यावधी रुपये मिळत असून सदर पैशाचा होत असलेला अपव्यय, गाळांच्या लिलावात झालेला गैरव्यवहार, मार्केट यार्डातील प्लॉट लिज भाडेतत्तवावर वाटप करतांना कलम १२ (१) नुसार अटी व शर्तीचे उल्लंघन करुन कांही मर्जितील व्यापा-यांनाच गाळे वाटप करण्यात येणे, लिज प्रिमियम रक्कमेपेक्षा कमी रक्कम घेऊन गाळ्याचे वाटप करणे,बाजार समितीने पणन संचालक,पुणे यांच्या दि.२२/०९/२०१७ रोजीच्या निर्देशानुसार गाळेवाटप व नोकर भरतीत तीन टक्के आरक्षण ठेवणे अपेक्षित असतांनाही ते ठेवण्यात न येणे,बाजार समितीमध्ये १०६ गाळे लिलावासाठी मंजूर असतांना केवळ ७७ गाळांच्या लिलाव व्यापा-यांसमोर करणे, आर्थिक स्वार्थापोटी उर्वरीत २९ गाळांच्या लिलाव न करता गाळ्याचे वाटप करणे, परिणामी सर्वसामान्य व्यापारी बाजार समितीच्या गाळ्यापासून वंचित राहणे, स्थानिक लोकप्रतिनिधींनी उक्त लिलाव प्रक्रिया रद्द करुन सदर प्रकरणाची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याची मा.पणनमंत्री यांचेकडे निवेदनाव्दारे केलेली मागणी, उक्त प्रकरणी चौकशी करुन शासनास अहवाल सादर करण्याचे आदेश कक्ष अधिकारी,पणन विभाग,महाराष्ट्र शासन यांनी पणन संचालक,पुणे यांना दि.२८/०४/२०२५ रोजी देणे, परंतु अद्यापही उक्त प्रकरणी कोणतीच कार्यवाही न होणे, शासनाने उक्त प्रकरणी तातडीने चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता."

---

मंत्री (पणन) यांचे निवेदन

कृषि उत्पन्न बाजार समिती, हिमायतनगरच्या प्लॉट वाटपामध्ये अनियमीतता झालेबाबत दि.१७.०४.२०२५ रोजीची तक्रार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांच्याकडे प्राप्त झाली होती. सदर तक्रारीवर चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची विनंती तक्रारीमध्ये करण्यात आली होती. त्या

शेट/एम - ६३४ (७५०-०७-२०२५)

अनुषंगाने सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. भोकर यांना चौकशी करण्याचे निर्देश दिले असून त्यांनी दि.१०.०७.२०२५ रोजी प्राथमिक अहवाल जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांना सादर केला आहे.

सदर अहवालात बाजार समितीच्या संबंधित अभिलेख्याची पाहणी केली असता कृषि उत्पन्न बाजार समिती, हिमायतनगर यांनी दि.०९.०५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये बाजार समितीच्या मार्केट यार्डातील भूखंड २९ वर्षाकरीता नोंदणीकृत भाडेतत्त्वावर वाटप करण्याचा कलम १२ (१) चा प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांना सादर केला होता. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांनी दि.१५.०५.२०२४ रोजी पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे सादर केला. सदर प्रस्तावास पणन संचालक, पुणे यांनी दि.२१.०५.२०२४ च्या पत्रान्वये अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता दिलेली आहे. सदर मान्यतेनुसार बाजार समितीने दि.१५.०६.२०२४ रोजी एकुण १०५ रिकाम्या भूखंडाचे दै. प्रजावाणी व दै. एकजूट या वृत्तमानपत्रात दि.०९.०६.२०२४ रोजी जाहीर प्रगटन दिले आहे. तसेच दि.१५.०६.२०२४ रोजी वरील सर्व १०५ भूखंड जाहीर लिलावाद्वारे वाटपाची प्रक्रिया केल्याचे दिसून येते.

उपरोक्त १०५ भुखंडापैकी २८ भुखंडाची संपूर्ण रक्कम जमा होऊन त्यातील २४ भुखंडांचा नोंदणीकृत भाडेपट्टा झालेला आहे. उर्वरित ४ भुखंडांचा भाडेपट्टा झालेला नाही. तथापि, ज्या भुखंडांची रक्कम जमा झालेली नाही त्या भुखंडधारकांना ३ वेळा नोटीस देऊनही त्यांनी रक्कम जमा न केल्यामुळे बाजार समितीने दै. दैशोन्नती या वृत्तमानपत्रात दि.१०.०४.२०२५ रोजी जाहिर प्रगटन देऊन लिलावात वाटपात झालेल्या भूखंड धारकांना लिलाव प्रक्रियेत बोली लावलेली रकमेचा भरणा दि.१५.०४.२०२५ पर्यंत करणेबाबत कळवून प्रक्रिया बंद केली आहे. एकूण १०५ भूखंडांपैकी अनुक्रमांक १ ते ७७ भूखंडांपैकी एकूण १५ भूखंडांचे व अनुक्रमांक ७८ ते १०५ भूखंडापैकी ०९ भूखंडाचे नोंदणीकृत भाडेपट्टा झालेचे दिसून येते. उर्वरित ७७ भूखंड वाटप करणे शिल्लक आहे, असे प्राथमिक चौकशी अहवालात नमूद केले आहे. अंतिम अहवाल प्रलंबित आहे. शासनाकडे दि.१७.०४.२०२५ रोजी कृषि उत्पन्न बाजार समिती, हिमायतनगरच्या प्लॉट वाटपामध्ये अनियमीतता झालेबाबत पत्र प्राप्त झाल्यानंतर दि.२८.०४.२०२५ रोजी या प्रकरणी तात्काळ स्थगिती देऊन अनूपालन अहवाल सादर करण्याचे निर्देश पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना दिले आहेत.

*****

एम - ६३४ - १अ

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२५ चे व्दितीय अधिवेशन**

श्री. भास्कर जाधव, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १३३ पुढीलप्रमाणे आहे :-

" रत्नागिरी जिल्हयातील लोटे (ता. खेड) औदयोगिक वसाहतीतील कारखान्यांमध्ये प्रक्रिया करून तयार झालेला शेकडो टन घनकचरा आणि राख बोरज (ता. खेड) धरण परिसरातील मोकळया जागेत पसरवून त्यावर माती टाकून हे कृत्य लपविण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची धक्कादायक बाब दि. ३१ मार्च २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, याच धरणातून खेड शहराला पाणीपुरवठा होत असल्याने पावसाळयाच्या दिवसांत सदर रासायनिक घनकचऱ्याचे पाणी धरणातील जलाशयात मिसळून ते दूषित होण्याची आणि पर्यायाने नागरिकांच्या जिविताला धोका निर्माण झालेला असणे, असे असतानाही संबंधितांवर कारवाईस करण्यात आलेली टाळाटाळ, याबाबत सखोल चौकशी होवून दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी जिल्हाधिकारी, रत्नागिरी तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेकडे वारंवार करून देखील जाणीवपूर्वक करण्यात आलेले दुर्लक्ष, लोटे औदयोगिक वसाहतीतील घनकचरा असो वा प्रक्रिया न केलेले सांडपाणी उघडयावर टाकण्याचे प्रकार वारंवार घडूनदेखील संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांचे कारखानदारांशी संगनमत असल्याने दोषी कारखान्यांवर कारवाई होत नसल्याने परिसरातील रहिवाशी आणि नागरिकांमध्ये निर्माण झालेली तीव्र संतापाची आणि चिडीची भावना, ही गंभीर बाब लक्षात घेऊन शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल ) यांनी करावयाचे निवेदन**

मौजे बोरज ता. खेड, जि. रत्नागिरी येथील हद्दीमध्ये लोटे औदयोगिक वसाहतीमधील केमिकल कंपनीतील केमिकल बेकायदेशिररित्या खाजगी जागेमध्ये टाकत असलेबाबत श्री. परेश उदय शिंदे, रा. बोरज, ता. खेड यांची तक्रार दिनांक २७.०२.२०२५ रोजी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाली होती. सदर तक्रारीमध्ये खेड तालुक्यातील बोरज गावचे हद्दीमध्ये खाजगी जागेमध्ये लोटे औदयोगिक वसाहतीतील कंपनी बेकायदेशीररित्या त्यांच्या कंपनीतील घातक केमिकल टाकत असलेबाबत नमुद करण्यात आले होते. सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत सदर ठिकाणी दिनांक २०.०३.२०२५ रोजी पाहणी करण्यात आली. पाहणी दरम्यान सदर ठिकाणी बॉयलरची राख व हिरव्या रंगाचे पावडर सदृश्य रसायन राखेसोबत विखुरलेल्या स्वरूपात आढळून आले. सुमारे ४०० X २०० फुट क्षेत्रावर राख व रसायन अज्ञात व्यक्तीकडून टाकण्यात आल्याचे आढळून आले. सदरची राख ही लाल रंगाच्या मातीने झाकून टाकलेली आढळली. पाहणी दरम्यान सदर ठिकाणचे नमुने संकलित करण्यात आले व प्रादेशिक प्रयोगशाळा, चिपळूण येथे पृथ्थकरणासाठी पाठविण्यात आले. उपरोक्त ठिकाणच्या परिसरात कोणताही पाण्याचा प्रवाह अस्तित्वात नाही. तथापि, सदर ठिकाण हे बोरज धरणाच्या पाणलोट क्षेत्रात येते.

तसेच प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने उपरोक्त ठिकाणी सापडलेला घनकचरा निर्माण होऊ शकतो अशा लोटे परशुराम औदयोगिक वसाहती मधील एकुण ०४ संभाव्य उदयोगांची पाहणी दिनांक २०.०३.२०२५, ०१.०४.२०२५, ०२.०४.२०२५ व ०९.०४.२०२५ रोजी करण्यात आली. त्यामध्ये १) मे. रिव्हरसाईड इंडस्ट्रिज, प्लॉट नं. बी-६, एम.आय.डी.सी., लोटे. २) मे. श्रेयस इंटरमिडीएट, प्लॉट नं. डी-२१, एम.आय.डी.सी., लोटे. ३) मे. सुप्रिया लाईफसायन्सेस, ए-५/२, एम.आय.डी.सी., लोटे आणि ४) मे. दिपक केमटेक्स, मौजे आवाशी. या ०४ डाईंग/ पिगमेंट (Dying-pigment) व बल्क ड्रग तयार करणा-या उद्योगांचा समावेश आहे. तथापि बोरज

येथील संकलित केलेले नमुने व मे. रिव्हरसाईड इंडस्ट्रिज, प्लॉट नं. बी-६, एम आय.डी.सी., लोटे या उद्योगाच्या घनकचऱ्याचे पृथ:करण अहवालामध्ये साम्य असल्याचे आढळून येत असल्याने सदरचा घातक घनकचरा हा तातडीने या जागेवरून उचलून त्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट CHWTSDF, MWML, Taloja, Dist. Raigad येथे आपल्या स्व-खर्चाने तात्काळ करण्यात यावी व सदर घनकचऱ्याची विल्हेवाट लावताना पर्यावरणास कोणतीही हानी होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी असे निर्देश मे. रिव्हरसाईड इंडस्ट्रिज, प्लॉट नं. बी-६, एम.आय.डी.सी., लोटे या उदयोगाला दिनांक २३.०४.२०२५ रोजी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून देण्यात आले. तदनंतर घातक घनकचरा ( व्यवस्थापन व हाताळणी ) अधिनियम, २००८, सुधारणा २०१६, अन्वये पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ व घातक घनकचरा अधिनियम अंतर्गत पुढील कारवाईसाठी वरिष्ठांकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्याअनुषंगाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून दिनांक २५.०४.२०२५ रोजी सदर उद्योगाला प्रस्तावित निर्देश बजावण्यात आले. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या प्राप्त निर्देशानुसार सदर उद्योगाने दिनांक ०८.०५.२०२५ रोजी राख मिश्रीत घातक घनकचरा एकुण २३.१३० मे. टन एवढा उचलुन त्याची विल्हेवाट मे. मुंबई वेस्ट मॅनेजमेंट (CHWTSDF), तळोजा येथे केलेली आहे. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिनांक १८.०६.२०२५ रोजी उद्योगाला बंद करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

तदनंतर उत्पादन बंदच्या निर्देशाच्या अनुषंगाने संबंधित उदयोगाची तपासणी केली असता उदयोगाचा विज व पाणीपुरवठा खंडीत करण्यात आल्याचे व उदयोगाचे उत्पादन बंद असल्याचे निर्दशनास आले. उदयोगाने सादर केलेल्या उत्पादन चालु करण्याच्या विनंती पत्रानुसार सदर उदयोगाची सुनावणी मुख्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्याकडे प्रस्तावित आहे. तसेच बोरज धरण (शिव खुर्द) व जलजीवन मिशन पाणीपुरवठा योजना पाटीलवाडी, ता. खेड येथील पाण्याचे नमुने पावसाळा चालु झालेनंतर दिनांक १८.०६.२०२५ रोजी संकलित करण्यात आले होते. सदर पृथ:करण अहवालानुसार पाण्याची गुणवत्ता विहीत मर्यादेत आढळून आली.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळातर्फे वेळोवेळी औद्योगिक वसाहतीतील उदयोगांची पाहणी करण्यात येते व पाहणी दरम्यान दोषी आढळणाऱ्या उद्योगांवर जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) कायदा, १९७४ व हवा (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) कायदा, १९८१ अन्वये कारवाई करण्यात येते. त्या अनुषंगाने मागील एक वर्षात लोटे औदयोगिक वसाहतीतील उघडयावर प्रक्रियाकृत / विनाप्रक्रिया सांडपाणी अथवा घातक घनकचरा सोडणाऱ्या एकुण २७ उद्योगांना कारणे दाखवा नोटीस, १६ उद्योगांना प्रस्तावित निर्देश, १५ उद्योगांना अंतरिम निर्देश व १२ उदयोगांना उद्योग बंदचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

तसेच, जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या अहवालानुसार जलाशयातील पाणी दुषित होऊन नागरिकांच्या जिविताला धोका निर्माण झाल्याबाबत परिसरातील नागरिकांची कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याचे कळविण्यात आलेले आहे.

*****

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग.                                                    लक्षवेधी सूचना क्र. १३५

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. भास्कर जाधव, श्री. मोहन मते, श्री. अस्लम शेख, श्री. अमीन पटेल, श्रीमती ज्योती गायकवाड, डॉ. विश्वजित कदम, श्री. विकास ठाकरे, श्री. संजय मेश्राम, श्री. राजु तोडसाम, श्री. सुधीर मुनगंटीवार, श्री. हरिश्चंद्र भोये, श्री. राजेंद्र गावित, श्री. महेश सावंत, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र. १३५ पुढीलप्रमाणे आहे:-

"वाडा तालुक्यातील (जि. पालघर) वडवली येथील ग्रामपंचायतीच्या हद्दीत जुने टायर जाळून त्यापासून ऑईलची विक्री मोठ्या प्रमाणात होत असून टायर रिसायकलिंग करणाऱ्या कंपन्यांमुळे वाडा परिसरातील नागरिक मागील तीन वर्षांपासून कारखान्यांतून होणाऱ्या प्रदूषणामुळे त्रस्त असून वडवली गावाच्या हद्दीत असलेले दहा प्रदूषणकारी कारखाने मा.पालघर जिल्हा पालकमंत्र्यांच्या आदेशानुसार बंद करण्यात आले असणे, संबंधित कारखान्याच्या मालकानी शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करून कारखाने पुन्हा रात्री सुरू केल्याचे तेथील ग्रामस्थांना माहे जून मध्ये निदर्शनास येणे, वाडा परिसरात दररोज प्रदूषित रसायनिक सांडपाणी नैसर्गिक नाल्यात टाकल्याने दूषित पाण्यामुळे नाल्यातील मासे तसेच जनावरे मृत्युमुखी पडल्याच्या घटना समोर येणे याबाबतीत प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे अनेकदा पत्रव्यवहार करूनही त्याकडे संबंधित अधिकाऱ्यानी दुर्लक्ष केल्याने रिसायकलिंग कारखान्यांच्या प्रदूषणामुळे स्थानिक नागरिकांना श्वसन विकाराचा त्रास सहन करावा लागून रुग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होणे, एम. डी. पायरोलिसेस या कंपनीत माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये स्फोट होऊन या स्फोटात संपूर्ण कंपनी जळून खाक होऊन त्यामध्ये दोन कामगारांचा व त्यांच्या दोन मुलांचा बळी गेल्याची घटना उघडकीस येणे ग्रामस्थांकडून कारखान्यांवर कारवाई करण्याची मागणी होत असतांना प्रशासनाकडून कोणतीही कारवाई होत नसल्याने परिणामी शासनाप्रति निर्माण झालेली चिडीची व असंतोषाची भावना याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

.............................................................................................................................................

**मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग) यांचे निवेदन.**

वडवली ग्रामपंचायत, तालुका वाडा, जिल्हा पालघर हद्दीत एकुण १९ टायर पायरोलिसिस उद्योग आहेत. त्यापैकी ०९- उद्योगांना उद्योग उभारणीसाठी व १०- उद्योगांना उत्पादन करण्याकरीता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने अटी व शर्तीसह संमतीपत्र प्रदान केलेले आहे. या उद्योगामध्ये टाकाऊ/वापरलेले टायरचा कच्चा माल म्हणून वापर करुन त्यापासून पायरो तेल काढले जाते. तसेच चार (Char) व स्टील स्क्रॅपचे उत्पादन घेतले जाते. सदर उद्योगाने औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करणेसाठी सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा व शून्य निष्काशन प्रक्रिया यंत्रणा उभारलेली असून प्रक्रियाकृत औद्योगिक पाण्याचा पुर्नवापर केला जातो. सदर उद्योगामध्ये इंधन म्हणून एल.डी.ओ. (Light Diesel Oil) तसेच उद्योगामधून निर्माण होणारा पायरोगॅस वापरला जातो. सदर उद्योगांनी हवा प्रदूषण नियंत्रणासाठी हवा प्रक्रिया संयंत्रणा, वेट स्क्रबर, ३० मी. उंचीचे धुरांडे (चिमणी) उभारली आहे व अतिरिक्त पायरोगॅस जाळण्याकरिता फ्लेअर धुरांडे (चिमणी) सुध्दा उभारली आहे. तसेच अतिरिक्त पायरोगॅस साठविण्याकरीता गॅस बलुन सिस्टिम बसविली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उद्योगांची वेळोवेळी पाहणी करुन पाहणीदरम्यान त्रूटी आढळणे व संमतीपत्रातील अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास उद्योगांवर वेळोवेळी कारवाई करण्यात येते.

वडवली ग्रामपंचायत हद्दीतील टायर पायरोलिसिस उद्योगामुळे प्रदूषण होत असल्याबाबत तहसिलदार, वाडा यांचेमार्फत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. तसेच मा. पालकमंत्री, पालघर यांनी सदर तक्रारीच्या अनुषंगाने टायर पायरोलेसिस उद्योगांचे सर्वेक्षण करुन अहवाल देण्यास सांगितले होते. त्यानुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने एप्रिल, २०२५ मध्ये विशेष सर्वेक्षण केले असून सदरील सर्वेक्षणादरम्यान महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रदान केलेले संमतीपत्र व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शिकेनुसार (SOP) पुर्तता याबाबत सविस्तर पाहणी करण्यात आली. सदर पाहणीदरम्यान संमतीपत्रातील अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यामुळे ०८-उद्योगांना उत्पादन बंदचे आदेश, ०१-उद्योगाला अंतरिम निदेश व ०१- उद्योगास प्रस्तावित आदेश दिलेले आहेत. सद्यस्थितीत वडवली हद्दीत ०२ उद्योग चालू असून या दोन्ही उद्योगांवर कायदेशीर कार्यवाही चालु आहे. तसेच उत्पादन बंदचे आदेश दिलेले उद्योग रात्री सुरू असल्याबाबतची तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त नाही. सदर उद्योगांचा विद्युत पुरवठा खंडीत

केल्याबाबतचा अहवाल महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी लि. यांचेकडून प्राप्त झाला आहे. दि.०५/०७/२०२५ व दि.१०/०७/२०२५ रोजी उद्योगांची पाहणी केली असता ०८- उद्योग बंद असल्याचे आढळून आले.

तसेच वाडा परिसरात प्रदूषित रासायनिक सांडपाणी नैसर्गिक नाल्यात टाकल्याने दूषित पाण्यामुळे नाल्यातील मासे मृत्युमुखी पडल्याची तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दि.१७/०८/२०२३ रोजी प्राप्त झालेली होती. प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने ०१ उद्योगास उत्पादन बंदचे आदेश देण्यात आले होते. त्याअनुषंगाने मुसारणे नाला येथील पाण्याचे नमुन्याचे पृथ्थ:करण अहवालानुसार पाण्याची गुणवत्ता विहित मानकांच्या मर्यादेत असल्याचे दिसून येते.

सहाय्यक आयुक्त, मत्स्य व्यवसाय यांच्या प्राप्त अहवालानुसार, वाडा तालुक्यातील (जि. पालघर) बडवली येथील ग्रामपंचायतीच्या हद्दीत जुने टायर जाळून त्यापासून ऑईलची विक्री मोठ्या प्रमाणात होत असून टायर रिसायकलिंग करणाऱ्या कंपन्यांमुळे वाडा परिसरातील नागरिक मागील तीन वर्षांपासून कारखान्यातून होणाऱ्या प्रदूषणामुळे त्रस्त असून बडवली गावाच्या हद्दीत असलेले दहा प्रदूषणकारी कारखान्यांकडून वाडा परिसरात दररोज प्रदूषित रासायनिक सांडपाणी नैसर्गिक नाल्यात टाकल्याने दूषित पाण्यामुळे नाल्यातील मासे मृत्युमुखी पडल्याबाबत कोणत्याही वैयक्तिक मच्छिमार व मच्छिमार सहाकारी संस्थाकडून कोणतही लेखी वा तोंडी तक्रार मत्स्य व्यवसाय कार्यालयास प्राप्त झाली नाही.

पशु वैदयकिय अधिकारी यांच्या प्राप्त अहवालानुसार, बडवली हे गाव पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी – १ कुडुस ता. वाडा जि. पालघर या दवाखान्याच्या कार्यक्षेत्रामध्ये येत असून दवाखान्यातील शव विच्छेदन नोंदवहीतील नोंदीमध्ये अशा आशयाच्या घटनेमुळे मागील ३ वर्षांत जनावरे मृत झाल्याची नोंद दिसून येत नसल्याचे कळविले आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी, पालघर यांचेकडून प्राप्त अहवालानुसार पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील बडवली हे गांव प्रा. आ. केंद्र कुडुस कार्यक्षेत्रात येत असून येथील ग्रामपंचायत हद्दीतील प्रा. आ. केंद्राचे ठिकाणी उपचाराकरीता आलेले श्वसनाचे रुग्ण तसेच कार्यक्षेत्रात आढळणारे श्वसनाचे रुग्ण हे संबंधित कंपन्यांच्या प्रदूषणामुळे झाले आहेत की कसे हे निश्चित सांगता येत नाही, असे नमूद केले आहे.

मे. एम. डी. पायरोलायसिस बडवली या कंपनीमध्ये दि.२९/०१/२०२५ रोजी आगीची घटना घडली होती. त्यासंदर्भात दि.३०/०१/२०२५ रोजी कंपनीने ई-मेलद्वारे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास कळविले होते. सदरील घटनेच्या अनुषंगाने दि.३०/०१/२०२५ रोजी प्राथमिक पाहणी केली असता रियक्टरच्या बॅकफायरमुळे अपघात झाल्याची माहिती देण्यात आली. सदर अपघातच्या अनुषंगाने उद्योगाला दि.३१/०१/२०२५ रोजी स्वयं उत्पादन बंदचे आदेश देण्यात आले.

सहसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य यांचेकडून दि.२४/०२/२०२५ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार दि.२९/०१/२०२५ रोजी साधारणपणे सायंकाळी ०६:०० वाजताच्या सुमारास पायरोलेसिस रिॲक्टरमध्ये आग लागून अपघात घडला होता. सदर अपघातात पायरोलेसिस रिॲक्टरमधून निघालेल्या गरम आगीच्या ज्वाळांमुळे एकुण ३ कामगार व २ लहान मुले गंभीर जखमी झालेले होते. जखमींना तातडीने उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते व उपचारा दरम्यान २ स्त्री कामगारांचा व २ लहान बालकांचा मृत्यु झालेला आहे व एक कामगार हा सध्या उपचार घेत आहे. सदर घटनेची उपसंचालकामार्फत घटनास्थळास भेट देऊन चौकशी करण्यात आली. चौकशीदरम्यान असे निदर्शनास आले की, पायरोलेसिस रिॲक्टरमध्ये प्रक्रिया चालु असताना रिॲक्टरचा दाब वाढून आगीची घटना घडलेली आहे. आस्थापनेच्या भोगवटादाराने कारखाने अधिनियम, १९४८ अंतर्गत परवाना घेतलेला नव्हता. तसेच सदरचा अपघात घडू नये म्हणुन सुरक्षिततेबाबतच्या उपाययोजना केलेल्या नसल्याचे निदर्शनास आले. सबब भोगवटादारास महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ चे नियम ४(४) व कारखाने अधिनियम, १९४८ चे कलम ७-अ(२)(a) च्या भंगाबाबत दिनांक २०/०२/२०२५ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे व पुढील फौजदारी खटला दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे असे कळविण्यात आले होते. तसेच मृत कामगारांच्या वारसांना कारखाना व्यवस्थापनाकडून एकुण रक्कम रुपये १५ लाख इतकी नुकसान भरपाई देण्यात आली आहे. टायर पासून ऑईल बनविणाऱ्या कारखान्यांवर औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, वसई या कार्यालयामार्फत आजतागायत एकुण ८ खटले दाखल करण्यात आले असल्याचे कळविले आहे.

*********

महाराष्ट्र विधानसभा सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन.

श्री. सुनिल प्रभु, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्रमांक ५१७ पुढीलप्रमाणे आहे.

"जि. रायगड ता. अलिबाग जुई बापूजी येथील वन विभागाच्या राखीव क्षेत्रावर जेएसडब्ल्यु कंपनीने कांदळवन नष्ट करुन, भराव टाकून पर्यावरण व वन विभागाची परवानगी न घेता, खडीचा रस्ता व संरक्षक भिंतीचे अनधिकृत बांधकाम करणे, अद्याप शासनाने दोषी संचालका विरुध्द कारवाई न करणे, तसेच ता. वडखळ खारमाचेला येथील कांदळवन नष्ट करुन अतिक्रमण करुन लोखंडी पुलाचे व सुरक्षा चौकीचे अनधिकृत बांधकाम करणे, या प्रकरणात वन अधिकाऱ्यांनी कंपनीच्या संचालकाविरुध्द गुन्हा दाखल न करता, जनरल मॅनेजर विरुध्द गुन्हा दाखल करणे, प्रदुषण नियंत्रण मंडळाने कंपनीला चार वेळा कारणे दाखवा नोटीसा देणे व पुढे कंपनीस दिलेली कन्सेन्ट टु ऑपरेटची परवानगी रद्द न करणे, दाभोळकराच्या तक्रारीनुसार कंपनी विरोधात न्यायालयात फौजदारी दावा दाखल करुन, या ही प्रकरणात उपविभागीय अधिकारी यांनी संचालक मंडळास वाचवून जनरल मॅनेजरवर दावा दाखल करणे, केंद्रिय हरित लवादाने दिलेल्या अनेक आदेशानुसार पोलुटर्स पे प्रिन्सिपल या तत्वानुसार प्रोजेक्टच्या ५ टक्के प्रमाणे दंड न घेता केवळ १ टक्याहुन कमी प्रमाणे १,६०,८०,००० रुपये अद्याप दंड रक्कम न भरणे, यामध्ये शासनाचे प्रचंड अर्थिक नुकसान होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल) यांचे निवेदन

मे. जे. एस. डब्ल्यु. स्टील लि. हा उद्योग डोलवी, ता. पेण, जि. रायगड येथे आहे. या उद्योगामध्ये मुख्यातः लोखंडाचे (Integrated Steel Plant) उत्पादन करण्यात येते. सदर उद्योग सन १९९४ च्या दरम्यान मे. इस्पात इंडस्ट्रीज लि. या नावाने अस्तित्वात होता, तद्नंतर, मे. जे. एस. डब्ल्यु. स्टील लि. या उद्योगाने २०१२ मध्ये अधिग्रहण केले आहे. या उद्योगामध्ये लोखंडाचे उत्पादन करण्यासाठी पहिल्या टप्यामध्ये (३ एमटीपीए क्षमता प्रकल्प) क्षमतेचा होता. तद्नंतर, दुस-या टप्प्यामध्ये (विस्तारीकरण ३ ते ४ एमटीपीए क्षमता प्रकल्प) क्षमतेचे विस्तारीकरण करण्यात आले व तिस-या टप्प्यामध्ये (विस्तारीकरण ५ ते १० एमटीपीए क्षमता प्रकल्प) प्रकल्पाचे विस्तारीकरण करण्यात आले.

मे.जे.एस.डब्ल्यु.स्टील लि. या कंपनीने सदर उद्योगांसाठी पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून दि.२१.११.२०१२, दि.२५.०८.२०१५, दि.०१.०२.२०१८ व दि.२२.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये पर्यावरणीय अनुमती घेतलेली आहे. तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने सदर प्रकल्पांना जल (प्रतिबंध व प्रदुषण नियंत्रण) कायदा १९७४ अंतर्गत हवा (प्रतिबंध व प्रदुषण नियंत्रण) कायदा १९८१ व घातक घनकचरा व इतर अधिनियम सुधारित २०१६ अंतर्गत आवश्यक त्या अटी व शर्ती घालून संमतीपत्र प्रदान केलेले आहे.

मौजे खारमाचेला ता.पेण. येथील स.नं. ९४ पैकी ३.३७६६० हे. महाराष्ट्र शासन राजपत्र दि २०.०८.२०१५ अन्वये भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ४ अन्वये राखीव वन म्हणून घोषित करणेसाठी अधिसुचित झालेले आहे. तदनंतर महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२०.०१.२०२१ अन्वये भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम २० अन्वये राखीव वन म्हणून घोषित झालेले आहे. वन विभागाच्या ताब्यातील मौजे खारमाचेला गट नंबर ९४/२ मध्ये जे.एस.डब्लू कंपनीने भराव करुन केलेली कांदळवन कत्तल व अतिक्रमण करुन लोखंडी पुलाचे व सुरक्षा चौकीचे बांधकाम केल्याबदल वडखळ वनपरिक्षेत्राकडील गडब राऊंड गुन्हा क्र.१ दि. १५.०२ २०२१ नोंद करण्यात आलेला आहे. तसेच या प्रकरणी दंडात्मक कारवाई व शिक्षेकरीता वन परिक्षेत्र अधिकारी, वडखळ यांनी मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेण यांचे न्यायालयीन समरी केस क्रमांक १३३/२०२२ दाखल केली असून सनावणीची कार्यवाही सुरू आहे. सदर प्रकरणी सुनावणीची कार्यवाही सुरु आहे. तसेच मौजे जुई बापुजी येथील अधिसुचीत झालेले क्षेत्राची मोजणी दिनांक १०.०१.२०२० व दिनांक १३.०१.२०२० रोजी करण्यात आलेली होती. सदर प्रकरणी अधिसुचीत झालेले क्षेत्रावर बांधकाम व इतर वनेत्तर कामे झाल्याचे निदर्शनास आल्याने प्रस्तुत प्रकरणी अलिबाग वन परिक्षेत्राच्या तिनवीरा परिमंडळाकडील वन गुन्हा प्रकरण क्र. रॉड गुन्हा नं. ई/०२/२०१९-२०२० अन्वये नोंदविलेला आहे. वन विभागाच्या ताब्यात असलेले कांदळवन क्षेत्रात जेएसडब्ल्यू कंपनीने केलेल्या अनियमितते बदल वन विभागाकडून गुन्हा दाखल करुन कार्यवाही करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांमार्फत करण्यात आलेल्या पाहणी दरम्यान आढळलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने सन २०२१-२०२२ दरम्यान दि.०४.०८.२०२१, ०१.०२.२०२२ ०२.११.२०२२ व १८.११.२०२२ रोजी या उद्योगास "कारणे दाखवा" नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

सदरील उद्योगामुळे होणाऱ्या प्रदूषणाबाबत स्थानिक नागरिकांच्या वेळोवेळी तक्रारी या कार्यालयास प्राप्त झालेल्या आहेत. सदर तक्रारींच्या अनुषंगाने मंडळाने उद्योगाची प्रदूषणाची तिव्रता कमी करण्यासाठी कालबद्ध कृती आराखडा (Time Bound Action Plan) सादर करण्याकरीता सदरील उद्योगास दि. ०७.०५.२०२४ रोजी निर्देश दिलेले आहेत.

श्री दाभोळकर यांनी दिनांक ८ व ९ मार्च २०२३ रोजी याबाबत केलेल्या तक्रारीचे अनुषंगाने, तक्रारीत नमुद केलेल्या गावांपैकी मौजे कोळवे सोडून वडखळ, डोलवी, गडब, खारकारवी, खारमाचेला, वावे येथील गावामध्ये श्री. दाभोळकर यांना सोबत घेऊन वन परिक्षेत्र अधिकारी, वडखळ यांनी कांदळवन समिती सदस्यांसोबत दिनांक ८.३.२०२३ रोजी स्थळपाहणी करुन, पंचनामा करण्यांत आलेला होता. उपविभागीय अधिकारी, पेण यांनी तक्रारदार श्री दाभोळकर यांचे समवेत संयुक्तरित्या स्थळपाहणी केली असता, जे.एस.डब्ल्यु स्टील लि प्रशासनाने सदरचा प्रकल्प इस्पात इंडस्ट्रिज लि. कंपनीकडून खरेदी केलेला आहे. तसेच सदरचा प्रकल्प जे एस.डब्ल्यू प्रशासनास हस्तांतरीत झाल्यानंतर सदर मुद्यांबाबत कंपनी विरुध्द मा प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, पेण यांचे न्यायालयात फौजदारी दावा आर.सी.सी. केस क्र.९५/२०१२ दाखल करण्यात आला होता. सदर प्रकरणी मा. न्यायालयाने दि. १९.०८.२०१४ रोजी दावा फेटाळला आहे.

सौ. समिता राजेंद्र पाटील यांनी मे. जे. एस.डब्ल्यू स्टील लि या कारखान्यामुळे होणाऱ्या प्रदुषणाबाबत मा. हरित लवाद, नवी दिल्ली येथे अर्ज क्र. १२२/२०१५ अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. मा. हरित लवाद, नवी दिल्ली यांनी या अर्जाच्या अनुषंगाने दि. २७.०५.२०२१ रोजी मे जे. एस. डब्ल्यू, स्टील लि.

या कारखान्यामुळे प्रदूषणाच्या अनुषंगाने अहवाल सादर करण्यासाठी ५ सदस्यांची समिती गठित केली होती. सदर समितीमध्ये अध्यक्ष सह सचिव, वने, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली, जिल्हाधिकारी रायगड, सदस्य, भारतीय प्रौद्योगिक संस्था मुंबई यांचे सदस्य, केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळ सदस्य व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ सदस्य हे आहेत. तसेच, मा. जिल्हाधिकारी रायगड यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती गठित करण्यात आली होती. या उपसमितीमध्ये इतर शासकिय विभागांचा समावेश होता.

सदयस्थितीत, मुळ अर्ज क्र. १२२/२०१५ मध्ये .मा. हरित लवाद यांनी दिलेल्या दि २७.०५.२०२१ रोजी दिलेल्या आदेशान्वये गठित केलेल्या समितीने अहवाल तयार केलेला असून सदर अहवाल मा. हरित लवाद यांना सादर करण्यात आलेला आहे. सदर अहवालामध्ये महाराष्ट्र प्रदूषण मंडळाने या उद्योगास दिलेल्या संमतीपत्रातील त्रुटीच्या अनुषंगाने व उद्योगास दिलेल्याा निर्देशातील त्रुटींच्या अनुषंगाने पर्यावरण नुकसान भरपाई (Environmental Compernisation) रु. १,६०,८०,०००/- भरणेबाबत या अहवालामध्ये नमूद केलेले आहे. मा. राष्ट्रीय हरित लवाद यांनी दि. १७.०४.२०२५ रोजी जिंदाल स्टील वर्क्स लिमिटेड या कंपनीला रूपये १,६०,८०,०००/- ही रक्कम त्यांनी १ वर्षाच्या आत सिएसआर म्हणून खर्च करण्यात यावी असे आदेश पारित केले आहे. तद्नूसार, मे. जे. एस. डब्ल्यु. स्टील लि. यांनी दि. ०९.०५.२०२५ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व जिल्हाधिकारी रायगड यांना डोलवी गावाजवळील ११ ग्रामपंयाचतींचे नागरी घनकचरा व्यवस्थापन शास्त्रोक्तरित्या करण्यासाठी रूपये ७.३ कोटी इतक्या खर्चाचा प्रकल्प सिएसआर उपक्रम अंतर्गत प्रस्तावित केला असल्याचे कळविले आहे.

*******************

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग लक्षवेधी सूचना क्रमांक - १५२३

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन

सर्वश्री. हेमंत भुजंगराव ओगले, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १५२३ पुढीलप्रमाणे आहे-

"टिळकनगर ता. श्रीरामपूर जि. अहिल्यानगर येथे टिळकनगर इंडस्ट्रीज या नावाने मद्य बनविणारी कंपनी अनेक वर्षांपासून असणे, सदर कंपनी सुरू झाल्यापासून या कंपनीतून बाहेर पडणारे दूषित सांडपाणी परिसरातील शेतीमध्ये गेल्यामुळे शेती नापीक होणे तसेच विहिरी प्रदूषित होऊन त्यातील प्रदूषित पाणी प्यायल्याने अनेक जनावरे मृत्युमुखी पडणे, परिणामी शेतकरी उध्वस्त होणे तसेच मानवी आरोग्यास धोका असणे, येथील नागरिकांना सतत आजारी पडत असल्यामुळे औषध उपचारांचा वाढलेला खर्च करावा लागणे आणि त्यांच्या उपजीविकेचा गंभीर प्रश्न निर्माण होणे, त्यामुळे या कंपनीकडे बाधित शेतकरी आणि नागरिक यांनी वेळोवेळी तक्रारी केलेल्या असणे, कंपनी व्यवस्थापनाने येथील बाधित शेतकरी आणि नागरिक यांना कंपनीत रोजगाराचे आश्वासन दिलेले असणे परंतु त्याचे पालन न करणे, यामुळे येथील बाधित शेतकरी व नागरिकांनी कंपनी विरोधात उपोषण आंदोलने,मोर्चे काढून या कंपनी विरोधात कारवाईची मागणी करणे, परंतु शासन करीत असलेले दुर्लक्ष परिणामी येथील जनतेमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण,याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल) यांचे निवेदन

श्रीरामपुर तालुक्यातील टिळकनगर येथे मे. टिळकनगर इंडस्ट्रीज या नावाने सन- १९३३ पासुन मळी आधारीत आसवणी प्रकल्प तसेच सन २०१२ पासुन धान्य आधारीत आसवणी प्रकल्प व मद्य बाटली बंद करण्याचा प्रकल्प हे उद्योग कार्यान्वित आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर उद्योगाःस अटी व शर्तींच्या अधिन राहुन संमतीपत्र प्रदान करण्यात आले असून त्याची वैधता ३१.०८.२०२६ पर्यत आहे.

मळी आधारीत आसवणी प्रकल्प हा एप्रिल - २०२३ पासुन बंद आहे व धान्य आधारीत आसवणी प्रकल्प हा सन- २०१२ रोजी उभारला असुन सदरील प्रकल्प एप्रिल २०१२ पासुन बंद आहे. सद्य:स्थितीत मद्य बाटली बंद प्रकल्प चालु असुन सदर प्रकल्पापासुन निर्माण होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सदर उद्योगाने प्रथम, द्वितीय व तृतीय स्वरुपाची सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा उभारण्यात आली आहे. वरील तीनही प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यासाठी उद्योगाने शून्य निकसन पद्धत अवलंबलेली असून सदरील उद्योगामधुन निर्माण होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन प्रक्रियायुक्त सांडपाणी पुनर्वापर करण्यात येत आहे.

मे. टिळकनगर इंडस्ट्रीज या उद्योगामधून निर्माण होणा-या सांडपाण्यामुळे आसपासच्या परिसरातील शेतकरी व नागरिकांच्या होणा-या नुकसानीबाबत उद्योगाच्या परिसरातील शेतक-यांनी

मा. जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांच्या कार्यालयासमोर दि. १९.०८.२०२४ रोजी उपोषण केले होते. सदरील उपोषणाच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांनी दि. २३.०८.२०२४ रोजीच्या आदेशान्वये सदर प्रकरणाबाबत चौकशी करून उचित कार्यवाही करणेकामी समिती स्थापन करण्यात आली होती. तथापि, उपोषणकर्ते शेतक-यांनी उपोषण विनाशर्त मागे घेत असल्याबाबत व सदर गठीत समितीचा आदेश मागे घेण्याबाबतची विनंती दि. ०२.०९.२०२४ रोजीच्या निवेदनान्वये मा. जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांना करण्यात आली होती.

तालुका आरोग्य अधिकारी, श्रीरामपुर यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार सदर उद्योगाच्या आजुबाजुच्या परिसरातील भुजलामधील पाणी पिण्यास अयोग्य असून त्याभागातील लोकांसाठी टँकरने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात आहे. तसेच, पिण्याच्या पाण्यामुळे विशेष काही आजार झाल्याचे निर्देशनास आले नसल्याचे तालुका आरोग्य अधिकारी, श्रीरामपुर यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

तसेच, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अहिल्यानगर यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार सदर उद्योगाच्या आजुबाजुच्या परिसरातील जमिन नापिक झाली नसून पिक लागवड करण्यास योग्य असल्याचे आढळून आले आहे.

सदर उद्योगापासुन निर्माण होणा-या सांडपाण्यामुळे आसपासच्या परिसरातील पर्यावरणावर झालेल्या परिणाम व त्यानुषंगाने करवयाच्या उपाययोजनांबाबत परिक्षण करण्याकरिता महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत सदर उद्योगास अंतरिम निर्देश देण्यात आले होते. त्यानुषंगाने सदर उद्योगाने राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था, नागपूर (NEERI) या संस्थेस परिक्षणाचे काम दिले असून सदर संस्थेमार्फत परिक्षणाचे काम सुरु आहे.

*******

लक्षवेधी सुचना क्र.१६३१

महाराष्ट्र विधानसभा सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन
श्री.सुनिल प्रभु, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्रमांक १६३१ पुढीलप्रमाणे आहे.

" जि.रायगड ता.अलिबाग तालुक्यापासून वडखळ तालुक्यापर्यंतच्या डोलवे, खारमाचेला, वावे, जुई बापूजी, या पाच गावादरम्यान असलेल्या जेएसडब्ल्यू स्टील उत्पादन कंपनीने कांदळवन नष्ट करुन व त्यावर भराव टाकून, मोठ्या प्रमाणात अनधिकृत रस्ते व बांधकाम करुन सीआरझेड कायदा व पर्यावरण कायद्याचे उल्लंघन केल्याचा धक्कादायक प्रकार दि.३०.०६.२०२५ रोजी निदर्शनास येणे, सदरहू कंपनी व्यवस्थापनाने गेल्या अनेक वर्षापासून सुरु असलेल्या दोन कोक ओव्हन प्रकल्पापैकी एक प्रकल्प कोणतीही परवानगी न घेता बेकायदेशीर रित्या राबवून त्यातून उत्पादन करण्यात येणे, धर्मतर खाडी परिसरात सीआरझेडची हद्द ओलांडून प्रतिबंधित क्षेत्रात कांदळवन नष्ट करुन प्रकल्पाची कामे राबविण्यात येणे, कंपनीतील स्टील उत्पादन प्रक्रियेत सुरु असलेले बॉयलरचे प्रक्रीयेत मोठया प्रमाणात बॉयलर अधिनियमाचे उल्लंघन करण्यात येणे, बॉयलर तपासणी अहवालानुसार हवेतील प्रदुषण निर्देशांक २०१७ मध्ये जास्त प्रमाणात असणे, सदरहू कंपनीने पर्यावरण, सीआरझेड आणि वनकायद्याचे सर्रास उल्लंघन करुन अनधिकृत बांधकामे करण्यात आल्याने सदरहू प्रकरणी शासनाने दोषीविरुध्द तत्काळ कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही "

---

## मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल) यांचे निवेदन

मे. जे. एस. डब्ल्यु. स्टील लि. हा उद्योग डोलवी, ता. पेण, जि. रायगड येथे आहे. या उद्योगामध्ये मुख्यतः लोखंडाचे (Integrated Steel Plant) उत्पादन करण्यात येते. सदर उद्योग सन १९९४ च्या दरम्यान मे. इस्पात इंडस्ट्रीज लि. या नावाने अस्तित्वात होता, तद्नंतर, मे. जे. एस. डब्ल्यु. स्टील लि. या उद्योगाने २०१२ मध्ये अधिग्रहण केले आहे. या उद्योगामध्ये लोखंडाचे उत्पादन करण्यासाठी पहिल्या टप्यामध्ये (३ एमटीपीए क्षमता प्रकल्प) क्षमतेचा होता. तद्नंतर, दुस-या टप्प्यामध्ये (विस्तारीकरण ३ ते ४ एमटीपीए क्षमता प्रकल्प) क्षमतेचे विस्तारीकरण करण्यात आले व तिस-या टप्प्यामध्ये (विस्तारीकरण ५ ते १० एमटीपीए क्षमता प्रकल्प) प्रकल्पाचे विस्तारीकरण करण्यात आले.

मौजे खारमाचेला ता.पेण येथील स.नं. ९४ पैकी ३.३७६६० हे. महाराष्ट्र शासन राजपत्र दि २०.०८.२०१५ अन्वये भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ४ अन्वये राखीव वन म्हणून घोषित करणेसाठी अधिसुचित झालेले आहे. तदनंतर महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२०.०१.२०२१ अन्वये भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम २० अन्वये राखीव वन म्हणून घोषित झालेले आहे. वन विभागाच्या ताब्यातील मौजे खारमाचेला गट नंबर ९४/२ मध्ये जे. एस. डब्लू. कंपनीने भराव करुन

केलेली कांदळवन कत्तल व अतिक्रमण करून लोखंडी पुलाचे व सुरक्षा चौकीचे बांधकाम केल्याबदल वडखळ वनपरिक्षेत्राकडील गडव राऊंड गुन्हा क्र.१ दि. १५.०२ २०२१ नोंद करण्यात आलेला आहे. तसेच या प्रकरणी दंडात्मक कारवाई व शिक्षेकरीता वन परिक्षेत्र अधिकारी, वडखळ यांनी मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेण यांचे न्यायालयीन समरी केस क्रमांक १३३/२०२२ दाखल केली आहे. सदर प्रकरणी सुनावणीची कार्यवाही सुरु आहे. तसेच मौजे जुई बापुजी येथील अधिसुचीत झालेले क्षेत्राची मोजणी दिनांक १०.०१.२०२० व दिनांक १३.०१.२०२० रोजी करण्यात आलेली होती. सदर प्रकरणी अधिसुचीत झालेल्या क्षेत्रावर बांधकाम व इतर वनेत्तर कामे झाल्याचे निदर्शनास आल्याने प्रस्तुत प्रकरणी अलिबाग वन परिक्षेत्राच्या तिनवीरा परिमंडळाकडील वन गुन्हा प्रकरण क्र. रॉड गुन्हा नं. ई/०२/२०१९-२०२० अन्वये नोंदविलेला आहे. वन विभागाच्या ताब्यात असलेले कांदळवन क्षेत्रात जेएसडब्ल्यू कंपनीने केलेल्या अनियमितते बदल वन विभागाकडून गुन्हा दाखल करुन कार्यवाही करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांमार्फत करण्यात आलेल्या पाहणी दरम्यान आढळलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने सन २०२१-२०२२ दरम्यान दि.०४.०८.२०२१, ०१.०२.२०२२, ०२.११.२०२२ व १८.११.२०२२ रोजी या उद्योगास "कारणे दाखवा "नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

मे.जे.एस.डब्ल्यु.स्टील लि. या कंपनीने सदर उद्योगांसाठी वने , पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून दि.२१.११.२०१२, दि.२५.०८.२०१५. दि.०१.०२.२०१८ व दि.२२.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये पर्यावरणीय अनुमती घेतलेली असून, ज्यामध्ये ४.५ दशलक्ष टन प्रति वर्ष इतक्या क्षमतेचे कोक ओव्हन देखील अंतर्भुत आहे. तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने सदर प्रकल्पांना जल (प्रतिबंध व प्रदुषण नियंत्रण) कायदा १९७४ अंतर्गत हवा (प्रतिबंध व प्रदुषण नियंत्रण) कायदा १९८१ व घातक घनकचरा व इतर अधिनियम सुधारित २०१६ अंतर्गत आवश्यक त्या अटी व शर्ती घालून संमतीपत्र प्रदान केलेले आहे.

सदर उद्योगाने दोन कोक ओव्हन प्रकल्पांसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे विहित संमतीपत्र प्राप्त केलेले आहे.

१. मे. जे. एस. डब्ल्यु. स्टील लि. (कोक ओव्हन प्लान्ट क्र. २) सर्वे क्र. ९१ ते ११३, डोलवी यांनी संमतीपत्र (नुतनीकरण) प्राप्त केले असून त्याची वैधता दि.३१.१२.२०२७ पर्यंत आहे.
२. मे. अंबा रिव्हर कोक लि. (कोक ओव्हन प्लान्ट), डोलवी यांनी संमतीपत्र (नुतनीकरण) प्राप्त केले असून त्याची वैधता दि. ३१.०५.२०२९ पर्यंत आहे.

बाष्पके संचालनालय यांच्या अहवालानुसार सदर स्टील उत्पादन कंपनीत एकूण २६ बाष्पके व ६ मितोपयोजके कार्यरत असुन, बाष्पके अधिनियम २०२५ मधील तरतुदींनुसार त्यांचे सक्षम अधिका-यांद्वारे वार्षिक निरीक्षण करून त्या बाष्पकास/मितोपयोजकास वार्षिक/द्विवार्षिक मुदतीची प्रमाणपत्र ऑनलाईन प्रणालीद्वारे देण्यात आली आहेत. सदर बाष्पके हे प्रमाणित बाष्पक प्रचालन

अभियंता व बाष्पक परिचरामार्फत चालविण्यात येतात. सबब सदरील स्टील उत्पादन कंपनीमध्ये बाष्पके अधिनियम २०२५ चे उल्लंघन झालेले नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे सदर उद्योगाने बसवलेल्या प्रदूषण नियंत्रण यंत्रणेची वेळोवेळी पर्यावरण दृष्टिकोनातून पाहणी केली जाते. तसेच पाहणीच्या वेळी उदयोग परिसरातील हवेची व पाण्याची गुणवत्ता तपासण्यात येते. पाहणी दरम्यान त्रुटी आढळल्यास उद्योगावर पर्यावरण कायद्यांतर्गत जल (प्र. व प्र. नि.) कायदा, १९७४ व हवा (प्र. व प्र. नि.) कायदा, १९८१ मधील तरतुदीनुसार उदयोगावर कारवाई करण्यात येते.

सन २०१७ या कालावधीत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने हवा प्रदूषणाच्या अनुषंगाने सदरील उद्योगास जल (प्र. व प्र.नि.) कायदा, १९७४ व हवा (प्र. व प्र. नि.) कायदा, १९८१ अंतर्गत दि. २९.०८.२०१७ रोजी प्रस्तावित निर्देश व दि. १६.१०.२०१७ रोजी अंतरिम निर्देश बजावले आहेत.

कांदळवन क्षेत्रात भराव केल्याने वने, महसूल विभागाने तसेच हवा प्रदूषणाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर उद्योगावर कारवाई केलेली आहे

---

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग. लक्षवेधी सूचना क्र.१६९०

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. नरेंद्र मेहता, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र. १६९० पुढीलप्रमाणे आहे:-

"मीराभाईंदर महापालिकेतील मौ. घोडबंदर येथे हिटकॉन इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा.लि., एम. के. इन्फ्रा आर.सी.सी. प्लांट, सोनम बिल्डर्स, जिवी अडव्हॉन्स टेकनीकल लि.,ग्रेस सिमेंट प्रा.लि., राज ट्रान्सिझट इन्फ्रा प्रा.लि., सफॉम प्लांट प्रा.लि. आर.एम.सी. (RMC) प्लांट सुरू असणे, तर मौजे पेणकरपाडा येथे मे.कल्पतरू या विकासका मार्फत सुरू करणार असणे, सदरचे RMC प्लांट मुख्यत्वे रहीवास क्षेत्रात असुन यातील काही प्लांट CRZ अंतर्गत तर काही प्लांट इकोसेंसेटीव झोन अंतर्गत चालवित असणे, या प्लांटमुळे परिसरातील ग्रामस्थांना श्वसनाचे आजाराने ग्रासले असणे, तसेच येथील पर्यावरणाला देखील धोका निर्माण होऊन संपूर्ण गाव व आसपासचा परिसर प्लांटमधुन निघणाऱ्या सिमेंट धुळीकणाने आच्छादले असणे, यामुळे पर्यावरण व नागरिकांचे जीवन विस्कळीत होत असणे, तसेच महापालिका क्षेत्रात मोठया प्रमाणात पर्यावरण विभागाची परवानगी न घेता विकासाची काम होत असणे, यामध्ये प्रामुख्याने २० हजार चौ. मी. पेक्षा जास्त क्षेत्राचे बांधकाम करायचे असल्यास पर्यावरण विभागाची परवानगी घेणे बंधनकारक असणे, दोन्ही प्रकरणी संबधित विभागाकडे लेखी तक्रार करून देखील अद्यापही कोणतीच कारवाई न करण्यात येणे, यामुळे स्थानिक पातळीवर व पर्यावरण प्रेमींमध्ये मोठया प्रमाणावर असंतोषाची भावना निर्माण होणे याकरता शासनाने आर.एम.सी. प्लांट वर व पर्यावरण विभागाची ना हरकत घेता झालेल्या व होत असलेल्या बांधकाम वर तात्काळ कारवाई करून त्यांचेवर गुन्हा दाखल करुन प्लांट बंद करण्याबाबत शासनाने करावयाची कारवाई."

.................................................................................................................................

**मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग) यांचे निवेदन.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मे. हिरकॉन इन्फ्रा, १४/४, घोडबंदर गाव, काशिमिरा, जि. ठाणे, मे. एम.के. इन्फ्रा आर.एम.सी., सर्वे नं. १४, घोडबंदर गाव, जि. ठाणे, मे. सोनम बिल्डींग सोल्युशन एलएलपी, सर्वे नं. ८/९ डी, घोडबंदर गाव, जि. ठाणे, मे. जे व्ही आय अॅडव्हान्स टेक्निकल एलएलपी, सर्वे नं.८, घोडबंदर गाव, जि. ठाणे, मे. मे. ग्रेस सिमेंट प्रा.लि., सर्वे नं. ६/३, घोडबंदर गाव, जि. ठाणे, मे. राज ट्रान्सिट इन्फ्रा प्रा.लि., शेड नु. ३२, डी.एस. पटेल कंपाऊंड, मिरा रोड, जि. ठाणे असे एकूण ७ आर.एम.सी. प्लांट कार्यरत आहेत. तसेच, मे. एक्स्रस्माईल प्रॉपर्टीज प्रा.लि., सर्वे नं. ७९, पेनकर पाडा, मिरा रोड, ठाणे यांना कॅप्टीव्ह आर.एम.सी. प्लांट उभारणी करीता संमतीपत्र दि.१०/१२/२०२४ रोजी प्रदान करण्यात आले. मौजे पेणकरपाडा येथे मे. कल्पतरु या विकासामार्फत प्रस्तावित RMC उद्योगाला कॅप्टीव्ह प्लांटकरीता मिरा भाईंदर महानगरपालिकेने प्रदान केलेल्या ना हरकत दाखल्याच्या आधारे उद्योग उभारणीचे संमतीपत्र प्रदान करण्यात आले असून सद्यस्थितीत उद्योग उभारणीचे कामास सुरुवात झालेली नाही.

उपरोक्त नमुद ७ कार्यरत आर.एम.सी. उद्योगांच्या प्रत्यक्ष पाहणीदरम्यान सदर आर.एम.सी. उद्योगांनी हवा प्रदूषण नियंत्रण व्यवस्था जसे बॉक्स टाईप एनक्लाजर्स (Process area) पाणी फवारणी व्यवस्था, डस्ट कलेक्टर व्यवस्था, टायर वॉशिंग व्यवस्था, सेडीमेंटेशन टँक व बॅरीकेडींग व्यवस्था बसविलेली दिसून आले. सदर आर.एम.सी. उद्योगांनी नवीन आर.एम.सी. धोरण दि.२७/११/२०२४ नुसार रु.२५ लाखाची बँक हमी तसेच निरंतर हवा प्रदूषण मापक यंत्रणा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वेब साईटवर जोडली नसल्याने व २ आर.एम.सी. उद्योगांनी बॅरीकेडींग व्यवस्था पूर्ण न केल्यामुळे व १ आर.एम.सी. प्लांट ने बॉक्स टाईप एनक्लोजर परिपूर्ण न केल्यामुळे उपरोक्त ७ आर.एम.सी. प्लांट कारखाना का बंद करण्यात येऊ नये, याबाबत प्रस्तावित आदेश दि.०२/०७/२०२५ रोजी बजाविण्यात आले आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर आर.एम.सी. उद्योगांना उद्योग उभारणी व उद्योग चालविण्याकरीता संमतीपत्र प्रदान केले आहे. तसेच सदर आर.एम.सी. उद्योगांना मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात आलेले आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी, ठाणे यांचेकडून प्राप्त अहवालानुसार आर.एम.सी. प्लांट परिसरातील नागरिकांना श्वसनाचे आजार तसेच विशिष्ट प्रकारच्या रुग्णांबाबतच्या तक्रारी आरोग्य विभागास प्राप्त झालेल्या नाहीत.

उप वनसंरक्षक ठाणे वनविभाग यांचेकडून प्राप्त अहवालानुसार मे. हिरकॉन इन्फ्रा प्रोजेक्टस व मे. एम.के. इन्फ्रा आर.एम.सी., सर्वे नं. १४, घोडबंदर गाव हे उद्योग संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्रामध्ये येतात. तर उर्वरित मे. सोनम बिल्डींग सोल्युशन एलएलपी, मे. जे की आय ॲडव्हान्स टेक्निकल एलएलपी, मे. ग्रेस सिमेंट प्रा.लि., मे. राज ट्रान्सिट इन्फ्रा प्रा.लि., मे. एव्हर स्माईल प्रॉपर्टीज प्रा.लि. हे आरएमसी प्लांट संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्राबाहेर येतात.

विभागीय वन अधिकारी, कांदळ वन विभाग यांचेकडून प्राप्त अहवालानुसार भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ४ अन्वये शासन अधिसूचना दि.४ जानेवारी, २०२१ अन्वये मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील 'राखीव वन' कांदळवन म्हणून घोषित करण्यात आले आहे. लक्षवेधीमध्ये नमूद सर्व आरएमसी प्लांट हे ५० मीटर बफ़र झोनच्या बाहेर आहेत. तसेच सदर आरएमसी प्लांट कोणतीही तक्रार कांदळवन विभागाकडे प्राप्त नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास २० हजार चौ.मी. पेक्षा जास्त बांधकाम क्षेत्र असलेल्या विकास प्रकल्पांनी पर्यावरण संमती न घेता केलेल्या बांधकामाबाबत तक्रार अप्राप्त आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडून प्राप्त अहवालानुसार २० हजार चौ.मी. पेक्षा जास्त बांधकाम क्षेत्र असल्यास पर्यावरण विभागाची मंजूरी घेणे हा विषय आरएमसी प्लांट संदर्भात नाही. तथापि, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व संजय गांधी राष्ट्रीय उद्यान पर्यावरण संवेदन क्षेत्र सनियंत्रण समिती यांच्या ना-हरकत दाखल्याच्या अनुषंगाने, महानगरपालिकेमार्फ़त विहित अटीशर्तीच्या अधीन राहून कार्यक्षेत्रात एकूण १२ आरएमसी प्लांट उभारणेस परवानगी देण्यात आली आहे. तसेच, मे.कल्पतरु या विकासकास दि.०४/०२/२०२५ रोजी परवानगी देण्यात आली असून सद्यस्थितीत सदर प्लांट उभारलेला नाही. महानगरपालिकेने परवानगी दिलेले आरएमसी प्लांटकरिता १०० मी. अंतर संरक्षित क्षेत्र(बफ़र झोन) राखण्यात आले आहे.आरएमसी प्लांट परिसरातील नागरीकांना त्रास होणार नाही याकरिता संबंधित प्लांट धारकांकडून हमीपत्र घेण्यात येते. सदर आरएमसी प्लांटवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व महानगरपालिकेमार्फ़त वेळेवेळी आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने कारवाई केली जाते.

***************

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे व्दितीय अधिवेशन

श्री. सिध्दार्थ शिरोळे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १९४३ पुढीलप्रमाणे आहे :-

" पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोंढवा-कमेला येथे कत्तलखाना असणे, सदर कत्तलखान्यातील जनावरांची अवैधरित्या होणारी कत्तल तसेच जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) अधिनियम, १९७४ व वायु (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) अधिनियम, १९८१ चे तरतुदींचे होणारे उल्लंघन याबाबतची तक्रार नॅन्सी गार्डन सहकारी गृहनिर्माण सोसायटी, पुणे यांनी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ कार्यालयाकडे केली असणे, सदर तक्रारींच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ कार्यालयाने चौकशी केली असणे, चौकशीअंती कत्तलखान्यामध्ये प्राण्यांच्या मांसाशी निगडीत घन व द्रव कचऱ्याचे प्रचलित अधिनियम, नियम तसेच निर्देश यानुसार योग्यरित्या व्यवस्थापन करुन, विल्हेवाट लावली जात नसल्याचे स्पष्ट झाले असणे, त्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पुणे महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी (कत्तलखाना) यांना दि. ८-५-२०२५ रोजीचे पत्राद्वारे ९६ तासात कत्तलखाना बंद करण्याबाबतचे निर्देश दिले असणे, तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे यांनी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, रास्ता पेठ विभाग, पुणे व पुणे महानगरपालिकेतील पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांना ९६ तासात कत्तलखान्याच्या विज पुरवठा व पाणी पुरवठा बंद करण्याबाबत निर्देश दिलेले असणे, तसेच राज्यात अनेक ठिकाणी अवैध कत्तलखाने असणे, अशात अवैध कत्तलखान्यावर कारवाईबाबत निश्चित मार्गदर्शक सुचना निर्गमित करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाची कालबध्द भुमिका व करावयाची कार्यवाही. . "

---

### मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल ) यांनी करावयाचे निवेदन

प्रादेशिक कार्यालय पुणे अंतर्गत असणाऱ्या उप प्रादेशिक कार्यालय पुणे-१ या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये पुणे शहर, दौंड, बारामती, इंदापूर, जेजुरी, सासवड, भोर इत्यादी तालुक्यांचा समावेश होतो. सदर कार्यालयाअंतर्गत ०२ कत्तलखाने समाविष्ट असून त्यापैकी पुणे शहरात ०१ व दौंड तालुक्यामध्ये ०१ कत्तलखाना आहे.

पुणे शहरामध्ये कोंढवा परिसरामध्ये कार्यरत असलेला कत्तलखाना हा पूणे महानगरपालिकेच्या अंतर्गत असून सदरील कत्तलखान्याकरीता महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे संमतीपत्र घेतले असून त्याची वैधता दिनांक ३१.०३.२०२७ पर्यंत आहे. सदर कत्तलखान्याची क्षमता १०० मोठी व २४० लहान जनावरे कापण्याची आहे. मोठी जनावरे ही यंत्राच्या सहाय्याने कापली जातात. त्यामुळे सदरील कत्तलखान्यामधून २६.५ घन मीटर प्रती दिन इतके सांडपाणी निर्माण होते. निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरीता प्राथमिक, व्दितीय व तृतीय स्वरुपाची सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा बसविलेली आहे.

सदरील सांडपाणी प्रक्रिया ही महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत वेळोवेळी करण्यात आलेल्या पहाणी दरम्यान कार्यरत नसल्याचे आढळून आलेले आहे. तसेच कत्तलखान्याचे अप्रक्रियाकृत सांडपाणी वाहिन्यांमध्ये जात असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

सदरील कत्तलखाना हा रहिवाशी क्षेत्रात असून परिसरातील घरगुती वसाहतींच्या पाणी प्रदूषण व दुर्गंधी बाबतच्या तक्रारी वारंवार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास प्राप्त होत असतात. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास दिनांक २७.०२.२०२५ रोजी नॅन्सी गार्डन को. हौ. सोसायटी, बोराडे नगर, वानवडी, पुणे येथील नागरीकांनी सदरील कत्तलखान्यामुळे होणाऱ्या प्रदूषणाबाबतची तक्रार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास

केलेली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २८.०२.२०२५ रोजी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांमार्फत कत्तलखान्याची पाहणी करण्यात आलेली होती.

पाहणी दरम्यान आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने तसेच संकलित करण्यात आलेले सांडपाणी नमुने हे संमतीपत्र घालून दिलेल्या मानकांच्या प्रमाणापेक्षा अधिक असल्याचे आढळून आल्या कारणास्तव महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने सदरील कत्तलखान्यास दिनांक २८.०२.२०२५ रोजी प्रस्तावित निर्देश बजावले होते. तदनंतर सदरील कत्तलखान्याची दिनांक ०२.०४.२०२५ रोजी वैयक्तिक सुनावणी घेऊन कत्तलखाना बंद करण्याबाबतचे आदेश दिनांक ०८.०५.२०२५ रोजी देण्यात आले आहेत.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने कत्तलखाना बंद करण्याबाबतच्या बजावण्यात आलेल्या आदेशानंतर ही सदरील कत्तलखाना दिनांक २४.०६.२०२५ रोजी करण्यात आलेल्या पहाणीमध्ये सुरु असल्याचे आढळल्या कारणास्तव महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने सदरील कत्तलखान्यास दिनांक ३०.०६.२०२५ रोजी न्यायालयीन खटला का दाखल करण्यात येऊ नये (Prosecution Notice) या बाबत नोटीस बजावलेली आहे. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यामार्फत दिनांक ०८.०७.२०२५ रोजी करण्यात आलेल्या पहाणीदरम्यान सदरहू कत्तलखान्याच वीज व पाणीपुरवठा खंडीत केल्याचे निदर्शनास आलेले असून विविध विभाग सील केलेले असून कत्तलखाना पूर्णपणे बंद असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

मुख्य पशुवैद्यकिय अधिकारी, पुणे महानगरपालिका यांचेमार्फत सदर लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने दिनांक ०७.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अहवाल प्राप्त झालेला आहे. सदरील अहवालामध्ये, कत्तलखान्यामधील उपकरणे सुमारे १० ते १५ वर्ष जुनी झाली असल्याने दैनंदिन कटाई संख्येमध्ये समाविष्ट गावे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका मुळे झालेली वाढ व त्यानंतर अतिरिक्त निर्माण होणारे सांडपाणी व रक्त पर्यावरण पूरक पद्धतीने प्रकिया करणेस कार्यरत क्षमता अपुरी पडत आहे हि वस्तुस्थिती आहे. त्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या मार्गदर्शनानुसार सद्यस्थितीत कत्तलखान्यातील जनावरांची कटाई तात्पुरता स्वरूपात थांबविण्यात आली असून विविध उपाय योजना करण्यात येत आहेत.

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक २३.१०.२०१२ रोजी केंद्र शासनाच्या निर्देशांच्या अनुषंगाने कत्तलखान्यांचे संचलन करण्याबाबत प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली राज्य स्तरीय समितीची स्थापना केलेली असून सदर समितीच्या कार्यकक्षेमध्ये अनोंदणीकृत कत्तलखाने शोधणे व जिल्हाधिकारी यांच्या तसेच अन्य यंत्रणांच्या मदतीने प्राण्यांची अनधिकृत कत्तल रोखणे ही बाब समाविष्ट आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत कत्तलखान्यास जल (प्रदूषण नियंत्रण व प्रतिबंध) कायदा १९७४ व हवा (प्रदूषण नियंत्रण व प्रतिबंध) कायदा १९८१ अंतर्गत संमतीपत्र प्रदान करण्यात येते. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने राज्यामध्ये एकूण ३२ कत्तलखाने असून सर्व कत्तलखानेधारकांनी आवश्यक ती प्रदूषण नियंत्रण यंत्रणा उभारलेली असून सदर यंत्रणा कार्यरत आहे. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून त्याची वेळोवेळी तपासणी केली जाते. तसेच, अनधिकृत कत्तलखाना आढळुन आल्यास त्यावर नियमाप्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येते.

*****

लक्षवेधी सूचना क्र.११०

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन**

श्री काशिनाथ महादु दाते सर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यात दुग्धोत्पादन वाढ होण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पशुखाद्यात भेसळ केली जात असुन त्यामध्ये युरीया, अमोनिया, मेलामाईन, भेसळयुक्त मिनरल मिक्सर, साखरेचे ऊर्जायुक्त घटक, सिंथेटिक रंग, पोल्ट्रीचा कचरा इत्यादी विषारी पदार्थांची भेसळ केली जात असल्याचे दिनांक २७ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास उघडकीस येणे,भेसळयुक्त खाद्यामुळे दुधाळ गाईच्या शरीरातील यकृत, वृक्क (किडनी) व पचनसंस्थेवर ताण येणे, यामुळे गायीच्या दुधाचे प्रमाण तर कमी होतेच, पण प्रजनन क्षमतेवरही दुष्परिणाम होणे, गायीमध्ये वेळेआधी रोगप्रतिकार शक्ती खालावून त्या वारंवार आजारी पडू लागणे, आजारी गायींना मोठ्या प्रमाणात अँन्टी बायोटिक्स दिल्याने अँन्टीबायोटिक्स व अफलाटॉक्सिन्स त्याचबरोबर इतर विषारी घटक दुधामध्ये येणे, भेसळयुक्त खाद्य खाल्लेल्या गायींच्या दुधातून विषारी घटक थेट माणसांच्या शरीरात प्रवेश करणे, दुषित दुधाचे सेवन केल्यास अॅलर्जी, अतिसार, त्वचेचे विकार, किडनी विकार, कर्करोगासारख्या गंभीर आजारांचा धोका वाढणे, पशुखाद्य मानके निश्चित केली असली तरी त्यांची अंमलबजावणी होत नसणे, पशुखाद्याच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवणारी प्रभावी यंत्रणा नसल्याचे उघडकीस येणे, त्यामुळे पशुखाद्यातील भेसळीमुळे जनावरांना होणारे विविध आजार, परिणामी शेतकऱ्यांचे होणारे नुकसान, त्यास्तव पशुखाद्यातील भेसळ रोखण्यासाठी शासनाकडून करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

**मा. मंत्री (पशुसंवर्धन) यांचे निवेदन**

केंद्र शासनाच्या फुड सेफ्टी अॅन्ड स्टँडर्स ऑफ इंडिया या संस्थेने आय एस आय (बीआयएस प्रमाणका प्रमाणे) पशुखाद्याचे उत्पादन व विक्री करणे दि. १७.१२.२०१९ व दि २७.०१.२०२० च्या पत्रान्वये बंधनकारक केले आहे. राज्यातील पशुधनास चांगल्या प्रतीचे पशुखाद्य उपलब्ध व्हावे, यासाठी राज्य शासनाने दि. १४.०७.२०२३ च्या शासन निर्णयान्वये उत्पादित होणाऱ्या सर्वप्रकारच्या पशुखाद्यांचे यादृच्छिकपणे (रँडमली) नमुने घेवून, सदर पशुखाद्य नमुन्यांची शासन मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडून नियमितपणे तपासणी करण्याचे निर्देश पशुसंवर्धन विभागातील यंत्रणेस दिले आहे.

राज्यातील पशुखाद्य उत्पादक संस्थांच्या विविध प्रकारच्या पशुखाद्याच्या उत्पादनाचे सन २०२३-२४ मध्ये ४१७ तर सन २०२४-२५ मध्ये ३५० नमुने पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घेण्यात येवून, विभागाच्या गोखलेनगर येथील पशुखाद्य विश्लेषण प्रयोगशाळेत सदर नमुन्यांची तपासणी करण्यात आली आहे. पशुखाद्य विश्लेषण प्रयोगशाळा या संस्थेच्या विश्लेषण अहवालानुसार कोणताही पशुखाद्य नमुना कमी प्रतीचा अथवा निकृष्ट आढळून आलेला नाही.

पशुखाद्याच्या उत्पादनासाठी व विक्रीसाठी भारतीय मानक संस्थेचा (बीआयएस) परवाना घेणे आवश्यक आहे. उत्पादन / विक्री करण्यात येणारे पशुखाद्य हे बी.आय.एस. मानकाप्रमाणे नसल्यास त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याचे अधिकार केंद्र शासनाच्या फुड सेफ्टी अॅन्ड स्टँडर्स ऑफ इंडिया या संस्थेस आहे.

भेसळयुक्त अथवा कमी दर्जाच्या पशुखाद्यामुळे पशुधनाच्या उत्पादन व प्रजनन क्षमतेवर विपरित परिणाम होतो तसेच, त्याव्दारे मानवी आरोग्यावरही विपरित परिणाम होतो ही बाब विचारात घेऊन तपासणीअंती मानकाप्रमाणे पशुखाद्य उत्पादन न करणाऱ्या व विना परवाना पशुखाद्य उत्पादकांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यासाठी सक्षम प्राधिकरणास म्हणजे केंद्र शासनाच्या फुड सेफ्टी अॅन्ड स्टँडर्स ऑफ इंडिया या संस्थेस अहवाल सादर करण्याचे निर्देश राज्यशासनाने क्षेत्रिय अधिकाऱ्यांना दिले आहेत.

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे द्वितीय(पावसाळी) अधिवेशन

श्री.अनंत (बाळा) नर, वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

" जोगेश्वरी पूर्व विधानसभा क्षेत्रातील आरे दुग्धवसाहत येथे असंख्य झोपडीधारक रहात असून सदर झोपडीधारक मुलभूत सोयी-सुविधा विज, पाणी शौचालय आणि नागरी सुविधा मिळणे आवश्यक आहे. परंतू शासनाच्या नियमाप्रमाणे त्या सुविधा त्यांना मिळणे आवश्यक असतानाही त्या सुविधा त्यांना मिळत नसल्यामुळे वंचित असणे, आरे दुग्ध वसाहतीमधील हा संवेदनशिल भाग असून येथे बांधकामांना निर्बंध असल्यामुळे तेथील रहिवाश्यांची घरे दुरुस्ती करण्यासाठी देखील परवानगी देण्यात येत नसणे. त्यामुळे मुंबई सारख्या शहरामध्ये अत्यंत गलिच्छ जिवन जगण्याची त्यांच्यावर आलेली वेळ, त्यांच्या पुनर्वसना करीता पात्रतेचे निकष ठरविण्यासाठी व झोपडयांची संख्या निश्चित करण्यासाठी १९९५ पासून झोपडयांचे सर्वेक्षणही झालेले नसणे, याकडे शासनाचे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, परिणामी झोपडपटटीधारकांमध्ये पसरलेले असंतोषो व संतापाचे वातावरण, झोपडीधारकांना तात्काळ मुलभूत सोयी-सुविधा पुरविण्याबाबत व त्याचे पुनर्वसन करण्याबाबत शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

## श्री. अतुल सावे, मा. मंत्री (दुग्धव्यवसाय विकास) यांचे निवेदन

शासनामार्फत सन १९४९ साली गोरेगांव (पूर्व) मुंबई येथील एकूण ८ गावातील ३१६२.३२ एकर जमीन भूसंपादित करुन आरे दुग्ध वसाहतीची निर्मिती करण्यात आलेली आहे. मुंबई शहराला ताजे, स्वच्छ, सकस व रास्त दराने दूध मिळावे तसेच मुंबई शहरातील खाजगी मालकांचे तबेले स्थलांतरीत करणे या उद्देशाने शासनामार्फत आरे दुग्ध वसाहतीमध्ये विविध ३२ गटात तबेल्यांची शास्त्रोक्त पध्दतीने बांधणी करण्यात आलेली आहे.

आरे दुग्ध वसाहतीमध्ये सद्यस्थितीत दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या ताब्यात एकूण ११६५.१० एकर जमीन आहे. सदर जागेत शासकीय ३० तबेले, शासकीय निवासस्थाने, पॅरागवताचे प्लॉट, अंतर्गत रस्ते, ४ उद्याने, आरे तलाव, आरे दुग्धशाळा, मु.का.अ.आरे यांचे कार्यालय, न्यूझिलंड हॉस्टेल व दुग्धशाळा विज्ञान संस्था तसेच आदिवासी पाडे व इतर झोपडपट्टी आहे. सदर तबेल्यात एकूण ४९३ परवानेधारकांची १७९२२ जनावरे आहेत.

आरे दुग्ध वसाहतीत सन २००५ मध्ये केलेल्या सर्वेक्षणामध्ये वसाहतीमध्ये ४६ ठिकाणी १८० एकर जमिनीवर झोपडपट्टी वसलेली आहे तसेच २७ आदिवासी पाडे आहेत, असे निदर्शनास आले आहे. अतिक्रमीत झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याकरिता झोपडपट्टी धारकांचे सर्वेक्षण

करुन त्यांची पात्रता निश्चित करुन पूनर्वसनाचे काम करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या होत्या. यानुषंगाने उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) मालाड तथा सक्षम प्राधिकारी, मालाड यांनी दि.७.०५.२००५ च्या पत्रानुसार ६७२० झोपडीधारकांची पात्रता ठरविण्यासाठी आलेल्या अर्जापैकी एकूण सुमारे ४००० झोपडीधारकांची पुराव्याच्या आधारे पात्रता निश्चित केल्याचे दिसून येते. यानंतर सन २०१७ या वर्षी सर्वेक्षण करण्यात आले परंतू त्याचा अहवाल अप्राप्त असल्याने झोपडीधारकांना मुलभूत सुविधा देण्याकरिता पात्रता निश्चित करण्यात आलेली नाही. तसेच आरे दुग्ध वसाहतीतील झोपडीधारकांना वीज जोडणी, घर दुरस्ती, पाणी पुरवठा इत्यादी मुलभूत सुविधा देण्याकरिता कोणतेही धोरण अस्तित्त्वात नाही.

पर्यावरण, जलवायू व हवामान बदल विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी दि.०५/१२/२०१६ रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेनुसार आरे दुग्ध वसाहतीमधील संपूर्ण परिसर हा पर्यावरण संवेदनशील क्षेत्र (ESZ) म्हणून घोषित करण्यात आलेला आहे. सदर अधिसूचनेनुसार आरे दुग्ध वसाहतीच्या परिसरामध्ये पर्यावरण संवेदनशिल क्षेत्रात कोणतीही नवीन बांधकामे करण्यास मनाई आहे. सदर अधिसूचनेतील तरतूद क्र.४ नुसार, पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ (२९ ऑफ १९८६) नुसार पर्यावरण संवेदशिल क्षेत्रातील Prohibited Activities, Regulated Activities Promoted Activities मधील कामांची यादी नमुद केलेली आहे. तसेच सदर अधिसूचनेतील तरतूद क्र. ५ नुसार एकूण १३ सदस्यीय पर्यावरण संवेदनशिल क्षेत्र सनियंत्रण समिती गठीत करण्यात आलेली आहे. यामुळे झोपडी दुरुस्तीकरिता परवानगी दिली जात नाही.

आरे दुग्धवसाहतीचे मुंबई शहरातील स्थान व पर्यावरणीय व पर्यटन विषयक महत्व विचारात घेऊन सदर परिसराचा सर्वंकष विकास करण्याच्या दृष्टीने मास्टरप्लान तयार करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली असून, सदर सल्लागार संस्थेने आरे दुग्ध वसाहतीचे ड्रोनव्दारे सर्वेक्षण करुन येथील जागेचा पर्यावरण व पर्यटनाच्या दृष्टीने विकास करण्याकरिता प्राथमिक मास्टर प्लॅन तयार केलेला आहे. यावर अंतिम निर्णय घेण्याकरिता शासन निर्णय दि.२१.०४.२०२३ नुसार मा. मंत्री, दुग्धव्यवसाय विकास विभाग यांचे अध्यक्षतेखाली १८ सदस्यीय समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समिती आरे परिसराचा विकास आराखडा तयार करण्यासाठी नियुक्त करण्यात येणा-या सल्लागाराच्या अहवालावर अभ्यास / चर्चा करुन त्यात बदल सुधारणा सुचविणे, आरे दुग्ध वसाहतीचा परिसर अतिक्रमणमुक्त करुन सदर जागेचा वापर सार्वजनिक हितासाठी करण्याकरिता उपाययोजना सुचविणे, आरे वसाहतीतील रहिवाश्यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेव्दारे मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे (अतिक्रमण सोडून), आरे परिसर हा पर्यावरणदृष्ट्या संवेदनक्षम असल्याने त्यास बाधा न आणता आरे परिसराचा पर्यटन स्थळ म्हणून विकास करण्यासाठी मार्गदर्शन करणे इ. निर्णय घेणार आहे.

आरे दुग्धवसाहतीचा तयार करण्यात येणारा मास्टरप्लान व त्यानुसार उपरोक्त समितीद्वारे घेण्यात येणा-या निर्णयानुसार, आरे दुग्ध वसाहतीतील जागेचा पर्यावरण व पर्यटनाच्या दृष्टीने विकास करणे, आदिवासी तसेच झोपडीधारकांना मुलभूत सोयी-सुविधा पुरविणे व त्यांचे पूनर्वसन इत्यादी बाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

************************************

लक्षवेधी सूचना क्र. २०६३

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. श्याम खोडे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २०६३ पुढीलप्रमाणे आहे:-**

"वाशिम येथील दिव्यांग सक्षमीकरण संस्था मध्ये कार्यरत जिल्हा दिव्यांग सक्षमिकरण अधिकारी यांचे विरुध्द तक्रारी प्राप्त होणे, सदर अधिकारी यांची मूळ पदस्थापना अमरावती जिल्हा समाजकल्याण अधिकारी जिल्हा परिषद अमरावती येथे असून त्यांच्याकडे वाशिम येथील दिव्यांग समिकरण अधिकारी चा अतिरिक्त कार्यभार असणे, दोन्ही पदे सांभाळताना दिव्यांग शाळा, आश्रम शाळा तसेच या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था यांचे कडून एजंट मार्फत कामात अनियमितता करून वा पैसे गोळा केल्या प्रकरणात वेळोवेळी लेखी व तोंडी तक्रारी प्राप्त होणे, असे असतांना जिल्हा सक्षमिकरण अधिकारी यांचे विरुध्द कार्यवाहीची मागणी होत असतांना कुठलीही कार्यवाही न होणे, तरी सदर प्रकरणी सखोल चौकशी करून दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तातडीने कारावयाची कारवाई व प्रतिक्रिया "

---

**मा. मंत्री, दिव्यांग कल्याण यांचे निवेदन**

श्री. डी. एम. पुंड यांची दिनांक १७.१०.२०२३ च्या आदेशान्वये अधिक्षक वर्ग-२, शासकीय बहुउदेशीय दिव्यांग संमिश्र केंद्र, वाशिम येथे पदस्थापना करण्यात आली आहे. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती या पदावर कार्यरत अधिकारी यांची पदोन्नती झाल्याने रिक्त झालेल्या पदावर सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक २२.२.२०२४ च्या आदेशान्वये श्री. पुंड यांच्याकडे जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे.

शासन निर्णय, दिनांक २०.१.२०२५ अन्वये प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासाठी गठित समितीच्या दिनांक ६.३.२०२५ च्या बैठकीमध्ये पहिल्या टप्प्यात विभागांतर्गत कार्यरत असलेले वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता आणि शासकीय संस्थांमधील अधिक्षक गट-ब यांच्याकडे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार शासन आदेश, दिनांक २९.४.२०२५ अन्वये श्री. पुंड यांच्याकडे त्यांच्या अधिक्षक गट-ब या पदाचा कार्यभार सांभाळून जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण

अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार तात्पुरत्या स्वरुपात सोपविण्यात आला आहे. त्यानुसार त्यांनी जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, वाशिम या पदाचा अतिरिक्त कार्यभार दिनांक १ मे, २०२५ पासून स्विकारला आहे. सदर कार्यालयाचा आहरण व संवितरण क्रमांक अद्याप अप्राप्त असून कार्यालयाकडून अद्यापपर्यंत कोणतीही योजना राबविण्यात आलेली नाही अथवा कोणतेही देयक पारित करण्यात आलेले नाही.

दिव्यांगाच्या अनुदानित विशेष शाळा/कर्मशाळा यांची संख्या वाशिम जिल्हयात १३ असून अमरावती जिल्हयात ३३ आहेत. सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यरत असलेल्या आश्रमशाळा आणि वसतिगृहाचे कामकाज संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्यामार्फत पाहिले जाते. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अंतर्गत आश्रमशाळांचे कामकाज येत नाही.

शासकीय बहुउदेशीय दिव्यांग संमिश्र केंद्र, वाशिम, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती आणि जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, वाशिम या तीनही पदांचा अधिक्षक गट-ब हे कार्यभार सांभाळत असताना अतिरिक्त कार्यभाराच्या कालावधीत दिव्यांग शाळा, आश्रमशाळा तसेच या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था यांच्याकडून एजंट मार्फत कामात अनियमितता करून वा पैसे गोळा केल्याप्रकरणी त्यांच्याविरुध्द कोणतीही लेखी वा तोंडी तक्रार प्राप्त झालेली नाही.

श्री. पुंड यांच्याकडे मूळ पदासह इतर दोन पदांचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला असल्याने एकाच वेळेस तीन पदाचे कामकाज करणे शक्य होत नसल्याने जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती या पदाचा अतिरिक्त कार्यभार कमी करून त्या पदाचा पदभार अन्य अधिकाऱ्याकडे सोपविण्याची विनंती श्री. पुंड यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना दिनांक २९.५.२०२५ च्या पत्रान्वये केली आहे.

श्री. पुंड यांच्याविरुध्द कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याने त्यांच्याविरुध्द कार्यवाही सुरु केलेली नाही.

*****

लक्षवेधी सूचना क्रमांक : २०४५

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री.तानाजी मुटकुळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २०४५ खालीलप्रमाणे आहे :-

"परभणी शहर महानगरपालिका परभणीच्या हद्दीतील शेत सर्वे नं. ४७/१, ४७/२, ४८, ४९, ५०, ७०, ७१/१, ७८/१, ९०, ३४० हे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या इनामी वक्फ मिळकती असणे, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे गॅझेट जे की, महाराष्ट्र शासन राजपत्र १८ एप्रिल १९७४ वर नोंदणीकृत आहे त्यावर उपरोक्त सर्वे नंबर हे इनामी वक्फ जमिनी असल्याचे नमुद असणे, सदर मिळकतीबाबत महसूल अधिकारी / कर्मचारी यांच्याशी संगनमत करुन व खोटे फेरफार दाखल करुन परस्पररित्या इतर लोकांच्या नावे करण्यात आली असणे, सदर इनामी जमिनी इतर लोकांच्या नावे विनापरवाना हस्तांतरित केल्यामुळे वक्फ संस्था, वक्फ मंडळ व महाराष्ट्र शासनाचे महसूली नुकसान झालेले असणे. महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर, बीड, नांदेड, हिंगोली, जालना, व पुणे इत्यादी जिल्ह्यात वक्फच्या अनेक मिळकती असणे, सदर जिल्ह्यातील तसेच महाराष्ट्र राज्यातील इतर जिल्ह्यातील वक्फच्या जमिनी शासनाच्या पुर्व परवानगीशिवाय हस्तांतरीत झालेल्या असणे याबाबत शासनाची भुमिका व करावयाच्या उपाययोजना."

**श्री.दत्तात्रय भरणे, मा.मंत्री (अल्पसंख्याक विकास व औकाफ) यांचे निवेदन :-**

परभणी जिल्हातील वक्फ मालमत्तांचा तपशील दिनांक ०२.०५.१९७४ रोजीच्या शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. सदर राजपत्रामध्ये परभणी शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्वे नं. ४७/१, ४७/२, ४८, ४९, ५०, ७०, ७१/१, ७८/१, ९०, ३४० ह्या मालमत्तांची नोंद नाही.

उम्मीद अधिनियम १९९५ मधील तरतूदीनुसार राज्यातील वक्फ मालमत्तांची नोंदणी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे होत असते. सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे १७००० पेक्षा जास्त वक्फ संस्था नोंदणीकृत असून, त्यामधील बरीच मालमत्ता छत्रपती संभाजीनगर, बीड, नांदेड, हिंगोली, जालना व पुणे या जिल्यांमध्ये आहे. राज्यातील वक्फ

मालमत्ता अधिसुचित करण्याबाबत शासनामार्फत वेळोवेळी कार्यवाही करण्यात आलेली आहे. तत्कालिन वक्फ कायद्यातील तरतूदी नुसार राज्यातील वक्फ मालमत्तांचे सर्वेक्षण करुन सदर मालमत्ता दिनांक ०२.०५.१९७४ रोजीच्या राजपत्रात अधिसुचित करण्यात आलेले आहेत.

राजपत्रात अधिसूचित झालेल्या मालमत्ता ह्या सक्षम न्यायालयाने फेटाळल्या खेरीज निर्विवादपणे वक्फ मालमत्ता ठरतात. वक्फ मालमत्तांच्या खरेदी/विक्रीस निर्बंध आहेत. तथापि, राज्यातील काही भागांमध्ये वक्फ मालमत्तांची अवैधपणे खरेदी/विक्री होत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत.

वक्फ मालमत्तांच्या मालमत्ता पत्रकामध्ये मालकी सदरी वक्फ संस्थेचे नाव लावण्याबाबत तसेच मालमत्ता पत्रकामधील खाजगी व्यक्तींची नावे हटविण्याबाबत महसूल विभागाच्या दिनांक १३.०४.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये महसुली प्राधिकरणांना निर्देश देण्यात आलेले आहेत. परंतू काही ठिकाणी अद्यापही वक्फ मालमत्तांच्या मालकी सदरी खाजगी लोकांची नावे असल्याने वक्फ मालमत्ता अवैधपणे हस्तांतरीत करण्याचा प्रयत्न होत असल्याच्या तक्रारी आहेत. सदर बाबींवर आळा घालण्यासाठी दिनांक १३.०४.२०१६ रोजीच्या शासन निर्णयाचे पुनर्विलोकन करण्यास्तव दिनांक १७.१०.२०२३ रोजी राज्य शासनाने चार सदस्यीय समिती गठीत केलेली आहे.

वक्फ मालमत्तेची विक्री, भेट, अदलाबदल, गहाण ठेवणे वा हस्तांतरण करणे यास वक्फ कायद्यान्वये मनाई करण्यात आलेली आहे. वक्फ मालमत्तांची अवैधपणे खरेदी/विक्री केल्यास संबंधितांना दोन वर्षापर्यंतची शिक्षेची तरतूद उम्मीद अधिनियम मध्ये करण्यात आलेली आहे.

*********

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

## लक्षवेधी सूचना क्र. १३४

**श्री.भास्कर जाधव, श्री. शेखर निकम, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१३४ पुढीलप्रमाणे आहे:-**

"गेली जवळपास १७ वर्ष रुंदीकरणाचे काम सुरु असलेल्या मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाची माहे जून २०२५ च्या तिसऱ्या सप्ताहात झालेल्या अवघ्या दोन दिवसांच्या मुसळधार पावसात दुर्दशा झाल्याचे समोर येणे, रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर येथील शास्त्री पुलाजवळ खचलेला काँक्रीटचा रस्ता, खेड तालुक्यातील लोटे येथील पुलावरील रस्त्याला गेलेले तडे, कुरधुंडा, परशुराम घाट, कशेडी घाटात संरक्षक भिंतींना तडे गेल्यामुळे या भिंती कोसळून मोठा अपघात होण्याची शक्यता, परशुराम घाटात लोखंडी जाळीच्या कामासाठी टाकण्यात आलेली माती वाहून आल्याने पायथ्याशी असलेल्या पेढे गावात पसरलेले दलदलीचे साम्राज्य, महामार्गावर अनेक ठिकाणी नव्याने झालेल्या रस्तावर पडलेले खड्डे, अनेक ठिकाणी दरड कोसळल्याने वाहतुकीस निर्माण झालेला अडथळा, माणगाव (जि. रायगड) तालुक्यातील मुगवली येथील उड्डाण पुलावरील रस्त्याला दोन्ही बाजूंनी मोठमोठ्या भेगा पडल्याने निर्माण झालेला धोका, त्यामुळे एकूणच या संपूर्ण महामार्गाच्या दर्जा व गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून संबंधित अधिकारी आणि ठेकेदार यांच्यातील हितसंबंधांमुळे निकृष्ट दर्जाच्या कामाकडे अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक होणारे दुर्लक्ष, त्यामुळे कोकणातील जनतेमध्ये निर्माण झालेली तीव्र संतापाची आणि असंतोषाची भावना, महामार्गाच्या कामाकडे व दर्जाकडे दुर्लक्ष करून ठेकेदारांशी हितसंबंध जाणाऱ्या अधिकाऱ्यांबरोबरच त्यांच्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांवरदेखील कठोर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**<u>मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन</u>**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ ची महाराष्ट्र राज्यातील एकूण लांबी ४७१.३० कि.मी. असून त्यापैकी कि.मी. ०/०० (पळस्पे) ते कि.मी. ८४/०० (इंदापूर) या लांबीतील चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) व कि.मी. ८४/०० (इंदापूर) ते कि.मी. ४७१/३० (पात्रादेवी) या लांबीतील चौपदरीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत प्रगतीपथावर आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीत असलेल्या कामांपैकी पनवेल ते कासू या ४२.३० कि.मी. लांबीपैकी ४१ कि.मी. लांबीतील काँक्रिटीकरणाचे काम पूर्ण झाले असून गडब येथील भुयारी मार्गाचे (VUP) काम अंतिम टप्प्यात आहे. तसेच, कासू ते इंदापूर या ४२.३० कि.मी. लांबीपैकी ३७ कि.मी. मधील काँक्रीटीकरणाचे काम पूर्ण झाले असून उर्वरित पाच भुयारी मार्ग व तीन उड्डाणपूलांची कामे प्रगतीत आहेत. सदर कामे डिसेंबर २०२५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

कि.मी.८४/००० (इंदापूर) ते कि.मी.४५०/१७० (झाराप) या एकूण ३६६.१७ कि.मी. लांबीपैकी ३३४ कि.मी. लांबीतील काँक्रिटीकरणाचे काम पूर्ण झाले असून उड्डाणपूलासहित उर्वरित काम डिसेंबर-२०२५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. इंदापूर व माणगाव बायपासच्या कामांची निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील मुगावली-माणगाव येथील उड्डाणपूलावरील रस्त्याला पडलेल्या/ भेगा तसेच लोटे (ता. खेड) येथील पूलावरील रस्त्याला गेलेले तडे हे कंत्राटदारामार्फत स्वखर्चाने इपॉक्सी ग्राउटने दुरुस्त करण्यात आले असून सदर ठिकाणी रस्ता वाहतुकीसाठी सुरळीत ठेवण्यात आला आहे. भेगा पडलेल्या तडे गेलेल्या ठिकाणचे कॉक्रीट पॅनल पावसाळ्यानंतर कंत्राटदारामार्फत स्वखर्चाने बदलून त्याठिकाणी नव्याने पीक्यूसी करण्यात येणार आहे.

माहे जून २०२५ मध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे परशुराम घाट (ता. चिपळूण) येथील प्रगतीत असलेल्या गॅबियन वॉलच्या कामामधील माती भरावाचा काही भाग दरी लगत असलेल्या पेढे गावामध्ये वाहून गेला. सदर वाहून गेलेला भराव राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत नागरिकांच्या सहकार्याने वेळोवेळी काढण्यात आला आहे. याठिकाणी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून मातीचा भराव वॉटरप्रूफ शीटनी झाकण्यात आला आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६० या महामार्गावरील संगमेश्वर (जि. रत्नागिरी) येथील शास्त्री पुलाजवळील काम प्रगतीत असून पूलाच्या पुढील भागात असलेल्या बॉक्स कल्वर्टच्या पॅरापेटचे काम पूर्ण झाले नसल्याने पावसाच्या पाण्याचा अतिरिक्त दाब येऊन शास्त्री पुलाजवळील रस्ता खचला आहे. याबाबत कंत्राटदारास NCR (Non Conformance Report) देण्यात आला असून तसेच सद्यस्थितीत वाहतूक एकाच मार्गीकेमधून नियंत्रित करण्यात आली आहे. कंत्राटदारामार्फत खचलेल्या रस्त्याच्या ठिकाणी नवीन पीक्युसीचे काम करण्यात येणार आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील कुरधुंडा ता. संगमेश्वर येथील संरक्षण भितीला भेगा निर्माण झाल्याने कंत्राटदारास NCR (Non Conformance Report) देण्यात आला आहे. सद्यस्थितीत वाहतूक सुरळीत राहण्याच्या दृष्टीने आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्या असून संरक्षक भिंतीची दुरुस्ती कंत्राटदारामार्फत स्वखर्चाने करण्यात येणार आहे.

सदर महामार्गावरील परशुराम घाट तसेच अन्य दरड प्रवण क्षेत्रातील दरड कोसळण्याच्या घटनांना आळा घालण्यासाठी सुरक्षात्मक उपाययोजना करण्यासाठी केंद्रसरकार मार्फत टेहरी (Tehri Hydro Development Corporation limited) या संस्थेद्वारे सर्वे करण्यात आला असून त्यांच्या सल्ल्याने सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed Project Report) तयार करण्यात आला आहे. त्यानुसार परशुराम घाटामध्ये सुरक्षा उपाययोजनांचे काम प्रगतीत आहे.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कामाचे गती न राखल्याने संबंधित कंत्राटदारावर कार्यवाही करण्याची प्रक्रिया प्रगतीत आहे. या महामार्गावरील काही ठिकाणी पडलेले खड्डे कंत्राटदारामार्फत वेळोवेळी भरण्यात येत आहेत. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय (MoRTH) यांच्यामार्फत नियुक्त स्वतंत्र अभियंता (Independent Engineer) यांच्याद्वारे मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्गावरील कामाची देखरेख करण्यात येत असून कामाची गुणवत्ता राखण्यात येते.

******************

## महाराष्ट्र विधानसभा

२२७

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन
लक्षवेधी सूचना क्र. २२७

ॲड. राहुल ढिकले, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२२७ पुढीलप्रमाणे आहे:-

"नाशिक शहरातील व्दारका ते दत्त मंदिर नाशिक रोड वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असणे,सदरील मार्गावर दररोज वाहतुकीची कोंडी होत असल्याने प्रचंड ट्राफिक होवून नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत असणे,सदरील रस्त्यावर प्रचंड रहदारी असल्याने मागील १० वर्षात छोटे-मोठे शेकडो अपघात होवून मोठ्या प्रमाणात जीवितहानी व वित्तहानी झाली असणे, नाशिक शहरात सन २०२७ मध्ये कुंभमेळा होणार असल्याने सदरील उड्डाणपुलाचे बांधकाम होणे अत्यंत गरजेचे असणे,तसेच नाशिक शहरासाठी नियोजित निओ मेट्रो प्रकल्प मंजूर झालेला असणे, नियोजित निओ मेट्रो हि याच परिसरातून जात असल्याने नाशिक शहरातील व्दारका ते दत्त मंदिर नाशिक रोड हा उड्डाणपूल नियमित वाहतुकी बरोबरच निओ मेट्रोसाठी होणारा डबल डेकर उड्डाणपूल प्रकल्प सयुंक्तिक रीत्या करणे अत्यंत गरजेचे असणे, निओ मेट्रोसाठी आवश्यक डबल डेकर उड्डाणपूलाचे भविष्यकालीन नियोजन करून सध्य स्थितीत नाशिक शहरातील व्दारका ते दत्त मंदिर नाशिक रोड उड्डाणपूल नियमित वाहतुकीसाठी निर्माण करणे अत्यंत गरजेचे असणे, सदरील उड्डाण पूल प्रकल्पाला तातडीने प्रशासकीय मान्यता देवून निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाची प्रतिक्रिया"

### मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन

नाशिक शहरातील द्वारका सर्कल ते नाशिक रोड (दत्त मंदीर) हा भाग नाशिक पुणे राष्ट्रीय महामार्ग क्र. ६० चा भाग आहे. सदर भाग नाशिक महानगरपालिकेच्या हद्दीत येतो. सदर महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या आखत्यारीत आहे. सद्यस्थितीत द्वारका सर्कल ते दत्त मंदिर या दरम्यान साधारणत: ४३,६०० पीसीयु वाहतूक वर्दळ आहे.

वाहतूक सुरक्षा व सुरळीततेच्या दृष्टीने द्वारका सर्कल ते नाशिक रोड (दत्त मंदीर) या महामार्गावर उड्डाण-पूलाकरिता भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत (NHAI) प्रकल्प सल्लागार नेमणुकीचे काम प्रगतीपथावर आहे. दि. २२ जून २०२५ रोजी मा.मंत्री रस्ते, वाहतूक व महामार्ग मंत्रालय यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये उड्डाणपूलाच्या कामासाठी लागणारा कालावधी विचारात घेता उड्डाणपूलाचे काम कुंभमेळ्यानंतर हाती घेण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. कुंभमेळ्यानंतर सविस्तर प्रकल्प अहवालाच्या निष्कर्षाच्या आधारावर व प्राधिकरणाच्या मंजूरीनंतर उड्डाणपूलाबाबत पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन मार्फत नाशिक मेट्रो निओचा सविस्तर प्रकल्प अहवाल MoHUA केंद्र सरकार यांचेकडे दि. ०९.०९.२०१९ रोजी सादर केला आहे.

******************

मेटा H/499 (750-7-25)

C:\Users\Radhna Nalawade\Downloads\... लक्षवेधी सूचना क्र. २२७ ...docx

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री किशोर पाटील, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.११६३ पुढीलप्रमाणे आहे :-**

" पाचोरा येथे (जि.जळगांव) सार्वजनिक बांधकाम विभागीय कार्यालय नव्याने पाचोरा, भडगांव, चाळीसगांवसाठी सुरू करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.३०/०१/२०२५ रोजीच्या सुमारास मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन देण्यात येणे, परंतु अद्यापही या संदर्भात शासनाने चौकशी वा कार्यवाही न करणे, परिणामी सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने ताडीने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका "

---

**मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन.**

अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम जळगांव मंडळ कार्यालयातंर्गत १) सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव २) सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, जळगांव ३) सार्वजनिक बांधकाम विभाग, अंमळनेर ४) सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जळगांव ५) मार्ग प्रकल्प विभाग, जळगांव असे एकूण पाच (५) विभाग आहेत.

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव यांच्या अधिपत्याखाली १) सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१, जळगांव २)सार्वजनिक बांधकाम उपविभाग,भडगांव ३). सार्वजनिक बांधकाम (बांध.) उपविभाग, जळगांव ४) सार्वजनिक बांधकाम उपविभाग, जामनेर ५) सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पाचोरा ६) सार्वजनिक बांधकाम उपविभाग, चाळीसगांव असे एकूण सहा (६) उपविभाग आहेत.

मा.विधानसभा सदस्य, पाचोरा भडगांव मतदारसंघ यांनी दिलेल्या निवेदनानुसार पाचोरा, भडगांव व चाळीसगांव या उपविभागीय कार्यालयांसाठी नव्याने सार्वजनिक बांधकाम विभागाचे एक विभागीय कार्यालय सुरू करण्याची मागणी केलेली आहे.

पाचोरा, भडगांव व चाळीसगांव येथे सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप विभागीय कार्यालये पूर्वीपासून कार्यान्वित आहेत. त्यामुळे पाचोरा येथे पुन्हा नव्याने विभागीय कार्यालय स्थापन करणे उचित होणार नाही.

*****************

# महाराष्ट्र विधानसभा

१२५८

**सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन**
**लक्षवेधी सूचना क्र. १२५८**

**श्री.विनोद निकोले, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१२५८ पुढीलप्रमाणे आहे:-**

"मुंबई आमदाबाद राष्ट्रीय महामार्गांवरील वाहतूक कोंडी अद्यापही न सुटणे. सुमारे ५५४ कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च करून बांधलेल्या महामार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे होणे. अद्यापही मुंबईकडील मार्गिकेचे काम धिम्या गतीने सुरू असणे. नव्याने तयार केलेल्या रस्त्यावरही मोठ्या प्रमाणात खड्डे होणे. अनेक ठिकाणी काँक्रिटीकरणाचे काम करताना जुन्या डांबरी रस्त्यावर थेट सिमेंट काँक्रीट टाकणे. यामुळे अनेक रस्ते तथा उड्डाण पुलावर मोठ्या प्रमाणात पाणी साचने. संध्याकाळी व रात्रीच्या वेळेस मोठ्या वाहनांच्या अडथळ्यांमुळे रुग्णवाहिका प्रवासी आणि व मालवाहतूक ही तासंताच अडकून राहणे. डहाणू तालुक्यातील विवळवेढे , मेंढवण येथील उड्डाण पुलावर मोठ्या प्रमाणात पाणी साचून वाहतूक ठप्प होऊन अपघात होण्याची शक्यता निर्माण होणे. वाहतूक नियोजनासाठी कंत्राट दाराकडून कोणतीच उपयोजना केली गेलेली नसणे. त्यामुळे वारंवार अपघाताचे प्रमाण वाढणे. गुजरात व मुंबईकडील दोन्ही मार्गांवरील कोंडी सोडविण्यासाठी आमदार व जिल्हाधिकारी यांनी घेतलेल्या बैठका निष्फळ ठरणे. निकृष्ट रस्त्यामुळे ३१ मे २०२५ रोजी मेंढवन खिंड वळ झालेल्या अपघातामध्ये तीन निरप्राध लोकांचा मृत्यू होणे. रस्त्याचे काम निकृष्ट करणाऱ्या कंत्राट दारावर व सदर कंत्राटदाराला पाठीशी घालणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सदर घटनेस जबाबदार म्हणून त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाय योजना व शासनाची प्रतिक्रिया."

## मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन

मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र.४८ वरील आच्छाड ते दहिसर (एकूण लांबी १२१ कि.मी. ) या लांबीतील व्हाईट टॉपींगचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीत आहे. सदर महामार्ग सहा पदरी (३+३) असून सद्यस्थितीत या महामार्गावरुन साधारणत: १ लाख ते १.५ लाख पी.सी.यु. अशी वाहतूक वर्दळ आहे.

महामार्गाच्या कामामध्ये व्हाईट टॉपींगचे काम मंजूर असल्याने अस्तित्वात असलेल्या डांबरी पृष्ठभागाच्या २५ मि.मी. विअरींग कोर्स (Wearing Course) मिलिंग करुन उर्वरित डांबरी पृष्ठभागावर काँक्रीट करण्यात आले आहे. सद्यस्थितीत या महामार्गाच्या व्हाईट टॉपींगचे काम प्रगतीत असून ९८ % व्हाईट टॉपींगचे काम पूर्ण झाले आहे. या व्यतिरिक्त आच्छाड, नांदगांव फाटा, विक्रमगड येथील तीन भुयारी मार्गांचो (VUP ) कामे पूर्ण असून उर्वरित सातीवली, दिल्ली दरबार व सुत्रकार फाटा येथील ३ भुयारी मार्गांची कामे प्रगतीत असून दहा ठिकाणी पादचारी पूलांचो (FOB) कामेही प्रगतीत आहेत.

प्रस्तुत महामार्गाचे काम करण्यासाठी वाहतूक वळविण्यासाठी पर्यायी मार्ग उपलब्ध न झाल्याने अस्तित्वातील महामार्गावर काही मार्गिकांमध्ये वाहतूक सुरु ठेवून उर्वरित मार्गिकेचे काम करण्यात आले आहे.

कृ.मा.प.

Rotm-H-434-1(750-7-2025)

४०१२

अस्तित्वातील महामार्गावर काही मार्गिकांमध्ये वाहतूक सुरु ठेवून अन्य उर्वरित मार्गिकांमध्ये कॉंक्रीटचे काम करणे, सातीवली व दिल्ली दरबार येथील भुयारी मार्गाची कामे तसेच सेवा रस्त्यांच्या क्रॉंक्रीटीकरणाच्या कामांमुळे वाहतूक कोंडी होत होती. सद्यस्थितीत सेवा रस्त्याच्या एका मार्गिकेचे क्रॉंक्रीटीकरण पूर्ण झाल्याने वाहतूक कोंडी कमी झाली आहे. मुख्य रस्त्यावरुन जाणाऱ्या अवजड वाहनांमध्ये वारंवार होणारे बिघाड, वाहतूक नियमांचे पालन न करता विरुध्द दिशेने जाणारी वाहने या कारणांमुळे महामार्गावर वाहतूक कोंडी होते. व्हाईट टॉपींगचे काम पूर्ण झालेल्या ठिकाणी वाहतूक कोंडी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

महामार्गावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आणि वाहतूक सुरक्षा व सुरळीततेच्या दृष्टीने ४० ट्रॅफीक वॉर्डन पोलिसांना उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. याशिवाय पालघर जिल्हा प्रशासनाच्या निर्देशानुसार कंत्राटदारामार्फत १०० ट्रॅफीक वॉर्डन नियुक्त करुन वाहतूक पोलिसांच्याकडे देण्यात आले होते. महामार्गाच्या संपूर्ण (१२१ कि.मी.) लांबीसाठी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत तीन गस्ती वाहने तैनात करण्यात आली आहेत. अपघातग्रस्त /बिघाड झालेली वाहने तातडीने हटविण्यासाठी तीन क्रेनही उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तसेच भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत अपघात समयी मदत करण्यासाठी पाच रुग्णवाहीका उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

नव्याने कॉंक्रीटकरणाचे काम केलेल्या कामावरुन काही ठिकाणी वाहतूक गेल्यामुळे खड्डे व टायर मार्क्स निर्माण झाले. रस्त्याच्या दुरुस्तीसाठी कंत्राटदारामार्फत तीन वेगवेगळी मेंटेनन्स पथके नेमण्यात आली आहेत. पावसामुळे दुरुस्ती कामात काही अडचणी उद्भवत आहेत. तथापि, काही ठिकाणी खराब झालेले कॉंक्रीट पॅनेल पूर्णपणे काढून नव्याने कॉंक्रीट पॅनेल तयार करण्यात येत आहेत.

महामार्गाशेजारील मालमत्ता धारकांनी महामार्गाच्या पातळीपेक्षा त्यांच्या जागेची पातळी उंच केल्याने, तसेच महामार्गाशेजारील कचरा /मलबा या कारणांमुळे महामार्गावर पाणी साचत असल्याचे निदर्शनास आले आहे. पाण्याचा त्वरित निचरा होण्याच्या दृष्टीने काही ठिकाणी जुन्या लहान आकाराच्या पाईप मोऱ्याऐवजी २×२ मीटर आकाराचे बॉक्स कल्वर्ट बसविण्यात आले आहेत. पावसाचे पाणी त्वरित वाहून जाण्यासाठी ट्रेंचेसही काढण्यात आले आहेत. पूल /उड्डाणपूलावरील ड्रेनेज स्पाऊटसही साफ करण्यात आले असून या सर्व उपाययोजनांमुळे पाणी साचण्याचे प्रमाण कमी झाले आहे. विवलवेढे आणि मेंढवण येथील बंद झालेले ड्रेनेज स्पाऊटस् तातडीने साफ करण्यात आले असून याठिकाणी पाणी साचण्याची समस्या नाही.

दिनांक ३१ मे २०२५ रोजी मेंढवण घाटात दिवसा झालेला दुर्दैवी अपघात चालकाच्या अतिवेगाने तसेच लेन कटींग करुन वाहन चालविल्यामुळे झाला असल्याचे निदर्शनास आले आहे.

कामासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्यांची चाचणी घेऊन योग्य साहित्य वापरुन महामार्गाची विविध कामे गुणवत्तापूर्वक करण्यात येत आहेत.

दुरुस्तीच्या कामात कंत्राटदाराकडून झालेल्या विलंबाबाबत संबंधीत कंत्राटदाराला एप्रिल, २०२५ मध्ये तीन महिन्यांसाठी निविदा प्रक्रियेसाठी प्रतिबंधीत केले आहे. तसेच काम वेळेत पूर्ण न केल्यास निविदा अटी व शर्तीनुसार कंत्राटदारावर कारवाई करण्याचे नियोजन आहे.

H-434-1A

*********X*********

# महाराष्ट्र विधानसभा

१३७०

## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन
## लक्षवेधी सूचना क्र. १३७०

**श्री.संदिप क्षीरसागर, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१३७० पुढीलप्रमाणे आहे:-**

""बीड व शिरुर कासार (जि.बीड )तालुक्यातून जाणारा खरवंडी -ब्रम्हनाथ येळंब-आर्वी-खालापुरी-नवगन राजुरी या राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ एफ या रस्त्याच्या कामाकरिता १९९ कोटी रुपयांची मान्यता जुन,२०१८ मध्ये आदेश देऊन १८ महिन्यात काम पूर्ण करण्याचे उददीष्ट असतांनाही आज सात वर्षाचा कालावधी लोटला असूनही रस्त्याचे काम अपूर्ण अवस्थेत असल्याचे नुकतेच माहे जून,२०२५ मध्ये निदर्शनास येणे,सदर रस्त्याकरिता भुसंपादन अदयाप पूर्ण झाले नसल्याने ब्रम्हनाथ येळब , मुंगुस वाडी जांब व नवधन राजुरी या गावांमधील रस्त्याची कामे अदयापी रखडलेली असणे,तसेच भुसंपादन बाधितांना अदयाप जमिनीचा मोबदला मिळालेला नसणे, भूसंपादन व रस्त्यांचे काम अदयापी अपूर्ण असल्याने कामाच्या किंमतीमध्ये झालेली वाढ,परिणामी ९ कोटीचा वाढलेला अधिकचा खर्च, रस्त्याच्या व भूसंपादनास विलंब झाल्यामुळे शासनाला आर्थिक भुर्दड सोसावा लागणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन यास जबाबदार असणा-या अधिका-याविरुध्द कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.""

## मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन

खरवंडी-मुंगूसवाडे-भालगाव-ब्रम्हनाथ-खालापुरी-नवगण राजुरी हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१-F असून या रस्त्याची एकूण लांबी ३६.९० कि.मी. आहे. या महामार्गाची बीड जिल्ह्यामधील लांबी २२.६० कि.मी. आहे. दिनांक ६ फेब्रुवारी २०१८ रोजीच्या राजपत्रानुसार हा महामार्ग राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित करण्यात आला असून यापूर्वी तो प्रमुख जिल्हा मार्ग होता.

रस्ते वाहनूक व महामार्ग मंत्रालयाच्या (MoRTH) दिनांक २१ मार्च २०१८ रोजी च्या आदेशानुसार सदर महामार्गाच्या दुपदरीकरणाच्या कामास रुपये २७६.९५ कोटी रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली. राष्ट्रीय महामार्ग घोषित होण्यापूर्वी सदर रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग असल्याने रस्त्याची रुंदी १८ मीटर होती. रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या मान्यतेस अनुसरून रस्त्याच्या दुपदरीकरणासाठी २४ ते ३० मीटर रुंदीपर्यंत भूसंपादन प्रस्तावित करण्यात आले. प्रशासकीय मान्यतेनुसार २१.६५ हेक्टर जमीन संपादित करण्यासाठी एकूण रुपये ३२.४८ कोटी रक्कम मंजूर करण्यात आली होती तथापि प्रत्यक्षात २०.४९ हेक्टर जमीन संपादित करण्यासाठी एकूण रुपये ७८.९६ कोटी निधीची आवश्यकता आहे.

प्रस्तुत रस्त्याच्या दुपदरीकरण करण्याच्या कामास दिनांक ०५ जून २०१८ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला असून डिसेंबर २०२५ अखेर काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. भूसंपादन

प्रक्रियेमध्ये झालेल्या विलंबामुळे काम पूर्ण करण्यास विलंब झालेला आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ F खरवंडी ते नवगण राजुरी या रस्त्यावरील ता. शिरूर कासार जि. बीड मधील एकुण २२.६० कि.मी. लांबीपैकी २१.७२ कि.मी. लांबीतील काम पूर्ण झालेले असून सद्यस्थितीत भुसंपादनासाठी मंजूर रुपये ३२.४८ कोटी निधी वाटपाची प्रक्रिया प्रगतीत आहे.

सद्यस्थितीत भूसंपादनाच्या कामाचे अंतिम निवाडे प्राप्त झाले असून भुसंपादनासाठी लागणाऱ्या वाढीव निधीचा प्रस्ताव रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय (MoRTH) कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे. भूसंपादन कार्यवाही पूर्ण करून डिसेंबर २०२५ अखेर उर्वरित लांबीमधील काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

*******************

H/436-1A

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

२८०

**लक्षवेधी सूचना क्र. २०१६**

**श्री.शांताराम मोरे, श्री.रईस शेख, श्री.विकास ठाकरे, श्री.राजु खरे, श्री.सुरेश भोळे, श्री.नितीन पवार, विधानसभा सदस्य, यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना :-**

"वाडा -भिवंडी मनोर रस्त्याची अतिशय दुरावस्था झाल्याचे नुकतेच माहे जून, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, या रस्त्यावर यापूर्वी अनेकदा मोठ्या प्रमाणात दुर्घटना घडून जीवतहानी झाल्या असणे, सदरहू रस्त्याकरिता शासनाने सुमारे ७७७ कोटी रुपयांचा निधी मंजूर केलेला असतांनाही, संबधित ठेकेदार रस्त्यांचे काम अत्यंत संथ गतिने करित असल्याने प्रचंड वाहतुककोंडी होत असणे, यासंदर्भात ठेकेदारास वेळोवेळी सुचना देवुन त्यांच्याकडून जाणीवपूर्वक होत असलेली चालढकल, रस्त्याच्या संथगतीने चालू असलेल्या कामामुळे अत्यावश्यक सेवेमध्ये येत असलेला अडथळा, रस्त्याच्या कामासंदर्भात विचारणा केली असतांना ठेकेदारांकडून उडवाउडवीची मिळत असलेली उत्तरे, ठेकेदारांच्या मुजोरी, हलगर्जीपणामुळे रस्त्यांच्या कामास होत असलेल्या विलंबाबाबत सखोल चौकशी करुन तातडीने रस्त्याचे काम तातडीने करुन वाहतुकीसाठी १ साईड लेन सुरु करण्याबाबतची कार्यवाही होण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यास जबाबदार असणा-या ठेकेदारा विरुध्द कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

### मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन

मनोर वाडा रोडचे राज्यमार्ग क्र. ३४ (सा.क्र.कि.मी. २९/५५० ते ५३/८०० आणि वाडा- भिवंडी रोडचे) राज्यमार्ग क्र. ३५ (सा.क्र.कि.मी. ४९/००० ते कि.मी. ८९/७०० सुधारणा करणे.) ता. भिवंडी जि. ठाणे या कामास शासन निर्णय दि. ०५/०३/२०२४ अन्वये रु. १०४२.६० कोटी रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली. त्यानंतर तांत्रिक मान्यता व निविदा कार्यवाही पूर्ण करून दिनांक १५/१०/२०२४ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. काम पूर्ण करण्याकरिता ३० महिन्यांची मुदत म्हणजेच दिनांक १४/०४/२०२७ पर्यत आहे.

त्यानुसार कंत्राटदार यांनी कामास सुरुवात केली असून ८.०० किलोमीटर लांबीच्या एका मार्गिकेचे काँक्रिटीकरण पूर्ण करण्यात आले असून सदर लांबी वाहतुकीस खुली करण्यात आली आहे. (वाडा ते शिरीषपाडा ४.०० कि.मी. व वडवली ते डाकीवली फाटा ४.२०० कि.मी. असे एकुण ८.२०० कि.मी. लांबी.) त्याचप्रमाणे वाडा ते अंबाडी दरम्यान महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांच्या भूमीगत विद्युत वाहिन्या रस्त्याच्या मध्यापासुन ५ मी. ते ८ मी. मध्ये येत आहेत. त्यामुळे कंत्राटदार यांना काळजीपुर्वक काम करावे लागत असल्याने अपेक्षित गती प्राप्त होत नाही. याबाबत संबंधित विद्युत कंपनी यांना कळविण्यात येत आहे.

जुन महिन्यामध्ये रा.म.मा क्र. ४८ मुंबई अहमदाबाद या रस्त्यावर सातिवली येथे सुरू असलेल्या भुयारी मार्गाच्या कामामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याने रा.म.मा क्र. १६० मुंबई नाशिक व JNPT कडे जाणारी जड अवजड वाहने मनोर वाडा-भिवंडी रस्त्यावरुन जात असल्याने अस्तित्वातील रस्त्याच्या पृष्ठभागावरील खड्ड्यांचे प्रमाण वाढले आहे. आजमितीस वेळोवेळी खड्डे भरण्यात येवून रस्ता सुस्थितीत ठेवण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

*******************

लक्षवेधी सूचना क्र.२०२१

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री.भास्कर जाधव, श्री.जयंत पाटील, श्री.महेंद्र थोरवे, श्री.बाबुराव कदम-कोहळीकर विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२०२१ पुढीलप्रमाणे आहे :-

"चिखली (जि.बुलढाणा) येथील १०० वर्षापूर्वी इंग्रजकालीन विश्रामगृहाची मजबुत इमारत सार्वजनिक बांधकाम विभागाने शासनाची कोणतीही परवानगी न घेता दिनांक २४ जून, २०२५ रोजी रात्रीच्या वेळी पाडण्यात येणे, ऐतिहासिक इमारतीचा ठेवा जपण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी इमारतीच्या दुरुस्तीसाठी ८० लाख रुपये निधी मंजूर केला असता विश्रामगृहाची दुरुस्ती करण्याऐवजी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी शासनाची परवानगी न घेता नियमबाह्यरित्या पाडण्यात येणे, बुलढाणा जिल्ह्याचा हा अलौकिक ठेवा जपण्याची आवश्यकता असतांना विश्रामगृह पाडून अधिकाऱ्यांनी आपल्या पदाचा केलेला गैरवापर, ऐतिहासिक इमारत जपून ठेवण्याकरिता शासनाचा आटोकाट प्रयत्न सुरु असताना अधिकाऱ्यांनी शासनाच्या आदेशाचे केलेले उल्लंघन, परिणामी शासकीय कर्मचारी/अधिकारी, राजकीय पदाधिकारी, सर्वसामान्य नागरिक यामध्ये पसरलेले चिडीचे व असंतोषाचे वातावरण, विश्रामगृह दुरुस्तीकरीता मंजूर झालेला निधी खर्च करण्याऐवजी इंग्रज कालीन ऐतिहासिक विश्रामगृह परवानगी शिवाय ज्या अधिकाऱ्यांनी पाडले त्यांची सखोल चौकशी करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यावर करावयाची कारवाई व शासनाची भूमिका."

**मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन**

चिखली (जि.बुलढाणा) येथील १०० वर्षापूर्वी इंग्रजकालीन विश्रामगृह पाडण्यात आल्याचे निदर्शनास आलेले आहे. प्रस्तुत प्रकरणी सखोल चौकशी करण्याकरिता अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला यांनी दिनांक ०९.०७.२०२५ अन्वये कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव यांचे अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती गठित केली आहे. सदर चौकशी समितीचा अहवाल प्राप्त करुन प्रस्तुत प्रकरणी नियमानुसार उचित कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

ROTA-H-855-1 (500-10-2025)

*******************

२०२७

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री.किशोर आप्पा पाटील, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२०२७ :-**

"पाचोरा-भडगांव मतदार पाचोरा-तारखेडा रस्ता प्रजिमा-३७ किमी २९/९०० ते ३३/४०० हा रेल्वे हद्दीतील रस्ता असुन रेल्वेच्या रुंदीकरणातील तिसऱ्या मार्गिकेच्या बांधकामामुळे बंद होणे, या करीता या रस्त्यासाठी रेल्वे रस्त्यालगतची जमिन अधिग्रहण करुन पर्यायी रस्त्यांची व्यवस्था करणेबाबत विनंती करणे, याअनुषंगाने अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, जळगांव यांनी कार्यासन अधिकारी नियोजन-१, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांना याकरिता दहा कोटी रुपये सन २०२५ च्या जुलै, २०२५ पुरवणी अर्थसंकल्पात समाविष्ट करण्याकरिता सादर करण्यात आला ~~होता येणे, असे~~ असतांना दि.३० जून २०२५ रोजी सादर करण्यात आलेल्या पुरवणी अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात न येणे, सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगाव विभागाचा कामाचा वर्कलोड पाहता पाचोरा, भडगांव, चाळीसगांव या तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम रस्त्याच्या लांबीचे नवीन कार्यालय सुरु करणे गरजेचे असणे, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रीया व भूमिका."

---

### मा. सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री यांचे निवेदन

पाचोरा भडगाव मतदारसंघातील पाचोरा तारखेडा रस्ता प्रजिमा-३७ किमी २९/९०० ते ३३/४०० च्या रेल्वे मार्गिकेलगत नवीन जागेच्या भुसंपदानासाठी जिल्हाधिकारी यांचेमार्फत उपविभागीय अधिकारी, पाचोरा भाग पाचोरा यांना भुसंपादन अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात आलेले आहे. भूसंपादनाकरीता एकुण अंदाजित रु.२५.०० कोटी रकमेची आवश्यकता आहे. सबब, रेल्वे मार्गिकेलगत नवीन जागेच्या भुसंपदानासाठी निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार काम हाती घेण्याचे नियोजन राहील.

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगाव यांच्या अधिपत्याखाली १) सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१, जळगाव २)सार्वजनिक बांधकाम उपविभाग,भडगाव ३). सार्वजनिक बांधकाम (बांध.) उपविभाग, जळगाव ४) सार्वजनिक बांधकाम उपविभाग, जामनेर ५) सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पाचोरा ६) सार्वजनिक बांधकाम उपविभाग, चाळीसगाव असे एकूण सहा (६) उपविभाग आहेत.

पाचोरा, भडगांव व चाळीसगांव येथे सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप विभागीय कार्यालये पूर्वीपासून कार्यान्वित आहेत. त्यामुळे पाचोरा येथे पुन्हा नव्याने विभागीय कार्यालय स्थापन करणे उचित होणार नाही.

-----------

212

२०२९

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री.किशोर पाटील, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२०२९ :-**

"पाचोरा-भडगांव मतदार संघातील १.पिंपरखेड-गिरड-पाचोरा-खडकदेवळा-गोदेगांव-बनोटी-घाटनांद्रा-फुलंब्री ते रामा ४८ समृध्द महामार्गाला जोडणारा रस्ता (१०५ कि.मी.) व २.कजगांव-नागद-कन्नड-वेरुळ बायपास सोलापूर हायवे रामा-३९ समृध्दी महामार्गाला जोडणारा रस्ता (७५ कि.मी.) हे रस्ते राष्ट्रीय महामार्ग व बाजारपेठे जोडणारे महत्वाचे असणे, सदर रस्ते एमएसआरडीसी मार्फत मंजूर झाल्यास मतदार संघातील नागरिकांच्या सोयीचे होणार असून नागपूर-मुंबई-पुणे-औरंगाबाद शिर्डी छ.संभाजीनगर येथे जाण्यास फारच सोईचे रस्ते होणार असून संदर्भात कार्यासन अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय यांनी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे याबाबतचा अहवाल देण्याकरिता दि.८.५.२०२५ रोजी पत्र देण्यात येऊनही अद्यापही अहवाल सादर करण्यात न येणे, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

**मा. सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री यांचे निवेदन**

१. पिंपरखेड-गिरड-पाचोरा-खडकदेवळा-गोदेगांव-बनोटी घाट नांद्रा-फुलंब्री ते रामा ४८ ची सा.क्र.०/०० ते २५/७५० लांबीचा पृष्ठ भागाची रुंदी ५.५० मी. असुन सुस्थितीत आहे. सदर रस्ता जळगाव व छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांना जोडणारा महत्वाचा रस्ता असून जळगाव जिल्हा हद्दीतील लांबी २५.७५० कि.मी. आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्हा हद्दीतील रामा ४८ चा भाग गोदेगांव ते बनोटी लांबी ६.२५ कि.मी. असून ३.७५ मी. रुंदीचा डांबरी रस्ता सुस्थितीत आहे. बनोटी ते भराडी हा रस्ता रामा ४० दर्जाचा असून लांबी ३७.७० कि.मी.आहे. यातील ११.०० कि.मी. लांबी ३.७५ मी. असुन डांबरी पृष्ठभाग आहे. १४.७० कि.मी.५.५० मी. असुन डांबरी / कॉक्रीट पृष्ठभाग आहे. तसेच १०.७० कि.मी. लांबी ७.०० मी असुन पृष्ठभाग डांबरी आहे. तसेच ०.८० कि.मी. लांबी १०.०० मी. असुन पृष्ठभाग कॉंक्रिटचा आहे व ०.५० कि.मी. लांबी १२.०० मी असुन पृष्ठभाग कॉंक्रिटचा आहे. या भागात ६.२० कि.मी. लांबी वनविभागातून जाते. हा रस्ता भराडी येथे रामा ५१ ला मिळतो. रामा ५१ हा १०.०० मी. रुंदीचा डाबंरी रस्ता आहे. वर नमूद रस्त्यावर वाहतुक दोन जिल्हे तसेच दोन प्रादेशिक विभागातून जात असल्याने रुंदीकरण करणे आवश्यक आहे.

२. कजगांव-नागद-कन्नड-वेरळ बायपास सोलापूर हायवे रामा-३९ ची सा.क्र.५९/९०० ते ७२/३०० लांबीचा पृष्ठ भागाची रुंदी ३.७५ मी आहे. सदर रस्ता जळगाव व छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांना जोडणारा महत्वाचा रस्ता असून जळगाव जिल्हा हद्दीतील लांबी १२.४०० कि.मी. आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्हा हद्दीतील नागद ते कन्नड लांबी ३५.०० कि.मी. आहे. यातील १६.०० कि.मी. लांबी वनविभागातून जाते. १८.६० कि.मी. लांबीचा रस्ता ३.७५ मी.डांबरी असुन १४.४० कि.मी. लांबीचा रस्ता ५.५० मी रुंदीचा आहे. २.०० कि.मी.लांबीचा रस्ता ७.०० मी.रुंदीचा आहे. रस्त्यावरील वाहतुक वर्दळ मोठ्या प्रमाणात असुन रुंदीकरण आवश्यक आहे. सदर कामे हे प्राधान्यक्रम, मंजूरी, निकष व निधीच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

---------

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२५ चे (पावसाळी) अधिवेशन**

**लक्षवेधी सूचना क्रमांक २२४३**

मा. श्री अमोल जावळे, विधानसभा सदस्य, यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २२४३ पुढीलप्रमाणे आहे :-

" भुसावळ ते फैजपूर या प्रमुख मार्गावर, विशेषत: आमोदा ता. यावल गावाजवळ, गेल्या दोन वर्षांपासून सतत अपघात होत असणे, आतापर्यंत या ठिकाणी ११ मोठे तसेच २५ ते ३० लहान अपघात घडणे, यात अनेक निष्पाप नागरिकांचा जीव जाणे आणि अनेक गंभीर जखमी होणे, या मार्गावर दिनांक ६ जुलै २०२५ रोजी एक मोठा अपघात घडणे, ज्यामध्ये इंदोरहून जळगावकडे येणारी खासगी बस आमोदा येथे अपघातग्रस्त होणे, या अपघातात ३ जणांचा दुर्दैवी मृत्यू, तसेच २५ ते ३० प्रवासी गंभीर जखमी होणे, हा मार्ग DLP (Defect Liability Period) मध्ये असणे, तरी या रस्त्याच्या सुरक्षेची कोणतीही ठोस उपाययोजना संबंधित प्रशासनाकडुन केली जात नसणे, सदरहू बाब अतिशय गंभीर व निष्काळजीपणाची असणे, वेळोवेळी प्रशासनाचे लक्ष वेधूनही या मार्गावर सुरक्षा उपाययोजना नसणे, तरी या अपघातांची सखोल चौकशी करून लवकरात लवकर दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच अपघात रोखण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा. मंत्री (सा.बां.) (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन

भिकनगांव पाल खिरोदा आमोदा रस्ता रामा क्र.४५ किमी ०/०० ते ४४/०० ची सुधारणा करणे. ता. रावेर जि. जळगांव हे काम दि. २५/०३/२०२१ ला पूर्ण करण्यात आलेले असुन सदरील रस्त्याचा देखभाल दुरुस्ती कालावधी १० वर्षे इतका आहे. आमोदा येथील खाजगी बसच्या झालेल्या अपघाताच्या अनुषंगाने पोलीस स्टेशन, फैजपुर यांच्या दि. ०६/०७/२०२५ रोजीच्या घटनास्थळ पंचनाम्यानुसार सदर अपघात "निष्काळजीपणे, हयगयीने व भरधाव वेगाने वाहन चालविल्यामुळे" झालेला आहे. सदरील रस्त्यावर आमोदा या गावाजवळ अरुंद पुलाजवळ अपघात न होणेसाठी रम्बंल स्ट्रीप, कॅट आय, सुचना फलक, दिशा दर्शक फलक, स्पीड लिमिट फलक, रेडीअम, डेलीनेटर इ. सर्व प्रकारच्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. सद्यस्थितीत सदर रस्त्यावरुन वाहतुक सुरक्षित व सुरळीत सुरु आहे.

महाराष्ट्र विधानसभा सन २०२५ चे दुसरे अधिवेशन लक्षवेधी सूचना क्र.१४०

**श्री.भास्कर जाधव, श्री. मोहन मते, श्री. सुधीर मुनगंटीवार, श्री. राजु तोडसाम,वि.स.स .यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १४०, दिनांक ०८ जुलै २०२५ पुढीलप्रमाणे आहे.**

"शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांचे उत्पादन वाढवण्यासाठी कृषि विभागीय क्षेत्रीय स्तरावर काम करणारा महत्वाचा कृषि पर्यवेक्षक संवर्ग असणे, कृषि पर्यवेक्षक संवर्ग विविध योजनांमधील मोका तपासणी करून कोट्यवधीचा निधी शेतकऱ्यांपर्यंत पोचविण्याचे काम करीत असणे, त्याचबरोबर महाडीबीटी, पोकरा यांसारख्या योजना शेतकऱ्यांना मिळवून देण्याचे कामे पर्यवेक्षक करीत असणे, असे असतानाही पर्यवेक्षक अनेक अडचणींना तोंड द्यावे लागणे, जसे वेतनात असलेल्या त्रुटी दूर करणे, पर्यवेक्षक कृषि अधिकारी असे पदनाम करणे, चार कृषि सेवकांच्या मागे एक पर्यवेक्षक अशी पदे वाढविणे, ३१ मे, २०२५ पर्यंत पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण करणे, यांसारख्या विविध अडचणी सोडविण्याच्या अनुषंगाने १० फेब्रुवारी, २०२५ रोजी कृषि पर्यवेक्षकांना आश्वस्त करण्यात आलेले असले तरी, याबाबत राज्य पातळीवर शासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप मागण्या प्रलंबितच असल्याने, राज्यभरातील कृषि पर्यवेक्षक आंदोलन करण्याच्या तयारीत असणे, यापूर्वीच मागण्या मान्य न झाल्याने कृषि सहायकांचेही आंदोलन सुरु असणे कृषि विभागातील अधिकाऱ्यांच्या तसेच कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या मान्य करण्या संदर्भात शासनाने त्वरित केलेली वा करण्यात येणारी कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

---

**श्री.माणिकराव कोकाटे, मा.मंत्री (कृषि) यांचे निवेदन**

कृषि विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या विविध मागण्या संदर्भात दिनांक ०७/०२/२०२५ रोजी आयुक्त (कृषी) व दिनांक १०/०२/२०२५ रोजी माननीय मंत्री (कृषि) यांच्या अध्यक्षतेखाली बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर बैठकीमध्ये कृषि पर्यवेक्षकांच्या विविध मागण्यांबाबत सविस्तर चर्चा होऊन मा.मंत्री (कृषि) यांनी त्यावर कार्यवाही करणेबाबत निर्देश दिलेले होते. त्यानुसार कृषि पर्यवेक्षकांच्या मागण्यांबाबतची वस्तुस्थिती व कार्यवाही थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे -

- सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने वेतनश्रेणी S-१३ (३५४००-११२४००) वरुन S-१४ (३८६००-१२२८००) सुधारित वेतनश्रेणी मंजूर करणे बाबतचा प्रस्ताव, वेतन त्रुटी निवारण समिती-२०२४ ने उप कृषि अधिकारी (कृषि पर्यवेक्षक) यांची वेतनश्रेणी मागणी मान्य केलेली नाही.
- कृषि पर्यवेक्षकांची प्रमुख मागणी ही पदनाम बदलाची असून, कृषि व पदुम विभागाचे शासन निर्णय दि.०५.०६.२०२५ अन्वये कृषि पर्यवेक्षक व कृषि सहाय्यक यांचे

,३५८

पदनामात अनुक्रमे उप कृषि अधिकारी व सहाय्यक कृषि अधिकारी असा बदल करण्यात आला आहे.

- सध्याच्या ६ कृषि सहायकांच्या मागे १ कृषि पर्यवेक्षक अशी रचना आहे. त्या ऐवजी ४ कृषि सेवकांच्या मागे १ कृषि पर्यवेक्षक ठेवण्यात यावा या मागणी संदर्भात असे नमूद करण्यात येते की, सदर बाब धोरण विषयक असून विभागाचा आकृतीबंध अंतीम करताना वित्त विभाग व उच्च स्तरीय समिती जो निर्णय घेईल तो बंधनकारक असणार आहे.

- कृषि पर्यवेक्षक संवर्गातून महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील विभागीय पदोन्नती समितीची बैठक झालेली असून, विभागीय पदोन्नती समितीने सादर केलेला प्रस्तावास सामान्य प्रशासन विभागाची मान्यता प्राप्त होणे बाकी आहे. सामान्य प्रशासन विभागाने उपस्थित केलेल्या बाबीच्या माहितीची पूर्तता झाल्यानंतर पदोन्नतीचे आदेश पारित होतील.

कृषि सहाय्यक संघटना व कृषी पर्यवेक्षक संघटना यांनी आंदोलनाबाबत निवेदन दिलेले होते, त्या संदर्भात वरीष्ठ स्तरावरील बैठकीत सकारात्मक चर्चा झालेली असून, वरील दोन्ही संघटनांनी आपले आंदोलन मागे घेतलेले आहे. कृषि आयुक्तालय व शासन स्तरावर सर्व संघटना प्रतिनिधींची बैठक झाली असून, त्यांच्या विविध मुद्यांवर नियमोचीत कार्यवाही करण्यात येत आहे.

******************************

H|730-19

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**मा.श्रीम.श्वेता महाले, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ७४७** पुढीलप्रमाणे आहे :-

" बुलढाणा जिल्ह्यात खरीप हंगामासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज केलेल्या शेतकऱ्यांसाठी तीन जून २०२५ रोजी सोयाबीन बियाण्यांची ऑनलाईन लॉटरी द्वारे निवड झाली असणे, त्यामध्ये चिखली तालुक्यातील ८२४ शेतकऱ्यांना ५११ क्विंटल बियाणे यांचे वाटप नियोजित असताना प्रत्यक्षात मंजूर बियांना पेक्षा कमी बियाणे देण्यात आल्याने गोंधळ निर्माण झालेला असणे, काही शेतकऱ्यांना ७५ किलो बियाणे मंजूर असताना केवळ ६६ किलोच बियाणे दिल्याची तक्रार शेकडो शेतकऱ्यांनी करणे या योजनेअंतर्गत तुर, मूग, उडीद, सोयाबीनचे सुधारित व प्रमाणित केलेले बियाणे १००% अनुदानावर शेतकऱ्यांना देण्यात येते त्यामुळे उत्पादनात वाढ होत असून शाश्वत शेतीला चालना मिळत असणे, त्यामुळे अल्पभूधारक शेतकरी हा प्रगत शेतीकडे वळत असल्याने बियाणे वाटपातील तूट शेतकऱ्यांना मान्य नसल्याने मंजूर झालेले १००% बियाणे शेतकऱ्यांना मिळाले पाहिजे अशी मागणी ते करीत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## निवेदन

सन २०२५-२६ मध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान-कडधान्य व राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया योजनांतर्गत कडधान्य व तेलबिया पिकांचा पिक प्रात्यक्षिके व प्रमाणित बियाणे वितरणाचा लक्षांक व मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय पातळीवर वितरीत करण्यात आल्या आहेत.

सोयाबीन व भुईमूग या पिकांचे ५ वर्षांचे आतील वाणांचे प्रमाणित बियाणे वितरणाकरिता लाभार्थी निवड महाडीबीटी पोर्टलवर प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य (FCFS) तत्वावर वितरीत करण्यात येत असून याकरिता १००% अनुदान देय आहे. तूर, मुग व उडीद या पिकांचे १० वर्षांचे आतील व १० वर्षांचे वरील वाणांचे प्रमाणित बियाणे वितरण बियाणे पुरवठादार संस्थांच्या वितरकांकडून प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य (FCFS) तत्वावर बियाणे पुरवठादार संस्थांकडून वितरीत करण्यात येत आहे. याकरिता १० वर्षांचे आतील वाणांच्या बियाणांना रु. ५०००/- प्रति क्विंटल व १० वर्षांचे वरील वाणांच्या बियाणांना रु. २५००/- प्रति क्विंटल अनुदान देय आहे.

राष्ट्रीय खाद्यतेल अभियान तेलबिया योजनेअंतर्गत सन २०२५-२६ मध्ये राज्यासाठी प्रमाणित बियाणे वितरणाचा ४६५०० क्विंटलचा लक्षांक असुन बुलढाणा जिल्ह्यास ३७५० क्विंटल लक्षांक आहे. त्यापैकी चिखली तालुक्याला सोयाबीन प्रमाणित बियाणे वितरणाचा ६०० क्विंटल लक्षांक देण्यात आला होता. त्यानुसार जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, बुलढाणा यांनी चिखली तालुक्याकरिता महाबीजकडे ६०० क्विंटल बियाणे मागणी नोंदविलेली असुन महाबीज यांनी अधिकृत विक्रेत्याकडे बियाणे उपलब्ध करून दिले आहे.

केंद्र शासनाचे मार्गदर्शक सूचनेनुसार सोयाबीन पिकासाठी ८० किलो प्रती हेक्टर, कृषी विद्यापीठाच्या शिफारशीनुसार ७५ किलो प्रती हेक्टर बियाणे आवश्यक आहे. कृषी विद्यापीठाच्या शिफारसीनुसार जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, बुलढाणा यांचेकडून सोयाबीन पिकासाठी प्रमाणित बियाणे वितरणाकरिता प्रति हेक्टरी ७५ किलो बियाणे मागणी नोंदविण्यात आली होती. महाबीज या पुरवठादार संस्थेकडे सोयाबीन बियाण्याच्या २२ किलो पॅकिंग साइजच्या पिशव्या उपलब्ध आहेत. त्यानुसार शेतकऱ्यांना २२ किलो बियाण्याच्या ३ पिशव्या (६६ किलो) बियाणे दिल्यानंतर उर्वरित खुले बियाणे देतांना बियाणे कायदा १९६६ अंतर्गत मर्यादा येत होत्या. त्यामुळे शेतकऱ्यांना खालील दोन पर्याय उपलब्ध करून देण्यात आले होते.

१) शेतकऱ्याने २२ किलो पॅकिंग साइजच्या बियाण्याच्या ४ पिशव्या (८८ किलो) बियाणे घेऊन योजनेनुसार फक्त ७५ किलो १०० % अनुदानावर असल्याने वरच्या १३ किलो साठी बाजारभावानुसार विक्रेत्याला बियाण्याचे पैसे देणे.

**अथवा**

२) शेतकऱ्याने बियाणे घेतांना २२ किलो पॅकिंग साइजच्या बियाण्याच्या ३ पिशव्या घेऊन उर्वरित ९ किलोसाठी २-३ शेतकऱ्यांनी एकत्र येऊन बियाणे विभागून घेणे.

चिखली तालुक्यातून सोयाबीन पिकासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज केलेल्या शेतकऱ्यांना FCFS (प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य) नुसार दिनांक १ जुन, ३ जुन , ६ जुन, ११ जुन व १४ जून २०२५ च्या प्रमाणित बियाणे वितरणाच्या झालेल्या निवडीमध्ये एकूण ९९७ शेतकऱ्यांची ६१६.८८ क्विंटलसाठी निवड झाली आहे व प्रत्यक्षात ९८२ शेतकऱ्यांनी ५८१.३ क्विंटल बियाणे उचल केलेली आहे.

************************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र.१७३७

**श्री. राघवेंद्र मनोहर पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १७३७ पुढीलप्रमाणे आहे:-**

"धुळे ग्रामीण विधानसभा मतदार संघ हा कृषिप्रधान असून येथील बहुसंख्य लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती असणे, मागील १५ ते २० वर्षापासून तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात बोर या पिकाची मोठ्या प्रमाणात लागवड करण्यात येणे, या पिकाचा लागवडीचे हे प्रमाण प्रतिवर्ष वाढत असून बोर या पिकाला फळपिकाचा दर्जा अद्याप मिळालेला नसणे, सदर पिकाचा प्रधानमंत्री फळपिक विमा योजनेत समावेश होवू शकला नसणे, त्यामुळे बहुसंख्य शेतकरी पीकविमा योजनेपासून वंचित राहिले असणे, बोर पिकाच्या होणाऱ्या नुकसानीची भरपाई शेतकऱ्यांना मिळालेली नसणे, त्यामुळे बोर पिकाचे उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण होणे, धुळे जिल्ह्यात बोर या पिकाचा फळपिकात समावेश होवून प्रधानमंत्री फळपिक विमा योजनेत समावेश करून स्थानिक शेतकऱ्यांना दिलासा देण्याची आवशक्यता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मा.मंत्री (कृषि) यांचे निवेदन

राज्यात प्रामुख्याने सोलापूर, धुळे व अहिल्यानगर या जिल्ह्यांमध्ये बोर पीकाचे उत्पादन घेण्यात येते. या जिल्ह्यांमध्ये बोर फळपीकाखालील क्षेत्र अनुक्रमे १५६८ हेक्टर, ३४२ हेक्टर आणि २७० हेक्टर इतके असून, अनुमानित वार्षिक उत्पन्न अनुक्रमे १७,२१३.५०४ मेट्रिक टन, २४९० मेट्रिक टन आणि १८१४.९५० मेट्रिक टन इतके आहे. राज्यातील इतर भागात बोर पीकाचे व्यवसायिक तत्वावर फारसे उत्पादन घेतले जात नाही. राज्यातील फळपीकांना विनिर्दिष्टपणे फळपीक असा दर्जा देण्यात येत नाही. त्यामुळे बोर पीकाला स्वतंत्रपणे "फळपीक" म्हणून दर्जा दिलेला नसला तरी, सदर पीक हे फळपीकात मोडते.

बोर हे उष्ण कटिबंधीय आणि उपोष्ण कटिबंधीय फळपीक आहे. त्यामुळे या पीकाची शिफारस विशेषत: कोरडवाहू व अर्ध-कोरडवाहू भागांमध्ये शाश्वत शेतीसाठी केली जाते. साहजिकच, बोर पिकाच्या वाढीसाठी पाण्याची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता नसते. बोर हे तुलनेने कमी कीड-रोग लागणारे पीक मानले जाते. यामुळे शेतकऱ्यांना कीटकनाशकांवर आणि रोगनाशकांवर कमी खर्च करावा लागतो. बोर पीकावर मोठया प्रमाणावर रोग येत नाहीत. तसेच मोठ्या प्रमाणात किडींचा देखील प्रार्दुभाव होत नाही. परिणामी बोर पीकाला फारसे हवामान धोके किंवा कीड रोग धोके नसल्याने, बोर पीकाच्या नुकसानीची शक्यता इतर फळपीकांच्या तुलनेत कमी असते. थोडक्यात बोर हे कोरडवाहू व अर्ध-कोरडवाहू भागासाठी एक आदर्श फळपीक आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजने अंतर्गत पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजनेचा समावेश असून त्याखाली वार्षिक नगदी फळपीके, ज्यांचा ठराविक हंगाम असतो, अशा फळपीकांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. त्यानुसार, सदर योजनेमध्ये महाराष्ट्रातील संत्रा, मोसंबी, डाळिंब,

चिकु, पेरु, लिंबु, सिताफळ, द्राक्ष, काजू, आंबा, केळी, पपई व स्ट्रॉबेरी या १३ पिकांचा समावेश करण्यात आला आहे.

पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेंतर्गत फळपीकांची निवड करण्यासाठी खालील प्रमुख निकष विचारात घेतले जातात :-

क) मोजता येण्याजोगे हवामान धोके आणि पीक नुकसानीशी त्याचा संबंध

ख) विश्वसनीय हवामान डेटा पायाभूत सुविधांची उपलब्धता

ग) पिकांची वैशिष्ट्ये आणि हवामान-आधारित विम्यासाठी उपयुक्तता

घ) मागील उत्पन्नाच्या डेटाची तसेच लागवडीखालील क्षेत्राच्या डेटाची उपलब्धता आणि व्यवस्थापन

ङ) आर्थिक व्यवहार्यता आणि प्रीमियम दर

पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेंतर्गत फळपीकांची निवड करताना गंभीर वाढीच्या टप्प्यांमध्ये (उदा. फुले येणे, फळधारणा, परिपक्वता) विशिष्ट हवामान घटनांना अत्यंत संवेदनशील असणारी फळपीके निवडण्यास प्राधान्य दिले जाते. बोर पीकाला प्रतिकूल हवामानाचा फारसा धोका संभवत नाही. कारण बोर पीक प्रतिकूल हवामानाला जास्त संवेदनशील नाही. याखेरीज बोर पीक हे तुलनेने कमी कीड-रोग लागणारे पीक आहे.

तथापि, बोरे या फळपीकाबाबत हवामान धोके निश्चिती व अन्य फळपीक विमा योजनेतील निकष तपासून आवश्यकतेनुसार याबाबत योग्य ती कार्यवाही करता येईल.

........

महाराष्ट्र विधान सभा
सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. सुनिल वामन प्रभू, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र.१९४१ पुढीलप्रमाणे आहे:-**

"सांगली जिल्हयातील द्राक्ष पिके, पालेभाज्या व फळ पिकांचे उत्पादक शेतकऱ्यांना पीजीआर कंपनीच्या सल्लागाराने कृषी विभागातील अधिकाऱ्यांसोबत संगनमताने बनावट औषध विक्री करुन कोटयावधी रुपयाचा अर्थिक गैरव्यवहार केल्याचा धक्कादायक प्रकार दि.०३.०७.२०२५ रोजी उघडकीस येणे, सदरहू कंपनीचे ठिकाण गल्ली बोळात पत्र्याच्या खोलीत असताना, त्यांनी दिशाभूल व फसवणूक करुन पुणे, मुंबई, ठाणे ठिकाणचा खोटा पत्ता नमूद करण्यात येणे, या कंपनीने हजारो शेतकऱ्यांना बनावट औषधाची निर्मिती, पुरवठा आणि चढ्या दराने विक्री करुन गेले दहा वर्ष ते अद्यापपर्यंत प्रंचड घोटाळा करण्यात येणे, सदरहू कंपनीचा कार्यभार कृषी अधिकारी, कंपनी चालक, सल्लागार, वितरक, कृषी सेवा केंद्र चालक, कृषी विभागातील अधिकाऱ्यांचे नातेवाईक तसेच नातेवाईकांच्या नावे बोगस कंपनीचा बनावट औषध विक्रीचा गोरख धंदा चालू असणे, कंपनीच्या सल्लागाराने पीजीआर कंपनीचे औषधे खरेदी करण्यासाठी तयार केलेल्या यादीत कृषी विभागातील अधिकारी यांचे नाव व मोबाईल नंबर असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस येणे, सदर प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन दोषीविरुध्द कठोर कारवाई करण्याची आवश्यकता,याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

**मा.मंत्री (कृषि) यांचे निवेदन**

सांगली जिल्ह्यामध्ये पी.जी.आर. कंपनीच्या सल्लागाराने कृषि अधिकाऱ्याच्या संगनमताने बनावट औषधी विक्री करुन कोटयावधी रुपयाचा आर्थिक गैरव्यव्हार होऊन ते दिनांक ०३/०७/२०२५ रोजी उघडकीस येणे, सदरहु कंपनीचे ठिकाणाचा खोटा पत्ता नमुद करणे, बनावट औषधाची निर्मीती करुन पुरवठा व चढ्या दराने शेतकऱ्यांना विक्री करणे, सदरहु कंपनीचा कार्यभार कृषि अधिकारी, कंपनी चालक, सल्लागार, वितरक, कृषि सेवा केंद्र चालक यांचे नातेवाईकांच्या नावे अनधिकृत कंपनीचा बनावट औषध विक्रीचा व्यावसाय चालु असणे, कंपनीच्या सल्लागाराने पी.जी.आर. कंपनीचे औषधे खरेदी करण्यात तयार केलेल्या यादीत कृषि विभागातील अधिकाऱ्यांचे नाव व भ्रमणध्वणी नंबरचा उल्लेख असणे या मुद्यांच्या अनुषंगाने सखोल चौकशी करण्याचे निदेश कृषि आयुक्तालयास देण्यात आलेले आहेत.

सांगली जिल्ह्यामध्ये निविष्ठांचे गुणनियंत्रण करीता जिल्हास्तरीय एक व तालुका स्तरावर १० अशी एकूण ११ भरारी पथके स्थापन करण्यात आले आहेत. सांगली जिल्हातील सर्व बीयाणे / खते / कीटकनाशके विक्रेत्यांची भरारी पथकामार्फत तपासणीचे काम नियमितपणे करण्यात येते. निविष्ठा उत्पादन करणाऱ्या कंपनीची नियमीत तपासणी करण्याच्या सूचना गुणनियंत्रण निरीक्षकांना वेळोवेळी देण्यात आलेल्या आहेत.

सेया M/664(750-7-25)

*********

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

## विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक-६७९

श्री.हिरामण खोसकर, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ६७९ पुढीलप्रमाणे आहे :-

"इजिमा -५४ ते बोरपाडा ते रायते रस्त्यावर (ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक) येथे पीएमपीएसव्हाय या यंत्रणेमार्फत पूलाचे बांधकाम अस्तित्वातील रस्त्यावर काम न करता बाजूच्या फॉरेस्ट व महसूल विभागाच्या मालकीच्या हद्दीत काम केले असल्याची बाब नुकतीच निदर्शनास येणे, ठेकेदाराने मर्जीप्रमाणे काम केल्याने रस्त्याला पूलाच्या दोन्ही बाजूला वळण तयार झाले असून याकरिता झाडांची कत्तल करण्यात येणे, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करून संबधित ठेकेदारांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कारवाई, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

### मा.मंत्री (ग्रामविकास व पंचायत राज) यांचे निवेदन

प्रधानमंत्री ग्रामसडक योजना ही केंद्र पुरस्कृत असून प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार योजना राज्यामध्ये राबवली जाते. प्रधानमंत्री ग्रामसडक योजना भाग-३ अंतर्गत नाशिक जिल्ह्यातील इजिमा -५४ ते बोरपाडा ते रायते रस्त्यावर (ता.त्र्यंबकेश्वर), दि.१५.०३.२०२४ च्या शासन निर्णयान्वये रु.१३५९.१३ लक्ष किंमतीची ३ पुलांची कामे पॅकेज क्रमांक MH-२०१३४ अंतर्गत मंजूर करण्यात आली असून या कामाचे कार्यारंभ आदेश दि.११.१०.२०२४ रोजी देण्यात आला आहे.

इजिमा -५४ ते बोरपाडा ते रायते रस्त्यावर सा.क्र.४/५०० येथे ७० मीटर लांबीच्या मंजूर पहिल्या पुलाचे बांधकाम अस्तित्वातील पुलाच्या जागेवर न करता अस्तित्वातील पुलाच्या खालील बाजूस सुरू आहे. सदर पुलाच्या बांधकामाची जागा ही वन विभागाची नसून खाजगी मालकीची आहे. अस्तित्वातील पुलाच्या ठिकाणी नविन पुलाचे बांधकामामुळे संबंधित शेतकऱ्याच्या घरास अडथळा होत असल्यामुळे अस्तित्वातील पुलाच्या खालील बाजूस काम करण्यास संबंधित शेतकऱ्याने संमती दिली तसेच सदर ठिकाणी पुलाच्या दोन्ही बाजूला अस्तित्वातील पुलाचे असलेले वळण नविन पुलामुळे कमी होत असल्याने अस्तित्वातील पुलाच्या ठिकाणी काम न करता त्याच्या खालील बाजूस काम केले आहे. सदर ठिकाणी पुलाच्या पोहचमार्ग रस्त्यासाठी आवश्यक असलेल्या जागेत झाडांची कत्तल केलेली नाही. सदर पुलाची संरचनेस सक्षम अधिकारी यांची मंजूरी घेतल्यानंतरच सदर पुलाचे बांधकाम हाती घेण्यात आलेले आहे.

सदर रस्त्यावर सा.क्र.४/२३० येथे दुसऱ्या १२० मिटर लांबीच्या पुलाचे काम मंजूर करण्यात आले असून अद्याप सदर ठिकाणी पुलाचे बांधकाम सुरु करण्यात आलेले नाही. सदर रस्त्यावर सा.क्र.३/२९० येथे तिसऱ्या ६० मी लांबीच्या पुलाचे काम मंजूर करण्यात आले आहे. सदर अस्तित्वातील पुलाच्या रायते गावाच्या बाजुकडील पोहचमार्गावर शेतकऱ्याचे घर असून अस्तित्वातील पुलाच्या ठिकाणी पुलाचे बांधकाम केल्यास पुलाची उंची व रुंदी वाढत असल्यामुळे संबंधित शेतकऱ्याने हरकत घेतली होती. त्यामुळे अस्तित्वातील पुलाच्या खालच्या बाजूला (D/S) नविन पुलाच्या पायाचे खोदकाम सुरु केले होते. तथापि कोटंबो गावाच्या बाजूकडील पोहच रस्ता वन विभागाच्या हद्दीतून जात असल्याचे निदर्शनास आल्यामुळे ठेकेदाराने काम थांबविले आहे. वन विभागाची मंजूरी घेतल्यानंतर सदर पुलाचे बांधकाम सुरू करण्यात येईल.

अस्तित्वातील जुने पुल हे कमी उंचीचे असल्याने पावसाळ्यात पुल पाण्याखाली जात असल्यामुळे वाहतुकीस अडथळा येत होता. तसेच अस्तित्वातील पुल हे अरुंद व तीव्र वळणांवर असल्याने सदर जुन्या पुलांच्या जागी उंच व रुंद तसेच जलद व सुरक्षित वाहतुकीसाठी सोयीचे व्हावे याकरिता जास्तीत जास्त सरळ तसेच अडचण विरहीत अश्या पुलांची कामे मंजूर करण्यात आली असून सदर कामे प्रगतीपथावर आहेत.

---

लक्षवेधी सूचना क्रमांक. १२५७

महाराष्ट्र विधानमंडळाचे पावसाळी अधिवेशन -२०२५

मा. श्री. राघवेंद्र पाटील, वि.स.स. यांनी नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना :

"धुळे जिल्हयातील सर्व संगणक परिचालकांचे मागील १४ वर्षापासून ग्रामपंचायत येथे ऑनलाईन कामकाज सुरु असून सी.एस.सी., एस.पी.व्ही. या कंपनीमार्फत नियुक्ती देणे, मानधनाच्या नावाखाली ग्रामपंचायतमधुन दरमहा १२५०० रू. एवढी रक्कम कंपनीकडे वर्ग करण्यात येणे, परंतू त्यांना ६-६ महिने मान्धन मिळत नसल्याची बाब माहे, जून २०२५ च्या चौथ्या आठवड्यात निदर्शनास येणे, तसेच संगणक व प्रिंटर नादुरूस्त असणे, कंपनीकडे देखभाल दुरूस्तीचे काम असून देखील पैसे ग्रामपंचायत कंपनीला दरमहा देत असतानाही वर्षात एकदाही संगणक व प्रिंटर दुरूस्त करून न देणे, तसेच सर्वच ग्रामपंचायतीला इंटरनेटची व्यवस्था नसून संगणक परिचालक हे स्वतःच्या खर्चातून इंटरनेट वापरून ग्रामपंचायचे ऑनलाईन कामे करत असणे, संगणक परिचालक यांना देखील कुटूंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी पैशांची गरज भासते, मुलांचे शिक्षण, आरोग्य या गोष्टींना दररोज तोंड द्यावे लागणे, ग्रामपंचायत अंतर्गत कामे देखील संगणक परिचालक प्रामाणिकपणे करत असून ते स्वतःच्या मोबाईलचे इंटरनेट वापरुन ऑनलाईन कामे करत असून यांचे वेतन मानधन ५ ते ६ महिने उशिरा होत असल्याने त्यांच्या मनामध्ये चिडेची भावना निर्माण होणे, संपूर्ण महाराष्ट्रातल्या ग्रामपंचायतेतून संगणक परिचालक वेतन व संगणक देखभाल दुरुस्ती यासाठी ग्रा.प.च्या वित्त आयोगातून ठरल्याप्रमाणे नियमित स्वरूपात निधी देण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

मा. मंत्री (ग्रामविकास) यांचे निवेदन:-

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पंचायतराज संस्थांच्या कारभारामध्ये ई - पंचायत प्रकल्पांतर्गत अभिप्रेत असलेला सर्व कारभार संगणीकृत करुन एकसुत्रता व पारदर्शकता आणणे (G2G) , नागरिकांना विविध प्रशासकीय विभागांतर्गत आवश्यक सेवा दाखले (G2C) तसेच, इतर व्यावसायिक सेवा (B2C) व बँकिग सेवा (FI) इ. सेवा ग्रामीण जनतेला एकाच केंद्रावर त्यांच्या रहिवासी क्षेत्रात कालबध्द स्वरुपात मिळण्याच्या उद्देशाने राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये आपले सरकार सेवा केंद्र दि. ११ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आली आहेत. तेव्हापासुन जून, २०२४ पर्यंत CSC eGovernance India ltd. यांच्यामार्फत सदर प्रकल्प राबविण्यात येत होता. आता दि.१९.०९.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर प्रकल्प आई टी

आई लिमिटेड व रेलटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड यांचेमार्फत राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर दोन्ही कंपन्यांची नियुक्ती त्यांच्या कार्यक्षेत्राचे विभाजन करून १ वर्षाच्या कालावधीसाठी करण्यात आलेली आहे.

राज्यात २०,७९० इतके आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करण्यात आलेली आहेत. सदर केंद्रांमध्ये संगणक परिचालक/ ग्रामोद्योजक यांची नियुक्ती आई टी आई लिमिटेड व रेलटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड यांचेमार्फत करण्यात येते. ग्रामपंचायत प्रशासनाचे संगणकीकरण (G२G व G२C) करण्यासाठी संगणक परिचालक/ ग्रामोद्योजक यांना दरमहा रू. १०,०००/- इतके मानधन देण्यात येते. याव्यतिरिक्त केंद्रचालक हे ग्रामोद्योजक (VLE) असून B२C सेवा ग्रामस्थांना पुरविल्यावर त्याचा अतिरिक्त मोबदला त्यांना देय असतो.

सदर आपले सरकार सेवा केंद्राचा खर्च रू. १३, ४६३/- (करासह) इतका ग्रामपंचायतीच्या स्वउत्पन्नामधून भागविण्यात येतो. ग्रामपंचायतीच्या स्वउत्पन्नामध्ये ग्रामपंचायतींचे स्वत:चे उत्पन्न, केंद्रीय वित्त आयोगातून प्राप्त निधी,आदिवासी विकास विभागाकडून प्राप्त निधी, इतर कोणताही मुक्त निधी ज्याचा पूर्णपणे खर्च करण्याचा ग्रामपंचायतींना अधिकार आहे, अशा बाबींचा समावेश होतो.

संगणक परिचालकांना G२G व G२C सेवेसाठी देय असलेली रूपये १०,०००/- प्रतिमाह मोबदल्याची रक्कम त्यांच्या उपस्थितीच्या प्रमाणात संबंधित ग्रामपंचायत त्यांच्या स्वनिधीतून प्रचलित देयक संगणक प्रणालीनुसार जिल्हा परिषदेमार्फत संचालक (पंचायतराज) राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान, पुणे यांच्याकडे जमा करते व त्यांच्या मार्फत एकत्रित रक्कम कंपनीला अदा करण्यात येते . तद्नंतर, केंद्र चालकांचे मानधन संबंधित कंपनीमार्फत त्यांच्या बँक खात्यात जमा केले जाते .जिल्हा परिषदांना ग्रामपंचायतींचा एकत्रित निधी जमा करून संचालक (पंचायतराज) , राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान, पुणे यांच्याकडे जमा करण्याच्या या प्रक्रियेला काही कालावधी लागत असल्याने, मानधन अदा करण्यास विलंब होतो. सध्या केंद्रचालकांचे मार्च, २०२५ पर्यंतचे मानधन अदा केले असून माहे एप्रिल, २०२५ पासूनचे देयक अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे. आपले सरकार सेवा केंद्र (ग्रामपंचायत) या प्रकल्पासाठीच्या कंन्झ्युमेबल्स, प्रशिक्षण सहाय्य व व्यवस्थापन इ. करिता प्रति केंद्र प्रति माह रक्कम रू.२९३५/- अधिक कर इतकी रक्कम आई टी आई लिमिटेड व रेलटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड यांना प्रचलित संगणक प्रणालीद्वारे अदा करण्यात येते. त्या रकमेतून आपले सरकार सेवा केंद्र (ग्रामपंचायत) या प्रकल्पासाठी ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार संबंधित कंपनीकडून हार्डवेअरची दुरूस्ती करून देण्यात येते.

वरीलप्रमाणे महाराष्ट्रातील सर्वच ग्रामपंचायतमध्ये संगणक परिचालकांच्या संदर्भात मानधन अदा करणे , प्रिंटर्स दुरूस्ती करणे याबाबत एकच कार्यपध्दती अवलंबविण्यात येते. त्यानुसार धुळे जिल्ह्यात ५५७ इतक्या ग्रामपंचायती असून एकूण ४९५ इतके आपले सरकार सेवा केंद्र आहेत. सदर आपले सरकार सेवा केंद्रातील सर्व केंद्रचालकांचे मार्च, २०२५ पर्यंतचे मानधन अदा केले आहे , माहे एप्रिल पासूनचे मानधन अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच

काही केंद्रात प्रिंटर दुरूस्तीच्या बाबी आढळून आल्या असून, त्या दुरूस्त करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच धुळे जिल्ह्यात ५५७ ग्रामपंचायतींना डिजिटल इंडिया सार्वजनिक इंटरनेट कार्यक्रमांतर्गत ५४३ ग्रामपंचायतींना इंटरनेट सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्याअंतर्गत ग्रामपंचायतीतील इंटरनेट सुविधेचा वापर आपले सरकार सेवा केंद्रांकरिता करण्यात येत आहे.

*********

महाराष्ट्र विधानसभा, सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन
लक्षवेधी सूचना

मा. श्री. रवी राणा, विधानसभा सदस्य यांनी विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधीसूचना क्र. १५६७ खालीलप्रमाणे आहे-

"पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब वर्ग ) २५१५_२५६५ श्री. सूर्यवंशी वाल्मिकी मठ संस्थान सामदा काशीपूर तालुका दर्यापूर जि. अमरावती हे पुरातन "ब" तीर्थक्षेत्र असून तेथील येणाऱ्या भक्तांना अपुऱ्या पडत असणाऱ्या सोयीसुविधा पुरविण्याबाबत तेथील वरील संस्थांशी आस्था असणारे समाजसेवक उमेश ढोणे यांनी जी.प. अमरावती यांच्याकडे पाठपुरावा करुन जी.प.ने रक्कम रुपये १६.१३९३ कोटी ची मागणी प्रस्ताव ग्राम विकास विभाग, मंत्रालय यांना पाठवून तो प्राप्त झाला असणे, त्यावर विधानसभा सदस्य लोकप्रतिनिधी यांनी ही मा. ग्रामविकास मंत्री यांना पत्र देऊन वरील नमूद मागणी मंजूर करण्यात यावी त्यांची मागणी ची दखल घेत मा. मंत्री यांनी माहे मे मध्ये प्रधान सचिव, ग्रामविकास यांना लेखी सूचना देऊन निधी मंजूर करण्यात यावा करण्यासंबंधाने पत्र दिले असणे, मुख्यमंत्री सचिवालय कक्ष, अमरावती, विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती, या कार्यालयाचे विशेष कार्यकारी अधिकारी यांनीही त्यांचे पत्र क्र.६८/२५ ६८ २५ दि.०६/०३/२५ चे पत्र मुख्यमंत्री सचिवालय कक्ष यांना पाठवून निधी मंजूर करण्यात यावा या संबंधाने शिफारस केली असणे, शासनाने तातडीने प्रस्ताव मंजूर करुन निधी मंजूर करण्याची आवश्यकता असणे, या संबंधाने निर्णय घेणे त्या संबंधाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे निवेदन

"पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब वर्ग)" या योजनेतंर्गत "श्री सूर्यवंशी महर्षी वाल्मिकी मठ संस्थान, सामदा काशीपूर ता. दर्यापुर जि. अमरावती" या तीर्थक्षेत्रास "ब" वर्ग दर्जा प्राप्त आहे. सदर तीर्थक्षेत्रास जिल्हा परिषद, अमरावती यांच्या प्रस्तावानुसार यापूर्वीच ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक: तिर्थवि-२०२३/प्र.क्र.२७१/योजना-११, दि. १३ मार्च, २०२४ अन्वये रु. २००.६० लक्ष ची प्रशासकिय मान्यता प्रदान करुन प्रशासकीय मान्यतेच्या १०% म्हणजेच रु २०.०० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत प्रशासकीय मान्यता प्राप्त कामे प्रगतीत आहेत.

२. श्री सूर्यवंशी महर्षी वाल्मिकी मठ संस्थान, सामदा काशीपूर ता. दर्यापुर जि. अमरावती या तीर्थक्षेत्रास रू. २५.०० कोटी निधी उपलब्ध करून देण्याची विनंती मा. श्री. रवी राणा, विधानसभा सदस्य यांनी श्री.उमेश महादेवराव ढोणे, महासचिव म.कृ.स. यांच्या पत्रास अनुसरून केली होती. या पत्रातील विनंतीनुसार सदर तीर्थक्षेत्राचा रू. २५.०० कोटींचा प्रस्ताव सादर करण्याचे जिल्हाधिकारी, अमरावती यांना दि. २७ जून, २०२४ व दि. ०५ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या पत्राव्दारे कळविण्यात आले आहे. त्याअनुषंगाने कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, अमरावती यांनी रू. १६१३.९३ लक्ष किंमतीचा प्रस्ताव दि. १८.०२.२०२५ रोजी जिल्हाधिकारी, अमरावती यांना सादर केला होता. परंतु, सदर प्रस्तावामध्ये त्रुटी असल्याने जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दि. ०७.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये त्रुटींची पुर्तता करून प्रस्ताव फेर सादर करण्याचे कळविले. सदर प्रस्ताव अद्याप या विभागास प्राप्त झालेला नाही.

*****************************

महाराष्ट्र विधानसभा, सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन
लक्षवेधी सूचना

मा. श्री. रवी राणा, विधानसभा सदस्य यांनी विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १९५३ **खालीलप्रमाणे आहे.**

"श्री. संत अच्युत महाराज संस्थान शेंदूरजना बाजार ता. तिवसा जि. अमरावती या "ब वर्ग तीर्थक्षेत्राचा" विकास करण्याकरिता विकास आराखड्यास मान्यता देण्यासाठी शासनाचे ग्रामविकास विभागाचे कक्ष अधिकारी यांचे पत्र क्र. १०३८/दि.०६/०३/२५ रोजी चे जिल्हाधिकारी अमरावती यांना प्राप्त पत्रान्वये जिल्हाधिकारी यांचे त्यांचे कडील कार्यवाही पूर्ण करून शासनाला प्रस्ताव पाठवण्याचे निर्देशीत केले असणे. शासनाने परिपूर्ण प्रस्ताव मागूवून निधी मंजूर करण्याची मागणी श्री. संत अच्युत महाराजांचे लाखो अनुयायी, भाविक भक्तांकडून सातत्याने लोकप्रतिनिधी यांच्याकडे व शासनाचे कडे होत असणे. यासंबंधी शासनाने घ्यावायाचा निर्णय, करावयाची कार्यवाही व शासनाची [redacted] प्रतिक्रिया"

---

मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे निवेदन

"श्री. संत अच्युत महाराज संस्थान शेंदूरजना बाजार ता. तिवसा जि. अमरावती" या तीर्थक्षेत्राचा "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेतंर्गत" रु.२४.५४ कोटी निधी उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, अमरावती यांच्याकडून दि.१४.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये दि.२२.१०.२०२४ रोजी या विभागास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावाची किंमत रु.५.०० कोटी पेक्षा जास्त असल्याने, नियोजन विभाकडील शासन निर्णय दि.०४.०६.२०२५ अन्वये मा.पालकमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीची व जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय कार्यकारी समितीची मान्यता घेऊन सादर करणे आवश्यक आहे. त्यामुळे या विभागाच्या दि. ०६.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये त्रुटीची पूर्तता करून प्रस्ताव सादर करणेबाबत जिल्हाधिकारी, अमरावती यांना कळविण्यात आले होते.

२. तसेच, जिल्हाधिकारी, अमरावती यांना दि.१९.०९.२०२५ रोजीच्या स्मरणपत्राद्वारे प्रस्ताव सादर करणेबाबत कळविले आहे. प्रस्ताव अद्याप या विभागास प्राप्त झालेला नाही. याबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांना स्मरणपत्र पाठवून पाठपुरावा करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर नियमोचित कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

**************************

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन
महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ८९७

**मा. श्री. रईस शेख, मा. श्री. विजय वडेट्टीवार व श्री. अबू आझमी सन्माननीय विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"तत्कालीन सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग भंडारा सुकेशिनी तेलगोटे यांनी आपल्या कार्यकाळात जिल्हयात अनुसूचित जातीच्या उपयोजनेअंतर्गत क्रीडांगण विकास योजनेसाठी वितरित केलेल्या रक्कमेचा गैरवापर करुन कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे नुकतेच माहे जून, २०२५ मध्ये उघडकीस येणे, तत्का. सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग, भंडारा यांनी निविदा प्रक्रिया न राबविता विविध शासकिय शाळा आणि वसतिगृहांसाठी ६५ लाख रुपयांची रक्कम वितरित करणे, सदरहू रक्कम राजेदहेगांव येथील शाळा आणि पवनी, लाखांदूर, भंडारा आणि साकोली येथील वसतीगृहांमध्ये खर्च केल्याचे समोर येणे, शासकीय तरतूद केलेली नसतांनाही आपल्या मर्जीतील अशोका हायटेक एनर्जी सारख्या बहुउददेशीय संस्थांना धनादेश अदा करणे, पुरवठादारांकडून कोटेशन न घेताच देयके अदा करणे, त्याचबरोबर तत्का. सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग, भंडारा यांनी नागपूर जिल्हयातील ३० शासकीय वसतीगृहे व निवासी शाळामधील भोजन ठेकेदारां-यांच्या कामांचे देयके प्रलंबित ठेवून देयके मंजूर करण्यासाठी केलेली पैशांची मागणी, शासकिय कर्मचा-यांना राजकीय व्यक्तींच्या नावाने धमकावणे, अशा अनेक तक्रारी असणे, तत्का. सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग भंडारा श्री. सुकेशिनी तेलगोटे यांनी त्यांच्या कार्यकाळात केलेल्या कामांच्या अनियमितता व गैरव्यवहार पाहता त्यांनी केलेल्या सर्व कामाची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनान तातडीने लक्ष घालून दोषींविरुध्द कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, शासनाची प्रतिक्रिया व भूमिका".

**मा. मंत्री, सामाजिक न्याय यांचे निवेदन**

श्रीमती सुकेशिनी तेलगोटे, सहायक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर यांनी सहायक आयुक्त, समाज कल्याण, भंडारा या पदावर कार्यरत असताना केलेल्या कथीत भ्रष्टाचाराची चौकशी करुन त्यांना तात्काळ निलंबित करण्याबाबत श्री. रविंद्र एन. कौटंबकार, मुख्य संपादक, दैनिक साहसिक, वर्धा यांनी दि. २८.०४.२०२५ रोजी प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, नागपूर या कार्यालयाकडे तक्रार केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्याकरीता प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, नागपूर यांनी दि. २८.०४.२०२५ च्या आदेशान्वये लेखाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत केली होती. त्यानुसार चौकशी समितीने दि. १५.०५.२०२५ रोजी प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, नागपूर या कार्यालयास सादर केलेला अहवाल समाज कल्याण आयुक्तालयाने दि. २५.०६.२०२५ रोजी सादर केला आहे. सदर चौकशी समितीच्या विरुध्द श्रीमती तेलगोटे यांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर येथे मूळ अर्ज क्र. ६६०/२०२५ दाखल केला आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

क्रिडांगण विकास योजनेंतर्गत क्रिडांगण सपाटीकरण, क्रिडांगणावर पाण्याची व्यवस्था करणे व क्रिडांगणावर फ्लड लाईट लावणे या बाबीसाठी जिल्हा नियोजन समिती, भंडारा यांनी प्रशासकीय मान्यता दिली असून त्याचा निधी जिल्हा क्रिडा अधिकारी, भंडारा (कार्यान्वयीन यंत्रणा) यांचेकडे बीडीएस वर वितरीत केला. जिल्हा क्रिडा अधिकारी, भंडारा यांनी प्रशासकीय मान्यतेतील अट क्र. २ नुसार एकत्रित ई-

निविदा कार्यप्रणालीचा अवलंब न करता व योजना त्यांच्यास्तरावर न राबविता समाज कल्याण विभागाच्या अखत्यारीतील ५ वसतिगृहे व १ निवासी शाळेच्या आहरण व संवितरण अधिकारी यांच्या बँक खात्यात निवड झालेल्या कामाचा निधी रु. ५०.०० लाख दि. १५.०३.२०२२ च्या निधी वितरण आदेशान्वये थेट वर्ग केला. सदर निधी वितरण आदेशाची प्रत जिल्हा क्रिडा अधिकारी, भंडारा यांनी सहायक आयुक्त, समाज कल्याण, भंडारा यांना अग्रेषित किंवा पाठविण्यात आल्याचे लेखाधिकारी यांच्या अहवालावरुन दिसून येत नाही.

जिल्हा नियोजन समिती, भंडारा यांच्या प्रशासकीय मान्यतेनुसार विहित प्रयोजनासाठी खर्च करणे, विहित निकषानुसार खर्च करणे, पूर्णत्वाचे दाखले घेणे, उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे, गैरव्यवहार / लेखा आक्षेप तसेच काम पूर्ण झाल्यावर देखभाल दुरुस्ती या सर्व बाबीसाठी कार्यान्वयीन यंत्रणा यांना अंतिमत: जबाबदार ठरविण्यात आले आहे. एकूणच रु. ५०.०० लाख एवढा निधी सहायक आयुक्त, समाज कल्याण, भंडारा यांनी वसतिगृहांना तसेच निवाशी शाळेला वितरीत केला नसून, जिल्हा क्रिडा अधिकारी, भंडारा यांनी वसतिगृहांना व निवासी शाळेला परस्पर वितरीत केला आहे. चौकशी अहवालानुसार साहित्याचे प्रदान संबंधित वसतिगृह व निवासी शाळेच्या आहरण व संवितरण अधिकारी यांनी पुरवठादारांना केले आहे. याशिवाय सहायक आयुक्त यांच्या दबावाखाली व त्यांचे मौखिक निर्देशावरुन आहरण व संवितरण अधिकारी असलेल्या गृहपालांनी त्यांची वैयक्तिक जबाबदारी लक्षात न घेता धनादेशाचे प्रदान केले असे लेखी दिलेल्या बयाणाव्यतिरीक्त कोणतेही ठोस पुरावे चौकशी अहवालात दिसून आलेले नाही.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि. ०६.११.२०२३ च्या शासन निर्णयानुसार विभागांतर्गत सर्व मुलामुलींचे शासकीय वसतिगृहे व निवासी शाळा येथे प्रवेशित विद्यार्थ्यांना भोजन पुरवठा करण्यासाठी मे. कैलास फुड किराणा जनरल स्टोअर्स **JV with** ब्रिक्स इंडिया प्रा. लि. या नवीन पुरवठाधारकाची दि. १५.११.२०२३ पासून निवड करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर पुरवठाधारकाकडून नागपूर जिल्ह्यातील सर्व २५ शासकीय वसतिगृहे व २ निवासी शाळेमध्ये भोजन पुरवठा सुरु आहे. सदर शासकीय वसतिगृहे व निवासी शाळेमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांचे हजेरीनुसार सहायक आयुक्त कार्यालयास प्राप्त झालेल्या भोजनाची देयके वरिष्ठ कार्यालयास मंजूरीसाठी सादर करण्यात येतात. त्यानुसार सदर पुरवठाधारकांचे भोजनाच्या देयकांना शासनस्तरावरुन मंजूरी प्रदान करुन देयके अदा करण्यात येतात.

************

लक्षवेधी सूचना क्र.९०८

## महाराष्ट्र विधानसभा, सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

डॉ.तुषार राठोड, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम क्र.१०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.९०८ पुढीलप्रमाणे आहे:-

"मुखेड जि.नांदेड तालुक्यात अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातील मान्यवर व्यक्तींचे स्मारक बांधणे,ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्ट्या महत्व असलेल्या स्थळांचा विकास करणे या योजनेतंर्गत नारायण काळबा गायकवांड रा. पेठवडज या व्यक्तीने नोंदणी रद्द झालेल्या स्वंयसेवी संस्थेच्या माध्यमातून ऐतिहासिक पाश्र्वभूमी नसलेल्या तीन गावात महापुरुषांचे स्मारक बांधकामासाठी सुमारे ३०.०० कोटी रुपये अटीशर्तीचे उल्लंघन करुन नियमबाह्य पध्दतीने योजनेवरील प्रत्यक्ष झालेल्या कामापेक्षा अधिकची रक्कम उचल केल्याचे माहीती समोर येणे, सद्यस्थितीत काम अर्धवट असणे, उपरोक्त व्यक्तीने अध्यक्ष व इतर पदाधिकारी म्हणून वेगवेगळया जातीधर्माचे बनावट प्रतिज्ञा पत्र, खोटे शपथ पत्र सादर करुन शासकीय अनुदानाचे अपहार करुन शासनाची फसवणूक केल्याचे दिसून येणे, लाभ घेणे, अशाप्रकारे शासन, अल्पसंख्याक विभाग व सामाजिक न्याय विभागाची अनधिकृत रक्कमेची उचल केल्याचे दिसून येणे, अपहार असणे, खोटे कागदपत्रे तयार करुन शासनाची फसवणूक करण्याचा प्रकरणात दिवसेंदिवस होत असलेली वाढ उपरोक्त प्रकरणी दोषी असणा-या स्वयंसेवी संस्थेचे पदाधिकारी, संबंधित विभागाचे अधिकारी यांच्यावर कडक कारवाई होण्याची नितांत आवश्यकता असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने सखोल चौकशी करुन शासन स्तरावर करावरायची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भुमिका."

श्री.संजय शिरसाट, मा. मंत्री (सामाजिक न्याय) यांचे निवेदन

सामाजिक न्याय विभागाच्या दि.०५.११.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील मान्यवर व्यक्तिंचे स्मारके बांधणे तसेच अनुसूचित जातीसाठी सांस्कृतिक व ऐतिहासिकदृष्ट्या महत्व असलेल्या स्थळांचा विकास करणे व अनुसूचित जातीच्या सांस्कृतिक व नितीमुल्यांवर आधारित विकास साधणाऱ्या प्रकल्पांसाठी स्वयंसेवी संस्थांना अनुदान मंजूर करण्याविषयीची निकष व नियमावली (लेखाशीर्ष २२२५ ३६३६) निश्चित करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत स्वयंसेवी संस्थांना अनुदान मंजूर करण्यात येते. सदर योजनेंतर्गत सांस्कृतिक भवन, विपश्यना केंद्र, प्रशिक्षण केंद्र, वाचनालय, रिसर्च सेंटर, अभ्यासिका इत्यादींचे बांधकाम करण्यासाठी. स्वयंसेवी संस्थांना अनुदान उपलब्ध करुन दिले जाते. प्रस्तावित प्रकल्पाच्या एकूण अंदाजपत्रकीय खर्चामध्ये शासनाचा हिस्सा ९० टक्के इतका व संबंधित संस्थेचा हिस्सा १० टक्के असणे बंधनकारक आहे.

श्री. नारायण काळबा गायकवाड रा.पेठवडज या व्यक्तीच्या एकूण तीन संस्थांना उपरोक्त योजनेंतर्गत अनुदान मंजूर करण्यात आले आहे. सदर संस्थेची नावे व संस्थेच्या प्रकल्पाकरीता मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे आहे-

१. जनकल्याण विकास मंडळ, पेठवडज ता. कंधार जि. नांदेड (नोंदणी क्र. एफ-६७२५)

विभागाच्या शासन निर्णय दि. २७ फेब्रुवारी, २०१८ अन्वये मौजे-खरब खंडगाव स्वरुप-डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक बांधकामाकरीता रु. १.९८ कोटी रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. सदरचे काम पूर्ण झालेले आहे. उपरोक्त स्मारकाच्या वाढीव बांधकामाच्या प्रस्तावास विभागाच्या शासन निर्णय दि. २३ जून, २०२२ अन्वये रु.४.९९ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार बांधकामास सुरुवात झाली असून शासन निर्णयातील नियम व अटीनुसार ३०% बांधकाम झाले नसल्याने बांधकाम ठेकेदारास अद्याप रक्कम अदा करण्यात आली नाही.

२. महाराष्ट्र सुराज्य मेमोरियल ट्रस्ट, होकर्णा तांडा, ता. मुखेड जि. नांदेड (नोंदणी क्र. एफ-६६०१)

विभागाच्या शासन निर्णय दि.०८ मार्च, २०१९ अन्वये मौजे - होकर्णा तांडा, मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे महात्मा ज्योतिबा फुले स्मारक बांधकामाकरीता रु. ४.९९ कोटी एवढया रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदरचे काम पूर्ण झाले आहे.

उपरोक्त स्मारकाच्या वाढीव बांधकामाच्या प्रस्तावास शासन निर्णय दि. १६ मार्च २०२४ अन्वये रु. ९.९९ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला असून बांधकामास सुरुवात झाली आहे. परंतु शासन निर्णयातील नियम व अटीनुसार ३०% बांधकाम झाले नसल्याने बांधकाम ठेकेदारास अद्याप रक्कम अदा करण्यात आली नाही.

३. जय केदारनाथ सेवाभावी संस्था वाकद, ता. भोकर, जि. नांदेड. (नोंदणी क्र. एफ-८३२३)

शासन निर्णय दि. १६ सप्टेंबर, २०१९ अन्वये मौजे-चिवळी, ता.मुखेड, जि.नांदेड येथे राजर्षी शाहु महाराज स्मारक बांधकामाकरीता रु. ८.९२ कोटी एवढ्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून सद्यस्थितीत ८५% काम पुर्ण झाले आहे. तथापि, प्रकल्प किमतीच्या एकुण रक्कमेपैकी ७५% रक्कम बांधकाम ठेकेदारास अदा करण्यात आली आहे.

श्री. नारायण काळबा गायकवाड, रा. पेठवडज या व्यक्तीच्या दोन संस्था रद्द करण्यात आल्या होत्या. परंतु धर्मादाय सह आयुक्त,सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नांदेड विभाग, नांदेड यांच्या दि.०५.०५.२०२५ रोजीच्या पत्रानुसार अपील/रिव्हिजन मध्ये दि.९.८.२०२१ व २७.०९.२०२१ रोजीच्या आदेशान्वये सदरहु संस्था पुनर्जिवित करण्यात आल्या असून सदर संस्था कार्यरत आहेत.

उपरोक्त तीन गावात महापुरुषांचे स्मारक बांधकामास विभागाच्या शासन निर्णय दि.१६.१२.२०१५ व दि.०५.११.२०२० मधील नियम व अटीनुसारच मान्यता प्रदान करण्यात आली असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुल्यांकन दाखला प्राप्त करुन तेवढयाच मूल्यांची रक्कम बांधकाम कंत्राटदारास अदा करण्यात आली आहे. सबब, शासकीय अनुदानाचे अपहार करुन शासनाची फसवणुक केल्याचे निदर्शनास आले नाही. तसेच सदरहु तीन्ही संस्थेचे अध्यक्ष, पदाधिकारी व सदस्यांचे जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्राची शहानिशा केली असता संस्थानिहाय सदस्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे-

I. जनकल्याण विकास मंडळ, पेठवडज ता. कंधार जि. नांदेड. या संस्थेमध्ये एकुण ७ सदस्य असून सर्वजण मांग जातीचे (Schedule Caste) असल्याचे आढळून आले आहे.

II. महाराष्ट्र सुराज्य मेमोरियल ट्रस्ट, होकर्णा तांडा, ता. मुखेड जि. नांदेड, या संस्थेमध्ये एकूण ९ सदस्य असुन सर्वजण मांग जातीचे (Schedule Caste) असल्याचे आढळुन आले आहे.

III. जय केदारनाथ सेवाभावी संस्था वाकद, ता. भोकर, जि. नांदेड या संस्थेमध्ये एकुण ७ सदस्य असून पैकी ५ सदस्य मांग जातीचे (Schedule Caste) व इतर २ सदस्य खुल्या प्रवर्गाचे असल्याचे आढळून आले आहे.

जनकल्याण विकास मंडळ या संस्थेस अल्पसंख्याक स्वयंसेवी संस्थेची मान्यता प्राप्त आहे. तसेच शासनाच्या निधीची अनाधिकृतरीत्या उचल किंवा निधीचा अपहार अशा बाबी झाल्याचे निदर्शनास आलेल्या नाहीत.

**********************

लक्षवेधी सूचना क्र.१८१०

## सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. राजकुमार बडोले, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"सामाजिक न्याय विभागाद्वारे औद्योगिक सहकारी संस्थांना आर्थिक अनुदानाची योजना मागील ३५ वर्षापासून राबविण्यात येत असणे, असे असतांना, अनुसूचित जातीच्या मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्थांना अनुदान देताना मागील ३५ वर्षात फक्त मराठवाडा, कोल्हापूर,सातारा, सांगली या भागातील ९० टक्के संस्थांना त्यामध्ये अनुदान देण्यांत येत असणे, तथापि त्यामध्ये विदर्भातील विशेषत: गोंदिया,गडचिराली, भंडारा या जिल्हयातील संस्थांना मात्र डावलण्यात येत असणे, तसेंच यापूर्वी देखील सन २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीत सुध्दा भंडारा, गोंदिया,गडचिरोली जिल्हयातील एकाही संस्थेचा अनुदान वाटपात समावेश करण्यांत आला नसल्याचे आढळून येणे, सदर योजनेत लाभार्थी निवडताना प्रादेशिक समतोल व जिल्हयाचा समतोल राखणे आवश्यक असून त्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यांत यावा व गोंदिया, भंडारा, गडचिरोली या जिल्हयांचा अनुदान वाटपामध्ये समावेश करण्यांत यावा अशी मागणी, मा.मंत्री महोदय यांना तेथील मा.लोकप्रतिनिधीं यांनी दि.१६ मे, २०२५ मध्ये पत्रान्वये आग्रही मागणी करण्यांत आलेली असणे, परिणामी, गोंदिया, गडचिरोली व भंडारा जिल्हयातील जनतेत निर्माण झालेले संभ्रमाचे वातावरण व शासनाप्रति चिडीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व त्याबाबत शासनाची भुमिका."

## श्री.संजय शिरसाट, मा.मंत्री यांचे निवेदन

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांचा सहकाराच्या माध्यमातून विकास साधण्यासाठी त्यांच्या औद्योगिक सहकारी संस्थांना अर्थसहाय्य देण्यासाठी "अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना अर्थसहाय्य करण्याची योजना" शासन निर्णय, दिनांक २२.०५.२००८ अन्वये सुरु करण्यात आलेली आहे. राज्यातील कोणत्याही जिल्ह्यातील सहकारी संस्था सदर योजनेकरीता अर्ज करू शकत होत्या. यामध्ये विभागनिहाय किंवा प्रदेशनिहाय कोणत्याही प्रकारची अर्जदारांची संख्या निश्चित करण्यात आली नव्हती.

सदर योजनेंतर्गत, अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या यंत्रमाग सोसायटया, निटींग गारमेंटस, कापड प्रोसेसिंग युनिट, शेतीमालावर प्रक्रिया करणाऱ्या सहकारी संस्था, साखर कारखान्याचे खांडसरी कारखान्यात रुपांतरीत करणे व तत्सम उद्योगांना अर्थसहाय्य व कर्ज उपलब्ध करुन देण्यात येते.

अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांच्या प्राप्त प्रस्तावांची सदर योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीसंदर्भात कागदपत्रांची छानणी व तपासणी केल्यानंतर सदरच्या प्रस्तावांमध्ये १०० टक्के अटींची पूर्तता होत असल्यास संबंधित सहकारी संस्थेस प्रकल्प मुल्याच्या ३५% शासकीय भागभांडवल व ३५% कर्ज असे एकूण ७०% अर्थसहाय्य मंजूर करण्यात येते. सदर योजना सुरू झाल्यापासून आजपर्यंत एकूण ५०७ संस्थांना मंजुरी देण्यात आलेली असून या योजनेंतर्गत भंडारा जिल्ह्यात ४ व गडचिरोली जिल्ह्यात २ संस्थांना मंजुरी देण्यात आलेली आहे.

सदर योजनेंतर्गत निधी उपलब्धतेच्या प्रमाणात अधिकचे प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्याने साधारणत: २०१२ नंतर कोणत्याही नविन औद्योगिक सहकारी संस्थांच्या प्रस्तावांना राज्य शासनाने मान्यता न देता शासन स्तरावर मंजूरीसाठी प्रलंबित असलेले ४४९ संस्थांचे प्रस्ताव समाज कल्याण आयुक्तालयास परत पाठविण्यात आलेले आहेत. प्रलंबित ४४९ प्रस्तावांमधून प्राप्त प्रस्तावांची छाननी करण्यासाठी सह सचिव (अजाक) यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना दिनांक २६.१०.२०१८ च्या शासन निर्णयान्वये केलेली आहे. सदर प्रलंबित ४४९ प्रस्तावांचे विभागनिहाय वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | विभागाचे नाव | प्रलंबित प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | नागपूर | ०१ |
| २. | अमरावती | २४ |
| ३. | पुणे | १६९ |
| ४. | छत्रपती संभाजीनगर | १९९ |
| ५. | लातूर | ३४ |
| ६. | नाशिक | ०९ |
| ७. | कोकण | १३ |
| | एकूण | ४४९ |

सदर ४४९ प्रस्तावामध्ये भंडारा, गोंदिया व गडचिरोली या जिल्ह्यातील एकाही संस्थेचा प्रस्ताव प्राप्त नसल्याने सदर जिल्ह्यातील संस्था मंजूर होत नसल्याची तसेच सदर योजनेत लाभार्थी निवडताना प्रादेशिक समतोल, जिल्ह्याचा समतोल राखला जात नसल्याची बाब खरी नाही.

************

लक्षवेधी सूचना क्रमांक- ६६२

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. नरेंद्र भोंडेकर, श्री. अस्लम शेख, श्री. संजय मेश्राम, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ६६२ पुढीलप्रमाणे आहे:-

"मुंबई येथील आयुक्त परिवहन कार्यालयातील मोटर वाहन निरिक्षक सचिन पाटील यांनी खाजगी वाहन चालक वैभव फडतरे याला सरकार गणवेश घालून त्याच्यासह देवनार येथे वाहन तपासनीसाठी जाणे, मोटार वाहन निरिक्षक पाटील हे देवनार येथे स्वत:च्या वाहनामध्ये बसून सरकारी गणवेशात असलेला खाजगी वाहन चालक वैभव फडतरे याला नियम मोडणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनाचे फोटो काढून नागरिकांना वेठीस धरुन सेटींगच्या नावे मोठया प्रमाणात आर्थिक वसूली करणे, ह सर्व प्रकार उघडया डोळयानी मोटर वाहन निरिक्षक वाहनात बसून बघत असताना सुध्द कोणत्याही प्रकारची कारवाई न करणे, या नियमबाह्य पध्दतीने सुरु असलेल्या कार्यवाहीमुळे नागरिकांनी सचिन पाटील यास विचारणा कली असता उडवाउडवीचे उत्तर देणे, पदाचा दुरपयोग, नियमबाह्य पध्दतीने खाजगी व्यक्तीला सरकारी गणवेश घालून राजरोसपणे वसूली व हप्तेखोरी करणाऱ्या मोटर वाहन निरिक्षक पाटील व खाजगी व्यक्ती फडतरे यांच्या विरोधात तक्रार करून सुध्दा अघापही कोणतीच कारवाई होत नसल्यामुळे नागरिकात पसरलेले तिव्र असंतोष, परिणामी या गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी करून संबधित अधिकारी व खाजगी व्यक्तीवर फौजदारी कारवाई होण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

मा. मंत्री (परिवहन) यांचे निवेदन

मोटार वाहन विभागात राज्यातील वायुवेग पथकांमार्फत रस्ता सुरक्षा अमंलबजावणी व करवसुली संदर्भात कामकाज केले जाते. मोटार वाहन विभागातील कार्यरत वाहनचालकांनी ओळख पटण्यासाठी खाकी रंगाचा गणवेश परिधान करणे व ओळखपत्र दर्शनी भागावर लावणेबाबत परिवहन आयुक्त कार्यालयाने दिनांक २४.०२.२०२५ रोजीच्या परिपत्रकानुसार सूचना जारी केल्या आहेत. मोटार वाहन विभाग अतंर्गत अंमलबजावणी पथकाद्वारे मोटार वाहन कायदा व त्याअंतर्गत नियमातील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर प्रभावीपणे कार्यवाही करण्याकरिता संपूर्ण महाराष्ट्र राज्यात वायुवेग पथकाद्वारे विशेष तपासणी मोहिम राबविण्यात येते. श्री. सचिन आत्माराम पाटील, मोटार वाहन निरीक्षक हे दिनांक २८.०५.२०२५ रोजी शासकीय वाहन क्र. एम.एच. ०४ के.आर. ६४७७ ह्या वाहनावर अमंलबजावणी वायुवेग पथक- १ अंतर्गत

कर्तव्यात कार्यरत होते. त्यांच्या सोबत वाहन चालक श्री. वैभव सुरेश फडतरे हे देखील कर्तव्यात हजर होते. श्री. वैभव सुरेश फडतरे हे मे. ब्रिक्स इंडिया प्रा.लि. यांचे मार्फत मोटार वाहन विभागातील वाहन चालक पदाकरिता बाह्य यंत्रणेद्वारे कंत्राटी चालक म्हणून दिनांक १२.११.२०२१ रोजी नेमण्यात आले होते. श्री. सचिन आत्माराम पाटील, मोटार वाहन निरीक्षक ई-चलान मशीनद्वारे वाहनांची तपासणी करीत असतांना रस्त्यावर वाहतुक कोंडी निर्माण झाली. तसेच इतर वाहनांना त्याचा त्रास होत असल्याने श्री. वैभव सुरेश फडतरे, वाहन चालक हे वाहतुक कोंडी दूर करण्यासाठी वाहनांना पुढे जाण्यास सूचित करीत असतांना याबातचे व्हिडिओ रेकॉर्डिंग केले असल्याने निदर्शनास आले आहे. श्री. वैभव फडतरे, वाहन चालक हे दिनांक १७.१०.२०२३ पर्यत ब्रीक्स कंपनीद्वारे पदस्थापनेवर होते. श्री. सचिन आत्माराम पाटील, मोटार वाहन निरीक्षक, परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांना दिनांक ०५.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सह परिवहन आयुक्त (अमंल-२) व सह परिवहन आयुक्त (संगणक) यांचे नियंत्रणाखाली अंमलबजावणीच्या कर्तव्यापासून दूर करून अकार्यकारी करण्याची कारवाई करण्यात आली आहे. याबाबत श्री. सचिन आत्माराम पाटील, मोटार वाहन निरीक्षक यांनी दि. २८.०५.२०२५ रोजीच्या वाहनतपासनीच्या व्हिडिओक्लिप समाजमाध्यमात प्रसारीत झालेबाबत दिनांक २९.०५.२०२५ नुसार त्यांना ज्ञापन देण्यात आले.

**********************************

**लक्षवेधी सूचना क्रमांक - १८३५**

## महाराष्ट्र विधानसभा
### सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.** यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली **लक्षवेधी सूचना क्र. १८३५** पुढीलप्रमाणे आहे:-

"गुणवंत निकम, मोटार वाहन निरीक्षक, अंधेरी हे विनाआदेश शनिवार व रविवार शासकीय सुट्टीच्या दिवशी मालवाहतूक वाहने व बसेस इत्यादी वाहनांना योग्य (फिट) नसलेल्या वाहनांना योग्यता प्रमाणपत्र देत असल्याची माहिती माहे जून २०२५ मध्ये समोर येणे, मोटार वाहन कायद्यातील तरतुदी व नियमानुसार एका दिवसात सरासरी २५ ते ३० अवजड वाहनांना फिटनेस प्रमाणपत्र देणे अपेक्षितअसणे, श्री. निकम यांनी दि. १८ फेब्रुवारी २०२४ रोजी एक दोन नव्हे तर तब्बल १४५ वाहनांना प्रमाणपत्र दिले असल्याचे समोर येणे, अशा अनफिट हजारो वाहनांना नियमबाह्य परवाने त्यांनी बहाल केले असणे, त्यामुळेच रस्त्यावरील अपघाताचे प्रमाण वाढले असुन मोठ्या प्रमाणावर जिवित हनी होत असल्याने सदर अधिकाऱ्यावर तातडीने निलंबनाची कारवाई करुन त्यांनी दिलेल्या सर्व प्रमाणपत्राची चौकशी करुन प्रमाणपत्र रद्द करुन कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

### मा. मंत्री (परिवहन) यांचे निवेदन

मालवाहतूक, प्रवासी सेवा, तीन चाकी रिक्षा, तीन चाकी मालवाहू इत्यादी वर्गातील एकूण १४५ वाहनांची योग्यता प्रमाणपत्रे दिनांक १८.०२.२०२४ रोजी जारी करण्यात आल्याचे वाहन प्रणालीवरील नोंदी नुसार दिसून आले आहे. सदर कामकाजाबाबत कार्यालयीन अभिलेखानुसार तीन अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. मोटार वाहन निरीक्षकांची पदे रिक्त असल्यामुळे मोटार वाहन निरीक्षक यांच्या अनुपस्थितीत कार्यालयीन कामकाज सहायक मोटार वाहन निरीक्षक यांच्या मार्फत करण्यात येते.

मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या आदेशान्वये २५० मी. लांबीच्या टेस्ट ट्रॅकवर योग्यता प्रमाणपत्र विषयक वाहनाची चाचणी घेण्याबाबत निर्देश प्राप्त आहेत. प्रादेशिक परिवहन कार्यालय मुंबई (पश्चिम) कार्यालयात २५० मी. लांबीचा टेस्ट ट्रॅक उपलब्ध नसल्याने उपलब्ध असलेल्या ऐरोली, नवी मुंबई येथील टेस्ट ट्रॅकवर वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र विषयक वाहन तपासणी/चाचणी संबंधी कामकाज करण्यात येते. रविवार, दिनांक १८ फेब्रुवारी २०२४, तसेच त्याच्याआधीचा शनिवार, दिनांक १७ फेब्रुवारी २०२४ व त्यानंतरचा सोमवार, १९ फेब्रुवारी २०२४

या दिवशी शिवजयंती निमित्त सार्वजनिक सुट्टी असल्याने कामकाजासाठी कार्यालय बंद होते. तथापि, परिवहन आयुक्त कार्यालयाकडून वेळोवेळी निर्गमित केलेले परिपत्रके तसेच निर्देशानुसार मुंबई व इतर महानगर क्षेत्रांतील प्रलंबित फिटनेस प्रकरणे लक्षात घेता, वाहनांच्या योग्यताप्रमाणपत्र तपासणीचे कामकाज सुरु ठेवण्याचे निर्देश राज्यातील सर्व प्रादेशिक कार्यालयांना देण्यात आले होते.

मोटार वाहन विभागामार्फत वाहन तपासणी ही केंद्रीय मोटर वाहन नियम १९८९ च्या नियम ६२ नुसार करण्यात येते. तसेच सदर वाहन तपासणीवर नियंत्रक अधिकारी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अथवा त्यांचे नियंत्रक अधिकारी प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे नियंत्रण असते. त्यांच्याकडून याबाबत कोणताही अभिप्राय किंवा आक्षेप वाहन प्रणाली अथवा नस्ती मध्ये नोंदविलेला असल्याचे अभिलेखावरुन दिसून आले नाही. त्यामुळे यांत्रिक दृष्टया योग्य नसलेल्या वाहनांना योग्यता प्रमाणपत्र दिले असल्याची बाब अभिलेखावरुन सद्यस्थितीत दिसून येत नाही.

सदर प्रकरणात १४५ वाहनांची योग्यता प्रमाणपत्रांची चाचणी एक मोटार वाहन निरीक्षक व दोन सहायक मोटार वाहन निरीक्षक यांच्याकडून करण्यात आलेली असून योग्यता प्रमाणपत्र प्रदान करण्याची कार्यवाही मोटार वाहन निरीक्षक यांच्या लॉग इन आयडी मधून करण्यात आली आहे. अनफिट' वाहनांना प्रमाणपत्र दिल्यामुळेच रस्ते अपघातांचे प्रमाण वाढले, असा सरसकट निष्कर्ष सध्या उपलब्ध अभिलेखाच्या आधारे सिद्ध होत नाही.

...............

लक्षवेधी सूचना क्र.१२८३

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.१२८३

श्री. संदिप क्षीरसागर मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१२८३ पुढीलप्रमाणे आहे :-

**"बीड तालुक्यातील नाळवंडी, काळेगाव हवेली, म्हाळसजवळा, पोखरी (मैदा), बोरफडी, रुद्रापुर, हिवरापहाडी, घोडका राजुरी, खडकीघाट या गावासह तालुक्यातील इतर गावांमध्ये नरेगा अंतर्गत विविध विकास कामे चालु असणे, एजन्सी/कंत्राटदार व अधिकारी यांनी संगणमत करुन कामामध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार करणे, तसेच कामामध्ये दिरुक्ती व कामे निकृष्ट दर्जाची करणे, मजुरांच्या हाताने अकुशलची कामे करणे गरजेचे असताना देखील सदरील कामे मशिनरीने करणे, अकुशल निधी वितरीत होत असताना त्याची मजुरांना कल्पना सुध्दा नसणे, अँगल कॅम मध्ये दैनंदिन फोटो काढताना फोटो एडीट करुन टाकणे, शासनाकडील कुशलची देयके देत असताना संबंधित कंत्राटदाराकडे जिएसटी, आयकर व नोंदणीकृत परवाना नसणे, सदरील प्राप्त तक्रारीच्या अनुशंगाने दिनांक १४/०५/२०२५ रोजी प्रशासनाला सोबत घेऊन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रत्यक्ष कामाची पाहणी करणे, झालेल्या अनियमिततेची व भ्रष्टाचाराची चौकशीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या कडून जिल्हाधिकारी बीड, मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद बीड, सचिव रोजगार हमी योजना मंत्रालय मुंबई यांच्याकडे होणे, सदर विषयी शासनाने तात्काळ कार्यवाही करण्याची आवश्यकता व भुमिका."**

**मा.मंत्री (रोजगार हमी ) यांचे निवेदन**

मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजनेअंतर्गत सन २०२३-२४ आर्थिक वर्षाच्या आराखड्यास शासनस्तरावरुन मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार ग्रामपंचायत नाळवंडी, ता.जि. बीड येथे मंजुर असलेली पाणंद रस्ता खडीकरण व मजबुतीकरणाची कामे पुर्ण करण्यात आली आहेत. ग्रामपंचायत नाळवंडी, ता. जि. बीड येथे महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत पाणंद रस्त्यांच्या कामांसंदर्भात प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड यांच्या स्तरावरुन तपासणी करण्यात आली होती. तसेच, प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने कामांची पडताळणी (क्रॉस चेकींग) करण्यासाठी उप अभियंता व शाखा अभियंता, उप विभाग, गेवराई यांचेमार्फत ग्रामपंचायत नाळवंडी येथील पाणंद रस्त्यांच्या कामांची चौकशी करण्यात आली होती. सदर कामे तांत्रिकदृष्टया योग्य असुन कामांचे मुल्यांकन देखील योग्य झाल्याचे चौकशी अहवालात नमुद केल्याने काही कामांची कुशल व अकुशल देयके पारीत करण्यात आली आहेत.

२. तद्नंतर लोकप्रतिनिधींच्या मागणीस अनुसरुन ग्रामपंचायत नाळवंडी व ग्रामपंचायत काळेगांव हवेली ता. जि. बीड येथील कामांची कार्यकारी अभियंता, जि.प. बीड यांचेमार्फत चौकशी करण्यात आली. सदरील कामे ही इतर योजनेतून झाली नसलेबाबतचे प्रमाणपत्र व जागा उपलब्धतेचे प्रमाणपत्र सरपंच व ग्रामसेवक यांच्या स्वाक्षरीने संचीकेसोबत जोडलेले नसणे, मजुरीची रक्कम बँक खात्यामध्ये जमा झाली असल्याचे कामावरील मजुरांनी प्रत्यक्ष हजर राहुन सांगीतले असणे आणि सदरील सर्व कामे ही अंदाजपत्रकानुसार तांत्रिक व भौतिकदृष्ट्या झाल्याचे दिसून आले आहे, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

तसेच, काळेगाव हवेली या ग्रामपंचायतींतर्गत मनरेगा योजनेंतर्गातील ०१ ग्रामपंचायत भवन, ०१ सिमेंट रोड, ०१ पेव्हरब्लॉकचे काम आणि ०६ पांदण रस्त्यांचे काम असे एकुण ९ कामांची समितीमार्फत तपासणी करण्यात आली आहे. ग्रामपंचायत भवनाचे काम अपूर्ण असून सिमेंट रस्त्यांची जाडी सरासरी अंदाजपत्रकानुसार व रुंदी अस्तित्त्वात असलेल्या रस्त्याप्रमाणे घेण्यात आली आहे. तसेच, पेव्हर ब्लॉकच्या कामाची संचिका उपलब्ध झाली नाही. तथापि, पेव्हर ब्लॉकचे काम सुस्थितीत असल्याचे नमूद आहे. पांदण रस्त्यांच्या कामांवर प्रत्यक्ष ट्रायल पीट

घेऊन त्यामध्ये खडी व मुरुम असल्याची समितीने खातरजमा केली आहे. मात्र, पाणंद रस्त्यांच्या कामांवर नामफलक नाहीत व कामांचे दोन भाग करुन प्रशासकीय मान्यता देण्यात आली असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

३. बीड जिल्ह्यातील नाळवंडी, घोडका राजुरी, म्हाळसजवळा, रुद्रापुर, हिवरापहाडी, अवलपूर, बोरफडी आणि मौजे पोखरी या ग्रामपंचायती अंतर्गतील एकुण १४४ मनरेगाच्या कामांच्या तक्रारी लोकप्रतिनिधींद्वारे प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार आयुक्त, नरेगा, नागपूर यांनी विभागीय आयुक्त यांना त्यांचे कार्यालयातील कार्यकारी अभियंता, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, अधिक्षक, कृषी अधिकारी व लेखा अधिकारी यांचे स्वतंत्र पथक निर्माण करण्याचे निदेश देण्यात आले होते. सदर निदेशानुसार विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी कार्यकारी अभियंता (रोहयो), यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १६/०६/२०२५ रोजी चौकशी समिती गठीत केली आहे.

४. सदर चौकशी समितीने आजपावेतो एकुण १४४ पैकी ३४ कामांची चौकशी केली असुन त्यात काही कामांच्या प्रशासकीय मान्यतेच्या आदेशांमध्ये अकुशल व कुशल रक्कम नमुद नसणे, काही कामांचे मागणीपत्रक, मुळ हजेरीपत्रक, साईट नकाशा, कामाचे डिझाईन इ. उपलब्ध नसणे. तसेच, पंचायत समितीस्तरावर मस्टर ट्रॅकर आढळुन न येणे, गटविकास अधिकारी, यांच्याकडुन अधिकारकक्षेबाहेर प्रशासकीय मान्यता देण्यात येणे, मंजुर सिमेंट रस्त्याच्या कामाचे दोन भाग करुन वेगवेगळ्या ठिकाणी कामे करणे इ. प्रशासकीय अनियमिततेच्या बाबी आढळुन आल्या आहेत. तसेच, मौजे हिवरापहाडी येथील ९,मौजे पोखरी (मैदा) येथील ७ व मौजे रुद्रपुर येथील २ कामांच्या तक्रारी प्राप्त होत्या. तथापि, सदर कामांपैकी मौजे हिवरापहाडी व मौजे पोखरी (मैदा) येथील प्रत्येकी २ कामे व मौजे रुद्रपुर येथील ०१ काम सुरु झालेली नाहीत व त्यांचे हजेरीपत्रक देखील निर्गमित झालेले नाहीत असेदेखील अहवालात नमूद करण्यात आले आहे.

तसेच, प्रत्यक्ष खडीकरणाचे काम झाले नसतांनाही मोजमाप पुस्तिकेत खडीकरणाची नोंद असणे, झालेल्या कामाची दैनंदिन नोंद घेण्याऐवजी मोजमाप पुस्तिकेमध्ये एकदाच नोंद घेणे, निविदा प्रक्रिया न राबविणे, कामाचे फोटो उपलब्ध नसणे, सामुग्रीची गुणवत्ता चाचणी न करणे इ. तांत्रिक अनियमिततेच्या बाबी निदर्शनास आल्या आहेत. तसेच, मौजे. पोखरी (मैदा), मौजे हिवरापहाडी, मौजे रुद्रपूर येथील काही कामे भौतिकदृष्टया पुर्ण झालेली असूनही सदर कामांच्या कुशल बाबींची नोंद मोजमाप पुस्तिकेत घेण्यात आली नसल्याचे दिसून आले आहे. कामांच्या झालेल्या खर्चाबाबतचे रोख पुस्तक, बँक स्टेटमेंट, कुशल देयके व ताळमेळ प्रपत्र इ. प्राप्त करुन समितीद्वारा तपासणी करण्यात येत आहे.

उर्वरीत ११० कामांची चौकशीसह अंतिम चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

**********

महाराष्ट्र विधान सभा

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

जलसंपदा विभाग (खारभूमी) लक्षवेधी सूचना क्र.१२२५

**श्री.महेंद्र दळवी, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१२२५ पुढीलप्रमाणे आहे:-**

"मौजे नांदगाव व खारआंबोली ता. अलिबाग, जि. रायगड येथील खारबंधाऱ्याची कामे खारभूमी विकास विभागाची असून उक्त कामे जिल्हा ग्रामीण पुरवठा, जि.प. रायगड यांनी विनापरवानगी केल्याचे माहे जून, २०२५ च्या दरम्यान निदर्शनास येणे, महाराष्ट्र खारभूमी विकास अधिनियम १९७९ अन्वये खारभूमी विकास विभागाने विनापरवानगी करण्यात आलेल्या उक्त दोन्ही कामाबाबत जि.ग्रा.पा.पु.विभाग, जि.प. रायगड यांच्याकडे कोणत्याच प्रकारची चौकशी न करणे, उक्त दोन्ही कामे केल्याचा दाखला देत ठेकेदार अवैध प्रकारे खार भूमी विकास विभागाची कामे मिळवत असणे, अशाप्रकारे जि.ग्रा.पा.पु.विभाग, जि.प. रायगड यांच्या विनापरवानगी केलेल्या कामाबाबत कोणती कार्यवाही करण्यात येणार असणे, तसेच उक्त दोन्ही कामे केल्याचा दाखला देत ठेकेदार अवैधरीत्या मिळवलेल्या ठेकेदाराची कामे रद्द करुन अशा ठेकेदारांवर गुन्हा दाखल करुन काळया यादीत टाकण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**-: मा. मंत्री (खार जमिनी विकास) महोदय यांचे निवेदन :-**

मौजे नांदगांव व खारआंबोली ही गावे अलिबाग तालुक्यात नसून ती मुरुड तालुक्यात आहेत. सदर ठिकाणी अनुक्रमे नांदगांव मजगांव खारभूमी योजना व मुरुड आंबोली खारभूमी योजना खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग, ता. पेण, रायगड या विभागाकडे आहे. सदर योजना ह्या रायगड जिल्ह्यातील एकूण १६५ योजनांपैकी असून खारभूमी विभागास सदर योजनांना सी. आर. झेड मान्यता मिळालेली आहे. खारलँड विकास अधिनियम १९७९ मधील तरतुदीनुसार सदर योजना शासनाच्या ताब्यात आहेत व सदर योजनांवर काम करण्याचा अधिकार फक्त खारभूमी विभागाचा आहे.

खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग, पेण यांनी त्यांच्याकडील कामांच्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया राबवली असता एका निविदाकाराने निविदेसोबत निविदेतील अटी शर्ती मधील अट क्रमांक ५.३.१. नुसार ची माहिती देताना नांदगांव येथील खारबंधा-याच्या दुरुस्तीच्या कामाचा दाखला दिला होता.

मात्र सदर दाखल्यामध्ये दिलेले परिमाण हे निविदेतील अटी व शर्तीच्या परिमाणांची पुर्तता करीत नसल्यामुळे संबंधित अभिकरणास या निविदा प्रक्रियेत अपात्र ठरविण्यात आले.

तसेच या दाखल्याच्या आधारे ठेकेदाराला खारभूमी विकास विभागामार्फत काम दिलेले नसल्यामुळे त्याच्यावर गुन्हा दाखल करुन काळया यादीत टाकण्याबाबत कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन
## महाराष्ट्र विधानसभा नियम १०५अन्वये लक्षवेधी सूचना

श्री. मोहन मते, डॉ.जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र.३६ पुढील प्रमाणे आहे:-

"बीड जिल्ह्यातील गेवराई येथील छत्रपती मल्टीस्टेटने एका शेतकऱ्याच्या कष्टाच्या नऊ लाख रुपयांच्या ठेवी परत करण्यात कमालीची हेळसांड केल्याने शेतकऱ्याने मल्टीस्टेटच्या समोरच आत्महत्या केली असल्याची घटना दिनांक १८ जून, २०२५ रोजी घडली असणे, या शेतकऱ्याने सन २०२० मध्ये छत्रपती मल्टीस्टेटमध्ये ११ लाख ५० हजार रुपये ठेवले असणे, मुलांच्या शिक्षणासाठी ही रक्कम काढण्यासाठी संबंधित शेतकरी आणि त्याचे कुटुंब गत दोन वर्षांपासून छत्रपती मल्टीस्टेटमध्ये चकरा मारीत असणे, परंतु तरीदेखील छत्रपती मल्टीस्टेटने शेतकऱ्याचे हक्काचे पैसे देण्यात केलेली अक्षम्य दिरंगाई आणि टाळाटाळ, दिनांक १७ जून, २०२५ रोजी देखील संबंधित शेतकरी आपल्या पत्नीसह छत्रपती मल्टीस्टेटच्या कार्यालयाबाहेर दिवसभर बसून राहिला असणे, तरीदेखील त्याला ठेवी परत मिळाल्या नसल्याने संबंधित शेतकऱ्याने नैराश्येपोटी उचललेले आत्महत्येचे टोकाचे पाऊल, सदरहू प्रकारामुळे राज्यातील मल्टीस्टेटच्या गैरकारभारावर निर्माण झालेले शिक्कामोर्तब, तरी देखील शासनाचे मल्टीस्टेटच्या गैरकारभाराकडे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे निष्पाप शेतकऱ्याचा नाहक गेलेला जीव, यास्तव सदर प्रकरणी सखोल चौकशी करून छत्रपती मल्टीस्टेटच्या दोषी पदाधिकाऱ्यांवर शासनाने करावयाची कारवाई आणि शासनाची प्रतिक्रिया."

---

### मा. मंत्री (सहकार) यांचे निवेदन-

छत्रपती मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीची नोंदणी केंद्र सरकारच्या मल्टीस्टेट को-ऑपरेटीव्ह सोसायटीज ॲक्ट, २००२ अंतर्गत करण्यात आलेली आहे. मल्टीस्टेट को ऑपरेटीव्ह सोसायटीवर राज्य शासनाचे नियंत्रण नाही.

छत्रपती मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या मुख्य कार्यालयास सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था गेवराई यांनी भेट दिली असता मुख्य कार्यालयाला पोलीस प्रशासनाच्या वतीने सील करुन कुलूप लावलेले असल्याचे निदर्शनास आले आहे. पोलीस निरीक्षक, गेवराई यांनी छत्रपती मल्टीस्टेट गेवराईचे चेअरमन संतोष बसंता भंडारी, गेवराई तालुका गेवराई, जिल्हा बीड यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता BNS २०२३ चे कलम १०८ अन्वये दिनांक १८ जून २०२५ रोजी एफ आय आर क्रमांक ३७९/ २०२५ अन्वये गुन्हा दाखल केल्याचे निदर्शनास आले आहे व पुढील तपास पोलीस विभाग करीत आहे.

प्राथमिक माहितीनुसार, गेवराई येथील शेतकरी श्री. सुरेश आत्माराम जाधव, खळेगाव, तालुका गेवराई यांनी छत्रपती मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीमध्ये सन २०२० मध्ये ११ लाख ५० हजार रुपये ठेव म्हणून ठेवले होते. त्यांना मुलांच्या शिक्षणासाठी यातील ९ लाख रुपये काढायचे होते. गेल्या दोन वर्षांपासून ते सातत्याने संस्थेकडे पाठपुरावा करत होते. १७ जून २०२५ रोजी देखील ते त्यांच्या पत्नीसह दिवसभर कार्यालयाबाहेर बसले होते, परंतु त्यांना पैसे मिळाले नाहीत. या आर्थिक अडचणी आणि संस्थेकडून झालेल्या दिरंगाईमुळे नैराश्य येऊन त्यांनी १८ जून २०२५ रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याचे निदर्शनास आले आहे. संस्थेचे कार्यालय बंद असल्यामुळे व कोणतेही रेकॉर्ड प्राप्त न झाल्यामुळे इतर कोणाच्या किती ठेवी आहेत याबाबत माहिती प्राप्त झालेली नाही.

राज्य शासनाचे सदर मल्टीस्टेट संस्थेवर नियत्रंण नसल्यामुळे गैरकारभाराकडे अक्षम्य दुर्लक्ष झालेले आहे असे म्हणता येणार नाही. बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, २००२ चे कलम ८४(४) अन्वये लवाद नियुक्त करणे व कलम १०८ अन्वये संस्थेची तपासणी करणे या व्यतिरिक्त इतर कोणतेही वैधानिक अधिकार राज्याच्या निबंधकास नाहीत.

राज्यातील बहुराज्यीय सहकारी संस्थांबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने केंद्रीय निबंधक, सहकारी संस्था, भारत सरकार, नवी दिल्ली या कार्यालयाचे एक प्रादेशिक कार्यालय महाराष्ट्र राज्यापुरते स्थापन करण्याची विनंती दि.१८.०७.२०२४ च्या पत्रान्वये मा.केंद्रीय मंत्री यांना मा.मंत्री (सहकार) यांच्या स्तरावरुन करण्यात आली आहे. त्यानुषंगाने राज्य शासनाच्या विनंतीनुसार केंद्र शासनाने पुणे येथे प्रादेशिक कार्यालय सुरु करण्याचा निर्णय घेतला असल्याचे मा.केंद्रीय सहकार मंत्री यांनी दिनांक ०५.०५.२०२५ च्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री महोदयांना कळविले आहे.

****************

लक्षवेधी सूचना क्र.१४३५

३७३

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना

**श्री. प्रवीण तायडे वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १४३५ पुढील प्रमाणे आहे:-**

"नीरज अर्बन को-ऑपरेटिव निधी बँक रजि.न.U६५१००MH२०२२PLM३८८३७६ निधी स्थापन करून या बँकेच्या माध्यमातून संस्थापक युवराज भगवान गिरे, रा. बीड याने शेतकऱ्यांची व नागरिकांची फसवणूक करून १४ ते १५ कोटी रुपये रुपयाचा घोटाळा करून अमरावती जिल्ह्यातील चांदूरबाजार, शिरजगाव कसबा,परतवाडा, करजगाव, अचलपूर येथे शाखा स्थापन करून तेथील लोकांची १४ ते १५ कोटी रुपयांनी फसवणूक करणे, या नीरज अर्बन निधी लिमिटेड या बँकेच्या माध्यमातून या ठिकाणी शाखा उघडून एफडी, आरडी, डेली कलेक्शनच्या माध्यमातून नागरिकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक केलेली असणे, तसेच तिथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची नेमणूक करून त्यांच्या पगाराची एक कोटी रुपये रक्कम घेऊन या नीरज अर्बन को-ऑपरेटिव्ह लिमिटेड बँकेचा संस्थापक युवराज भगवान गिरे हा पसार झालेला असणे, या बँकेच्या शाखा इतरही ठिकाणीही असणे, नीरज अर्बन कॉपरेटिव्ह लिमिटेड च्या माध्यमातून धुळे येथे पण असाच घोटाळा केलेला असणे, मात्र अद्यापर्यंत या युवराज भगवान गिरे यावर कोणत्याच प्रकारची कारवाई व अटक झालेली नसणे, सदरहू प्रकरणी तात्काळ कारवाई करून अमरावती जिल्ह्यातील शिरजगाव, चांदूरबाजार, करजगाव, परतवाडा, अचलपूर येथील नागरिकांचे १४ ते १५ कोटी रुपये नागरिकांना परत मिळून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, यावर शासनाची प्रतिक्रिया.."

---

**मा. मंत्री (सहकार) यांचे निवेदन-**

नीरज अर्बन को-ऑप निधी बँक लि. अमरावती (रजि. नंबर U65100MH2022PLM388376) ही बँक अमरावती जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती या कार्यालयाचे अधिनस्त महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अंतर्गत नोंदणी झालेली नाही. तथापि Ministry Of Corporate Affairs, Government of India यांचे वेबसाईट्वर नीरज अर्बन को-ऑप निधी बँक लि. अमरावती या संस्थेचे नांव NIRAJ URBAN COOP NIDHI LIMITED असे दिसून येते. त्यामुळे सदर संस्था सहकार विभागाच्या अधिकार क्षेत्रात येत नाही.

चांदूर बाजार, अचलपूर, परतवाडा, करजगांव व शिरसगांव कसबा, तसेच या गावांमध्ये त्या त्या तालुक्यातील सहायक निबंधक, सहकारी संस्था यांचेमार्फत प्रत्यक्ष जावून तपासणी केली असता सदर गावांमध्ये नीरज अर्बन को ऑप निधी बँक लि. अमरावती असे फलक दिसून आले आहेत. सदर शाखा बरेच दिवसांपासुन बंद असल्याने त्यांच्या व्यवहाराबाबतची माहिती प्राप्त झाली नाही. नीरज अर्बन को-ऑप निधी बँक यांनी को-ऑपरेटीव्ह (सहकार) या शब्दाचा वापर केल्याचे निर्दशनास आल्याने महाराष्ट्र सहकरी संस्था अधिनियम १९६०, चे कलम १४५(१) व कलम १४८(३) अन्वये कारवाई करण्याच्या सुचना जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांना दिल्या आहेत. धुळे व नागपुर जिल्हयांमध्ये सदर संस्थेची कोणतीही शाखा नसल्याने फसवणूकीबाबतची तक्रार आढळून आलेली नाही.

सौ. सुधा श्रीकृष्ण हिवराळे, ब्रँच मॅनेजर नीरज मल्टीपर्पज निधी लि., शाखा चांदुर रेल्वे जि. अमरावती यांनी चांदुर रेल्वे पोलीस स्टेशन येथे नीरज मल्टीपर्पज निधी लि., शाखा चांदुर रेल्वे जि. अमरावती चे अध्यक्ष श्री युवराज भगवान गिरे व इतर ६ यांचे विरुध्द आर्थिक फसवणूकीबाबत दिनांक २०.०५.२०२५ रोजी FIR क्र. ०२७३/२०२५ दाखल केली आहे. सदर FIR मध्ये नमुद रक्कम रु.१,०४,१०,९५२/- इतकी आहे. परंतू याबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती या कार्यालयास कोणतीही तक्रार प्राप्त नाही. नीरज मल्टिपर्पज निधी लि. शाखा चांदुर रेल्वे जि. अमरावती या संस्थेची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत झाली नसल्याने त्याबाबत कारवाईचे अधिकार सहकार विभागास नाहीत.

***************

महाराष्ट्र विधानसभा

सन -२०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक -१४५३ पुढील प्रमाणे आहे :-

"मुंबईतील सांताक्रुज प. जुहू येथील गुलमोहर क्रॉस रोड नं. १० जेव्हीपीडी सीएस क. १२७ मधील स्टर्लिंग को. ऑप. सोसायटी सदस्य प्रशांत हिंगोरानी सह काही घरमालकांनी म्हाडाचे उपनिबंधक आदिनाथ दगडे यांचे बरोबर संगनमत करून आर्थिक घोटाळा करण्यात येणे, व्यवस्थापन समिती सदस्य योगेश शेट्टी या मुळ सदस्यांना एम.सी.एस. कायदयाचे कलम ७८ अ (१) (ब) हे कलम लागू होत नसतानाही श्री. दगडे यांनी ५० लाख रूपये लाच घेवून व पदाचा दुरूपयोग करून म्हाडा ठराव क.६४८० दि. ०६/०५/२०१० लागू होते किंवा कसे याबाबत म्हाडाचे अभिप्राय न घेता, उपनिबधकानी सदस्यांना काढुन टाकण्याचा एकतर्फी आदेश जारी केल्याने त्यांचेवर अन्याय होणे, २००४ मध्ये सोसायटीचे अधिकृत सदस्यत्व प्राप्त केलेले प्रशांत शेट्टी हे २५ मे २०१८ रोजीच्या सोसायटी निवडणूकीत विजयी झाल्यानंतर, उपनिबंधकानी प्रशांत शेट्टी सह ५ सदस्यांचे सदस्यत्व रद्द केल्याचा बेकायदा आदेश जारी केल्याने योगेश शेट्टी व जानकी शेट्टी या मुळ सदस्यांना फ्लॅट मिळण्यापासून आणि ५ सदस्यांना सदस्यत्व पदापासून वंचित रहावे लागणे, याबाबत संभाजी ब्रिगेडचे अध्यक्षांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व सहकार आयुक्त यांना दि.३.६.२०२५ रोजी लेखी पत्र देऊनही यावर कोणतीच कार्यवाही न होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही "

मा. मंत्री (सहकार) यांचे निवेदन

जे.व्ही.पी.डी. स्टर्लिंग को ऑप हौ. सोसा लि. या संस्थेची नोंदणी करण्यांबाबत मुख्य अधिकारी, म्हाडा मुंबई यांचेकडील दिनांक १७.०४.२००४ रोजीच्या पत्रान्वये श्री दिपक आर शेटी- मुख्य प्रवर्तक, श्री एच एम चुगानी, श्री स्वरुप एस खेडेकर, श्री रत्नाकर एस शेट्टी, श्रीमती जानकी आर शेट्टी, श्रीमती ज्योती एच शेट्टी, श्री योगेश आर शेट्टी, श्रीमती विनिता शेट्टी, श्रीमती अनुपमा वाय शेट्टी, श्री अजय कणुका, श्री नंदु एन शेट्टी या व्यक्तींच्या नावाचा समावेश करुन संस्थेची नोंदणी करण्यांस म्हाडा मुंबई यांची हरकत नसल्याबाबत उपनिबंधक म्हाडा यांना कळविले होते. त्यानुसार सदर संस्थेची नोंदणी दिनांक २७.०४.२००४ रोजी करण्यात आली आहे.

भाडे करारानुसार संस्थेने म्हाडा मान्यता प्राप्त तीन मुळ खरेदीदार व ११ प्रवर्तक असे एकुण १४ सभासदांची निवासाची व्यवस्था करण्यासाठी १४ सदनिकांचा आराखडा मंजूर करुन घेणे आवश्यक असतांना मुख्य प्रवर्तकाने फक्त ७ मजल्यांची इमारत बांधली असून त्यात फक्त ७ गाळे बांधकाम करण्यात आले आहे. त्यातील ४ सदनिका या पुन्हा १४ व्यक्तींव्यतिरिक्त अन्य ४ व्यक्तींना विक्री केल्या आहेत. त्यामुळे संस्थेमध्ये म्हाडाकडून मंजूर केलेल्या ११ सभासदांच्या सदनिका नाहीत. ज्यांच्या ताब्यात संस्थेची इमारत आहे त्यातील एकूण ७ गाळेधारकांपैकी मुंबई मंडळाने ३ सदनिकाधारकांना मान्यता दिलेली आहे.

संस्थेची निवडणुक दिनांक २८.०५.२०१८ रोजी झाली असून निवडणूक अहवालानुसार त्यामध्ये श्रीमती अंजली शेट्टी, श्रीमती अनुपमा शेट्टी, श्री. पर्वत शेट्टी, श्री. प्रशांत शेट्टी, श्री. उदयकुमार शेट्टी, श्री. योगेश शेट्टी, श्रीमती अर्चना शेट्टी असे एकूण ७ समिती सदस्य निवडून आले. म्हाडाच्या नियमावलीनुसार तसेच संस्थेचे म्हाडाबरोबर झालेले दिनांक २२.०९.२००४ रोजी Deed of Assignment नुसार सभासद बदलास म्हाडा प्राधिकरणाची मान्यता न घेताच संस्थने श्रीमती अंजली शेट्टी, श्रीमती अर्चना शेट्टी, श्री. पर्वत शेट्टी, श्री प्रशांत शेट्टी व श्री. उदयकुमार शेट्टी यांना म्हाडा ठराव क्र. ६४८० दि. ०६.०५.२०१० पूर्वीच हस्तांतरणास मान्यता दिली आहे.

म्हाडा प्राधिकरणाकडील सदर ठरावानुसार गाळे / भुखंड वितरणाच्या ५ वर्षाच्या कालावधीनंतर मिळकतीचे अभिहस्तांतरण झाले असल्यास गाळे / भूखंडाचे हस्तांतरण/नियमितीकरणाची परवानगी म्हाडाकडून घेण्यांची आवश्यकता नाही. तथापि, सदर सभासदांचे हस्तांतरण त्यापूर्वी संस्था स्तरावर करण्यांत आलेले असल्यामुळे त्या हस्तांतरणास म्हाडा प्राधिकरणाची मान्यता असल्याशिवाय अधिकृत सभासद होत नाहीत. त्यामुळे ते व्यवस्थापक समितीवर निवडुन येण्यास अपात्र ठरतात. सबब, प्राधिकरणाच्या पुर्व मंजुरीशिवाय सभासदाच्या यादीमध्ये बदल करता येत नाही व सभासदांच्या पात्रतेस म्हाडा यांची मान्यता असणे आवश्यक आहे.

सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठीचे आदर्श उपविधीतील क्रमांक १९ मध्ये संस्थेचे सदस्य होण्यासाठी व्यक्तींनी पुर्ण करावयाच्या अटी/शर्ती नमूद असून उपविधी क्रमांक १९ (अ) (८) मध्ये सिडको, म्हाडा या विशिष्ठ नियोजन प्राधिकरणाखाली नोंदविण्यांत आलेल्या संस्थांच्या बाबतीत अर्जदार हा संबंधित कायदयातील तरतूदीनुसार व निर्देशक तत्वाखाली पात्र असला पाहिजे अशी तरतुद आहे.

श्रीमती अंजली शेट्टी, श्रीमती अर्चना शेट्टी, श्री पर्वत शेट्टी, श्री प्रशांत शेट्टी, श्री उदयकुमार शेट्टी व श्री. योगेश शेट्टी यांना म्हाडा प्राधिकरणाकडील दिनांक ०६.०५.२०१० रोजीचा ठराव होण्यापूर्वीच संस्था स्तरावर गाळे हस्तांतरण करण्यांत आले आहेत. तथापि, त्यास म्हाडा प्राधिकरणाने रितसर परवानगी दिली नाही. सबब ते समिती सदस्य पदावर कार्यरत राहू शकत नाहीत. सबब, सदर उपरोक्त नमूद कारणांच्या आधारे उपनिबंधक म्हाडा यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ अ (१) (ब) मधील तरतुदीनुसार उपरोक्त नमूद सहा समिती सदस्यांना समिती सदस्य पदावरुन का काढून टाकण्यांत येऊ नये? याबाबतचा लेखी खुलासा सादर करणेकरीता दिनांक ०१.०९.२०२२ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावून व संबंधीतांना सुनावणीची संधी देवून, सदर समिती सदस्यांना म्हाडा प्राधिकरणाच्या मान्यतेअभावी ते संस्थेचे रितसर सभासद नसल्याने त्यांना व्यवस्थापक समिती सदस्यपदी राहण्यास अपात्रता येत असल्याच्या कारणावरून दि.१३.०१.२०२३ रोजीच्या आदेशान्वये समिती सदस्य पदावरून काढून टाकण्यात आले आहे. तसेच त्यांना कायद्यातील उक्त तरतुदीनूसार समितीच्या पुढच्या एका कालावधीची मुदत समाप्त होईपर्यंत कोणत्याही संस्थेच्या, समितीचा सदस्य म्हणून पुन्हा निवडून येण्यास, पुन्हा स्वीकृत केला जाण्यास किंवा पुन्हा नामनिर्देशित केला जाण्यास अपात्र करण्यात येवून संस्थेचे दैनंदिन कामकाज करण्यासाठी प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उपनिबंधक म्हाडा यांचे उपरोक्त आदेशान्वये सदर निष्कासित समिती सदस्यांना केवळ समिती सदस्य पदी राहण्यास अपात्र करण्यात आले असून त्यांना संस्थेचे सभासदत्व व सदनिका मिळण्यापासून वंचित ठेवण्यात आलेले नाही.

उपनिबंधक म्हाडा यांचे दि. १३.०१.२०२३ रोजीचे आदेश हे अर्धन्यायिक स्वरुपाचे आहेत. त्याविरुध्द अपिल / पुनरिक्षण दाखल करण्याची सहकार कायद्यात तरतूद आहे. त्यानुसार श्री. योगेश शेट्टी व इतर यांनी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग मुंबई यांचेकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५२ अन्वये दाखल केलेल्या अपिलामध्ये व मा. मंत्री सहकार यांचेकडील पुनरिक्षण अर्जामध्ये उपनिबंधक म्हाडा यांचे दि. १३.०१.२०२३ रोजीचे आदेश कायम करण्यात आले आहेत. तसेच मा. मंत्री सहकार यांचे सदर आदेशाविरूध्द दाखल रिट पिटीशन क्र. ५३११/२०२४ व रिट पिटीशन क्र. ५३१२/२०२४ मध्येही मा. उच्च न्यायालयाने दिनांक २१.०२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये सदर रिट पिटीशन फेटाळले आहे.

श्री. सुहास राणे, संभाजी ब्रिगेड यांनी शासनाकडे दि. ०३.०६.२०२५ रोजी निवेदन दिलेले असून त्यावर गृहनिर्माण विभागाने दि. ०९.०६.२०२५ रोजीचे पत्रान्वये सदर पत्रावर कार्यवाही करुन अहवाल शासनास सादर करण्याबाबत म्हाडास कळविले आहे.

***************

लक्षवेधी सूचना क्र.१९९६

विषय : सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन
महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१९९६
श्री.हिकमत उढाण, मा. वि.स.स.

"मौजे महाकाळा येथील समर्थ सहकारी साखर कारखाना, महाकाळा व सागर सहकारी साखर कारखाना, तिर्थपूरी (जि. जालना) व्यवस्थापनाने अनेक वर्षापासून शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या ऊस देयकातून विविध कारणांनी रक्कम कपात केलेली असणे, सदर कपातीविरोधात अनेक वर्षे ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी वेळोवेळी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणे व आंदोलने करून न्यायासाठी आवाज उठविला असणे, सन २०१८ पासून स्थानिक शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या ऊस देयकातून विविध कारणांनी देयकांच्या रकमेतून कपात केलेली असणे, सदर कपातीच्या रकमेबाबत विचारणा केली असता कारखाना व्यवस्थापनाकडून कोणतेही समाधारकारक निर्णय अद्याप घेतलेला नसणे, समर्थ कारखान्यांच्या अंतर्गत कार्यरत असलेली खोलेश्वर ग्रामीण बहुउदेशीय सेवा भावी संस्थमार्फत शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या कर्जाच्या रकमेवर तसेच शेअर्स वाटपात करण्यात आलेल्या प्रकरणांमध्ये आर्थिक गैरव्यहार केलेला असणे, आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत स्थानिक शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, सहकार आयुक्त कार्यालय, मुख्यमंत्री कार्यालय तसेच केंद्रीय सहकार मंत्री यांचेकडे लेखी अर्ज तक्रार दाखल करुनही देखील त्यांच्या तक्रारीची कोणतीही दखील अद्याप शासनाकडून घेतलेली नसून शेतकऱ्यांना न्याय मिळालेला नसणे, त्यामुळे हतबल झालेल्या शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे थकित रकमेचा परतावा मिळाला नसल्यास आत्महत्या करण्याकरिता परवानगीची मागणी केलेली असणे, बळीराजाच्या हक्काची रक्कम परत मिळवून देण्याकरिता व शेतकऱ्यांना आत्महत्येपासून रोखण्याकरिता न्याय मिळण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

मा. मंत्री (सहकार) यांचे निवेदन

समर्थ सहकारी साखर कारखाना लि. अंकुशनगर, ता. अंबड, जि. जालना, या कारखान्याचा नोंदणी क्र. जेएएल/पीआरजी/(ए)-१,दि.१०.०२.१९८२ असा आहे.

साखर आयुक्त तथा विशेष निबंधक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि.३१.१२.२०१३ रोजीच्या आदेशान्वये सागर सहकारी साखर कारखाना लि. तिर्थपुरी, ता. घनसावंगी, जि. जालना हा कारखाना समर्थ सहकारी साखर कारखाना लि. अंकुशनगर, ता. अंबड, जि. जालना या सहकारी साखर कारखान्यात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनिमय १९६० चे कलम १७ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १६ अन्वये विलीनीकरण करण्यात आलेले आहे.

साखर आयुक्त तथा विशेष निबंधक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि.३१.१२.२०१३ रोजीच्या आदेशान्वये सागर सहकारी साखर कारखाना लि. तिर्थपुरी, ता. घनसावंगी, जि. जालना या कारखान्याची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनिमय १९६० चे कलम २१ अंतर्गत नोंदणी रद्द करण्यात आलेली आहे.

समर्थ सहकारी साखर कारखान्याव्दारे २०१८ नंतर ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडुन कोणत्याही ठेवी स्विकारलेल्या नाहीत. तथापी कारखान्याच्या २०२४-२०२५ या आर्थिक वर्ष अखेरच्या ताळेबंदानुसार बिगर सभासदांकडुन वसुल करण्यात आलेल्या विनापरतीच्या ठेवी या सदराखाली रु.२,३८,९२,००२.४३/- इतकी, सभासद पुर्वहंगामी ठेव या सदराखाली रु.११,१५,६५३.३० इतकी तसेच को-जन युनिट च्या

अंतर्गत को-जन प्लॅन्ट परतीच्या ठेवी रु.३,३३,५६,९३९/- इतक्या जमा आहेत. अशा एकुण रु.५,८३,६४,५९४.७३ इतक्या रकमेच्या ठेवी स्विकारलेल्या असुन सदर ठेवी खुप वर्षापुर्वी जमा करण्यात आलेल्या आहेत. सदर ठेवी पुढील पाच वर्षे परत न करण्याचा ठराव कारखान्याने अधिमंडळाची वार्षिक सभा दि.१८.०९.२०२१ मध्ये संमत केलेला आहे.

या संदर्भात प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने साखर आयुक्त कार्यालयाने विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ सहकारी संस्था (साखर) जालना यांचेकडून मागविलेला अहवाल प्राप्त होताच नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

खोलेश्वर ग्रामीण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत नोंदणीकृत नसून ही मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० (सन १९५० च्या मुंबई अधिनियम क्र.२९) अन्वये सहाय्यक धर्मादाय आयुक्त, जालना उपविभाग जालना यांचेकडे नोंदविलेली आहे.

**************************************

लक्षवेधी सूचना क्र. २१८२

३४४

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना

श्री.धर्मरावबाबा आत्राम, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २१८२ पुढील प्रमाणे आहे:-

"अनुव्रत को-ऑप क्रेडीट सोसायटी मर्यादित चेंबूर मुंबई येथे कार्यान्वीत असणे, या संस्थेचे व्यवस्थापक व संचालक यांनी संगनमत करुन करोडो रुपयाचा अपहार केल्याचे उघडकीस येणे, सन २०११ ते २०१६ च्या दरम्यान सोने तारण कर्ज देतांना सोने तारण न करता अर्जदाराच्या खोट्या सह्या व बनावट कागदपत्राच्या आधारे कर्ज वाटप झाल्याचे दाखवून संस्थेची फसवणूक केली असणे, सन २०१६ ते २०१८ या कालावधीतील बॅलेन्सशिटवर ऑडीटरच्या खोटया सह्या करुन संचालक मंडळ व काणे यांनी लेखापरिक्षण अहवाल प्रसिध्द केला असल्याचे उघडकीस येणे, कर्जाच्या कागदपत्रावर शासनाची स्टॅम्प डयूटी कमी भरली असणे, मुद्रांक शुल्क विभागाने ३ कोटी ६६ लक्ष रुपयाची दंडात्मक रक्कम वसूल करण्याचे आदेश दिले असणे, सदर बाब ऑडीट करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आली असणे, सदर प्रकरणात उपजिल्हानिबंधक, मुंबई यांनी चेंबूर पोलीस स्टेशन येथे दि. १२/७/२०१९ ला गुन्हा दाखल करण्यात आला असणे, संस्थेचे ७० % कर्ज बुडीत निघाले असणे, याप्रकरणी अद्यापपर्यंत प्रशासकाची नेमणूक करण्यात आली नसणे, संस्थेचे व्यवस्थापक व संचालक मंडळ यांनी केलेल्या अपहाराची चौकशी करुन त्यांचेवर फौजदारी कारवाई होणेकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

मा. मंत्री (सहकार) यांचे निवेदन-

अनुव्रत को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. मुंबई ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतूदीनुसार नोंदणीकृत संस्था आहे. संस्थेचे कार्यक्षेत्र मुंबई शहर-२ जिल्हास्तर असून जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पूर्व उपनगरे, मुंबई -२ यांचे वैधानिक अधिकार कक्षेतील आहे. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (२) पूर्वउपनगरे, मुंबई यांचेकडील दि. ०१/०९/२०२१ रोजीच्या आदेशान्वये पतसंस्थेचे सन २०११-१२ ते २०१५-१६ या कालावधीतील फेरलेखापरिक्षण करण्यासाठी लेखापरिक्षक अधिन विशेष लेखापरिक्षक वर्ग-२ सहकारी संस्था (गृह-७) मुंबई यांची नियुक्ती केली आहे. सदर पतसंस्थेचे फेरलेखापरिक्षण पूर्ण करुन, त्याबाबतचा विशेष अहवाल व विनिदिष्ट अहवाल दि.३१/०५/२०२४ रोजीच्या पत्राने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (२) पूर्व उपनगरे, मुंबई कार्यालयास सादर करण्यात आला आहे. सदर विनिदिष्ट अहवालाच्या आधारे संबंधितावर चेंबूर पोलिस स्टेशन, मुंबई येथे संस्थेचे व्यवस्थापक, संचालक व वैधानिक लेखापरिक्षक यांच्यांवर दि. १७/१२/२०२४ रोजी क्र. ०५५२/२०२४ एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

तसेच सदर विशेष अहवालातील नमूद गंभीर मुद्यांची कलम ८३ अन्वये सखोल चौकशी करण्याकरिता जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (२) पूर्व उपनगरे, मुंबई यांनी त्यांचेकडील दि.१०/०६/२०२४ रोजीच्या आदेशान्वये उपनिबंधक सहकारी संस्था एम विभाग, मुंबई यांची नियुक्ती केली आहे. कलम ८३ अंतर्गत चौकशीचा अहवाल दि.२७/०२/२०२५ रोजी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (२) पूर्व उपनगरे, मुंबई यांच्याकडे सादर केला आहे. सदर अहवालात सन २०११-१२ ते २०१५-१६ या कालावधीत वाटप केलेली कर्ज थकबाकी वसुलीची कारवाई व प्रभावशाली कर्ज, एस.एस.व्ही. एन्टरप्रायजेस बाबत संस्थेमध्ये केलेला गैरव्यवहार, व्यवस्थापक श्री. काणे यांच्या बचत खात्यावरील व्यवहाराबाबत, वैधानिक लेखापरिक्षकाची नियुक्ती व वर्ष इ. मुद्दे

आढळून आले. त्याअनुषंगाने चौकशी करण्यासाठी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (२) पूर्व उपनगरे, मुंबई यांनी दि. १९/०५/२०२५ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अंतर्गत उपनिबंधक सहकारी संस्था एन विभाग, मुंबई यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.

सन २०१६-२०१८ या कालावधीतील ताळेबंदावर ऑडीटरच्या खोटया सहया करुन संचालक मंडळ व श्री. काणे यांनी लेखापरीक्षण अहवाल प्रसिध्द केला असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. सन २०१६-१७ ते २०१७-१८ या कालावधीचे लेखापरीक्षण सनदी लेखापाल यांनी केले आहे. सदर लेखापरीक्षण अहवालात संस्थेमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा कोणताही विशेष अहवाल सादर केलेला नाही. मुद्रांक शुल्क विभागाकडून संस्थेने शासनाची स्टॅम्प डयुटी कमी भरली अथवा त्याबाबत संस्थेविरुध्द दंडात्मक कारवाई केली याबाबत कोणतीही माहिती शासनास प्राप्त नाही.

सदर संस्थेच्या अपहार प्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे अपहाराची रक्कम जबाबदारी निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८३ व कलम ८८ अन्वये कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच संस्थेच्या व्यवस्थापक समितीस बरखास्त करुन संस्थेचे दैनंदिन कामकाज करण्यासाठी प्रशासक / प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती का करण्यात येवु नये, याबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (२) पूर्व उपनगरे, मुंबई यांनी कलम ७८ (अ) (१) अन्वये दि.३०/६/२०२५ रोजी संस्थेस कारणे दाखवा नोटिस बजावली आहे.

त्याचबरोबर सदर संस्थेवर देखरेख ठेवणे, संस्थेचे वर्गीकरण सुधारणे, वसुली व इतर कामकाजाचा पाठपुरावा व्हावा यासाठी सदर बँकेवर उपनिबंधक, सहकारी संस्था, एम विभाग, मुंबई यांची पालक अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. सदर पालक अधिकारी नियमितपणे संस्थेच्या कामकाजावर देखरेख ठेऊन आढावा घेत आहेत.

//-//-//

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना

श्री. रमेश बोरनारे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र. २२१४ पुढील प्रमाणे आहे:-

"मोजे वैजापूर, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर येथील श्री साईबाबा महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बुडाली असणे, सदर पतसंस्थेच्या अध्यक्ष व व्यवस्थापकाने संस्थेच्या ठेवीदारांना व खातेदारांना कोणतीही पूर्वसूचना न देता पतसंस्था बंद करणे, रोजनिशी खातेदारांकडून दैनंदिन अल्पबचत जमा करणाऱ्या पिग्मी एजंटकडून पतसंस्था बंद झाल्याची माहिती खातेदारांना देण्यात येणे, खातेदारांना पतसंस्थेत ठेवी ठेवण्यासाठी जास्त व्याजदराचे आमिष दाखवून ठेवी जमा करून घेण्यात येणे, पतसंस्थेचे अध्यक्ष व व्यवस्थापक यांनी ठेवीदारांच्या पैशांचा गैरवापर करून त्या ठेवींचे योग्य विनियोजन न करता स्वहितासाठी वापर करणे, परिणामी सदर पतसंस्थेच्या खातेदारांना आपल्या कष्टाचे पैसे मिळण्यापासून वंचित रहावे लागणे, याबाबत खातेदारांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका......

---

मा. मंत्री (सहकार) यांचे निवेदन-

श्री. साईबाबा महिला नागरी सहकारी पतसंस्था, मर्या. पडेगांव, जि. छत्रपती संभाजीनगर ही नोंदणीकृत पतसंस्था आहे. श्री. साईबाबा महिला नागरी सहकारी पतसंस्थेमध्ये एकुण १४४७ सभासद असुन रु. ८.५७ कोटी एवढ्या ठेवी आहेत. तसेच संस्थेने रु. ७.४२ कोटीचे कर्जवाटप केल्याचे सन २०२२-२०२३ या कालावधीतील लेखापरिक्षण अहवालात नमूद आहे. संस्थेने मुदत ठेवीसाठी ७ ते १०.५०% पर्यंत व्याज आकारणी तसेच संस्थेकडुन दिलेल्या कर्जावर १६ ते १८% प्रमाणे व्याजाची आकारणी केली आहे. संस्थेचे सन २०२२-२०२३ या कालावधीचे लेखापरिक्षण प्रमाणित लेखापरिक्षक यांनी केले आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने सहकार आयुक्त यांच्या दिनांक २२.०४.२०२५ रोजीच्या आदेशान्वये या संस्थेचे दि.०१.०४.२०२२ ते दिनांक ३१.०३.२०२३ या कालावधीचे चाचणी लेखापरिक्षण करणेसाठी विशेष लेखापरिक्षक वर्ग-०२ यांची नियुक्ती केली आहे.

सदर चाचणी लेखापरिक्षणातील मुद्दयांच्या अनुषंगाने सहकार आयुक्त कार्यालयाच्या दिनांक ११.०५.२०२५ रोजीच्या आदेशान्वये सदर संस्थेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८९ (अ) नुसार तपासणी करणेसाठी सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. पैठण यांची नियुक्ती केली आहे. तथापि, या संस्थेचे कार्यालय बंद असलेने तपासणीसाठी रेकॉर्ड प्राप्त झालेले नाही. म्हणून दि. ०९.०७.२०२५ रोजी तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार, छत्रपती संभाजीनगर यांना जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर यांनी पत्र दिले आहे. संस्थेवर MPID कायदा अंतर्गत कलम ३ व ४ अन्वये वैजापुर पोलीस स्टेशन येथे गुरनं ३२१/२०२५ व शिल्लेगांव पोलीस स्टेशन येथे २० व्यक्तींवर दिनांक २९/०६/२०२५ रोजी गुरनं २६२/२०२५ गुन्हा दाखल झाला आहे. अद्यापपर्यंत कोणालाही अटक करण्यात आलेली नाही. पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखा (ग्रामिण) छत्रपती संभाजीनगर यांचेमार्फत चालू आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७ अ अन्वये सहकार आयुक्तांच्या दि. ०८.०७.२०२५ च्या आदेशान्वये संस्थेचे संचालक मंडळ निष्प्रभावित करुन संस्थेवर सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पैठण यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. प्राधिकृत अधिकाऱ्यांकडून कर्जदारांची सक्तीने वसुली करुन ठेवीदारांच्या ठेवी परत करणेबाबत कार्यवाही करण्यात येईल.

//-//-//

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२५ चे दुसरे पावसाळी अधिवेशन**

श्री. भास्कर जाधव, श्री.सुधीर मुनगंटीवार, श्री.राजु तोडसाम वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.१३७ पुढीलप्रमाणे आहे :-

"राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियाना अंतर्गत अनेक योजना राबविण्यात येत असणे, त्यापैकी जननी सुरक्षा कार्यक्रमामार्फत गर्भवतीच्या सुविधेसाठी "राष्ट्रीय रूग्णवाहिका सेवा" हा उपक्रम राबविला जात असणे, या सुविधेचा लाभ घेण्यासाठी टोल फ्री क्र. १०२ वर संपर्क साधल्यानंतर गर्भवतींना रूग्णालयात आणून प्रसुतीनंतर बाळ व बाळंतीणीला सुखरूप घरी सोडण्याची सुविधा १०२ टोल फ्री रूग्णवाहिकेमार्फत पुरविली जात असणे, राज्यात सुमारे १०२ क्रमांकाच्या सुमारे तीन हजाराहून अधिक रूग्णवाहिका असून या रूग्णवाहिकांना मागील अनेक महिन्यापासून सदर योजनेसाठी केंद्र सरकारने माहे एप्रिल, २०२५ पासून निधी मंजूर न केल्याने परिणामी गर्भवतींना रूग्णवाहिका उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक आणि आरोग्य विभागाचे वैदयकीय अधिक्षक पेट्रोलपंप चालकांकडून रूग्णवाहिकेमध्ये उसनवारी पेट्रोल भरीत असणे, अत्यवस्थ रूग्ण आणि गरोदर महिलांना राज्यातील रूग्णालयात पोहचण्याआधीच प्रवासात मृत्यू ओढवण्याच्या घडत असलेल्या गंभीर घटना, त्यामुळे जिल्हा शल्यचिकित्सक व वैदयकीय अधिक्षक यांना अनेक अडचणींना सामोरे जाऊन ग्रामस्थांमध्ये सुरू असलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने गर्भवतींसाठी १०२ रूग्णवाहिकेची सेवा सुरळीत ठेवण्यासाठी राज्य सरकारने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यासाठी दि. २२ एप्रिल, २०२५ रोजी समर्थन संस्थेने आरोग्य प्रशासनाकडे केलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**श्री.प्रकाश आबिटकर, मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण) यांचे निवेदन**

राष्ट्रीय आरोग्य अभियानातर्फे जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत रेफरल ट्रान्सपोर्ट गरोदर महिलांना व आजारी बालकाला (०-१ वर्ष) यांना मोफत वाहन सुविधा देण्यात येते.

जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम अंतर्गत येणा-या लाभार्थ्यांना मोफत पिक-अप व ड्रॉप-बॅक संदर्भ सेवा देण्यासाठी केंद्रशासनाने प्रकल्प अंमलबजावणी आराखडयाच्या (पीआयपीमध्ये) मंजूर केलेल्या निधीनुसार प्रत्येक वर्षी तेल व इंधनासाठी (POL) निधी राज्यातील सर्व जिल्ह्यांना दिला जातो.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यात येणा-या जननी सुरक्षा कार्यक्रमा मार्फत गर्भवतीसाठी उपलब्ध होणारी १०२ रुग्णवाहिका सेवा अविरत सुरु राहण्यासाठी प्रलंबित असलेला

निधी त्वरीत मिळावा यासाठी समर्थन संस्था, मुंबई यांनी दि.२२/०४/२०२५ रोजीचे निवेदन शासनास दिले आहे. तथापि, यासंदर्भात आरोग्य यंत्रणेकडून कार्यवाही चालूच असते.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता केंद्र शासनाकडून ५ वा हफ्ता मार्च २०२५ अखेर प्राप्त झाला नाही. उपलब्ध अनुदानातून १०२ रुग्णवाहीकांच्या इंधनासाठी दि.२२/०४/२०२५ रोजी रु.११.९६ कोटी जिल्हयांना निधी वितरित करण्यात आला आहे.

तसेच सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता राष्ट्रीय आरोग्य अभियानाचा निधी दि.२०/०६/२०२५ रोजी प्राप्त झाला आहे. यामधून १०२ रुग्णवाहीकांच्या इंधनासाठी दि.१०/०७/२०२५ रोजी रु.१४.९२ कोटी वितरित करण्यात आले आहे. शासकीय रुग्णवाहीका उपलब्ध न झाल्याने रुग्णालयात पोहचण्यापुर्वी मृत्यु झाल्याचे निदर्शनास आले नाही.

रुग्णवाहिकांची दुरुस्तीसाठी राज्याच्या अर्थसंकल्पातून अनुदान उपलब्ध करून देण्यात येते. सदयस्थितीत राज्यात ३३३२ शासकीय रुग्णवाहीका सर्व ३४ जिल्ह्यात कार्यान्वित आहेत.

राज्यातील ३४ जिल्हयामध्ये जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम रेफरल ट्रान्सपोर्ट या कार्यक्रमाअंतर्गत माहे एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ पर्यंत एकूण ८,११,६९८ गरोदर महिलांना व १,२८,४०७ आजारी बालकांना (० ते १ वर्ष) मोफत संदर्भ रुग्णवाहिका सेवा देण्यात आली आहे.

**********

## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन
## श्री. आमश्या पाडवी, मा. वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.३९६ पुढीलप्रमाणे आहे.

"नंदुरबार जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेची अत्यंत दयनीय अवस्था झालेली असणे, जिल्ह्यात अनेक ठिकाणी दवाखाने बांधून ठेवलेले असताना या दवाखान्यांमध्ये आवश्यक असणारा कर्मचारी वर्ग अद्याप पर्यंत भरलेला नसणे, रुग्णालयात आवश्यक असणाऱ्या संसाधने अपुरी असणे, आवश्यक संसाधने व कर्मचारी अभावी रुग्णांना जिल्ह्यात पुरेशी व आवश्यक आरोग्य सेवा मिळायला अडचण निर्माण होत असणे, जिल्ह्यातील बरता परिसर हा अतिशय दुर्गम असल्यामुळे अतिदुर्गम भागात दररोज दोन बालकांचा उपचारा अभावी मृत्यू होत असणे, उपचारा अभावी कुपोषणाचे प्रमाण कमी होण्याअभावी दिवसेंदिवस वाढत असणे, जिल्ह्यातील आरोग्य सुविधा बाबत गेल्या दोन वर्षापासून स्थानिक लोकप्रतिनिधींनी विधानसभा व विधान परिषदेत वारंवार चर्चा करूनही त्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असणे, त्यामुळे नंदुरबार जिल्ह्यातील जनतेमध्ये आरोग्य व्यवस्थेविषयी असंतोषाची भावना निर्माण होणे, त्यावर करावयाची शासनाची उपयोजना व प्रतिक्रिया."

---

### श्री. प्रकाश आबिटकर, मा. मंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे निवेदन

नंदुरबार जिल्हा हा आदिवासी बहुल जिल्हा असुन जिल्हयात एकुण १ जिल्हा रुग्णालय, १ महिला रुग्णालय, २ उपजिल्हा रुग्णालय, १३ ग्रामिण रुग्णालये कार्यान्वित आहेत. तसेच नंदुरबार जिल्ह्यात सद्यस्थितीत एकुण मंजूर ६९ प्राथमिक आरोग्य केंद्रांपैकी सद्यस्थितीत ६४ कार्यरत असून उर्वरित नवीन ५ प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी जागेच्या उपलब्धतेसाठी पाठपुरावा सुरु आहे. तसेच एकुण मंजूर ३७१ आरोग्य उपकेंद्रापैकी सद्यस्थितीत २९३ उपकेंद्र कार्यरत असून ७८ आरोग्य उपकेंद्र कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच सन २०२४-२०२५ या वर्षामध्ये १५ वा वित्त आयोगामार्फत नंदुरबार जिल्ह्याकरिता नवीन ४९ आरोग्य उपकेंद्र व जुने मोडकळीस आलेले ४९ उपकेंद्र असे एकुण ९८ उपकेंद्राच्या बांधकामाकरिता मंजूरी देण्यात आलेली आहे. सर्व कामे तातडीने पुर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

वैदयकिय अधिकारी यांचे गट-अ व गट-ब यांच्या रिक्त असलेल्या पदावर जिल्हा निवड समिती यांचे मार्फत तदर्थ वैदयकिय अधिकारी भरण्यांत येतात. यामध्ये ५० तदर्थ वैदयकिय अधिकारी कार्यरत आहेत. तसेच नंदूरबार जिल्हयातील मातामृत्यु व बालमृत्यु आणि कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याकरिता आयुक्तालय स्तरायरुन प्रत्येक महिन्याकरिता अक्कलकुवा तालुका व धडगांव तालुका येथे स्त्रीरोगतज्ञ व बालरोगतज्ञ यांना प्रतिनियुक्तीने सेवा पुरविल्या जात आहेत.

नंदूरबार जिल्हयातील सदयस्थितीतील आरोग्य संस्थामध्ये एकुण २२२१ पदे मंजूर आहेत. सदर पदांपैकी १३८० पदे भरलेली असून ८४१ पदे रिक्त आहेत. नंदुरबार जिल्ह्यातील आरोग्य संस्थेतील रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

सन २०२३-२०२४ या वर्षीच्या सरळसेवा पदभरती प्रक्रिया राबविण्यात आली असून, सदर भरती प्रक्रियेत उत्तीर्ण झालेल्या पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार अंतर्गत गट-क व गट- ड मध्ये एकुण १०६७ पदे मंजूर असून ६३८ पदे भरलेली असून ४२९ पदे रिक्त आहे. काही उपकेंद्रांत रिक्त पदी नियमित किंवा कंत्राटी आरोग्य सेविकांना अतिरिक्त पदभार देण्यात आलेला आहे.

सन २०२५-२६ या वर्षामध्ये राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम (NQAS) अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रांना व उपकेंद्रांना आवश्यक ती साधन सामुग्री, वैद्यकीय उपकरणे, संसाधने आणि औषधसाठा जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण आणि आदिवासी उपयोजना) आणि राष्ट्रीय आरोग्य अभियान मार्फत पुरविण्यांत येत आहे.

नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा आणि धडगाव तालुका हे मुख्यतः आदिवासी अतिदुर्गम क्षेत्र असल्याने इतर तालुक्यांच्या तुलनेत बालमृत्यूचे प्रमाण जास्त असल्याने याकरिता ऑगस्ट २०२३ पासून

नंदुरबार जिल्ह्यात लक्ष्य ८४ दिवस या मोहिमेअंतर्गत सदर तालुक्यांत कार्यरत वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेविका आणि आशा कर्मचारी यांच्यामार्फत प्रत्येक गरोदर मातेचा प्रसूतीपूर्व आणि प्रसुतीपश्चात ४२ दिवस पर्यंत पाठपुरावा, भेटी देऊन मातेला व बाळाला आवश्यकतेनुसार उपचार व संदर्भसेवा देण्यात येत आहे. तसेच संस्थात्मक प्रसूतीसाठी गरोदर मातांना प्रवृत्त करण्यात येत आहे. परिणामतः अक्कलकुवा व धडगाव या तालुक्यांतील संस्थात्मक प्रसूतीचे प्रमाण वाढलेले आहे. परिणामी माता व बालमृत्युच्या प्रमाणात घट झालेली आहे, माता व बालमृत्यु कमी करण्यासाठी आरोग्य विभागामार्फत नियोजन करुन प्रयत्न करण्यात येत आहेत.

नंदुरबार जिल्ह्यात नियमितपणे महिला बालविकास विभाग आणि आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने अंगणवाडीत दाखल बालकाचे दरवर्षी नियमितपणे स्क्रिनिंग करण्यात येते. सदर स्क्रिनिंग दरम्यान आढळलेल्या SAM कुपोषित बालकांना अंगणवाडीत सुरु असलेल्या ग्राम बालविकास केंद्रात (VCDC) दाखल करुन श्रेणीवर्धन करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत, तसेच ग्राम बालविकास केंद्रांत वजनात वाढ न झालेल्या कुपोषित बालकांना ग्रामीण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालयात सुरु असलेल्या पोषण पुनर्वसन केंद्रात दाखल करुन तज्ञ डॉक्टर मार्फत तपासणी करुन आवश्यक औषधोपचार व आहार देण्यात येऊन त्यांचे श्रेणीवर्धन करण्यात येत आहे.

नंदूरबार जिल्हयामध्ये बाल मृत्यु कमी करण्यासाठी तसेच गंभीर आजारी नवजात बालकांवर उपचार करण्यासाठी २ विशेष नवजात शिशु काळजी कक्ष Special New Born Care Unit (SNCU) व ५ नवजात शिशु स्थिरीकरण कक्ष- (New Born Stabilization Unit (NBSU) व ६ पोषण पुनर्वर्सन केंद्र (Nutrition Rehabilitation Centre-NRC) कार्यरत आहेत. पोषण पुर्नवसन केंद्रामध्ये ५ वर्षाखालील आजारी तीव्र कुपोषित बालकांना १४ दिवस वैदयकिय उपचार व पोषण आहार दिला जातो. तसेच माता व काळजी वाहक यांचे शिशु पोषण बाबतचे कौशल्य वाढविण्यासाठी बाळाची घरी सुध्दा योग्य काळजी घेण्यासाठी मातेस बुडीत मजूरी देण्यात येते.

तसेच घरच्या घरी नवजात शिशुची काळजी (HBNC), जोखीमग्रस्त कार्यक्षेत्रातील आशांमार्फत अतिसार, न्युमोनिया व सेप्सीस या आजारांचे व्यवस्थापन, स्तनपानाविषयी मातेला योग्य माहिती पुरविण्यासाठी तसेच स्तनपानास प्रोत्साहन देण्यासाठी "मा" कार्यक्रम - Mother Absolute Affection (MAA), अतिसाराचा स्टॉप डायरिया कॅम्पेन (Stop Diarrhea Campaign)-अतिसारामुळे होणारे बालमृत्यु टाळण्यासाठी जनजागृती, प्रतिबंधात्मक उपाय व उपचार करण्यात येतात. ॲनिमिया मुक्त भारत- या कार्यक्रमांतर्गत रक्तक्षयाचे प्रमाण कमी करण्यासाठी ६ महिने ते ५९ महिने, ५ ते ९ वर्ष या वयोगटातील बालकांना, १० ते १९ वर्ष या वयोगटातील किशोरवयीन मुला-मुलींना, गर्भवती व स्तनदा मातांना, प्रजननक्षम वयोगटातील स्त्री यांना लोह व फॉलिक ॲसिड (IFA) या औषधाची पूरक मात्रा देण्यात येते. तसेच हिमोग्लोबिनची तपासणी करून अनेमिया असलेल्या माता व बालकांना उपचार देण्यात येतो.

राज्यातील आदिवासी भागातील आरोग्य विषयांचा अभ्यास करण्यासाठी आणि त्याच्यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी दिनांक २७/०३/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरीय समिती स्थापन करण्यात आलेली आहे. तसेच, विभागामध्ये स्वतंत्र आदिवासी कक्षही (Tribal cell) स्थापन करण्यात आलेला आहे.

-----------------------

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्रीमती सना मलिक, डॉ.जितेंद्र आव्हाड, श्री.चेतन तुपे, श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर, श्री. सुरेश धस, श्री. मंगेश चव्हाण, श्री. मनोज जामसुतकर, श्री. योगेश सागर, श्री. सुनिल प्रभू सर्व मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.५०४ पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यात मे,जून २०२५ मध्ये पावसाळा सुरु होताच मुंबईसह सर्व शहरात डेंग्यू, मलेरिया, गॅसस्ट्रो, टायफाईड, कॉलरा, कावीळ अशा आजारांचे शेकडो रुग्ण आढळून येणे, मुंबईत दररोज १३ जणांना मलेरिया आढळून येणे, दि. १ जानेवारी ते ७ जून, २०२५ या कालावधीत मलेरियाचे २,११४ रुग्ण आणि डेंग्यूचे ३७७ रुग्ण आढळून येणे, हे आजार कुंड्या, डबक्यात साचलेल्या पाण्यामुळे होत असल्यामुळे यावर नियंत्रण ठेवण्यासाठी महानगरपालिका व शासनाकडून आवश्यक ती खबरदारी न घेतल्यामुळे मुंबईकरांना डासांपासून होत असलेले विविध आजार रोखण्यासाठी आवश्यक ती प्रतिबंधात्मक खबरदारी घेण्याची गरज, दरवर्षी पावसाळा सुरु झाल्यानंतर अशाप्रकारे आजार सुरु होत असल्यामुळे पावसाळ्यापूर्वीच याची दक्षता घेणे गरजेचे असतांना याकडे प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी मुंबईसह इतर शहरात मोठ्या प्रमाणात मलेरिया, डेंग्यू, टाईफाईड, चिकनगुनीया झालेले अनेक रुग्ण आढळून येत असल्यामुळे या आजारांना आळा घालण्यासाठी महानगरपालिका व शासनाने तात्काळ करावयाची आवश्यक ती उपाययोजना व शासनाची भुमिका."

---

### मा.श्री.प्रकाश आबिटकर, मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे निवेदन.

हिवताप,डेंग्यू, चिकनगुनिया हे कीटकजन्य आजार आहेत. राज्यामध्ये हिवतापाचे माहे १ जानेवारी ते जून २०२४ मध्ये ५४३९ रुग्ण होते तर २०२५ मध्ये ६७८८ इतके रुग्ण आढळून आलेले आहेत, यामध्ये १३४९ रुग्णांची वाढ झालेली आहे. याच कालावधीमध्ये डेंग्यूची रुग्ण संख्या २०२४ मध्ये २३७१ तर २०२५ मध्ये १९०६ असून डेंग्यूची रुग्णसंख्या ४६५ ने कमी झालेली आहे. मुंबईमध्ये वरील कालावधीमध्ये हिवतापाची २०२४ मध्ये २०५५ तर २०२५ मध्ये २८५७ इतकी रुग्णसंख्या होती. त्यामध्ये ८०२ ने रुग्णसंख्या वाढलेली आहे. मुंबईमध्ये डेंग्यूची रुग्णसंख्या २०२४ मध्ये ४३१ तर २०२५ मध्ये ४५२ असून २१ ने रुग्णसंख्या वाढलेली आहे. राज्यामध्ये चिकनगुनिया ची रुग्णसंख्या वरील कालावधीमध्ये २०२४ मध्ये ६४३ तर २०२५ मध्ये ८६४ इतकी असून ११५ ने वाढ झालेली आहे. मुंबईमध्ये चिकनगुनिया ची याच कालावधीत २०२४ ला २१ तर २०२५ ला एकही चिकनगुनिया चा रुग्ण दिसून येत नाही.

कावीळ, गॅस्ट्रो, टाइफाइड, कॉलरा हे दूषित अन्न व दूषित पाणी यामुळे होणारे आजार आहेत. काविळ रुग्णसंख्या मे २०२४ अखेर १२३८ असून मे २०२५ अखेर ती संख्या १४२७ म्हणजे १८९ रुग्ण वाढले आहेत. टाइफाइड रुग्णसंख्या मे २०२४ अखेर १४३३८ असून मे २०२५ अखेर १६३१७ आहे. म्हणजे १९७९ रुग्ण वाढ आहे. गॅस्ट्रो रुग्णसंख्या मे २०२४ अखेर १२,०२४ असून मे २०२५ अखेर १०१९३ रुग्ण आहे. म्हणजे १८३१ रुग्ण संख्या कमी झाली आहे. कॉलरा रुग्णसंख्या मे २०२४ अखेर ६६ असून मे २०२५ अखेर २२ आहे. म्हणजे ४४ रुग्ण कमी झाले आहेत. म्हणजेच जलजन्य आजारामध्ये कावीळ व टायफाईडचे रुग्ण वाढले असून गॅस्ट्रो व कॉलराचे रुग्ण कमी झाले आहेत राज्यामध्ये माहे मे व जूनमध्ये पावसाळा सुरु होऊन मोठ्या प्रमाणात पाण्याची डबकी, कुंड्या आणि वापरत नसलेले टायर्स, घराभोवती तसेच परिसरामध्ये पडलेले निरुपयोगी वस्तू, रिकामे कंटेनर्स यामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये पाणी साठते व यामध्ये मोठ्या प्रमाणात डासांची उत्पत्ती होत असल्याने डासांपासून प्रसार होणाऱ्या कीटकजन्य आजार हिवताप, डेंग्यू, चिकनगुनिया या आजारांची रुग्णसंख्या वाढते. शासनाकडून किटकजन्य आजार नियंत्रण व प्रतिबंधाकरिता नियमितपणे घरोघरी ताप सर्वेक्षण, किटकशास्त्रीय सर्वेक्षण, मोफत रक्तनमुना व रक्तजल तपासणी त्याचबरोबर शासकीय आरोग्य संस्थेत हिवताप, डेंग्यू व चिकनगुनिया करिता मोफत रक्तजल तपासणी व गरजेप्रमाणे संपूर्ण कालावधीत मोफत उपचार दिले जातात.

- वेळोवेळी आरोग्य सेवक, आरोग्य सहाय्यक, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी, आरोग्य पर्यवेक्षक, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, भिषक, बालरोगतज्ञ यांची प्रशिक्षणे शासनामार्फत घेतली जातात.

राज्यातील किटकजन्य आजार रुग्णसंख्येची मागील ३ वर्षांची व ०७ जून २०२५ अखेर पर्यंतची माहिती खालीलप्रमाणे:-

| अनु.क्र. | वर्ष | हिवताप | | | डेंग्यू | | | चिकनगुनिया | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तपासलेले रक्त नमुने | बाधित रुग्ण | मृत्यु | तपासलेले रक्तजल नमुने | बाधित रुग्ण | मृत्यु | तपासलेले रक्तजल नमुने | बाधित रुग्ण |
| १ | २०२२ | १६४७०९५१ | १५४५१ | २६ | ८५९६१ | ८५७८ | २७ | १४७५८ | १०८७ |
| २ | २०२३ | १८०२७९२४ | १६१५९ | १४ | १३४१०८ | १९०३४ | ५५ | ३०८९२ | १७०२ |
| ३ | २०२४ | २०१४४४३१ | २१०७८ | २६ | १५२३९७ | १९३८२ | २६ | ५७४५३ | ५८५२ |
| ४ | २०२४ (०७ जून अखेर) | ४७६३०६३ | ५४३९ | ० | २४३६५ | २३७१ | १ | १२००५ | ६४३ |
| ५ | २०२५ (०७ जून अखेर) | ९५५२७९४ | ६७८८ | ० | ३११३९ | १९०६ | ० | १४३१७ | ८६४ |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता, राज्यात हिवताप, डेंग्यू व चिकनगुनिया यांची रुग्णसंख्या वाढली आहे. कारण २०२२ च्या तुलनेत आता तपासणींच्या प्रमाणात वाढ झाली असल्याने रुग्णसंख्येत जरी वाढ दिसून येत असली तरी प्रत्यक्षात मात्र २०२२ च्या तुलनेत आता मृत्युच्या प्रमाणात घट झाली आहे.

राज्यातील जलजन्य आजार रुग्णसंख्येची मागील ३ वर्षांची माहिती खालीलप्रमाणे

| आजाराचे नाव | २०२२ | | २०२३ | | २०२४ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लागण | मृत्यु | लागण | मृत्यु | लागण | मृत्यु |
| कॉलरा | ११०४ | २० | २२ | १ | १०२८ | ४ |
| गॅस्ट्रो | २१४२५ | ० | २७७५७ | ० | २७५८२ | ४ |
| काविळ | २११३ | ० | २४०३ | ० | ३१६६ | १ |
| टायफाईड | २९७३० | ० | ३८६१४ | ० | ४५७०७ | ० |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता, रुग्णसंख्या अल्पशा प्रमाणात वाढली असली तरी, २०२४ मध्ये लागण झालेली रुग्णसंख्या विचारात घेता कॉलरा-४, गॅस्ट्रो-४ व काविळ-१ असे मृत्यू आहेत. तर, टायफाईड आजारामध्ये ३ वर्षात एकही मृत्यू झालेला नाही.

राज्यातील ३० मे २०२४ व ३० मे २०२५ अखेर तुलनात्मक माहिती खालीलप्रमाणे

| ३० मे अखेर | कॉलरा | | गॅस्ट्रो | | काविळ | | टायफाईड | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागण | मृत्यु | लागण | मृत्यु | लागण | मृत्यु | लागण | मृत्यु |
| २०२४ | ६६ | ० | १२०२४ | ० | १२३८ | ० | १४३३८ | ० |
| २०२५ | २२ | ० | १०१९३ | ० | १४२७ | ३ | १६३१७ | ० |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता असे आढळून येते की, राज्यातील कावीळ व टायफाईड या आजारांची रुग्णसंख्या वाढली असून कॉलरा व गॅस्ट्रोच्या रुग्ण संख्येत घट झाली आहे.

मुंबई शहरातील माहे जानेवारी ते जून, २०२४ आणि जानेवारी ते जून, २०२५ या कालावधीतील विविध आजारांची तुलनात्मक रुग्णसंख्या खालीलप्रमाणे

| आजार | जानेवारी ते जून २०२४ | | जानेवारी ते जून२०२५ | |
|---|---|---|---|---|
| | रुग्ण संख्या | मृत्यु | रुग्ण संख्या | मृत्यु |
| हिवताप(मलेरिया) | २०५५ | २ | २८५७ | ० |
| डेंग्यू | ४३१ | ० | ४५२ | ० |
| चिकूनगुनिया | २१ | ० | १३६ | ० |
| गॅस्ट्रो | ४२०० | ० | ४५१३ | ० |
| काविळ | ३४७ | ० | ४३७ | ० |
| टायफाईड | १३०१ | ० | ९५६ | ० |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता मुंबई शहरात हिवताप, डेंग्यू, चिकनगुनिया ,गॅस्ट्रो व काविळ यांचे रुग्णसंख्येत सन २०२४ च्या तुलनेत वाढ झाली आहे. तसेच टायफाईडचे रुग्ण कमी झाले आहेत. तपासणींची संख्या वाढवली असल्यामुळे एकूण रुग्णसंखेत जरी वाढ दिसत असली तरी प्रत्यक्षात गंभीर रुग्णांचे प्रमाण कमी असून मृत्यू दरात गेल्या वर्षीच्या तुलनेत घट झाली आहे.

मा.मंत्री. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी दि.१२.०६.२०२५ रोजी सर्व जिल्हा व महापालिकास्तरीय अधिकारी यांची पावसाळा पूर्व तयारीबाबतची बैठक घेऊन साथरोग प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा आढावा घेतला व सर्व यंत्रणांनी सतर्क राहून तात्काळ योग्य ती कार्यवाही करण्याबाबत सूचना दिल्या असून, त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

मा.सचिव, आरोग्य सेवा व कुटुंब कल्याण व मा.सचिव, नागरी विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी दि.०२.०७.२०२५ रोजी साथरोगाबाबत महापालिका क्षेत्रातील डेंग्यू या संसर्गजन्य आजारांचा दुरदृश्य प्रणालीद्वारे आढावा घेतला व येणाऱ्या पावसाळा काळात सतर्क राहून तात्काळ योग्य ती कार्यवाही करण्याबाबत सूचना दिल्या असून, त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

मा.संचालक, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण (किटकजन्य आजार), भारत सरकार यांनी दि.०४.०७.२०२५ ते दि.०६.०७.२०२५ या काळात मुंबई महानगरपालिका क्षेत्रात विविध आरोग्य संस्थांना भेटी देऊन संसर्गजन्य (किटकजन्य) आजारांचे सध्यस्थितीचा आढावा घेऊन व कार्यवाही करण्याबाबत सूचना दिल्या असून, त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

राज्यामध्ये किटकजन्य आजारांच्या प्रतिबंधासाठी खालील उपाययोजना राबविल्या जातात:-

- आरोग्य सेवक/सेविका तसेच आशा कार्यकर्ती यांचे मार्फत घरोघरी जाऊन जलद ताप रुग्ण सर्वेक्षण तसेच डास नियंत्रणासाठी प्रभावी कीटकशास्त्रीय सर्वेक्षण केले जाते.
- प्रत्येक शासकीय आरोग्य संस्थेत हिवतापाकरिता रक्तनमुने तपासणी केली जाते. तसेच, राज्यामध्ये गंभीर रूग्णांच्या व्यवस्थापनाकरिता हिवतापासाठी ८९ तसेच डेंग्यूकरीता ५० सेंटीनल सेंटर्स (प्रयोगशाळा) कार्यान्वित आहेत.
- पावसाळयाच्या काळात संपर्क तुटणा-या गावांमध्ये (दुर्गम व अतिदुर्गम भागात) हिवतापाच्या तात्काळ निदानासाठी रॅपिड डायग्नोस्टीक टेस्ट किट तसेच उपचाराकरिता औषधसाठा त्या भागातील आशा कार्यकर्ती यांचेकडे ठेवण्यात येतात.
- या आजाराचे शहरी भागामध्ये प्रमाण जास्त असल्याने राज्यातील १३ महानगरपालिकांना सर्वेक्षणासाठी ब्रीडिंग चेकर्सच्या माध्यमातून मनुष्यबळ पुरवठा केला गेला आहे.
- राज्यामध्ये जीवशास्त्रीय उपाययोजनेंतर्गत डासोत्पत्ती स्थानांमध्ये डास अळीभक्षक गप्पीमासे सोडण्यात येतात. सदर जीवशास्त्रीय उपाययोजना ग्रामीण तसेच शहरी भागातही आहे.
- दरवर्षी जागतिक हिवताप दिन (२५एप्रिल) आणि राष्ट्रीय डेंग्यु दिन (१६ मे) तसेच माहे जून "हिवताप प्रतिरोध महिना" व माहे जुलै "डेंग्यू प्रतिरोध महिना" विविध उपक्रम घेऊन साजरा केला जातो.

- शालेय आरोग्य शिक्षणांतर्गत शालेय विदयार्थ्यांना डासआळी प्रात्यक्षिक दाखवून त्या नष्ट करावयाचे प्रशिक्षण दिले जाते. तसेच प्रभात फेरी, निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा अश्या उपक्रमांद्वारे डेंग्यूची जनजागृती केली जाते.
- किटकजन्य आजाराला प्रतिबंध करणेसाठी करावयाच्या उपाययोजनांची अंमलबजावणी करणेसाठी जनतेला आरोग्य शिक्षण देण्यात येऊन लोक सहभाग वाढविण्यात येतो.
- राज्यातील डेंग्यू आजारामुळे होणारे मृत्यूचे प्रमाण कमी करणेसाठी डेंग्यू रूग्ण व्यवस्थापन व उपचार पध्दतीचे ५०३ वैद्यकीय अधिकाऱ्यांना वेळोवेळी (Clinical Management ) प्रशिक्षण दिले आहे. भीषक (फिजीशियन), बालरोग तज्ञ यांना प्रशिक्षकांचे प्रशिक्षण (TOT) देण्यात आले आहे. या प्रशिक्षकांनी त्यांचे विभागातील वैद्यकिय अधिकारी व रुग्णालयीन कर्मचारी यांना प्रशिक्षित केले आहे.
- राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम योग्य रितीने राबविला जावा याकरिता राज्य / जिल्हा / तालुका / प्रा.आ.केंद्र स्तरावरुन क्षेत्रीय भेटीद्वारे मुल्यमापन व संनियंत्रण केले जाते.
- राज्यामध्ये किटकजन्य आजारांच्या ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागामध्ये डेंग्यूचे प्रमाण ( सन २०२३ मध्ये शहरी भागात ६१% व ग्रामीण भागात ३९%, सन २०२४ मध्ये शहरी भागात ५९% व ग्रामीण भागात ४१% ) अधिक असल्याचे दिसून येते.

### जलजन्य आजाराबाबत प्रतिबंधात्मक व नियंत्रणात्मक उपाययोजना

जलजन्य आजाराचे उद्रेक टाळण्यासाठी कृती योजना तयार करुन खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते-:

- रुग्ण सर्वेक्षण करणे साथरोगाच्या नियंत्रणासाठी प्रत्यक्ष सर्वेक्षण नियमित केले जाते.
- पिण्याच्या पाण्याची नियमित तपासणी करुन शुध्द पाणी पुरवठा करण्याबाबत संनियंत्रण करणे.
- सर्व साथीच्या आजाराच्या रुग्णांवर उपचार करणेकरीता प्रत्येक आरोग्य संस्थेत व्यवस्था सुसज्ज ठेवण्यात येते.
- सार्वजनिक विहीरी व कुपनलिकांच्या पाण्याची जिल्हा, राज्य आरोग्य प्रयोग शाळांमार्फत नियमित तपासणी करणे.
- पाणी पुरवठयाच्या पाईप मधील असलेल्या गळत्या शोधणे व दुरुस्ती करणे.
- जोखमीच्या गावांची यादी तयार करणे - अशा गावांच्या ग्रामपंचायतीना लाल रंगाचे कार्ड देवून साथरोग प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याची सूचना देण्यात येते.
- ग्रामपंचायत नगरपालिका/महानगरपालिका अथवा जिल्हापरिषद यांच्या अंदाजपत्रकात ब्लिचिंग पावडरच्या खरेदीबाबत पाठपुरावा करणे.
- साथरोग नियंत्रणासाठी औषधांचा साठा पुरविला जातो.

### मुंबई शहरामध्ये किटकजन्य आजारांच्या प्रतिबंधासाठी खालील उपाययोजना राबविल्या जातात-

पावसाळापूर्व तयारी -Mosquito abatement committee.

- पावसाळा पूर्व प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या तयारी करीता - मा. मनपा आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली सदर आढावा सभा दोन वेळा आयोजित करण्यात आली असून सदर सभेस मुंबईतील विविध संस्था तसेच प्राधिकरण जसे रैल्वे, एनटीपीसी (NTPC ), म्हाडा, पीडब्ल्यूडी, विमानतळ प्राधिकरण, बीपीटी (BPT) इत्यादी उपस्थित होते. तसेच या संस्थांचे कार्यक्षत्रात येणाऱ्या इमारती व पाण्याच्या टाक्या हे डास प्रतिबंधात्मक करून घेण्यात आले व त्याकरिता संयुक्त भेटी तसेच कृती योजना राबवून डास प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या.
- विविध विभागांमध्ये राबवण्यात आलेल्या पावसाळापूर्व डास प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि एडिस सर्वेक्षणामध्ये, ५३,५६,३३४ कंटेनर्सची तपासणी केली असता, एडिस डासांची ६३,६९४ उत्पत्ती स्थाने आढळून आल्याने ती नष्ट करण्यात आली. तसेच बांधकाम क्षेत्रे आणि सोसायट्या यांना सूचना पत्र देण्यात आले आणि ६९६ खटले दाखल करण्यात आले.

- याचबरोबर, विभागातर्फे "अडगळ हटाव मोहीम (odd article removal)" राबवण्यात आली. या मोहिमेत जुने टायर, पाण्याच्या टाक्या, नव्या, प्लास्टिक कंटेनर यांसारख्या ५,३५७ टायर्स सह एकूण २,३५,३९८ अडगळीच्या वस्तू हटवण्यात आल्या.
- विशेष प्रशिक्षण - मलेरिया, डेंग्यू आणि चिकनगुनिया निदान व उपचार याबाबत वैद्यकीय, निमवैद्यकीय, खाजगी वैद्यकीय व्यवसायिक जसे की IMA तसेच विविध वैद्यकीय संघटना यांचे प्रशिक्षण घेण्यात आलेले आहे. तसेच, बांधकामाच्या ठिकाणी बांधकाम सुरक्षा अधिकारी यांचे प्रशिक्षण घेण्यात आले.
- एकूण ४,११८ बांधकाम आस्थापनांची विशेष उपक्रमांतर्गत पाहणी करण्यात आली, ज्यामध्ये ८ ते १० प्रमुख पायाभूत सुविधा प्रकल्पांचा (मेजर इन्फ्राप्रोजेक्ट) समावेश आहे. त्यामध्ये कार्यरत असणाऱ्या एकूण ५६,३२१ बांधकाम मजुरांची विशेष मोहीम (Special Drive) राबवून रक्ततपासणी करण्यात आली, ज्यामध्ये ३० मजूर हिवतापाने बाधित असल्याचे आढळले. या सर्व बाधित रुग्णांचा उपचार करण्यात आला.

पावसाळ्यातील उपाययोजना -

- सर्वेक्षण - रुग्णाच्या घराच्या परिसरामध्ये जलद ताप सर्वेक्षण करण्यात येते. फोकाय आधारित सर्वेक्षण (Foci based surveillance), घरोघरी व वस्तीपातळीवर सर्वेक्षण करून तापाचे रुग्ण शोधून रक्ताचे नमुने घेतले जातात. तसेच, रुग्ण मलेरिया आजार बाधित आल्यास समूळ उपचार देण्यात येतात.
- तपासणी - ताप रुग्णांची तपासणी आणि बाधित रुग्णांना निदानानुसार तसेच लक्षणानुसार उपचार दिला जातो.
- डास प्रतिबंधात्मक उपाययोजना - रुग्ण राहत असलेल्या परिसरामध्ये किटकशास्त्रीय सर्वेक्षण आणि डासोत्पत्ती स्थानांचा शोध घेऊन त्यामध्ये अळीनाशक कार्यवाही करण्यात येते. तसेच, गप्पीमासे सोडण्यात येतात.
- विशेष कार्यवाही अंतर्गत अति जोखमीच्या क्षेत्रांसाठी विशेष कृती आराखडा तयार करून डासनियंत्रण आणि अडगळीचे सामान शोधून नष्ट करण्यासाठी धडक मोहीम राबविली जाते.
- फवारणी - कीटक विभागातर्फे वेळोवेळी डासनियंत्रणकरिता धूरफवारणी करण्यात येते.
- विविध विभागांशी समन्वय साधून डास प्रतिबंधात्मक उपाययोजना वेळोवेळी राबविण्यात येतात.

विशेष मोहीम / आढावा -

- अति जोखिमेच्या क्षेत्रात नियंत्रणासाठी विशेष मोहीम राबविली जाते. तसेच, प्रत्येक विभागस्तरावर वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्या अंतर्गत मान्सून कंट्रोल रूम तसेच आरोग्य केंद्रस्तरावर रॅपिड रिस्पॉन्स टीम तयार करण्यात आली आहे.

जनजागृती -

जागतिक हिवताप दिन, हिवताप प्रतिबंध महिना जून, डेंग्यू दिवस, डेंग्यू प्रतिबंध महिना जुलै यामध्ये जनतेमध्ये जनजागृती करण्यात येते. तसेच शाळा, महाविद्यालयामध्ये, मोठ्या सोसायट्या तसेच वस्तीपातळीवर विविध माध्यमांद्वारे जसे की (Mumbai against Dengue App) जनजागृती करण्यात येत असून "भाग मच्छर भाग" ही विशेष मोहीम लघुपटाच्या माध्यमातून जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे.

**************

लक्षवेधी सुचना क्र. १७८५

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी अधिवेशन)

श्री. संजय मेश्राम, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे:-

"कुही (जि.नागपूर) तालुक्यात कार्यरत आशा स्वयंसेविका त्यांच्या कार्यक्षेत्रात माता व बालमृत्यू कमी करण्यासाठी तसेच आरोग्य विभागाच्या संबंधित ५२ योजना व कामे करीत असणे, त्यांना या कामाचा अल्प मोबदला मिळत असणे, त्यावर त्यांची उपजिवीका अवलंबून असणे, परंतु माहे फेब्रुवारी, २०२५ ते जुन, २०२५ पर्यंतच मानधन मिळालेले नसणे, त्यामुळे त्यांना दैनंदिन खर्च चालविणे अडचणीचे होऊन आर्थिक समस्या निर्माण होणे, त्यामुळे या आशा स्वयंसेविकांना त्यांचे थकित मानधन तातडीने मिळावे, अशी त्यांची मागणी असतानाही त्याकडे शासन असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी या आशा सेविकांत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, सबब शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया."

## निवेदन

राज्यात आशा कार्यक्रमातंर्गत ग्रामीण व नागरी भागात एकुण ८१८९९ आशा स्वयंसेविकांची पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. त्यापैकी ७८०९१ आशा स्वयंसेविकांची नियुक्त करण्यात आली आहेत.

आशा ही सामाजिक कार्यकर्ती असून त्यांना केंद्र शासनाने प्रकल्प अंमलबजावणी आराखडयात मंजूर केल्याप्रमाणे ग्रामीण आशांना ६२ व शहरी आशांना ४२ बाबींवर कामावर आधारीत मोबदला अदा करण्यात येतो.

आशांना केंद्र शासनाचे ४ बाबींवर काम केल्यास रू. २०००/-, आयुष्मान आरोग्य मंदिर प्रमाणकाच्या कामासाठी समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेविका व आशा स्वयंसेविका यांच्या गटास मोबदला दिला जातो. त्यामध्ये आशा स्वयंसेविकांना रु.१०००/- मोबदला देण्यात येतो. याप्रमाणे केंद्रशासनाचा दर महिन्याला रु. ३०००/- निधी आशांना देण्यात येतो. राज्य शासनाकडून आशांना रु. १००००/- दरमहा मानधन देण्यात येते. आशांना केंद्र व राज्य शासन मिळून एकत्रित रू.१३०००/- मासिक मानधन / मोबदला अदा करण्यात येतो.

या व्यतिरिक्त ६२ बाबींवरील कामावर आधारित मोबदला आशांना अदा करण्यात येत असून अंदाजित सरासरी रु.६०००/- कामावर आधारित मासिक मोबदला आशांना अदा करण्यात येतो. राज्य शासनाचा निधी आशांना वेळेत देण्यात येतो. नागपुर जिल्हयातील कुही तालुक्यात एकुण १०५ आशा स्वयंसेविका कार्यरत असुन त्यांना राज्यशासन मोबदला जुन २०२५ पर्यंत अदा करण्यात आलेला आहे. मात्र, केंद्र शासनाचा निधी वेळीच प्राप्त न झाल्यामुळे जानेवारी, २०२५ पासून देता आला नव्हता.

सदर केंद्र शासनाचा निधी दि.०४/०७/२०२५ रोजी प्राप्त झाला असून त्यामधून दिनांक ०७/०७/२०२५ रोजी आशांचे प्रलंबित मानधन अदा करण्यासाठी जिल्हा व महानगर पालिकास्तरावर निधी वितरीत करण्यात आला आहे.

**********************